महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),
छत्रपती संभाजीनगर

शिक्षणातील

दीपस्तंभ





यशोगाथा
2023-24















School Leadership Academy
(SLA-MIEPA)
Maharashtra

प्रेरणा

मा.रनजीतसिंह देओल, भा.प्र.से.

प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य,

मा.सूरज मांढरे, भा.प्र.से.

आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

मा.प्रदिपकुमार डांगे, भा.प्र.से.

राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

मा.राहूल रेखावार, भा.प्र.से.

संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

मुख्य संपादक

डॉ.वैशाली जामदार

संचालक

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर

संपादक

श्री. प्रकाश मुकुंद

उपसंचालक

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर

सहसंपादक

डॉ.ज्योती कुलकर्णी

समन्वयक

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर

तथा

नोडल अधिकारी, SLA-MIEPA, महाराष्ट्र

सहा.संपादक

डॉ.कल्पना जोशी

समन्वयक

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर



आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

संपादकीय

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये देशाच्या वाढत्या विकासात्मक गरजा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच या धोरणात प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्जनशील क्षमतेवर भर देण्यात आला आहे.या शतकातील शाश्वत विकास ध्येय प्राप्त करणे शक्य होईल अशी सक्षम शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

नव्या शैक्षणिक धोरणात सर्जनशील विचार,चिकित्सक विचार, संभाषण, सहकार्य, आत्मविश्वास या कौशल्यांवर भर दिला आहे. या शैक्षणिक धोरणात गुण पत्रिकेऐवजी सर्वांगीण प्रगतीचे पुस्तक असेल, ज्यात अद्वितीय क्षमता, योग्यता, दृष्टीकोन, प्रतिभा, कौशल्य, कार्यक्षमता आणि विद्यार्थ्यांच्या इतर क्षमतांचा तपशील असेल, या सर्व बाबींचा विचार करून या शतकातील आव्हान पेलण्यासाठी सक्षम नागरिक तयार होण्यासाठी शाळांमधून विद्यार्थी घडत आहे.

आव्हाने असो कितीही,
सामर्थ्य आमच्या मनात आहे,
साधावयाचा केवळ बालकांचा विकास आहे.

अशा ध्येयाने प्रेरित होऊन विविध आव्हानांचा सामना करून विद्यार्थी हिताचे उपक्रम, कृती करणारे शालेय नेतृत्व व त्यातून निर्माण होणाऱ्या या यशोगाथांना राज्य, राष्ट्रीय पातळीवर स्थान मिळावे, त्यातून इतरांना प्रेरणा मिळावी म्हणून महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर या संस्थेने महाराष्ट्रातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधून वेगळा मार्ग यशस्वीपणे स्वीकारणाऱ्या व सकारात्मक बदल घडवून आणणाऱ्या शाळा यशोगाथांचे संकलन करून वाचकांना उपलब्ध करून दिले आहे.

या यशोगाथा वाचताना आपल्या लक्षात येते की काहीतरी उत्तुंग करण्याची जिद्द बाळगावी, विचारांवर विश्वास ठेवावा आणि आपल्या कर्तुत्वाने ते साध्य करावे, शालेय नेतृत्वाच्या सहकार्याने शिक्षक आज केवळ पुस्तकी ज्ञान न देता एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी सक्षम असा विद्यार्थी घडवीत आहेत. Children must be taught, How to think and not what to think, या आशयानुसार मुलांच्या विचारांना नवी दिशा देणारे शिक्षक या यशोगाथेत दिसून येतात.

समाजातील प्रतिभावंत, अनुभवी, उच्चविद्याविभूषित व्यक्तीच्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग विद्यार्थी समुपदेशन, मार्गदर्शनासाठी केला जातो. ज्येष्ठ व्यक्तीचा शालेय तास, आजी आजोबा दिवस या सारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना ज्येष्ठांच्या अनुभवाचा फायदा होतो आणि हे अनुभव त्यांना पथदर्शक ठरतात. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी हंगामी वसतिगृह, बांधावरची शाळा घेणारे शिक्षक आपल्याला येथे दिसतात. ऑक्सिजन पार्क सारख्या संकल्पनेतून वृक्षारोपणाचे महत्व अधोरेखित करणारे शिक्षक इथे आहेत. Astronomy Club ची स्थापना करून विद्यार्थ्यांना अवकाश निरीक्षणाची संधी उपलब्ध करून देणारे शालेय नेतृत्व इथे पहायला मिळते.

बालसाहित्य संमेलनातून मुलांना विविध साहित्य प्रकारांची ओळख करून देणारे, बचत बँक, ग्राहक भांडार अशा उपक्रमातून नफा, तोटा, सहकार तत्व याबाबत माहिती देणाऱ्या शाळा, शिक्षक, मुख्याध्यापक या यशोगाथा वाचताना पहायला मिळतात. बोलक्या बाहुल्यांच्या उपक्रमातून मनोरंजनातून अध्ययन आणि विविध सामाजिक विषयावरील जसे बेटी बचाव बेटी पढाव, वृक्षारोपण, स्त्री सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन, जल संवर्धन या सारख्या विविध समस्यांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता घडवून आणणारे शिक्षक इथे आहेत. या मानसिकतेतून विद्यार्थ्यात देव पाहणारा आणि त्यालाच दैवत मानणारा शिक्षक इथे आहे. ग्रेट भेट सारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांपुढे आदर्श ठेवणारे, कला आणि क्रीडा या माध्यमातून शिकणे सोपे करणारे शिक्षक इथे आहेत. थोडक्यात विद्यार्थ्यांना योग्य दिशेने पुढे नेणारे हे नेतृत्व बहुआयामी बनत आहे.

प्रत्येकाचा मार्ग वेगळा, परंतु ध्येय मात्र विद्यार्थी विकासाचे म्हणूनच या मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या कृतीतून तयार झालेल्या शाळा यशोगाथा म्हणजे शिक्षण प्रवासातील दीपस्तंभच आहेत ज्या प्रकाशबीजे रुजविण्याचे काम करत आहेत आणि जणू सांगत आहेत.....

आम्ही प्रकाशबिजे रुजवीत चाललो
वाटा नव्या युगाच्या रुजवीत चाललो
काट्यावरून जाता मागे न पाय घेऊ
हसऱ्या कळया,फुलांची स्वप्ने विणून घेऊन
ओसाडमाळ आम्ही फुलवीत चाललो
वाटा नव्या युगाच्या रुजवीत चाललो.

या यशोगाथा वाचल्यानंतर आपल्यालाही नवनवीन कल्पना सुचतील, प्रेरणा मिळेल आणि देशाचे भविष्य घडविणाऱ्या या कार्यात आपले मोलाचे योगदान असेलच. विद्यार्थी विकासासाठी सतत धडपडणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक यांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा!!!

डॉ.वैशाली जामदार
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन
व प्रशासन संस्था (मिपा)
छत्रपती संभाजीनगर



आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

संपादकीय

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर मार्फत शिक्षणातील नवीन विचार प्रवाहांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील मुख्याध्यापक ते राज्यस्तर अधिकारी यांच्याकरिता नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यातीलच एक उपक्रम म्हणजे ज्या शाळांनी नवीन प्रवाहांची अंमलबजावणी करून शाळेमध्ये सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. अशा शाळांच्या यशोगाथा राज्यभरातील शिक्षक, मुख्याध्यापक यांना वाचण्यासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. शालेय नेतृत्वाच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांच्या कर्तुत्वाची ज्योत प्रज्वलित होत असते हे यशोगाथांमध्ये दिसून येते. या यशोगाथा म्हणजे शिक्षणातील दीपस्तंभच आहेत. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, भौगोलिक अडथळे दूर करत शालेय नेतृत्वाने आणि त्यांच्या सहकार्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे उद्दिष्ट साधले आहे.

या यशोगाथेत नवीन विचार, कौशल्य आणि व्यावसायिक शिक्षणाची अंमलबजावणी करणारे शालेय नेतृत्व दिसते. विद्यार्थ्यांच्या पायाभूत क्षमता विकसित करण्यासाठी धडपडणारे शालेय नेतृत्व, लिंग समावेशकतेला चालना देणारे, सामाजिक न्याय, निःपक्षपातीपणा यासाठी कार्य करणारे तसेच पाय जमिनीवर ठेवून आभाळ कवेत घेण्याची स्वप्ने पहायला लावणारे शालेय नेतृत्व या यशोगाथेमध्ये दिसते. विद्यार्थ्यांना प्रेरित करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असावे यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील विविध पैलू विकसित करण्यास आणि वाढविण्यास शिक्षक मदत करतात हे या यशोगाथेत पाहायला मिळते. समाजातील सर्व स्तरातील विविध क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वीकारून त्यांच्यातील विशेष, क्षमतांना समोर आणण्यासाठी धडपडणारे शिक्षक व मुख्याध्यापक इथे दिसतात, अशा उपक्रमशील शिक्षक, मुख्याध्यापक यांचे प्रयत्न पाहून समाधान वाटते म्हणूनच या यशोगाथेतील कृतीतून निश्चितच सर्व शालेय घटक आणि पर्यवेक्षीय यंत्रणांना प्रेरणा मिळेल असा विश्वास वाटतो.

शालेय विद्यार्थ्यांना समृद्ध अनुभवाच्या संधी देणाऱ्या या शाळा इतरांना दिशादर्शक ठरतील. यातून प्रेरणा घेऊन आगामी काळात आपली शाळा उत्तमतेकडे जाण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापक निश्चितच प्रयत्न करतील असे वाटते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची रुजवण करणारा, ती मूल्ये वृद्धिंगत होण्यासाठी संस्कार करणारे शालेय नेतृत्व आपल्या कृतीतून जणू सांगताहेत...

या मुलांना या फुलांना, रंग द्या आणि गंध द्या
पाकळ्यांना या कळ्यांना, साद द्या प्रतिसाद द्या
भाव ज्यांचा देव आहे, भाव त्यांना घेऊ द्या
भरधाव ज्यांची धाव आहे, गाव त्यांचे होऊ द्या
होऊ द्या साकार स्वप्ने, आकार त्यांना घेऊ द्या
आकाश आणि अवकाशही, ग्रहगोल त्यांना पाहू द्या
नक्षत्र ज्यांचे छत्र आहे, क्षेत्र त्यांना आजमावू द्या
पुत्र हे आधार भू चे, मात्र त्यांना मंत्र द्या.

बागेमधील फुले आणि वर्गातील मुले हे आजचे आशेचे किरण आहेत. या मुलांच्या प्रगतीसाठी अविरतपणे मेहनत घेणाऱ्या सर्व शिक्षक आणि मुख्याध्यापक यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा !!!

श्री.प्रकाश मुकुंद
उपसंचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन
व प्रशासन संस्था (मिपा)
छत्रपती संभाजीनगर

जिल्हा अंतर्गत शाळानिहाय यशोगाथा

अनुक्रमणिका

अनुक्रमांक	जिल्हा	शाळेचे नाव	क्षेत्र	पृष्ठ क्रमांक
1	ठाणे	मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळा क्रमांक 35, डाचकूलपाडा,काशिमिरा रोड, (पूर्व), जि.ठाणे.	स्थानिक/ भौगोलिक व सामाजिक परिस्थितीनुसार घेतलेले विशिष्ट उपक्रम	1-17
2	ठाणे	जिल्हा परिषद केंद्रशाळा, काल्हेर, ता.भिवंडी,जि. ठाणे.	गुणवत्ता वाढीतून पटसंख्या वाढ	18-32
3	ठाणे	ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 95, काजूवाडी, जि.ठाणे.	उमलत्या कळीत, विश्वास देऊ पाळीत	33-52
4	अहमदनगर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देशमुख मळा, धांदरफळ बु., ता.संगमनेर, जि.अहमदनगर	आनंददायी शिक्षणासाठी विविध उपक्रम	53-63
5	अहमदनगर	नगरपालिका शाळा क्र 8,पानसरे आखाडा, कुरण रोड,ता.संगमनेर, जि.अहमदनगर	आनंददायी शिक्षणातून पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान	64-68
6	अहमदनगर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हॅरिसन ब्रँच (जेऊर कुंभारी), ता.कोपरगाव, जि.अहमदनगर	आनंददायी शिक्षणा अंतर्गत शालेय निवडणुकीत EVM चा वापर	69-73
7	अहमदनगर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावरकुटे,ता.अकोले, जि.अहमदनगर	आदिवासी भागातील विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान	74-76
8	अहमदनगर	नगरपालिका शाळा नं.६ कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर	प्रयोग इंग्रजी अध्यापनातले	77-83
9	अहमदनगर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चाँदसुरज,केंद्र लहित, पो.चास, ता.अकोले, जि.अहमदनगर	शालेय व्यवस्थापन समितीचा विद्यार्थी विकासात सहभाग	84-90
10	अहमदनगर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राळेगण सिद्धी, ता.पारनेर जि.अहमदनगर	चळवळ लोकसहभागाची आणि विद्यार्थी विकासाची	91-97
11	अमरावती	जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, मलकापूर, केंद्र.बदनापूर, पं. स. चिखलदरा, जि.अमरावती.	लोकसहभागातून शाळा विकास	98-102
12	अमरावती	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दाभा,पं. स नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती.	सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी विकास	103-113
13	अमरावती	जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा,खोलापूर मुले, पं.स. भातकुली जि.अमरावती.	पटनोंदणी व नियमित उपस्थिती	114-118

14	बुलडाणा	आदर्श जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक बोराखेडी,ता.मोताळा, जि.बुलडाणा.	आनंददायी शिक्षणातून पटसंख्या वाढ व नियमित उपस्थिती	119-129
15	बुलडाणा	जिल्हा परिषद केंद्रीय मराठी आदर्श प्राथमिक शाळा, सावरगांव डुकरे ता.चिखली, जि.बुलडाणा.	लोकसहभागातून विद्यार्थी विकास	130-134
16	छत्रपती संभाजीनगर	जिल्हा परिषद प्रशाला शिवना, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर	बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मनोरंजनात्मक अध्ययन अध्यापन	135-141
17	छत्रपती संभाजीनगर	जिल्हा परीषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा,सातारा (खं), ता.जि.छत्रपती संभाजीनगर.	नाविन्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थी विकास	142-164
18	छत्रपती संभाजीनगर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोविंदनगर, वरठाण, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर.	आनंददायी शिक्षणासाठी विविध उपक्रम	165-168
19	धुळे	जिल्हा परिषद शाळा, भोयाचापाडा, ता.साक्री, जि.धुळे.	सामाजिक भावनात्मक शिक्षणातून विद्यार्थी विकास	169-171
20	धुळे	जिल्हा परिषद शाळा, शिरधाने, प्र.नेर, ता.जि.धुळे	उपक्रमांच्या नियोजन व कृतीतून नियमित उपस्थितीत वाढ	172-177
21	धुळे	जिल्हा परिषद शाळा व्हऱ्यापाणी, ता.शिरपूर, जि.धुळे	पटनोंदणी व नियमित उपस्थिती वाढविण्यासाठी विविध उपक्रम	178-185
22	गडचिरोली	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक डिजिटल शाळा,जाजावंडी, पोस्ट-गट्टा तालुका एटापल्ली, जि.गडचिरोली.	आदिवासी भागातील विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान	186-196
23	गडचिरोली	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, निमगाव,केंद्र रांगी, प. स.धानोरा, जि.गडचिरोली.	लोकसहभागातून विद्यार्थी विकासासाठी उपक्रम	197-213
24	गोंदिया	जिल्हा परिषद वरिष्ट प्राथमिक आदर्श शाळा, झालिया, प. स. सालेकसा, जि.गोंदिया.	अतिदुर्गम भागातील उपक्रमशील शाळा	214-218
25	हिंगोली	जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, डिग्रस कऱ्हाळे,ता.जि.हिंगोली.	ऍस्ट्रॉनॉमी क्लब – अंतराळ, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न	219-222
26	हिंगोली	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळदरी, ता.औंढा, जि.हिंगोली	शाळा विकसित होण्यासाठी ग्रामस्थांचे लाभलेले सहकार्य व सहशालेय उपक्रम यांच्या समन्वयातून विद्यार्थी गुणवत्ता विकास	223-226
27	जळगाव	जिल्हा परिषद उर्दु शाळा,कुऱ्हा (पानाचे), ता.भुसावळ,जि.जळगाव.	स्थानिक गरजेनुसार उपक्रमातून विद्यार्थी उपस्थिती व विकास	227-231

28	जळगाव	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,उपखेड, ता.चाळीसगाव, जि.जळगाव.	B – PLUS एक अभिनव उपक्रम	232-237
29	जालना	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लालवाडी तांडा,केंद्र.पारनेर, ता.अंबड, जि.जालना	स्वच्छ व सुंदर शाळा	238-240
30	कोल्हापूर	श्री बाहुबली विद्यापीठाचे, जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर व आक्काताई नरसाप्पा नांद्रेकर ज्यु कॉलेज जयसिंगपूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर	स्पर्धा परीक्षा, क्रीडा विभाग आणि सांस्कृतिक विभाग अंतर्गत शाळेची यशोगाथा	241-248
31	कोल्हापूर	विद्या मंदिर, बशाचामोळा, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर	लोकसहभाग व आनंददायी शिक्षणातून विद्यार्थी विकास	249-272
32	लातूर	जिल्हा परिषद प्रशाला, भादा, ता.औसा, जि.लातूर	वाचन ते परीक्षण	273-289
33	लातूर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाके तांडा, केंद्र.रेणापूर, ता.रेणापूर, जि.लातूर.	गोडी शिक्षणाची	290-301
34	नागपूर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खुर्सापार, केंद्र.नांदागोमुख, ता.सावनेर, जि.नागपूर	माझी शाळा ,सुंदर शाळा	302-306
35	नांदेड	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डौर, मु.डौर, पो.आरळी, ता.बिलोली, जि.नांदेड	हसतखेळत शिकवूया,शाळेत विद्यार्थी टिकवूया	307-317
36	नांदेड	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावळी,ता.बिलोली, जि.नांदेड	अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर – ई लर्निंग	318-322
37	नंदुरबार	आंतरराष्ट्रीय निवासी शाळा, तोरणमाळ,ता.धडगाव, जि.नंदुरबार.	दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रात यश	323-331
38	यवतमाळ	जिल्हा परिषद शाळा, लोहतवाडी, पंचायत समिती नेर, जि.यवतमाळ.	स्वच्छ सुंदर व वैविध्यतेने नटलेली शाळा	332-338
39	यवतमाळ	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,भाटंबा गांव, केंद्र.काटखेडा, पंचायत समिती पुसद, जि.यवतमाळ.	Building as Learning Aid (BaLA)	339-346
40	यवतमाळ	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुकळी, केंद्र.कोठा, ता.कळंब, जि.यवतमाळ.	उपक्रमांच्या दिनचर्येतून विद्यार्थी विकास	347-355
41	नाशिक	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, फांगदर,ता.देवळा, जि.नाशिक	खडकाळ माळरानावरील शालेय नंदनवन	356-368

42	नाशिक	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करंजवण, ता.दिंडोरी, जि.नाशिक.	डिजिटल तंत्रज्ञानाचा अध्ययन अध्यापन प्रक्रियेत प्रभावी वापर	369-374
43	नाशिक	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धामडकी, ता.इगतपुरी, जि.नाशिक	अतिदुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान	375-379
44	धाराशिव	जिल्हा परिषद आदर्श कन्या प्राथमिक शाळा, कसबे तडवळे, ता.जि.धाराशिव.	शालेय स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश	380-391
45	धाराशिव	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कौडगाव, ता.जि.धाराशिव.	अभ्यासपूरक उपक्रमांतून विद्यार्थी विकास	392-396
46	परभणी	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताडबोरगाव, ता.मानवत, जि.परभणी	लोकसहभागातून विद्यार्थी विकास	397-404
47	परभणी	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, गुंजेगाव, ता.गंगाखेड, जि.परभणी.	लोकसहभाग व स्पर्धा परीक्षेतून गुणवत्ता विकास	405-408
48	पुणे	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, काटेवाडी, केंद्र काटेवाडी, ता.बारामती, जि.पुणे.	गावाला शाळेचा अभिमान आणि शाळेला गावचा आधार	409-432
49	रायगड	रायगड जिल्हा परिषद शाळा हेदवली, केंद्र कडाव, तालुका कर्जत, जि.रायगड.	आनंददायी शिक्षण Building as Learning Aid (BaLA)	433-446
50	रायगड	रायगड जिल्हा परिषद शाळा, गोळेगणी, ता.पोलादपूर, जि.रायगड	शाळेतील परसबाग घरोघरी	447-452
51	रत्नागिरी	जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा, शीर नंबर ३, ता.गुहागर, जि.रत्नागिरी.	खेळाल तर शिकाल	453-457
52	रत्नागिरी	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सागवे कात्रादेवी, ता.राजापूर, जि.रत्नागिरी.	लोकसहभाग आणि विविध उपक्रमातून विद्यार्थी विकास	458-466
53	सांगली	जि.प.उच्च प्राथमिक मराठी शाळा,पांढरेवाडी, ता.जत, जि.सांगली.	आनंददायी शिक्षण	467-471
54	सातारा	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचणी, पोस्ट मोरावळे,ता.जि.सातारा	क्रीडा क्षेत्रातील यश	472-478
55	सातारा	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केळवली, ता.जि.सातारा	केळवली शाळेची कलाक्षेत्रातील यशोगाथा	479-483
56	सातारा	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,कुशी, केंद्र.किडगाव, बिट.लिंब,ता.जि.सातारा	अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर	484-489
57	सिंधुदुर्ग	जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, विजयदुर्ग नं.1, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग	इंग्रजी पेटी अन् डिजिटल साधनांची युती, निघून गेली इंग्रजीची भीती“	490-494
58	सोलापूर	बी.एफ.दमाणी प्रशाला,194/1, बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर.	शाळेची क्रीडा क्षेत्रातील यशोगाथा	495-501

59	वर्धा	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, पुलई, पंचायत समिती वर्धा, जि.वर्धा	अप्रगत विद्यार्थी विहीन, गुणवत्ता पूर्ण प्रगत शाळा स्पर्धा व क्रीडा क्षेत्रातील यश.	502-519
60	वर्धा	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुलतानपूर, केन्द्र. आजंती, पोस्ट.सावली (वाघ), ता.हिंगणघाट, जि.वर्धा.	बागेतील फुले व गुणवत्तापूर्ण मुले	520-545
61	मुंबई	जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची प्राथमिक शाळा, सारस्वत कॉलनी, नेहरू रोड, डोंबिवली पूर्व, मुंबई.	आनंददायी शिक्षणासाठी नवोपक्रम (ज्ञानरंग बालकेंद्र ते विद्यालये संस्कृतम्)	546-548
62	सांगली	अजितराव घोरपडे विद्यालय, कळंबी,ता.मिरज, जि.सांगली.	One Page Translation - an innovative activity	549-553
63	मुंबई	D.S. High School, Sion, Mumbai	"Integrated Learning in the Modern Age - Navigating Competitive Exams, Mental Health, and the Digital Revolution."	554-564
64	मुंबई	Lion M. P. Bhuta Sion Sarvajanik School, Mumbai.	Transformative Leadership in Education	565-618

“स्थानिक/ भौगोलिक व सामाजिक परिस्थितीनुसार घेतलेले विशिष्ट उपक्रम”

शाळेचे नाव - मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळा क्रमांक,35 डाचकूलपाडा, काशिमिरा मिरा रोड, (पूर्व)जि.ठाणे.

मुख्याध्यापकाचे नाव - सौ संजना संजय आंबेरकर.



शाळेची जुनी इमारत (समाज मंदिर)



शाळेची तीन मजली नवीन इमारत

- **कार्यरत शिक्षक माहिती -**



प्रस्तावना -


मी, सौ संजना संजय आंबेरकर गेल्या दहा वर्षापासून मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा क्रमांक 35 डाचकूलपाडा या शाळेत कार्यरत आहे. या शाळेची आद्य शिक्षिका असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. माझी नियुक्ती ठाणे जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात 1998 साली झाली. शिक्षिका म्हणून या शिक्षणाच्या प्रवाहात मी दाखल झाले. त्यानंतर पाच वर्ष सेवा पूर्ण करून पालघर तालुक्यात मी सात वर्ष अध्यापन केले. अशा बारा वर्षाच्या सेवेनंतर माझी मिरा-भाईंदर महानगरपालिकेत बदली झाली. प्रथम मि.भा मनपा 04, काशी शाळेत मी कार्यरत होते. तेथून तात्पुरती बदली म्हणून शाळा क्रमांक 35 डाचकूलपाडा येथे मला पाठवण्यात आले.

डाचकूलपाडा शाळेचा इतिहास -

मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात असलेला तसा हा दुर्गम व दुर्लक्षित भाग .सुरुवातीला सात आठ घरांचा असलेला हा आदिवासी पाडा कालांतराने बहुभाषिक परप्रांतीय लोकांनी वेढला गेला. लोकसंख्या वाढल्याने या ठिकाणी शाळेची गरज भासू लागली . अनुषंगाने सुरुवातीला समाज मंदिरात शाळा भरविण्यात आली. तत्कालीन प्रशासकीय आदेशानुसार केंद्रशाळेत कार्यरत असलेले शिक्षक पंधरा-पंधरा दिवसांच्या नियोजनाने या शाळेत अध्यापन करू लागले.

शाळेची पार्श्वभूमी -

आज ही मला आठवतो तो शाळेचा पहिला दिवस! दिनांक १३ ऑक्टोबर २०१३, एक छोट्याशा समाज मंदिरात भरणारी ती शाळा. शाळेत हजर होते फक्त तीन ते चार विद्यार्थी ,परंतू पटावर होते 15 ! विद्यार्थी उपस्थिती बाबत दररोजची हीच स्थिती. रोजची हीच तऱ्हा पाहून आजूबाजूचा परिसर मी थोडा न्याहाळला. मग लक्षात आले हा सर्व परिसर उत्तर भारतीय व आदिवासी समाजाचा आहे, शिवाय पुष्कळ गरिबी! त्यामुळे शाळेत मुलांना पाठवायचे ते केवळ मध्यान्ह भोजनासाठी व मिळणाऱ्या मोफत गणवेशासाठी, वह्या-पुस्तकांसाठी, ही अशी पालकांची मानसिकता. त्यातच विद्यार्थी संख्या कमी. शाळेला व्यवस्थित इमारत नाही .छोटसं समाज मंदिर. साधं मुलांसाठी स्वच्छतागृहसुद्धा नाही. अशावेळी एक शिक्षकी शाळेत काय आणि कसं करावे हा मोठा प्रश्न उभा राहिला. आणि



रडूच कोसळलं. काशी शाळेसारख्या मोठ्या शाळेत कार्यरत असताना अशा 'या शाळेत' आपल्याला का पाठवले, आता काय करावे. प्रश्न ..... ठरवलं .... जेवढ्या मोठ्या शाळेतून आपण आलो आहोत तेवढीच ही शाळाही मोठी करायची. विचार पक्का झाला आणि कार्याला सुरुवातही. त्या समाज मंदिरात एकटी माझीच शाळा नाही तर बालवाडी ही भरायची, त्यांच्या मदतनीस होत्या सौ मंजुळा पवार. त्यांना मदतीला घेतले आणि ठरवले..... समाज मंदिर मध्ये भरणारी शाळा उत्तम करायची.....

सर्वेक्षणाची गरज -

ज्या भागात आपल्याला काम करायचे आहे तो सर्व परिसर डोळ्याखालून घालायचा. मग काय, तिथे असलेल्या झोपडपट्ट्यांमधून, आदिवासी पाड्यामधून फेरी मारली, सर्वेक्षण केले. वेळप्रसंगी रविवार, सुट्टीचे दिवस, संध्याकाळी रात्री सुद्धा सर्वेक्षण केले. छोटे रस्ते आणि उघडी गटारे गलिच्छ वस्ती, व्यसनाधीनता,अज्ञान, शिक्षणाबद्दलची अनास्था. अशा बिकट परिस्थितीत तेथे असलेल्या सहा वर्ष पूर्ण झालेल्या दाखल पात्र विद्यार्थ्यांच्या शोध घेतला, पालकांचे प्रबोधन केले, शिक्षणाचे महत्त्व समजावले आणि शिक्षणाच्या प्रवाहात त्यांना घेऊन आले. आता प्रश्न होता हे विद्यार्थी टिकवायचे कसे? शाळेची आवड त्यांच्या मनात निर्माण करायची कशी? शिस्त नाही, टापटीपपणा नाही, स्वच्छता नाही, मग काय पुन्हा एकदा कसरत..




https://youtu.be/R5j_4ty7Yzc?si=GO2E1i8h1Xv0A8NT

(YouTube link डाचकूलपाडा परिसर गलिच्छ वस्ती, व्यसनाधीनता)

.....आणि मुलांना लागली शाळेची ओढ

विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण व्हावी म्हणून गट कार्य, सांघिक खेळ; गाणी, गोष्टी कविता युक्त परिपाठ. वर्गात लक्ष देण्याची सवय व्हावी म्हणून अध्ययन अध्यापन पद्धती दरम्यान शैक्षणिक साहित्याचा वापर , त्यांची खेळणी, शाब्दिक खेळ, कृतियुक्त खेळ, मैदानी खेळ घेतले. कारण खेळ आणि गाण्यांतून मिळणारे अध्ययन अनुभव अधिक सुखावह व दिर्घकाळ लक्षात राहणारे असतात. घरातील टीव्ही ,डीव्हीडी प्लेयर आणले आणि गाणी गोष्ठी ऐकवून मनोरंजन व बालगीतातून विद्यार्थ्यांचे कान ही तयार केले.. आदिवासी मुलांची बोली भाषा वेगळी असल्याने संबोध स्पष्ट करण्यास अधिक वेळ लागत असे . तीच परिस्थिती उत्तर भारतातून आलेले विद्यार्थी यांची ; त्यांची प्रमाण भाषा म्हणजे हिंदी व उर्दू . मग या विद्यार्थ्यांना एखादी संकल्पना समजावून देताना प्रथम त्यांच्या हिंदी प्रमाणभाषेचा वापर आणि मग मराठी भाषेचा वापर अध्यापनात करावा लागत असे. काही महिन्यातच ह्या लहान मुलांना मराठी व हिंदी भाषा नीट समजू लागल्या. भरपूर शैक्षणिक साधने तयार केली, त्यांचा वापर अध्यापन करताना केला. हे विद्यार्थी आता नियमित शाळेत येऊ लागले. शिस्त व स्वच्छतेसाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले. विद्यार्थी शाळेत आले परंतु एक शिक्षिका, तीन वर्ग, पालकांची गरिबी ,त्यांच्याकडे असलेल्या शैक्षणिक साहित्याचा अभाव. अशावेळी माझ्या घरातील कॉम्प्युटर शाळेत आणला. मुलांना संगणक बाबत मुलभूत माहिती दिली व त्यातूनच मुलांना संगणकाची आवड निर्माण झाली.

तीन इयत्ता आणि एक शिक्षक असल्याने अध्यापन दरम्यान open book shelf व open toy shelf हा मुलांसाठी उपक्रम सुरु केला. सोबत विविध सहशालेय उपक्रम, कार्यक्रम राबविले, दिव्यांग विद्यार्थ्यांनाही त्यात सहभागी करण्यात आले. वेळोवेळी शासनाकडून येणारे कार्यक्रम/उपक्रम नित्य नेमाने राबविले. शासनाकडून मिळालेल्या निधी अपुरा पडत होता. मग मी माझ्या परिचयातील व्यक्ती, मित्रमैत्रिणी, समाजातील मदत करणाऱ्या व्यक्ती (CSR) यांच्याकडून विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात येण्यासाठी विविध भौतिक सुविधा उपलब्ध करून घेतल्या. वेळप्रसंगी बाईं च्या ऐवजी त्यांची आई झाले . आजचं चित्र मात्र वेगळे आहे, पण तेव्हा.....



समुदाय सेवा संसाधने (CSR) अंतर्गत मिळालेल्या भौतिक सुविधा -

अनुक्र	शैक्षणिक वर्ष	CSR उपलब्ध करून देणाऱ्या व्यक्ती	CSR अंतर्गत मिळालेल्या वस्तू	संसाधनाचा उपयोग	रक्कम
१	२०२०-२०२१	श्रीम मीना मुधोळकर	AMPLIFIER	परिपाठ करिता	5000
२	२०२१-२०२२	श्रीम आत्मजा राजे आणि सहकारी मित्र	स्टीलची वाडगे व चमचे	खिचडी खाण्यासाठी	14400
३	२०२२-२०२३	श्रीम मोनाली रणदिवे आणि सहकारी मित्र	वायर लेस/ ब्लू टूथ स्पिकेर्स	सांस्कृतिक कार्यक्रमासाठी	12000
४	२०२३- २०२४	श्री सनम कोठारी, नवकार स्टेशनरी	स्टडी टेबल	खाली बसून लेखन वाचन करिता	18000






वाढती पटसंख्या, अपुरी इमारत आणि शिक्षक वर्ग -

आता प्रश्न होता तो शाळेचा म्हणजे शाळेच्या इमारतीचा . समाज मंदिरात भरणारी शाळा आता वर्षागणिक 5,15,45,65,75 अशा पटसंख्येची झाली. पटसंख्या वाढत होती आणि समाज मंदिर अपूर्ण पडत होतं. मुलांना बसण्यासाठी फारच त्रास होऊ लागला. शिवाय शिक्षकाची कमतरता ही भासू लागली .संपूर्ण शाळेचा कारभार मी व माझा शिपाई दोघे सांभाळत होतो. महानगरपालिकेच्या हद्दीत जरी आमची शाळा असली तरी ती शहरापासून एका बाजूला लांबच होती. त्यामुळे सर्वांचेच शाळेकडे दुर्लक्ष होते. शाळेतील समस्यांबाबत कार्यालयात येरझाऱ्या मारून


काहीच उपयोग झाला नाही. त्यामुळे मग मी ठरवलंच, सर्वांचं लक्ष माझ्या शाळेकडे वळवायचे. पुन्हा थोडा वेळ वेळ जाऊ दिला परंतु समस्या काही सुटेना. मग मी नव्याने स्थापन केलेली शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्याने शिक्षण विभागाशी शाळा वाढवण्यासाठी, बांधकाम विभागाशी शाळा बांधून देण्यासाठी पत्रव्यवहार केला व प्रयत्नांना यश आले . शिक्षण विभागाने लक्ष घातले आणि अखेर समाज मंदिरावर एक मजला चढला! सोबत स्वच्छतागृह ही बांधून देण्यात आले. यामुळे होणारी मुलांची गैरसोय तर दूर झालीच पण दरवर्षी शालेय पटातही कमालीची वाढ झाली.

शालेय पटाचा चढता आलेख -

अनु क्र	सन	पटावरील एकूण विद्यार्थी
१	२०११-२०१२	१५
२	२०१२- २०१३	२२
३	२०१३-२०१४	३४
४	२०१४-२०१५	४१
५	२०१५-२०१६	४०
६	२०१६-२०१७	५५
७	२०१७-२०१८	७७
८	२०१८– २०१९	११५
९	२०१९-२०२०	११८
१०	२०२०-२०२१	१२३
११	२०२१-२०२२	२५०
१२	२०२२-२०२३	२६८
१३	२०२३-२०२४	२७५



शालेय पटाची एक झलक ग्राफिक च्या माध्यमातून –



शाळेचा झालेला कायापालट -

शाळा मोठी करायची म्हणजे विद्यार्थी हवेच, अनुषंगाने पटसंख्या हवीच. दरवर्षी मी व आमच्या मदतनीस संपूर्ण गावाचा सर्वे करायचो. दाखल पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घ्यायचे आणि पालकांमध्ये जागृती निर्माण करायची. अतः आमच्या प्रयत्नाला यश मिळाले शै. वर्ष 2018- 19 मध्ये शाळेची पटसंख्या जवळजवळ सव्वाशे झाली. एवढ्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी मला, प्रथम शिक्षिका, मुख्याध्यापिका आणि शिपाई या तीनही भूमिकांतून जावे लागे. मग शिक्षकाकरिता पुन्हा तसाच प्रयत्न . हायवे पासून शाळेकडे जाणारी पायवाट आणि त्यातील अंतर. त्यामुळे शिक्षक, बदली करिता ही शाळा स्वीकारत नसत. पुन्हा शिक्षण विभागाशी संपर्क, विनंती अर्ज अन् वेळप्रसंगी विनवण्याही. मग 2019 साली एक सह शिक्षिका सौ रेवती ढगे देण्यात आल्या.

त्यांची सोबत मिळाली आणि अध्ययन अध्यापन प्रक्रियेला गती मिळाली. दरवर्षी पटसंख्या वाढत होती. आता शिक्षिका मिळाली पण नवीन समस्या भेडसावू लागली, ती म्हणजे विद्यार्थ्यांच्या बसण्याची. शाळा लहान पडू लागली.



(वर्ग खोली एक आणि विद्यार्थी अनेक)

अनुकूल परिस्थितीतून निघणारा मार्ग पुन्हा प्रतिकूल परिस्थितीकडे वळाला. पुनश्च शिक्षण विभाग, बांधकाम विभाग यांच्याशी सातत्याने पत्र व्यवहार केला, पाठपुरावा केला. पुन्हा शाळा आणि संदर्भित कार्यालये यांमध्ये फिरणारे ते धावपळीचे चक्र. शाळेच्या इमारतीची गरज व होणारी गैरसोय सांगितली. प्रस्ताव मांडला . वर्ग खोल्यांसाठी आग्रह धरला तेव्हा मला एक शिपाई देण्यात आला. पण जागेची अडचण कायमच होती. मी माझी सहशिक्षिका, आमच्या अंगणवाडीच्या मदतनीस, शिपाई सर्वांनी पुन्हा शाळेचे बांधकाम करण्यासाठी प्रयत्न केले. अखेर नवीन शाळा बांधकाम मंजूर झाले.

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा क्रमांक 35 डाचकूलपाडा शाळेच्या नवीन इमारतीचा उदघाटन सोहळा दि १५ फेब्रुवारी २०२२ रोजी, मिरा भाईंदर मनपा तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक माननीय श्री दिलीप ढोले, तत्कालीन महापौर श्रीम ज्योत्स्ना हसनाळे यांच्या हस्ते व मा अतिरिक्त उपायुक्त, मा उपायुक्त मा सहा आयुक्त, शिक्षण मा शिक्षणाधिकारी मा केंद्र प्रमुख,काशी केंद्र शाळा , मा नगरसेवक यांच्या उपस्थितीत जल्लोषात पार पडला. बघता बघता २०२२ मध्ये आमची शाळा तीन मजल्यांची झाली. एका खोलीच्या समाज मंदिरात भरणारी शाळा आज तीन मजल्यांची पाहताना आनंदाला पारावर उरत नाही . तीन विद्यार्थी पासून ते 300 पटाची शाळा आज या तीन मजली ईमारतीत भरते. यासोबत शिक्षक संख्या व सुविधा या सर्वांमध्येच भर पडली. आज माझ्या शाळेत मी, आणि सह शिक्षिका त्याचबरोबर नव्याने रुजू झालेले शिक्षक सौ मनीषा पाठक, श्री संतोष कांबळे, ठोक मानधन पद्धतीने असलेले श्री समाधान कोळी , आणि कॉम्प्युटर शिक्षिका प्रणिता वणवे असे सहा जण आहेत.



(उद्घाटन सोहळ्याचे क्षणचित्रे)



पुढारी

मिरा-भाईंदर पालिका शाळेतील शिक्षिकेचा पाठपुरावा लागला सार्थकी

डाचकूल पाडा येथील शाळेचे महापौरांच्या हस्ते लोकार्पण

भाईंदर : पुढारी वृत्तसेवा

मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील काशिमीरा परिसरात असलेल्या डाचकूल पाडा येथील पालिका शाळा क्रमांक ३५ या तीन मजली इमारतीचे लोकार्पण मंगळवारी महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांच्या तर आयुक्त दिलीप ढोले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. एका समाजमंदिरात सुरू झालेली शाळा भव्य इमारतीत सुरू व्हावी. यासाठी शिक्षिका संजना आंबेरकर यांचा पाठपुरावा या शाळेच्या उभारणीसाठी सार्थकी लागल्याचे यावेळी समोर आले.

पालिकेने डाचकूल पाडा येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरीता २०१९ पासून एका समाज मंदिरामध्ये शाळा क्रमांक ३५ सुरू केली. त्यावेळी शाळेची विद्यार्थी पटसंख्या सुमारे २५ इतकी होती. या समाजमंदिरातील शाळेचे इमारतीत रुपांतर व्हावे, यासाठी शाळेतील शिक्षिका संजना आंबेरकर यांनी परिसरातील तसेच आसपासच्या आदिवासी पाड्यातील रहिवाशांमध्ये शिक्षणाबाबतची जनजागृती करुन मुलांना सध्याच्या अद्यावत युगात शिक्षणाची कशी आवश्यकता आहे, हे पटवून देण्यास सुरुवात केली. त्यात त्यांना यश मिळाल्याने गेल्या १२ वर्षात विद्यार्थ्यांची पटसंख्या २५ वरुन ३५० पर्यंत वाढली. दरम्यान वाहणाऱ्या विद्यार्थी पटसंख्येमुळे समाजमंदिराची जागा शाळेसाठी अपुरी पडू लागली. यामुळे शाळेच्या पुरेशा जागेसाठी त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला. प्रशासनाने

शाळा लोकार्पण निमंत्रण पत्रिकेवरुन शिवसेना व भाजपमध्ये उठलेल्या गदारोळानंतर प्रत्यक्ष लोकार्पणावेळी भाजप खेरीज सेनेचा एकही लोकप्रतिनिधी वा कार्यकर्ता उपस्थित नसल्याने आश्चर्य व्यक्त केले गेले.

शिक्षकांची उणीव देखील लवकरच कमी केली जाणार

आयुक्त दिलीप ढोले यांनी दिल्लीतील सरकारी शाळांच्या धर्तीवर सर्व पायाभूत सुविधा संपन्न शाळा पालिकेकडून निर्माण केल्या जाणार असून सध्या असलेली शिक्षकांची उणीव देखील लवकरच कमी केली जाणार असल्याचे स्पष्ट केले.

त्याची दखल घेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजनेंतर्गत २०१८-२०१९ मध्ये येथे नवीन शाळेच्या दोन मजली इमारतीच्या बांधकामाचा निर्णय घेतला. त्यासाठी शासनाकडून ७५ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला. यातील ६३ लाख ५५ हजार ८२९ रुपयांच्या निधीतून पालिकेने दोन मजली इमारत बांधकामाचा ठेका मेसर्स जैनम इन्फ्रा प्रोजेक्ट एल.एल.पी. या कंपनीला दिला. या दोन मजली इमारतीचे एकूण क्षेत्रफळ ३,५०० चौमी इतके असून इमारतीमध्ये एकूण ४ वर्ग खोल्या, एक संगणक कक्ष, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे व शिक्षकांच्या कार्यालयाचा समावेश आहे. हि शाळा सध्या इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच असली तरी त्यातील वाढत्या विद्यार्थी पटसंख्येनुसार पुढील इयत्तांचे वर्ग सुरू करण्यात येणार असल्याचे महापौरांनी सांगितले. यासाठी प्रशासनाला शिक्षकांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे त्या म्हणाल्या.

Thane Edition
Feb 16, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

Watch this video on Facebook -


https://www.facebook.com/share/v/EUb4Lpn91if4HqHn/?mibextid=onwyNj

Link of New Building Inauguration photos -

https://photos.app.goo.gl/Pbk56rzV3ZhSydTG7

शिक्षकांची उपलब्धी

अनु क्र	सन	मंजूर शिक्षक	कार्यरत शिक्षक	शिक्षकांची नावे
१	२०११ – २०१९	२	१	सौ संजना आंबेरकर
२	२०१९ – २०२२	४	२	सौ संजना आंबेरकर सौ रेवती ढगे
३	२०२२ – २०२३ २०२३-२०२४	५	५	सौ संजना आंबेरकर श्री संतोष कांबळे सौ रेवती ढगे सौ मनीषा पाठक श्री समाधान कोळी



समाज मंदिर ते तीन मजली इमारतीचा प्रवास -

दहा वर्षांपूर्वी छोटेसे समाज मंदिर ते तीन मजली इमारत, भौतिक साहित्य नसलेली शाळा ते सुसज्ज वाचनालय असलेली शाळा, घरातून नेलेला कॉम्प्युटर ते कॉम्प्युटर लॅबयुक्त शाळा , पाच विद्यार्थी ते थेट २७५ विद्यार्थी शिकणारी शाळा, घरचा टेलिव्हिजन, DVD Player ते महानगरपालकेतर्फे मिळालेला Projector, Digital बोर्ड, Laptop युक्त शाळा. , एक शिक्षकी ते प्रत्येक वर्गाला स्वतंत्र शिक्षक असलेली हि नवीन शाळा. यात भरीस भर म्हणून शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये एक महत्वपूर्ण निर्णय मिरा भाईंदर महानगर पालिका शाळांसाठी

घेण्यात आला तो म्हणजे तजेलदार रंगसंगती असणारा सुंदर गणवेश तसेच शिक्षकांसाठी Blue JACKET चा समावेश महानगरपालिकेने केला. या सुरेख परिवर्तनामुळे शाळेचे व मुलांचे रंगरूप पालटून गेले.

प्रशासकीय अधिकारी व मान्यवरांच्या भेटी -

याच दरम्यान माजी आयुक्त मा दिलीप ढोले, माजी महापौर मा ज्योत्स्ना हसनाळे, मा अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, मा उपायुक्त संजय शिंदे, मा उपायुक्त कल्पिता पिंपळे, मा सहा आयुक्त कविता बोरकर यांनी वेळोवेळी शाळेला भेटी देऊन विद्यार्थी व शिक्षकांना प्रोत्साहन दिले. तसेच या शाळेला प्र सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्रीम रंजना सोनवणे, विशेष तज्ञ श्रीम धनश्री घाडी, विशेष शिक्षिका श्रीम नयना चांगण यांनीही वेळोवेळी भेटी दिल्या आहेत. तसेच शासन उपक्रम PGI च्या शाळा भेटी दरम्यान परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडिकेटर टीमने शाळेला भेट दिली होती.



(PGI Team)




(तत्कालीन आयुक्त मा दिलीप ढोले, मा अतिरिक्त आयुक्त श्री संभाजी पानपट्टे, मा सहा आयुक्त , मा शहर अभियंता हे नवीन इमारतीतील संगणक कक्ष व ग्रंथालयाला भेट दिली तो क्षण.)



(शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये मा अतिरिक्त आयुक्त श्री संभाजी पानपट्टे, मा उपायुक्त शिक्षण श्री संजय शिंदे यांनी शाळेला गुणवत्ता भेट दिली , शाळेचे व्यवस्थापन उत्तम व विद्यार्थ्यांना असलेल्या शिस्तीचे कौतुक केले व मुलांना प्रोत्साहन दिले . विशेष म्हणजे digital बोर्ड ला moving black बोर्ड बनविण्याच्या संकल्पनेचे खूप कौतुक केले.)

गुणवत्ता FLN व ध्येय



आमच्या शाळेत एकूण पटापैकी बहुतांश मुले ही ऊर्दू व हिंदी भाषिक असून त्यांच्या मराठी वाचनाची गती ही ५० ते ६० टक्के आहे ,ती १०० टक्के पर्यंत न्यायचा प्रयत्न सर्व शिक्षक आपापल्या पद्धतीने करत आहेत. तसेच इंग्रजी वाचन ६५ ते ७० टक्के पर्यंत करत आहेत त्यात LFW (Leap for Word) ह्या संस्थेच्या अध्यापन तंत्रानुसार इंग्रजी वाचनात मुले १०० टक्के प्रयत्न करतील यात तिळमात्र शंका नाही आणि गणित हा विषय सेंमी इंग्लिश मध्ये असल्याने या विषयातील प्रगती ही ९० ते १०० टक्के राहील अशी सर्व शिक्षकांना आशा वाटते.

एकंदरीत, शाळेचे ध्येय हे मराठी वाचन १०० % पर्यंत नेऊन ठेवणे इतपतच नव्हे तर सर्व विषयांतील गुणवत्ता वाढवणे तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हे आहे.





उपक्रमांची नांदी-

परिपूर्ण युक्त शिक्षक असलेल्या या शाळेत विविध उपक्रम राबविण्यात आले त्यात नियमित साजरे केले जाणारे उपक्रम जसे शाळा प्रवेशोत्सव, योग दिन, आषाढी एकादशी दिंडी, वृक्षारोपण, शिक्षक दिन खेळातून शिक्षण,रक्षाबंधन , स्वच्छता अभियान , सांस्कृतिक कार्यक्रम , शैक्षणिक सहल वनभोजन , किल्ला व कंदील बनवणे,

दिवाळी सुट्टी पूर्वी मुलांना अल्पपहार वाटप ,हळदीकुंकू समारंभ, थोर पुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी , विज्ञान प्रयोग , दीपपूजन, वैज्ञानिक उपक्रम, चांद्रयान थेट प्रक्षेपण व आधारित उपक्रम, विज्ञान प्रयोग.

शैक्षणिक वर्ष २०२२ -२०२३ व शैक्षणिक वर्ष २०२३- २०२४ या दरम्यान शाळा पूर्व तयारी मेळावा, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव निमित्त उपक्रम G 20 आयोजित विविध कार्यक्रम, निपुण महोत्सव कार्यक्रम, स्वच्छता अभियान चांद्रयान थेट प्रक्षेपण व आधारित उपक्रम, विज्ञान प्रयोग असे उपक्रम शाळेने साजरे केले आहेत.

https://www.instagram.com/reel/ChHqlNBDPKM/?igshid=NGEwZGU0MjU5Mw

2 वर्षापूर्वी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव निमित्त उपक्रम insta link -





https://drive.google.com/drive/folders/19gP9Y9OBIXVzWYKpSPb87B1I-DYIE2rs

वार्षिक स्नेह संमेलन व गुणगौरव समारंभ -

सन २०१८-१९ मध्ये दि. ५ मार्च रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार क्रीडा व सांस्कृतिक समिती अंतर्गत महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेह संमेलन व गुणगौरव कार्यक्रमासाठी सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरणाकरिता काही निवडक शाळांना बोलाविले होते. त्यात आमची मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळा क्रमांक 35, मराठी डाचकूलपाडा शाळाही होती. सदर कार्यक्रमाला आमच्या शाळेने बालगीतावर मनोरंजनपर नृत्य सादर केले होते. या नृत्यास तत्कालीन मा उपायुक्त (शिक्षण) , मा सभापती (शिक्षण), मा उप सभापती (शिक्षण) यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.





.

क्रीडा महोत्सवात दैदीप्यमान कामगिरी - सन २०२२ -२३ या शैक्षणिक वर्षात मिरा-भाईंदर महानगरपालिका आयोजित **क्रीडा महोत्सवात** शाळेने सर्व स्पर्धांमध्ये भाग तर घेतलाच पण लंगडी, खो खो व लगोरी या स्पर्धेत बक्षिसे सुद्धा मिळवूनशाळेचे नाव उज्वल केले.





वक्तृत्व स्पर्धेत सहभाग -

तसेच सन २०२२ -२३ या शैक्षणिक वर्षात भाईंदर सेकंडरी या शाळेत आयोजित केलेल्या तालुका स्तरीय वक्तृत्व स्पर्धेत खाजगी शाळा अनुदानित शाळा , विना अनुदानित शाळा यांच्याबरोबर आपल्या महानगरपालिकेच्या ३६ शाळांमधून मोठ्या पाच शाळांनी भाग घेतला होता आणि त्यात विशेष म्हणजे आमची इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत ची छोटीशी मराठी माध्यमाची डाचकूलपाडा शाळा सुद्धा होती.



स्पर्धात्मक परीक्षा -

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून सुरु झालेली BHARAT TALENT SEARCH (BTS) पूर्वीची (प्रज्ञा शोध परीक्षा). या परीक्षेसाठी विद्यार्थी बसविले आहेत. सर्व शिक्षक जादा तासिका घेऊन त्यांची परीक्षेची तयारी घेत आहेत. विशेष म्हणजे या परीक्षेसाठी चालू शैक्षणिक वर्षापासून ३०० रुपये फी आकारण्यात आलेली आहे. या शाळेत येणारे विद्यार्थी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील असून सुद्धा एकूण ६५ विद्यार्थ्यांनी परीक्षेकरिता नोंदणी केली आहे.

अनु क्र	इयत्ता	प्रवेशित विद्यार्थी संख्या
१	१ ली	१२
२	२ री	१४
३	३ री	२७
४	४ थी	१२
एकूण		**६५**



(BTS प्रवेशित विद्यार्थी)

हा प्रवास तसा अवघड होता. पण तो पूर्ण झाल्याचे समाधान फार मोठे आहे. हे वाचल्यावर असं वाटत असेल हा प्रवास इथे संपला आहे पण नाही, पहिली ते चौथी वर्ग असलेल्या शाळेला वर्ग पहिली ते दहावी पर्यंत न्यायचे हा मानस आहे. फक्त शाळा, पहिली ते दहावीपर्यंत नुसती करायची नाही तर मिरा भाईंदर महानगरपालिकेतील गुणवत्तापूर्ण एक आदर्श शाळा करायचे हे स्वप्न आहे. मी आणि माझी टीम हे स्वप्न नक्की पूर्ण करू. या प्रवासात स्वप्नपूर्ती करिता आपणा सर्वांच्या शुभाशीर्वादाची अपेक्षा उराशी बाळगून इथेच समारोप करते.

मार्गदर्शक आणि आभार -

सदर यशोगाथा निवड करणे करिता मा. शिक्षणाधिकारी, सोनाली मातेकर, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी प्रेरित केले. तसेच लेखनादरम्यान मला मा.ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉक्टर संभाजी भोजने, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, राहटोली, ठाणे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका विशेष तज्ञ, श्रीमती धनश्री घाडी यांनी सुद्धा मला यशोगाथा लेखनादरम्यान चर्चा करून खूप सहकार्य केले. तसेच प्र. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्रीमती रंजना सोनवणे यांचेही मार्गदर्शन लाभले . तसेच शाळेतील शिक्षकवृंद श्री संतोष कांबळे, सौ रेवती ढगे, सौ मनीषा पाठक, श्री समाधान कोळी यांचे सदर यशोगाथा माहिती संकलित करणे, संगणकीकृत करणे कामी सहकार्य लाभले. या सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करून सदर यशोगाथेचा समारोप करते.

गुणवत्ता वाढीतून पटसंख्या वाढ

शाळेचे नाव - जिल्हा परिषद केंद्रशाळा, काल्हेर,ता.भिवंडी, जि.ठाणे.

Email ID – kalhezpschool@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - सौ. अश्विनी राजन पालवणकर


प्रास्ताविक -

आज जवळ जवळ एक शतक होत आलं तरीही जिची जोमाने प्रगती होत आहे, होत राहणार आहे, ती आमची शाळा "केंद्रशाळा काल्हेर " या ध्येयपूर्तीसाठी काल्हेर शाळेची व्यवस्थापन समिती,वेताळ शैक्षणिक प्रतिष्ठान, ग्रामपंचायत,सेवाभावी संस्था तसेच ग्रामस्थ यांच्या अथक सहकार्याने, श्रमदानाने आणि खडतर अशा परिश्रमातून, उत्तम लोकसहभागाच्या प्रेरणेतून चाळीस लाख रुपये खर्च करून उभारलेली ठाणे जिल्ह्यातील प्राथमिक केंद्रशाळा काल्हेर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सज्ज आहे.

विविध सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून शालेय आयुष्याची पायाभरणी सर्व बाजूंनी पक्की करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती व शिक्षकवृंद सदैव तत्पर असतात. गावात इयत्ता १ली ते ८वी पर्यंत अनेक इंग्रजी माध्यमांच्या, मराठी माध्यमांच्या शाळा असतानाही पालक आपल्या मुलांना जि.प. केंद्रशाळा काल्हेर येथे दाखल करताना दिसतात. हेच या शाळेच्या यशाचं रहस्य आहे. सर्वाधिक पटसंख्या असणारी जिल्हा परिषदेची मराठी शाळा हा नावलौकिक शाळेत प्राप्त झाला आहे.

हाडाचा शिक्षक करारी बाणा असलेल्या शेतकऱ्याप्रमाणे समोर असलेली जमीन, कोणताही वाफा फुलविणे हे त्याचे नेमून दिलेले कर्तव्य समजतो. आणि ज्याला हे समजले तो धन्य होतो.


"मळाही फुलतो आणि माळीही!"



उपक्रमाची गरज -

(मुख्याध्यापिका - मा. सौ. अश्विनी राजन पालवणकर मॅडम यांचे मनोगत)

जिल्हा परिषद केंद्रशाळा काल्हेर येथे मुख्याध्यापिका म्हणून मी सन 2014 साली रुजू झाले. त्यावेळी शाळेची पटसंख्या फक्त 350 एवढीच होती.गावात अनेक खाजगी तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळा असल्यामुळे पालक आपल्या पाल्यास या शाळांमध्ये दाखल करण्यासाठी उत्सुक असल्याचं जाणवलं. सर्वप्रथम आपल्या मराठी शाळेचा पट वाढविणे आवश्यक असल्याची प्रकर्षाने जाणीव झाली. कार्यरत शिक्षक, त्यावेळी असलेली ग्रामशिक्षण समिती, वेताळ शैक्षणिक प्रतिष्ठान व ग्रामपंचायत समिती यांच्याशी चर्चा करून ह्या संदर्भात विविध उपक्रम राबवून शाळेचा पट वाढवूया व तळागाळातील सर्व घटकांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी धडाडीने प्रयत्न करूयात अशी भूमिका मी मांडली.सर्वच उपस्थितांनी ह्या भूमिकेचे समर्थन केले व आमचा जिद्दीने ध्येय गाठण्याचा प्रवास सुरु झाला. दाखलपात्र विद्यार्थी शोधमोहीम हाती घेतली, घरोघरी भेटी देणे, शाळेची जाहिरात करणे, शालेय उपक्रमांचे पॅम्प्लेट वाटप करणे, झोपडपट्टी भागात जाऊन लोकांचे उदबोधन करणे, इंग्रजी माध्यमाकडे ओढा असणाऱ्या पालकांचे मन परिवर्तन करून त्यांना मराठी शाळेकडे वळविणे अशा अनेक युक्त्या वापरून आम्ही आमच्या शाळेच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले.कार्यरत शिक्षक, त्यावेळी असलेली ग्रामशिक्षण समिती, वेताळ शैक्षणिक प्रतिष्ठान व ग्रामपंचायत समिती या सर्वांचेच सहकार्य मला लाभले.हाती घेतलेल्या कार्यास यश मिळत होते पण ते टिकविणे व सातत्य राखणे आवश्यक असल्यामुळे सहशालेय उपक्रमांतून विद्यार्थी गुणवत्ता विकास होण्यासाठी विविध सहशालेय उपक्रम आमच्या शाळेने राबविले.आमच्या केंद्रशाळा काल्हेरची यशोगाथा आपल्यापुढे सादर करीत आहोत.



शाळेने राबविलेले सहशालेय उपक्रम -

1. पटनोंदणी मोहीम -

जिल्हा परिषदेची सर्वाधिक पटसंख्या असणारी ठाणे जिल्ह्यातील एकमेव मराठी शाळा म्हणून जि. प.केंद्रशाळा -काल्हेर प्रसिद्ध आहे.आज मराठी शाळेकडे पालक-विद्यार्थी पाठ फिरविताना दिसतात, त्याच्या अगदी विरुद्ध काल्हेर शाळेत प्रवेश घेणारे विद्यार्थी दिवसेंदिवस वाढतच आहेत परंतु हे सहजसाध्य नव्हते. सन २०१४ साली शाळेची पटसंख्या अवघी ३५०च्या घरात होती. परंतु शाळेचा पट वाढविणे व टिकविणे या ध्येयाने प्रेरित शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अश्विनी पालवणकर मॅडम तसेच त्यावेळी कार्यरत शिक्षणवृंद आणि शालेय व्यवस्थापन समिती,ग्रामपंचायत,ग्रामस्थ यांनी घरोघरी भेटी देणे, पॅम्प्लेट्स वाटणे,जाहिराती करणे,झोपडपट्टी व शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांच्या पालकांचे उद्बोधन सत्र, पटनोंदणी मोहीम होती घेऊन शाळेमध्ये विविध उपक्रम, गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली.या मोहिमेला सर्वांच्याच सहकार्यामुळे व परिश्रमामुळे यश मिळाले आणि शाळेतील विद्यार्थी संख्येचा आलेख सतत चढत गेला व आज या शाळेची पटसंख्या ८०० वर येऊन पोहोचली आहे.





2. **प्रवेशोत्सव व पालक मेळावा** -

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच इ.१ली तो दाखल होणाऱ्या व शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेची भीती दूर व्हावी आणि शाळेची ओढ वाटावी यासाठी विद्यार्थ्यांना मिरवणूक काढून शाळेत आणले जाते, शाळेत रांगोळी, तोरण, फुगे लावून आकर्षक सजावट करून विद्यार्थ्यांचे औक्षवण केले जाते, फुले, चॉकलेट आणि शै.साहित्य देऊन स्वागत केले जाते व प्रवेशोत्सव अतिशय उत्साहात साजरा करण्यात येतो.पालकांनाही शाळेत आमंत्रित करून पालक-मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. त्यात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने विद्यार्थ्यांची स्वच्छता, शिस्त,गणवेश, वक्तशीरपणा व शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने उद्बोधन केले जाते.शाळेचा पट वाढविणे व टिकविणे, गळती रोखण्याच्या दृष्टीने हे उपक्रम उपयुक्त ठरत आहेत.







3. निपुण माता पालक -

निपुण भारत अभियानांतर्गत माता-पालकांचा सहभाग घेऊन 'शाळेबाहेरची शाळा' या उपक्रमातून घराघरातून शालेय शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्मिती होते. माता-पालकांचा या उपक्रमास मिळणारा प्रतिसाद व सहभाग उत्स्फूर्त असा आहे सन-2022-23 साली शालेय शिक्षण मंत्री मा. दीपकजी केसरकर साहेब, ठाणे जिल्हाधिकारी मा.डॉ.राजेश नार्वेकर साहेब, ठाणे, जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री. मनुज जिंदल साहेब, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मा.श्री.सुभाषदादा पवार साहेब, ठाणे शिक्षण अधिकारी मा.श्री.कारेकर साहेब यांनी भेट देऊन संवाद साधला व शाळेच्या उपक्रमाविषयी शाळेचे अभिनंदन केले. सन-2023-24 रोजी निपुण माता-पालक उत्सव कार्यक्रमांतर्गत माता-पालक गटास ठाणे जिल्हा उपशिक्षणाधिकारी मा.श्री.निर्पूते साहेब, समग्र शिक्षा ठाणे जिल्हा समन्वयक मा. श्रीम.सुवर्णा वावेकर मॅडम व प्रथम संस्था ठाणे जिल्हा समन्वयक मा. श्रीम. ऋतुजा पाटील मॅडम यांनी भेट देऊन माता-पालकांशी चर्चा केली, सभा घेतली व शाळेने या उपक्रमाची केलेली यशस्वी मांडणी व कार्यवाही याविषयी कौतुक केले. शाळेच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी हा उपक्रम यशस्वी होत आहे.





4. कोविड काळातील शिक्षण -

सन 2020-21कोविड काळात ही विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबले नाही.शाळे बाहेरची शाळा,ऑनलाईन, गुगल झूम मिटिंग सारख्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून, गृहभेटी देऊन, अध्ययन गट तयार करून व्हाट्सअपच्या माध्यमातून शिक्षणाचा झरा अखंड वाहतच होता. मुख्याध्यापिका मॅडम सर्व शिक्षक, व्यवस्थापन समिती, वेताळ शैक्षणिक प्रतिष्ठान, ग्रामपंचायत समिती ह्यांनी ह्यासाठी खूप मोलाची भूमिका पार पाडली. विविध उपक्रमात सहभागी होऊन शाळेने ह्या काळातही दखल घेण्यासारखी कामगिरी करून दाखविली.




5. **व्हर्चुअल व डिजिटल क्लासरूम -**

एकविसावे शतक हे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करत असताना व तंत्रज्ञान हे आयुष्याच्या एक अविभाज्य घटक बनत असताना दिसत आहे. सर्वच खाजगी, शाळाही इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे डिजिटल क्लासरूम हा उपक्रमामुळे विद्यार्थी व पालकांसाठी एक आकर्षण होते. आपल्या जिल्हा परिषदेच्या शाळाही कात टाकून आज तंत्रस्नेही बनवून काळाबरोबर चालत आहेत.आमच्या जि.प. केंद्रशाळा-काल्हेर येथेही विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत प्रभावीपणा व मनोरंजकता यावी या उद्देशाने प्रथम समाजसेवा संस्थेतर्फे सन 2022-23 साली व्हर्चुअल क्लासरूमचे उद्घाटन शालेय शिक्षण मंत्री मा. दीपकजी केसरकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षकांनी डेमो लेसन घेऊन वापर व हाताळणी याचे प्रात्यक्षिक सादर केले. उद्घाटन प्रसंगी ठाणे जिल्हाधिकारी मा.श्री. डॉक्टर राजेश नार्वेकर साहेब, जि.प.अध्यक्ष मा.श्री.पुष्पाताई पाटील मॅडम, जि.प. उपाध्यक्ष मा.श्री.सुभाषदादा पवारसाहेब, जि. प.मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.भाऊसाहेब दांगडे साहेब, शिक्षण अधिकारी मा.श्री.भाऊसाहेब कारेकर साहेब, गटशिक्षणाधिकारी भिवंडी मा.श्री.निलम पाटील मॅडम , शिक्षण विस्तार.अधिकारी मा.श्री. अस्वले साहेब,काल्हेर केंद्रप्रमुख श्री.संखे सर यांची विशेष उपस्थिती होती.शाळा यश प्राप्त करत असल्याची पावती ह्या माध्यमातून मिळत असते.









6. लोकसहभाग -

आमची जि.प.केंद्रशाळा-काल्हेर यशस्वी व प्रसिद्ध होण्या मागील एक महत्त्वाचा घटक म्हणजे शाळेच्या प्रगतीसाठी अविरत झटणारा, हाक दिल्यावर साथ देणारा व भक्कम पाठीराखा असणारा लोक सहभाग. लोकसहभागातूनच शाळेची प्रशस्त व सुसज्ज अशी इमारत, सभागृह, स्वच्छ पिण्याचे पाणी, वॉटर फिल्टर, टेबल खुर्च्या शाळेत उपलब्ध झालेल्या आहेत.विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य,वह्या, छत्र्यांचीही वाटप करण्यात आले आहे.गावातील ग्रामपंचायत, सेवाभावी संस्था, शालेय व्यवस्थापन समिती,ग्रामस्थ व पालकवर्ग असा भव्य लोकसहभागाचा महामेरू शाळेच्या प्रगतीसाठी बांधील आहे.









7. माझी स्वच्छ व सुंदर शाळा -

'स्वच्छता ही सेवा 2023' या उपक्रमांतर्गत दि.१५ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर 2023 या कालावधीत स्वच्छतेची सवय, महत्व व मूल्य जोपासना करण्याच्या उद्देशाने स्वच्छता शपथ, स्वच्छता फेरी, चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा, श्रमदान इ. प्रबोधन घडविणारे उपक्रम घेऊन 'स्वच्छ भारत दिवस' ग्रामपंचायत, शालेय व्यवस्थापन समिती, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अश्विनी पालवणकर मॅडम, शाळेतील कार्यरत शिक्षक वृंद तसेच सर्व विद्यार्थी यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन यशस्वी केला आहे.







8. कलात्मक - विकासात्मक उपक्रम -

विद्यार्थ्यांच्या विकास सर्वांगीण असावा, गुणात्मक व कलात्मक विकास झाला तरच एक परिपूर्ण विद्यार्थी घडतो. यशस्वी आयुष्यासाठी शैक्षणिक प्रगती बरोबरच कलात्मक प्रगती व्हावी, आजचे विद्यार्थी, उद्याचे भावी नागरिक असतील त्यादृष्टीने उत्तम खेळाडू,वक्ता, चित्रकार, कलाकार इ.अभिव्यक्ती क्षेत्रातही विद्यार्थी पारंगत असावेत या उद्देशाने वक्तृत्वस्पर्धा,चित्रकला स्पर्धा, कार्यानुभवावर आधारित कार्यशाळा, क्रीडा स्पर्धा, विविधगुणदर्शन स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना सहभागी

होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते, मार्गदर्शन केले जाते.त्यामुळेच आमची शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव तत्पर असणारी अशी एक उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जात आहे.














एक पणती

शाळेची घेण्यात आलेली दखल :-फलनिष्पत्ती

" नन्ही चींटी जब दाना लेकर चलती है,

चढती दिवारो पर, सौ बार फिसलती है |

मनका विश्वास रगों मे साहस भरता है,


चढकर गिरना, गिरकर चढना न अखरता है |

आखिर उसकी मेहनत बेकार नही होती,

कोशिश करने वालों की कभी हार नही होती |"

या हरिवंशराय बच्चनजी लिखित कवितेस अनुसरून, शाळेने शून्यातून सुरुवात करून विश्व निर्माण केले आहे. अविरत न थकता,थांबता, कष्ट घेऊन,समर्पण वृत्तीने झटून शाळेस आज यशाच्या पंक्तीत नेऊन बसवली आहे. शाळेच्या या सर्व उपक्रमातून शाळा नावारूपास आली,अनेक प्रतिष्ठित मान्यवरांनी शाळेत भेटी देऊन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अश्विनी पालवणकर मॅडम, कार्यरत शिक्षकवृंद शालेय व्यवस्थापन समिती,वेताळ शैक्षणिक प्रतिष्ठान,ग्रामपंचायत समिती,मा. सरपंच, मा. उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

आमच्या उपक्रमशील शाळेच्या कार्याने दखल पंचायत समिती भिवंडी ह्यांनी घेतली व सन-2022-23 च्या आदर्श शाळा पुरस्काराने दि-03 डिसेंबर 2022 रोजी पंचायत समिती सदस्य मान.श्री. विनोद गोपाळ मुकादम साहेब ह्यांच्या हस्ते शाळेच्या मुख्याध्यापिका मान. श्रीम. अश्विनी राजन पालवणकर यांस देऊन शाळेस गौरविण्यात आले आहे.कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी भिवंडी मान. श्रीम. निलम पाटील मॅडम,मा.श्री.अस्वले साहेब,विस्तार अधिकारी मा.श्रीम. डोंगरे मॅडम, केंद्रप्रमुख मा. श्री. संखे सर उपस्थित होते.विविध वर्तमानपत्रे स्थानिक न्यूज चॅनल व मीडियामध्येसुद्धा शाळेच्या कार्यक्रमांची दखल घेऊन शाळेस प्रसिद्धी दिली आहे.





समारोप -

आमच्या शाळेने विविध सहशालेय उपक्रमांचे आयोजन व कार्यवाही करून शाळेस ओळख प्राप्त करून दिली आहे. ह्या सर्व उपक्रमांचे यश म्हणजे शाळेची वाढलेली पटसंख्या. आज मराठी शाळांकडे पालक व विद्यार्थी पाठ फिरवत असताना आमच्या शाळेत मात्र वर्षभर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थांचा ओघ वाहतच आहे. हे वैभव शाळेने आपल्या सहशालेय उपक्रमातून प्राप्त केले आहे आणि विविध सहशालेय उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास करण्यासाठी आमची शाळा सदैव तत्पर आहे अशी ग्वाही आम्ही देत आहोत.

उमलत्या कळीत, विश्वास देऊ पाळीत..


शाळेचे नाव - ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 95 काजूवाडी, ठाणे.

Email Id - tmc95thane@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – सौ.सुप्रिया प्रदीप मळेकर

सहशिक्षक - सौ शारदा चंद्रकांत चौधरी




हालचाल

प्रास्ताविक -


आज आपण 21 व्या तंत्रज्ञानाच्या युगात प्रवेश केलाय एकीकडे आपली महिला अवकाशात झेप घेतेय असे कोणतेच क्षेत्र नाही की जिथे महिला पोहचली नाही. आज आपल्या महिला चांद्रयान मोहीम यशस्वी करीत आहेत.मागील दोन वर्षांपासून तर स्त्रीयांसाठी अतिशय अवघड अशा डिफेन्स मधील NDA सारख्या क्षेत्रात महिला उतरल्या. एकीकडे ही परिस्थिती तर दुसरीकडे ही आपली आजची स्त्री ह्या मासिक पाळी संदर्भात बोलायलाही संकोच करते.

१. एकदा शाळेत वर्गात शिकवीत असताना वेदिका ची अचानक वर्गात बाकावर बसलेली असतांनाच मासिक पाळी आली.तिला माहिती झाले तोपर्यंत तिच्या ड्रेस वर डाग पडले.तिला खूपच अवघड वाटत होते.आता काय करू?कसे घरी जाऊ? या प्रश्नाने ती अस्वस्थ झाली.मग मी तिची अवस्था जाणली.व माझी ओढणी तिला दिली.डाग दिसू नये अशी गुंडाळून दिली.आणि मग ती घरी गेली. हे असे अनेक प्रश्न नेहमीच शाळेत निर्माण होत असत.अचानक मुलींची पाळी येत असे मग त्या खूप घाबरायच्या. ज्या मुलींना पाळी येत असत त्या कधीच त्याबद्दल शाळेत बोलायच्या नाहीत. आठवीच्या मुलींना बऱ्याचदा विचारल्यानंतर त्यांनी एकदा भित भित सांगितले की मॅडम आम्ही कपड्याची घडी वापरतो..

२. समाजात पूर्वीपासून ह्या पाळीचे अनेक गैरसमज पसरले आहेत. महिलांना हे माहिती असायला हवं की, ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. कोणत्याही अंधविश्वासावर विश्वास न ठेवता मासिक पाळीची वैज्ञानिक माहिती घेणं आवश्यक आहे, आणि आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असणाऱ्या ह्या पाळी विषयी बोलणे किती महत्वाचे आहे हे आता सर्वांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे.

३.माझ्या शाळेतील पाचवीच्या मुलींनी मला एकदा सामुदायिक विचारलेला प्रश्न? मॅडम आपल्या शाळेतील काही मुली कधी कधी सारख्या मागे फ्रॉकला का बघत असतात व आम्हाला विचारतात. अग काही लाल डाग दिसतोय का बघ ?लता त्यावर लगेच म्हणते अग रक्ताचा डाग पडला की काय हे बघत असतात . तर अनिता म्हणते अग तिला काहीतरी लागलं असेल व रक्ताचे डाग पडले असतील, यांची ही अशी चर्चा ऐकतांना मनात विचार येत. मुलींना योग्य वयात पाळीसंबंधी माहिती दयायला हवी.

४.मला ही माझ्या पहिल्या पाळीचा अनुभव लक्षात आला.. त्यावेळेची परिस्थिती मला आठवली,तो पहिल्या पाळीचा प्रसंग आठवला की आज ही अंगावर शहारे येतात.त्यावेळेस माझी जी अवस्था झालेली होती ती आज ही ३० वर्षानंतर ही तशीच आहे. माझ्या वेळेस खूपच कठीण परिस्थिती होती परंतु आता ही जर ह्या मुलींची ही अवस्था असेल तर...



ह्या उमलणाऱ्या कळ्याना जर आपण योग्य रीतीने उमलू दिले तर... यावर विचार पूर्वक चर्चा करून ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही विविध उपक्रम राबविले व तिची ती मासिक पाळी सुखकर केली .



५.आज ही आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत येणाऱ्या मुली ह्या मागास,परप्रांतीय,झोपडपट्टी अश्या ठिकाणांहून येतात त्यात मुलींची आई बरेचदा अशिक्षित ही असते त्यामुळे ही पाळी सर्वाना सुखकर जावी ह्या अनुषंगाने आम्ही राबविलेले यशस्वी उपक्रमांची यशोगाथा येथे मांडत आहे.

विषयासंदर्भात आलेल्या समस्या...

१.शाळेत परिपाठ नंतर आम्ही सर्व शिक्षक खेळ ही घेत असू,पण बऱ्याचदा इयत्ता पाचवी ते आठवी च्या मुली खेळायला तयार नसत,आणि त्यांची आपापसात कुजबुज असे,काही वेळेस तर त्या नुसत्या बसूनच असत,कुठलीही वस्तू आणण्यासाठी उठतही नसत,काही मुली तर तीन ,तीन दिवस गायब राहत मग तिच्या मैत्रिणी सांगत मॅडम तिला यायचं नसेल.. एक तर म्हणाली मॅडम ते डाग पडतात ना मग तिला भीती वाटते.. किंवा बऱ्याच मुलींची आई ह्या दिवसांत त्यांना शाळेतच येऊ देत नसत..

२.आठवी च्या मुलींना बऱ्याचदा विचारल्यानंतर त्यांनी एकदा भित भित सांगितले की मॅडम आम्ही कपड्याची घडी करून वापरतो आणि डाग पडेल या भीतीने एकच ठिकाणी बसून राहतो.

३. मुली बोलल्या की हे पाच दिवस आम्हाला घरात ही वेगळच बसवून ठेवतात आणि वेगळीच वागणूक मिळते.हे वेगळं बसवणं काय असते. हे दुःख आम्हा मुलींनाच का येते?

गैरसमज -

१.पूर्वापार चालत आलेल्या कुप्रथा ह्या आज ही अज्ञाना मुळे जश्याच तश्या आहेत. उदा.ह्या पाच दिवसात घरात अडगळीच्या खोलीत किंवा कोपऱ्यातच बसायचे,त्या काळात त्यांचं अंथरूण ,पांघरूण, जेवणाचे ताट वेगळे असे. या प्रथांमुळे मुलींची मानसिक घुसमट होते.चंद्रपूर,गडचिरोली ह्या ठिकाणी अश्या मुली व महिलांसाठी असे कुर्मा घर आज ही आहेत.

२. पालकांची अनास्था ह्या काळात ह्या मुलींना पाळी बद्दल सांगणे खूप आवश्यक असते.ती का येते,ती आली म्हणजे तुम्ही वयात आल्या.तिचे फायदे त्या काळातील स्वच्छता, pad चा वापर करणे वगेरे ,परंतु माता आपल्या मुलींना हे सांगतात , तू ह्या काळात उड्या मारू नको ,एकच जागी बस,कोपऱ्यात रहा, शाळेत नको जाऊ. त्यामुळे यात मुलींची घुसमट होते त्या काळातील अभ्यास अर्धवट राहतो त्या घाबरतात.आपल्याला काही आजार झालाय का असेच त्यांना वाटते.


काही चुणचुणीत मुलींनी मला तर घाबरत घाबरत प्रश्न विचारला..मॅडम हे असे डाग का पडतात.. मला तर कस कस च होत व माझ्या आईने सांगितलं की हा कपडा घडी करून ठेवायचा , शाळेत उड्या मारायच्या नाहीत एकच जागी बसायचे अश्या विविध समस्या समोर आल्यात व तेव्हा आम्ही विचार केला की यांना यासंदर्भात मोकळ करून बोलत करणे गरजेचे .....येथूनच उमलत्या कळीचा प्रवास सुरू झाला.

मुख्याध्यापक शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी –

ह्या वयात येणाऱ्या मुलींचा प्रश्न नाजूक होता व तेवढाच महत्वाचा. यावर ह्या कुमारवयीन मुलींचे भविष्य अवलंबून होते. तसेच शाळेचा विकास ही अवलंबून होता.सर्वप्रथम मुख्याध्यापक यांनी सर्व शिक्षकाची सहविचार सभा घेतली व हा विषय कसा हाताळावा ह्यावर चर्चा केली. प्रत्येक शिक्षकाला जबाबदारी वाटून घेतली व पार पडली

१.सौ.सुप्रिया प्रदीप मळेकर मुख्याध्यापक यांनी डॉक्टर यांना संपर्क साधून त्यांना शाळेत बोलावले .

२. सौ. सौ.अनघा कोयंडे मँडमनी घोषवाक्य तयार करून घेतले.





३.सौ.शारदा चंद्रकांत चौधरी प्रत्येक मुलीची माता शाळेत येण्यासाठी त्यांच्या घरी गृहभेटी २ मातांची सभा.. घेतली.व समूपदेशन केले.पाळीची स्वच्छता कशी करावी ते सांगितले.





उमलत्या कळीत विश्वास देऊ पाळीत या नवोपक्रमाला चौथा क्रमांक प्राप्त

४.मासिक पाळी व स्वच्छता संदर्भात शाळेत प्रोजेक्टर वर व्हिडिओ दाखवणे व Padman फिल्म दाखवणे. प्रत्यक्ष कामाला सुरुवात करताना ह्या सर्व मुलींच्या मातांची एक सभा शाळेत बोलवून त्यांना पाळी म्हणजे नेमके काय,ती का येते,ह्या काळात घ्यावयाची स्वच्छतेची काळजी या सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी महिला डॉक्टर गायनोकोलोजिस्ट बोलवले होते. त्यांनी प्रत्यक्ष आकृती द्वारे सर्व स्पष्टीकरण केले आणि तुम्ही ह्या विषयावर बोलते व्हा. तेव्हाच तुमच्या मुली ही मोकळ्या बोलतील असे सांगितले. त्यांच्या प्रत्येक प्रश्नांचे उत्तर डॉक्टर यांनी दिले. मुलींची कार्यशाळाच घेतली त्यांना मुली वयात कधी पासून येतात. पाळी म्हणजे काय? सर्वप्रथम पाळी हा मुद्दा गुंतागुंतीचा नाही.त्यामुळे तुम्ही बिनधास्त बोला, यावर कटाक्षाने भर दिला.पाळी बददल सांगा.मग काळजी कशी घ्यावी यावर चर्चा केली तर त्यामधे त्या कपड्याची घडी घ्यायच्या हे समजले त्यामुळे त्यांचे उठणे बसणे हे अवघड होत होते ते व्यवस्थित व्हावे स्वच्छता कशी राखावी याचे प्रत्यक्ष उदाहरण दाखविले.pad कसा वापरावा हे दाखविले आणि यापुढे तुम्हाला शाळेतच pad मिळतील हे समजावले..मग त्यांना शाळेत सौ.सुवर्णा निकम मँडमनी पँड द्यायला सुरुवात केली . सॅनिटरी मशिन असल्यामुळे त्यांना पँड मिळत गेले.

https://drive.google.com/file/d/1Dxe9CXQmYgBmJfalsTj0Ud6ISGkp5ab0/view





हळूहळू मुलींची पाळीची भीती कमी होत गेली.त्यांची समस्या कमी झाली. या गोष्टीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांच्या. कडून च घोषवाक्य तयार केले.व आपल्या परिसरातील मुलींना, स्त्री यांना ही माहिती पोहचविण्याचे कामच त्यांना दिले.

घोषवाक्य लिंक - https://www.youtube.com/watch?v=3_XxlG4QuwA

त्यांच्या कडूनच नाटिका बसविल्या, अश्या माध्यमातून मुली बोलत्या झाल्या व हळूहळू मुलींमध्ये बदल दिसू लागला. मुली आता बोलत्या होत होत्या. त्यांना आता कपड्याची घडी वापरायच्या ऐवजी पँड वापरू लागल्या. एकमेकींना मासिकपाळी याबद्दल बोलू लागल्या त्यानंतर कधी कधी पोटात दुखायचे मग बाजूला प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे डॉ .स्वाती शिंदे, यांनी मुलींना प्रोत्साहन दिले.

डॉ.स्वाती शिंदे- प्राथमिक आरोग्य केंद्र





स्वच्छतेची काळजी कशी घ्यावी यावर मार्गदर्शन केले.डॉ.मनिषा पवार मॅडम यांनीही मार्गदर्शन केले . .

एकात्मिक बालविकास सेवा योजनाच्या सुवर्णा पाटील मॅडम यांनी फोनद्वारे मार्गदर्शन केले.त्यानी महत्त्वपूर्ण सल्ला दिला की पाळीची माहिती सांगायच्या आधी आपल्या शरीराच्या बदलाची ओळख करून द्या मग पाळीविषयी बोला.त्याना आवडेल.तज्ञ मार्गदर्शन सुवर्णा पाटील मॅडम, पर्यवेक्षिका एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प मोखाडा तसेच डॉ.अनिता बेंडाळे गायनालाजिस्ट यांना वेळोवेळी मुलींचे मासिकपाळी रेकॉर्ड पाठवले

तसेच मुलींना सॅनिटरी पॅड देऊ दिले. अश्या प्रकारे आमच्या शाळेतील मुली आता मनमोकळे बोलायला लागल्या.ज्या ह्या दिवसात गैरहजर राहत त्या आता नियमित शाळेत येऊ लागल्या खेळ खेळू लागल्या,आणि चांगल्या अभ्यास ही करू लागल्या.




ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 95 काजुवाडी ला डॉ अनिता बेंडाळे कडून इयत्ता सातवी आणि आठवी या वर्गासाठी मुलींना सॅनिटरी पॅड मिळाले.



डॉ.अनिता बेंडाळे नाशिक यांनी पाठविलेले सॅनिटरी पॅड स्विकारतांना सुजाता चौधरी आणि शारदा चौधरी






मासिक पाळी
12
10
8
6
4
2
0
सहावी
सातवी
आठवी
मुली
निसंकोच बोलते झाल्या



विविध कार्यक्रमात सहभागी होतात.






माझी
लाडकी
बहीण



सौ.शारदा चंद्रकांत चौधरी प्राथमिक शिक्षिका यांचा तेजोमय दिवस मासिकपाळी शॉर्ट फिल्म मध्ये सहभाग. तिचं अस्तित्व शॉर्ट फिल्म मध्ये सहभाग





एकत्र बसून डबा वाटून खातात.

लिंक-

https://drive.google.com/drive/folders/1BiKEYbLb5CZgmaA2Xq4S0UiigbVe0HSz
https://youtu.be/vrKl3esiXBg?feature=shared
https://youtube.com/shorts/oq57Mv9BQq4?feature=shared
https://youtu.be/3_XxlG4QuwA?feature=shared
https://youtu.be/Caw2BTgnqlg?feature=shared
https://drive.google.com/file/d/1Bj2vp-CVAIA6Enx-sCjjqo5mEIHX-tao/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1Bg60UkZd2baU62OtCRRAhLsO0zW6mkrG/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1Bji4qYeHrgNhHrZbUIu75zibXLTnTuqr/view?usp=drivesdk

फलश्रुती -

1.आमच्या शाळेतील मुली पाळी ह्या विषयावर बोलत ही नव्हत्या त्या आता निसंकोच पणे बोलतात.

2.पाळी म्हणजे हा एखादी अभिशाप नसून ती नवनिर्मितीची चाहूल असते यावरच संपूर्ण जीवसृष्टी अवलंबून आहे हे मुलींना हळूहळू पटायला लागले.

3.ज्या मुली पाळीच्या काळात कापडी घड्या वापरत होत्या त्या आता स्वतः शाळेतून pad बॉक्स मधून pad आणतात. एकमेकींना ह्या काळात मदत करतात.

4.ह्या सर्वाचा महत्वाचा परिणाम शाळेच्या विकासावर ही झाला पाळीच्या काळात चार दिवस. सतत गैरहजर राहणाऱ्या मुली आता दररोज हजर राहू लागल्या.

5. ज्या मुलींना खो खो,कबड्डी असे खेळ खेळायला आवडत व ते मासिक पाळीच्या कारणांनी खेळत नसत त्या आता निसंकोच खेळायला लागल्या.

6.मुलींना पाळीच्या काळातील स्वच्छता कळली व त्या आता स्वतः स्वच्छतेचे नियम पाळू लागल्या..

7.माता पालकांना ही वेळोवेळी शाळेत बोलवून पाळी बद्दलची माहिती मिळाल्याने त्या ही आता जागरूक झाल्या. ही गोष्ट लपवायची व किळसवाणी नसून ती निसर्गतः नवनिर्मितीची प्रक्रिया आहे ही गोष्ट त्यांना पटली त्यामुळे त्या आता निसंकोच पाळी बद्दल बोलू लागल्या.

समारोप -

अश्या पद्धतीने आम्ही आमच्या शाळेतील उमलत्या कळ्यांचे उमलणे , खेळणे,बागडणे, सहजपणे वागणे,खेळात सहभागी होणे, आनंदाची पर्वणी यशाचे गमक आहे हे त्यांना पटवून दिले.त्यांना बोलते करून त्यांना जीवनातील आनंद परत मिळवून दिला. ध्यास तर सर्वांनी घेतला होताच पण सर्वांच्या प्रयत्नांनी तो पूर्ण केला..

पाळी

मनात अनेक विचार, मासिक पाळी आली
कसे सांगू काय सांगू, पंचाईत खूप झाली
का असे होत असेल, मनामधे आल्या शंका
मी आता कसे राहू, विचारांच्या शंका कुशंका
आई जाते कामावर, ताईचे सकाळी कॉलेज
मासिक पाळी विचाराचे, मी कसे मिळवू नॉलेज
प्रश्न मला अनेक पडतात, उत्तर सापडत नाही
व्यक्त करण्यासाठी, वर्ग शिक्षिका माझी आई
साऱ्या प्रश्नांचीच उकल, आता झाली आहे मला
विचारांचे काहूर संपले, बिनधास्त सहज जगायला
मासिक पाळी दिवस तेजोमय, घालवूया साऱ्या जणी आनंदमय



पाळीत स्वच्छता, आरोग्य सुदृढता, माझी पाळी,माझे बदलाव
गरज आहे आनंदी राहण्याची, भिती नको पाळी येण्याची
आईला विचारू,बाईला विचारू, मनातील शंकांचे समाधानाची

लिंक-

https://www.youtube.com/watch?v=vrKl3esiXBg
https://youtube.com/shorts/oq57Mv9BQq4?feature=shared
https://youtu.be/3_XxlG4QuwA?feature=shared
https://youtu.be/Caw2BTgnqlg?feature=shared
https://drive.google.com/file/d/1Bj2vp-CVAIA6Enx-sCjjqo5mEIHX-tao/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1Bg60UkZd2baU62OtCRRAhLsO0zW6mkrG/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1Bji4qYeHrgNhHrZbUIu75zibXLTnTuqr/view?usp=drivesdk

आनंददायी शिक्षणासाठी विविध उपक्रम

शाळेचे नाव -जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देशमुख मळा, धांदरफळ बु., ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

मुख्याध्यापकाचे नाव - सौ. वृषाली सुनील कडलग.

प्रास्ताविक -

२९ जून २०१८ मध्ये माझी बदली जिल्हा परिषद शाळा देशमुख मळा येथे झाली. नवीन शाळा कशी असेल तेथील मुले कशी असतील, पालक कसे असतील असे अनेक विचार डोक्यामध्ये येत होते. शाळेत पोहोचले. देशमुख मळा ओढ्याच्या शेजारची शाळा. खरंतर मी मोठ्या शाळेमध्ये काम करण्याची सवय असलेली उपाध्यापिका म्हणून छोट्या शाळेत काम कसं करायचं असेही विचार डोक्यात कावकाव करत होते. शाळेमध्ये आले, शाळेच्या पटांगणात भले मोठे गवत वाढलेले. निरीक्षण करताना अचानक त्या गवतात जरा हालचाल जाणवली बघते तर काय त्या ठिकाणी साप पुढे निघून गेला. मनात धस्स झाले. टीप टीप पाऊस चालू होताच पडवी मध्ये ओलावा होता पडवीचा पत्रा गळत होता वर्गामध्ये प्रवेश केला वर्गातही ओलावा दोन्ही वर्गासह अंगणवाडी ही गळत होती. जेवणाच्या प्लेट मध्ये पाणी पडत होते.

मनाशी निश्चय केला की ही परिस्थिती मी बदलून टाकेल, डोळ्यात टचकन आलेले पाणी केव्हाच पळून गेले. हळूहळू मुलांच्या आणि पालकांच्या ओळखी होत गेल्या. मुलांना आठ ते दहा दिवसातच माझा लळा लागला. शिक्षक पालक सभेमध्ये ही विचार मांडला की आपण शाळेचे स्वरूप बदलून टाकूयात हो तर सर्वांनी म्हटले पण पुन्हा काही दिवस कुणी पुढे येईना.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश देशमुख यांना बोलावून घेऊन मी गवंडी बोलावण्यास सांगितले. स्वतः एक पगार काढून स्वतःच काम सुरू केले. कामाला रूप येतंय हे बघायला लागल्यानंतर लोकच चौकशी करायला लागले त्यांच्या लक्षात आलं की मॅडम एकट्याच खर्च करतात आणि मग लोकांनी हळूहळू मदत करायला सुरुवात केली. गावातील सर्वच लोकांनी राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून शाळेला भरभरून मदत केली. चांगले शिकवणारे दोन्हीही शिक्षक एक मुख्याध्यापक आणि दुसरी शिक्षिका आपल्या मुलांचे भवितव्य उज्वल होईल हा विचार त्यांच्या मनामध्ये रुजवण्यास मी यशस्वी ठरले होते आणि बघता बघता शाळेचे स्वरूप बदलून गेले.

स्वच्छ सुंदर व आनंदी शाळा बनवण्यासाठी शाळेचे कंपाउंड उभे राहिले. संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समिती चे माजी सभापती अनिल देशमुख यांनी शाळेला सुसज्ज प्रवेशदवार दिले. शाळेच्या कंपाउंड वर हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळ्याचे चित्र रंगवण्यात आले. यामुळे विद्यार्थी शिवजयंती उत्सव मोठ्या आनंदात साजरा करू लागले.संगमनेर मधील रोटरी क्लब च्या मदतीने शंभर गोष्टीचे पुस्तके, हॅन्ड सॅनिटायझर मशीन आणि कपाट मिळवले. विद्यार्थी आवडीने छोटी छोटी गोष्टीचे पुस्तके वाचू लागले त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्य वाढण्यास मदत झाली वाचनाचे आवड तयार झाली. पुस्तके व्यवस्थित घेणे आणि व्यवस्थित कपाटामध्ये ठेवणे ही शिस्त मुलांना लागली. पुस्तकांना जपणे मुलांना समजले .कोरोना काळात हाताची स्वच्छता राहण्यासाठी हॅन्ड सॅनिटायझर चे मशीन रोटरी क्लब कडून उपलब्ध झाले. स्वतःच्या पगारातून रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम ही उभी राहिली. पावसाचे पाणी त्याच ठिकाणी जमिनीमध्ये सोडण्यात आले त्यामुळे पाण्याची बचत झाली. पाणी हे जीवन आहे त्याचं महत्त्व मुलांना यामुळे समजलं. गुजरात स्थित उद्योगपती भाऊसाहेब डेरे यांची मदत घेऊन शाळेला साऊंड सिस्टिम,सोलर सिस्टम मिळवली. साऊंड सिस्टिम मध्ये रोज सकाळी गोष्टी, गाणी, सप्तरंगी परिपाठ, सांस्कृतिक कार्यक्रम यामध्ये विद्यार्थी भाग घेऊ लागले. सोलर सिस्टम

मुळे शाळेला 24 तास लाईट उपलब्ध झाली.विद्यार्थी गळक्या पडवीत बसत होते. जेवण करण्यासाठी व्यवस्थित जागा देखील नव्हती. अनेक वेळा पावसाचे पाणी प्लेटमध्ये पडायचे. मा.बाळासाहेब देशमाने यांना भेटून पडवीकरता डोनेशन मिळवले आणि सुसज्ज असे पत्र्याचे शेड उभे राहिले. विद्यार्थी आज आवडीने या सेटमध्ये जेवण करतात खेळतात उन्हापासून मुलांचे रक्षण झाले.माजी सरपंच मंगलताई देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी भव्य कलामंच दिला.

गावातील ज्येष्ठ सामाजिक व राजकीय कार्यकर्ते वसंतराव देशमुख यांनी शाळा डिजिटल करण्यास मदत केली शाळेमध्ये संगणक आला. शैक्षणिक अनुभव विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवता आले अनेक प्रकारच्या कविता ताला सुरामध्ये दाखवता आल्या. तारखेचा पाढा संगीतमय पाढा घेऊन विद्यार्थी पाढे शिकले. शाळेमध्ये होणारे भौतिक सुविधा आणि स्वच्छ परिसर बघून पटसंख्या वाढण्यास मदत झाली. त्या सर्व गोष्टींचा वापरही होत असल्यामुळे पालकांचा उत्साह आणखीनच दुणावला. शाळेचे अंतरंग आणि बाह्यरंग यामधील बदल विद्यार्थी १००% उपस्थित राहिले. आम्ही परिसरातील औषधी वनस्पतींची जमून लागवड केली. विद्यार्थ्यांनी आपल्या घरासमोरील तुळशी, कोरफड, निलगिरी पान, अडुळसा, ओवा, आवळा, लाजाळू, लिंबोणी, शेवगा, आंबा, बदाम, सिताफळ, इ. ची रोपे आणून झाडे लावली. एक मूल एक झाड याप्रमाणे विद्यार्थ्यी आपल्या घरी केशर आंब्याचे एक झाड लावून वाढदिवस साजरा करू लागले. दप्तर मुक्त शाळा या अंतर्गत प्रत्येक शनिवारी अवांतर वाचन घेतले पेपर मधील शैक्षणिक पुरवणी मधील कोडे सोडवणे चित्र रंगवणे गोष्ट वाचणे जगातील वैशिष्ट्यपूर्ण घडामोडी विद्यार्थी वाचू लागले.

ओढा क्षेत्र भेटीच्या उपक्रमांतर्गत शाळेसमोरील ओढ्याचे पर्यावरणाच्या दृष्टीने महत्व विषद केले. चला ओढा समजून घेऊया, शाळेच्या समोरच असल्यामुळे ओढ्याचे महत्त्व ,ओढा कसा तयार होतो याबद्दलचे कुतूहल मुलांमध्ये होतेच. नियमीत ओढ्याचे वाहणारे पाणी त्याचा खळखळता आवाज तसेच त्याचे महत्त्व, उपयोग समजून घेतले. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शाळेत पुढील उपक्रम राबविले.

क्षेत्रभेट- चला, ओढा समजून घेऊ या.

उद्दिष्टे- १ विद्यार्थ्यांमध्ये संघभावना निर्माण करणे.
२ स्त्री पुरुष समानता आणणे.
३ पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करणे.
४ गावाचा ठेवा जतन करणे.

अध्ययन निष्पत्ती- या उपक्रमातून विद्यार्थी पर्यावरण समजून घेतील, आनंद मिळवतील, स्वतः माहिती जमवून खऱ्या अर्थाने शिकतील.

साहित्य - वही, पेन ,कापडी पिशव्या ,जेवणाचा डबा इत्यादी

पूर्वतयारी - क्षेत्रभेट हा उपक्रम घेताना मान. मुख्याध्यापकांना संपूर्ण कार्यवाहीची माहिती दिली. शालेय व्यवस्थापन समिती, अध्यक्ष यांनाही संबंधित उपक्रमाविषयी अवगत केले. विद्यार्थ्यांच्या पालकांना माहिती दिली. विद्यार्थ्यांना आदल्या दिवशी

एकत्र करून उपक्रम कसा पूर्ण होणार आहे? आपण सर्वांनी कशी काळजी घ्यायची? कार्यवाहीसाठी लागणारा अंदाजे वेळ, उपक्रमाची मर्यादा याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यवाही - सकाळी नऊच्या दरम्यान ओढ्याच्या कडेला विद्यार्थ्यांसह आम्ही पोहोचलो. ओढ्याचे विहंगम दृश्य विद्यार्थ्यांनी डोळ्यात आणि हृदयात भरून घेतले. तेथील विविध वनस्पती, पक्षी, दगड, शंख शिंपले, पाण्याचा प्रवाह यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. कापडी पिशव्यांमध्ये शंख शिंपले, दगडाचे विविध आकार, वनस्पती, शेवाळ यांचे नमुने जमा केले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारले त्या प्रश्नांना उत्तरे दिली.

सकाळी साडेअकरा वाजता ओढ्याच्या कडेला असलेल्या आंब्याच्या झाडाखाली मुलांची पंगत बसली. भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी ओढ्याची भेट घेतल्यानंतर त्यांना जाणवलेल्या विशिष्ट गोष्टी नमूद केल्या. रांगेत, शिस्तीत विद्यार्थी शाळेत आले.

दुसऱ्या दिवशी कापडी पिशव्यांतून सोबत आणलेल्या वस्तूंचे छोटे प्रदर्शन वर्गसमोर मांडले. त्या प्रदर्शनाचा लाभ ग्रामस्थ आणि पालकांनी घेतला.

मूल्यमापन - या उपक्रमातून पर्यावरणाशी जवळीक साधण्याचा प्रयत्न झाला आणि निसर्ग माझा सोबती ही भावना निर्माण होण्यासाठी मदत झाली.

विद्यार्थ्यांनी संघ भावनेचे प्रदर्शन केले. ओढ्याला भेट देत असताना बारकाईने निरीक्षण केले. ओढ्याच्या कडेची वाळू, पाण्याचा प्रवाह, पक्षांचे आवाज निरनिराळ्या आकाराची पाने, फुले या सर्वांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. जेवताना पाहिलेल्या गोष्टींचे तोंडी वर्णन केले, आपली कला सादर केली. खाऊचे वाटप, डबे धुणे या कामात विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी सहभाग घेतला.

भारतीय संस्कृती प्रमाणे मातृ-पितृ पूजन करून विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांना नमस्कार केला. हार घालून आरती केली त्यामुळे आई वडील भारावून गेले. सध्या तरुण पिढीला या संस्काराची आवश्यकता आहे. परिसरातील उपलब्ध रानमेवा शेतातील वनस्पतींचे पीक फळे जमा करून, बालआनंद मेळावा, आठवडे बाजार यांचे नियोजन केले यातून विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाचा अनुभव आला वस्तूची किंमत देवाणघेवाण करणे समजले. काच फलक, हस्तकला या उपक्रमा अंतर्गत अनेक कागदी आकार ग्रीटिंग कार्ड, डाळी बिया काड्या मनी पाने कार्ड सेटवर चिटकून सुंदर भेटवस्तू तयार केल्या आणि काच फलकामध्ये लावल्या नाविन्यपूर्ण कविता गोष्टी पेपर मधील कात्रण विद्यार्थिनी नियमित आणून काचफलकात लावू लागले. ओला व सुका कचरा ई कचरा समजून याचे विभाजन केले योग्य ठिकाणी कचऱ्याची विल्हेवाट लावली शालेय परिसर वर्ग सदैव स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी मदत झाली माझा खाऊ मला द्या,प्लास्टिक मुक्त शाळा, प्लास्टिक मुक्त गाव यामुळे वाढदिवसाला मिळणारे चॉकलेट घरातील प्रत्येक नवीन वस्तूला येणारे प्लास्टिक आवरण एका ठिकाणी जमा करून प्लास्टिक गोळा केले याचा जनावरांना होणारा तोटा समजल्यामुळे प्लास्टिक चा वापर कमी करण्यास सुरुवात झाली.कंपोस्ट खताचा उपयोग शालेय परसबागेमध्ये लावलेल्या झाडांना करण्यात आला.अशा विविध उपक्रमांची मांदियाळीच तयार झाली.

संगमनेर शहर रोटरी क्लब तर्फे आम्ही अतिशय धडपडीने त्यांना आग्रह धरून शाळा डिजिटल करण्यासाठी आणि कोविडमध्ये मुलं शाळेत येत नाहीत म्हणून विद्यार्थ्यांना घरीच अभ्यास करता यावा म्हणून ११ टॅब मिळवले. यामुळे कविता पाठांतर, पाढे, स्वाध्याय, इंग्रजी शब्दांचे उच्चार, खेळ, गाणी, गोष्टी ऐकण्यासाठी उपयोग झाला त्यासाठी अनिल

काळे आणि भाऊसाहेब डेरेनी केलेली मदत महत्त्वपूर्ण ठरली. मुलांची शाळा बंद पण शिक्षण चालू या पद्धतीने चालू राहिले. शाळा सुरू झाल्यानंतर उपस्थिती वाढवण्यासाठी लांबून येणाऱ्या मुलींसाठी इनरव्हील क्लब ऑफ संगमनेर च्या मदतीने आठ सायकल मिळवण्यात आल्या.

विद्यार्थ्यांचा अगदी प्रत्येक उपक्रमामध्ये आम्ही सहभाग घेतला विज्ञान प्रदर्शनात प्रदूषण विरहित सिग्नल झोन या मॉडेलला तालुका पातळीवर प्रथम क्रमांक मिळाला. शब्दांचा डोंगर या अंतर्गत कविता गाणी यांचे हस्तलिखित तयार केले साहित्यिक संतोष खेडलेकर यांनी या हस्तलिखिताचे उद्घाटनकेले. परसबाग असो की परिसरातील लघुउद्योजकांना भेटी असो...

मुलांचा उत्साह दुणावतच होता. आपल्या गावातील ग्रामपंचायत, लोहार, सोनार, कुंभार, वीट-भट्टी, बँक, पाणीपुरवठा, फोटोस्टुडिओ यांची माहिती असावी म्हणून प्रत्यक्ष भेट देऊन माहिती सांगितली. गावातील बाजार कसा भरतो, हे प्रत्यक्ष बाजारात जाऊन समजून सांगितले.

वर्गामध्ये कला कार्यानुभव, गणित कोपरे तयार करण्यात आले शालेय कवायत साहित्य आणल्यामुळे २६ जानेवारी, १५ ऑगस्ट या राष्ट्रीय कार्यक्रमात लेझीम डंबेल्स झांज बसवली. बोलक्या भिंतीवरती महत्त्वपूर्ण शैक्षणिक चित्रे माहिती काढून मुले वाचू लागली योगासने, सांस्कृतिक कार्यक्रम खेळ आदी उपक्रम सुरू झाले. अकोले येथील माजी शिक्षक श्री. गंगाधर वैद्य यांची भेट घेऊन त्यांच्याकडून विद्यार्थ्यांसाठी खेळणी आणि श्री. दिनकर देशमुख त्यांच्याकडून प्रिंटर देणगी मिळाला.

हसरी बोलकी रांगोळी, कुंडी भरू - सजावट करू, साहित्य कवायत, कब आणि बुलबुल, बेदाणे-फुटाणे-शेंगदाणे, हात धुणे, तिमाही वाचन कट्टा, माझा वाढदिवस, घरगुती साधनातून विज्ञान शिकूया, विविध महापुरुष, नेते, प्रेरक व्यक्तिमत्त्वांची जयंती-पुण्यतिथी साजरी करणे, जागतिक जलदिन, माती पासून पणती, तुळशी-वृदांवन अशा वेगवेगळ्या वस्तू बनवणे. वाचन प्रेरणा दिन साजरा करत असताना, वाचनाचे महत्व समजून वाचन पेटी तयार केली. प्लास्टिक-मुक्त परिसर या उपक्रमाची दखल सकाळ वृत्त समूहाने घेतली. खेळू- करू-शिकू या पाठ्यपुस्तकातील शैक्षणिक व्हिडिओ तयार केले. यूट्यूब चैनल, शैक्षणिक ब्लॉग, बालचित्रकला स्पर्धा असे अनेक उपक्रम शाळेमध्ये राबवले. यामध्ये विशेष करून जीवन कौशल्य वाढेल आणि त्यांच्यामध्ये संस्कार रुजले जातील असा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांचे मनगट, मेंदू आणि हृदयाला काम देणारे उपक्रम राबवण्यात आले.

उपक्रमाचे नाव - कुंडी भरू सजावट करू

उद्दिष्टे - १. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव निर्माण करणे.
२. पर्यावरणाचे संवर्धन आणि जतन करण्याची गोडी निर्माण करणे.
३. शालोपयोगी काम करण्यास प्रोत्साहित करणे.
४. श्रमप्रतिष्ठेची जाणीव निर्माण करणे.
५. विविध प्रयोगाच्या माध्यमातून विज्ञानाची गोडी निर्माण करणे.

अध्ययन निष्पत्ती -


विद्यार्थी स्वतःहून सांघिक कार्यात सहभाग घेवू लागली.

कुंडी भरण्याची कृती क्रमवार सांगतात.

रोपाची कुंडी भरताना केलेल्या कृतीचे विश्लेषण करतात.

नवीन कृती शिकताना आनंद मिळवतात.

वैयक्तिक कौशल्य प्रदर्शित करतात.



आवश्यक साहित्य - रिकाम्या कुंड्या, विविध रोपे, माती, पालापाचोळा, विटांचे तुकडे, शेणखत, पाणी, इ.

प्रत्यक्ष कार्यवाही -

विद्यार्थ्यांना एकत्र जमून कुंडी कशी भरतात?, कोण कोणते साहित्य आवश्यक असते?, साहित्य कसे हाताळावे? याविषयी प्राथमिक कल्पना दिली. एकाच वेळी दहा कुंड्या घेऊन २० विद्यार्थ्यांना एकत्रित काम करण्याची संधी दिली. विद्यार्थ्यांनी माझ्या कृतीचे अनुकरण केले. प्रत्येक कृती करताना विद्यार्थ्यांना सविस्तरपणे समजावले त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. भरलेली कुंडी सूर्यप्रकाश मिळेल अशा ठिकाणी ठेवली. प्रत्येक कुंडीला त्या त्या विद्यार्थ्यांच्या नावांची चिठ्ठी चिकटवली. कुंडीला जीव लावण्याची जबाबदारी निश्चित केली.

मूल्यमापन -

विद्यार्थ्यांच्या रोपांची कुंडी भरताना होणाऱ्या प्रत्येक कृतीचे बारकाईने निरीक्षण केले. कामाचा वेग, टापटीपपणा , स्वच्छता, हळुवारपणा, कृतीयुक्त सहभाग, प्रामाणिकपणा या बाबींचे निरीक्षण केले. विद्यार्थ्यांच्या नावासमोर वैयक्तिक नोंद केली.

उपक्रमाचे नाव - घरगुती साधनातून विज्ञान शिकूया

उद्दिष्टे -

१. वैज्ञानिकदृष्टी निर्माण होणे.

२. विज्ञानाशी नाते जोडले जाणे.

३. प्रयोगाविषयी आत्मविश्वास निर्माण होणे.

४. कमी खर्चातील शिक्षण.

अध्ययन निष्पत्ती -

विद्यार्थी घरगुती साधनातून विज्ञान शिकतात.

विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाविषयी जवळीक निर्माण होते.

विद्यार्थी स्वतः साहित्य हाताळून प्रयोग करतात.

प्रत्यक्ष कार्यवाही -

विद्यार्थ्यांना कृती करायला ,प्रयोग करायला फार आवडते. त्यांच्या मनातील प्रयोगाविषयीची भीती घालवून साहित्य हाताळणे विषयी गोडी निर्माण करायला हवी. प्राथमिक शालेय स्तरावर प्रयोगाच्या साहित्याची वानवा असते .अशावेळी विद्यार्थ्यांना अतिशय कमी साहित्यातून किंबहुना घरगुती वापराच्या साधनातून प्रयोग करणे शिकवता येते. विद्यार्थी असे सोपे प्रयोग आपापल्या घरी करून पाहतात आणि आपापल्या पालकांनाही करून दाखवतात. हे सोपे प्रयोग करताना वय परिस्थिती स्तर अशा कोणत्याही बाबींचा अडथळा येत नाही. उलट गरज ही शोधाची जननी आहे हे सर्व वयातील व्यक्तींना शिकता येते. वस्तू हाताळणे, निरीक्षण करणे, निष्कर्ष काढणे अशी विविध कौशल्य अंगी येतात. मी माझ्या वर्गात विविध प्रकारचे प्रयोग आयोजित करत असते. त्यापैकी काही नमुना प्रयोग या पुस्तकात मांडत आहे.



१. हवेत एक पंचमांश भाग ऑक्सीजन असतो.

आवश्यक साहित्य - एक बशी, रिकामा काचेचा ग्लास, मेणबत्ती, काडेपेटी, पाणी, एवढ्या साहित्याचा वापर होतो.

कृती - प्रथम विद्यार्थी एक बशी घेऊन त्यात एक छोटी मेणबत्ती पेटवतात. बशीच्या भोवती पाणी टाकतात. काचेचा ग्लास मेणबत्तीवर बशीतील पाण्यात उपडा करून ठेवतात. काही वेळाने मेणबत्ती विझते आणि बशीतील काही पाणी ग्लास मध्ये शिरते. विद्यार्थी निरीक्षण करतात. असे का घडले हे सांगण्याचा प्रयत्न करतात. अशावेळी रिकामी झालेली पोकळी म्हणजे मेणबत्तीच्या ज्योतीने वापरलेला ऑक्सिजन आणि तेवढ्याच प्रमाणात त्याची जागा पाण्याने घेतली असे विद्यार्थ्यांना समजावता येते.

२. कार्बन डाय-ऑक्साइड मुळे आग विझते.

आवश्यक साहित्य - एक वाटी ,पाच ते सहा चमचे लिंबाचा रस, खाण्याचा सोडा, मेणबत्ती, काडेपेटी.

कृती - हा प्रयोग करताना विद्यार्थी एक रिकामी वाटी घेतात त्यात एक मेणबत्ती पेटवून उभी करतात मेणबत्तीच्या भोवताली लिंबाचा रस ओळखतात सगळ्यांचे निरीक्षण सुरू असते एवढ्यात खाण्याचा सोडा तीन ते चार चिमूट लिंबाच्या रसात टाकतात लिंबाच्या रसाला फेस यायला लागतो आणि मेणबत्ती फडफड करून दिसते याद्वारे मुले निरीक्षण करून आपापल्या पद्धतीने उत्तरे देण्याचा प्रयत्न करतात. त्यांना ही आग लिंबातील आम्ल आणि खाण्याचा सोडा म्हणजे कॅल्शियम कार्बोनेट याच्या संयोगातून कार्बन डाय-ऑक्साइड निर्माण झाल्यामुळे विझली हे समजवता येते.

३.पाण्याचे शुद्धीकरण


आवश्यक साहित्य - पाण्यासाठी भांडे ,स्वच्छ कापड ,गाळणी, तुरटी, इत्यादी.

कृती - घरात जेव्हा अशुद्ध पाणी शुद्धीकरणाच्या विविध पद्धतीने शुद्ध करता येते. या बाबी विद्यार्थी स्वतःच वर्गात शिकतात. गाळणे, निवळणे, उकळणे अशा सोप्या प्रयोगातून विद्यार्थी आपले स्वतःचे आरोग्य जपतात. आपल्या पालकांपर्यंत हे प्रयोग पोहोचवतात. शिक्षणाचे खऱ्या अर्थाने उपयोजन होते.

मूल्यमापन - वर दिलेल्या प्रयोगांबरोबरच अनेक असे सोपे प्रयोग विज्ञान आणि परिसर अभ्यास या विषयांच्या निमित्ताने वर्गात करून घेता येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची संघ भावना वाढीस लागते, त्यांची वैज्ञानिक दृष्टी बळावते ,प्रयोगाचे साहित्य हाताळण्याची कला त्यांच्यात येते आणि स्वतःचे जीवन विज्ञानाच्या साह्याने समृद्ध सकस करण्याची क्षमता त्यांच्यात येते. ही सारी कौशल्य विद्यार्थ्यांच्या अंगी येतात हे तपासण्यासाठी विविध प्रकारचे निकष ठरवून विद्यार्थ्यांचे निरीक्षण, तोंडी प्रश्न उत्तरे, प्रत्यक्ष प्रयोग, कृती यांच्या मदतीने मूल्यमापन करता येते.

उपक्रमाचे नाव - माझी हसरी ,बोलकी रांगोळी

उद्दिष्टे - १. विद्यार्थ्यांच्या नवनिर्मितीला चालना देणे.
२. विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती वाढवणे.
३. रांगोळी काढण्याची कौशल्य वृद्धिंगत करणे.
४. रांगोळीतून नावीन्य आणणे.
५. प्रदर्शनातून अभिव्यक्त होणे.



अध्ययन निष्पत्ती -

विद्यार्थी नाविन्यपूर्ण रांगोळी काढतात.

रांगोळीचा समवाय इतर विषयांशी जोडतात.

आपल्या कलाकृती विषयी माहिती सांगतात.

आवश्यक साहित्य - रांगोळी, रंग, हात स्वच्छ करण्यासाठी कापड.

प्रत्यक्ष कार्यवाही -

विद्यार्थ्यांना एकत्रित जमवून रांगोळी ची चिमूट कशी पकडावी? याविषयी मार्गदर्शन केले. पांढऱ्या रांगोळीत रंग कसे मिसळतात? मोठे आकार रांगोळीने कसे पूर्ण भरतात? रांगोळीची कड कशी तयार करावी? विज्ञान, गणित, भाषा आणि इतर विषयांच्या संदर्भात रांगोळी कशी काढता येते याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

विद्यार्थ्यांना कागदावर पेन्सिलने रेखाटन करायला सांगितले. त्यांच्या व्यक्ती स्वातंत्र्याचा आदर करत किरकोळ सूचना दिल्या. प्रत्येक विद्यार्थ्याला दीड फूट बाय दीड फूट अशी जागा आखून दिली. सर्वांना समाज सहभागातून रांगोळी उपलब्ध करून दिली.

विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी आपापल्या जागेत रांगोळी पूर्ण केली. रांगोळी रेखाटताना विद्यार्थिनी विज्ञानातील प्रयोग, विविध संस्था, गणितातील भौमितीक आकार, अंक, अक्षरे, चिन्हे, पाने, फुले, पूर्ण वनस्पती, ऐतिहासिक प्रसंग आणि अशा अनेक घटकांचा घटकांचा उपयोग केला.

मूल्यमापन -

विद्यार्थ्यांचे रेखाटन रांगोळी व्यवस्थित पकडणे,आकार रांगोळीने पूर्ण करणे, रांगोळीतून नवनिर्मिती, इतर विषयांशी समवाय या बाबींचे निरीक्षण केले गेले आणि त्याची नोंद करण्यात आली. उल्लेखनीय रांगोळी रेखाटणाऱ्यांना भेट म्हणून पुस्तके देण्यात आली.

उपक्रमाचे नाव - माझा वाढदिवस

उद्दिष्टे - १. विद्यार्थ्यांमध्ये स्नेहभाव वाढीस लावणे.


२. शिक्षणाविषयी गोडी निर्माण करणे.

३. आत्मविश्वास आणि निश्चय करण्याची वृत्ती वाढवणे.

४. एकमेकांच्या आनंदात सहभागी व्हायला शिकवणे.

अध्ययन निष्पत्ती - विद्यार्थी संघभावनेने वागतात. आनंद देणे आणि घेणे शिकतात.

आवश्यक साहित्य - कार्डशिट पेपर, सर्व विद्यार्थ्यांचे छायाचित्र, लहान आकाराची वाचन पुस्तके आणि भेटवस्तू.



प्रत्यक्ष कार्यवाही -

विद्यार्थ्यांच्या मदतीने त्यांची पासपोर्ट साईज छायाचित्रे मिळवली जातात. एका कार्डशीटवर ही सर्व छायाचित्रे महिनानुक्रमे आणि विद्यार्थ्यांच्या वाढदिवसाच्या तारखेनुसार चिकटवली जातात. या संपूर्ण तक्त्याला सुंदर पद्धतीने सजवले जाते. हा तक्ता दर्शनी ठिकाणी चिकटवला जातो जेणेकरून विद्यार्थ्यांना एकमेकांचे वाढदिवस कधी आहेत हे पाहता येते.

विद्यार्थ्यांच्या वाढदिवशी त्यांना समोर बोलवून परिपाठानंतर त्यांचे अभिष्टचिंतन केले जाते. मुले मुलींचे आणि मुली मुलांचे औक्षण करतात. सर्व वर्गाच्या वतीने छोटे वाचनीय पुस्तक भेट दिले जाते. संबंधित विद्यार्थी आपले मनोगत व्यक्त करतो. त्याला अभिव्यक्तीसाठी वेळ दिलेला असतो. विद्यार्थी त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी संपूर्ण शाळेच्या वेळेत स्वतःच्या आवडीचे एक तरी शालोपयोगी काम अन्य विद्यार्थी मित्र मैत्रिणींच्या सहाय्याने पूर्ण करतो. त्याची नोंद ठेवतो. उदाहरणार्थ झाडून घेणे, फळा सुशोभित करणे, एखादे झाड लावणे, झाडांना पाणी देणे, रांगोळी काढणे इत्यादी.

मूल्यमापन -

विद्यार्थ्यांचा सहभाग ,त्याची अभिव्यक्ती ,पूर्ण केलेले शालोपयोगी कार्य,इतर विद्यार्थ्यांचा घेतलेला सहभाग, संघभावना ,कामाचा वेग या सर्व बाबींचा विचार करून निरीक्षण केले जाते. तशी त्याची नोंदही केली जाते.


तत्कालीन गटविकास अधिकारी श्री. सुरेश शिंदे यांच्यासह विद्यमान गटविकास अधिकारी श्री. अनिल नागणे यांनी केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरले.

तत्कालीन गटशिक्षणाधिकारी श्रीमती. सुवर्णा फटांगरे, विद्यमान गटशिक्षणाधिकारी श्री. बाळासाहेब गुंड यांच्यासह श्री. हनुमंत अडांगळे सर यांनी अनमोल मार्गदर्शन केले.

केवळ भौतिक विकास करून शाळा समृद्ध होत नाही, तर शैक्षणिक बदलही शाळेत झाले पाहिजे. शाळेची गुणवत्ता वाढली पाहिजे, म्हणून आम्ही तळमळीने कामाला लागलो. अनेक स्पर्धा परीक्षामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांची गुणवत्ता सिद्ध केली. आज विविध स्पर्धा-परीक्षा, गणितीय कौशल्य, इ. वाढवणाऱ्या अबॅकस स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी शाळेचा नावलौकिक वाढवला.

शाळेला कुंपण भिंत होती, तरी त्यावर वाघ चढून आत येऊ शकत होता. आमची शाळा वस्ती शाळा असल्यामुळे आजूबाजूला सर्व ऊसाची शेती आहे. वाघ व बिबट्यांचा वावर या ठिकाणी सहज आढळून येतो. विद्यार्थ्यांना कोणताही धोका होऊ नये म्हणून मला मिळालेल्या राज्य सरकारच्या 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिक्षिका पुरस्कार' च्या रक्कमेतून आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने तारेचे कुंपन करुन घेतले. संगमनेर येथील सह्याद्री ऍग्रो व्हेट कंपनीचे संचालक श्री. नितीन हासे व साईनाथ कृषी भांडार उद्योग समूहाचे संचालक श्री. सुदीप वाकळे यांनी प्रत्येकी दोन हजार लिटरच्या पाण्याच्या टाक्यांची व्यवस्था शाळेसाठी करून दिली. अजित वाळे फाउंडेशन यांच्या वतीने शाळेसाठी पाच संगणक आणि दोन एलईडी मिळवले.

आज रोजी आय एस ओ मानांकन प्राप्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देशमुख मळा ही अतिशय दिमाखदार स्वरूपात वस्ती शाळा म्हणून उभी आहे स्वच्छ सुंदर आणि आनंदी शाळा शैक्षणिक गुणवत्ता असलेली शाळा असा नावलौकिक तिला प्राप्त झाला आहे माझ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिक्षिका गुणगौरव पुरस्काराने शाळेचा मान सन्मान वाढला आहे भविष्यात भारताचे जबाबदार नागरिक, अधिकारी, व्यावसायिक, उद्योजक, राजकारणी, विधीज्ञ असे अनेक विविध नागरिक या शाळेतून तयार होतील असा विश्वास नक्कीच वाटतो.



अडचणींवर मात -

प्रत्येक कामाची सुरुवात ही अडचणी पासूनच होते. परंतु हळूहळू परिणाम दिसू लागल्यानंतर सर्व विद्यार्थी, पालक, शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ यांनी मनापासून सहकार्य केले. स्वच्छ सुंदर शाळा करण्यासाठी नानाविध उपक्रम राबवण्यासाठी बारा ते तेरा लाख रुपये लोकसहभागातून उभे केले. त्यामुळे भौतिक सुविधा उपलब्ध करून शाळा डिजिटल करून सुशोभित केली.

फलनिष्पत्ती -

२०१८ मधील देशमुख मळा येथील जिल्हा परिषदेची शाळा संपूर्ण लोकसभागातून कायापालट करून मुख्याध्यापक शालेय व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्यामुळे शाळेला स्वच्छ सुंदर शाळा म्हणून उदयाला आलीं .जिल्हा परिषदेचा मानाचा जिल्हा आदर्श पुरस्कार २०२१ तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२३, डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम २०२३ नवी दिल्ली विज्ञान भवन येथे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, नॅशनल वुमन्स एक्सिलेन्स अवॉर्ड २०२३ नवी दिल्ली विज्ञान भवन येथे देण्यात आला इतराई अनेक संस्थांचे पुरस्कार शाळेसाठी प्राप्त झाले. ही त्या कामाची पोच पावतीच आहे.

निसर्गरम्य वातावरणात शाळेसारख्या जीवन मंदिराला ज्ञानरूपी कळस चढवितांना येणाऱ्या प्रत्येक पायरीवरील अनुभव हा अविस्मरणीय आहे. मी शिक्षक असल्याचा मला अभिमान आहे. डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम म्हणतात राष्ट्र निर्मितीचे शिल्पकार या चार भिंतीच्या आत शिक्षक तयार करतात हे काम करण्याचं भाग्य मला मिळालं...

क्षणचित्रे




माझी शाळा, माझा अभिमान
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देशमुखमळा, धांदरफळ बु।।., ता. संगमनेर






Date : 27TH JULY 2023,
Timing : 5:30PM ONWARDS

आनंददायी शिक्षणातून पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान

शाळेचे नाव - नगरपालिका शाळा क्र ४,पानसरे आखाडा,कुरण रोड, संगमनेर,ता.संगमनेर,जि.अहमदनगर

मुख्याध्यापकाचे नाव - सौ.वैशाली शिरीष विटेकर

प्रास्ताविक -

फळा फुलांचा मळा पाहिजे, आनंदाचा सोहळा पाहिजे, गावात एक वेळेस देऊळ नसले तरी चालेल, पण एक आदर्श शाळा पाहिजे. अशाच एका आनंददायी शाळेची यशोगाथा आपणा पुढे सादर करत आहे.विद्यार्थ्यांच्या पायाभूत झालेली असते. तसेच गणन प्रक्रियेसाठी ते तयार असते. साक्षरता हे शिक्षणाचे एकमेव उद्दिष्ट नसून, मुलांना भाषेच्या विविध कौशल्यांचा योग्य वापर करण्यास सक्षम करणे हे महत्त्वाचे आहे. श्रवण, संभाषण, वाचन, लेखन आणि निरीक्षण, चिकित्सक विचार यासारखी कौशल्य मुलांमध्ये एकाच वेळी विकसित होत असतात. या बाबी लक्षात घेऊन इयत्ता पहिली-दुसरी मध्ये विविध कृती आणि खेळांची रचना केली गेली. मुलांच्या मेंदूच्या निरोगी विकासाला व वाढीला चालना देणे गरजेचे आहे. हे देखील उपक्रम व कृतींचे आयोजन करताना लक्षात ठेवण्यात आले. मुलांचा वयोगट, भावविश्व लक्षात घेऊन, मुलांची पायाभूत साक्षरता आणि संख्या ज्ञानाचा प्रवास आनंददायी पद्धतीने तसेच खेळाच्या माध्यमातून कसा होईल, यासाठी उपलब्ध भाषापेटी, गणित पेटी, परिसरातील विविध साहित्य, नवीन शैक्षणिक साहित्य यांची सांगड घातली गेली. इयत्ता पहिलीतील विद्यार्थी दुसरी मध्ये आल्यावर, इयत्ता पहिलीच्या क्षमता व उद्दिष्टे विद्यार्थ्यांनी प्राप्त केली होती. आणि आनंददायी पद्धतीने विविध साहित्यांच्या द्वारे सत्र एक पर्यंत बालकांनी दुसरीच्या 75 टक्के क्षमता व उद्दिष्टे प्राप्त केली आहेत.

इयत्ता दुसरी साठी पायाभूत भाषा साक्षरतेसाठी समाविष्ट घटक पुढीलप्रमाणे आहेत -

1) मौखिक भाषा विकास
2) भाषेच्या लेखी रुपाची जाणीव
3) भाषेतील ध्वनीची जाण4) विसांकेतिकरण
4) आकलन युक्त वाचन
5) ओघवते वाचन
6) शब्द संग्रह
7) लेखन
8) वाचन संस्कृती/ वाचनाकडे कल.

तसेच पायाभूत संख्याज्ञानासाठी -

1) संख्या पूर्व संबोध
2) संख्या व त्यावरील क्रिया
3) आकार व अवकाशीय संकल्पना
4) मापन
5) आकृतीबंध
6) माहितीचे व्यवस्थापन

7) गणितीय संप्रेषण या क्षमता व कौशल्य आहेत.

इयत्ता पहिली व दुसरी साठी वरील क्षमता व कौशल्य लक्षात घेऊन विद्यार्थ्यांकडून आनंददायी विविध कृती करून घेण्यात आल्या. ही बालके निपुण भारत उपक्रमा अंतर्गत इयत्ता तिसरीपर्यंत नक्कीच 100% सर्व क्षमता व कौशल्ये प्राप्त करतील.

मुलांच्या किमान क्षमता प्राप्तीसाठी खालील बाबी गरजेच्या आहेत

1) मूल शाळेत रमणे.

2) बालकाच्या वाचन,लेखन कौशल्याच्या विकासासाठी मौखिक भाषा विकास होणे.

3) भाषेच्या लेखी स्वरुपाची जाणीव होणे.

4) भाषेतील ध्वनींची जाणीव होणे.

5) ओघवते वाचन करता येणे.


6) गणिताचा आनंद घेता येणे.गणिताची भीती कमी होणे.

7) तार्किक विचार करणे.

अंमलबजावणी -

इयत्ता पहिली व दुसरीतील बालकांचा वयोगट,भावविश्व लक्षात घेऊन त्यांना कृती करणे, साहित्य वापरणे,ते हाताळणे, तसेच खेळाच्या माध्यमातून जर सांगितले तर ते त्यांना जास्त आवडते आणि त्यांचा विकास झपाट्याने होतो. इयत्ता पहिली व दुसरी मध्ये बालकांना पायाभूत साक्षरता आणि संख्या ज्ञानाच्या विविध क्षमता व कौशल्य प्राप्त होण्यासाठी अनेक आकृती व उपक्रमांची योजना केली त्यासाठी भाषा पेटी गणित पेटी व निर्मित शैक्षणिक साहित्याचा वापर केला. यासाठी कृतीयुक्त गाणी, गोष्टी सांगणे, ऐकवणे, उड्या मारणे, औपचारिक- अनौपचारिक गप्पा मारणे, चित्र वाचन, घटनाक्रम, स्वतःची, कुटुंबाची ओळख सांगणे, विविध प्रकारचे खेळ, आवाज ऐकवणे, वाचन कोपरा, सहभागी वाचन , उपस्थिती पत्र, अक्षर गटावरील चित्र वाक्य साचे, वाचन पाठ ,वर्गातील वस्तूंवर नाम पट्ट्या लावणे, शब्दचक्र, मुळाक्षरे वाचन, चौदाखडी, शब्द कार्ड, जोडाक्षरे वाचन, चित्रमय उतारे किशोर मासिकातील चित्रमय उतारे, शब्द डोंगर, खडे ,बिया अक्षरावर ठेवून घेणे, शब्द शोधणे, पूर्णविराम याचा उपयोग, चित्रयुक्त वाक्यांचे लेखन यासारख्या अनेक कृतींचा समावेश करण्यात आला. तसेच नावे शोधूया महिन्यांची, आगगाडी, बिंगो, चला वाचूया, चित्र शब्द कोडे सोडवू या, ग्रेगरियन वर्षाचे महिने लक्षात ठेवण्याची ट्रिक, मुळाक्षरांना स्वरचिन्हे जोडणे असे अनेक खेळ घेतले. क्षेत्रभेट उपक्रमा अंतर्गत शालेय परिसराची सहल किराणा दुकानाला भेट असे उपक्रम घेतले. त्याचप्रमाणे संख्याज्ञानाच्या क्षमता व कौशल्य प्राप्त होण्यासाठी पुढील उपक्रम व कृती घेण्यात आल्या.

वर्गीकरण करणे (परिसरातील पाने, बिया, खडे, रंगीत पेन बाटल्यांची झाकणे) लहान मोठा ओळखण्यासाठी चित्रे रंगवणे, आकारानुसार क्रम लावणे, वस्तू मोजणी, चित्रातील संख्या लिहिणे, मणी माळीवर संख्या मोजणी, गोष्टीच्या स्वरूपात शून्य व इतर संख्यांची ओळख करून देणे, विविध वस्तू मोजून घेणे, वस्तू, नाणी, नोटा, बोटे वापरून बेरीज- वजाबाकी करणे, परिसरातील विविध गोष्टींची निरीक्षण करून आकृतीबंध शोधणे, चित्रातील आकृतीबंध पूर्ण करणे, विविध आकार ओळखणे, आजचा वार दिनांक यासाठी दिनदर्शिका वापरणे, तराजू बनविणे यासारख्या अनेक कृती करून घेतल्या. तर वस्तूंवर रिंग टाकूया, संख्या सांगणे, दोन अंकी संख्या तयार करणे ,दशक एकक टोप्या घालून संख्या बनवणे, आबरा का डाबरा, ओळखा आमची संख्या, पैसे पैसे ,चला पत्ते खेळूया संख्या तयार करूया, असे अनेक आनंददायी खेळ घेतले. वरील



प्रमाणे कृती व खेळ घेण्यासाठी भाषा पेटी व गणित पेटीचा वारंवार उपयोग केला, तसेच मुळाक्षरे कार्ड, चित्रे, चित्रमय उतारे, नाम पट्ट्या, विद्यार्थी नाम पट्ट्या, शब्द डोंगर, तारेवरचे वाचनालय, माझे कुटुंब, चौदाखडी ची खिडकी, शब्द कार्ड, वाक्य कार्ड, उतारे कार्ड, हस्तलिखित अंकलिपी, महिन्यांची आगगाडी, संख्यांचे पत्ते, दशक एकक टोप्या संख्यांचे, कॅलेंडर, संख्या कार्ड, चित्रकार्ड (गणितासाठी), असे अनेक प्रकारचे आनंददायी शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांच्या वयोगटांनुसार तयार केले. अनेकदा सोशल मीडियावरील तसेच स्वनिर्मित कृतीपत्रिकांचा वापर केला.तसेच मुळाक्षरांच्या चौदाखडी चे व्हिडिओ, भाज्यांची ओळख, सण व उत्सव, आकार ,शब्द वाचन, प्राणी व त्यांची नावे, करामती मुळाक्षरे, वाहतुकीची साधने, शून्याची संकल्पना, संख्या बनवूया, महिन्यांची आगगाडी, नाव ओळखू या, असे अनेक व्हिडिओ निर्मिती करून विद्यार्थ्यांच्या अभ्यास गटामध्ये वापर केला.बालकांची आवड आणि वयोगट लक्षात घेऊन विविध पपेट ची निर्मिती केली आणि वेळोवेळी वापर केला.

फलनिष्पत्ती -

विविध कृती खेळाच्या माध्यमातून संकल्पना समजावून सांगितल्यामुळे बालकांचा भाषा आणि संख्याज्ञान विकास योग्य पद्धतीने झाला. खेळाधारित अध्यापन पद्धतीमुळे बालके शाळेत रमू लागली. त्यांना शाळेची ओढ लागली. त्यामुळे उपस्थितीचे प्रमाण वाढले.तणावरहित आनंददायी पद्धतीने अध्ययन अध्यापन घडू लागले. 15 ऑगस्ट 2023 ला नगरपालिका संगमनेर येथील मैदानावर सादर केलेल्या देशभक्तीपर गाण्यावरील नृत्य मध्ये मुले आत्मविश्वासाने सहभागी झाली.परिपाठामध्ये आत्मविश्वासाने सहभागी होऊन वार दिनांक तर सांगू लागली. परंतु सर्वांपुढे गोष्ट देखील सांगू लागली. वर्गातील तारेवरच्या वाचनालयातील पुस्तके वाचू लागली.पालकांना उपक्रमात सहभागी करून घेतल्याने बालकाच्या शिक्षण प्रक्रियेत पालकांचा सहभाग वाढला.


विद्या प्रवेश उपक्रमामुळे शिक्षणाला तयार झालेली बालके इयत्ता दुसरी मध्ये अध्ययन प्रक्रियेसाठी शाळेमध्ये चांगल्या प्रकारे स्थिरावली आहेत. शैक्षणिक वर्षात मध्येच प्रवेशित झालेली शाळा बाह्य बालके देखील वर्गामध्ये रमत आहेत. यासाठी बालके आणि पालक दीक्षा ॲप व्हर्चुअल क्लास यांचा देखील वापर करू लागले.

आनंददायी पद्धतीने अध्यापनामुळे बालकांचा भाषा व संख्याज्ञानाच्या विकासाबरोबर कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण इत्यादी विषयांचा देखील विकास होत आहे. ठरवलेली उद्दिष्टे पूर्ण होताना दिसून येत आहेत. मुले शिकली..... शाळा हसली.

समारोप -

आनंददायी शैक्षणिक साहित्यातून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या उपक्रमाद्वारे बालकांना हसत खेळत आनंददायी पद्धतीने अभ्यासात आवड निर्माण झाली. बालके शैक्षणिक प्रवाहात आली. या शैक्षणिक प्रवासातला त्यांचा आनंद उत्साह टिकून ठेवता आला. ज्ञान मिळवण्याची भूक वाढवता आली. बालकांना वेळोवेळी प्रेरणा रुपी थाप देता आली. ठरवलेले उद्दिष्ट पूर्ण होताना बघून आनंद होत आहे.


बालकांच्या आनंददायी प्रवासामध्ये माननीय भांगरे साहेब - ज्येष्ठ अधिव्याख्याता डायट अहमदनगर, माननीय डामसे साहेब - प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ संगमनेर, माननीय जाहीद शेख - ज्येष्ठ लिपिक शिक्षण मंडळ संगमनेर, तत्कालीन मुख्याध्यापिका श्रीमती जाधव मॅडम तसेच माझे सर्व सहकारी शिक्षक शाळा व्यवस्थापन समिती पालकांचे वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन लाभले.



संकलन व लेखन - सौ ज्योत्स्ना शशांक खोजे उपशिक्षक, नगरपालिका शाळा क्रमांक ४,संगमनेर

संदर्भ साहित्य फोटो व व्हिडिओ लिंक -


https://youtu.be/nUaGNEdf3XA?si=xLxP-s2bAHXfXESP
https://youtu.be/1ZyKGLQJgbM?si=tGnL-M2VF0lh2IxU
https://youtu.be/UBeKu899OPY?si=uA-uBbYt5VOiKLgZ
https://youtu.be/UoUlo2k9ZeE?si=kpks1mHXIZ9ZNXwh
https://youtu.be/GbZkZEIDBXI?si=byPFMSKQk2HZOuw-
https://youtu.be/4peJxqwsJto?si=a6X1sJYBYL6d_CcI
https://youtu.be/oVGcxqCA5lg?si=Pb1nYOAa9Z-eVtUz
https://youtu.be/2zJ3uPn4Pew?si=VABE9PMRO8G3xIcd
https://www.youtube.com/watch?v=-tJ2XqIT0Tc










निपुण महाराष्ट्र
Worksheet 2 week 2
इयत्ता 1ली ते 3 ऱ्या मुलांसाठी
इयत्ता -2री
तस्लीम शमीर शेख


Rice
Shot on OnePlus
By JSK

आनंददायी शिक्षणाअंतर्गत शालेय निवडणुकीत EVM चा वापर

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हॅरिसन ब्रँच (जेऊर कुंभारी), ता.कोपरगाव,जि.अहमदनगर

मुख्याध्यापकाचे नाव - श्रीमती रंजना डोंगरे

प्रास्ताविक –


भारत हा लोकशाही प्रधान देश आहे.प्रत्येक व्यक्तीला संविधानाने मतदानाचा हक्क दिलेला आहे. वयाची अठरा वर्ष पूर्ण झाली की विद्यार्थ्यांना मतदानाचा हक्क मिळतो.मी स्वतः बीएलओ असल्याने नवीन मतदार नोंदणीसाठी मतदार शाळेत फॉर्म भरण्यासाठी शाळेत येत असत. अशावेळी मतदान प्रक्रियेविषयी अनेक शब्द मुलांच्या कानावर पडत असत. तसेच खूप वेळा जेव्हा जेव्हा निवडणूका होत त्यावेळी ही लहान मुले आईवडीलांबरोबर मतदानाच्या ठिकाणी गेलेली होती. तेथील मतदान प्रक्रिया मुलांनी डोळ्यांनी पाहिलेली होती.पण मशिनचा वापर कसा करायचा हेच माहित नव्हते. विद्यार्थ्यांनी चर्चेला वर्गात मतदान प्रक्रियेचा विषय घेतल्यावर अनेक प्रश्न चर्चेच्या स्वरुपात बाहेर आले. नागरीकशास्त्रात तसा मुलांना मुलभूत अधिकार समजून द्यायचेच होते. हीच गोष्ट लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष EVM मशिनचा वापर करुन मतदान कसे होते याचा अनुभव द्यायचे ठरवले व त्याप्रमाणे तयारी सुरु केली.यातून विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रिया समजण्यास मदतच होणार होती.

शिक्षकांना आलेल्या अडचणी -

आगामी काळात विधानसभा निवडणुका जवळ आलेल्या आहेत. निवडणूक म्हणजे काय? मोठी माणसे मतदान कसे करतात? ईव्हीएम मशीन कशी असते? मतमोजणी कशी करतात? शाई का लावतात? आणि एकूण प्रक्रिया कशी असते? असे अनेक प्रश्न विद्यार्थी शाळेतील शिक्षकांना सतत विचारत होती. ईव्हिएम मशीनबद्दल विद्यार्थ्यांना उत्सुकता होती. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निवडणूक कशी दाखवावी हे आव्हान होते. खूप शोधल्यानंतर EVM मशिनचा वापर डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने घेता येईल का ,याचा विचार करुन माहिती घेतली. त्यावेळी शाळेतील तंत्रस्नेही शिक्षक नवनाथ सूर्यवंशी यांनी शालेय विद्यार्थ्यांना दोन गटांत विभागत निवडणूक प्रक्रिया प्रत्यक्षात राबविण्याचा निर्णय मुख्याध्यापकांना बोलून दाखवला आणि ही प्रक्रिया राबविली.




या अडचणीवर मात करण्यासाठी शिक्षकांनी केलेली अंमलबजावणी -नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही पहिली ते चौथी पर्यंत प्रत्येक वर्गासाठीची विविध पदे सांगून वर्गस्तराची निवडणूक हात वर करून घेण्यात आली. यात शिक्षण, परिपाठ, आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता, भोजन, माहिती तंत्रज्ञान, क्रीडा, अशी पदे निवडली गेली. सोबतच त्यांची कामे सांगून जबाबदारी देण्यात आली आणि शाळेचा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या पदासाठी निवडणूक घ्यायची तयारी केली. या पदासाठी १० विद्यार्थी उमेदवार इच्छुक होते. त्यांना एक दिवस प्रचार करण्यासाठी वेळ दिला वोटिंग मशीन ऍपद्वारे ईव्हीएम तयार करत त्यात फोटोसह उमेदवार यादी तयार करून घेतली. आज डिजिटल वर्गात प्रत्यक्ष कसे मतदान करतात हे मॉकपोल laptop वर दाखवले. ब्यालेट बटन दाबल्यानंतर पसंतीच्या उमेदवाराच्या पुढील बटन दाबल्यावर हिरवा लाईट लागतो आणि विशिष्ट आवाज होतो. हे laptop वरून सर्वांना सांगितले.शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक घेताना प्रथम EVM मशिनची माहिती मुलांना देण्यात आली.या निवडणूकीत शाळेच्या मुख्याध्यापिका रंजना डोंगरे व शाळेतील उपक्रमशील शिक्षक श्री.नवनाथ सुर्यवंशी सर यांनी Voting machine या Android ॲपचा वापर करून दोन टॅबच्या सहाय्याने कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट असा वापर करून मतदान घेतले.शाळेत एकूण ५ पदासाठी ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली.निवडणूकीच्या आदल्या दिवशी नामनिर्देशन फॉर्म भरून घेऊन उमेदवारांची नावे नोंदविण्यात आले.निवडणूकीतून माघार घेण्याची वेळही देण्यात आली.तसेच विद्यार्थ्यांना निवडणूक चिन्हे दिल्यानंतर प्रचाराला जोरात सुरुवात झाली.अखेर सायंकाळी उद्याच्या मतदानाची वेळ दुपारी ३ वाजताची ठरविण्यात आली.शाळेच्या कार्यालयात मतदान कक्ष उभारण्यात आला.




निवडणूकीच्या दिवशी दुपारी मॉक पोल सर्व उमेदवार व उमेदवार प्रतिनिधी समोर घेण्यात आले.यावेळी जेऊर कुंभारी गावच्या सरपंच सौ.सुवर्णाताई पवार,शाळा व्यवस्थापन अध्यक्ष सतिष पवार,मधुकर वक्ते,शैलेश दळवी,संजय दळवी,ज्ञानेश्वर देवकर,संतोष जाधव व शिक्षक उपस्थित होते.सदर निवडणूक प्रक्रियेत एकूण ५ जागांसाठी १० विद्यार्थी उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते.प्रत्येक मतदार पाच जागांसाठी मतदान करत होता.मतदारही रांगेत येऊन मतदान करत होते.मतदान अधिकारी १ मतदाराचे विद्यार्थी हजेरीतील नाव व आयकार्ड पाहून ओळख पटवत होते.मतदान अधिकारी क्र.२ विद्यार्थ्यांच्या बोटावर शाई लावत होता.तर मतदान अधिकारी क्र.३ कंट्रोल पॅनल वरील बॅलेट बटन दाबून मतदाराला मतदान कक्षाकडे मतदानाला पाठवीत होते.

शाळेचा इयत्ता १ ते ४ थीचा पट ३५ असून १००% उपस्थिती दररोज असते.व मतदानही १००% झाले.ठिक ४ वाजता मतदानाची वेळ संपल्यावर Close बटन दाबून मतदान प्रक्रिया संपली.केंद्राध्यक्ष शर्वरी मोरे, मतदान अधिकारी, करण पवार,राशी माळी व महेश मोरे यांनी कंट्रोल युनिट,बॅलेट युनिट व इतर साहित्य मुख्याध्यापकांमार्फत निवडणूक निर्णय अधिकारी नायब तहसीलदार मनिषा कुलकर्णी मॅडम यांच्या कडे व सहाय्यक निवडणूक अधिकारी राहुल शिरसाठ यांच्या ताब्यात दिले. निकालासाठी त्यांनी निकाल बटण दाबून स्क्रीनवर दिसणारा निकाल प्रत्येक उमेदवाराच्या नावासह अहवाल डाऊनलोड केला. तोपर्यंत सर्व मतदार विद्यार्थी व उमेदवार विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार व पूरक आहार देण्यात आला.विद्यार्थी उमेदवार चिंतेत दिसत होते.त्यांना निवडणूक निकाल काय लागेल याची प्रतिक्षा होती. सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या मैदानावर बोलावून घेण्यात आले.व सर्वांच्या उपस्थितीत नायब तहसीलदार मनिषा कुलकर्णी यांनी निवडणूकीचा निकाल जाहिर करण्यास सुरुवात केली.निवडणूक जिंकलेले विद्यार्थी निकाल येताच एकच जल्लोष करत होते.एकूणच काय तर "कहीं खूषी तो कहीं गम" अशी परिस्थिती दिसत होती.सर्व निकाल जाहीर झाल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते निवडून आलेली शाळेची मुख्यमंत्री उमेजा शेख,उपमुख्यमंत्री शिफा शेख,स्वच्छता मंत्री-शिवराज माळी,परिपाठ मंत्री-विनोद देवकर, आरोग्यमंत्री श्रावणी डोखे या सर्वांचा गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

सदर निवडणूक प्रक्रीया कोपरगाव तहसीलच्या नायब तहसीलदार मनिषा कुलकर्णी यांच्या देखरेखीखाली पार पडली.यावेळी जेऊर कुंभारी गावच्या सरपंच सुवर्णा पवार व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सतिष पवार,विजय लकारे गावातील ग्रामस्थ व पालक उपस्थित होते. निवडणूक प्रक्रियेनंतर उपस्थित सर्वांचे आभार मुख्याध्यापिका रंजना डोंगरे यांनी मानले. सदर उपक्रम सुंदर रित्या आयोजन व नियोजन केल्याबद्दल पंचायत समिती गटविकास अधिकारी सचिन सूर्यवंशी साहेब व गटशिक्षणाधिकारी शबाना शेख यांनी विद्यार्थी,शिक्षक,मुख्याध्यापक व पालकांचे कौतुक केले.५) या उपक्रमाचा परिणाम / फलनिष्पत्ती १) विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया कशी असते,तसेच जनतेतूनच लोकप्रतिनिधी कशा पद्धतीने निवडला जातो याबद्दल माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. २) विद्यार्थ्यांचा शैक्षणिक,सामाजिक तसेच सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली. ३) लोकशाहीचा प्रत्यक्षअर्थ व अनुभव मिळाला. ४) या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शाळेप्रती असणारी जबाबदारी लक्षात आली.एकमेकांना सहकार्य,शिस्त,आपलेपणा,जबाबदारी हे गुण विकसित होण्यास मदत झाली.




08:37
1. आर्यानी विक्रम शिंदे
2. उमेजा असीर शेख
3. शिफा जावेद शेख
ERASER
4. चैतन्य रोहीत दळवी
5. शिवराज संदिप माळी
6. अनुष्का अजय सोनवणे
7. गौरव संदिप पवार
8. विनोद सतिष देवकर
9. सुदर्शन सचिन कातकडे

सार्वमत

हॅरिसन ब्रँच शालेय मंत्रिमंडळ निवडणुकीसाठी ईव्हीएमचा वापर



जेऊरकुंभारी (वार्ताहर)– कोपरगाव तालुक्यातील जेऊर कुंभारी गावातील हॅरिसन ब्रँच जिल्हा परिषद शाळेत नुकतीच शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक झाली. या निवडणुकीत मुख्याध्यापिका रंजना डोंगरे व उपक्रमशील शिक्षक नवनाथ सूर्यवंशी यांनी वोटिंग मशिन या अँन्ड्राईड अॅपचा वापर करून दोन टॅबच्या सहाय्याने कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट असा वापर करून मतदान घेतले.

हरिसन ब्रँच शाळेत एकूण ५ पदांसाठी ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. निवडणुकीच्या आदल्या दिवशी नामनिर्देशन फॉर्म भरून घेऊन उमेदवारांची नावे नोंदविण्यात आली. निवडणुकीतून माघार घेण्याची वेळही देण्यात आली. तसेच उमेदवारांना निवडणूक चिन्हे दिल्यानंतर प्रचाराला जोरात सुरुवात झाली. बीएलओ म्हणून गणेश बर्डे याने मतदार यादी अपडेट करण्याचे काम केले. अखेर मतदानाची वेळ दुपारी ३ वाजेची ठरविण्यात आली. शाळेच्या कार्यालयात मतदान कक्ष उभारण्यात आला.

निवडणुकीच्या दिवशी दुपारी मॉक पोल सर्व उमेदवार व उमेदवार प्रतिनिधी समोर घेण्यात आले. यावेळी सरपंच सुवर्णा पवार, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष सतीश पवार, विजय लकारे, मधुकर वक्ते, शैलेश दळवी, संजय दळवी, ज्ञानेश्वर देवकर, संतोष जाधव व शिक्षक उपस्थित होते. या निवडणूक प्रक्रियेत एकूण ५ जागांसाठी १० विद्यार्थी उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते. प्रत्येक मतदार पाच जागांसाठी मतदान करत होता.

मतदान १०० टक्के झाले. केंद्राध्यक्ष शर्वरी मोरे, मतदान अधिकारी, करण पवार, राशी माळी व महेश मोरे यांनी कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट व इतर साहित्य मुख्याध्यापकांमार्फत निवडणूक निर्णय अधिकारी नायब तहसीलदार मनिषा कुलकर्णी व सहाय्यक निवडणूक अधिकारी राहुल शिरसाठ यांच्या ताब्यात दिले. सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या मैदानावर बोलावून सर्वांच्या उपस्थितीत नायब तहसीलदार मनीषा कुलकर्णी यांनी निवडणुकीचा निकाल जाहीर केला. निवडणूक जिंकलेले विद्यार्थी निकाल येताच एकच जल्लोष करत होते. सर्व निकाल जाहीर झाल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते निवडून आलेली शाळेची मुख्यमंत्री उमेजा शेख, उपमुख्यमंत्री शिफा शेख, स्वच्छता मंत्री शिवराज माळी, परिपाठ मंत्री– विनोद देवकर, आरोग्यमंत्री श्रावणी डोखे यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीविषयी घोषणा देऊन मतदानाचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले.

Sarwamat Edition
Jul 28, 2023 Page No. 7
Powered by : eReleGo.com

या उपक्रमामूळे निश्चितपणे विद्यार्थ्यांत कमालीचा बदल झाला.शाळेतील काम वाटपामूळे मुले शाळेशी जास्त संलग्न झाली.व जबाबदारीने वागू लागली.शाळेतील तंटा कमी झाल्यामुळे शाळेतील वातावरण आनंदी झाले. त्यामुळे दरवर्षी हा उपक्रम राबविण्याचे निश्चित करण्यात आले.

शालेय मंत्रिमंडळ निवडणुकीसाठी EVM चा वापर कसा केला जातो...त्याबाबत व्हिडीओ लिंक येथे CLICK करा.

आदिवासी भागातील विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावरकुटे, पो.मवेशी. ता.अकोले जिल्हा अहमदनगर

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.भांगरे अंबादास लक्ष्मण

प्रास्ताविक -

शालेय विद्यार्थ्याच्या अध्ययन अध्यापन क्रिया सुसंगत व चांगल्या स्वरुपात व्हावी आणि त्या दृष्टीने ही प्रक्रिया सुलभ होऊन गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रमाच्या माध्यमातून याचा उपयोग होईल उद्देश आहे.जि प प्राथ.शाळा सावरकुटे ही शाळा इयत्ता १ ते ७ वी पर्यंत असून सर्व विद्यार्थी आदिवासी समाजातील असून, त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत शैक्षणिक प्रगती होईल अशा स्वरुपाची नाही. म्हणून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढ होऊन शालेय उपस्थिती नियमित राहील व त्यांना शाळेविषयी आवड निर्माण होईल. या दृष्टीने एक पाऊल उचलून व एक आदर्श शाळा निर्माण होईल, उपक्रमशील शाळा तयार होईल व गावाच्या माध्यमातून इतर संस्था आणि काही सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून शाळेचा सर्वांगीण विकास व्हावा असा मानस शाळेचे मुख्या.इतर शिक्षक यांचे माध्यमातून आहे.

मुख्याध्यापक शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी - कार्यवाही करताना आलेल्या अडचणी -

ही सगळ्यात अवघड समस्या आमच्या सर्वापुढे होती .शाळेत सर्व शिक्षक नविन असल्याने खूप साऱ्या समस्या होत्या सर्वात महत्वाचे कि सर्व परिसर हा डोंगरदऱ्याचा असल्याने सर्व समाज आदिवासी असल्याने सर्व विद्यार्थी हे २ ते ३ कि.मी दूर वरून शाळेत येणारे होते आणि उन वारा थंडी पाउस यापासून संरक्षण व्होवे कि, जे विद्यार्थी १० ते ५ ज्या इमारतीती बसणार आहेत ति सुंदर असावी. हा सगळ्यात महत्वाचा विषय असल्याने ती समस्या सोडविणे महत्वाचे आवश्यक होते.ती सोडविणे क्रमप्रात असल्याने हा विषय सोडविणे आवश्यक असल्याने शाळा व्यवस्थापन समिती समोर विषय मांडला .या माध्यमातून त्यांचे समोर जे वियार्थी नियमित शाळेत येतात ते कसे आपला जीव मुठीत धरून १० ते ५ शाळेत बसतात हे सर्व गावातील समाजापुढे मांडून ति,सोडविणे अगदी आवश्यक आहे हे मांडण्यात आले.शाळेतील एकूण सर्व ८ वर्ग खोल्या असून त्या कोणत्याच इयत्तेला बसण्याच्या दृष्टीने चांगल्या नसल्याने याची उपस्थिती कशी राहील हाही प्रश्न समोर असल्याने सर्व समस्या आगदी खर्चिक आणि अवघड स्वरूपाच्या होत्या आणि त्यांचा प्रश्न मार्गी लावणे महत्वाचे होते .आणि ही समस्या सोडविण्यासाठी सर्व शिक्षक व मुख्याध्यापक याने आपले योगदान देऊन ती सोडविण्याचा चंग बांधला.





या अडचणींवर मात करण्यासाठी शिक्षक व मुख्याध्यापक यांनी केलेल्या उपाययोजना, प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी .....

भौतिक सुविधा हा महत्वाचा विषय असल्यानं जेथे दिवसतील ८ तास ज्या इमारतीमध्ये विद्यार्थी बसणार आहेत.ती समस्या सोडविणे महत्त्वाचे असल्याने गाव हे आदिवसी उपाययोजना क्षेत्रात येत असल्याने प्रथम त्यांना या शासकीय जीआर नुसार शालेय आरोग्य व भौतिक सुविधा पुरविणे किंवा त्यासाठी 40 % निधी खर्च करणे अपेक्षित असल्याने तो या मार्गाने आपला प्रश्न सोडवू शकतो .हे त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे प्रथम एक वर्ग दुरुस्ती या प्रमाणे खऱ्या

अर्थाने कामकाजाला सुरुवात करून एक सर्वांच्या मनावर नवचैतन्य निर्माण झाले आणि कामाला चालना मिळाली .आणि काम प्रगतीपथावर चालू झाले.आणि करता करता जो आमचा प्रश्न होता.तो मार्गी निघाला आणि एकामागून एक असे तीन वर्ग दुरुस्त करण्यात आले.१ वर्ग ग्रामपंचायत यांचे माध्यामातून २ वर्ग लोक प्रतिनिधीच्या मार्फत मिळून तीन वर्षात म्हणजे २०१८ ते २०२१ पर्यंत दुरुस्त करून घेतले .आणि असे करता करता जुने वेग अगदी नविन रुप धारण करून उभे राहिले .आणि आज शालेय भौतिक परिसर स्वच्छ सुंदर व देखणा तयार झालेला आहे .यामध्ये शालेय परिसर,शालेय संरक्षक भिंत, किचन शेड, शालेय इमारत,सुंदर परसबाग सहशालेय उपक्रम आशा सर्व गोष्टीने आज एक नव रूप उभे राहिले.आणि यामधून विद्यार्थ्याचा मानतील गोष्टी जाऊन घेऊन शेजारी शासकीय संकुल असून आज गावातील विद्यार्थी शाळेत आनंदाने येऊन अध्ययन करतात.अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर,शालेय उपक्रम घेऊन एक या परिसरात नावारूपाला आलेली शाळा आणि यामध्ये अध्यापन करणारे सर्व शिक्षक वृंद या सर्वामुळे हे शक्य झाले यासठी गावातील ग्रामस्थ,सदस्य,शिक्षण विभागातील अधिकारी,तसेच लोक प्रतिनिधी,समाजातील स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी संगणक,वाचनासाठी पुस्तके,शालेय साहित्य,दप्तर,स्वेटर,सौर दिवा डिजिटल बोर्ड,बोलके वर्ग,शिष्यवृत्ती निकाल,शालेय परसबाग बाग क्रमांक,शालेय क्रीडास्पर्धेत क्रमांक विज्ञान प्रदर्शन प्रथम क्रमांक या सर्व बाबींनी आज नाविन्यपूर्ण शाळा तयार झाली आहे.याचा आम्हा सर्वाना अभिमान आहे.





मुख्याध्यापक / शिक्षक यांनी निवडलेल्या विषयांसदर्भातील अडचणी दूर केल्यानंतर दिसलेले दृश्य परिणाम फलनिष्पत्ती केलेले काम हे नेहमी आपल्या कार्याची पावती देत असते आणि याचे महत्वाचे कारण म्हणजे की या गोष्टीचे आज समाधान मिळतंय .गेल्या पाच वर्षातील वाढती पटसंख्या हे महत्वाचे आहे कारण शाळेपुढे सर्वात महत्वाची बाब शाळेचा पट टिकविणे हा आहे .शालेय जीवनाचा विद्यार्थी आत्मा आहे आणि त्याचा सर्वांगीण विकास साधला जावा यासाठी उपक्रमांचा आम्हाला याचा फार उपयोग झाला.

शाळेच्या भौतिक सुविधा,शैक्षणिक साहित्य, शालेय स्वेटर, संगणक संच, Interactive बोर्ड,शालेय विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी सौर दिवे, अशा साऱ्या गोष्टीतून शालेय भौतिक परिसर शालेय बांधकाम, त्याच बरोबर शैक्षणिक गुणवत्ता वाढ त्याच बरोबर शेजारी खूप मोठा शालेय कॅम्पस असून आमच्या शालेय पटात झालेली वाढ विशेष बाब आहे.हा यामागचा उद्देश असून तो अत्यंत प्रभावी असून या सर्व घटाकावरून शालेय शैक्षणिक गुणवत्ता वाढ करणे.त्याच बरोबर आम्ही सर्वांनी मिळून शालेय गुणवत्ता वाढण्यासाठी आदिवासी दुर्गम डोंगराळ भागातील एक नाविन्यपूर्ण शाळा बनविण्यात आलेले यश हे आमच्या दृष्टीने खूप वाढता विश्वास आहे.आणि पाच वर्षातील पटात झालेली वाढ ही महत्वाची उल्लेखनिय आहे.






केलेले काम हे नेहमी आपल्या कार्याची पावती देत असते आणि याचे महत्वाचे कारण म्हणजे की ज्या गोष्टीचे आज समाधान मिळतंय .गेल्या पाच वर्षातील वाढती पटसंख्या हे महत्वाचे आहे कारण शाळेपुढे सर्वात महत्वाची बाब असेल तर शाळेचा पट टिकविणे .शालेय जीवनाचा विद्यार्थी आत्मा आहे आणि त्याचा सर्वांगीण विकास साधला जावा यासाठी आम्हाला याचा फार उपयोग झाला .

समारोप -

अशा स्वरूपात केलेल्या कार्याची फल निष्पती झाली व भौतिक सुविधेमुळे शाळेचा कायापालट झाला आणि शालेय पटाबरोबरच शैक्षणिक गुणवत्ता वाढ झाली इतर मॉडेल शाळेच्या बरोबरीने आपलीही शाळा आहे याची जाणीव ग्रामस्थ पालक यांना झाली व त्यामध्ये नव्याने काही करता येतंय का याची जाणीव त्यांना मुख्याध्यापक शिक्षक यांनी करून दिली व परिसरातील एक मोडकळीस आलेली शाळा उन्नत होण्यात यश मिळत आहे याचा आम्हा शिक्षकांना अभिमान आहे.



प्रयोग इंग्रजी अध्यापनातले

शाळेचे नाव - नगरपालिका शाळा नं.६ कोपरगाव,ता.कोपरगाव,जि.अहमदनगर.

मुख्याध्यापकाचे नाव – श्रीम.कल्पना निंबाळकर

सहशिक्षक - श्रीम.सुनिता भाऊसाहेब इंगळे

प्रास्ताविक –

माझी शाळा पूर्णतः झोपडपट्टी भागातील मजूरवर्गीय पालक असणाऱ्या मुलांची आहे. पालक दररोज सकाळीच मजुरीच्या निमित्ताने जातात व रात्री उशिरा घरी येतात.त्यामुळे आपल्या पाल्याकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नाही. इंग्रजी वाचन व लेखन संदर्भाने खूप समस्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून आल्या म्हणून मा.मुख्याध्यापक यांनी दिलेल्या प्रेरणा,मार्गदर्शन आणि सहकार्य यामुळे विद्यार्थ्यांना उपक्रमांमधून इंग्रजी शिकविणे सोपे झाले.


कार्यवाही करताना आलेल्या अडचणी -

हा उपक्रम राबवताना प्रथमतः विद्यार्थ्यांची मानसिकता तयार करणे खूप गरजेचे होते.यात विद्यार्थी वयोगटानुसार तक्ते, शब्दकार्ड जमा करणे,जी मुले चांगला प्रतिसाद देतील त्या मुलांसाठी इंग्रजी छोटी वाक्ये,शब्दडोंगर, गोष्टवाचनासाठी पुस्तके शोधणे थोडे अडचणीचे वाटले.फक्त भिंत तयार करुन भागणार नव्हते. तर त्या शब्दभिंतींची गोडी लावण्यासाठी काही उपक्रम निवडावे लागले.हे उपक्रम निवडतानाही काही पुस्तके वाचली.युट्यूबचा वापर केला.

सर्व विद्यार्थ्यांची मराठी मातृभाषा असल्याने मुले मराठी आत्मविश्वासाने बोलतात पण तेवढाच आत्मविश्वास इंग्रजी बोलताना आढळून येत नाही. मूळातच इंग्रजी विषयाची मनात भीती असल्याने संवादकौशल्य आत्मसात करण्यास मुलांना अडचणी येतात.प्रश्नांची उत्तरे लिहितानाही शब्दांमधून काही अक्षरे गाळून टाकतात किंवा चुकीचे स्पेलिंग लिहितात.हे लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांसाठी काही उपक्रम राबवीले तर निश्चितच विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची भिती कमी होऊन विद्यार्थी आत्मविश्वासाने बोलू शकतील,सुस्पष्ट वाचू व लिहू शकतील यासाठी काही उपक्रम घेण्याचे निश्चित केले.

या अडचणीवर मात करण्यासाठी शिक्षकांनी केलेली अंमलबजावणी –

हा नवोपक्रम मी वर्गस्तरावर राबवत आहेत.इंग्रजी अध्यापन करताना आलेल्या समस्यांवर छोट्या उपक्रमातून अध्ययनाची गोडी वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत.हा उपक्रम राबविण्याचे खूप दिवसाचे मनात होते.यातून फलनिष्पत्ती मिळेल याचाही अंदाज होता.हे लक्षात घेऊन वर्गातील विद्यार्थ्यांशी चर्चा करुन आपल्याला इंग्रजी विषयासाठी भिंत तयार करायची आहे याची चर्चा केली.त्यांनंतर सहकारी शिक्षिका, मुख्याध्यापिका यांच्याशी चर्चा करुन उपक्रम समजावून सांगितला.



आवश्यक साधनांचा विचार –

हा उपक्रम राबविण्यासाठी प्रथम वर्गाची एक रिकामी भिंत हवी होती.त्यानंतर विद्यार्थी वयोगटाला आवश्यक विविध प्रकारचे इंग्रजी तक्ते, शब्दकार्ड, वाक्यकार्ड हवी होती.२०१५ पूर्वी इंग्रजी अध्ययन समृद्धी साठी खूप शब्दकार्ड शाळेस प्राप्त होते शाळेचा वर्ग आवरताना ती मला सापडली. ही कार्ड पाहिल्यावर या कार्डांचा पुन्हा एकदा नव्याने वापर होऊ शकतो हे लक्षात घेऊन सहजच इंग्रजी शब्दभिंतींची कल्पना सुचली.जर विद्यार्थ्यांपुढे ती कार्ड एखाद्या टोपलीत गठ्ठ्याने ठेवली असती तर विद्यार्थ्यांनी ती घेऊन अभ्यास करायला कंटाळा केला असता.म्हणून भिंत जर तयार केली तर सातत्याने हि कार्डस विद्यार्थ्यांच्या डोळ्यांसमोर राहतील व विद्यार्थी येता - जाता हे शब्द वाचू शकतील.यासाठी मिळालेल्या कार्डमधून चित्र व शब्द व फक्त शब्द असणारे कार्ड वेगळे केले.यातही प्रथम दोन अक्षरी शब्द ते तीन अक्षरी,चार अक्षरी शब्द,पाच अक्षरी शब्द असा स्तर वाढवत नेणार आहोत.सध्या फक्त दोन अक्षरी व तीन अक्षरी शब्दकार्ड लावलेली असून त्याचा सराव चालू आहे.या शब्दभिंतीला पुरक असे काही उपक्रमही वर्गात घेत आहोत.

Word - chain - यात एक शब्द लिहून त्यातील शेवटच्या अक्षरांपासून सुरु होणारा शब्द लिहिणे (उदा.mat-tea-ant...) सर्वांत जास्त शब्द लिहिणाऱ्यास word chain king म्हणून अभिनंदन केले.सुरुवातीला मुलांना शब्द वाचता आले नाही तरी त्यांनी शेवट येणाऱ्या अक्षरापासून सुरुवात होणारे खूप शब्द शोधले.शोधलेल्या शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांना dictionary मध्ये शोधून अर्थ लिहिण्यास सांगितले.त्यामुळे विद्यार्थ्यांना शब्द कसा शोधायचा हे समजले.



Rhyming word game - सुरुवातीला तोंडी rhyming word चा भरपूर सराव घेतला ते शब्द blackboard वर लिहून वाचून घेतले. नंतर दोन गटात rhyming word चे flash card वाटून दिली. पहिल्या गटातील एकाने जवळील फ्लॅश कार्ड दाखवून शब्द सांगायचा त्याच्याशी उच्चाराने यमक जुळणारे rhyming शब्दाचे कार्ड दुसऱ्या गटातील विद्यार्थ्यांने दाखवायचे.शब्द जर बरोबर आले तर दोघांनी एकमेकांना हात देऊन जवळ यायचे. व दोन्ही शब्दकार्ड सर्व विद्यार्थ्यांना दाखवायचे. rhyming word चुकला तर विद्यार्थी बाद होईल व पुन्हा खेळ सुरु होईल. शब्दवाचन, शब्दांतील गंमत समजण्यासाठी या खेळाचा चांगला उपयोग होतो.

जाऊ शब्दांचिया गावा - विद्यार्थ्यांसाठी प्रथम A to Z अक्षरे असणारे भरपूर कार्ड तयार करुन दिले.दोन गट करुन उपलब्ध साहित्यातून अक्षरे निवडून त्यांना परीचित असणारे शब्द तयार करण्यास सांगितले नंतर




अपरिचित शब्द तयार करण्यास सांगितले.विखरुन टाकलेल्या वर्णमालेतून विद्यार्थ्यांनी अक्षराची निवड करायची आहे,एक मुलगा शब्दरचना करत असताना इतर वाचतील,यामध्ये जो मुलगा जास्तीत जास्त शब्द बनवेल त्याचे अभिनंदन करता येईल.यामुळे विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढून शब्दवाचन सरावही घेता येतो.



Word mountain - विद्यार्थ्यांनी इंग्रजी वाचन आत्मविश्वासपूर्वक करावे म्हणून हा उपक्रम चालू आहे. यात सर्वप्रथम कार्डवर विद्यार्थी परीचयाचे चित्र घेऊन त्यावर आधारीत तीन ते चार सोपे इंग्रजी वाक्य असणारे word mountain तयार केले..ती वाक्ये कशी वाचायची याचा सराव देऊन ती वाक्ये वाचून घेतली.अशी जवळजवळ १०० कार्डे विद्यार्थ्यांना लॅमिनेशनसह उपलब्ध करुन दिली. सरावाअंती विद्यार्थी आत्मविश्वासाने वाचू लागली आहेत.स्वयंअध्ययन कार्ड म्हणूनही या कार्डचा उपयोग करतात.

English word wall - यात वर्गाची एक संपूर्ण भिंत इंग्रजी या विषयासाठी तयार केलेली आहे. यात चित्र व



शब्दकार्ड, इंग्रजीचे चित्रशब्दयुक्त तक्ते (body parts, animals, birds, vegetables, flowers, वाहने,तक्ते) लावलेली आहेत.या भिंतीवर ५०-६० शब्दकार्ड लावलेली आहेत. या कार्ड वाचनाचा दररोज सराव घेतला जातो.या word wall चा उपयोग करुन अनेक छोटे छोटे खेळ,उपक्रम घेता येतात.


उदा. कोणतेही एक इंग्रजी अक्षर देऊन त्यापासून सुरू होणारे शब्द शोधा.
शेवट होणारे शब्द शोधा.
मध्ये 'a' येणारे शब्द शोधा .
तीन अक्षरी शब्द शोधा.
दोन,अक्षरी,चार,अक्षरी,मोठ्यात मोठे शब्द शोधा.
rhyming word असणारे शब्द शोधा.
तुला आवडलेला शब्द शोध.
दिलेले शब्दांचे अर्थ लिही.

दिलेल्या शब्दांपासून वाक्य तयार कर,एका मिनिटात जास्तीत जास्त शब्द लिही,न चुकता शब्द वाच. अशा विविध प्रकारे मुलांचा सराव चालू आहे.वर्गातील विद्यार्थ्यांची सर्वात आवडती जागा म्हणजे English word wall आहे. विद्यार्थी अध्ययन समृद्धीसाठी चांगला उपयोग होत आहे.

सोपे शब्दपट्टी व वाक्यपट्टीवाचन -



मुळाक्षरे,शब्द यांचे दृढीकरण होण्यासाठी हा उपक्रम चालू आहे.यात विद्यार्थ्यांना सुरुवातीला सोपे वाक्यवाचनाचे नमुने देऊन वाक्यवाचन सराव करुन घेऊन नंतर वाचनास सहज उपलब्ध होतील असे छोटे उतारेही दिलेले आहेत.वाक्य वाचनाचा सराव व्हावा म्हणून जास्तीच्या वाक्यवाचन सरावपट्ट्या केलेल्या आहेत.



इंग्रजी अध्ययन कोपरा -

विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक सुकर व्हावे म्हणून उपलब्ध साहित्यातूनच टाकाऊतून टिकाऊ बालस्नेही शैक्षणिक साहित्य निर्मिती करुन यात इंग्रजी विषयाचे विविध घटक अंतर्भूत करण्यात आले आहे. प्रत्यक्ष वर्गाच्या नियोजित कोपऱ्यात वर्ग अध्यापनासाठी लागणारे साहित्य मांडून ठेवले आहे.त्यात yes no cards, फुले, फळांची चित्रे, भाज्यांची नावे, A to Z alphabets, words, sentences, storytelling cards, English story book, chocolate raper, soap raper .शिक्षकांच्या अनुपस्थितीतही विद्यार्थी त्या वस्तू पाहू शकतील,हाताळून निरीक्षण करु शकतील.वस्तू दाखवून विद्यार्थ्यांकडून वस्तूसंबंधी शब्द किंवा वाक्यरचना करुन घेता येईल.हा कोपरा विद्यार्थी स्वयंअध्ययनास उपयुक्त असाच ठरेल.

वरील उपक्रम मी इयत्ता चौथी व सातवी या वर्गासाठी राबवले आहेत.सहा महिन्यापासून उपक्रम चालू आहेत.

शिक्षक यांनी निवडलेल्या विषयांसदर्भातील अडचणी दूर केल्यानंतर दिसलेले दृश्य परीणाम/ फलनिष्पत्ती -

सुरुवातीला विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय अध्ययनाला घेतला तरी नकोसा वाटायचा.विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची भीती कमी व्हावी म्हणून काही इंग्रजी रंजक खेळ,उपक्रम वर्गात सुरु केले.इंग्रजी शब्द भिंतीवरील वाचन नमुने सारख्या उपक्रमात विद्यार्थी सक्रीय आहेत.आत्मविश्वासाने वाचत आहे.विद्यार्थ्यांचे वाचनाचे नमुने व्हीडिओ घेऊन युट्यूब वर अपलोड केलेले आहेत.त्यामुळे विद्यार्थ्यांनाही आनंद होत आहे. विद्यार्थ्यांत वाचनाची स्पर्धा निर्माण होत आहे.शब्द भिंत यांसारख्या उपक्रमामुळे मुले इंग्रजी अध्ययनात रमण्यास मदत झाली. शब्द

भिंत जवळ जाऊन मुले तिथे बसतात,शब्द वाचण्याचा प्रयत्न करतात.सोपे वाक्य वाचून बघतात.हेच या उपक्रमाचे यश आहे.याचा परीणाम म्हणजे विद्यार्थी गोष्ट सांगणे याकडे वळत आहेत.विद्यार्थ्यांना इंग्रजी संबंधित महत्त्वाची माहिती चित्रासहीत टॅबवर उपलब्ध करुन दिली जात आहे.इंग्रजी वाचनाकडे न वळणारी मुले आवर्जून इंग्रजी वाचत आहे.एकूणच चांगला परिणाम या उपक्रमाचा होत आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेत आनंददायी वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढला. शुद्ध व स्पष्ट उच्चारानुसार वाचनाची सवय लागली. स्पेलिंग वाचनात सुधारणा झाली. विद्यार्थ्यांमध्ये रंजक पद्धतीने श्रवण,संभाषण,उच्चारण,लेखन कौशल्य विकसित झाले.

वर्गात हे उपक्रम सुरु असल्याने विद्यार्थ्यांनी इतर वर्गातील आपल्या मित्रांनाही सांगितले.त्यामुळे दुसऱ्या वर्गातील मुलेही इंग्रजी वाचनाकडे वळली.इंग्रजी शब्द भिंत व इतर उपक्रम शाळेतील इतर वर्गात सुरु झाले. विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती हळूहळू वाढविण्यास मदत होत आहे. इंग्रजी संभाषणाचा आत्मविश्वास निर्माण होऊ लागला आहे.

या उपक्रमाची महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन परीषद पुणे तर्फे प्रकाशित होणारे शैक्षणिक मासिक नोव्हेंबर २०२३ चे **जीवन शिक्षण मासिक** यातही दखल घेतली गेली आहे.

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHT (IJCRT) या जागतिक स्तरावरील नियतकालिक माहे सप्टेंबर २०२३ मध्ये उपक्रमाची दखल घेण्यात आली.

समारोप –

मुले इंग्रजी वाचनाकडे वळली यातच मोठे समाधान आहे.वर्गात ७५ कार्ड इंग्रजी शब्दडोंगरची लॅमिनेशनसह तयार करवून घेतली आहे.विद्यार्थी वाक्यवाचनही छान करत आहे.विद्यार्थ्यांचे वाचनाचे छोटे -छोटे इंग्रजी वाचनाचे व्हिडिओ माझ्या युट्यूब चॅनलवरही उपलब्ध आहेत.ज्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास निश्चितच वाढला आहे.

शालेय व्यवस्थापन समितीचा विद्यार्थी विकासात सहभाग

शाळेचे नाव - जि.प.प्राथ.शाळा चाँदसुरज, केंद्र लहित, पो.चास,ता.अकोले, जि.अहमदनगर

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.जयवंत भांगरे

प्रास्ताविक –


अहमदनगर जिल्ह्यातील सह्याद्रीच्या रांगेत वसलेला आदिवासी बहुल एकमेव तालुका म्हणजे अकोले तालुका. या तालुक्याचे विशेष म्हणजे दऱ्या-खोऱ्यांनी, नैसर्गिक डोंगरानी नटलेल्या तालुक्याची ओळख सांगता येईल, एवढेच नव्हे तर याच तालुक्यांनी तुकाराम धांडे यांसारख्या कवींना जन्माला घातले, क्रांतीकारकांचा तालुका ही ओळख तर अख्या महाराष्ट्राला माहितच आहे. खरतर अशा तालुक्यात माझा जन्म व्हावा व योगा-योगाने का होईना मला एक आदिवासी मुला-मुली असणारी चाँदसुरज नावाची शाळा मला ऑनलाईन बदलीने मिळावी हे माझ भाग्यच समजेल.

तस चाँदसुरज नावातच बरच काही आहे, असे सर्वांना वाटाव तस मलाही वाटल. नगर जिल्ह्यात नावाजलेल्या संवत्सर शाळेतून चाँदसुरज शाळेत बदली झाली .नावाप्रमाणे खूप नावाजलेली शाळा असेल अस वाटण स्वाभाविकच होत ते कोणत्याही शिक्षकाला वाटल असत तस मलाही वाटल पण.....

शाळेत हजर होण्यासाठी शासनाने तीन महिने इतका वेळ दिला होता पण माझ्या उत्सुकतेला मला थांबवता आले नाही, एकदा शाळा तर पाहून येऊ अस एकदाच ठरवून मी शाळा पाहण्यासाठी आलो. शाळा पाहण्यासाठी माझी जीवनसंगीनी सोबत होती. शाळा पाहताच आमच्या दोघांत आधीची शाळा व आता बदलीने मिळणारी शाळा याची तुलनात्मक चर्चा होऊ लागली. शाळेचे फोटो काढुन व राहायला खोली मिळेल का याची चौकशी करून मोटार सायकलने प्रवास सुरू केला पण मनात मात्र तेंव्हा पासूनच शाळा आणि फक्त शाळा ..... असाच विचार सुरू झाला. तीन महिन्यानंतर चाँदसुरज गावची शाळा माझी शाळा होणार होती. मग मला अनेक सकारात्मक नकारात्मक गोष्टी माझ्या मनात गोंधळ घालत होत्या. पण जाता जाताच स्वत:चीच समजूत काढत एकदाच ठरवून टाकल की, मी मला हवी असणारी शाळा करील.. आणि रेघ लहान झाली या गोष्टीप्रमाणे आधीच्या रेघे पेक्षा नक्कीच मोठी रेघ काढेन... आणि मनातील विचारांना पूर्णविराम दिला.

सुरुवातीला शाळेचा दर्जा अगदी सामान्य.म्हणुन काहीतरी वेगळं करावं यासाठी विविध कल्पना डोक्यात घोळत होत्या. यापूर्वीच्या जुन्या शाळेचा दांडगा अनुभव होताच.पक्का निश्चय केला. चाँदसुरज गावच्या ग्रामस्थांची आर्थिक परीस्थिती तशी सामान्यच. पण दानशूर लोकांची कमी नव्हती. परंतु शाळा नवीन, शिक्षक नवीन, इमारतीची दुरावस्था झालेली, जेमतेम पट. एकंदरीत शाळा बंद पडते की काय अशी अवस्था . अशात लोकवर्गणी जमा होणे जवळ जवळ अशक्यच. शाळेत कुणी फ़िरकायला तयार नाही. १५ ऑगस्टला तर कोणी फिरकतही नसायचे पण या दिवशी प्रभात फेरीच्या माध्यमातून सर्वांना शाळेत आमंत्रीत केले . लेझीम डान्स बसवून गावकरी व पालकांची विद्याथ्यांनी मनोरंजन केले तसेच आवेशपूर्ण भाषण सुध्दा केली. नाउमेद न होता लोकांत मिसळलो. माझ्या डोक्यातील कल्पना सांगितल्या. माझ्या कल्पना व कल्पनेतील शाळा सर्वच सहजासहजी न पटण्यासारख्या. त्यात देणगीची मागणी यामुळे आणखी दुरावा निर्माण झाला. आता शेवटचा आधार होता फ़क्त तरुण वर्गाचा.सर्व तरुणांना विनंती केली आणि शेवटी थोडे तुम्ही टाका आम्ही काही जमा करतो या अटीवर काम सुरू झाले.

चाँदसुरज गावातील प्रगतशिल शेतकरी, गावचे पोलीस पाटील पदाचा भार सांभाळण्या बरोबरच शाळेचे व्यवस्थापनाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणारे समिती-चे अध्यक्ष श्री.सचिन शेळके



भाऊ व मयुरेश भाऊ यांच्याकडून शाळेसाठी बदल घडवून आणण्यासाठीचा होकार मिळविला तरूणांची व विद्यार्थी- पालकांची मिटींग घेऊन शाळेसाठी कोणकोणत्या गोष्टींची कमतरता आहे व त्यासाठी आपल्याला काय काय करावे लागेल यासाठी चर्चा घडवून आणली. व सर्वांना विश्वासात घेऊन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग मिळविला. कोणी शारिरीक कष्टाच्या स्वरुपात मदत तर कोणी प्रत्यक्ष शालेय उपयोगी वस्तू दिल्या श्री.जिजाबाभाऊ लोहकरे यांनी तर रेकॉर्ड ठेवण्यासाठी कपाट, किशोर लोहकरे साहेब यांनी एक संगणक, व भरगोस अशी अर्थिक मदत केली. रंग-रंगोटीच्या कामासाठी पालक व येथील दानशूर ग्रामस्थांकडून शाळेसाठी रू.50,000/- हजारच्या पुढे रोख रक्कम जमा केली. विद्यार्थ्यांचा गुणवत्तेतील अपेक्षित वर्तन बदल पाहून ग्रामस्थ शाळेत यायला लागले. अडचणी विचारायला लागले. त्यात माझे प्रेरणास्थान सन्मा. खताळ साहेब, विस्ताराधिकारी धांडे साहेब, मा. के.प्र. वाल्मिक बडेसाहेब यांनी माझ्या पूर्वी च्या शाळेचा कामाचा अनुभव पाहता माझ्यावर पूर्ण विश्वास टाकत ग्रामस्थांना प्रेरीत केले. आणि चारच महिन्यात ग्रामस्थांचा विश्वास आणि आम्हा शिक्षकांची कृतीशिलता यातून अध्ययन-अध्यापन सुरू झाले.आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षण प्रक्रियेत कसा वापर करता येऊ शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे चाँदसुरज शाळा हे समिकरण तयार झाले. कमी वेळेत व कमीत कमी श्रमात जास्तीत –जास्त उद्दीष्टपूर्ती करणे यामुळे सोपे झाले.

अडचणी दूर केल्यानंतर फलनिष्पत्ती -

- पालक - शिक्षकांचे जिव्हाळयाचे सबंध निर्माण झाले.
- विद्यार्थी – पालक – शिक्षक यांच्यामधील अध्यन-अध्यापनामधील आंतरक्रीया वाढण्यास मदतच झाली.
- शालेय कामात शिक्षकांना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी पालक स्वंयप्रेरणेने शाळेत येऊ लागले व त्यामळे शालेय विकास कामास गती मिळाली.
- शैक्षणिक उठाव व मिशन आपुलकी अंतर्गत शाळेला मदत मिळणे सोपे झाले.
- व्यवस्थापन समिती - पालक - गावकरी यांमधील जिव्हाळयाचे संबंध वाढीस लागले.
- गावा विषयी व शाळेविषयी नोकरदार वर्गामध्ये ओढ निर्माण झाली.
- लोकांचा शाळेविषयी विश्वास निर्माण झाला.
- परिणामी विद्यार्थी शाळेच्या वेळेआधी शाळेत येऊ लागले.
- पालक व विद्यार्थी यांना शाळेविषयी आत्मविश्वास वाढीस लागला.

त्याच बरोबर Educational software च्या मदतीने अध्ययन अध्यापन सुकर झाले. गणिती खेळ अभ्यासक्रमावर आधारीत Activity स्वाध्याय कार्ड, अध्ययन अध्यापन सुकर होण्यासाठी व्हिडीओज, यामुळे एकूणच शिक्षण प्रक्रिया मनोरंजनात्मक होऊन विद्यार्थ्यांची प्रगती होत आहे.दप्तराचे ओझे हळूहळू कमी होत शाळा दप्तरमुक्त कधी झाली हे कळले देखील नाही. इंटरनेटच्या माध्यमातून भाषा, गणित, इंग्रजी, भूगोल या विषयाचे अनेक सॉफ़्टवेअर व Apps डाऊनलोड करून त्यांचा वापर अध्ययन अध्यापन क्रियेत केला जातोय. याचा फ़ायदा एखादा अवघड घटक समजून घेण्यासाठी होतोय.यातून विद्यार्थी स्वत:च शिकत आहेत. त्यामुळे आपोआपच शिकण्याचा वेग वाढला. याचे फ़लीत म्हणून येथील सर्व विद्यार्थी त्यांच्या इयत्तेच्या पातळीपेक्षा कितीतरी पुढे आहेत. त्याचप्रमाणे त्यांचे इंग्रजी विषयाचे ज्ञान प्रशंसनिय आहे. प्रज्ञाशोध सारख्या परीक्षांमध्ये गुणवत्ता यादीत येथील विद्यार्थी चमकतील अशी आशा निर्माण होत आहेत. त्याचाच परीणाम पालक आपल्या मुलांना खाजग़ी शाळांपेक्षा या शाळेत दाखल करण्यास प्राधान्य देत आहेत. एक झाड एक विद्यार्थी, संगीतमय पाढे, कृतीयुक्त कविता व गीत गायन, रांगोळी स्पर्धा, मनोरंजक खेळ, शाळास्तरावरील क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इ. उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. शाळेचा YouTube Channel तयार केला असून इतर शाळांना येथील उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.



जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेरचे तत्कालीन प्राचार्य मा.अरुण भांगरे साहेब यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. शिक्षण परिषदेमधून नियमित मार्गदर्शन मिळत आहे. शाळेला आतापर्यंत अनेक अधिकारी, पदाधिकारी यांनी भेटी देऊन सकारात्मक अभिप्राय नोंदविले आहेत. या पुढेही शाळेची निरंतर प्रगती होऊन आदर्श शाळा म्हणून नावलौकिक प्राप्त करेल अशी खात्री आहे.

सोबत लिंक -

https://youtu.be/Lu4O29-qfI8?si=H5Y_l4kXSAdxrRIw

https://youtu.be/fIVE4IW0wcU?si=GDVQiXYwAT2M27Ea

https://youtu.be/AkFLjQjwUZY?si=MKHjIh9vpCoe1AgG

काही क्षणचित्रे -

जुनी इमारतीचे समोरील बाजू 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिना निमित्ताने लोकांना लोकसहभाग वाढविण्यासाठी आवाहन कले.













जुन्या इमारतीची आतील व बाहेरील बाजू









रंगरंगोटी,साहित्य निर्मिती केल्यानंतर शाळेचे बदललेले रूप




जिल्हा परिषद प्राथ.शाळा-चाँदसुरज


• संगणक कक्ष •
जिल्हा परिषद प्राथ.शाळा-चाँदसुरज


• संगणक कक्ष •
जिल्हा परिषद प्राथ.शाळा-चाँदसुरज









चळवळ लोकसहभागाची आणि विद्यार्थी विकासाची

शाळेचे नाव – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राळेगणसिद्धी, ता.पारनेर, जि.अहमदनगर

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.रमेश बबन पावडे

प्रस्तावना –

जगामध्ये नावलौकिक असलेले आदरणीय जेष्ठ समाजसेवक पद्मविभूषण पद्मश्री माननीय अण्णा हजारे यांचे आदर्श गाव राळेगणसिद्धी या गावातील आमची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. श्री रमेश बबन पावडे सर, श्री सुरेश रामभाऊ गायकवाड सर आणि श्रीमती वृषाली सुदाम गायकवाड मॅडम असे तिघेजण या शाळेत कार्यरत आहेत. आदरणीय अण्णा हजारे हे शाळेच्या कार्यक्रमात दरवर्षी हजर असतात व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतात.



संगणक कक्ष -

प्रत्येक बालकाला शिक्षणाची अत्यंत गरज आहे.परंतु सद्यस्थितीत इंग्रजी माध्यमाच्या शाळामध्ये पालकांचा जास्त ओढा आहे, त्यामुळे शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न आवश्यक होते.यासाठी आमच्या गावातील लोकांनी कॉम्प्युटर म्हणजे संगणक मुलांना हाताळता यावे यासाठी प्रयत्न सुरु झाले. श्री.पावडे सर व श्री.गायकवाड सर सन 2018 मध्ये बदली होऊन आले त्यानंतर कोरोना काळ आला आणि ऑनलाइन शिक्षण सुरू झाले. मुले चांगल्या प्रकारे मोबाईल हाताळू लागली. या कल्पनेतून शाळेमध्ये विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर हवे यासाठी शाळेत एक मीटिंग बोलवली आणि हे कॉम्प्युटर कसे

मिळवायचे यासाठी लोकांनी वर्गणी जमा करून 15 कॉम्प्युटर शाळेस दिले त्यासाठी शाळेत स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला. कोरोनाच्या काळापासून सर्व क्षेत्र ऑनलाईन झाले आहेत. अनेक परीक्षा ह्या कॉम्प्युटरवर घेतल्या जातात. मुलांना प्राथमिक स्तरापासूनच कॉम्प्युटर हाताळण्याची सवय लागावी त्यासाठी इयत्ता पहिली पासून विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर शिकवणे सुरू करण्याचे ठरवले..

हे शिक्षण मुलांना दुपारच्या वेळेत देण्यास सुरुवात केली. विद्यार्थ्यांना कॉम्प्युटरवर शिकायला आवडायला लागले. आता वर्ग पहिली ते चौथी सर्व मुले येथे कॉम्प्युटरवर शिकत आहेत .

विद्यार्थी पेंटिंग ड्रॉइंग,माऊस हाताळणे,भरपूर गोष्टी शिकले आहे.

प्रत्यक्ष हाताळल्यामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

चुका पण शिका हा कानमंत्र विद्यार्थ्यांना मिळाला.

विद्यार्थ्यांच्या हाती आज कॉम्प्युटर, उद्याचे भविष्य सुखकर...



स्वच्छ सुंदर- माझी शाळा

आकर्षक परिसर



शाळेत पाऊल ठेवताच अधिकाऱ्यांना शिक्षकांना विद्यार्थ्यांना पालकांना सर्वांनाच आकर्षक वाटतो तो आमच्या शाळेचा परिसर. स्वच्छ सुंदर असा हा आमच्या शाळेचा परिसर आहे .

खूप जुनी मोठी झाडे, फुलझाडे, रंगरंगोटी केलेले वर्ग, बोलक्या भिंती आणि डिजिटल वर्ग हे सर्व असल्यामुळे इमारत आकर्षक वाटते.विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यात आनंद होतो.

झाडांची निगा ठेवणे,वेळोवेळी छाटणी करणे,वेळेवर पाणी देणे, पाला पाचोळा गोळा करणे आणि सर्वांत महत्वाचे परिसर कायम व नियमित स्वच्छ ठेवणे ही जबाबदारी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक मोठ्या जबाबदारीने पार पडतात.

शाळेत भेटी द्यायला येणारे पालक,ग्रामस्थ,पर्यवेक्षीय अधिकारी आल्यावर झाडे व परिसराची स्वच्छता पाहून आनंदी होतात. तसेच शाळेची रंगरंगोटी आणि बोलक्या भिंती ह्या पण सर्वांना आकर्षक वाटतात.

त्यामुळेच म्हणावेसे वाटते.....



ही आवडते मज मनापासुनी शाळा,
लाविते लळा ही जसा माऊली बाळा.
हसऱ्या फुलांचा बाग जसा आनंदी,
तशीच ही शाळा, मुले इथे स्वच्छंदी....

तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर -

शाळेमध्ये शिक्षक विद्यार्थी नवनवीन शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करतात शाळेतील विद्यार्थ्यांचा वर्गानुसार व्हाट्सअप ग्रुप स्थापन केलेला आहे. त्या माध्यमातून रोजचा दिलेला अभ्यास व ऑनलाइन परीक्षा विद्यार्थी सोडवतात. चंद्रयान थ्री चे प्रक्षेपण व त्यासंबंधी माहिती हे सर्व पाहण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करतात तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन वाढण्यासाठी विद्यार्थ्यांना वेगवेगळे विज्ञानाविषयी प्रयोग दाखवले जातात व त्यांची जिज्ञासू वृत्ती वाढीस लागते.

आदर्श परिपाठ -

दिवसाची सुरुवात ही चांगली झाली तर; सगळा दिवस चांगला जातो त्याप्रमाणे आमच्या शाळेची दिवसाची सुरुवात संगीतमय परिपाठाने होते. त्या परिपाठात सर्व वर्गातील विद्यार्थी सहभाग घेतात विद्यार्थ्यांचा उत्साह व सर्वांगीण गुणवत्तेत वाढ होते. नेतृत्व गुण, संग्रह वृत्ती वक्तृत्व कौशल्य,समायोजन,प्रसंगावधान या अशाच अनेक जीवनास आवश्यक कौशल्य मुलांनी शालेय घटकांमधून तसेच परिपाठात शिकावीत यासाठी प्रयत्न केले जातात.

'परिपाठ हा आदर्श शाळेचा आरसा असतो'.

कृतीयुक्त शिक्षणावर भर -

विद्यार्थी हा शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू मानला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वात जास्त कृतीतून शिक्षण दिले तर; जास्त व निरंतर कायम स्मरणात राहते. या हेतूने आमच्या शाळेत विद्यार्थ्यांना कृतीतून शिकवले.

वाचन उपक्रम - दप्तर मुक्त शाळा



या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे शनिवारी प्रकट वाचन घेतले जाते. सर्वांसमोर वाचण्यास सांगितल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये धाडस निर्माण होते व वाचनाची गती सुधारते छोट्या छोट्या चुका समजतात हा उपक्रम आम्ही आमच्या शाळेतच राबवत आहोत . पण पालकांनी घरी सुद्धा हा प्रकट वाचनाचा उपक्रम राबवावा यासाठी आम्ही आग्रही असतो . त्यामुळे विद्यार्थ्यांची वाचनाची गती वाढली आहे. मराठी वाचण्यासोबतच इंग्रजी विषयाचे सुद्धा वाचन घेतले जाते. त्यामुळे इयत्ता पहिली पासून विद्यार्थी इंग्रजी शब्द उच्चारतात .

परीक्षेमधील यश -

आजच्या जगामध्ये सर्वच ठिकाणी स्पर्धेचे युग झाले ; त्यामुळे आपला विद्यार्थी अशा या स्पर्धेमध्ये टिकला पाहिजे या हेतूने आमच्या शाळेमध्ये विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थी सहभाग घेतला जातो. उदाहरणार्थ मंथन एक्सलंट शिष्यवृत्ती अशा अनेक स्पर्धा परीक्षांना विद्यार्थ्यांना बसवले आहे व यामध्ये बहुतांश विद्यार्थी चांगल्या श्रेणीत पास झाले.

श्यामची आई संस्कार कथा माला -


आम्ही ऑक्टोबर 2023 पासून साने गुरुजींची श्यामची आई कथा माला सुरू केली आहे. यात परिपाठात प्रत्येक शिक्षकाने श्यामची आई या पुस्तकातील छोटा भाग रोज वाचायचा त्यातील संवेदनशील प्रसंग सांगताना विद्यार्थ्यांना रडू कोसळते श्यामची आई कथा मालिकेतून आम्हा शिक्षकांना व विद्यार्थ्यांना संस्काराची जणू शिदोरीस मिळाली.

लोक सहभाग वॉटर फिल्टर -

स्वच्छ पाणी असल्यावर विद्यार्थी सतत आजारी पडणार नाही यासाठी लोकसहभागातून शाळेतला पाण्याचे फिल्टर बसवण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांना सर्वांनाच शुद्ध व स्वच्छ पाणी पिण्यास मिळते . लोकसहभागातून व ग्रामपंचायत सहभागातून पाण्याचे फिल्टर शाळेत प्राप्त झाले आहे.

क्रीडा साहित्याचा वापर व विविध प्रकारचे खेळ -

खेळ हा विद्यार्थ्यांचा आवडीचा विषय आहे. त्यामुळे क्रीडांगणावरती खेळाचे साहित्याचा वापर करून विविध प्रकारचे खेळ आमच्या शाळेत खेळले जातात. कबड्डी खो-खो, हॉलीबॉल, फुटबॉल, रिंग दोरीवरच्या उड्या रेस, रनिंग रेस, लिंबू चमचा,पोत्यातील उड्या असे अनेक प्रकारचे खेळ शाळेत खेळले



शिकवले जातात त्यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होतो. शाळेला भरपूर मोठे मैदान उपलब्ध असल्यामुळे कबड्डी खो-खो हॉलीबॉल असे मोठे खेळ मुले खेळतात.

शैक्षणिक गुणवत्ता विषयक इंग्रजी उपक्रम -

अहमदनगर जिल्ह्याने राबवत असलेला इंग्रजी उपक्रम We Learn English आमच्या शाळेत सुरु आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी वाचण्यात सुधारणा झाली.

माझे हस्ताक्षर -

जसा वहीचा आरसा सुंदर हस्ताक्षर असतो त्याप्रमाणे वही असावी यासाठी आमच्या शाळेमध्ये सुंदर हस्ताक्षर हा उपक्रम राबवला जातो. यामध्ये विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे रोजच्या रोज शुद्धलेखन लिहिल्यामुळे, लिहिण्यामध्ये होणाऱ्या चुका समजतात. त्याच बरोबर विद्यार्थ्यांचे श्रुतलेखन हा उपक्रम घेतल्यावर विद्यार्थ्यांना ऐकून लिहिण्याची सवय लागली आहे व छोट्या छोट्या चुका दुरुस्त होत आहेत.

आजी आजोबा कृतज्ञता दिन -

आमच्या शाळेत एक अनोखा उपक्रम राबवण्यात आला . त्यामध्ये आजी आजोबा यांना नातवांच्या शाळेत बोलवण्यात आले. यामध्ये आजोबांनी त्यांच्या जीवनातील कथा सांगितल्या, शाळेतील गमती जमती सांगितल्या आपल्या नातवासोबत विविध खेळात सहभागी झाले, आजी-आजोबांचा तो आनंद वेगळाच होता,अशाप्रकारे आजी-आजोबांचा कृतज्ञता व्यक्त करणारा दिन आमच्या शाळेत राबवला गेला.

कला दालन -

आमच्या शाळेत माईक, लाऊड स्पीकर, तबला, ढोल, संगीत पेटी, झांजर असे अनेक साहित्य आहे. या साहित्याचा वापर करून अनेक गीते बसवली जातात स्पर्धेमध्ये गायन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना हे शिकण्यास आनंद मिळतो. आठवड्यातून एक दिवस गावातील श्री एकनाथ देवराम पोटे हे विद्यार्थ्यांना चित्रकला मोफत शिकवतात त्यामुळे विद्यार्थी आकर्षक चित्रे काढू लागली आहेत. विद्यार्थ्यांना चित्र काढायला. व रंगवायला खूप आवडते. रेषांच्या मदतीने चित्र काढण्यात विद्यार्थी हरवून जातात विद्यार्थी वेशभूषा स्पर्धेत सहभागी होऊन आपली कला सादर करतात. कागदापासून विद्यार्थी आकाश कंदील

दिवाळीच्या आधी शाळेत बनवतात आणि तेच आकाश कंदील आपल्या घरावर लावतात. तसेच रक्षाबंधन सणाच्या अगोदर राखी बनवण्याचा उपक्रम शाळेमध्ये राबवला जातो त्यामुळे कार्यानुभव मधील विविध क्षेत्र अनुभवले जाते.


समारोप -

आमच्या शाळेमध्ये अनेक उपक्रम सर्व शिक्षक सर्व वर्गांमध्ये राबवतात. आमच्या गावातील ग्रामपंचायत व लोकसहभाग या माध्यमातून शाळेला विविध प्रकारचे सहभाग देऊन शाळेस मोठ्या प्रमाणात मदत केली आहे.

त्यामुळे शेवटी एक वाक्य म्हणावेसे वाटते आणि आमचे विद्यार्थी म्हणतात..

शाळेची मजा घरी येत नाही...

सुट्टीच्या दिवशी घरी करमत नाही...



लोकसहभागातून शाळा विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, मलकापूर, केंद्र- बदनापूर पं. स.,चिखलदरा जि.अमरावती

मुख्याध्यापकाचे नाव - श्री किरण विष्णु आडे

प्रास्ताविक –

सातपुड्यातील पायथ्याशी वसलेल्या मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील मलकापूर हे गाव आहे या गावात जिल्हा परिषद शाळेत १०० % कोरकू भाषेतील विद्यार्थी आहेत . या गावातील लोक मजूर वर्ग आहे. येथील गावातील गावकरी वीट भट्टीवर बाहेर गावी कामाला जातात. आपल्या मुलांना आपल्या आजी- आजोबा कडे, काही आपल्या नातेवाईकाकडे ठेवतात. मी २०१८ मे मध्ये रुजू या शाळेत झालो. कु पायल हिंगमिरे या २०१७ मध्ये रुजू झाल्या आम्ही दोघंही येथे नवीन होतो.

पटनोंदणी व नियमित उपस्थिती –

जिल्हा परिषद शाळा मलकापूर येथे दरवर्षी पटनोंदणी १००% केली जाते गाव सर्वेक्षण करुन गावातील दाखल पात्र विद्यार्थी यांची यादी बनवून सर्व दाखल पात्र विद्यार्थी वर्ग १ली मध्ये दाखल केले जातात या प्रमाणे १००% पटनोंदणी केली जाते.

स्वच्छ व सुंदर शाळा –

स्वच्छता हा मानवी जीवनातील सर्वात मोठा गुण आहे. विद्यार्थ्याचे वैयक्तिक स्वच्छता, पाण्याची स्वच्छता, स्वच्छतागृह व शौचालय स्वच्छता, शालेय इमारत स्वच्छता व परिसर स्वच्छता हे निकष आम्ही डोळ्यासमोर ठेवले. तसेच स्वच्छता ही सांगून होत नाही ती करावी लागते, तेव्हा आम्ही सर्व सामुहिक स्वच्छता करतो. शाळेच्या आवारातील कुठेही कागद किंवा झाडाचे पान जरी पडलेले दिसले तरी आम्ही सर्वच व आमचे विद्यार्थी कचरा उचलून कचरापेटीत टाकतात.

शाळेतील शालेय पोषण आहार शिजविणारे व स्वयंपाकी व मदतनीस यांचा स्वच्छतेत महत्वाचा हातभार आहे. आमची शालेय इमारत अतिशय सुंदर आहे. शालेय परिसरात फुलांची व मेहंदीची झाडे लावली आहे. आमच्या शाळेला स्वच्छ विद्यालय जिल्हा पुरस्कार मिळाला. आमची शाळा स्वच्छ विद्यालय मध्ये ***** म्हणून निवड झाली.






मलकापूर हे गाव चिखलदरा तालुक्यातील अवघ्या सातशे लोकवस्तीचे गाव. बहुतांश गावकरी हे आदिवासी कोरकू अल्पभूधारक मजुरी करणारे . या गावात शिक्षणाची ओढ निर्माण करणे हे तर थोडे कठीणच काम .या ठिकाणी इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे. या शाळेत मी २०१८ मध्ये रुजू झालो. याच शाळेत कु पायल हिंगमिरे या शिक्षिका आंतरजिल्हा बदलीने ऑक्टोबर २०१७ ला रुजू झाल्या. शाळेला दोन वर्ग खोल्या होत्या. पण त्या गळत होत्या शाळेच्या मागे मोकळी जागा होती. पण त्या जागेचा काहीच उपयोग नव्हता. या जागेवर खुरटी काटेरी झाडे वाट रोखून उभी होती. शाळेत पिण्याच्या पाण्याची कायम स्वरूपी व्यवस्था नव्हती.पाण्याची टाकी होती ती देखील नादुरुस्त होती. पाण्याच्या टाकीला जलवाहिनी जोडलेली नव्हती. पिण्याच्या पाण्यासाठी एका ड्रमचा वापर करावा लागत होता. मलकापूरची शाळा १९६६ मध्ये बांधण्यात आली होती. त्यावेळी बांधण्यात आलेली एक वर्ग खोली मोडकळीस आल्याने निर्लेखन करण्यात आली होती. मुलांना शिकवायचे कुठे हा प्रश्नच होता. गेल्या अनेक वर्षापासून मेळघाटातच आहे या आधी चिखलदरा तालुक्यातील रामटेक गावात जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकवायचो त्या ठिकाणी सुधारणा करता आल्या. त्याचा अनुभव गाठीशी होता. पण मलकापूरच्या शाळेचे आव्हान त्याहून मोठे होते. शाळेत सुधारणा करण्याची त्यांची तळमळ मला जाणवली. पायल हिंगमिरे यांच्या सहकार्याने मी शाळेच्या कायापालट घडवून आणण्यासाठी प्रयत्न सुरु केले. त्यासाठी काही तातडीच्या उपाययोजना करणे गरजेचे होतेच पण दीर्घकालीन नियोजनाची आवश्यकता होती.समोर अडचणीचे डोंगर उभे होते. शाळेच्या पाठीमागे सुमारे १५ हजार चौरस फुट जागा ही विना वापर तशीच पडून होती.या जागेवर झाडे झुडपे अस्ताव्यस्त वाढली होती. ही मोकळी जागा ही जागा शाळेच्या मालकीची आहे. ही जागा स्वच्छ करून विद्यार्थ्यांसाठी मैदान तयार करण्याचे आम्ही ठरवले. पण हे काम सोपे नव्हते. मैदानाचे सौदर्यीकरण करण्याआधी सपाटीकरण आवश्यक होते. जेसीबी वापरण्याशिवाय पर्याय नव्हता. जेसीबी वापरण्यासाठी ७ हजार रुपये खर्च येणार होता स्वसहभागातून हा खर्च आम्ही केला १५ हजार चौरस फुट जागेवर शाळकरी मुलासाठी मैदान उपलब्ध झाले. पुढचे काम हे सौदर्यीकरणाचे होते .त्यासाठी आम्ही हळूहळू काम सुरु केले. दरम्यान एम्पथी फाउंडेशन ही स्वयंसेवी संस्था माहिती होती. एम्पथी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. आर. सुंदरश्वन यांचा

कल्पकतेतून तसेंच दिवंगत शांतीलाल छेडा यांच्या पुढाकारातून अनेक शाळांच्या इमारती बांधल्या गेल्या याची माहिती मला माहित होती. मी एम्पथी फाउंडेशनच्या पदाधिकारी यांचेसोबत संपर्क साधला. मलकापूरच्या शाळेतील एका खोलीचे निर्लेखन करून खोली बांधकामाचा प्रस्ताव पाठवला. संस्थेचे पदाधिकारी शाळेचे सर्व्हेक्षण करण्यासाठी आले तेव्हा एक मोठी अडचण समोर आली. शाळेच्या खुल्या जागेमध्ये दोन विद्युत खांब होते त्यांपैकी एका पोलची अडचण निर्माण झाली.विद्युत खांब असल्याने बांधकाम करता येणार नाही असे त्यानी सांगितले. विद्युत खांब हटविणे आवश्यक होते.आम्ही महावितरणकडे अर्ज सादर केला. त्यांच्याकडून उत्तर आले पण ते निराश करणारे होते.सध्या आर्थिक तरतूद नसल्याने खांब हटवता येणार नाही.या कामासाठी दोन वर्ष लागू शकतात असे आम्हाला सांगण्यात आले पण इतके दिवस वाट पाहणे शक्य नव्हते. काहीतरी मार्ग काढणे आवश्यक होते. पुन्हा चौकशी केली तुमची खर्च करण्याची तयारी असेल तर, आम्ही कंत्राटदार पुरवतो, असे महावितरणच्या कार्यालयाकडून सांगण्यात आले, मार्ग सापडला होता .त्यासाठी दहा हजार रुपये खर्च येणार होता. मी व हिंगमिरे मॅंडम आम्ही खर्च करण्याची तयारी दर्शवली आणि विद्युत खांब हटविले. शाळेमध्ये वीज पुरवठा उपलब्ध करून घेण्यासाठी तीन हजार पाचशे रुपये खर्च आला. त्यासाठी आम्हाला लोक वर्गणी करावी लागली. नंतर एम्पथी फाउंडेशनकडे प्रस्ताव पाठविला. तो मंजूर झाला जानेवारी २०१९ मध्ये शाळा इमारतीच्या बांधकामाला सुरुवात झाली आणि नोव्हेंबर २०१९ मध्ये उद्घाटनाचा दिवस उजाडला.२८ नोव्हेंबर २०१९ रोजी तत्कालीन गटविकास अधिकारी विकास मीना (भा.प्र.से.) यांच्या हस्ते शाळेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन पार पडले. प्रमुख पाहुणे म्हणून दिनेश झोरे, आकाश रेवस्कर, गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे, विस्तार अधिकारी गंगाधर मोहने अधिक्षक अश्विन मानकर, मोतीलाल दहीकर केंद्र प्रमुख अनिल धांडेकर आदी मान्यवर या कार्यक्रमाला आवर्जून हजर होते. शाळा इमारतीसाठी एम्पथी फाउंडेशन २६ लाख रुपये खर्च केला ,तीन लाख रुपये स्वच्छतागृह उभारण्यासाठी खर्च करण्यात आले.



शाळेसाठी एक मोठी पायाभूत सुविधा उपलब्ध झाली,पण आव्हाने संपलेली नव्हती. शालेय पोषण आहारासाठी शाळेत पुरेशा प्रमाणात भांडी आणि इतर साहित्य नव्हते. शासनाकडून पोषण आहार शिजण्यासाठी गॅस सिलेंडर उपलब्ध करून देण्यात आले. पण शेगडी नव्हती. पुन्हा लोकवर्गणी केली. काही स्वनिधी दिला. शालेय पोषण आहाराचा प्रश्न सुटला. शाळेत पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था नव्हती. पाण्याची टाकी दुरुस्त करणे आवश्यक होते. त्यासाठी आम्ही वॉटर फॉर पिपल या संस्थेशी संपर्क साधला. या संस्थेकडे प्रस्ताव पाठविला तो मंजूर झाल्याने आठ दिवस पुरेल एवढी क्षमता असलेली पाण्याची टाकी दुरुस्त करून मिळाली. विद्यार्थी संख्येनुसार नळांना तोट्या बसवण्यात आल्या. पुर्णवेळ पाणीपुरवठा उपलब्ध होण्यासाठी मुख्य जलवाहिनीशी जोडणी करण्यात आली. हा सर्व खर्च संस्थेने केला. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा पश्न मिटला.पण या घडामोडीच्या मध्येच करोना संकटाचा काळ आम्ही अनुभवला. या कालावधीत शाळा बंद होत्या आम्हाला पूर्णवेळ उपस्थित राहणे शक्य नव्हते. शाळेच्या सौदर्यीकरणाचे काम थांबले होते. तरीही वेळ मिळेल तसा आवारात औषधी गुणधर्म असलेले वृक्ष, शोभिवंत झाडाची लागवड आणि संगोपन करत होतो शाळा परिसर मेहंदी, तुळशी , गुलाब कन्हेर, जास्वंदाची झाडे लावण्यात आली. आता एक सुंदर शाळा तयार झाली आहे .तसेच वॉटर फॉर पिपल या संस्थेशी पुन्हा संपर्क साधला व त्याकडून शाळेला रेन हारवेस्टिंग करून मिळाले. आम्ही मध्यंतरी आयएसओ शाळेविषयी माहिती मिळवली अचलपूर तालुक्यातील मल्हारा येथे अशी एक शाळा असल्याचे आम्हाला समजले आम्ही या शाळेला भेट दिली आयएसओ मानांकनासाठी एकूण ८५ निकषांची यादी पाहिली. त्यातील जवळपास ७५ निकषांची पूर्तता आमची शाळा करीत होती. पण मुख्य अडचण होती ती मानांकनासाठी लागणा-या शुल्काची, तब्बल १५ हजार रुपये शुल्क भरावे लागणार होते आमची त्यासाठी तयारी होत नव्हती. पण सहा. शिक्षिका पायल हिंगमिरे यांचे पती शाळेची परिस्थीती जाणून होते. त्यांना आयएसओ मानांकन प्रक्रीयेचा अनुभव देखिल होता त्यांनी १५ हजार रुपयांची भरघोस मदत जाहीर केली. पालकापर्यंत याची माहिती पोहोचताच त्यांनीही मदतीची तयारी दर्शवली ग्रामपंचायत व लोकवर्गणीतून राहिलेले निकषांची पूर्तता करण्यात आले. स्वातंत्र्यदिनी पूर्वसंध्येला मलकापूरच्या शाळेला आयएसओ मानांकन मिळाल्याचा संदेश प्राप्त झाला. हा आमच्यासाठी आनंदाचा क्षण होता. आयएसओ मानांकन मिळणारी मेळघाटातील पहिली शाळा असा बहुमान आम्हाला प्राप्त झाला. मी चिखली येथे शिक्षक म्हणून सेवेला सुरुवात केली होत. नंतर मेळघाटातच रामटेक येथे स्थानांतर झाले. माझ्या प्रयत्नातून तेथील शाळा प्रगत करू शकलो. मला त्यावेळी २०१६ - २०१७ या वर्षीचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. मलकापूरच्या शाळेत कार्यरत असतांना २०१८- २०१९ या वर्षीचा राज्य आदर्श पुरस्कार मला प्राप्त झाला.२०२१ मध्ये मलकापूरच्या शाळेला स्वच्छ विद्यालय पुरस्कार मिळाला. हे सर्व काही पालक, गावकरी यांच्या प्रोत्साहनामुळे शक्य झाले.मला पायल हिंगमिरे यांचे सातत्याने बहुमोल सहकार्य मिळत आले. त्या दरवर्षी मुलांना लेखन साहित्य, स्वेटर आणि इतर शालोयपयोगी वस्तू भेट देत असतात. शिक्षकांची विद्यार्थ्याप्रती असलेली तळमळ पाहून मजुरीचे काम करणारे कोरकू बांधवानी लोकवर्गणी गोळा केली. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सरिता दहीकर यांचे पती हे ग्रामपंचायत सदस्य त्यांनी शाळेला टेबल,खुर्ची आणि इतर साहित्य ग्रामपंचायतीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले. तालुकास्तरीय अधिका-याचे मार्गदर्शनातून आम्ही आयएसओ चे उदिष्ट देखील पुर्ण केले. भौतिक सुविधेसह गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देत विविध उपक्रम राबविले. विविधांगी परिपाठ भाषा व गणित पेटीचा सुयोग्य वापर, नियमित मराठी भाषेचा वापर यामुळे विद्यार्थी प्रगतीपथावर आहेत. अनेक शिक्षक शाळेला भेट देतात. शाबासकी मिळत आहे ही आमच्यासाठी समाधानाची बाब आहे.गरीब विद्यार्थ्याच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडावा, हेच आमचे ध्येय आहे.







समारोप –

जि.प.प्रा.मराठी शाळा, मलकापूर कडून आम्हाला सहकार्य करणारे अधिकारी, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य तसेच गावकरी मंडळी या सर्वांचे मनापासून धन्यवाद व आभार.

सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,दाभा, पं. स नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

मुख्याध्यापकाचे नाव- सौ. अरुणा संतोष घुगे

प्रस्तावना -

अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील दाभा हे गाव शहरापासून अवघ्या 3 किलोमीटर अंतरावर आहे.त्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळांसोबत स्पर्धा तर आहेच, मात्र माझ्या भारताचे हे बाल सैनिक, उद्याचे उज्ज्वल भविष्य घडविणारे, माझ्या भारताला प्रगती पथावर नेणारे सक्षम भारताचे हे 'भारतपुत्र' कसे असायला हवे, जेणेकरून माझा भारत देश लख्ख उजळून निघेल. असे स्वप्न आम्ही उघड्या डोळ्यांनी पहायला शिकलो; किंबहुना लोकांचे राष्ट्रपती म्हणून ख्याती पावलेले आदरणीय ए.पी जे अब्दुल कलाम यांनी ते आम्हाला शिकवलं.NEF 2005 व SCF 2010 यामध्ये प्रगत व उज्ज्वल भविष्याचा वेध घेत असताना ज्ञानावर आधारित व उच्च दर्जाचे, कौशल्य धारण केलेले मनुष्यबळ निर्मितीचे माध्यम म्हणून शिक्षण व्यवस्थेकडे बघितले आहे.विविध प्रशिक्षण व कार्यशाळेच्या माध्यमातून शिक्षण यंत्रणेची निष्ठा तपासत अनेक अपेक्षा जोपासल्या गेल्या आहेत.त्या प्रत्यक्षात उतरवताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व पाठ्यक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्याचे आव्हान रुपी शिव धनुष्य पेलताना शिक्षकांना प्रयत्नांची पराकाष्टा करण्याची जाणीव होत असते. म्हणूनच प्राथमिक शिक्षक देशाप्रती आमचे कर्तव्य पूर्ण करताना आम्ही देशाच्या मूलभूत जडण घडणी साठी आवश्यक असणारे कौशल्याधिष्ठित मनुष्यबळ निर्मिती हा हेतू ठेवून विविध उपक्रमाची रचना व त्यांची अंमलबजावणी करण्याचा भरपूर प्रयत्न आम्ही या ठिकाणी केलेला आहे.



शिक्षक व मुख्याध्यापक यांना आलेल्या अडचणी -

1) पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असलेला कल

2) भौतिक सुविधांचा अभाव

3) कोरोना काळानंतर अध्ययन प्रक्रियेत आलेला दुरावा

4) विद्यार्थ्यांचे अधून मधून वाढते गैर हजेरीचे प्रमाण

5) दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट करताना येणाऱ्या अडचणी

6) विद्यार्थ्यांमध्ये संस्कार व शिस्तबद्धतेची कमतरता

7) विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक अजाणतेपणा व अज्ञान

8) विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव

9) अन्नातील पोषक तत्वांबद्दल माहिती व जाणीव जागृतीचा अभाव

10) इतिहास भूगोल सारख्या विषयांप्रती अनास्था

उद्दिष्टे -

1) 100% पटनोंदणी करणे

2) शाळेची पटसंख्या टिकवून ठेवणे

3) विद्यार्थ्यांचे उपस्थितीचे प्रमाण वाढविणे

4) गुणवत्ता पूर्ण व कौशल्याधिष्ठित शिक्षण देणे

5) विदयार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव देणे

6) विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार व जीवनमूल्ये रुजवणे

7) विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, पर्यावरण विषयी जाणीव जागृती, वैज्ञानिक दृष्टिकोन व गणितीय दृष्टिकोन रुजविणे

8) इतिहासाचा आदर करणे व ऐतिहासिक वारसाचे जतन करणे


9) सांस्कृतिक जडणघडण जोपासणे

10) विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व भविष्यातही आव्हांनासाठी प्रेरित करणे

11) कर्तृत्ववान व थोरा मोठ्यांबद्दल आदर बाळगणे

12) विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्याचा विकास करणे

13) व्यावसायिक शिक्षणावर भर देणे



14) कोरोना काळातील मोबाईल च्या अती वापरामुळे विद्यार्थी आक्रमक ,भावनाशून्य मानसिक दृष्ट्या दुर्बल अशा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे

15) मानसिक,बौद्धिक ,सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक व नैतिक या सर्व दृष्टीने सक्षम नागरिक घडविणे.

शाळेने राबविलेले सहशालेय उपक्रम -

1) पटनोंदणी - वाडी -वस्तीवर आपला पाल्य शाळेत जाण्यायोग्य झाला याचे भान पालकांना नसते. तसेच, शाळेची पटसंख्या वाढावी यासाठी शाळेचे फ्लेक्स व पॉम्पलेट तयार केले. पॉम्पलेटवरती विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा नमूद करण्यात आल्या. रॅली काढून जनजागृती केली. गृहभेटी दिल्या. वाडी वस्तीवरील इतर राज्यातून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांची 100%पटनोंदणी करण्यात आली.

2) रोजचा उपक्रम -

अ) संगीतमय परिपाठ -

1) जो दिनांक तो पाढा.

2) माईकवर व करावकेवर प्रार्थना व स्फूर्तीगीत सराव.

3) हावभावयुक्त आरोह व अवरोहसह बोधयुक्त कथाकथन.

4) विद्यार्थी कथा सांगणाऱ्याला कथेवर प्रश्न विचारतात.परिणामी - विद्यार्थी कथा मन लावून ऐकतात.

5) सामान्य ज्ञानावर आधारित माहिती /प्रश्न

6) इंग्रजीचे शब्द व त्यावर आधारित वाक्य सराव.

ब) उपस्थिती ध्वज प्रदान - ज्या वर्गाची उपस्थिती जास्त त्या वर्गाला व वर्गशिक्षकाला ध्वज घेण्याचा मान नक्की.

क) आजचे सामान्यज्ञान - रोज दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत फळ्यावर सामान्य ज्ञानाचे पाच प्रश्न लिहिले जातात. ते विद्यार्थी वहीत लिहितात. ते प्रश्न 100 ते 200झाले की, त्यावर सामान्य ज्ञान स्पर्धा घेतली जाते व बक्षीसही वितरित होते.

3) राष्ट्रीय गणित दिन –


1) 22 डिसेंबर या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये दैनंदिन व्यवहारातून गणिताचा संबोध स्पष्ट होण्यासाठी प्रदर्शन व प्रश्नमंजुषा घेण्यात येते.

2) क्लूप्यांचा उलगडा होईल अशा गणिताचे प्रात्यक्षिक

3) गणितीय खेळ घेतले जातात. श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनकार्याचा परिचय.

4) गणितीय रांगोळी व विविध आकाराच्या वस्तूची सजावट.

5) वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासणे



अ) राष्ट्रीय विज्ञान दिन

1) विज्ञान प्रतिकृती प्रदर्शनी.

2) विज्ञान प्रयोग सादरीकरण करणे.

3) वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासणारी रांगोळी.

4) श्री.चंद्रशेखर व्यंकटरमण यांच्या जीवन कार्याचा परिचय.

6) प्रश्नमंजुषा

ब) ग्रहण हा संबोध – 28 ऑक्टोबरला चंद्रग्रहणाचे औचित्य साधून आकृती व प्रात्याक्षिका द्वारे मार्गदर्शन.

क) English words Competition - दररोज इंग्रजी शब्द पाठ करण्यास प्रवृत्त करणे. व महिन्यातून एकदा पाठ केलेल्या शब्दांवर स्पर्धा घेणे.

ड) मूल्यसंवर्धनात्मक उपक्रम -

1) आजी आजोबा दिवस साजरा करणे - यातून कुटुंब संस्थेबद्दल प्रेम, मोठ्यांचा आदर, जिव्हाळा, या सर्व गोष्टी वृद्धिंगत होतात.

2) घरादाराची साफसफाई, आईला कामात हातभार व तोरण लावणे यातून विद्यार्थ्यांना जबाबदारीची जाणीव होते.


3) जयंती व पुण्यतिथी साजरी करणे - यातून देशाला सर्वच क्षेत्रात प्रगती पथावर नेणाऱ्या प्रत्येक थोरांच्या कार्याची ओळख, तशीच वेशभूषा करून देशाविषयी अभिमान बाळगणे, देशभक्तीची भावना रुजविणे या गोष्टी साध्य होतात.

4) स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव - या कार्यक्रमांतर्गत रॅली काढून गावातून फिरून जल्लोष साजरा करण्यात आला. रॅली मध्ये लेझीम पथक, घोड्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांची स्वारी, आगमन ,फुगडी पथक , बँड पथक तसेच राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी विविध जाती धर्मांची वेशभूषा करण्यात आली. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याकरिता विद्यार्थ्यांचा 75 हा अंक कवायतीच्या माध्यमातून दृश्य स्वरूपात आकर्षक अशी आकृती तयार करण्यात आली.

4) सांस्कृतिक परंपरांचे जतन -

अ) पारंपरिक व सांस्कृतिक खाद्य संस्कृती

1) विद्यार्थ्यांना तृणधान्य व कडधान्याची प्रयोगनिशी माहिती दिली
2) काय खावे व काय खाऊ नये या विषयी माहिती
3) तृणधान्य व कडधान्याचे आपल्या जीवनात महत्व यावर आधारित Role play
4) तृणधान्य व कडधान्य पासून उत्तम पदार्थ कसा बनावावा याचे भारुडातून सादरीकरण तसेच पिज्जा, बर्गर चे दुष्परिणाम
5) पाक कृती प्रदर्शन



ब) बाल आनंद मेळावा - विविध पोषक तत्वे असलेल्या खाद्य प्रकारचे स्टॉल लावतात व विद्यार्थ्यांना खरी कमाई, स्व कमाई, व नफातोटा याची ओळख होते.हिशोब समजतो ,महत्वाचे पालक संपर्क वाढतो.

क) सांस्कृतिक कार्यक्रम - दरवर्षी 26 जानेवारी ला भारत देशातील पारंपरिक व थोर व्यक्तींवर आधारित नृत्य प्रकारचे सादरीकरण केले जाते. किमान 4 राज्यांच्या खाद्य प्रकारांची व नृत्य प्रकारांची माहिती या वेळी विद्यार्थ्यांना दिली जाते. तसेच यात नाट्यीकरणाचा देखील समावेश असतो.

5) ऐतिहासिक वारसांचे जतन -

गडकिल्यांची प्रतिकृती स्पर्धा - या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी किल्ल्यांचा स्वतः अभ्यास केला तसेच आपल्या इतिहासातल्या कथा अभ्यासल्या. इतिहासाविषयी आवड निर्माण झाली. हुबेहूब किल्ला रेखाटण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला. त्या निमित्ताने गनिमी काव्याचा अभ्यास विद्यार्थ्यांना झाला. किल्ले पाहण्यासाठी घरोघरी भेटी झाल्या परिणामी पालक संपर्क होऊन विद्यार्थी विकासावर चर्चा झाली. या साठी विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण सोबतच प्रमाणपत्र सुद्धा देण्यात आले व हा उपक्रम खूप आवडल्याने काही बक्षिस विद्यार्थ्यांसाठी रसिक प्रेक्षकांनी सुद्धा दिले.

6) उन्हाळी छंद शिबीर –

अ) सीड्स बॉल (Seed Ball) - निर्मिती व त्याचे जतन सर्व विद्यार्थ्यांकडून गाळाची माती आणली त्यामध्ये शेणखत, गांडूळ खात व BAC पावडर घालून सर्व माती एकत्र करून मुलांना वाटप केली.त्यांनतर विद्यार्थ्यांनी ती घट्ट भिजवून त्यात कडू निंब, आंबा, सीताफळ, चिंच, बोर, पेरू, निलगिरी, कडू बदाम, रामफळ, पपई, हेटा, साग, टरबूज, बकानी, बाभूळ, भिंगरी, चिकू यातील कोणतेही बी त्यात टाकून त्याचा गोळा बनविला. ते सर्व सीड्स बॉल आम्ही वाळवून पावसाळ्या पर्यंत सांभाळून ठेवले. त्यांनतर पावसाळा सुरु झाल्या बरोबर शिक्षण परिषदेमध्ये सर्व शिक्षकांना, शाळेतील विद्यार्थ्यांना, गावकाऱ्यांना देऊन ठराविक जागांवर, जंगलात, शेताच्या बांधावर, नदीकाठी, रस्त्याच्या कडेला, शेतातल्या विहिरी जवळ टाकून त्याची शक्य होईल तिथे जाऊन त्याचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करत आहेत.

ब) कागदकाम व वस्तूप्रदर्शनी - कागदाच्या, तावा च्या तसेच पुठ्ठया पासून विविध प्रकारची फुले,पक्षी, टोप्या, जहाजांचे प्रकार तयार करून त्याचा सराव विद्यार्थ्यांना दिला.व त्याची प्रदर्शनी भरविण्यात आली.

क) नृत्य व नाट्य संकल्पना - नृत्य व नाट्य विविध प्रकारांचे ओळख व त्या प्रकाराचा सराव विद्यार्थ्यांनी केला.नाट्य संदर्भतील छोटेप्रयोग, पडद्यामागचा आवाज, या सर्वांची माहिती देऊन विद्यार्थ्यांनी उत्तम सादरीकरण केले.

ड) राखी निर्मिती व घोषवाक्य स्पर्धा - या उपक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांनी सुंदर अशा राख्या बनविल्या व त्या सोबत निसर्गावर, कुटुंबावर व वृक्ष संवर्धनावर सुंदर व कौतुकास्पद असे घोषवाक्य तयार केले.या स्पर्धेलाही बक्षिस व शिल्ड देण्यात आले.

7) सहल व क्षेत्रभेट - 28 फेब्रुवारी ला म्हणजेच विज्ञान दिनाच्या दिवशी आमची सहल 'रमण विज्ञान केंद्र' नागपूर विमानतळ व महाराजा बाग येथे गेली होती.या सहलीतून विविध प्रकारचे प्रयोग व प्रतिकृती पाहिल्या तसेच संपूर्ण आकाश दर्शन व विविध ग्रहांची माहिती प्रत्यक्ष ग्रहदर्शन या सर्व गोष्टींची शैक्षणिक

माहिती विद्यार्थ्यांनी घेतली तसेच विमानतळावर विमान व वैमानिक यांची माहिती घेऊन जवळून विमान विद्यार्थ्यांना पाहता आले. महाराज बागेत सर्व प्रकारचे प्राणी व पक्षी पहायला मिळाले.

क्षेत्रभेट - दाभा गावाच्या परिसर मधील कारखान्यांना भेटी, सूत गिरणी, तेल फॅक्टरी, दाल मिल, पोस्ट ऑफिस, ग्रामपंचायत या सर्व ठिकाणांना भेटी देऊन त्यांची मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली.

8) दिवाळी उपक्रम - या उपक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांनी सुंदर असे आकाश कंदील, दिवे व भेटकार्ड तयार केले.काही आकाशकंदील व दिवे विक्रीलाही उपलब्ध करून दिले.त्यामुळे गावकऱ्यांची देखील या उपक्रम साठी गर्दी जमली होती. यामुळे विद्यार्थ्यांना खरी कमाई प्राप्त झाली स्व अनुभवातून सुप्त गुणांना वाव मिळाला.व पालकांनीही भरभरून विद्यार्थ्यांची कौतुक केले.

9) Best Student of the Year - या उपक्रमाअंतर्गत संपूर्ण वर्षात वर्ग 7 वी च्या विद्यार्थ्यांचे वर्तन गुणवत्ता व सर्व उपक्रमातील सहभाग त्या विद्यार्थ्यांची भावनिक, बौद्धिक व शारीरिक क्षमता याचे निरीक्षण करून उत्कृष्ट विद्यार्थ्यांची निवड केल्या जाते या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये होणारे बदल

1) उत्कृष्ट व गुणवान विद्यार्थी बनण्यासाठी कसोशीने प्रयत्न करतात

2) चांगल्या सवयी विद्यार्थ्यांना जडतात

3) उत्कृष्ट व्यक्तिमत्व बनण्यासाठी विद्यार्थी प्रयत्नशील असतात

पुरस्कार प्राप्त विद्यार्थी (वर्ग -7 वा) चि.साहिल विजय महेंद्र

अशा प्रकारे विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थी गुणवत्ता विकास करण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत.यातून बऱ्याच विद्यार्थ्यांना आम्ही शालेय वातावरणात परत आणलं, काहींना वाईट सवयी पासून दूर केले.तर आज आम्ही यशस्वीतेच्या मार्गी आहोत.पालकांचे शाळेविषयीचे मत अतिशय चांगले आहेत.आज शाळेच्या किंवा विद्यार्थ्यांच्या किणत्याही विकासासाठी आमचे गावकरी आम्हाला मदत करतात.

10) दाभा शाळेचे यश -

1) शाहू महाराज निबंध स्पर्धेत तालुक्यातून निवड

अ) सृष्टी सुनील तंबाखे

ब) श्रुती योगेश गेडाम

2) खादी महत्व वक्तृत्व स्पर्धा

अ) राधिका गणेश वंजारी

3) नवोदय परीक्षेत उत्तीर्ण होऊन नवोदय विद्यालयामध्ये प्रवेशित

अ) श्रावणी नरेंद्र धुर्वे

4) शालेय क्रीडा महोत्सवात निदर्शन मध्ये जिल्हा स्तरावर निवड



5) शिष्यवृत्ती परीक्षेत निवड

सन २०२०-२१ -

अ) सार्थक अस्वलकर ब) वैशाली धामळे

क) भाग्यश्री कोटांगळे ड) कारण तायडे ई) साहिल महेंद्र

सन 2021-22 -

अ) श्रावणी गेडाम ब) लावण्या वाठ क) कार्तिक लडके ड) ईश्वरी अढाऊ ई) अनुकल्प इंदूरकर

6) सर्वात मोठे यश म्हणजे सन 2022-23 मध्ये चालू शैक्षणिक वर्षात पटनोंदणी हि मार्च -एप्रिल मध्येच झाली त्यासाठी पालकांना मार्गदर्शन किंवा आमच्या शाळेत प्रवेश घ्या असे सांगावे लागले नाही.

7) आंतरराष्ट्रीय तृणधान्य स्पर्धेत प्रथम क्रमांक - शिक्षण विभाग आयोजीत उपक्रमात दाभा शाळेतील पालकांचा सक्रिय सहभाग व आंतरराष्ट्रीय तृणधान्य स्पर्धेत प्रथम क्रमांक

8) परसबाग स्पर्धेत तालुकास्तरावर प्रोत्साहन पर बक्षिस प्राप्त

9) तालुक्यातून मराठी माध्यमाची प्रथम क्रमांकाची सर्वाधिक पटसंख्या असणारी शाळा

10) केंद्र शासन पुरस्कृत PM Shree योजनेत नांदगाव खंडेश्वर तालुक्यातून दाभा शाळेची निवड

11) अध्ययन स्तरानुसार इंद्र धनुष्य शाळा म्हणून तालुका स्तरावर दुसरा क्रमांक प्राप्त

Youtube Links -

https://youtu.be/nI8mCvQ35AE?si=4xibhZkVgV4eKXch

https://youtu.be/K44AwbWabb8?si=LgJNbwxBrx1_TC8v

https://youtu.be/bM3jCivgF9k?si=wSeNpJ3vVnITB4S4


https://youtu.be/f6TsChqWpLI?si=zcAcbF11Q6RM3vty

https://youtu.be/lYs7RZHW9V0?si=0broFOKxxn8-5Au4

https://youtu.be/xicBzY89Fh8?si=A-wRqqGu20CIDt_L

https://youtu.be/eXLI4NXz98s?si=u-mpcH0gc0wShIHi

https://youtu.be/4MgmgBkQKII?si=xamjIm4UmrhUxqTF








REDMI NOTE 8 PRO
निखिल सवाई
21/04/2023 08:30






ज्य भाकरी पराठे व पोळी
रोलकढी
कंगणीचा उपमा
कंगणी Foxtail Millet
गहू Wheat
मका Maize
नाचणी Finger Millet
ज्वारी Jowar
कुटकी Little Millet
बाजरी Bajara
कोदो Codo Millet
वरईचे तांदूळ
वेना Proso Millet


REDMI NOTE 8 PRO
निखिल सवाई
09/12/2023 08:41

पटनोंदणी व नियमित उपस्थिती

शाळेचे नाव - जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा,खोलापूर मुले, पं.स. भातकुली, जि.अमरावती.

मुख्याध्यापकाचे नाव - श्रीम.सुरेखा माणिकराव मुळे.

शिक्षकाचे नाव – श्री.लखनसिंग देवीसिंग जाधव (उपशिक्षक)


प्रास्ताविक -

जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा खोलापूर हे भातकुली पंस समिती अंतर्गत दर्यापूर रोड वर असलेले तालुक्यातील सर्वात मोठे गाव. गावात सर्वात जास्त मुस्लिम बहुल वस्ती असलेले गाव. गावात एकूण लोकसंख्या 24000 हजाराच्या जवळपास. गावात एकूण सात शाळा. त्यातील दोन उर्दू शाळा, एक खाजगी , अजगर हुसेन पाच ते बारावी पर्यन्त असलेली शाळा, एक मराठी उच्च माध्यमिक शाळा गाडगेबाबा हायस्कूल,पाचवी ते बारावी टापर हायस्कूल व दोन मराठी शाळा.त्यातील आमची शाळा जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी मुलांची शाळा,खोलापूर.एकूण अंगणवाडी 17.एवढ्या मोठ्या गावात साहजिक आहे की,पटसंख्या टिकवीणे व 100 टक्के पटनोंदणी करणे काही सोपे नाही.

शाळेचे, शिक्षणाचे महत्वाचे उदिष्ट म्हणजे विद्यार्थीचा सर्वांगीण विकास पण पटावरच विद्यार्थी नसेल तर गुणवत्ता व शाळा कशी टिकवावी ? असाही प्रश्न निर्माण होतो.

आमच्या गावातही सर्वच शाळांमध्ये स्पर्धा असते,ती म्हणजे आपल्या शाळेत मुले दाखल करून घेण्याची.गावालगतच दारापुर,शिगनापूर, दर्यापूर असे मोठे गाव आहे तीथे इंगजी माध्यमाच्या काही शाळा आहेत. त्यांच्या बसेस सुद्धा घरी येऊन मुलांना घेऊन जातात.त्यांचे कपडे,तयारी,सूट बूट व बसने मुलगा बाहेर गावी शिकण्यासाठी जातोय हे पाहून पालक आनंदित होताना दिसतात.

अशी सर्व परिस्थीती पाहता आपल्या शाळेत विद्यार्थी दाखल करून घेणे म्हणजे मोठी करामत. व त्यात तो विद्यार्थी टिकला पाहिजे हे त्याहूनही अवघड. आम्हालाही वर्ग पहिलीमध्ये विद्यार्थी दाखल करून घेणे आव्हानात्मक वाटू लागले. आम्ही गावात जाऊन एफ रजिस्टर वर विद्यार्थी नोंदवून पालकांच्या घरी जाऊन त्यांना शाळेत आपला पाल्य दाखल करण्यासाठी विनंती करू लागलो, मात्र पालक आमच्या म्हणण्याकडे जराही लक्ष देत नसत. मराठी माध्यमातील विद्यार्थी मराठी किंवा इंगजी शिकणाऱ्या बाहेरगावी शाळेत, गावातील उर्दू माध्यमातील विद्यार्थी उर्दू शाळेत दाखल करून घेत असत.



आम्हाला वर्ग पहिलीत दाखल करण्यासाठी मुले मिळत नव्हती किंबहुना खूप कमी 2017-2018 मधील दाखल पात्र 29 विद्यार्थी पैकी 20 विद्यार्थी दाखल झाले. 2018-2019 मध्ये दाखल पात्र 27 पैकी 10 दाखल झाले. 2019-20 मध्ये 23 पैकी 12 दाखल झाले. ही परिस्थिती आमच्या समोर होती.


अंमलबजावणी -


या परिस्थितीवर मात करण्यासाठी आम्ही उपाययोजना आखू लागलो. सर्व प्रथम आम्ही शाळेतील वातावरण उल्हास दायक आनंदी करण्यावर भर देऊ लागलो. मुले आनंदाने हसत खेळत शिकली तर ती टिकतात. शाळेत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवू लागलो. सर्व प्रथम आम्ही शाळेत सर्वांच्या आर्थिक सहकार्याने एक साऊंड सिस्टिम विकत घेतली ज्याची किंमत होती 18900 रुपये व त्यावर डिजिटल परिपाठ,शालेय गीत ,सांस्कृतिक कार्यक्रम करून शाळेचे वातावरण उल्हसित करू लागलो. मी स्वतः खर्च करून एक वायर लेस माईक घेतला. त्याचा वापर करून मुलांकडून माइकवर बोलणे, त्यावर परिपाठ करणे, बालसभा राबविणे, नुक्कड नाटिका करणे,गावात जाऊन चौकामध्ये नाटिकांचे सादरीकरण करणे,मुलांकडून विविध पाठावरील कविता पाठ करून,म्हणून घेणे असे उपक्रम घेऊ लागलो.

पालकसभेमध्ये पालकांना मुलांचे व्हिडिओ दाखवणे व कौतुक करणे,पालकांना शाळेतील सर्व बाबी विषयी चर्चा करणे ह्या बाबी करू लागलो. आता याचा परिणाम असा होऊ लागला की,पूर्वी तिसरी मधील मुलाचा भाऊ किंवा बहीण असेल तर ते गावातील कन्या शाळा किंवा दुसऱ्या शाळेत मुलांचे नांव दाखल करत. मात्र शाळेतील बदल पाहून, शाळेतील डिजिटल क्रांति पाहून पालकांचे पाल्य व त्यांच्या नातलगातील पाल्य आमच्या शाळेत दाखल होऊ लागली. गावातील प्रतिष्टीत नागरिक,सरपंचताई,जिल्हा परिषद सदस्य,पं.स.अध्यक्ष सर्व गावातील असल्यामुळे ते सुद्धा आमच्या शाळेबाबत सकारात्मक बोलू लागले.मुलांची उपस्थिती तर वाढलीच त्याचा परिणाम यांच्या वर्ग पहिलीत दाखल होण्याच्या प्रमाणात वाढ होऊ लागली.

फलनिष्पत्ती -

अशाप्रकारे सन 2020-2021 मध्ये 25 दाखल पात्र विद्यार्थी पैकी 25 विद्यार्थी दाखल झाली. सन 2021-2022 मध्ये 20 पैकी 19 विद्यार्थी व सत्र 2022-2023 मध्ये 20 पैकी 18 व या वर्षी सर्वात जास्त म्हणजे एकूण 28 विद्यार्थी दाखल झाली आहेत . त्यातही विशेष म्हणजे उर्दू माध्यमात किंवा इंग्रजी शाळेत दाखल करणाऱ्या पालकांनी व नातेवाईकांनी सुद्धा आमच्या शाळेतच आपल्या पाल्याला दाखल केले.





यूट्यूब वरील लिंक -

इयत्ता पहिली मुलाचे सादरीकरण –

https://youtu.be/W1AEmLbqgYE?si=rlQN9PYUKm3Brqzt

मोबाईल चे दुष्परिणाम नाटिका –

https://youtu.be/OJDHFijIyUg?si=B-Zk9C3lv2rIi_zS

उन्हाळी शिबिर –

https://youtu.be/2Z8vdz2ZSGs?si=VAtfUCPNM9m9032Z

जाहिरात शाळेची -

https://youtu.be/j_HnlYOcT0s?si=kaaD-xfq9EFa9SYG

गावात लेझीम नृत्य सादरीकरण -

https://youtu.be/hbLYXAjnmg4?si=8BehrB7BY7n4FyX3

बालगीत -

एक गुडिया बनायेगे हम

https://youtu.be/bFs8p6zBv_s?si=osRzGhuaD4CVZ9Yu

विनोदी नाटिका -

खोलापुरची हास्यजत्रा

https://youtu.be/beTSCNeuPac?si=nCkSt4_OmS4GSwhb

शिक्षणाचे महत्व नाटिका -

https://youtu.be/W06I1VYPA2Y?si=AOfxncUW947YWu_W




Kholapur P.S. Bhatkuli Dist. Amravati


Zilla Parishad Pre Middle Marathi School




समारोप -

"तुम्हाला जे पाहिजे ते मिळते फक्त ते प्राप्त करण्याची तीव्र इच्छा व त्यासाठी तुम्ही केलेले प्रयत्न प्रामाणिक असावेत"

मागील तीन वर्षांपासून आम्ही 100 टक्के दाखल पात्र मुले दाखल करण्यात व ते 100 टक्के उपस्थित ठेवण्यात यशस्वी झालो आहे.

शाळेच्या या विविध कार्यक्रमामुळे गावात शाळेची प्रतिमा तसेच शालेय गुणवत्ता वाढविण्यात आम्ही पूर्ण पणे यशस्वी झालो. पण म्हणतात ना की प्रत्येक वेळ ही सारखी नसते,आपले प्रयत्न व नावीन्यपूर्णता नियमित ठेवल्यास शाळेचा अधिक विकास होण्यास लवकरच यश येते . पालकांनी दाखवलेल्या विश्वासाबाबत आम्ही त्याचे मनःपुर्वक आभार मानतो.



आनंददायी शिक्षणातून पटसंख्या वाढ व नियमित उपस्थिती

शाळेचे नाव - आदर्श जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा बोराखेडी,ता.मोताळा, जि.बुलडाणा.

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.अनिल कनिराम चव्हाण

शाळेची प्रारंभिक माहिती -

जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा बोराखेडी येथे 251 विद्यार्थी सन 2012 ला शिक्षण घेत होते व ९ शिक्षक या शाळेमध्ये कार्यरत होते. सदर शाळेचा परीसर अत्यंत ओसाड उजाड होता, शैक्षणिक वातावरण सुध्दा लाभदायक नव्हते. फक्त इमारत उभी होती.. अशा विदारक ठिकाणी मुलांना दर्जेदार शिक्षण देणे म्हणजे एकप्रकारे तारेवरची कसरतच होती. कोणतीही सकारात्मक बाजू नसतात अशा परिस्थितीत मुलांना चांगले दर्जेदार शिक्षण द्यायचे आहे शाळेचा भौतिक विकास करून परिसर शैक्षणिक दृष्ट्या लाभदायक करणे ही मुख्याध्यापक म्हणून (2012) नवनियुक्त मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांची नैतिक जबाबदारी समजून त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या मागासलेल्या वस्तीमध्ये असलेल्या शाळेत मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून गुणवत्ता पुर्वक दर्जेदार शिक्षण द्यायचे म्हणजे शिक्षकांसमोर सुद्धा एक आव्हान होते. शाळेला संरक्षक भिंत नाही आवश्यक सोई सुविधा नाहीत गुरे, ढोर, बकरी माणसे यांची परिसरात सदैव घाण होत होती व गाड्याची वर्दळ ही सतत डोकेदुखी निर्माण झाली होती. विद्यार्थी अनुपस्थिती हा येथील सर्वात महत्त्वाचा मुद्दा होता १००% विद्यार्थी उपस्थित रहावे यासाठी विशेष प्रयत्नांची गरज होती.



प्रास्ताविक –

सर्वसाधारणपणे महाराष्ट्रात अनेक आय एस ओ जिल्हा परिषद शाळा ह्या नावारूपाला आल्याबाबत आपण वाचतोय आणि कुठेतरी जिल्हा परिषद मराठी शाळेत आजही ग्रामीण भागातील

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षक आपल्या जिवाचे रान करत शिक्षकी पेशा आदर्शवत ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहे. अशीच एक बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुका लगत असलेली भिल्ल, वडर, वैदु वस्तीमधील आदर्श शाळेची यशोगाथा वाखाणण्याजोगी आहे. शाळा विकास व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत स्वतः पासुन सुरुवात करत परिसरातील दानशूर लोकांना शाळेच्या यशामध्ये समावेश करून विकासापासून कोसो दूर असलेल्या ओसाड उजाड माळरानावर बाग फुलविण्याचे यशस्वी कार्य मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांनी जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा बोराखेडी येथे सिध्द केले आहे. केवळ परिक्षेपुरते विद्यार्थी मुल्यमापन नव्हे तर शैक्षणिक मूल्याची रूजवणूक करत आदर्श विद्यार्थी घडविण्याचे पवित्र कार्य आदर्श जिल्हा परिषद बोराखेडी येथे होतांना दिसतेय.


मुख्याध्यापक शिक्षक यांना विषया संदर्भात आलेल्या अडचणी किंवा मुख्याध्यापक शिक्षक यांनी विषयासंदर्भात अधिक प्रभावी केलेले काम.

प्रभावी शैक्षणिक कार्य - सन २०११-१२ या वर्षी मुख्याध्यापक या पदावर अनिल चव्हाण नियुक्ती झाली सप्टेंबर महिन्यात शाळेवर रुजू झाले. वरील सर्व गोष्टींचे आकलन चिंतन केले व एकच ध्यास गुणवत्ता विकास हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवला, शाळेचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध उपक्रमाचे नियोजन करून नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्याची गुणवत्ता, उपस्थिती व पटसंख्या वाढविण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवुन आनंददायी विविध शैक्षणिक उपक्रमांची सुरुवात केली. प्रत्येक महिन्याला आवश्यक असलेल्या उपक्रमांची अंमलबजावणी करत विद्यार्थी गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने पुर्वतयारी सुरू केली व त्यात मिळालेल्या फलनिष्पत्ती कशा व किती मिळाली याबाबत सातत्याने पाठपुरावा करून सामुहिक चर्चा केली.

अडचणींवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक शिक्षक यांनी केलेल्या उपाययोजना किंवा प्रभावी अंमलबजावणी...

सर्व प्रथम शाळेतील सर्व शिक्षकांची सभा घेऊन शाळेतील शैक्षणिक परिस्थितीवर चर्चा केली. विद्यार्थ्याची शैक्षणीक प्रगती व दैनंदिन उपस्थिती बाबत कोणते उपक्रम राबवायचे याची यादी मी स्वतः शिक्षकांसमोर सादर केली व उपक्रम निर्मीती करण्यासाठी सर्व शिक्षकांचा सहभाग घेऊन सकारात्मक परीवर्तन करण्यास सर्वांनी योगदान घ्यावे हि विनंती केली. या करीता शिक्षकांच्या कौशल्याने शब्द पट्ट्या, बोलक्या भिंती, बोलके तोरण, बोलका डेक्स, स्वयंअध्ययन फळा, परीपाठात शब्द वाचन, तारखेनुसार पाढा सांस्कृतीक कार्यक्रम, वृक्षारोपण, गांडूळ खत प्रकल्प, शालेय शिस्त मंडळ, हजेरी नुसार शब्द, स्वच्छ मुलगा स्वच्छ मुलगी, विद्यार्थी वाढदिवस, डिजीटल क्लासरूम, शालेय मंत्रीमंडळ, विद्यार्थी बचत बँक, परीपाठात शब्द स्पर्धात्मक गणेशउत्सव, बालसभा, विविध स्पर्धा, व योगासने, वाढदिवसाला वृक्षारोपण स्वच्छता अभियान, स्वच्छ परीसर, स्वच्छ शाळा, ग्रंथालय, शैक्षणिक साहित्यदालन, व कार्यशाळा शब्दांची बँक, एकतास वाचन, पुस्तक वाचा बक्षीस मिळवा, शिष्यवृत्ती वर्गाचे नियोजन, मातीकाम, कोलाज काम धुळपाटी, गल्लीतील शाळा, बालसभा, शिशुवर्ग सुरू करणे मनोरंजनात्मक शैक्षणिक खेळ, ई चाचणी सांगा सांगा लवकर सांगा दिवाळी अभ्यास, यु ट्युब शैक्षणिक व्हिडिओ, शैक्षणिक ब्लॉग असे नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेत राबविणे सुरु केले. या सर्व उपक्रमाच्या माध्यमातुन फक्त एकच ध्येय म्हणजे विद्यार्थी शाळेत टिकविणे व त्याला त्याच्या गरजेनुसार दर्जेदार शिक्षण देणे हेच होते.

वरील सर्व उपक्रमातुनच जि. प. बोराखेडी शाळा उपक्रमशिल शाळा म्हणून जिल्ह्यात नावारुपाला आली. आज वरील उपक्रमाच्या माध्यमातुन या भिल्ल, वडर, वैदु, मागासवर्गीय मुलांनी चांगल्या प्रकारे शिक्षण देण्यास आम्ही प्रयत्नशिल असून १००% यश आम्हाला मिळाले आहे. एकावेळी जे विद्यार्थी शाळेत



नियमीत येत नव्हते तेच विद्यार्थी आज या नाविण्यपुर्ण उपक्रमांच्या यशामुळे शिस्तीने स्वच्छ व निटनेटके, नियमित शाळेत १०० % उपस्थित राहतात. आणि विद्यार्थी संख्या 1 ते 8 ची 419 व शिशुवर्ग 65 एकूण 484 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत याचे श्रेय हे वरील राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, सर्व शिक्षकांचे योगदान व मुख्याध्यापकाचे नेतृत्व व नियोजन याला जाते. म्हणूनच म्हटले आहे केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे...

यशाचा मार्ग हा खडतर असतो पण सातत्याने त्या मार्गावर चालत राहिलो तर यश पदरात पडल्याशिवाय राहत नाही हेच आज आदर्श जिल्हा परिषद शाळा बोराखेडी येथे मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांनी सिद्ध केले आहे.



मुख्याध्यापक शिक्षक यांनी अडचणींवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक शिक्षक यांनी केलेल्या उपाययोजना किंवा प्रभावी कार्याची फलनिष्पत्ती -

मोताळा तालुक्यात अनेक खाजगी शिक्षण संस्था व कॉन्व्हेंट असून ग्रामीण भागातील आदर्श जि प शाळा बोराखेडी येथील शाळेत या गावातील विद्यार्थी 216 या व्यतिरिक्त बाहेरुन येणारे अंत्री व पुन्हई या गावाचे 203 विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहे, शाळा समिती यांच्या परवानगीने या शाळेत शिशुवर्ग सुरू असुन 65 विद्यार्थी शिकत आहे.विद्यार्थी संख्या हेच या शाळेतील नाविण्यपुर्ण उपक्रमाचे खास वैशिष्ट्ये असुन शाळेचे यश आहे.

शाळा व परिसरातील पर्यावरण राखण्यासाठी विद्यार्थ्यांची अगोदर जनजागृती करून करून त्यांना पर्यावरणाची हानी कशी होत आहे ह्याबद्दल माहिती व प्रात्यक्षिकाने महत्व पटवून देण्यात यावे असे वाटले विद्यार्थ्यांना व पालकांचे उद्बोधनाव्दारे त्यांना जागृत करून वृक्षारोपण शाळा स्तरावर कार्यक्रम राबविण्याची गरज ओळखून व गावातून वृक्षदिंडीचे आयोजन केले हा विषय काही मुलांना आवडला त्यांना त्यात गोडी निर्माण झाली, शाळा, परिसर, निसर्गरम्य व्हावा असे विद्यार्थ्यांना वाढू लागले शाळेची आवड निर्माण होऊन या उपक्रमामुळे उपस्थिती वाढण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांना मुख्यत: शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रमांपैकी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रम हा उपक्रम राबवून त्याव्दारे विद्यार्थ्यांना अनौपचारीक रित्या मुख्य प्रवाहात कळत-नकळत आणण्यासाठी हा उपक्रम राबविण्याची गरज वाटली. ह्या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांना उजाळा मिळावा व त्यांना स्वतःचा कलात्मक गुण जोपासता यावा व विद्यार्थी आपल्या कलागुणांना वाव देण्याच्या दृष्टीने आवडीने शाळेत येण्यासाठी हा उपक्रम राबविण्याची आवश्यकता वाटली.



अडचणींवर मात करण्यासाठी केलेले कार्य –

विद्यार्थ्यांचे मन आनंदीत राहील यासाठी फुलबाग, परसबाग तयार करावीशी वाटली यासाठी विविध फुलझाडे तसेच मोठ्या झाडांच्या रोपांची लागवड केली यात काही मुलांना फुलांची रोपांची लागवड करण्याची आवड निर्माण झाली, त्यांची जोपासना करण्याविषयी जिज्ञासा वाढली व स्वयंप्रेरणेने शाळेत उपस्थित राहून परसबागेची निगा राखू लागले, करीता या उपक्रमाची गरज वाटली. इतर सह शालेय उपक्रमात कार्यानुभवांतर्गत गांडूळ खताची निर्मीती करून आर्थिक दृष्टया प्रबळ होण्यासाठी व खत निर्मीती कश्याप्रकारे होते हे विद्यार्थ्यांना समजावून घेण्यासाठी गांडूळखत निर्मीतीची गरज वाटली व विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले. मोताळा तालुक्यालगत बोराखेडी हे गांव विविध जाती धर्माच्या लोकांनी वसलेले आहे, भिल्ल, वडर, व वैदू, नाथजोगी, मागासवर्गीय, भटक्या जाती, जमाती असलेल्या शैक्षणिक विकासाचा अभाव तसेच शिक्षणाची अनास्था असलेल्या मुलांना प्रभावी व परिणामकारक शिक्षण देणे ही अत्यंत महत्वाची व काळाची गरज ओळखून जि. प. मराठी उच्च प्राथमिक शाळा बोराखेडी येथे विद्यार्थ्यांना नाविण्यपूर्ण उपक्रमातुन शैक्षणिक प्रवाहात अनौपचारिक रित्या समाविष्ट करण्यासाठी व त्यांना आनंददायी व विविध उपक्रमांच्या मार्फत शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी त्यांचा सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी शाळेतून नाविण्यापूर्ण उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये निश्चीतच अपेक्षित बदल घडवून आणावेसे वाटले.

इतर शाळांचा शैक्षणिक आढावा घेतल्यावर असे निदर्शनास आले की वेगवेगळे प्रकारचे उपक्रम राबविणाऱ्या शाळांनी विद्यार्थ्यांमध्ये भावनिक, मानसिक विकास साधला आहे जेणे करून यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारणा, उपस्थिती, शैक्षणिक प्रगती व नियमितता व शाळेविषयी वाटणारी ओढ यामध्ये प्रगती साधली आहे. त्यामुळे नाविण्यापूर्ण उपक्रमांचा खजिना ह्या सदरामुळे निश्चितच माझ्या


विद्याथ्यांना विविध उपक्रमांमुळे त्यांना शाळेची ओढ लागून त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास व विविध उपक्रमातून त्यांचा कलात्मक सृजनशील गुणात्मक विकास निश्चित होईल अशी अपेक्षा वाटली.

विद्यार्थ्याच्या विकासासाठी उपस्थिती व पटसंख्या वाढीसाठी काही नाविण्यपूर्ण उपक्रमांची गरज वाटली. या मध्ये वृक्षारोपण ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांमध्ये ती रुजविण्यासाठी प्रदूषणाला आळा बसविण्यासाठी विद्यार्थ्यांची व पालकांची खूप मदत झाली आहे. तसेच शिक्षकांच्या कौशल्याने शब्द पट्ट्या, बोलक्या भिंती, बोलके तोरण, बोलका डेक्स, स्वयंअध्ययन फळा, परीपाठात शब्द वाचन, तारखेनुसार पाढा सांस्कृतीक कार्यक्रम, वृक्षारोपण गांडूळ खत प्रकल्प, शालेय शिस्त मंडळ, हजेरी नुसार शब्द, स्वच्छ मुलगा स्वच्छ मुलगी, विद्यार्थी वाढदिवस, डिजीटल क्लासरूम, शालेय मंत्रीमंडळ, विद्यार्थी बचत बँक, परीपाठात शब्द स्पर्धात्मक गणेशउत्सव, बालसभा, विविध स्पर्धा, व योगासने, वाढदिवसाला वृक्षारोपण स्वच्छता अभियान, स्वच्छ परीसर, स्वच्छ शाळा, ग्रंथालय, शैक्षणिक साहित्यदालन, व कार्यशाळा शब्दांची बँक, एकतास वाचन, पुस्तक वाचा बक्षीस मिळवा, शिष्यवृत्ती वर्गाचे नियोजन,धुळपाटी, गल्लीतील शाळा, बालसभा, शिशुवर्ग सुरू करणे मनोरंजनात्मक शैक्षणिक खेळ, ई चाचणी सांगा सांगा लवकर सांगा दिवाळी अभ्यास, यु ट्युब शैक्षणिक व्हिडिओ, शैक्षणिक ब्लॉग असे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले...

शाळेला आंतरराष्ट्रीय, आय एस ओ दर्जा मिळाला आदर्श शाळा झाली राज्यात टॉप टेन वा अमुक उपक्रमात अग्रेसर शाळा आहे याबाबत फारशी नवलाई करणे, जल्लोष करत कृतकृत्य होणे, धन्यधन्य होणे हि अपेक्षा न बाळगता माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रयोगशिल बनवत नवोदय एन एम एम एस स्पर्धेत दर्जेदार गुणात्मक विद्यार्थी तयार करणे हेच एकमेव उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ध्यास असून सदर शाळेच्या विकासासाठी सर्वांनी वेळोवेळी स्वतः जवळील पैसा खर्च केला तसेच शाळा समिती गावकरी सरपंच यांच्या मदतीने लोकसहभागातून शाळेचा विकास साधण्यासाठी तनमनधनाने १३ लाख रू वस्तू रूपात लोकवर्गणी निर्माण करण्यासाठी निस्वार्थ कार्य केले आहे.

शाळेचा परिसर विद्यार्थ्यांना मनमोहक करण्यासाठी परिसरातील शालेय भिंती रंगरंगोटी करून शैक्षणिक दृष्ट्या बोलक्या केल्या. पूर्वस्थिती व आजची स्थिती यांत खूप फरक आहे. कारण, पुर्वीची शाळा ओसाड भकास होती. व आज उपक्रमांच्या माध्यमातुन शाळा व शाळेचा परिसर निसर्गरम्य व मनमोहक, गुणवत्तेला लाभदायक असा करण्यात आलेला आहे. पुर्वीच्या व आजच्या शाळेतील दर्शविणारे छायाचित्र सादर करत आहोत.प्रत्येक शिक्षकाला आपल्या आवडीनुसार काम देवुन यात प्रतिनिधीत्व देवुन काही मुलांचा सुध्दा सहभाग नोंदवत या शैक्षणिक उपक्रमात मुलांना आवड निर्माण झाली. राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांना आवडीमुळे शाळेत सतत उपस्थित राहण्याच्या प्रमाणात सकारात्मक बदल होत विद्यार्थी शैक्षणिक काम स्वतः करू लागले. म्हणुन या सर्व उपक्रमाची आवश्यकता वाटली. स्वच्छ मुलगा, स्वच्छ मुलगी, शालेय मंत्रिमंडळ, विद्यार्थी वाढदिवस साजरे करणे, डिजीटल क्लासरूम, बालसभा, बोलका परिसर, स्वयंअध्ययन फळा, बोलका डेस्क, शैक्षणिक साहित्य निर्मीती दालन, बोलके तोरण, लेक वाचवा लेक शिकवा अभियान, स्वच्छता अभियान, सण, उत्सव जयंती व विविध स्पर्धा बालनर्सरी व परसबाग अशा विविध नाविण्यपुर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये निश्चित अपेक्षित बदल घडविण्यासाठी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण गुणात्मक, कलात्मक व शारिरीक असे सकारात्मक बदल करण्यासाठी या कृतीसंशोधनात नाविण्यपूर्ण उपक्रमांची गरज भासली. व "जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा बोराखेडी येथील नाविन्यपूर्ण उपक्रमचा खजिना " या विषयावर कृतिसंशोधन तयार करून राज्य स्तरावर सादर करून त्यास सन्मान मिळाला.

कधी कधी आपण आपल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न हे शासनाच्या कोणत्या योजनेत योग्य असतील हे आपल्याला कळत नाही आणि योगायोगाने हे कार्य कुठेतरी लागू पडते आणि आम्ही आजवर केलेल्या उपाययोजना शैक्षणिक कार्याची दखल शासनाने घेतली आणि शासनाने राबविलेल्या आंतरराष्ट्रीय शाळा या उपक्रमात शाळेला आंतरराष्ट्रीय शाळा प्रमाणपत्र मिळाले. यात



विद्यार्थ्यांना वेगवेगळा अभ्यासक्रम शिकायला मिळाला नंतर याच शाळेचे रूपांतर होऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत निवड झाली. विद्यार्थी गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने अविरतपणे चालू असलेल्या कार्यामुळे सकारात्मक परिवर्तन शाळेत घडले. आज पर्यंत नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमाची अंमलबजावणी सातत्याने करत अतिरिक्त शिष्यवृत्ती वर्ग घेऊन जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा बोराखेडी येथील अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, ओबिसी, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेवर भर देत "नवोदय" व "एन एम एम एस" शिष्यवृत्ती परिक्षेत सातत्याने निवड यादीत झळकत असुन सदर शाळा शैक्षणिक दृष्ट्या प्रगतिशील आहे. सतत तीन वर्षांपासून नवोदय विद्यालयात विद्यार्थी प्रवेश होत असुन एन एम एम एस मधे यावर्षी 10 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे व निवड यादी 2 विद्यार्थी पात्र ठरले आणि सारथी शिष्यवृत्ती ला 8 विद्यार्थी पात्र ठरले हे या शाळेचे खास वैशिष्ट्ये आहे.


शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वस्तीमध्ये शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी FLN उपक्रमाच्या माध्यमातून गावात प्रत्येक घरावरील भिंतीवर शैक्षणिक माहिती लेखन करत विद्यार्थ्यांना गल्लीत आनंददायी हसत खेळत शिक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न केले आहे.

ग्रामिण भागात कोणतेही सहकार्य नसतात सकारात्मक परिवर्तन करत आजच्या विदारक परिस्थितीत कोणतेही पाठबळ नसताना फक्त सकारात्मक दृष्टिकोन व सततच्या मेहनतीच्या बळावर मुख्याध्यापक अनिल चव्हाण व सर्व शिक्षक यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम व गुणवत्ता विकास साधत विद्यार्थी संख्या वाढीचा आलेख सातत्याने वाढता ठेवला असून शिक्षक संख्या सुध्दा वाढली आहे.

आज रोजी 1 ते 8 ची विद्यार्थी संख्या 419 असून केजी 1 व केजी 2 यांची विद्यार्थी संख्या 65 एकूण 482 विद्यार्थी असुन 14 शिक्षक मंजूर असून 11 शिक्षक कार्यरत आहेत. विशेष कार्य म्हणजे केजी 1 केजी 2 मुळे वर्ग 1 ली विद्यार्थी गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने पूर्वतयारी केली जात असून पटनोंदणी साठी सुद्धा 100% मदत होते आणि FLN-पायाभूत साक्षरता आणी संख्याज्ञान उद्दिष्ट 100% पूर्ण करण्यात येत आहे. तसेच सदर शाळा शासन राबवित असलेले प्रत्येक उपक्रम योजनांची १००% अंमलबजावणी करत असून सन 2023/24 मधे लेट्स चेंज स्वच्छता मॉनिटर या स्पर्धेत शाळा राज्यातून व्दितीय तर जिल्हा परिषद शाळेतून राज्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.

समारोप –

खरे तर आज इंग्रजी शाळेकडे असलेला पालकांचा कल व इंग्रजी शाळेतील फोफावलेली पटसंख्या व पालकांचे इंग्रजी शाळेबाबत ओढा बघता आजच्या युगात जिल्हा परिषद मराठी शाळा ह्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उपाययोजना व वाढती विद्यार्थी संख्या याचा विचार केल्यास आपणास हा एक अपवादात्मक परिस्थितीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा व गुणवत्ता यांचा सुवर्णमध्य साधत तालुक्यालगत 500 मिटरवर अनेक खाजगी शिक्षण संस्था उपलब्ध असताना जिल्हा परिषद मराठी शाळेला गुणवत्ता व सातत्याने पटसंख्या वाढवित आमुलाग्र बदल घडवत नाविण्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात दिशा देण्यासाठी केलेले विशेष कार्य व योगदान हे वाखाणण्याजोगे आहे. शासन राबवित असलेल्या सर्व योजनांची अंमलबजावणी करत आजवर ज्ञानरचनावाद शाळा जिल्हा पुरस्कार,स्वच्छ भारत अभियान जिल्हा पुरस्कार स्वच्छता मॉनिटर राज्य पुरस्कार राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त केले आहे. अशा स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्यांना मुख्याध्यापक शिक्षकांना व शाळांना शासनाने विशेष महत्त्व देत तेथील भौतिक सुविधा वाढवून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी विशेष सहकार्य केले पाहिजे एवढीच रास्त अपेक्षा आहे.




मेरी माटी मेरा देश
स्वच्छता अभियान
लोक शिक्षण लोक सहभाग




OPPO Reno4 Pro






भारतरत्न अटलविहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय
जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, वीरखेडी




भारतरत्न अटलविहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय
जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, वीरखेडी

मातृभूमि

मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांचा उपक्रम; विद्यार्थी गिरवितात धडे

अभिनव गल्ली-बोळीतही भरते शाळा

। बुलडाणा, दि. २७ ।



शिक्षणाचे महत्व सगळ्यांना कळावे आणि परिसरातील प्रत्येक विद्यार्थ्याला अक्षरओळख व्हावी म्हणून बोराखेडीच्या जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांनी अभिनव उपक्रम सुरू केला असून त्यांच्या संकल्पनेतून आता गल्लीतही शाळा भरत आहे. मोताळा शहरालगत असलेली आदर्श जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा बोराखेडी येथे मुख्याध्यापक अनिल चव्हाण हे सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असतात. महाराष्ट्र शासनान यांनी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान हे उद्देश पूर्ण करण्यासाठी गावातील प्रत्येक मुलाची पायाभूत क्षमता पुर्ण करणे शासनाच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचे सर्वात मोठे उद्दिष्ट म्हणजे शैक्षणिक धोरण २०२३-२४ मधे लागू करावयाचे आहे. यात ५+३+३+४ हे शैक्षणिक धोरण अवलंबिले आहे. पहिला टप्पा ३ ते ७ वर्षे नर्सरी ते वर्ग दुसरा वयोगटातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात समाविष्ट करून पायाभूत गुणवत्ता निर्माण करणे हे होय. नंतर तिसरा वर्ग ते पाचवा, सहावा ते आठवा, शेवटचा टप्पा म्हणजे ९ ते १२ वी पर्यंत शिक्षण पूर्ण करण्यासाठी शिक्षणाचे धोरण ठरविले आहे. सर्वात महत्त्वाचा पहिला टप्पा पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान हे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी जिल्हा परिषद शाळा बोराखेडी येथील मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांनी गावात जाऊन घरावरील भितीवय गल्ली गल्लीत मोक्याच्या ठिकाणी जिथे पाच दहा विद्यार्थी एकत्र येथील शिकतील अशा ठिकाणी इंग्रजी मराठी मुळाक्षरे, बाराखडी १ ते १०० पाढे पक्षी, फळे, प्राणी यांची चित्रे व शब्द दर्शक शैक्षणिक चार्ट चिटकवून विद्यार्थ्यांमधे पायाभूत क्षमता विकसित करण्यासाठी ''गल्लीतील शिक्षण'' ''घरोघरी शिक्षण'' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. चौका चौकात समाजमंदिरात घरातील भिंती शैक्षणिक दृष्टया बोलक्या करून विद्यार्थ्यांना घरपोच पायाभूत क्षमता विकसित करण्यासाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध होत आहे.

शिक्षकही उपक्रमात सहभागी

एखादा हुशार विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांना शिकवत पायाभूत क्षमता विकसित करतो यात मुलांमधील एक विद्यार्थी शिक्षक बनतो भितीविरहीत शैक्षणिक वातावरण निर्माण होते व विद्यार्थी हसत खेळत शिकतो. स्वयं अध्ययनाची सवय लागत विद्यार्थी स्वतः आपल्या पायाभूत क्षमता विकसित करतो. तसेच एखादा सुशिक्षित पालक माझी विद्यार्थी हा गल्लीत पाच दहा विद्यार्थ्यांना सहज हसत खेळत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करून देतो. बोराखेडी येथे भिल्ल वडर वैदु मागासवर्गीय मजुर, शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी व विद्यार्थ्यांची पायाभूत क्षमता विकसित करून शालेय गुणवत्ता वाढीसाठी सदर उपक्रम मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांनी सुरू केला. या उपक्रमात शाळेतील शिक्षक सुध्दा उत्साहात सहभागी झाले आहेत.

Buldana Edition
Jul 28, 2023 Page No. 1
epaper.dailymatrubhumi.com

दहीहंडीचा उत्साह!

जिल्हा परिषद शाळा, बोराखेडी

मोताळा : आदर्श जि. प. शाळा बोराखेडी येथे ७ सप्टेंबर रोजी कृष्ण जन्माष्टमी साजरी करण्यात आली. गोपालकाला करून प्रसाद वाटप करण्यात आला.

तीन थरांची दहीहंडी फोडत कृष्ण जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी शेकडो पालकांनी उपस्थिती दर्शविली व सहकार्य केले.

कृष्ण व गोपालच्या भूमिकेत मुलांनी गोविंदा रे गोपाला असा जयघोष करत नृत्य सादर केले. तसेच अनेक मुली राधाच्या वेशभूषेत आल्या होत्या. त्यांनी गरबा खेळून कृष्ण जन्माष्टमीचा आनंद घेतला. तसेच शाळेतील शिक्षक, शिक्षिका यांनी सुद्धा कृष्ण जन्माष्टमीनिमित्ताने या कार्यक्रमाचा आनंद घेत सहकार्य केले. यावेळी शाळेतील शिक्षिका अनुप्रिता व्यावेकर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी सुनीता हुडेकर, वामिंद्रा गजभिये, सुलोचना चव्हाण, सीमा गोरे, संध्या नाईक, सुनीता न्हावकर, अश्विनी जेऊघाले, अनिता राऊत, जया चव्हाण, शीतल झोळणे, दीपाली गोलाईत, उमेश मोठे आदी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला होता.





लोकमत

विज्ञान प्रदर्शनात बोराखेडी शाळा प्रथम

मोताळा : अनंतराव सराफ विद्यालय, शेलापूर येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात शिक्षक शैक्षणिक साहित्यात प्रथम क्रमांक पटकाविला. २१ डिसेंबर ते २२ डिसेंबरदरम्यान हे प्रदर्शन आयोजित केले होते.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थी विज्ञान साहित्यात नैतिक ढाके व प्रेम हटकर व शिक्षक शैक्षणिक साहित्यामध्ये उमेश मोठे यांनी सहभाग नोंदविला होता. एकूण ५० साहित्य तालुकास्तरावर आले होते.

मोताळा तालुक्यात शेलापूर येथे पार पडलेल्या विज्ञान प्रदर्शनात सहायक शिक्षक उमेश मोठे बोराखेडी शाळा यांना 'अध्ययन-अध्यापनातील शैक्षणिक साहित्य' या प्रकारात प्रथम क्रमांक मिळाला आहे. यामुळे जिल्हास्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.

आदर्श जि. प. शाळा सातत्याने नवनवीन उपक्रम राबवीत शाळेचा गुणवत्ता विकास साधण्याचा प्रयत्न करत असते. मुख्याध्यापक अनिल चव्हाण व शाळेतील शिक्षक यांनी उमेश मोठे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

Hello Buldhana
Page No. 4 Dec 24, 2023
Powered by: erelego.com

शाळेच्या उपक्रमाचे फोटो व व्हिडीओ बाबत लिंक -

https://drive.google.com/file/d/1z0tbGH-BOUJjTkWfcGpVk54W8MM9Wjll/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1gfBud931evBwn7JPuB2wedmUzNUIFDe4/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1ILZpcuShEmYe3MFqdNvv0L_PkDwLOP_0/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1FSbw5u-Eoxt9FwpXF3h47hjFhhxN_FB-/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1cyAAdWVZ3L1k6-LkBSQP-BKoWh13xcnh/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1NQk-x0TnzYWC7iMEcLSiaupXPy3qnBeG/view?usp=drivesdk

https://youtu.be/Wss8IaXxB_g?si=0i3OcoXLiGk0J4j6

https://youtu.be/gcKfHMLDjmM?si=yZZkPix9khCoLmkh

https://youtu.be/HZxuGoxaaE4?si=pz1aISrkZZK2pIaT

https://youtu.be/U6rUFN-SCFw?si=Q9DzNPuDPRSPE4e7

https://youtu.be/SfHXlhvo_6U?si=hQuTfS37N3G8fdIF

https://youtu.be/KiZrxug-2JY?si=fngHre4-ieWdKJ-K

https://youtu.be/9aGKy0YK3eU?si=OzeJe3e_Qta9c62D

https://youtu.be/pA-BLLTP4bA?si=Sbq0ohr4vIZYMZAL

https://youtu.be/rrzc8j32pCE?si=h25qEgx1B_KDZw2v

https://www.youtube.com/watch?v=l7DPv4ZTWuU

लोक सहभागातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव- जिल्हा परिषद केंद्रीय मराठी आदर्श प्राथमिक शाळा, सावरगांव डुकरे, ता.चिखली जि. बुलडाणा

मुख्याध्यापकाचे नाव — श्री.मनोहर शेनफड जाधव

शाळेची प्रारंभिक माहिती -

श्री शैनेश्वर टेकडीच्या कुशीत बसलेलं अवघ्या चारशे घरांच्या समुहात एकोप्यानं राहणारं एक टूमदार खेडे म्हणजे सावरगांव डुकरे हे गाव म्हणजे कर्मवीर संत गाडगेबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेलं आणि एकेकाळी, आदर्श गाव पुरस्कार मिळालेलं गाव आहे. तशी स्वातंत्र्य पूर्व काळातच गावात शिक्षणाची गंगा आणली गेली. त्यामुळे शिक्षणाने पुढारलेली सुसंस्कृत माणसं आजही या गावचं वैभव टिकवून आहेत. सावरगांव डुकरे जि.प. शाळेत पाच वर्षापूर्वि रुजू झालो तेंव्हाच शाळेचा सर्वांगीण विकास करण्याचा निश्चय केला. शाळेतील सर्व शिक्षक बांधवांना तसेच शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेवून 'स्वच्छ, सुंदर व गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडविणारी आदर्श शाळा निर्मितीचा संकल्प केला. लोकसहभागातून शाळेला भौतीक सुविधा, मिळविण्यात यशस्वी झालो. 'बाला' उपक्रमांतर्गत लोक सहभागातून शालेय रंगरंगोटी, सुशोभीकरण करून शालेय परिसर आकर्षक व रमणिय करण्यात आला. सन 2018 मध्ये शाळेला ISO मानांकन प्राप्त झाले. तर 2019 मध्ये महाराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झालेल्या ४४ शाळांमध्ये आमच्या शाळेचा समावेश करण्यात आला.

शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त होताच शाळेत जवळपासच्या पाच ते सहा गावातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येऊ लागले. सन 2022 मध्ये शासनाच्या' भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' या पथदर्शी प्रकल्पात शाळेची निवड झाली. शाळेच्या अंतर्बाहय विकासासोबतच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी शाळेत अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु करण्यात आले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता बघून आज तालूका स्तरावरून अनेक पालकांनी आपल्या मुलांना आमच्या शाळेत दाखल केले आहे. पुढील शैक्षणिक वर्षात चिखली शहरातून शेकडो विद्यार्थी शाळेत प्रवेश निश्चित करतील हा आत्मविश्वास आम्हाला आहे. शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर अधिक भर दिला जात असून माहिती व आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माझ्या शाळेचा विद्यार्थी कुठेही मागे पडता कामा नये म्हणून विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी शाळेत अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. याबाबत शाळेची यशोगाथा थोडक्यात बघूया.

प्रास्ताविक -

प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास साधता यावा म्हणून शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. यामध्ये दक्ष पालकांचा सहभागही मिळाला. परंतू काही विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा हवा तेवढा सहभाग मिळविण्यात यश मिळत नव्हते. त्यामुळे उपस्थितीचे प्रमाणही कमीच असायचे. वर्ग स्तरावर शिक्षकांची मेहनत असूनही त्या-त्या वर्गाच्या क्षमता विकसित होण्यात अडथळे येत होते. उपक्रम सुरु करायचा तर आर्थिक बाबही तेवढीच महत्वाची होती. अशावेळी सर्व शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी यांचा समन्वय घडवून आणला. विद्यार्थी गुणवत्ता वाढवायची असेल तर नवनविन

तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर करणे, वाचन विकासासाठी वाचनालयाची पुस्तके, संगणक कक्ष अशा अनेक बाबी महत्वाच्या वाटत होत्या.अशा वेळी लोकसहभाग मिळविण्याचा निश्चय केला.

एक तास वाचनासाठी -

शाळेच्या व्हरांड्यात एका कोपऱ्यात डेस्क बेंच मांडणी करून, बाजुला ग्रीन नेट लावली. लोकसहभागातून सामान्य ज्ञानावर आधारित छोटी-छोटी पुस्तके, शिष्यवृत्ती, नवोदय गाईड्स, गोष्टीची पुस्तके तसेच वृत्तपत्र खरेदी केले. शाळा भरण्यापूर्वी व मधली सुटीचा उपयोग घेत विद्यार्थी वाचन कक्षात वाचन करु लागली,त्यांना आम्ही सर्व सहकार्य करू लागलो, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाचनातील त्रुटी पूर्ण होण्यास मदत झाली. वाचनात सुधारणा झाली. वाचनाची आवड निर्माण झाली. एकाग्रता वाढली. अवांतर वाचनामुळे शब्दसंग्रह वाढू लागला. एकत्र बसून वाचन करतांना आपसात चर्चा होऊ लागली. या उपक्रमामुळे गुणवत्ता वाढण्यास निश्चितच मदत झाली.


विद्यार्थी गुणवत्ता वाढावी यासाठी शाळेत उपक्रम सुरु करावा म्हणून लोक सहभागातून...

- स्मार्ट टि. व्हि. प्रत्येक वर्गात बसविले.
- संगणक उपलब्ध करून मार्गदर्शन कक्ष उभारले.
- शाळेत लोकसहभागातून हस्ताक्षर सुधार वहया आणल्या व 'सुंदर माझे हस्ताक्षर' हा उपक्रम घेतला.
- व्यवहार कौशल्य विकसित व्हावं यासाठी शालेय वस्तू भांडार सुरु केले.
- नवनिर्मिती व साहित्य लेखन कौशल्य विकसित व्हावे यासाठी 'माझे प्रेरणादायी लेखन' हा उपक्रम शाळेत सुरु करण्यात आला.
- शालेय व्यवस्थापन तसेच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारी स्विकारणे, नियोजन करणे, नियम तयार करणे व ते काटेकोर पाळता येतात किंवा नाही याचे निरिक्षण करणे यासाठी शालेय मंत्रीमंडळ निवडणुक घेण्यात आली.
- स्वयंअध्ययनातून गुणवत्ता विकास साधता यावा म्हणून 'आकृती एक कृती अनेक' तसेच 'फुलोरा' नाविण्यपूर्ण उपक्रम शाळेत सुरु करण्यात आले.

सातत्याने अनेक उपक्रमातून गुणात्मकच नव्हे तर सर्वांगीण विकास साधत असतांना विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेची आवड निर्माण व्हावी, या नवोदय, शिष्यवृत्ती यासारख्या स्पर्धा परिक्षांची पूर्वतयारी प्राथमिक स्तरावर करता यावी म्हणून 'आम्ही सारे प्रज्ञापती' हा गुणवत्ता वर्धक अभिनव उपक्रम शाळेत सुरु करता आला. महिन्याच्या प्रत्येक शनिवारी स्पर्धा परिक्षा सराव पेपर सर्व विद्यार्थ्यांचा घेतला जातो. विद्यार्थ्यांसह पालक सुध्दा पेपरचा सराव करतात. सोमवारी पेपरचा निकाल घोषीत करण्यात येतो. पैकीचे पैकी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येते.

उपक्रम निष्पत्ती -

विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास साधता यावा यासाठी सुरु असलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण झाली. स्वयंअध्ययन, गटचर्चा, मनोरंजनातून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया पूर्ण होवू लागली. विद्यार्थ्यांसोबत पालकही अनेक उपक्रमांत मार्गदर्शकाची भुमिका निभावू लागले. हस्ताक्षर, नेतृत्व विकास, स्वयंअध्ययन, वक्तृत्व, नवनिर्मिती, गुणात्मक विकास, व्यवहार कौशल्य विकसन हया सर्व बाबींमुळे गुणवत्ता विकास साधणे शक्य झाले. शालेय वातावरण आनंददायी, मनोरंजक व उत्साहीत झाले. यामुळे उपस्थितीचे प्रमाण 100% वाढले. आज शहरातून विद्यार्थी ग्रामीण भागातील जि.प.च्या शाळेत शिक्षण



घेण्यासाठी येत आहेत. माझी शाळा नाविन्यपूर्ण उपक्रमशील शाळा म्हणून पंचक्रोशीत नावारूपाला आली आहे. यामागे शिक्षकांची मेहनत व पालकांचे सहकार्य सुध्दा तितकेच महत्वाचे आहे.














माझी शाळा,
स्वच्छ शाळा.


Kk
Kite
















माझे सहशाले

बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मनोरंजनात्मक अध्ययन – अध्यापन

शाळेचे नाव – जिल्हा परिषद प्रशाला, शिवना ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.बबनराव बालाजी सोनवणे

सहशिक्षक - श्रीमती सरला शामराव कामे

प्रस्तावना –

शाळा म्हणजे समाज, या समाजातील सर्वात महत्त्वाचा घटक विद्यार्थी असतो. शाळेत अध्यापनाचे नैतीकमूल्य जोपासण्याचे कार्य केले जाते. त्यात पाठ्यघटका बरोबरच नैतिकताही शिकवले जाते .वेगवेगळे उपक्रम, जयंती पुण्यतीथी, स्पर्धा, कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा यांचा समावेश असतो. पण विद्यार्थी व पालक यांच्यातील दुवा म्हणजे शिक्षक असतो, विद्यार्थ्यांचा सामाजीक भावनीक विकास, घडवून आणण्यासाठी शाळेचा महत्वपूर्ण वाटा असतो. याच उददेशाने जि .प. प्रशाला शिवना या शाळेत विद्यार्थ्यांना बोलक्या बाहुल्याच्या माध्यमातून मनोरंजनात्मक अध्यापनाबरोबरच देश व्यापी समस्यांचेही जनजागरण केले जाते .जसे की. अंधश्रध्दा निर्मूलन, तंबाखू मुक्त शाळा, आरोग्य, स्वच्छता अभियान, संविधान दिन, बेटी बचाव बेटी पढाव, स्त्री सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन,जल संवर्धन, वृक्षारोपण, यांसारख्या विविध शासकीय अभियानांची जनजागृती आमच्या शाळेत नाट्य रूपात बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून विद्यार्थी व पालकांच्या बोली भाषेत मनोरंजनात्मक व दर्जेदार पध्दतीने केली जाते.

नियोजन व अंमलबजावणी -

जि.प प्रशाला, शिवना, ता.सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर येथे एक अनोखा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांची अनुपस्थिती, वर्गातील गळती रोखणे व वेगवेगळ्या देशव्यापी समस्या व अभियानांची जनजागृती, मनोरंजनात्मक अध्यापन केल्याने गुणवत्ता व नैतिक मूल्यात खूप मोठी वाढ झाली.सदर उपक्रम राबविण्यासाठी श्रीमती सरला कामे यांनी पुढाकार घेतला,खूप मेहनत करून बाहुल्या बनविल्या, प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनात त्यांचा अतिशय सृजनात्मक वापर करण्यास सुरुवात केली.त्यांना मुख्याध्यापक यांनी या कामासाठी प्रेरणा देऊन सर्वतोपरी सहकार्य केले,शाळेतील सर्व शिक्षकांनी या उपक्रमातून विद्यार्थी विकास होण्यासाठी प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांना पारंपारीक अध्यापनाचा कंटाळा आला असून त्यांना नवनवीन पद्धतीने अभ्यासाची आवड, सृजनात्मक विकास निर्माण होण्यासाठी मनोरंजनात्मक अध्यापनाची निवड करण्यात आली. मराठी, गणित इतिहास भूगोल विज्ञान यांसारख्या विषयांचे पाठ्य घटक निवडून त्याचे नाट्य रूपात रूपांतर करून बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून शिकवल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासात गोडी निर्माण झाली. बोलक्या बाहुल्या शाळेतील शिक्षक स्वतः बनवतात व कपडे, केस यांची पाऱ्यानुसार निवड केली जाते. मुलगा, मुली, मासे, कार्टून छोटा भीम, राजू, कृष्णा, जोकर, पक्षी असे. विविध प्रकारचे 55 पपेट तयार करण्यात आले असून, पाठ्य घटक नाट्य रुपात रूपांतरीत करून मनोरंजनात्मक पध्दतीने शिकवले जाते.

इयत्ता 5वी ते 10 वी पर्यंत दररोज कोणत्याही एका तासिकेचे नियोजन करून बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून अध्यापन केले. जाते. यामूळे उपस्थिती शाळा सुटेपर्यंत असते. पारंपारीक अध्यापनापेक्षा बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून पाठ्यपुस्तकातील घटक नाट्यीकरणातून शिकवलेला

विद्यार्थ्याच्या कायम स्मरणात राहतो. शिवाय त्यांचे आवडते कार्टून्स, पपेट प्रत्यक्षात त्यांच्या सोबत असतात.

दिव्यांग व स्वमग्न विद्यार्थी आणि पपेट-

प्रशालेमध्ये काही दिव्यांग व स्वमग्न विद्यार्थी आहेत त्यांना व्यक्त होणे सहज जमत नव्हते ते इतर विद्यार्थ्यांशी मोकळे बोलणे व खेळणे टाळत होते. या अनुभवातून आम्ही दिव्यांग व स्वमग्न विद्यार्थ्यांना खेळण्यास पपेट दिले. सुरुवातीला ते त्यात रमत नव्हते मात्र हळूहळू बाहुल्यांशी बोलायला



लागले त्यांना आपल्या भावना सांगायला लागले. राग, दुःख, नैराश्य या भावना व्यक्त करतांना दिसून आले यामुळे दिव्यांग व स्वमग्न विद्यार्थ्यात असलेला न्यूनगंड दूर करून विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात खूप मोठी मदत झाली. ज्या वेळी शिक्षक वर्गात नसतात त्यावेळी किंवा खेळण्याच्या तासिकेला दिव्यांग व स्वमग्न विद्यार्थ्यांना पपेट खेळायला देतात विद्यार्थी या बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून स्वतःच्या भावना, दुःख, विचार व्यक्त करतात. अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेविषयी गोडी लागली ते मुक्तपणे खेळात व सर्व विद्यार्थ्यांमध्ये सहभागी होऊ लागले.





नैतीकमूल्य देशव्यापी समस्यांची जनजागृती –

विद्यार्थींना, ऍनीमेशन फिल्म, व कार्टून्स बघण्यास आवडते त्यांचा बराच वेळ यात वाया जातो व त्यांच्या आवडत्या कार्टून ने किंवा हिरोने सांगितलेले त्यांना पटते व दिर्घकाळ स्मरणात राहते. म्हणून विविध अभियान व देशव्यापी समस्यांचे जनजागृती ही बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून नियोजन बद्ध पध्दतीने करण्यात आली. शिक्षकांनी सांगितलेल्या सूचना किंवा मार्गदर्शन विद्यार्थी मन लावून ऐकत नाही किंवा विसरतात मात्र, त्यांच्या आवडत्या पाऊाने किवा पपेटने मनोरंजनात्मक पद्धतीने सांगितले ते स्मरणात ठेवतात. ऐकणे व बघून ऐकण्यात फरक असतो म्हणून अध्यापन उत्कृष्ट पद्धतीने घडवून आणण्यासाठी नाट्यिकरण पध्दती फार प्रभावी ठरल्यामुळे जनजागृती मोहीम ही जि. प. प्रशाला शिवना गावच्या नागरीकांनाही अनोखी व दर्जेदार वाटली. विद्यार्थ्यांना परिपाठाच्या वेळी सामूहिक रित्या पपेट शोच्या माध्यमातून जनजागृती केली जाते व गावात मोकळ्या जागी किंवा वेशीत लोकांना जमवून वेगवेगळ्या मोहिम, अभियान व समस्यांचे जनजागृती आम्ही करतो. बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून दिलेला संदेश लोकांना पटतो .

गतीमंद विद्यार्थ्यांसाठी अध्यापन –

आमच्या शाळेत काही गतीमंद विद्यार्थी आहेत. त्यांनाही बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून शिकवलेले समजते. घटकाचे नाट्य रुपांतर जसेच्या तसे करून दाखवतात व बोलक्या बाहुल्या प्रत्येक पात्रानुसार कोण काय म्हणाले ते ही सांगतात. म्हणून आमच्या शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षणा बरोबरच नैतिकता व देशव्यापी समस्यांचे जनजागरण करण्यासाठी बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मनोरंजनात्मक अध्यापन दर्जेदार व यशस्वी ठरले आहे. बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून देशव्यापी समस्यांचे जनजागरण करणे हा नवा उपक्रम सुरू केल्यापासून देशातील समस्यांची ओळख झाली तसेच बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून जनजागृती करत असताना विद्यार्थी व पालक यांनी नाट्यरूपात ज्या समस्या समजून घेतल्या त्यावर उपाययोजना करून त्यांनी विविध समस्या दूर करण्याच्या प्रयत्न केला. तसेच सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले. बोलक्या बाहुल्या संदेश देत असताना विद्यार्थी व पालकांच्या हृदयापर्यंत संदेश पोचवत असतात. यामुळे त्यांच्याच बोली भाषेमध्ये त्यांना मार्गदर्शन केल्यामुळे व सुप्रसिद्ध नायक किंवा कार्टून म्हणजे बाहुल्या आपल्याशी प्रत्यक्ष बोलत असल्यामुळे विद्यार्थी व पालकांना प्रेरणा मिळून विविध समस्यांवर मार्ग काढून उपाययोजना करण्यात येतात .



जनजागृती यादी -

- बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून देशव्यापी समस्यांचे जनजागरण
- स्वच्छ भारत अभियान
- बेटी बचाव बेटी पढाव
- अंधश्रद्धा निर्मूलन
- तंबाखू मुक्त शाळा
- तंबाखू मुक्त गाव
- जागो मतदार जागो
- सर्व शिक्षा अभियान
- शाळेची विद्यार्थी गळती थांबवणे
- शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात आणणे
- हर घर तिरंगा
- पर्यावरण संवर्धन
- झाडे लावा झाडे जगवा
- जलसंवर्धन
- वसुंधरा वाचवा



लोकमत

बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती

सिल्लोड : तालुक्यातील शिवना येथील जि. प. प्रशालेत कार्यरत असलेल्या राज्य आदर्श शिक्षिका सरला कामे-कुमावत यांनी जागो मतदार जागो या उपक्रमांतर्गत बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्याचे एक अनोखे अभियान राबविण्यास सुरुवात केली आहे. त्या या उपक्रमांतर्गत गावागावात शाळेत जाऊन बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती करीत आहे.

भारताचा सर्वांत मोठा आधारस्तंभ म्हणजे लोकशाही आणि लोकशाहीचा उत्सव म्हणजे मतदान येत्या २१ ऑक्टोबरला विधानसभेच्या निवडणुका होणार आहे. लोकशाहीला बळकट करण्यासाठी योग्य प्रतिनिधी निवडून आपल्या देशाचा विकास घडवायचा असेल, तर त्यासाठी मतदारांनी मतदान करणे गरजेचे असल्याचे शिक्षिका सरला कामे या जनजागृतीदरम्यान सांगत आहे. शासनाच्या या मोहिमेत त्यांची मोलाची भूमिका दिसत आहे. शिक्षिका असताना शाळेचे सर्व काम उरकून त्यांनी ही मोहीम हाती घेतल्याने सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

त्यांच्या या समाजसेवेची व राष्ट्रीय कामाची दखल घेऊन महाराष्ट्र शासन व अनेक संस्थांनी त्यांना सन्मानित केले आहे. त्यांच्या या कामात अशोक कुमावत, बबनराव सोनवणे, गटशिक्षणाधिकारी सिरसाठ आदींचे मार्गदर्शन लाभते. सर्व मतदारांनी आपल्या हक्काचा वापर करून मतदान उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन त्या आपल्या अभियानात जनतेस करीत आहे.

शिक्षिका सरला कामे-कुमावत 'जागो मतदार जागो' या उपक्रमांतर्गत एका शाळेत बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती करताना.

देशव्यापी समस्यांचेही जनजागरण

- सरला कामे या बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मनोरंजनात्मक अध्यापन तर करतातच शिवाय स्त्रीभ्रूणहत्या, मुलींवर होणारे अत्याचार, प्लास्टिक मुक्त भारत, स्वच्छ भारत अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन यासारख्या देशव्यापी समस्यांचे जनजागरण बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून व पोस्टर प्रदर्शन व व्याख्यान यांच्या माध्यमातून करतात.

रंगीला म्हणतो, 'कोरोनापासून स्वतःचा बचाव करा'

बोलक्या बाहुल्यांच्या साहाय्याने कोरोनावर जनजागृती ; जि.प. शिक्षिका सरला कामे यांचा उपक्रम

• उमेश जोशी





औरंगाबाद : अवघ्या जगाला हादरवून सोडणाऱ्या कोरोना ह्या विषाणूमुळे जनमाणसात भीतीचे वातावरण निर्माण झाला आहे. औरंगाबादेतही या विषाणूने थैमान घातले आहे. यापासून काळजी घेणे गरजेचे असून याबाबत जिल्हा परिषद शिक्षिका सरला कामे ह्यांनी आपल्या विशिष्ट बोलक्या बाहुल्यांच्या साहाय्याने कोरोनाबाबत जनजागृतीचे काम हाती घेतले आहे.

सरला कामे ह्या आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त शिक्षिका आहेत. त्या ज्ञानदानासोबतच समाजसेवाही करतात. मुलांना हसत खेळत अभ्यासाची गोडी लागावी ह्यासाठी त्यांनी विशिष्ट अशा बोलक्या बाहुल्यांची निर्मिती केली आहे. वेगवेगळ्या ठिकाणी त्या ह्या बाहुल्यांच्या साहाय्याने अभ्यासपूर्ण लघु नाटिका, खेळ आदींच्या माध्यमातून अभ्यासक्रमातील तसेच दैनंदिन जीवनातील गोष्टींचा समावेश करून मुलांना शिकवण देतात. दरम्यान सद्यस्थितीत कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव पाहता लोकांमध्ये कोरोना विषाणूंबाबत आवश्यक माहिती तसेच घ्यावयाच्या काळजीबाबत सरला कामे जनजागृती करत आहेत. यासाठी त्या आपल्या बोलक्या बाहुल्यांचे सहकार्य घेत आहेत.

कोरोना जनजागृतीसाठी सरला कामे यांनी रंगीलाह्या बोलक्या पोपटाची विशेष निर्मिती त्यांनी केलेली आहे.

रंगिलासोबत गप्पा मारताना कोरोना व्हायरसबद्दल कशा पद्धतीने मात केली पाहिजे, स्वतःचं संरक्षण कसं केलं पाहिजे, आणि कोरोना व्हायरस नष्ट कसा केला पाहिजे याबाबत त्या माहिती देतात. यात त्यांचा रंगीला पोपट कोरोनावर विशिष्ट गाणीही गातो तर इतर बोलक्या बाहुल्यांच्या साहाय्यानेदेखील नाटिकेद्वारे कोरोनाबाबत जनजागृती केली जाते. मुलांना समजतील अशा सहज सोप्या भाषेत शब्द वापरून, वाक्यरचना करून अत्यंत रंजक पद्धतीने ज्ञानवर्धक माहिती दिली जाते. या उपक्रमात [redacted] कामे हेदेखील मदत करतात.

सध्या शासनाने दक्षता म्हणून शाळांना सुट्या दिलेल्या असल्याने तसेच नागरिकांना बाहेर जाण्यास मज्जाव केलेला असल्याने सरला कामे ही जनजागृती फेसबुक, युट्युब, व्हॉट्सएप आदी सोशल मीडियाच्या माध्यमातून करत आहेत. नागरिकांनी कोरोनाबाबत जास्तीत जास्त काळजी घेऊन कोरोनाला हद्दपार करण्यात शासनाला सहकार्य करावे तसेच बोलक्या बाहुल्यांचे व्हिडीओ पाहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

सर्वांसाठी लाभदायक उपक्रम

कोरोनाबाबत अनेकांना अद्यापही विस्तृत माहिती नाही. म्हणून लहान मुलांसोबतच मोठ्यांसाठीही हे जनजागृतीपर व्हिडीओ फायदेशीय आहेत. प्रत्येकाने स्वतःची काळजी घेतल्यास कोरोनापासून आपण आपला व आपल्या कुटुंबीयांचा बचाव करू शकतो. यासाठी शासनाने दिलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करा आणि आमचे घरच्या मंडळींसोबत आमच्या बोलक्या बाहुल्यांचे व्हिडीओ पहा, त्यातून कोरोनाबाबत आणखी बरीच माहिती तुम्हाला मिळणार आहे.

–सरला कामे
(जि.प. शिक्षिका)

प्लास्टिक, तंबाखु मुक्त, स्वच्छता अभियानाची शपथ

शिवना। प्रतिनिधी





जि.प.प्रशाला शिवना व ग्राम पंचायत कार्यालय शिवना यांच्या संयुक्त सहभागाने शिवना येथील नागरिकांनी प्लास्टिक मुक्त, तंबाखू मुक्त, हागणदारी मुक्त व स्वच्छता अभियानाची शपथ घेतली.

दि.३ रोजी जि.प.प्रशाला शिवना शाळेने विविध घोषणा देत शिवना गावातून प्रभात फेरी काढली यावेळी महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर आधारित नाटिका सादर करून नागरिकांना प्लास्टिक मुक्त भारत व स्वच्छता अभियान याबाबत जनजागृती केली. यावेळी शाळेतील सावित्रीबाई फुले राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षिका सरला शामराव कामे यांनी बोलक्या बाहुल्याच्या माध्यमातून नागरिकांना व महिला पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बबनराव सोनवणे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांना व नागरिकांना शासनाच्या विविध योजना व नागरिकांचे कर्तव्य याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक जि.प.सदस्य गजानन राऊत, मुरलीधर काका, सलीम शेख (पं.स.सदस्य), सरपंच संतोषराव जगताप, उपसरपंच अरुणभाऊ काळे, हाजी साहेब, एकनाथराव राऊत (तंटा मुक्ती अध्यक्ष) विनायक काटकर (तंटा मुक्ती उप अध्यक्ष), सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुभाषचंद्र काळे ,श्री दादाराव जाधव, ग्रा. पं.सदस्य सचिन राऊत, शेख साफिक बिबन कुरेशी जब्बार शेख ,ज्ञानेश्वर वाघ, इस्माईल कुरेशी, सिंधुबाई राऊत, कुसुमबाई धनवई, तबस्सुम पठाण, अलकाबाई राऊत, चंचलाबाई दांडगे, ज्योती सपकाळ, रंजनाबाई काळे, मोनाली काळे, शफिबिबी सालन चाऊस, सर्व आजी माजी ग्रा.पं.सदस्य, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन गजानन राऊत व सर्व सदस्य , ग्रामसेवक रवींद्र पाटील, तलाठी शेरकर वैद्यकीय अधिकारी व सर्व कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका,पत्रकार एजाज पठाण, अमोल चितळे, गणेश जमादार ,गणेश जाधव, सुभाष होळकर ,अमोल काळे, दिपक गुप्ता, नदीम शेख, मुश्रफ शेख, दिनेश भागवत यांनी उपस्थित राहून प्लास्टिक मुक्त व स्वच्छता अभियानाची शपथ घेतली. कार्यक्रमाचे संचालन सरला कामे व विजयानंद काळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी शाळेतील पर्यवेक्षक देविदास बाविस्कर, माध्यमिक शिक्षक अरुण राउत, विलास सपकाळ, किशोरकुमार गव्हारे, इसील तडवी, भटू मैराळे, दिपक बावस्कर, दिपक काळे, क्रीडाशिक्षक रामकिसन गायकवाड, दिपक सावळे, जगदीश रिंढे , विद्या सोनगिरे ,संध्या तायडे, माधुरी [redacted]कर, भगवान बोडखे यांनी परिश्रम घेऊन [redacted] यशस्वी केला.

शाळेतील इतर उपक्रम -

१) संशोधनामध्ये रोबोटिक बाहुली ही अतिशय महत्त्वाची ठरली, पंचक्रोशीत या बाहुलीचे कौतुक झाले . ही बाहुली गुगलशी जुळली असल्याने जगभरातील माहीती सांगते.

२) शाळेतील मुलींना सॅनेटरी पॅडचा वापर कसा करावा आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, मुलगी वयात येताना कोणता पोषक आहार घ्यावा, कोणते खेळ खेळावे याबद्दल सतत मार्गदर्शन करीत सॅनेटरी पॅड उपलब्ध करुन देतो.

३) त्याचबरोबर मुलींना स्वरक्षणासाठी कराटेचे प्रशिक्षण प्रशिक्षण शाळेतल्या शिक्षिका सरला कामे देतात स्वतःचे रक्षण करणे आत्मविश्वास वाढवणे हा त्या पाठीमागचा उद्देश आहे.

४) दुर्गम आदिवासी भागातील मुली आता स्वतःचं संरक्षण स्वतः करू शकतात शाळेत येतांना घाबरत नाहीत. शाळेपासून पाच किलोमीटर अंतरावर राहणाऱ्या मुलींना विविध संस्थांच्या माध्यमातून शाळेत येण्यासाठी सायकल उपलब्ध करून दिल्या. सायकल मिळाल्यामुळे मुलींचा शाळेत येण्यासाठी जो पायी प्रवास होता तो कमी झाला व त्या रोज शाळेत यायला लागल्या.

५) शाळेच्या विकासासाठी गावातील श्रीमंत लोकांकडून वर्गणी करून शाळेत संगणक, सीसीटीव्ही कॅमेरे, माईक, स्पीकर, यांसारख्या वस्तू उपलब्ध करून घेतल्या.

६) पिण्याच्या पाण्यासाठी अक्वागार्ड फिल्टर समाजाच्या सहभागातून घेतला व त्याचा वापर करून मुलांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले.

७) शौचालयामध्ये स्वच्छतेसाठी पाण्याची सोय केली.

८) शाळेतील परिसरात विविध प्रकारचे वृक्षारोपण केले व शालेय वातावरण शोभिवंत झाले.


९) लोकवर्गणीतून शाळेला रंगरंगोटी केली, शैक्षणिक साहित्य निर्मिती केली.

१०) चालते फिरते चिकटबुकच्या माध्यमातुन इन्टरनेट तयार केले आहे या चिकटबुक मधुन विद्यार्थी जगभरातील माहीती घेतात.

समारोप -

जिल्हा परिषद प्रशाला, शिवना येथे आम्ही एक अभिनव उपक्रम राबवून गळती, स्थगीतीचे प्रमाण कमी करून विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवली. दुपार सञात निघून जाणारी मुले पुर्णवेळ शाळेत टिकवण्यात यश मिळाले. त्याच प्रमाणे दिव्यांग, स्वमग्न, गतिमंद व मतीमंद विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यात आम्हाला, बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मनोरंजनात्मक अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत मदत झाली. विविध उपक्रम, अभियान, देशव्यापी समस्या याबाबत जनजागृती करण्यासाठी बोलक्या बाहूल्यांचा वापर करून गाव व शाळा पातळीवर बदल झाला. मनोरंजनात्मक अध्यापन व देशव्यापी समस्या या माध्यमातून जनजागृती हा दर्जेदार उपक्रम आहे.

विविध उपक्रमांच्या माध्यमातून जिल्हा परिषद प्रशाला, शिवना ही औरंगाबाद जिल्ह्यातील एकमेव ISO माध्यमिक शाळा असून UNESCO क्लब प्रमाणित आहे.





बोलक्या बाहुल्यांनी आणली अभ्यासात गोडी



पुणनगरी

City NIEWS

बोलक्या बाहुल्यांनी दिले शिक्षणाला बळ!

शिक्षिकेची शक्कल : स्वखर्चातून वेगळा पायंडा, विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वाढली

Sunday Special

भीमसेन सरकटे

विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली

बाहुल्या आवडतात



ग्रामीण

लोकमत

बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मनोरंजनात्मक शिक्षण

श्यामकुमार पुरे

सरला कामे

संरक्षणासाठी मुलींना कराटे प्रशिक्षण

आम्ही सावित्रीच्या लेकी !



'झेडपी'च्या विद्यार्थ्यांची नवी मैत्रीण 'ॲलेक्सा'

इंग्रजीची भीती दूर करण्यासाठी उपक्रम शील शिक्षिका सरला कामे यांचा प्रयत्न

उ. वि. जोशी

विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत मनोरंजनाची मेजवानी

मनोरंजनातून दर्जेदार शिक्षण

न्यूयॉर्कमधून निमंत्रण

YouTube Links –

1) https://youtu.be/P7rrKbZ0anI?si=J4SWijnV1fCU08G5
2) https://youtu.be/3FnhGrmto9g?si=vp1c9eeNVqcTzqFX
3) https://youtu.be/tba6ln1jkLg?si=UYdXNOD43yVETX6H
4) https://youtu.be/F9tHBa1R4Jg?si=hunG6tf_Rkczmx3B
5) https://youtu.be/jasfrTpjSCQ?si=wLHY6DMlo3TS5FMu

नाविन्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव - जिल्हा परीषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा सातारा (खं) ता.जि. छत्रपती संभाजीनगर

ई.मेल – zpschoolsatara@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – श्रीम.मंजुश्री दिगंबरराव राजगुरू

सहशिक्षक – श्रीम.गीता भागवतराव गवळी

ध्येयपूर्ती ...

डोंगराच्या कुशीत, जि.प.शाळा सातारा।

तेथे पाझरतो ज्ञानाचा अखंड झरा.....॥

ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते,

त्या ज्ञानाचे मंदिर हे,

सत्य शिवाहून सुंदर हे.....

प्रास्ताविक -

मराठवाडा विभागाची राजधानी असलेल्या महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या सातारा गावातील जिल्हा परीषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा (खं) पंचायत समिती, औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद शाळेची ज्ञानाची भरारी काय वर्णावी ....

सातारा हे गाव औरंगाबाद तालुक्यातील डोंगरपायथ्याशी वसलेले असून शहरापासून 4 कि.मी. अंतरावर आहे. पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांनी जीर्णोद्धार केलेल्या श्री.क्षेत्र खंडोबा मंदिराचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या परिसरात शाळा आहे. डोंगराच्या कुशीत निसर्गरम्य वातावरणात शाळेचा भव्य परिसर मनाला सुखावून जातो.

जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा सातारा ही शाळा भारतातील पहिली जिल्हा परिषदेची आय.एस.ओ. मानांकन प्राप्त शाळा आहे. त्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम.मंजुश्री राजगुरू, शा.व्य.स., प्रतिष्टित नागरिक, सर्व शिक्षकवृंद व पालक वर्ग यांनी अपार मेहनत घेतलेली आहे. गावक-यांच्या मदतीने पालक सहभागातून शाळेमध्ये भरपूर सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. शाळेत गुणवत्तापूर्ण उपक्रम विदयार्थ्यांसाठी घेतले जातात. विदयार्थ्यांच्या गुणवत्तेसोबत त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले जाते. ही शाळा औरंगाबाद जिल्ह्यामध्ये एक उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाते.

शाळेला शिक्षणाचा केंद्रबिंदू असलेल्या विदयार्थी,पालक व शिक्षक मिळून यशाची उतुंग भरारी घेऊन जीवनाला आकार देतो. गुरूने दिला ज्ञानरूपी वसा या उक्तीला सार्थ करून दाखवणा-या उपक्रमशील मुख्याध्यापिका श्रीम.मंजुश्री राजगुरू मॅडम यांनी सन 2007 साली शाळेच्या विकासाची धुरा खांदयावर घेत शाळेचा गुणवत्ता आलेख सातत्याने आजापर्यंत उंचावत नेला आहे. विदयार्थी गुणवत्ता विकास ह्या एकाच ध्येयाने प्रेरित झालेल्या मॅडमनी पालक, गावकरी व शिक्षक यांच्या मदतीने शाळेचा चेहरा-मोहरा बदलून शाळेचा कायापालटच केला.

2007 साली असलेला शाळेचा 176 चा पट 632 वर पोहोचलेला आहे. आदर्श शाळा,वैज्ञानिक दृष्टीकोन, सर्वांगीण विकास व नितीमूल्याची रूजवणूक करणारे शिक्षण देण्यासाठी गावकरी,शाव्यस, शिक्षक व अधिकारी यांनी विडा उचलत नियोजन बद्ध कार्यक्रम आखला.



" गाव करी ते राव काय करी..... "

या म्हणीला सार्थ करीत शिक्षकवृंदांनी व गावक-यांनी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करून ' शाळा जुनिच पण ओळख नवी ' प्रमाणे शाळेची सर्व अदययावत सुविधांयुक्त इमारत तयार झाली. डोंगराच्या कुशीत निसर्गरम्य वातावरणात शाळेची इमारत व शाळा परीसर भुषणच ठरली.

शाळेतील अदययावत व्हर्चूअल क्लास रूम, नाविण्यपूर्ण प्रयोग शाळा, मुलामुलींसाठी स्वतंत्र सच्छतागृह, रूम टू रीड, बालवाचनालय, वाईल्ड लाईफ कक्ष, खगोलशास्त्र कक्ष, नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ व परमवीर चक्र विजेते माहिती कक्ष, डेन्स फॉरेस्ट, शुद्ध पेयजल योजना, हॅण्डवॉश स्टेशन, पाण्याचा हौद, परसबाग, क्रीडांगण, खेळणी इ. भौतिक सुविधांनी शाळा परीपूर्ण झाली.

शाळेत राबविण्यात येणा-या दर्जेदार व नाविण्यपूर्ण उपक्रमांमुळे गावात व पंचक्रोशीत शाळेचे नाव चर्चेत येऊ लागले. हल्ली इंग्रजी माध्यमांचे पेव फुटले असताना देखील पालकांना या शाळेत मुलांना प्रवेश घेण्यासंबंधी विश्वासार्हता निर्माण झाली आणि पाहता पाहता शाळेच्या पटसंख्येचा आलेख उंचावत चालला आहे.

तिमीरातूनी तेजाकडे जाण्यासाठी विदयार्थी गुणवंत, ज्ञानवंत, नितीवंत घडविणे ख-या अर्थाने शाळेत सुरू झालेल्या विविध उपक्रमांतून निदर्शनास येऊ लागले शाळेची शिस्त, नियम पाळून छोटी मुले फुलांसारखी बहरत व ज्ञानाचे धडे घेत आहेत.

गळती रोखणे -

विदयार्थ्यांची गळती रोखण्यासाठी शाळेकडून विविध उपाययोजना केल्या जातात. वेळोवेळी पालकांना विदयार्थ्यांच्या गुणवत्तेबाबत सांगितले जाते. माता-पालक सभा, FLN माता गटाकडून इतर माता पालकांना शाळेच्या संपर्कात ठेवून विदयार्थी प्रगती साधली जाते. विदयार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. पालकांच्या स्थलांतराबाबत विदयार्थ्यांच्या शिक्षणाची हमी देणे. शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्यांचा लाभ मिळवून देणे, विविध सूप्त गुणांना वाव देण्यासाठी उपक्रमाचे आयोजन करणे, इ. प्रयत्न केले जातात.

बिन भिंतीची उघडी शाळा लाखो इथले गुरू।

झाडे, वेली, पशु-पाखरे यांसी दोस्ती करू॥

शालेय परीसरात पर्यावरणाची ओळख महत्व आणि उपयोग करून देणारा मियावाकी घनवन प्रकल्प उभारण्यात आला असून 52 प्रजातींची 700 वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. तसेच शालेय परीसरात अनेक प्रकारची झाडे लावलेली असून त्यांच्या भोवती बांधलेल्या पारांवर पर्यावरण विषयक घोषवाक्य विदयार्थ्यांच्या ज्ञानात भर घालतात अशा या निसर्गरम्य परिसरात विदयार्थी दिवसभर आनंदवनासारखे मुक्त शिक्षण घेतात.

झाड हलवा, शब्द पाडा ..... होय हे खरे आहे.

विदयार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढवण्यासाठी व स्वयंअध्ययन रूजवणुक करण्यासाठी शब्दांची चक्क झाडेच बनवली आहे. विदयार्थी गटात बसून शब्द ओळखतात, लिहीतात व वाचतात त्याचप्रमाणे भाषिक विकासासाठी शब्दकुंभ विदयार्थ्यांसाठी रोज तासिका निहाय खुला होतो. मराठी व इंग्रजी भाषा विकास होण्यासाठी हजारो शब्दपट्ट्या कुंभात विदयार्थी स्वतः बनवून टाकतात " विषयमित्र " संकल्पनेनुसार मिळवून शिकतात यामधून त्यांचे भाषिक कौशल्य लेखन, व्याकरण वृद्धींगत होते.



" मी सुद्धा स्पर्शू शकतो आकाश,

फक्त संधी मिळण्याचा अवकाश..... "

विदयार्थ्यांना अवकाशीय खगोलीय घटना माहित होण्यासाठी सदरील कक्षाची स्थापना शाळेत करण्यात आलेली आहे. या कक्षात आकाशगंगा, अवकाश यात्री, अवकाशयान, ग्रह, उपग्रह, तारे, सुर्यग्रहण, चंद्रग्रहण, पृथ्वीची आंतररचना, उल्कापात, चंद्राच्या कला, इत्यादींने माहिती व पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत. विदयार्थी सदरील कक्षामध्ये भौगोलिक अभ्यास करण्यासाठी जातात.

" जीवनमे कोई काम अच्छा करे,

वनो और वन्यजीवों की रक्षा करे ॥ "

शाळेमध्ये पर्यावरण संवर्धन व वन्यजीव संरक्षण माहिती व कायदा विषयक जनजागृतीसाठी वाईल्ड लाईफ क्लबची स्थापना करण्यात आलेली आहे. यामध्ये वन्यजीव संरक्षण कायदा, वन्यजीवांचे अधिवास, परिसंस्था व जैविक विविधता यांसंदर्भिय माहिती चित्र स्वरूपात दर्शविली आहेत. विदयार्थी सदरील कक्षामध्ये तासिका निहाय जाऊन माहिती मिळवतात.

" भारत हमे जान से प्यारा है ..... "

भारतीय सेनेचे जवान नेहमी कर्तव्याची जाण ठेवत दिवसरात्र आपल्या देशाची, देशाच्या नागरिकांची रक्षा करत असतात. देशावर कुठलेही संकट आले की जवान त्यांच्या समोर एक मजबूत भिंतीप्रमाणे उभे राहतात. ज्यांच्या शौर्याची कहानी आपल्याला भारताच्या प्रत्येक घरात ऐकायला मिळते असे आपल्या भारतीय सेनेतील जवान खरच खुप शुर आहेत. हे देशभक्तीचे मूल्य बालवयात रूजवण्यासाठी व जवानांच्या शौर्यकथांची माहिती मिळवण्यासाठी परमवीर चक्र विजेते माहिती कक्ष शाळेत स्थापन केलेला आहे. विदयार्थी नियमित शौर्य गाथांचे वाचन करतात.

विज्ञानाची क्रांती, विज्ञानाची प्रगती.

विज्ञानाचा नवा ध्यास।

विज्ञानाने देशाचा विकास ॥

वैज्ञानिक दृष्टीकोन वाढवण्यासाठी विदयार्थ्यांना प्राथमिक शिक्षणामध्येच थोर शास्त्रज्ञ, संशोधक व त्यांची शोध विषयक माहिती साठी नाविण्यपूर्ण विज्ञान प्रयोगशाळा अदययावत साधनांसह उपलब्ध आहेत.
पायाभूत साक्षरता आणि अंकगणितीय क्षमता निपूण भारत अंतर्गत FLN माता पालक गटाचे नियमित बैठका आयोजित केल्या जातात. IDEA च्या माध्यमातून माता पालक व शिक्षक, विषयमित्र यांच्या सहाय्याने पायाभूत साक्षरता आणि अंकगणितीय क्षमता विकसित केल्या जातात. विदयार्थ्यांची 100% गुणवत्ता विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातात.



मिशन आय.ए.एस (IAS) -

मंजिल उन्हीको मिलती है, जिनके सपनो मे जान होती है।

पंखो से कुछ नही होता, हौसलो से उडान होती है॥

आजच्या स्पर्धेच्या युगात गुणवत्तापुर्ण शिक्षणाबरोबरच स्पर्धापरीक्षेचीही तयारी होण्यासाठी विविध गुणवत्ता विषयक स्पर्धा घेतल्या जातात शाळेव्यतीरिक्त वेळात विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

शरीर खलु धर्म साधनम् .....

निरोगी शरीरात निरोगी मन वास करते.

विदयार्थ्यांच्या बौद्धीक विकासासासोबतच शारीरिक व मानसिक भावनिक विकास साधण्यासाठी शाळेमध्ये क्रीडा साहित्यासह क्रीडांगण उपलब्ध आहे. विविध स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या क्रीडास्पर्धेत विदयार्थी बिटस्तर, तालुका व जिल्हा स्तरावर चमकले आहेत.

माझी कला माझी कृती-कलादर्शन.....

विदयार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी, अल्फाबेट रांगोळी, वैज्ञानिक रांगोळी, भौगोलिक रांगोळी, उपस्थिती ध्वज, मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा, गणित जत्रा, आनंदनगरी, पाककला स्पर्धा, स्नेहसंमेलन, चित्रकला स्पर्धा, नृत्य, गायन, भाषण, नाट्य, कविता सादरीकरण निबंध स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. विदयार्थी उस्फूर्तपणे आपल्या आवडीनुसार स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यशस्वी होतात.

उपक्रमशील, गुणवत्तापूर्ण निसर्गरम्य परिसरातील अशा या डिजीटल शाळेमध्ये शिक्षक, पालक, विदयार्थी रमतात. चिमुकले आनंददायी शिक्षण घेतात जिल्हयामध्ये नावारूपास आलेल्या या शाळेची यशोगाथा गेल्या दिड दशकापासून सर्वांच्या परिचयाची आहे. शैक्षणिक प्रगतीचा वाढता आलेख पाहता स्थानिक पदाधिकारी, प्रशासकीय आधिकारी, विविध संस्थास, मा.मंत्री महोदय यांनी विशेष भेटी दिलेल्या आहेत. या सर्वांच्या प्रेरणेने शाळा विकासास प्रोत्साहन मिळाले आहे.





जुनी शाळा इमारत



नविन शाळा इमारत (शाळा कार्यालय)



क्रिडा क्षेत्रातील यश



कला क्षेत्रातील यश



पटनोंदणी पंधरवाडा प्रवेशदिंडी



लोकमत

आय विटनेस बन ठण के... स्कूल चले हम...

शाळेच्या पहिल्या दिवशी सातारा जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांत असा उत्साह संचारला होता. मुले सजूनधजून व तोंडाला रंगीत मास्क, डोक्यावर वाढदिवसाच्या टोप्या आणि हाती चेंडू घेऊन धावतच वर्गाकडे निघाली. शाळेतर्फे जोरदार स्वागत झाल्याने बच्चे कंपनी आनंदली. त्यांचा आनंद अवर्णनीय होता. (छाया - फिरोज खान)

Hello Aurangabad
Page No. 3 Jun 16, 2022
Powered by: erelego.com

पहिले पाऊल उपक्रम वर्तमानपत्र प्रसिद्धी



प्रवेशोत्सव पहिले पाऊल मेळावा उपस्थिती शालेय शिक्षण मंत्री मा.वर्षाताई गायकवाड



मा.ना.श्रीम.वर्षाताई गायकवाड प्रवेशोत्सव कार्यक्रमात पहिले पाऊल अनावरण करताना





विदयार्थी गळती थांबवणे बाबत FLN माता गटांना मार्गदर्शन व सत्कार करताना



SCHOOL CAMPUS WITH BEAUTIFUL PAINTINGS



SCHOOL CLEAN AND GREEN



WILD LIFE CLUB INSIDE



ASTRONOMY CLUB PHOTO



ASTRONOMY CLUB WITH MORE PICTURES



BOYS TOILET



PARAMVIR CHAKRA WINNERS AND NOBLE PRIZE WINNER SCINENTIST LAB



DIGITAL CLASSROOM



NEW WELL DESIGNED CLASS ROOM



1 ST DIVISION CLASS ROOM



VIRTUAL CLASSROOM



WATER MANAGEMENT



SCIENCE LAB INSIDE



MARATHI ENGLISH AND MATH LAB



ROOM TO READ LIBRARY



SCHOOL OFFICE



DR.BABASAHEB AMBEDKAR LIBRARY FOR UPPER PRIMARY



LIBRARY INSIDE VIEW



RO WATER PURIFIER



CHILDRENS PLAYING AREA



GIRLS TOILET



GIRLS TOILET



निपूण भारत अंतर्गत माता पालकांचे मार्गदर्शन



स्काऊट गाईड जिल्हास्तरीय मेळावा सहभाग व पारितोषिक प्राप्त



भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत विविध कार्यक्रम



आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजन



Let's Change स्वच्छता मॉनिटर टीम

YouTube Link - https://www.youtube.com/watch?v=P_wWS7UhFYo

आनंददायी शिक्षणासाठी विविध उपक्रम

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोविंदनगर,वरठाण, ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर

Email ID - zppsgovindnagr@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री. सुजित रंगनाथ फलके

प्रास्ताविक-

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोविंदनगर वरठाण ता. सोयगाव जिल्हा छत्रपती संभाजीनगर ह्या दुर्गम भागात वसलेल्या शाळेने मागील पाच वर्षात उल्लेखनीय प्रगती केलेली आहे. यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता असो भौतिक सुविधा असो शालेय नवोपक्रम,शालेय शिस्त,नावीन्यपूर्ण उपक्रम, तंत्रस्नेही उपक्रम अशा प्रत्येक बाबतीत शाळा उत्कृष्ट कार्य करत आहे. कधी काळी जीर्ण झालेली शाळा आपल्या ह्या वैभवामुळे कात टाकत आहे. जिथे कधी काळी गावातील श्वापदांचा उपद्रव होत होता. गावातील लोकांसाठी गाव अड्डा होता. घाणीचे प्रचंड साम्राज्य होते. शाळेकडे पाहिल्यावर एका पडक्या वाड्याचे चित्र उभे राहत होते. शाळा एक भकास रूपात होती. मुलांचे शिक्षण एक आभासी चित्र होते. निरुत्साही पालक यामुळे आणखी शाळेची वाताहत होत होती. पण काळ बदलला नव्या दमाचे नवीन शिक्षक श्री. सुजित फलके आणि श्री. दीपक नगरे या शाळेत रुजु झाले आणि शाळेचा कायापालट झाला. दोन्ही शिक्षक विद्यार्थीप्रिय आणि तंत्रस्नेही तसेच नवोपक्रमशील असण्याचा फायदा नक्कीच शाळेला झाला. त्याचप्रमाणे श्रीम.वैशाली कांबळे मॅडम, प्राचार्य,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,छत्रपती संभाजीनगर,मा.श्रीम.जयश्री चव्हाण मॅडम,शिक्षणाधिकारी प्राथ), जि.प. छत्रपती संभाजीनगर, मा.श्री.रंगनाथ आढाव,गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती,सोयगाव,श्री.शामराव फुसे,शिक्षण विस्तार अधिकारी, बनोटी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. नितीन राजपुत सर गोंदेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. सचिन पाटील सर, गट साधन केंद्रातील विषय साधन व्यक्ती श्री.परमेश्वर कठोरे,श्री.सुनील बावचे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले.

प्रत्यक्ष कार्यवाही –

ओसाड वाटणाऱ्या शाळेची रंगरंगोटी झाली आणि शाळेच्या बदलाचा श्रीगणेशा झाला. शाळेचे बाह्य रुप सुंदर दिसायला लागले.शाळेची पटसंख्या ५२ वरून ७५ करण्यात शिक्षक यशस्वी ठरले. विशेष म्हणजे इग्रंजी माध्यमातील आठ मुले आजही ह्या शाळेत शिक्षण घेत आहे. ग्रामपंचायत वरठाण च्या मदतीने गावचे सरपंच आणि सदस्य यानी शाळेला मदत करायचे आश्वासन दिले. शाळेची डागडुजी झाली. शाळेच्या क्रिडांगणाला पेव्हर ब्लॉक बसवले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शाळेला संरक्षण भिंत ग्रामपंचायतच्या मदतीने मिळाली. संरक्षण भिंतीने शाळेला एक आगळेवेगळे स्वरूप प्राप्त झाले. शाळेत होणारया प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आणि त्यात मिळणारा लोकसहभाग विधायक कामाला लावून शाळेच्या मैदानाला भराव टाकणे, पिण्याच्या पाण्यासाठी पाण्याची टाकी आणि चौथरा, स्वयंपाकगृह दुरुस्ती अशी कामे निस्वार्थी भावनेने केली.वृक्षारोपण करण्यासाठी माळरानावर दगड गोटे होते मातीच्या भरावाची आवश्यकता होती मागील वर्षांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या लोकसहभागात संरक्षण भिंतीलगत अडिच फुटाचे काम करून त्यात मातीचा भराव टाकला आणि शाळेत वृक्षारोपणासाठी जागा तयार केली. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष आणि सद्स्य यांनी दिलेल्या झाडांचे रोपण शाळेत करण्यात आले. गुलाब, मोगरा,जास्वंद अशा विविध फुलझाडांबरोबरच सप्तपर्णि, वड, जांभूळ, बदाम,निलगिरी अशीमोठी झाडे देखील लावण्यात आली आणि एकूणच शाळेच्या सौंदर्यात वाढच झाली. शाळेतील मुले फुलझाडांची जिवापाड काळजी करायला लागली. मुलांमध्ये शाळेविषयी आत्मियता आणि प्रेम वाढायला मदत झाली.बाह्य रूपांतरानंतर शाळेने गुणवत्ता संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. डिझाइन फोर चेंज या उपक्रमापासुन सुरु झालेला हा गुणवत्तापूर्ण प्रवास शिक्षकांच्या सहकार्याने गुणवत्तापूर्ण विकास सुरु आहे.





निसर्गसहल, बालआनंदमेळावा, स्थानभेट, कला क्रिडा महोत्सव,शाळापूर्व तयारी मेळावा, पालक मेळावा, माता पालक मेळावा, प्रतिभावंत शिक्षकांच्या कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध जयंती,शासन स्तरावरील विविध उपक्रमामधील उत्कृष्ट सहभाग, ग्रामस्वच्छता अभियान असे विविध उपक्रम रावबत आणि त्यात नाविन्यता दाखवत शाळेने आपली गुणवत्ता दाखवली आहे. इंग्रजी विषयाची पंचसूत्री हा उपक्रम मुलांना इंग्रजी विषयाची गोडी लावण्यात यशस्वी ठरला. स्पेलचेक परीक्षेत मुलांनी आपला शब्दसंग्रह वाढविला. येथील इयत्ता दुसरीचे विद्यार्थी इंग्रजी वाचन करतात. ३ री ४ थी विद्यार्थी इंग्रजी संभाषण करतात. इंग्रजीत माहिती सांगतात, इंग्रजीत नाटीका करून दाखवतात. ३० पर्यंत पाढे विद्यार्थ्यांचे पाठ आहेत. वाचन करताना अर्थपूर्ण वाचन करतात. गणिती क्रिया वेगवान करतात. योगाभ्यास या उपक्रमात ध्यान धारणा, आनापानसती, भ्रामरी, कपालभाती, अनुलोमविलोम, संगीत योगा यांची ओळख मुलांना झाली. आठवड्यातील शनिवार हा उपक्रमवार झाला. प्राणायाम,वाचन, शैक्षणिक साहित्य वापर, आनंददायी खेळ, सर्वांग सुंदर व्यायाम प्रकार, कृतीयुक्त आनंददायी गीते, आत्मचिंतन पेटी वापर असा जणू उपक्रमांची सरबत्तीच शनिवारी शाळेत असते. शाळेत कधीही जा मुले कोणत्यातरी कार्यात रममाण झालेली असतात. हेच ह्या शाळेच्या कार्याचे फलित आहे. कार्यमग्नता, सातत्यता, दृढता, समर्पक भाव हे गुण मुलांच्या अंगी येण्यासाठी शिक्षक प्रयत्नशील आहेत. शाळेतील सर्वांग सुंदर परिपाठ शाळेच्या कामाची पावतीच म्हणावी लागेल.

मूल्यशिक्षण आणि चालू घडामोडीशी नाळ जोडणारा हा परिपाठ खूपच सुंदर तयार करण्यात आला आहे. सर्व विषयांचे घटक, स्वच्छतेच्या सवयी, नैतिक मूल्ये, थोर पुरुषांच्या कथा, बोधपर कथा, कविता, संभाषण, माहिती, स्थळवाचन,प्रसंगवाचन, चित्रवाचन अशा नानाविध प्रकारचा साठा या परिपाठ सत्रात घेण्याचा शाळेचा नियम त्यासाठी परिपाठाचे उत्तम नियोजन येथे आहे.गावचे सरपंच आवर्जून शालेय परिपाठासाठी वेळ मिळेल तेव्हा हजर राहतात. पालक तसेच माता पालक सभेला त्यांनी वेळोवेळी येउन मार्गदर्शन केले आहे. शाळेने कमी कालावधीत केलेला हा प्रगतीशील प्रवास वाखाणण्याजोगा आहे. शाळेतील शिक्षक श्री. सुजित फलके यांचे नवोपक्रम जिल्हास्तरावर बक्षीसास पात्र ठरलेले आहे. जिल्हास्तरीय ICTC हा तंत्रज्ञानावर आधारित पुरस्कार त्यांना यावर्षी मिळाला आहे. तसेच सकाळ वृत्तपत्राचा लेखक सन्मान त्यांना याच वर्षी मिळाला आहे. शैक्षिक आगाज या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेने मुख्याध्यापक राबवित असलेल्या नवोपक्रमाना सन्मानित केले आहे. सरांच्या कथा आणि कविताना देखील पुरस्कार प्राप्त आहे. श्री. दीपक नगरे सर यांचा आदर्श शिक्षक म्हणून ग्रामपंचायत वरठाण यांनी ग्रामसभेत सन्मान केला आहे. मुलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सरांनी विविध उपक्रम हाती घेतले आहे .शाळेच्या प्रगतीसाठी अनेक घटक मदतगार झाले. यामुळे शाळेचा आंतरबाह्य विकास होण्यास मदत झाली.





फलके सर म्हणतात, गेली पाच वर्ष मी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोविंदनगर वरठाण येथे काम करत आहे. अजिंठा डोंगर रांगेजवळील हे गाव नावाप्रमाणे आहे. सर्व अठरा पगड जाती जमातीचे लोक या गावात गुण्यागोविंदाने राहतात. आर्थिक परिस्थिती हलाखीची असली तरी कणा मजबुत असणारी ही माणसे आहेत. येथील शाळेत काम करायला भेटले ही कृष्णकृपा मी मानतो. गोविंदनगर म्हटल्यावर मी कृष्णप्रेमी येथे आल्यापासून झपाट्याने कामाला लागलो आणि





कार्य चालूच आहे. निर्मळ मन,अनासक्त वृत्ती,सरळ स्वभाव आणि सहकार्यवृत्तीने एक भागवतीक कार्य देवाने मला दिलय याच प्रेमळ भावनेने मी काम करत आहे. आणि सकारात्मक राहण्याचा फायदा पहा. मला माझ्या शाळेत खूप कार्य करायला प्रेरणा मिळत राहते. मनात नवनवीन विचार रुंजी घालतच असतात. आपले प्रिय विद्यार्थी उद्या आपलेच स्वरुप म्हणून जगापुढे येतील आणि माझ्या शिकवणीला सार्थ करतील अशी माझी भावना आहे. १००% नाही परंतु पाच दहा टक्के जरी माझ्या शिकवणीत उतरले आणि एक आदर्श घडले.तरी या शाळेतील माझी मेहनत सार्थकी लागली असे मी समजेल. आज शाळेत पाऊल ठेवले कि मन इतक प्रसन्न होते कि सगळा थकवा निघून काम करायला उत्साह येतो. शाळेतील फुले, मुले, झाडे इमारत एक अस अतूट नात निर्माण झाल की मुलांना सुद्धा एकही दिवस घरी राहावे वाटत नाही. सर्व सुंदर,निर्मळ आणि विलोभनीय वाटत. मनाला एक वेगळ्या प्रकारच समाधान वाटत. इतिहास हा भुतकाळात जमा झाला आणि गोविंदनगर शाळेने मागील पाच वर्षांत कात टाकली. मुलांना आनंददायी शिक्षणाबरोबरच नैतिक मुल्यांचे शिक्षण, योगाभ्यास, नावीन्यपूर्ण उपक्रम यांची ओळख मुलांना झाली. आपल्याला खुप काही शिकायला मिळत या भावनेने विद्यार्थी प्रेरित होतात. परिपाठ शाळेचा आरसा असतो. आम्ही हा आरसा एकदम स्वच्छ आणि नीटनेटका ठेवण्याचा प्रयत्न करतो आणि नक्कीच यामुळे आमचे स्वरूप आणि अंतर निर्मळ होत आहे. पालक शाळेच्या गेटवरुन शाळेतील विविध उपक्रम पाहत असतात आणि हलके हसुन पूढे निघून जातात तेव्हा मनाला एका समाधानाची नक्कीच जाणीव होते कि हो आपण आपले काम योग्य करतोय. मजूर पालक आपल्या मुलांचे भविष्यच आमच्या हातात देताय आणि आपणही त्याला योग्यपणे निभावतोय हे खूप छान वाटत.

विविध उपक्रम –

विद्यार्थ्यांचे आनंददायी गुणवत्तापूर्ण शिक्षण होण्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविण्यात येतात.त्यामध्ये हस्ताक्षर कार्यशाळा,व्यक्तिमत्व कार्यशाळा,कार्यानुभव कार्यशाळा,योगाभ्यास कार्यशाळा,वेळोवेळी सांस्कृतिक कार्यक्रम मूल्यशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येतात.त्यामुळे विद्यार्थी आनंदाने शाळेत येऊन शिकू लागली.त्याचा परिणाम त्यांच्या उपस्थितीवर झाला.









आम्ही काही सर्वोत्कृष्ट नाही परंतु शक्य तितके चांगले अध्ययन अनुभव आपण देउ हाच एक विश्वास मनात आहे. भविष्याचा वेध घेताना मुलांनी पालकांनी आपली आठवण काढावी दोन शब्द आपल्यासाठी आपुलकीचे बोलावे बस आपल शिक्षक होण सार्थकी लागल. मुलांनी ऐकलेल्या प्रत्येक गोष्टीचा विचार करावा त्यांच्यातली आंतरप्रेरणा जागृत व्हावी आणि त्यांनी झपाटून अभ्यास करावा आणि ते जे काही क्षेत्र निवडतील त्यात सर्वोत्तम असाव अस मला वाटत. खुप काही करायची प्रेरणा भगवंताने आम्हाला दिली अशीच आंतरिक प्रेरणा आम्हाला मिळत राहो म्हणजे आम्हाला खूप काही मुलांना देता येइल. सन्माननीय तसेच आमचे जेष्ठ मार्गदर्शक सोयगाव तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री.रंगराव आढाव साहेब, बनोटी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री. श्यामराव फुसे साहेब, बनोटी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. नितीन राजपुत सर गोंदेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. सचिन पाटील सर, गट साधन केंद्रातील विषय साधन व्यक्ती श्री.परमेश्वर कठोरे,श्री.सुनील बावचे यांचे शाळा भेटीतून वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. तसेच बनोटी केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक श्री. विकास पवार सर, श्री.कैलाश लांडगे,विशेष शिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन शाळेच्या विकासासाठी लाभले. तसेच वरठाण गावचे सरपंच श्री. अनिल सोळुंके, उपसरपंच श्री. धरमसिंग सोळुंके इतर सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. रवींद्र तायडे उपाध्यक्षा श्रीमती. कविता सोळुंके तसेच इतर समिती सदस्य, अंगणवाडी ताई श्री. सुनीता पवार श्री. सुरेखा महाजन, माता पालक यांचे अनमोल सहकार्य सहयोग शाळेला लाभले. अधिकारी, ग्रामस्थ यांच्या मार्गदर्शनातून सहकार्यातून शाळा अशीच उत्तरोत्तर प्रगती करत राहील आणि जिल्हा परिषद शाळा अशीच अभिमानाने आपल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करत राहिल. याच विश्वासाने हे ज्ञानदानाचे कार्य अविरत चालु राहो हिच अपेक्षा आहे.

शाळेत राबविण्यात येणारे नवोपक्रम आणि त्यांची यशस्वीता सांगणारे व्हिडिओ खालील प्रमाणे..

१) इंग्रजी अध्यापनाची आमची पंचसुत्री
https://youtu.be/BcyIam6pvRE?feature=shared
२) प्रतिकृतीतुन जीवन दर्शन
https://youtu.be/DzRpWsy63Bo?feature=shared
३) निसर्गसहल एक समृद्ध अनुभव
https://youtu.be/VNwzFayJ2nM?feature=shared
४) बाल आनंद मेळावा
https://youtu.be/M9Ak_J4FpzQ?feature=shared
५) सांस्कृतिक कला व क्रीडा महोत्सव
https://youtu.be/fWQ66OEiptE?feature=shared
६) निपुण भारत अंतर्गत उपक्रम मालिका
https://youtu.be/JVoWVQFGMqI?feature=shared
७) शाळा पुर्व तयारी मेळावा शाळा जल्लोष
https://youtu.be/R0SLwp5BdWU?si=Zv8YK-DvkrPec0xz

सामाजिक भावनात्मक शिक्षणातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा भोयाचापाडा ता.साक्री,जि.धुळे.

मुख्याध्यापकाचे नाव - हेमलता यशवंत पाटील

प्रास्ताविक -

६ ते १४ वयोगटातील सर्व वयोगटातील सर्व बालकांना मोफत शिक्षण देण्यासाठी १ एप्रिल २०१० रोजी बालकांचा सक्तीचा शिक्षण हक्क कायदा लागू झाला आहे.तरीही अजून काही मुले शाळेत अनुपस्थित राहतात.याचे एक कारण पालकांमध्ये असणारी व्यसनाधीनता.तंबाखूजन्य व अमली पदार्थांचे सेवन केल्यास स्वतःवर, कुटूंबावर परिणामी समाजावर अनिष्ट परिणाम होतो.यासाठी अनेक मर्मग्राही उपक्रम राबविले जातात त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषद शाळा भोयाचापाडा कडून 'एक पाऊल व्यसनमुक्तीकडे' हा उपक्रम राबवण्यात आला.या उपक्रमामुळे येणारी पिढी व्यसनाधीन होणार नाही तसेच पाल्यांच्या शिक्षणाकडे लक्ष देता येईल हा हेतू होता.

जिल्हा परिषद भोयाचापाडा ही शाळा आदिवासी पाड्यातील एका छोटेसे पाडे , येथे मुलांचे उपस्थितीचे प्रमाण खूप कमी आढळून येत होते यासाठी शिक्षकांनी उपाययोजना केल्या. पालक भेट, विविध सहशालेय उपक्रम, स्पर्धा, खेळ या माध्यमातून उपस्थिती वाढवली परंतु शाळेतील काही 2%टक्के मुलं अनुपस्थित राहत होते. शाळेची आवड असूनही ते शाळेत येत नव्हते, याचे कारण शिक्षकांनी शोधले पालकांच्या व्यसनामुळे मुले शाळेपासून दूर राहत होते, मुलांना विचारले असता आई-वडील व्यसन करून येतात घरात खूप भांडण होतात.काही दिवसांसाठी आई गावाला निघून जाते नाहीतर वडील घरीच येत नाही आणि भेटले कि सतत भांडण होते म्हणून आम्ही गैरहजर राहतो असे विद्यार्थी सांगू लागले. यात तंबाखू मुक्त शाळा अंतर्गत उपक्रम शाळेत राबवण्यात येत होते त्यात तंबाखू व अमली पदार्थांच्या व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना दाखवण्यात येत असत. मात्र तंबाखूमुक्त अभियान याबाबत शाळेत उपक्रम सुरु झाले,दररोज उपक्रम होऊ लागले, तंबाखू मुक्ती बाबत शपथ देखील घेण्यात आली. याचा परिणाम हळूहळू विद्यार्थ्यांवर होऊ लागला, मुले घरी जाऊन पालकांना, वडिलांना याबाबत समजावून सांगू लागली,परिणामी विद्यार्थी व्यसनमुक्ती दूत बनले.'एक पाऊल व्यसनमुक्तीसाठी' या उपक्रमात काही पालकांनी सुद्धा सक्रिय सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी शिक्षकांनी वर्ग सुशोभन केले .प्रत्यक्ष पालक भेटी घेतल्या, विविध उपक्रम राबवले. व्यसनमुक्तीसाठी, एक पाऊल व्यसनमुक्तीकडे या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारी समजली तसेच आपल्या पालकांविषयी भावनिक नाते असल्याने त्यांनी तंबाखूजन्य पदार्थांचे, अमली पदार्थांचे दुष्परिणाम समजावून सांगितले . या उपक्रमासाठी विद्यार्थी व्यसनमुक्तीचे दूत ठरले आणि जे विद्यार्थी व्यसनमुक्तीसाठी दूत ठरले, त्या विद्यार्थ्यांनीही पुढे कधी व्यसन करणार नाही याविषयी प्रतिज्ञा घेतली.

शाळेत विद्यार्थ्यांची उपस्थिती तर वाढली त्याचप्रमाणे व्यसनमुक्त कुटुंबासाठी देत असलेल्या योगदानाबाबत महाराष्ट्र भूषण पुरस्कार रोहित लक्ष्मण चौरे व नियर सिताराम चौरे यांनी एक पाऊल व्यसनमुक्तीसाठी या उपक्रमात सहभाग घेतला व पालकांना व्यसनमुक्त केल्याची यशोगाथा वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक सलाम मुंबई फाउंडेशनला पाठवली व त्यांना सन्मानपत्र प्राप्त झाले यासाठी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र भूषण व शिक्षकांना महाराष्ट्र रत्न राज्य पुरस्कार प्राप्त झाला तसेच शाळा स्तरावर शिक्षक परिषदेत व्यसनमुक्त झालेल्या पालकांचा सन्मान देखील करण्यात आला आणि ४ फेब्रुवारी जागतिक कर्कदिनानिमित्त तंबाखूजन्य पदार्थांची होळी शाळेत करण्यात येते. त्याचबरोबर केंद्रातील इतर शाळानाही आव्हान करण्यात आले,ते देखील या उपक्रमात सहभागी झाले.विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी केलेल्या उपक्रमाचा सामाजिक कार्यासाठी उपयोग झाला त्यातूनच विद्यार्थ्यांना आणि पालकांना या उपक्रमाचा फायदा झाला.

शालेय उपक्रम घेत असताना शिक्षण व त्याबरोबर सामाजिक जबाबदारी व भावनात्मक उपक्रमांची सांगड घातली तर निश्चितच सदर उपक्रम फलदायी ठरतात याची अनुभूती या उपक्रमातून आली.


व्यसनमुक्त महाराष्ट्रासाठी योगदान
शवंत पाटील यांना महाराष्ट्र रत्न
आले दि.2आक्टोबर2019


व्यसनमुक्त कुटुंबासाठी महाराष्ट्र भूषण स
न्मानपत्र नितेश सिताराम चौरे यास प्रदान
करण्यात आले दि.2आक्टोबर2019



भोयाचापाडा शाळेच्या शिक्षकांना पुरस्कार

चिकसे : साक्री तालुक्यातील भोयाचापाडा येथील प्राथमिक शाळेचे शिक्षक नीलेश चौरे व रोहित चौरे यांना व्यसनमुक्त अभियानातील योगदानाबद्दल सलाम मुंबई फाउंडेशनने महाराष्ट्र भूषण पुरस्कार व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका हेमलता पाटील यांना महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुक्राम भोये, जालम साबळे यांच्यासह शिक्षक, अंगणवाडी कर्मचारी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत सन्मानपत्राचे वितरण करण्यात आले.







उपक्रमांच्या नियोजन व कृतीतून नियमित उपस्थितीत वाढ

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा, शिरधाने प्र.नेर, ता.जि.धुळे

मुख्याध्यापकाचे नाव — श्री.राम कृष्णवंजी शिंदे

सहशिक्षक - श्री.विशाल मुरलीधर परदेशी



शिरधाने प्र.नेर, धुळे तालुक्यातील एक छोटेसे गाव. गावाची लोकसंख्या जवळपास 7000 ते 8000. पूर्वी डोंगर पायथ्याशी असलेल्या या गावात, सातत्याने मोठमोठ्या शाळा कोसळत. त्यामुळे भयभीत होऊन नागरिक डोंगरावर राहण्यास आले. गावातील सर्व कुटुंब शेती व्यवसाय करतात. तीनशे वर्षांपूर्वीचे पुरातन राम मंदिर गावात आहे. गावातील लोक धार्मिक वृत्तीचे आहेत. गावाच्या पश्चिम दिशेला भवानी मातेचे मंदिर असून दरवर्षी भवानी देवीची यात्रा भरते. गावाच्या उत्तरेला 'हमडा' नावाचे एक निसर्गरम्य ठिकाण असून अज्ञातवासात असताना पांडव या ठिकाणी मुक्कामी असल्याचे सांगितले जाते. गावाजवळच भटाई देवीचे मंदिर असून तेथेही दरवर्षी यात्रा भरते. गावातील सर्व समाज एकत्र सर्व सण उत्सव साजरे करतात. अशा या गावात आमची जिल्हा परिषद प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा शिरधाने प्र.नेर वसलेली आहे. आमच्या शाळेचा इयत्ता पहिली ते चौथीचा पट सद्यस्थितीत 265 इतका आहे. या पटापर्यंत पोहोचणे आणि शाळा सेमी इंग्रजी करणे याबाबतचा प्रवास मी आज तुमच्यासमोर मांडत आहे. या प्रवासात मी स्वतः विशाल मुरलीधर परदेशी (उपशिक्षक) आणि श्री.राम कृष्ण वंजी शिंदे (मुख्याध्यापक) यांनी केलेले कार्य प्रभावी ठरले आहे.



शैक्षणिक क्षेत्रामध्ये सगळ्यांना माहीत असलेली समस्या म्हणजे, जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे प्रमाण कमी असणे होय. जी मुले प्रवेशित होतात त्यांच्या पालकांना शिक्षणाविषयी अनास्था असते. आमची शाळा ही त्याला अपवाद नाही. आमचे पालक अशिक्षित, मोलमजुरी करणारे आहेत. शाळेसाठी हीच बाब आव्हानात्मक होती. शाळा धुळे जिल्ह्याच्या पश्चिम दिशेला माळमाथा परिसरात असल्याने शेतमजूर, जागले, मेंढपाळ, ऊसतोड पालक, विटाभट्टी कामगार यांची मुले आमच्या शाळेत शिकतात. परिणामी पटनोंदणी व उपस्थितीबाबत परिस्थिती बिकट असते. शाळेची पटनोंदणी व 100 टक्के उपस्थिती टिकवण्यासाठी, आम्ही सर्व शिक्षकांनी एकत्र येऊन चर्चा केली. परिस्थितीचे विश्लेषण केले असता, आम्हाला काही अडचणी जाणवल्या.

१. पालकांचे अज्ञान व शिक्षणाबद्दल अनास्था होती.

२. पटनोंदणीमध्ये गावातील मुलींचे व अनुसूचित जाती- जमाती, भटक्या जमाती, वंचित घटकातील मुलांचे प्रमाण अत्यल्प होते.

३. पालक, ग्रामस्थ आणि मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यात संवाद नसल्याने समन्वयाचा अभाव होता.

४.गावातील शिक्षणाबद्दल जाणीव असलेल्या पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे ओढा होता.

५. नियोजन शून्य शैक्षणिक व्यवस्थापन शाळेमध्ये होते.

६.शाळेत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया परिणामकारक होण्यासाठी आनंददायी, दर्जेदार, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची कमी होती. शिवाय डिजिटल साधनांचा अभाव होता.

अडचणींवर मात करण्यासाठी सुरुवातीला आम्ही शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक तसेच शैक्षणिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी गृहभेटी केल्या. तर दुसरीकडे शाळेत पटनोंदणी न करणारे गाव, पाडा, वाडा, तांडा, वस्ती येथील शेतमजूर, जागले, मेंढपाळ, ऊसतोड कामगार, विटभट्टी कामगार यांना भेटून सुसंवाद साधला. 'शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे' हा विचार पटवून देण्याचा प्रयत्न केला. शाळेत उत्तम शिक्षक मिळेल असा विश्वास दिला. ही आमची जबाबदारी आहे असे सांगितले.



शाळेची पटनोंदणी व १०० टक्के उपस्थिती वाढीसाठी प्रभावी कामकाज आम्ही सुरू केले.

१. शाळेतील माता-पालक संघ, शिक्षक-पालक संघ, शाळा व्यवस्थापन समितीच्या नियमित बैठका सुरू केल्या. त्यांची भूमिका समजावून त्यांना शाळेच्या कार्यात सहभागी करायला सुरुवात केली.

२. महिन्यातून एकदा वर्गनिहाय नियमित पालक भेटी सुरू केल्या.

३. शालेय व्यवस्थापन समिती प्रभावी करीत, साप्ताहिक उपस्थितीचा आढावा, अध्यापनात दर्जेदार शैक्षणिक (अध्ययन-अध्यापन)साहित्याचा वापर, विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरण, प्रोत्साहन, बक्षिसे, संगीतमय परिपाठ, शालेय स्पर्धा, विविध नाविन्यपूर्ण उपक्रम यांची नियोजनबद्ध सुरुवात केली. वर्गनिहाय स्पर्धांचे आयोजन ही केले. याप्रमाणे शालेय वातावरण बदल करत असतांना आम्ही आमच्या मध्ये म्हणजेच सर्व शिक्षकांमध्येही काही बदल केले. यात -

१. सर्वप्रथम मुख्याध्यापक- शिक्षकांमधील सुसंवाद वाढविण्यासाठी सर्वांनी मिळून वार्षिक नियोजन आराखडा तयार केला. प्रत्येकाचे मत, विचार, उपक्रम, कृती जाणून घेत सहभागीत्व वाढविले. आपोआपच आपसातील वातावरण निकोप झाले. त्याचा फायदा म्हणून शाळेत गुणवत्ता पूर्ण उपक्रमांना सुरुवात झाली.

२. प्रत्येक आठवड्यात, पूर्ण आठवडाभर उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना पेन, वही, लेखन साहित्य, बक्षिस स्वरूपात दिले गेले. परिणामी गैरहजर मुले उपस्थित राहण्याचे प्रमाण वाढू लागले.

३. सतत गैरहजर मुलांच्या घरी जाऊन, पालकांना शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या लाभाच्या योजना समजावून सांगितल्या. गैरहजर मुलांच्या पालकांना मुलं गैरहजर का? शाळेत पाठवा, अशी विनंती करत गेलो. त्याचा फायदा उपस्थितीचे प्रमाण वाढवून सतत गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होत गेले.

४. परिपाठात महिनाभर ज्या वर्गाची उपस्थिती 100% आहे त्यांना उपस्थिती ध्वज देऊन तो वर्गासमोर ठेवण्यात आला. त्यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांचे अभिनंदन करतात. आजही परिपाठाच्या वेळी 265 पैकी किमान 250 विद्यार्थी उपस्थित असतात. ध्वज मिळविण्यासाठी चढा-ओढ असते.



५.गावातील तरुण, शिक्षण प्रेमी, स्वयंसेवक यांना हजेरीपटाच्या याद्या देऊन प्रत्येक गल्ली, वस्ती, मोहल्ला, परिसर, चौक, मंदिर परिसर येथील विद्यार्थ्यांना गैरहजर न राहू देण्याची जबाबदारी दिली. त्यांचा या कामी उपयोग करून घेतल्याने शाळा गावात गेली आणि गाव शाळेत आले.

६. शाळेत आल्यावर मुलांच्या मनातील दडपण, भीती घालविण्यासाठी वर्गातून छडी हद्दपार केली. अध्ययन- अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून विद्यार्थीकेंद्रित शिक्षण प्रक्रिया सुरू केली. मनोरंजनात्मक शिक्षणावर भर दिल्याने नियमित उपस्थितीचा कल १०० टक्के वाढला.

७. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाणाऱ्या गावातील विद्यार्थ्यांच्या पालकांना विश्वासात घेऊन गुणवत्तेची हमी दिली आणि सेमी इंग्रजीचा वर्ग प्रशासनाच्या परवानगीने सुरू केला. परिणामी इंग्रजी माध्यमाची आवड असलेल्या पालकांची मुले शाळेत प्रवेशित झाली.

८. शाळेत संगीतमय परिपाठ नियमित सुरू झाला. वर्गनिहाय परिपाठाचे साप्ताहिक नियोजन केले. दररोज विविध विषयांच्या स्पर्धा घेतल्या. जसे -

1. सोमवार - भाषिक ज्ञान (समानार्थी - विरुद्धार्थी शब्द)

2. मंगळवार - कविता/ गीत गायन

3. बुधवार - प्रकट वाचन, बातमी वाचन.

4. गुरुवार - सामान्यज्ञान प्रश्न

5. शुक्रवार - वक्तृत्व स्पर्धा.

6. शनिवार - हस्ताक्षर, निबंध स्पर्धा





अशाप्रकारे उपक्रमांची अंमलबजावणी केली, शिक्षक -विद्यार्थी यांच्यामध्ये स्पर्धा निर्माण झालेली आहे. शासनाच्या प्रत्येक उपक्रमात शाळेचा

१०० टक्के सहभाग असतो. आमच्या उपक्रमांमध्ये आम्ही अशा प्रकारे सृजनशील विचार आणि सर्जनशीलता आणली.

या सर्व उपक्रम, नियोजन व कृती यांचा परिणाम म्हणजे -

१.प्रत्येक वर्गाची दररोजची नियमित उपस्थिती 85 ते 95 टक्के झाली.

२. शाळेची १०० टक्के पटनोंदणी झाली.

३. मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, ग्रामस्थ यांच्यामधील नाते अधिक मजबूत झाले.

४.शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक -पालक, माता -पालक, मीना मंच, शालेय मंत्रिमंडळ, तरुण मित्र, स्वयंसेवक यांची शाळेप्रति सहकार्याची भावना वाढीस लागली.

५. सहशालेय उपक्रमामुळे शाळेचे वातावरण आनंददायी व उत्साहपूर्ण झाले.

६. सेमी इंग्रजी वर्गामुळे विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची भीती कमी झाली. विद्यार्थी तोंडी व लेखी अभिव्यक्त होऊ लागले.

अशा अनेक बाबींचे फायदे आम्हाला विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे प्राप्त झाले. आमच्या शाळेचा शैक्षणिक दर्जा/ स्तर उंचावला. ही बाब मी अभिमानाने सांगेल. हे श्रेय शाळेतील प्रत्येक घटकाचे आहे, असे वाटते. एकविसाव्या शतकातील कौशल्यांची रुजवणूक शाळेतील प्रत्येक घटकांमध्ये झाली. जसे, समस्येकडे पाहण्याचा चिकित्सक विचार(Critical Thinking) उपक्रम सुरू करताना सर्जनशीलता (Creativity), फलनिष्पत्तीच्या प्रवासात सहकार्य (Collaboration), संप्रेषण (Communication) यांचा विकास झाला. या सर्व उपक्रमात मी 'Leader by Action' तर मुख्याध्यापक यांनी 'Leader by Position' ची भूमिका साकारत आमच्या शाळेचा संघटनात्मक शैक्षणिक गुणवत्ता विकास घडवून आणण्याचा सतत प्रयत्न करीत आहोत .



आजच्या परिस्थितीत आमची जिल्हा परिषद शाळा शिरधाने प्र.नेर ही 'आमची जीवन शिक्षण आदर्श शाळा' आम्ही घडवून आणली. आज आमची शाळा १०० टक्के पटनोंदणी, शंभर टक्के उपस्थिती व शैक्षणिक गुणवत्ता वाढीत अग्रेसर बनली.



पटनोंदणी व नियमित उपस्थिती वाढविण्यासाठी विविध उपक्रम

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा व्हऱ्यापाणी,ता.शिरपूर, जि.धुळे

मुख्याध्यापकाचे नाव - श्री कैलास शिलेदार पावरा

प्रास्ताविक -

अशिक्षित को शिक्षा दो, अज्ञानी को ज्ञान !

शिक्षा से ही हो सकता है, भारत देश महान !!

देशाला महान बनविण्याकरीता योगदान देणारी लहान शाळा म्हणजे जिल्हा परिषद शाळा व्हऱ्यापाणी होय. ही शाळा सातपुड्याच्या कुशीत अन शिक्षकांच्या मुशीत प्रगतीची वाटचाल करीत पुढे जाणारी शिरपूर तालुक्यातील धुळे जिल्ह्यात वसलेली आहे. सुप्रसिद्ध लोककलावंत भिका भीमा सांगवीकर यांचे जन्मगाव सांगवी ग्रुप ग्रामपंचायतीतील छोटेसे गाव म्हणजे व्हऱ्यापाणी. हे गाव सांगवीहून मुंबई आग्रा हायवे पासून ८ कि.मी. पश्चिमेला नयनरम्य करवंद धरणाच्या अगदी काठावर वसलेले आहे. अतिदुर्गम परिसर असून १००% आदिवासीबहुल गाव आहे. गावाची लोकसंख्या १३०९ आहे. आजही गावात सरकारी एस. टी.बस पोहोचलेली नाही.

गावात एक अंगणवाडी असून यात ० ते ६ वयोगटाची २०४ मुले आहेत. अलीकडच्या काही वर्षापासून शाळेचा व शिक्षणाचा दर्जा वाढायला सुरुवात झाली असून, आज परिसरातील वेगाने पुढे जाणारी शाळा ठरत आहे. या शाळेतील विद्यार्थी, केंद्र व तालुकास्तरावरील वार्षिक स्पर्धेत भाग घेतात व प्राविण्य मिळवितात. गरीब व अज्ञानामुळे पालकांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन फारसा सकारात्मक नसून मुख्याध्यापक व शिक्षक गावातील जेष्ठ नागरिक व शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने पटसंख्या व उपस्थिती वाढवण्याचा अथक प्रयत्न करीत आहे. याचा परिणाम पटसंख्या वाढण्यात झाला.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व्हऱ्यापाणी यांच्या गुणवत्ता व प्रगतीच्या चढत्या आलेखाबाबत मी मुख्याध्यापक कैलास शिलेदार पावरा थोडक्यात विवेचन करत आहे. या शैक्षणिक बदलीच्या प्रक्रियेनंतर आम्ही तिनही शिक्षक कैलास पावरा,विनेश पावरा व ईश्वर पवार या शाळेत काम करीत आहोत. आमच्या सोबत शाळेच्या बदलत्या कामकाजाकरिता शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.दिपक चंपालाल पावरा,ग्रामपंचायत सदस्य श्री. दिनेश धानका, शालेय व्यवस्थापन समिती सोबत काम करीत आहेत.

शाळेच्या भौतिक सुविधा ह्या ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन व ग्रामपंचायत सांगवी यांच्या माध्यमातून अत्यंत सुंदर व अद्ययावत झालेल्या आहेत. सीसीटीव्ही कॅमेरा असणारी आदिवासी क्षेत्रातील आमची एकमेव शाळा आहे. या सर्व गोष्टीसाठी दोन वर्ग खोल्या अद्ययावत आहेत. एका वर्गखोलीचे बांधकाम सुरू आहे. स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी,विद्युत सुविधा, डिजिटल क्लासरूम, शाळा ग्रंथालय, सुंदर अशी परसबाग, वृक्षांनी नटलेला सुंदर असा परिसर आहे. वेळोवेळी गावातील लोकांचा शालेय कामकाजासाठी सहभाग मिळत असतो. तसेच नजीकच्या शहरातून श्री.अशोक बाबुलाल अग्रवाल यांच्या देणगीने पाण्याची टाकी, हँडवॉश, नळ इत्यादी सुविधा प्राप्त झाल्या आहेत. ज्याप्रमाणे शाळेकरीता ग्रामस्थांचे योगदान आहे, त्याचप्रमाणे शाळा- मुख्याध्यापक, शिक्षक अनेक वेळेस गावात जाऊन ग्रामसफाई, किशोरवयीन मुलींचा मेळावा, तरुणांना रोजगार मार्गदर्शन,साक्षरता मोहीम यावर शाळा काम करीत आहे. शाळेची एकूण गुणवत्ता चांगली आहे.


इयत्ता :पहिली
वर्ग शिक्षकाचे नाव : कैलास शिलेदार पावरा
पट: ३२

माहे -जून मध्ये इयत्ता पहिलीत मुलांना प्रवेश देण्यात आला. प्रवेशावेळी शालेय वातावरणात रुजायला मुलांना थोडा वेळ लागला. गावातील बोलीभाषा व प्रमाणभाषा यात बरीच तफावत असल्यामुळे मुलांचे सुरवातीचे बोलणे पावरी व धानकी भाषेत असल्याने त्यांच्याशी संवाद साधताना अडचणी आल्या . "जसं जगात जर्मनी तसेच शिरपूर मध्ये व्हऱ्यापाणी ची भाषा वेगळी आहे". आणि मुलांना शिकवणे अवघड वाटत होतं. पण सर्वप्रथम त्या बालकांच्या भाषेतील काही शब्द शिकत गेलो,विद्यार्थ्यांशी जवळीक साधत गेलो. हे करत असताना मुलांच्या शिकण्याची गतीही कशा पद्धतीने वाढवता येईल? यासाठी नियोजन-बद्ध पद्धतीने अध्यापन करण्याचे नियोजन करण्यात आले. यात अक्षर ओळख, अंक ओळख, अंकांची गाणी,कृतीयुक्त गीत,वाचन,सोप्या पद्धतीने वाचन, अक्षरावरील क्रिया

करीत असताना मुलांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन मागे असणाऱ्या मुलांकरिता उपचारात्मक अध्यापन, गट पद्धतीने मोठ्या मुलांच्या साह्याने प्रगत करण्याचा प्रयत्न केला.

'यशोगाथा आहे वंदीची'

आमची वंदी सुरुवातीला प्रवेश घेतल्यापासून शाळेत येण्याच्या कंटाळा करत होती .सतत रडणारी,शाळेबद्दल भीती बाळगणारी, शांत आणि हट्टी असणारी वंदी चांगल्या पद्धतीने वाचन, गणितीय क्रिया, संख्या ओळख, सुंदर व स्वच्छ अक्षरात लेखन करीत आहे.





इयत्ता : दुसरी

पट: २१

शिक्षकाचे नाव : ईश्वर रामदास पवार

मागील वर्षी इयत्ता पहिली मध्ये १६ पटसंख्या होती. यापैकी बहुतांश विद्यार्थी हे अक्षरवाचन स्तरावर होते. तसेच गणितात २० पर्यंत संख्यावाचन स्तरावर होते . इयत्ता दुसरीचा वर्ग माझ्याकडे सोपीविण्यात आला. यावर्षी पाच मुले ही नवीन वयानुरूप मुळे इयत्ता दुसरी दाखल झाली. या मुलांना अक्षर व शब्द वाचन जोडी करण्याकरता मराठी साहित्य पेटीतील अक्षर तालिका व शब्द पट्ट्यांचा वापर करत मराठी वाचनात प्रगत करण्यात आले. हुशार मुलांना ग्रंथालयातील पुस्तकांचा अतिरिक्त वाचनाचा सराव देण्यात आला. वयानुरूप मुलांचा गट तयार करून त्यांना बहुवर्गात अध्यापनाचे वातावरण तयार करण्यात आले. याचबरोबर अंक ज्ञानाकरिता बोटांचा वापर, जेवढा अंक फळ्यावर लिहिला आहे तेवढ्या उड्या मारणे, तेवढ्या वेळा टाळी वाजवणे, बेंच वाजवणे यातून मुलांचा प्रत्यक्ष सहभाग होता. संख्याज्ञान संबोध स्पष्ट करण्यात आले. तसेच बेरीज वजाबाकी करिता पानांचा वापर, मणी माळांचा वापर, दगड,गोटे यांचा वापर करीत वजाबाकी व बेरीज या घटकांची तयारी करण्यात आली. याचबरोबर दशक गठ्ठ्याचा वापर करण्यात आला. कमी-जास्त घटकासाठी पेटीतील नोटांचा वापर करण्यात आला. आज रोजी इयत्ता दुसरीचा वर्ग ८५ ते ९० टक्के प्रगत अवस्थेत आहे. कधी कधी हुशार मुलांचा तर कधी कधी सम पातळीवरील मुलांचा गट तयार करून त्यांना अभ्यास देण्यात आला. तर कधी हुशार व साधारण मुलांचा गट तयार करून अध्ययन प्रक्रिया वर्गात घडविण्यात आली. याचबरोबर घरी मुलांना, ज्या मुलांची घरे जवळ आहेत, अशा जवळ घर असणाऱ्या मुलांच्या जोड्या बनवून त्यांना त्या पद्धतीने अभ्यास देऊन अध्ययन-अध्यापन प्रक्रिया गतिमान करण्यासाठी प्रयत्न करण्यात आला.



इयत्ता :तिसरी

पटसंख्या: १३

वर्गशिक्षक :श्री विनेश रायसिंग पावरा

श्री विनेश रायसिंग पावरा, जिल्हा अंतर्गत बदलीने मी, माहे जून २०२३ मध्ये शाळेत रुजू झालो. शाळेत आल्यावर पहिल्या दिवशी असे लक्षात आले की, शालेय विद्यार्थ्यांना मूलभूत क्रिया प्राप्त करुन देण्याची फार गरज आहे. त्यांना वाचनात व लेखनात ब-याच अडचणी आहेत. त्या मुलांना मूलभूत ज्ञान दिले नाही, तर त्यांना अध्ययन निष्पत्तीपर्यंत पोहोचविता येणार नाही. म्हणून सुरुवातीपासूनच मुलभूत ज्ञान देण्यावर भर देण्यात आला. मुलभूत ज्ञानामध्येही काही मुलांना अक्षर ओळख सुद्धा नव्हती. मुलभूत ज्ञाना बरोबरच संख्या ओळख,गणिती क्रिया या तर दूरच.. अशातच या मुलांचे भविष्य घडवायचे असेल, तर त्यांना आधी समजून घेतले पाहिजे. त्यानंतरच अध्ययन क्रिया कशी करावी? हे ठरवले. रोजच्या अध्यापनात विविध शैक्षणिक शब्द पट्ट्या, मणी माळ, शैक्षणिक साहित्य वापर करत असताना विद्यार्थी चुकत चुकत शिकत होते. जोडशब्द वाचन करत होते. संख्या ओळख, संख्यावरील क्रिया, रोज विविध शैक्षणिक साधनांच्या साह्याने विविध आव्हाने स्वीकारून, विद्यार्थी क्रिया करत होते. आज रोजी विद्यार्थी गणितीय क्रियामध्ये तीन अंकी संख्येची बेरीज, वजाबाकी, गुणाकार लॅटिस पद्धतीने सोडवतात. तसेच तारखेप्रमाणे पाढे पाठांतर आहेच. शिवाय चांगल्या पद्धतीने शैक्षणिक साधनांचा वापर करून पाढे विद्यार्थी तयार करतात. विद्यार्थी भौमितिक आकृत्यांसह चित्र ओळखतात . वाचनामध्ये विद्यार्थ्यांचा शब्द साठा वाढवण्यासाठी रोजच्या जीवनातील विविध सुविचार दैनंदिन येणारे सर्व शब्द मराठीतच बोलायला लावणे,समानार्थी, विरुद्धार्थी शब्दांचा वापर, स्त्रीलिंग पुल्लिंग शब्दांचा वापर. रोज अध्यापनात करत असताना वाचन सुधारण्यावर भर दिला. आज रोजी विद्यार्थी वाक्यवाचन स्तरावर आहेत. शिवाय परिच्छेद वाचन, गोष्ट वाचनही, चांगल्या पद्धतीने करण्याचा प्रयत्न करीत आहेत. काही विद्यार्थी तर पाठावरील प्रश्नांची उत्तरे देखील शोधण्याचा प्रयत्न करतांना दिसतात.



इयत्ता : चौथी

शिक्षकाचे नाव:- श्री विनेश रायसिंग पावरा

पट: १७

मी श्री.विनेश पावरा. इयत्ता तिसरी व चौथीचा जोड वर्ग माझ्याकडेच आला. सुरवातीला अल्प प्रतिसाद देणारे, वाचनात अडचण असणारे, गणितीय क्रिया यात मागे असणारे, संख्या ओळखताना काहीसे चुका करणारे, विद्यार्थी मला भेटले.


विषय: मराठी

सर्वप्रथम मुलांना शिकवताना साध्या शब्दापासून सुरुवात करावी लागली. यासाठी विविध शैक्षणिक साधने जसे शब्द पट्ट्या, कार्ड, वाचन पट्ट्या, पूरक वाचन, श्रृतलेखन, 'क ची करामत' यासारख्या साहीत्याचा वापर करुन अध्यापन केले . मुलांचा बौद्धिक विकास जर करायचा असेल, तर त्यांचा शब्दसाठा वाढविला पाहिजे. हे लक्षात घेऊन अध्यापनाला सुरुवात करण्यात आली . यात वचन बदल करणे, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, शब्दांचा डोंगर, जोडशब्द यांनी शब्दसंपत्ती वाढवली. वाचनाचा वेग वाढवण्यासाठी वाक्य वाचन, परिच्छेद वाचन करून धड्याचे प्रश्न उत्तरे शोधायला शिकवले. आज अध्ययन स्तरानुसार सर्व मुलं प्रगत झालेली आहेत..

विषय: गणित

जशी भाषा विषयात अडचण होती, तशीच गणित विषयात देखील मुलांना बरीच अडचण होती. सर्वप्रथम मुलांना संख्या ओळख करून गणितीय क्रियांकडे लक्ष दिले. क्रिया करत असताना चार अंकी संख्यांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार करणे, विविध शैक्षणिक साधने वापरून संख्यांचा लहान मोठेपणा,चढता-उतरता क्रम आणि संख्यांची किंमत काढणे, विस्तारित रूप,

पूर्णांकयुक्त अपूर्णांक, लॅटिस पद्धतीने गुणाकार, पाढे तयार करणे, तारखेप्रमाणे पाढे पाठांतर करणे, शाब्दिक उदाहरणे, परिमिती काढणे चांगल्या पद्धतीने विद्यार्थी करीत आहेत. हे सर्व शक्य झाले छोट्याशा प्रयत्नाने..



उपक्रम :१

- **<u>माझी शाळा माझे उपक्रम:-</u>**

  उपक्रमाचे नाव: शैक्षणिक साहित्य हंडी (दही हंडी ऐवजी साहित्य)

जि.प. शाळा व्हऱ्यापाणी येथे माझी शाळा माझा उपक्रम अंतर्गत शैक्षणिक साहित्य हंडी हा उपक्रम घेण्यात आला. सर्वप्रथम शैक्षणिक साहित्य हंडीची सजावट करण्यात येते. साहित्य हंडीत पेन,पेन्सिल, खोडरबर,स्केचपेन टाकले जातात . नंतर विद्यार्थीचा मनोरा करून साहित्य हंडीला सलामी देण्यात आली. विविध खेळ घेण्यात आले...

उद्देश...

१) विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देणे.
२) साहसी क्रीडा प्रकारात भाग घेणे.
३) शैक्षणिक साहित्याचा वापर करणे.
४) अश्या विविध उपक्रमातून १००% उपस्थिती टिकविणे.



उपक्रम: २

मिशन चंद्रयान : ३

विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, याचबरोबर देशाची प्रगती व्हावी याकरिता विज्ञान किती महत्वपूर्ण आहे? याचे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दर्शन व्हावे, अभ्यास व्हावा, याकरिता ज्या दिवशी भारताने चांद्रयान मोहीम सफल केली

त्याच दिवशी आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना आम्ही मेहनतीने चांद्रयानाची प्रतिकृती तयार करून दाखवली. प्रत्यक्ष चंद्रयान कशाप्रकारे लँड करणार आहे? याची माहिती शालेय आवारात चंद्रयान लँड करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चंद्रयानाची माहिती दिली. व चंद्रयान लाईव्ह प्रक्षेपण विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.





उपक्रम: ३

माझी स्वच्छता मोहीम

विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटावे, याकरिता सुरुवातीला विद्यार्थ्यांना स्वच्छतेची सवय स्वतःपासून लावली. आम्ही साफसफाई करत विद्यार्थ्यांना स्वच्छतेची सवय लावली. यात परिसराची स्वच्छता,शालेय परिसराची स्वच्छता, घराची स्वच्छता याचबरोबर स्वतःची स्वच्छता,नीटनेटकेपणा याकरिता विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन व आव्हान करून विद्यार्थ्यांकडून शालेय परिसराची स्वच्छता करून घेतली .याचबरोबर परिसरात शेकडो झाडे असून परिसरात कुठल्याही प्रकारचा केरकचरा साचलेला दिसत नाहीत. पुढील काळात शंभर टक्के गुणवत्ता वाढीकरिता आम्ही नियोजन करणार आहोत. आम्ही व गावातील माजी विद्यार्थीही गुणवत्ता वाढीकरता मदत करण्यास तयार आहेत. अशा प्रकारे स्वप्नातील शाळा बनवण्याकरिता आम्ही सर्व प्रयत्न करत आहोत. धन्यवाद !



आदिवासी भागातील विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान

शाळेचे नाव - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक डिजिटल शाळा,जाजावंडी,पो.गट्टा ता.एटापल्ली, जि.गडचिरोली

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.मांतय्या चिन्नी बेडके

प्रास्ताविक –

शैक्षणिक सत्र 2010 -2011 मध्ये या शाळेची पटसंख्या ८ इतकी होती व या शाळेत २ शिक्षक कार्यरत होते.गावाची लोकसंख्या ६०० पर्यंत व ६ ते १४ वयोगटातील भरपूर विद्यार्थी पण गावच्या शाळेत न शिकता बाहेर गावच्या आश्रम शाळेत शिकत होते. पालकांच्या शिक्षणाविषयी अनास्था व कौटुंबिक दारिद्रय यामुळे कसेबसे आपल्या पाल्यांना आश्रम शाळेत टाकणे व आपण निश्चिंत राहणे एवढच.



सन-2010-2011 ची शाळा

मुख्याध्यापक/ शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी -

अ) शाळेची पटसंख्या ८ असून शाळा बंद होण्याच्या मार्गावर होती.

आ) या परिसरात खूप बालके शाळा बाह्य झाले होते.

इ) समाज सहभागातून शाळा स्वच्छ सुंदर व डिजिटल करणे आवश्यक होते.

ई) शाळेविषयी लोकांची अनास्था.

उ) आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांचा अभाव.

ऊ) शाळेत तंत्रज्ञान सुविधेचा अभाव.

या अडचणीवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक /शिक्षक यांनी केलेल्या उपाययोजना -

अ) पटसंख्या वाढीसाठी शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची आखणी करण्यात आली.

आ) या परिसरातील स्थलांतरित व शाळाबाह्य बालकासाठी ग्रामसभा व मुख्याध्यापकांनी ३० विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन वसतिगृहात ठेऊन दर्जेदार शिक्षण दिले जात आहे.

इ) ही शाळा जीर्ण अवस्थेत होती,पालकांच्या सहभाग घेऊन रंगरंगोटी करून शाळा स्वच्छ, सुंदर,डिजिटल करण्यात आली.

ई) पालकांच्या मनात शाळेप्रती आवड निर्माण करून, पालकांचा सहभाग घेऊन शाळा समृद्ध करण्यात आली.

उ) ही शाळा आदिवासी भागात असल्याने येथे कोणतीच भौतिक सुविधा नव्हती, तरी प्रचंड इच्छाशक्तीने या शाळेचे परिवर्तन करून पटसंख्या १३८ करण्यात यश आले.

अ) समाज सहभागातून विविध डिजिटल साधने प्राप्त करून घेऊन अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाच्या वापर (ई लर्निंग) करण्यात आला.

शाळेची सुरुवातीची संपादणूक चाचणी अहवाल -

अनु.क्र	वर्ग	संपादणूक चाचणी टक्केवारी	संपादणूक चाचणी टक्केवारी वाढ/घट	शेरा
१	१ ला	३५%	साधारण	
२	२ रा	३७ %	साधारण	
३	३ रा	४१ %	साधारण	
४	४ था	३९ %	साधारण	

शाळेच्या कायापालट करण्यासाठी केलेले प्रयत्न -

शाळेची पटसंख्या जेमतेम ८ त्यापैकी ४ विद्यार्थी शाळेत येत असत व बाकीचे ३ पालकासोबत शेतात जात असत, अशा परीस्थितीत शाळेचा कायापालट करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आली.

अ) शाळा रंगरंगोटी व बोलकी करणे -

विद्यार्थी शाळेत रमावे व विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी तसेच गावातील लोकांना शाळेविषयी आकर्षण वाटावे यासाठी सर्प्रथम शाळेची रंगरंगोटी करून शाळा बोलकी करण्यात आली. यासाठी स्वतः प्रेरित होऊन समाजाचा सहभाग घेऊन शाळा बोलकी करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.



रंगरंगोटी केल्यानंतरची शाळा

ब) पटसंख्या वाढीसाठी विशेष प्रयत्न करणे -

सन-2010 – 2011 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी या शाळेची पटसंख्या केवळ ८ होती ,त्यामुळे शाळेची पटसंख्या वाढावी यासाठी शाळा स्तरावर विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची आखणी करण्यात आली.व शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास सुरुवात करण्यात आली.त्यामुळे शाळेतील पटसंख्या हळूहळू वाढत गेली.सन 2010 ते आजपर्यंतचे पटसंख्या खालील प्रमाणे वाढ झालेली आहे.

अ.क्र	शैक्षणिक सत्र	पटसंख्या
१	2011-2012	८
२	2012-2013	१५
३	2013-2014	२५
४	2017-2018	५०
५	2018-2019	६३
६	2019-2020	५८
७	2020-2021	७२
८	२०२२-२०२३	१२३
९	२०२३-२०२४	१३८



गुणवत्तापूर्ण शिक्षण दिल्याने शाळेच्या पट संख्येत वाढ

क) प्रौढ शिक्षण -

गावातील बहुतेक पालक निरक्षर असल्याने त्या पालकांना साक्षर करण्यासाठी गावात प्रौढ शिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आला, या प्रौढ शिक्षण कार्यक्रमात गावातील बहुतेक पालक सहभागी झाले.यातून गावात सुमारे १५० लोकांना साक्षर करण्यात आले.


1) प्रौढ शिक्षण गरज:- जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जाजावंडी ही शाळा अतिदुर्गम व नक्षलग्रस्त अदिवासी भागात असल्याने या भागातील अनेक पालक निरक्षर होते.शिक्षण विषयक जागरूक नाहीत,त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्व त्यांना समजत नाही. पाल्यांना लहानपणापासून जंगलात सोबत कामासाठी नेतात त्यामुळे मुले शाळाबाह्य राहतात,यासाठी पालकांना शिक्षित करणे गरजेचे वाटले.

2) प्रौढ शिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी:-गावात प्रौढ शिक्षण कार्यक्रम सुरू करायचे असल्याने सर्व गावातील लोकांची ग्राम सभा घेण्याचे ठरवले. ग्रामसभेत शिक्षण विषयक महत्व लोकांना पटवून देण्यात आले. त्यामुळे पालक प्रौढ शिक्षण घेण्यास तयार झाले. सर्वप्रथम मी स्वतः10 लोकांना शिकवण्यास सुरुवात केली. ही 10 लोक मुळाक्षरे,बाराखडी शिकले व स्वतःची सही करू लागले. त्यामुळे इतर ही पालक शिकण्यास उत्सुक झाले,त्यानंतर गावात 2 स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली.दोन स्वयंसेवक व मी असे आम्ही तिघे मिळून 150 लोकांना साक्षर केले.

3) प्रौढ शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम :- गावातील बहुतेक लोक निरक्षर असल्याने गावात शैक्षणिक वातावरण नव्हते, त्यामुळे विद्यार्थी घरी गेल्यावर गृहपाठ करत नव्हते म्हणून विद्यार्थी अभ्यासात मागे राहत होते, पण गावातील लोकांसाठी प्रौढ शिक्षण सुरू केल्याने गावात शैक्षणिक जागृती निर्माण झाली, त्यामुळे पालक व विद्यार्थी गावातील चौकात बसून अभ्यास करायला लागले. विद्यार्थी गृहपाठ वेळेवर करू लागले त्यामुळे अभ्यासात हुशार झाले,

4) प्रौढ शिक्षणाच्या मुलांच्या गुणवत्तेवर परिणाम:-प्रौढ शिक्षण उपक्रम गावात सुरू केल्याने गावात शैक्षणिक जागरूकता निर्माण झाली, त्यामुळे पालकांच्या कल शिक्षणाकडे वाढू लागला व सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना शाळेत प्रवेश दिला, त्यामुळे गावातील सर्व मुले गावच्या शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ लागले. गावातील जे विद्यार्थी बाहेर गावात शिकायला गेले त्यांनी परत गावच्या शाळेत प्रवेश घेतला. त्याचप्रमाणे गावच्या आजूबाजूला असलेल्या गावातील मुले देखिल या शाळेत प्रवेश घेऊ लागले.इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असलेले विद्यार्थ्यांनी देखील या शाळेत प्रवेश घेतले.

5) प्रौढ शिक्षणातून पालक ग्रामस्थ यांची शिक्षणाची गोडी वाढली ते शाळेत संपर्क करु लागले, येऊ लागले. त्यातून शाळेबद्दल त्यांना आस्था निर्माण झाली. म्हणून विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवणे, टिकवणे सोपे झाले.






प्रौढ शिक्षण घेताना गावकरी

ड) वनभोजन / क्षेत्रभेट कार्यक्रम -

विद्यार्थ्यांना शाळेविषयी गोडी लागावी व विद्यार्थ्याचे विविध कला कौशल्ये वाढीस लागावी व शालेय कामात समाजाचा सहभाग वाढावी यासाठी दरवर्षी शाळेत वनभोजन / क्षेत्रभेट कार्यक्रम आयोजन केले जातात.



इ) क्रीडा क्षेत्रात चॅम्पियन शाळा:-

शालेय बाल कला व क्रीडा संमेलनात या शाळेतील चिमुकले खेळाडू इतर शाळातील दिग्गज खेळाडूना हरवत गेल्या पाच वर्षापासून केंद्र स्तरावर तसेच गेल्या तीन वर्षापासून तालुका स्तरीय क्रीडा संमेलनात चॅम्पियन बनले आहे.



चॅम्पियन शाळा

फ) हंगामी वसतिगृह योजना -

ही शाळा आदिवासी बहुल अतिदुर्गम नक्षल ग्रस्त क्षेत्रात येत असल्याने या भागातील बहुतेक विद्यार्थी शाळा बाह्य राहतात, सर्व्हे करून गावातील व आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणण्याचे प्रयत्न करण्यात आले.



हंगामी वसतिगृहाचे उद्घाटन करताना केंद्र प्रमुख

अशाप्रकारे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जाजावंडी येथे विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे धडे देऊन शाळेचा कायापालट करून विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी या शाळेतील शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले.

मुख्याध्यापक व शिक्षकांनी स्वविकासासाठी केलेले कार्य -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी येथील शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी स्वविकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करून विकास साधण्याचे प्रयत्न केले, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी ही शाळा आदिवासीबहुल नक्षलग्रस्त भागात असल्याने या भागातील आदिवासी जनता माडिया ही भाषा बोलतात, अध्ययन अध्यापन करताना शिक्षकांना माडिया भाषा येत नसल्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते म्हणून शिक्षकांनी सर्वप्रथम माडिया भाषा शिकण्यास सुरुवात केली व माडिया भाषा आत्मसात केली. त्यातून विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन करणे सुलभ झाले.



थोर नेत्यांच्या जयंत्या व बाल सभेचे आयोजन

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत झालेला बदल -

या शाळेत सुरुवातीला विद्यार्थी संख्या फारच कमी होते, विद्यार्थी संख्या वाढण्यासाठी या शाळेतील शिक्षकांनी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत रंजकता आणून विविध व नवनवीन अध्यापन पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यास सुरुवात केली त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ दिसून आली.



दर वर्षी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजन करून विद्यार्थी कला गुणांचा विकास

शाळा विकासात शिक्षक पालक संघ/ शालेय व्यवस्थापन समिती/ पालक सहभाग यातून विद्यार्थी व शाळा विकासात झालेले बदल -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी या शाळेत विद्यार्थी संख्या झपाट्याने वाढत गेल्यामुळे या शाळेत वर्ग पाचवी,सहावी व सातवी जोडण्यात आले मात्र जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी या शाळेत वर्गखोल्या मात्र दोनच होत्या, शाळा व्यवस्थापन समिती व गावातील नागरिकांनी मिळून शाळेसाठी दोन वर्ग खोली बांधकाम करून दिले व वेळोवेळी शाळेसाठी शिक्षक पालक संघ/ शालेय व्यवस्थापन समिती यांचा सक्रीय सहभाग असल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांचा विकास झालेला आहे.



लोकसहभागातून वर्गखोली बांधकाम

मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी यांनी राबवलेला नवोपक्रमाचा शाळेसाठी फायदा -

बांधावरची शाळा उपक्रम -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी शाळेत मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना अध्यापन केले, त्यामुळे या शाळेची पटसंख्या वाढ झाली व तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये सुद्धा वाढ झाल्याचे दिसून आले. बांधावरची शाळा या उपक्रमात गावातील काही पालक जंगलात शेती करतात त्यामुळे पालक शेतात मुलांना सुद्धा जंगलात नेतात त्यामुळे ते शाळाबाह्य होतात म्हणून या मुलांसाठी शाळा सुरु होण्यापूर्वी व शाळा सुटल्यावर पालकांच्या बांधावर जाऊन विद्यार्थ्यांना शिक्षक मार्गदर्शन करतात.



नवोपक्रम – बांधावरची शाळा

शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी या शाळेला ग्रामपंचायत मार्फत टीव्ही व इतर साहित्य देण्यात आले त्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत डिजिटल वर्गाची निर्मिती करण्यात आली असून त्यातून विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे धडे देण्यात येत आहेत.



टीलीमिली कार्यक्रम बघताना शाळेतील विद्यार्थी

शालेय गुणवत्तेत वाढ होण्यासाठी प्रशिक्षणाचे योगदान -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी येथील शिक्षकांना या शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी प्रशिक्षणाचे मोठा फायदा झाला आहे, या शाळेतील शिक्षक वेळोवेळी तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर, राज्य स्तरावर आयोजित प्रशिक्षणामध्ये सहभागी होऊन आपल्या ज्ञानात भर घालून या शाळेच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.





राज्यस्तरावर जालना येथे बाल रक्षक प्रशिक्षण घेऊन शाळा बाह्य विद्यार्थ्यांना शाळेत दाखल केले

जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय स्तरावर यशस्वी उपक्रम क्रीडाप्रकार कलाप्रकार स्पर्धा यात नैपुण्य -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी या शाळेतील विद्यार्थी खेळांमध्ये प्रावीण्य मिळवले आहेत सलग पाच वर्षापासून केंद्र स्तरीय क्रीडा संमेलनांमध्ये तसेच सलग तीन वर्षापासून तालुकास्तरीय क्रीडा संमेलनामध्ये चॅम्पियनशिप प्राप्त केली आहे तसेच जिल्हास्तरावर वैयक्तिक खेळामध्ये या शाळेतील विद्यार्थ्यांनी नैपुण्य मिळवले आहे.



जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत चषक स्वीकारताना जाजावंडी शाळेतील विद्यार्थी

शिक्षणातून परिवर्तन






गुलेर धरून शिकारीसाठी जंगलात निघालेला विद्यार्थी, शिक्षणाच्या प्रवाहात

मागील पाच वर्षात वर्गात/शाळेत झालेली पटसंख्या वाढ -

अनु.क्र.	शैक्षणिक वर्ष	पटसंख्या	पटसंख्या वाढ/घट
१	२०११-१२	०८	-
२	२०१७-१८	५०	पटसंख्या वाढ
३	२०१८-१९	६३	पटसंख्या वाढ
४	२०१९-२०	५८	पटसंख्या वाढ
५	२०२०-२१	७२	पटसंख्या वाढ
६	२०२१-२२	१०२	पटसंख्या वाढ
७	२०२२-२३	१२५	पटसंख्या वाढ
८	२०२३-२४	१३८	पटसंख्या वाढ

मागील पाच वर्षात वर्गात/शाळेत झालेली पटसंख्या वाढ -



मागील पाच वर्षात वर्गात/शाळेत झालेली संपादणूक वाढ-

अनु.क्र.	शैक्षणिक वर्ष	संपादणूक चाचणी टक्केवारी
१	२०११-१२	०५%
२	२०१७-१८	१३ %
३	२०१८-१९	२५%
४	२०१९-२०	३९ %
५	२०२०-२१	५६ %
६	२०२१-२२	८८ %
७	२०२२-२३	९२%
८	२०२३-२४	९४%

वरील तक्त्यात मागील पाच वर्षात वर्गात/शाळेत संपादणूक वाढ झालेली आहे.अशा प्रकारे दुर्गम भागातील शालेय शिक्षणात उत्तम कामगिरी करणारे मुख्याध्यापक श्री.बेडके यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार बाबत माहिती लिंक:-

https://drive.google.com/file/d/1CUpEP4knk21ReXLKN39jEsnsLuHZSJ9i/view?usp=drivesdk

लोकसहभागातून विद्यार्थी विकासासाठी उपक्रम

शाळेचे नाव - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, निमगाव, केंद्र रांगी प. स. धानोरा, जिल्हा.गडचिरोली.

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.रमेश म.काळबांडे





प्रस्तावना –

शाळा आणि समाज हे दोन अविभाज्य घटक आहेत. समाजासाठी शाळा व शाळेसाठी समाज असतो. व्यक्तिमत्वविकास व त्यातून समाज विकास हे शाळेचे प्राथमिक ध्येय आहे. तर समाज साहाय्याने शाळेचा विकास साधणे हेही तितकेच गरजेचे असते. त्यासाठी शाळेच्या कार्यामध्ये लोकांचा व समाजाचा सहभाग घेणे अगत्याचे ठरते.

भारत सरकारच्या शिक्षण हक्क अधिनियम RTE २००९ नुसार शालेय कार्यामध्ये समाजाचा सहभाग घेणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्याबरोबरच महाराष्ट्र शासनाने १६ मे १९९६ व २४ ऑगस्ट २०१० रोजी पारित केलेल्या परिपत्रकान्वये तसेच माध्यमिक शाळा संहितेमधील नियम क्रमांक ३.२ मध्ये शाळेत शिक्षक पालक सभेच्या माध्यमातून शालेय अभ्यासक्रम तसेच विद्यार्थी व शिक्षक यांच्या समस्या सोडविणे असे ध्येय निश्चित करण्यात आले आहे.

१७ जून २०१० च्या महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या परिपत्रकान्वये शिक्षणाची उद्दिष्टे पूर्ततेत विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास साध्य करत असतानाच सामाजिक न्याय, लोकशाही, मानवी मुल्य प्रस्थापित करण्यासाठी शिक्षणामध्ये लोकसहभाग घेणे अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगण्यात आले आहे. शाळेमध्ये लोकसहभाग वाढवावा हे ध्येय समोर ठेवून स्थानिक पातळीवर शाळा व्यवस्थापन समितीची रचना करण्याचे सर्व शासकीय व खाजगी शिक्षण संस्थांना बंधनकारक करण्यात आले आहे.

वरील सर्व संदर्भांचा विचार करता शासन ध्येय असे दिसून येते की, विद्यार्थ्यांचा विकास व शिक्षण संकल्पना साकारण्यासाठी अध्ययन-अध्यापन कार्यामध्ये समाज पालक किंवा लोकसहभाग घेणे व त्या माध्यमातून विद्यार्थी विकास करणे अपेक्षित आहे.

शालेय कार्यात समाज किंवा लोकसहभागाची उद्दिष्टे –

समाज व शाळा संबंध जोपासणे.

शाळेची विश्वासार्हता वाढविणे.

शालेय समस्या सोडवणे.

शालेय कार्यावर नियंत्रण प्रस्थापित करणे.

सहशालेय उपक्रमात समाज सहकार्य मिळवणे.

समाजातील ज्येष्ठ व प्रतिभावंत व्यक्तींच्या ज्ञानाचा व अनुभवाचा वापर विद्यार्थी विकासासाठी करणे.

शालेय विकासासाठी आर्थिक मदत प्राप्त करून घेणे.


शालेय विकासामध्ये लोकांकडून भौतिक सामग्री, निधी, मनुष्यबळ प्राप्त करणे.

विद्यार्थी उपस्थिती वाढवणे.

शालेय वातावरण प्रसन्न, आकर्षक व सुरक्षित करणे.

समाज सहकार्यातून शालेय सामग्रीचे संवर्धन करणे.

समाजामध्ये परस्परसहकार्य भावना जोपासणे.





विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक, सामाजिक एकता, स्वच्छता व श्रमप्रतिष्ठा, नैतिक मूल्य, सामाजिक एकता, विषमता निर्मूलन इत्यादी बाबीची जोपासना करणे वरील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शाळेमध्ये लोकसहभाग घेणे अत्यंत गरजेचे होते. लोकसहभाग व सामाजिक सहभागातून करावयाचे शालेय कार्य लोकसहभाग व सामाजिक सहभागातून करावयाची कामाचे वर्गीकरण केल्यास त्याचे चार विभागांमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते.

- शैक्षणिक कार्यातील सहभाग
- सहशालेय उपक्रमातील सहभाग
- आर्थिक बाबींमधील सहभाग
- श्रम आणि मनुष्यबळ सहभाग
- शैक्षणिक कार्यातील सहभाग

शैक्षणिक कार्यातील लोकसहभात समाजातील प्रतिभावंत अनुभवी उच्चविद्याभूषित व्यक्तींच्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग विद्यार्थी समुपदेशन व मार्गदर्शन करण्यासाठी केला जाऊ शकतो त्याचबरोबर जीवनामध्ये अनुभव हीच सर्वात मोठी शिदोरी आहे व अशा अनुभव रुपये शिदोरीचे गाठोडे ज्येष्ठ नागरिकांकडे असते म्हटले जाते की ज्येष्ठांच्या चेहऱ्यावरील प्रत्येक सुरकुती ही एक स्वतंत्र अनुभव कथा असते ते अनुभव विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरू शकतात.
लोकसहभागातून करावयाचे शैक्षणिक कार्य

- विद्यार्थी मार्गदर्शन
- विद्यार्थी समुपदेशन
- अनुभव कथन सोहळा
- ज्येष्ठ व्यक्तींचा शालेय तास

सहशालेय उपक्रमातील सहभाग -

सहशालेय उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास साधतांना शाळेला अनेक अडचणी येऊ शकतात या अडचणी दूर करण्यासाठी सहशालेय उपक्रमांचे नियोजन करत असताना लोकसहभाग घेणे योग्य ठरते. लोकसहभागातून राबविला जाऊ शकणाऱ्या सहशालेय उपक्रमांची यादी

- वार्षिक स्नेहसंमेलन
- वृक्षारोपण कार्यक्रम
- राष्ट्रीय सण समारंभ आयोजन
- आरोग्य शिबिर
- महिला आणि बालिका मेळावा समुपदेशन

याव्यतिरिक्त प्रसंग निहाय व कल्पकतेने बऱ्याच सहशालेय उपक्रमांमध्ये लोकसहभाग किंवा समाज सहभाग मिळवता येऊ शकतो.

आर्थिक बाबींमधील सहभाग -

विकास व अर्थ हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत विकास साधण्यासाठी अर्थ किंवा पैसा आवश्यक आहे मग तो उपक्रम राबविणे शाळेचा भौतिक विकासात शालेय इमारतीची किंवा बांधणी करणे, शैक्षणिक साहित्य निर्मिती अशा अनेक कार्यांसाठी पैशाची गरज पडत असते बऱ्याचदा शासनाकडून प्राप्त झालेल्या निधी कमी पडत असतो अशावेळी समाजातील व्यक्तींकडून मदत आणि देणगी स्वरूपात निधी प्राप्त करून घेणे गरजेचे मात्र देणगीदारांची इच्छा व परिस्थिती या गोष्टीचा विचार केला गेला पाहिजे, निधीसाठी कुठलीही शाळा समाजावर बंधन टाकू शकत नाही.

आर्थिक सहभागातून उपक्रम -

- शाळा कृतज्ञता निधी कार्यक्रम
- शाळा विकास निधी निर्मिती
- वृक्षारोपण कार्यक्रम
- संगणक खरेदी
- परिसर सुशोभीकरण
- शालेय रंगरंगोटी
- फर्निचर निर्मिती
- श्रम आणि मनुष्यबळ सहभाग

सामाजिक कार्यात पैशाएवढेच महत्त्व मनुष्यबळाला आहे एकमेकांना सहकार्यातून मदत देऊन महाकाय सेतू बांधला जाऊ शकतो त्याचप्रमाणे एक आकर्षक सुशोभित संस्कार पूरक शालेय वातावरण तयार करण्यासाठी मनुष्यबळाचे योगदान मोलाचे ठरू शकते मनुष्यबळ किंवा श्रमदानातून करावयाची कामे

- परिसर स्वच्छता
- सुंदर शालेय परिसर
- शालेय इमारत बांधकाम किंवा गुरुजी
- संरक्षण भिंत
- फर्निचर निर्मिती
- शालेय बगीचा निर्मिती
- क्रीडा मैदान निर्मिती
- वृक्षारोपण

गरजेनुसार मनुष्यबाळाशी निगडित व इतर कार्यही आपण याद्वारे करू शकतो "विना सहकार सहकार नाही उद्धार" या उक्तीप्रमाणे सामाजिक सहकार्याशिवाय शाळेचा विकास साधने म्हणजे अशक्य प्राय आहे. हे साध्य करण्यासाठी शालेय व्यवहारात पारदर्शकता व समाज विश्वास जिंकणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण शाळेवर केवळ पुस्तके व शिकवायचे नाही तर उद्याची आधुनिक संस्कारक्षम सर्वगुणसंपन्न पिढी घडवायची जबाबदारी आहे.


जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा निमगाव येथे लोकसहभाग मिळण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न व फलनिष्पत्ती -

शाळा व्यवस्थापन समिती सभा -

शाळेमध्ये दर महिन्याला शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेण्यात येते.सभेमध्ये ९०% सदस्य नियमित उपस्थित राहतात. नवनियुक्त मुख्याध्यापक नवनियुक्त बदलीने आलेले शिक्षक यांच्या परिचय करून देण्यात आला त्यानंतर शाळेच्या विकास आराखड्यानुसार कामांना प्राधान्य देण्यात आले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री भजन मारुती वरखडे तसेच इतर सदस्यगण यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. शालेय व्यवस्थापन समिती सदस्यांनी गावामध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांना शाळा विषयी जनजागृती केली . विविध प्रभात फेरी, हर घर तिरंगा, कलश यात्रा अशा विविध राष्ट्रीय उपक्रमांमध्ये आवडीने सहभाग घेतला. त्यामुळे गावातील नागरिकांमध्ये शाळेविषयी आवड निर्माण झाली.

माता पालक सभा -

शाळेतील विद्यार्थ्यांच्या माता पालकांची सभा घेण्यात आली. त्यामध्ये शाळेविषयी विविध योजना व शिक्षणाचे महत्त्व सांगण्यात आले. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे माता पालक शाळेविषयी जागरूक झाले व त्यांचे सहकार्य लाभले त्यामुळे



विद्यार्थ्यांची उपस्थिती 100% उद्दिष्ट गाठण्यात शाळेला यश आले. विद्यार्थी नियमित नीटनेटके शालेय गणवेशात बूट लावून येतात.






आजी आजोबा दिवस -

आजी आजोबा दिवस त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या आजी आजोबा विषयी आत्मीयता निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या हस्ते त्यांच्या सत्कार करण्यात आला त्यामुळे आजी आजोबा शाळेने राबविलेल्या उपक्रमाबद्दल भावूक झाले. शाळेमध्ये आजी

आजोबांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या, त्यामुळे त्यांना त्यांचे बालपण आठवले त्यामुळे जेष्ठ नागरिकांमध्ये शाळेविषयी आत्मीयता निर्माण झाली त्यांनी त्यांचे अनुभव कथन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.







परसबाग निर्मिती -

परसबाग निर्मितीमध्ये पालकांच्या सहभाग शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य व इतर पालकांनी शाळेमध्ये परसबाग निर्मितीसाठी जमिनीची मशागत, वृक्ष लागवड, वृक्षांचे संगोपन, निंदण , खत देणे इत्यादी कामांमध्ये मोलाचे सहकार्य केले. तसेच विद्यार्थ्यांना सुद्धा शेतीच्या कामांबद्दल माहिती दिली त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कृषी विषयक ज्ञानाची भर पडली. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री नवनाथ चापडे आधुनिक शेतकरी यांनी सुद्धा परसबाग निर्मितीमध्ये खूप मोलाचे सहकार्य केले त्यांच्या मार्गदर्शनात शाळेची परसबाग फुलू लागलेली आहे.





मध्यान्ह भोजन योजना -

मध्यान्ह भोजन योजना देखभाल समिती नियमित शाळेत शिजवणारा आहार तपासतात . विद्यार्थी बैठक व्यवस्था, भांडी स्वच्छता तपासून वेळोवेळी मार्गदर्शन करतात. मध्यान्ह भोजन योजना अंतर्गत स्पर्धेमध्ये शाळेने सहभाग घेतला शाळेच्या स्वयंपाकी व मदतनीस यांनी माता पालकांच्या सहकार्याने व शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेत सहभाग घेऊन तालुकास्तरावर तृतीय पुरस्कार प्राप्त केला.



शाळेत विद्युतीकरण, हातपंप,नळ देखभाल व दुरुस्ती -

शाळेत विद्युतीकरण देखभाल व दुरुस्तीसाठी श्री पंढरी सुरपाम यांनी खूप मोलाचे सहकार्य केले. त्यांनी आपल्या कार्यकुशलतेचा उपयोग शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी केला.










अशासकीय मदत -

विविध एनजीओ, लर्निंग लिंक फाउंडेशन तसेच शाळा व्यवस्थापन समिती निमगाव यांच्या प्रयत्नाने NLIP व LLF फाउंडेशन यांच्याकडून शाळेला कचरापेटी, वाचनालय, सायन्स रूम, एलईडी टीव्ही प्रोजेक्टर (स्मार्ट रूम), मध्यान्ह भोजन योजनेसाठी आवश्यक भांडी पुरविण्यात आली.







निपुण भारत अंतर्गत माता पालक गटाची स्थापना -

निपुण भारत अंतर्गत माता पालक गटाची स्थापना करण्यात आली. स्थापना करण्यात आली त्यामध्ये लीडर माता इतर समाविष्ट माता पालकांना मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना विविध अध्ययन निष्पत्ती प्राप्त करून देण्यास अध्ययन अध्यापन प्रक्रियेत मदत करतात.

नवसाक्षर भारत कार्यक्रमात सहभाग -

गाव सर्वेक्षणामध्ये व गावातील इतर माहिती जमा करण्यामध्ये शाळेतील माता पालक विद्यार्थी यांनी मोलाचे सहकार्य केले. नवसाक्षर भारत कार्यक्रमांतर्गत माता पालकांची सभा घेण्यात आली. गावातील उच्चशिक्षित विद्यार्थ्यांची नियुक्ती स्वयंसेवक म्हणून करण्यात आली. नवसाक्षर व्यक्तींना साक्षर करण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समिती, गावातील सुशिक्षित व्यक्तींनी घेतली. आपला गाव साक्षर करण्यासाठी सगव्यांनी मोलाचे सहकार्य करण्याचे ठरविले.

ग्रामसभा अध्ययन अनुभव -

ग्रामपंचायत निमणवाडाचे सरपंच सौ छाया मडावी,उपसरपंच चेतन सुरपाम व गावातील इतर प्रतिष्ठित नागरिक यांनी सुद्धा वेळोवेळी विविध जयंती उपक्रम, सहशालेय उपक्रम यात उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ग्रामसभेमध्ये विद्यार्थ्यांना सहभाग घेऊन त्यांना ग्रामपंचायतच्या कारभाराविषयी माहिती दिली त्यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञान अनुभव प्राप्त झाले. अशा प्रकारे विविध उपक्रमांमध्ये पालकांचा, लोकांचा सहभाग शाळेला सतत मिळतो.



शालेय बाग -

ग्रामपंचायत निमणवाडा येथील ग्रामसचिव मुळे मॅडम, रोजगार सेवक श्री चापडे शालेय बगीचा तयार करण्यासाठी खूप मोलाचे योगदान केले. बगीचा स्वच्छता करणे,त्याची देखभाल करणे,त्याला पाणी देणे, त्याचे सुशोभीकरण करणे हे सर्व ग्रामपंचायत, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा निमगाव येथील विद्यार्थी व त्यांचे पालक शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सर्व मिळून जवाहरलाल नेहरू गुलाब उद्यान, डॉ. जगदीश चंद्र बोस जैवविविधता गार्डन,फळबाग यांचे संवर्धन करण्यात येत आहे त्यामुळे शाळेच्या परिसर स्वच्छ व सुशोभित दिसत आहे.



फलनिष्पती -

लोकसहभाग मिळण्याची प्रेरणा आमच्या रांगी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री देवेंद्र लांजेवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली निमगाव शाळेत अथक प्रयत्न करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रयत्न केला जातो. पालकांना शाळा आपली वाटू लागली. लोकसहभाग वाढू लागला. अशा प्रकारे लोकसहभाग व स्नेहसंमेलनातून मिळणाऱ्या निधीतून, शिक्षकांच्या कल्पकतेतून, हितचिंतक व मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाने तसेच शाळेच्या अविरात प्रयत्नांनी शाळेची पटसंख्या १०२ आहे. शिक्षक,पालक व विद्यार्थी यांनी मनावर घेतले अन इच्छाशक्तीच्या जोरावर वाटचाल करण्याचा निर्धार केला तर किती कायापालट होऊ शकतो,याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे निमगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा निमगाव होय .लोकसहभाग कसा मिळवायचा हे शाळेने इतर शाळेना दाखवून दिले. आज शाळेची प्रगतीकडे घोडदौड सुरु आहे.म्हणून तर ही शाळा जिल्ह्यात प्रसिध्द आहे .



आभार -

लोकसहभागातून शाळेचा विकास साधण्यासाठी आमच्या तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा . श्री आरवेली साहेब,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मा. श्री आखाडे साहेब तसेच आमच्या केंद्राचे केंद्रप्रमुख श्री देवेंद्र लांजेवार सर तसेच गट साधन केंद्र धानोरा येथील विषय तज्ञ / साधन व्यक्ती आम्हाला वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन व मदत करत असतात. त्यामुळे आम्हाला विद्यार्थ्यांचा विकास साधण्यासाठी विविध नवीन उपक्रम राबविण्याची प्रेरणा मिळत असते.

शाळा व्यवस्थापन समिती निमगाव अध्यक्ष तसेच सदस्य, शाळेतील मुख्याध्यापक व सहकारी शिक्षक यांचे विशेष आभार. आजच्या शिक्षण पद्धतीतील केंद्रबिंदू असणारे आमचे लाडके विद्यार्थी यांचे सुद्धा मनापासून आभार.


















ग्रीन सलाद
(कच्चा)







अतिदुर्गम भागातील उपक्रमशील शाळा

शाळेचे नाव – जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक आदर्श शाळा, झालीया, पं.स.सालेकसा,जि.गोंदिया.

Email – zaliyazpschool@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – श्री रोशनलाल मोहरीलाल लिल्हारे



प्रास्ताविक -

शालेय जीवन हा आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम काळ असतो कारण आपण नवीन मित्र बनवतो, नवीन गोष्टी शिकतो आणि तिथे आपले वर्तन घडवितो. शालेय जीवन आपल्याला अनेक नवीन गोष्टी शिकविते आणि जीवनातील सर्व आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार करते.

खेड्यापाड्यामध्ये बालकांच्या आणि पालकांच्याही मनामध्ये आदराचे स्थान निर्माण करणारी ही वास्तू आहे. ही वास्तू केवळ दगड, विटा मातीची नाही तर हिच्यासोबत अनेकांच्या मनातील आपुलकी आणि सोज्वळ भावना जुळलेल्या असतात. शाळा बालकांना शहाणे करुन सोडते. बालकांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे बळ देते. त्यांच्या पंखामध्ये शक्ति भरून उंच आकाशात भरारी घेण्याचे सामर्थ्य देते.त्यामुळे सर्वजण शाळेकडे आदराने पाहतात. ज्याप्रमाणे बाळ आपल्या आईकडे ममतेच्या रुपात बघतो, अगदी तसेच शाळेतून शिकून गेलेला प्रत्येक जण शाळेपुढे आदराने नतमस्तक होतो हे महात्म्य शाळेचे आहे. शाळेने अनेकांना स्वतःच्या पायावर उभे करून सफल जीवन जगण्यासाठी प्रेरित केलेले आहे आणि त्यांना समाजात मोठे केलेले आहे. असे अनेकजण आपल्या शाळेचे ऋण फेडण्यासाठी पुढे येतात आणि देणगीच्या रुपात निधी एकत्र करुन आपल्याला उज्जवल भवितव्य देणाऱ्या शाळेचा जीर्णोध्दार करतात आणि घडवतात ती "स्वच्छ शाळा, सुंदर शाळा."

हो, अगदी अशीच समाजाच्या, गावकऱ्यांच्या पालकांच्या, शिक्षकांच्या आणि पालकांच्या आणि बालकांच्या स्वप्नातील शाळा म्हणजे आमची जिल्हा परिषद वरिष्ट प्राथमिक आदर्श शाळा झालिया ! महाराष्ट्र शासनाच्या अभिनव उपक्रमातील आदर्श शाळा [MODEL SCHOOL]. अगदी नावाला साजेल अशी आणि तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात नावारुपास आलेली आदर्श शाळा. गोंदिया – आमगांव – सालेकसा दरम्यान राज्य महामार्ग क्रमांक 543 वर सालेकसा पासून 10 किमी अंतरावर वाघ नदीच्या काठावर बसलेली आहे. आमची शाळा निसर्गरम्य वातावरणात असून येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरुंचे लक्ष वेधून घेत आहे.

भव्य प्रवेशद्वार, हिरव्या पिवळ्या पांढऱ्या रंगाने रंगवलेली इमारत, प्रवेशद्वारापासून मुख्य इमारतीपर्यंत आणि त्यामध्ये फुललेली आणि बहरलेली हिरवीगार फुलझाडे कुणाचेही मन मोहीत करते. मुख्य इमारतीवरील शाळेचे सुस्पष्ट आणि आकर्षक नाव भल्याभल्यांना आपल्याकडे आकर्षित करते.

सालेकसा तालुक्यातील सुंदर आणि आकर्षक असणारी आमची शाळा आणि आमच्या स्वच्छ व सुंदर शाळेची यशोगाथा. 30 सप्टेंबर 1949 मध्ये स्थापन झालेली ही शाळा. इमारतीने मात्र आता कात टाकलेली आहे. सर्व वर्ग पक्के आणि मजबूत बांधलेले आहेत. गावातील लोकांच्या सहकार्याने ह्या शाळेने बऱ्यापैकी अंग झटकून सुंदर पेहराव परिधान केलेला आहे. जशी शाळा दिसायला सुंदर आणि आकर्षक आहे अगदी तशीच शाळेने गुणवत्ता आणि दर्जेदार शिक्षणाचे व्रत कायम पाळलेले आहे.याच शाळेने जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती असे मोठे मोठे राजकारणी दिग्गज जिल्ह्याला दिलेले आहेत. डॉक्टर्स, इंजिनियर, प्राध्यापक, शिक्षक आणि अनेक शासकीय खाजगी कंपनीत मोठ्या पदावर काम करणारे अधिकारी आमच्या झालिया शाळेची देण आहे.

श्री रोशनलाल मोहरीलाल लिल्हारे उच्चश्रेणी मुख्याध्यापक हे सध्या शाळेचे नेतृत्व करीत आहेत. त्यांचा सोबतीला श्री अनिलकुमार अंबुले (पदवीधर शिक्षक), श्री तोषलाल लिल्हारे (पदवीधर शिक्षक), सौ. अनिता निखाड़े (श. शि), सौ. शहनाज शेख (श. शि.) हे शिक्षक आहेत. शाळा जिल्हा परिषदेची असून माध्यम हिंदी आहे. शाळेमध्ये इयत्ता पहिली ते आठवीचे वर्ग असून इयत्ता पहिली ते आठवीचा पट एकूण 209 आहे. 114 मुले आणि 95 मुली या शाळेत शिकून आपल्या उज्जवल भविष्याचे स्वप्न पाहत आहेत. गावामधील उच्चशिक्षित आणि अनुभवी 1 पुरुष व तीन महिला स्वयंसेवकांची निवड करण्यात आलेली आहे.

आजचे युग माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. विज्ञानाचे युग आहे. जग वेगाने प्रगती करीत आहे. ज्ञानांच्या कक्षा आता रुंदावलेल्या आहेत. ज्ञान विस्तीर्ण झालेले आहे. विद्यार्थी आता माहिती आणि तंत्रज्ञानाचा भुकेला आहे. तंत्रज्ञानाच्या जाणिवेने तो जिज्ञासू आणि उत्सुक झालेला आहे. उत्सुकतेला योग्य खतपाणी घालणे काळाची गरज आहे. मात्र केवळ पाठ्यपुस्तकांच्या मदतीने ती गरज भागू शकत नाही. तर त्यासाठी सुसज्ज संगणक आणि प्रोजेक्टरयुक्त वर्गखोली हवी. जेणेकरुन विद्यार्थ्यांना कणापासून तर ब्रम्हांडापर्यंत जीवंत अध्ययन अनुभव देता येईल. पण समस्या हीच की एवढा निधी कुठून आणि कसा जमा करायचा. मुख्याध्यापक श्री आर. एम. लिल्हारे आणि इतर शिक्षक यांचा प्रयत्नाने आणि समाज व पालकांच्या सहकार्याने पाच संगणक आणि दोन प्रोजेक्टर तर दोन वर्गामध्ये स्मार्ट टिव्ही यांची सोय करण्यात आली आणि शाळेला डिजिटल शाळा म्हणून नावारुपास येण्याचा मान प्राप्त झाला. जिल्हातील कोणत्याही शाळेमध्ये नसेल एवढे सुसज्ज वर्ग आज शिक्षक आणि समाजाच्या सहकार्यातून निर्माण झाले. केवळ विद्यार्थी हा केंद्र मानून केलेले कार्य आज अनेकांना प्रेरणादायी ठरलेले आहे.

मुख्याध्यापक श्री आर. एम. लिल्हारे यांचा नेतृत्वात जवळ पास चार लक्ष रूपये गोळा करून शाळेतील सर्व वर्गाच्या भिंती बोलक्या करण्यात आल्या. जणू त्या त्या वर्गाचा पाठ्यक्रम त्या वर्गाच्या भिंतीवर उतरवला गेला. याचा फायदा विद्यार्थ्यांना झाला आणि आताही होत आहे. शाळेसाठी कुणी फोटो दिला, कुणी पंखा दिला तर कुणी प्रवेशद्वारा वर बोर्ड दिला.अनेक रुपात शाळेचा आपला वाटा अनेकजणांची उचलला याचे संपूर्ण श्रेय शाळेतील शिक्षकवृंद आणि पालकांना द्यावे लागेल. शाळेविषयी आपुलकी अनेक जणांची जपलेली आहे.

सध्या शाळेचे नेतृत्व उच्चश्रेणी मुख्याध्यापक श्री रोशनलाल मोहरीलाल लिल्हारे करीत आहेत. शिक्षणाचा कळवळा आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाची कास धरणारा असा मुख्याध्यापक मिळावा ही शाळेची परंपरा कायम राहिली. चांगल्याला टिकवून ठेवणे, दर्जेदार आणि उत्कृष्टाला आणखी उत्कृष्ट करणे हेही तेवढेच जिकरीचे आणि जबाबदारीचे काम आहे. शाळेचे रंगरंगोटी आणि संगणक, प्रोजेक्टर इत्यादि साहित्य सुस्थितीत आणि वापरात ठेवण्याचे शिवधनुष्य पेललेले आहे.

या शैक्षणिक वर्षात आमच्या शाळेची पटसंख्या 214 झालेली आहे. 2021 – 2022 ला 226, 2020 – 2021 ला 213, 2019 – 2020 ला 189, 2018 – 2019 ला 182 अशी होती. एकंदरीत पाहता या वर्षी पटसंख्येत लक्षणीय वाढ झालेली आहे. आजू बाजूच्या गावातील अनेक विद्यार्थी आणि पालक यांनी आमच्या शाळेवर दाखवलेला विश्वास याला कारणीभूत आहे. या वर्षी जवळपास 25 विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद शाळा आणि खासगी इंग्रजी माध्यमातून आमच्या शाळेत प्रवेश घेतलेला आहे. ही आमच्या शाळेची जमेची बाजू आहे. आजच्या घडीला पंचक्रोशीतील पालक आणि विद्यार्थी आमच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी अतिशय उत्सुक आहेत. आपल्या मुलांनी झालिया च्या जिल्हा परिषद शाळेत शिकावे हे स्वप्न पालकांनी पहावे याचे पूर्ण श्रेय मुख्याध्यापक श्री रोशनलाल मोहरीलाल लिल्हारे आणि सर्व शिक्षकवृंदांना जाते.

शाळेची वैशिष्टे –

- सुसज्ज वाचनालय, क्रीडा साहित्य, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन.
- शैक्षणिक सहल, वार्षिक स्नेहसंमेलन, चित्रकला स्पर्धा.
- बालसभा, माझा वाढदिवस, Smart Boys & Smart Girls.
- रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, वृक्षारोपण.
- विविध जयंती, पुण्यतिथि साजरी करणे, राष्ट्रीय सण साजरे करणे, क्षेत्रभेट, दिनांक तो पाढा , गृहपाठ, तपासणी पथक, निवडणुकीतून मंत्रिमंडळ
- शंकापेटी, उपस्थिति ध्वज, मराठी, हिंदी, इंग्रजी परिपाठ.
- संगणक शिक्षण, गावातील व्यावसायिकांना भेट देणे.
- दफ्तर विना शाळा, तंबाखूमुक्त शाळा.
- काड्या मोजूया – बेरीज शिकुया, शब्दांशी खेळुया, माझा आवाज ओळखा, अतिथी व्याख्यान.

हात धुवा नंतर जेवा -

वरील सर्व उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा विकास हे व्रत मुख्याध्यापक श्री रोशनलाल मोहरीलाल लिल्हारे यांचा नेतृत्वाखाली सर्व शिक्षकवृंदांनी घेतले आहे. शाळेची प्रगती आणि विद्यार्थी विकास हेच ध्येय ध्यानी आणि मनी शिक्षक व पालकांनी मनात रुजवले आहे. शाळेच्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. नवोदय परीक्षा, NMMS परीक्षा, शिष्यवृती परीक्षांमधून पात्र विद्यार्थ्यांची निवड होत आहे ही शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी बाब आहे. शैक्षणिक वर्ष 2021 – 22 मध्ये 14 विद्यार्थ्यांनी शिष्यवृती परीक्षेत बाजी मारलेली आहे. ही शाळेसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे.

समारोप –

शाळेच्या विकासासाठी शाळा व्यवस्थापन समितीसुध्दा तनमनधनाने काम करीत आहे. श्री खिलेश दमाहे यांच्या अध्यक्षतेखाली आणि सरपंच कुंजनजी नवगोडे यांच्या मार्गदर्शनाने तसेच सौ. डिलेश्वरी कुराहे, श्री रंगलाल भगत व इतर सदस्य यांच्या संकल्पनांतून अनेक शालेय – सहशालेय उपक्रम राबवले जातात. नुकताच 2 ऑक्टोबर रोजी महात्मा गाँधी जयंतीच्या निमित्ताने स्वच्छ भारत चित्रकला स्पर्धा शाळा व्यवस्थापन समिती मार्फत आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण व शाळेसाठी झपाटून काम करणाऱ्या सर्व शिक्षकांना गौरविण्यात आले. ही शाळेतील सर्व शिक्षकांसाठी प्रेरणा आहे. मा. व्ही. जी. राठोड़ (केंद्रप्रमुख) केंद्र झालिया, मा. विशाल डोंगरे (ग.शि.अ.) प. स. सालेकसा, मा. डॉ. महेंद्र गजभिये (शिक्षणाधिकारी प्राथमिक) जि. प. गोंदिया, मा. एम. एल. मेश्राम (व. शि. वि. अ.) प. स. सालेकसा, श्री पी. एस. शरणागत गटसमन्वयक BRC सालेकसा, DIET गोंदिया चे प्राचार्य डॉ. रमेश राऊत, अधिव्याख्याता सौ. सरस्वती सूर्यवंशी, श्री नरेश वैद्य, श्रीमती पूनम घुले, श्री भाऊराव राठोड़ यांचे ही अनमोल मार्गदर्शन शाळेच्या विकासात भर घालत आहेत.

विविध उपक्रमांचे निवडक फोटो –




आर एम लिल्हारे उ श्रे मुख्याध्यापक के
मार्गदर्शन में औद्योगिक क्षेत्र भेंट






आर एम लिल्हारे उ श्रे मुख्याध्यापक
दारू बंदी वर एकल नृत्य




भेड़ाघाट सहल










अदानी फाउंडेशन तत्वावधानात गांवची शाळा
आदर्श शाळा पुरस्कार






शाळेचा प्रगति,गांवची शाळा आदर्श
शाळा पुरस्कार,पी एम श्री योजनात
नंबर लागल्या मुळे मुख्याध्यापकाचा
जिला परिषद सदस्य कडुन सत्कार


झालिया जि.प. शाळेत पालक मेळावा
सोनपुरी : सालेकसा तालुक्यातील झालिया येथील जिल्हा परिषद वरिष्ठ
प्राथमिक आदर्श शाळापूर्व तयारी व पालक मेळावा घेण्यात आला.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पं.स. सभापती प्रमिला गणवीर या होत्या.
यावेळी जि.प. सदस्या छाया नागपुरे, सरपंच कुंदन नवगोडे, उपसरपंच
ललित मच्छिरके, पोलिस पाटील कविता कुराहे, हेमराज सुलाखे,
रोशनलाल गणवीर, प्रदीप शरणागत सुरेंद्र खोब्रागडे, विषयतज्ञ वाघमारे,
संजय सांबळे, कमलेश मेश्राम, हरेश कुराहे, मुलचंद लिल्हारे उपस्थित
होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक आर.एम. लिल्हारे यांनी मांडले, कार्यक्रमाचे
संचालन ए.जे. अंबुले यांनी केले तर आभार टी.आर. लिल्हारे यांनी मानले.




आर एम लिल्हारे उ श्रे मुख्याध्यापकचा
मार्गदर्शनात पळसबाग मुलाने तयार केले





ऍस्ट्रॉनॉमी क्लब – अंतराळ, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न.

शाळेचे नाव - जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,डिग्रस कऱ्हाळे, ता. जि. हिंगोली.

मुख्याध्यापकाचे नाव - श्री. लक्ष्मण राघोजी घुगे

सहशिक्षक - श्री.विठ्ठल दत्तराव गवळी


प्रास्ताविक-

भारताने नुकतेच चंद्रयान-3 व आदित्य L1 मिशन यशस्वीरित्या पूर्ण केलेले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचे स्थान व दबदबा वाढला. भविष्यातील आव्हानांचा व स्पर्धेचा विचार करता विद्यार्थ्यांना बाल्यावस्थेत ग्रह, तारे, रॉकेट यांची आवड निर्माण झाल्यास अनेक संधी तयार होतील. ग्रामीण भागात ग्रह, तारे, ग्रहणे याविषयी आहे, अंधश्रद्धा आहेत. ज्ञान व अनुभवाद्वारे नवीन पिढी त्यावर मात करू शकते.

विद्यार्थी बालपणापासून चंद्र, सूर्य आकाश पाहतात. याविषयी कमालीची उत्सुकता असते. विद्यार्थ्यांना आकाश व अवकाशा विषयी कुतूहल असते. अनेक प्रश्न त्यांना पडतात. दररोज चंद्र सारखा का दिसत नाही? एकाच वेळी चंद्रोदय,सूर्योदय का होत नाही? हिवाळ्यात आवडणारा उबदार सूर्यप्रकाश उन्हाळ्यात त्रासदायक का होतो? या प्रकारचे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांना पडतात. आई, वडील, आजी, आजोबा व नातेवाईक, शेजारी यांच्याकडून चुकीची माहिती, अंधश्रद्धा विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवल्या आढळल्या. सूर्यग्रहण चंद्रग्रहण याविषयी भीती विद्यार्थ्यांच्या मनात होती. शाळेत नाविन्यपूर्ण विज्ञान कक्ष असल्यामुळे नियमित प्रयोगाचे सादरीकरण होत होते. त्यामुळे विद्यार्थी प्रश्न विचारायचे. यातूनच विद्यार्थ्यांना खगोलीय घटनांचा अर्थ, परिणाम समजावणे, माहिती देणे आवश्यक वाटले तसेच विद्यार्थ्यांमध्ये नवनवीन संकल्पना, विचारप्रवाह, नवीन तंत्र, सृजनशीलता व संशोधन वृत्ती वाढीस लावणे गरजेचे होते. टेलिस्कोप मधून चंद्र, ग्रह, उपग्रह दाखवण्याचे ठरले.

शिक्षकांनी विषयासंदर्भात अधिक प्रभावी केलेले काम -

दिनांक १४ जुलै २०२३ रोजी श्रीहरीकोटा येथे चंद्रयान-3 चे प्रक्षेपण प्रत्यक्ष पाहिल्यानंतर याविषयी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना माहिती देण्याचा विचार आला. त्यानंतर ऑगस्ट 2023 पासून दर शनिवारी एका विषयावर विद्यार्थ्यासोबत चर्चा करण्यात आली. दर शनिवारी एक वेगळा विषय असल्यामुळे विद्यार्थी शनिवारची वाट पाहत असत. घरी गेल्यानंतर विविध वस्तू बनवून पहात, चित्र काढत. यादरम्यान विद्यार्थ्यांना टेलिस्कोपच्या मदतीने चंद्र व चंद्रावरील विवरे यांचे निरीक्षण करण्याचा अनुभव देण्यात आला. यामुळे डोळ्यांनी दिसणारा चंद्र व टेलिस्कोपमधून दिसणारा चंद्र यातील फरक समजू शकली. सूर्यमाला, रॉकेट, रोबोट, ISS, अंतराळवीर, विमान यांची माहिती त्यांना व्हिडिओद्वारे मिळाली. काही प्रयोग त्यांच्यासमोर करण्यात आले. शेवटच्या शनिवारी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या साहित्याचे गावपातळीवर प्रदर्शन



भरवण्यात आले. सोबतच चंद्रकलांच्या वेळेनुसार वेगवेगळे शाळांमध्ये टेलिस्कोपच्या मदतीने चंद्र निरीक्षणाचे कार्यक्रम, कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.

मुख्याध्यापक,शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी नियोजित उपक्रमांची केलेली अंमलबजावणी -

अ.क्र.	दिनांक	घटक	क्षणचित्रे
1)	14/07/2023	श्रीहरीकोटा- प्रत्यक्ष उपस्थिती	
2)	05/08/2023	गुरुत्वाकर्षण	
3)	12/08/2023	चांदयान-3 प्रक्षेपण माहिती	
4)	15/08/2023	चांदयान-3 देखावा, अंतराळवीर	
5)	19/08/2023	सूर्य	
6)	26/08/2023	पृथ्वी	
7)	28/08/2023	कृत्रिम तारांगण अनुभव	
8)	02/09/2023	आदित्य-L1 प्रक्षेपण माहिती	
9)	09/09/2023	सूर्यमाला	
10)	16/09/2023	रॉकेट	
11)	23/09/2023	चंद्र	
12)	30/09/2023	ISRO संस्था	
13)	07/10/2023	ISS- आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशन	

14)	14/10/2023	रोबोट	
15)	21/10/2023	विमान	
16)	21/10/2023	रात्री- चंद्र व आकाश निरीक्षण	
17)	28/10/2023	कागद काम, रांगोळी, चित्र	
18)	04/11/2023	प्रदर्शन	

फलनिष्पत्ती यशोगाथा -

सूर्य, सूर्यमाला, सूर्यमालेतील ग्रह याविषयी माहिती विद्यार्थी समजतात. पृथ्वी, गुरुत्वाकर्षण, चुंबक यांची माहिती झाली. रॉकेटचे कार्य समजून घेतले. त्यानुसार रॉकेट, अंतराळवीर, विमान यांच्या प्रतिकृती बनविल्या. आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशन, झिरो ग्रॅव्हिटी याची माहिती मिळाली. कृत्रिम तारांगणातून आकाशगंगा, तारे ग्रह पाहून भावविश्वच विस्तारले. दिवस, रात्र, ऋतू यांचे संबंध समजले. ग्रहणे, धूमकेतू, साडेसाती, राशीत मंगळ असणे याविषयी जाणीव जागृती झाली व या उपक्रमातून विद्यार्थ्यांना चंद्र, विवरे या विषयी माहिती झाली. टेलिस्कोप मधून चंद्र, त्यावरील विवरे यांच्या बद्दल माहिती मिळाली. चंद्रकला याविषयी चर्चा करू लागले.

टेलिस्कोपद्वारे आकाश निरीक्षणच्या जिल्हा परिषदेच्या 38 व हिंगोली मध्ये 16 कार्यशाळा घेतल्या. मा.जिल्हाधिकारी श्री.जितेंद्र पापळकर सरांनी जिल्हास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन केले. इतर शाळात विद्यार्थ्यांनी विविध प्रश्नोत्तराद्वारे चर्चा करून माहिती घेतली टेलिस्कोप मधून पहिल्यांदा चंद्र पाहून आनंदून गेले.

समारोप -

या उपक्रमामुळे विद्यार्थी शाळेत आनंदाने येत आहेत. स्वाध्याय प्रश्नोत्तरे, गृहपाठ यापेक्षा वेगळे, मनोरंजक व त्यांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळत असल्यामुळे चित्रकला, क्राफ्ट कामाला वाव, खेळणी निर्मिती यामुळे उपस्थिती वाढली. सोबतच या उपक्रमाचा संबंध परिसर अभ्यास, गणित, भाषा, इंग्रजी सोबत येत असल्यामुळे इतर विषयांना सुद्धा देण्यात फायदा झाला. विद्यार्थी आवडीने व समजून अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सहभागी होत आहेत. वर्गातील सूर्यमालेविषयी चार्ट हाताळत आहेत. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या साहित्याचे प्रदर्शन पाहण्याकरिता पालक, ग्रामस्थ उपस्थित होते. आपल्या मुलांनी केलेले साहित्य पाहून, त्यांची माहिती पाहून ते आश्चर्य व्यक्त करत आहेत.टेलिस्कोप वापरामुळे इतर शाळेतील विद्यार्थ्यांना आकाश निरीक्षण करता आले. ग्रह, तारे, भारताच्या चंद्र मोहिमा, लिगो वेधशाळा, ब्लॅक होल,

ग्रहणे, अंतराळ स्टेशन याविषयी माहिती झाली. येणारा काळ हा विज्ञानाचा आहे, या स्पर्धेकरिता मुलांना तयार करणे ही आपली जबाबदारी आहे. याकरिता उचललेले हे छोटे पाऊल आहे.

व्हिडीओची link-

https://drive.google.com/file/d/12yO952xyum2wBFBRqUskQYw03NL9kJUD/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1dRjuKELjnZKB2-WSJWwTA5HIrWodqcje/view?usp=drivesdk

फोटो ची link-

https://drive.google.com/file/d/1xORVremCpuY4AB8vDNKQEWCfyrAux-0n/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1xSdTRcSltbUdWnTU-Tp9kNd3H7Sd0aQ-/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1xSipjaxnXqL1yWSeHaBJz4LtXF_qwwHN/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1xnhKcyT3VqsPirBwK_xIfgbKYLMx1ExF/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1oT3feLUCDISUUEfbYxBNYhpdZD7XMWK4/view?usp=drivesdk

शाळा विकसित होण्यासाठी ग्रामस्थांचे लाभलेले सहकार्य व सहशालेय उपक्रम यांच्या समन्वयातून विद्यार्थी गुणवत्ता विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळदरी ता. औंढा ना. जि. हिंगोली

शाळेचा इमेल आय डी - cpspimpaldari7@gmail.com

मुख्याध्यापकाचे पूर्ण नाव - खपले विठ्ठल बाबुराव

सहशिक्षक - श्री. सिद्धेश्वर प्रभाकर शिंदे

प्रास्ताविक –


जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा पिंपळदरी ता. औंढा (नागनाथ) जिल्हा हिंगोली या आमच्या शाळेची निवड राज्य शासनाच्या आदर्श शाळायोजनेच्या पहिल्या टप्प्यात सन-२०२१ मध्ये झाली. तसे पाहता पिंपळदरी गावात विकास आणि बदलाचे चक्र थोडे अगोदरच सुरु झाले होते. मराठवाडा ,हिंगोली, औंढा, पिंपळदरी असा कमी प्रगतीचा हा भाग. गावातील पूर्वीची शाळा विद्यार्थी संख्येच्या तुलनेत खूपच लहान व अस्वच्छ परिसराने वेढलेली होती. शाळा प्रशासन आणि गावातील समाजसेवी ग्रामस्थ यांनी शाळेभोवती असणारी नापीक परंतु बाजारमूल्य अधिक असणारी जमीन शाळेला मिळवून देण्यासाठी कंबर कसली.

मुख्याध्यापक, शिक्षकांनी विषयासंदर्भात अधिक प्रभावी केलेले काम -

सन २०२१ मध्ये जिल्ह्यातील एकूण सहा शाळा आणि आपल्या तालुक्यातील एकमेव आपल्या शाळेची आदर्श शाळा यासाठी निवड झाल्याचे समजताच शाळा प्रशासन आणि समस्त गावकरी आनंदाने हरखून गेले. कोव्हीडचा प्रादुर्भाव सुरूच होता. तरीही ग्रामस्थाच्या पुढाकाराने शासनाचा विकास निधी येण्याची वाट न पाहता लोकसहभागातून आपले वेगळेपण सिद्ध करायचे ठरविले. मार्च २०२१ मध्ये शाळेच्या विकासासाठी पहिली ग्रामसभा शाळेत घेण्यात आली. पिंपळदरी गावच्या पंचक्रोशीत प्रसिद्ध गर्भश्रीमंत डोडल परिवारास वारंवार विनंती करून 40 गुंठे जमीन दानपत्र करून घेतली. सोबतच रिठे परिवाराची सामुदायिक मालकी असणारी १० गुंठे जमीनही शाळेसाठी दानपत्र करून मिळाली. आता शाळेकडे एकूण जवळपास ६० गुंठे जमीन झाली. त्यात आदर्श शाळा म्हणून निवड होण्यापूर्वी नवीन वर्गखोल्या आणि मैदान नुतनीकरण साठी जि. प. मधून मंजुरी मिळवून उत्तम नियोजनात कामही पार पडले.

तालुका प्रशासन, उपक्रमशील शिक्षक, सरपंच तथा ग्रामपंचायतचे आजी माजी सदस्य, होतकरू गावकरी आणि शाळेतील शिक्षक यांच्या सहविचार सभेत केवळ विकासाचे ठराव, मुद्दे आणि चर्चा एवढ्यावरच न थांबता याच बैठकीत 'समाजाप्रति आपलं देण' या उदात्त भावनेने उपस्थित गावकऱ्यांनी जवळपास दोन लाख रुपये निधी एकाच बैठकीत जमा केला. सोबतच शाळेत कार्यरत अकरा शिक्षकांनी मिळून एक लाख अकरा हजार रुपये शाळेसाठी रोख स्वरुपात देणगी म्हणून दिले.

या जमलेल्या विकासनिधीत अजून भर घालण्यासाठी गावकऱ्यांनी 'पिंपळदरी भूमिपुत्र' या नावाने whatsapp ग्रुप तयार करून गावातील स्थानिक तसेच नोकरी/व्यवसायाच्या निमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या इच्छुकांना प्रेरित करत वस्तू, सेवा आणि पैसे या स्वरुपात सहभागी करवून घेतले. तसेच गावातील वाढदिवस आणि lockdown असतानाही होत असलेली छोटी लग्न अश्या प्रसंगी परिवाराकडूनही उत्स्फूर्तपणे देणगी देण्यात आली. आलेल्या सर्व रकमेचा जमाखर्च पाहण्यासाठी एक समिती



गठीत करण्यात आली. त्या माध्यमातून नियोजनबद्ध असा भौतिक विकास सुरु झाला. इमारतीची किरकोळ दुरुस्ती, फरशी, RAMP, रेलिंग, दरवाजे, खिडक्या, प्लास्टर, तारकुंपण, मोठे लोखंडी गेट सोबतच 'आकर्षक स्वागत कमान' इत्यादी बांधकाम..... शालेय इमारत रंगरंगोटी, चित्रे-तक्ते-नकाशे-सुविचार आदि शैक्षणिक दृष्ट्या पेंटिंग आवश्यक कामे करण्यात आली. पडझड झालेल्या वर्गखोल्या आणि घाणीने वेढलेला परिसर यात आमूलाग्र बदल होवून स्वच्छ सुंदर आकर्षक इमारत आणि प्रसन्न करणारा भव्य शालेय परिसर असा कायापालट झाला.

मुख्याध्यापक,शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी नियोजित उपक्रमांची केलेली अंमलबजावणी -

जून २०२२ पासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर वर्षभरात राबविले जाणारे उपक्रम, स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी, गुणवत्ता विकास आणि भौतिक घटकात अपेक्षित बदलासंबंधी DIET हिंगोली, मुथा फौंडेशन आणि शाळेतील सर्व शिक्षक यांच्या समन्वयातून SQDP (SCHOOL QUALITY DEVELOPMENT PROGRAM) तयार करण्यात आला. विशेष नाविन्यपूर्ण उपक्रमांची योजना आखून त्यानुसार नियोजन तयार करण्यात आले. त्यातील घटकांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे..

सहाध्यायी गट –

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासाकरिता सुरुवातीला वर्गनिहाय त्यांचा अध्ययन स्तर पडताळणी करून त्यानुसार अभ्यासगट निश्चित करण्यात आले. संबंधित गटात शक्यतो घराजवळ, एकाच गल्लीत/वस्तीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश करून त्यांचा गटप्रमुख नेमण्यात आला. वर्गनिहाय अध्ययन स्तरानुसार सराव.स्वाध्याय व गृहपाठाचे नियोजन करून अंमलबजावणी करण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेत सकारात्मक बदल प्रकर्षाने जाणवला. गटात वावरल्याने निकोप गुणात्मक स्पर्धा वाढीस लागली, बंधुभाव, स्त्री-पुरुष समानता, परस्पर सहकार्यवृत्ती अश्या सामाजिक जीवनमुल्यांची रुजवणूकही उत्तमप्रकारे साधली जात आहे.

खान अॅकॅडमी –

आदर्श शाळांसाठी राज्य शासनाने गणित विषयातील संबोध दृढीकरण करिता ऑनलाईन विशेष उपक्रम म्हणून चालविलेला खान अॅकॅडमी आमच्याही शाळेत सुरु झाला. सुरुवातीला वेबसाईटवर येणाऱ्या तांत्रिक अडचणी क्लिष्ट वाटत होत्या. मात्र सराव आणि DIET टीम च्या मार्गदर्शनाने हळूहळू त्या बाबी सुकर होत गेल्या. शिक्षक नोंदणी, वर्ग तयार करून विद्यार्थी नोंद, सराव आणि स्वाध्याय देणे या सर्व ऑनलाईन प्रक्रिया नियमित करण्यात येवू लागल्या. तुलनेने डोंगराळ दुर्गम आणि अदिवशी बहुल असणारा हा भाग पायाभूत सुविधेचा अभाव असलेला, पालकांकडे मोबाईलची कमतरता, पालकांचे स्थलांतर, नेटवर्क समस्या, एका मोबाईलवर एकच लॉगीन होणे अश्या अडचणीना तोंड देत अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

दप्तराविना शाळा –

मागील दोन वर्षापासून शाळेत सुरु असलेला हा उपक्रम SQDP मध्ये समाविष्ट करण्यात आला आणि त्यातील रंजकता आणि परिणामकारकता अधिकच प्रभावी होत गेली. दर महिन्याचा शेवटचा शनिवार हा उपक्रम पूर्वनियोजित अभ्यासपुरक शैक्षणिक घटकांचा तोही सर्वाना रुची वाटेल असा भरगच्च असतो. यात एक दिवस दप्तर नसल्याने मुले अगदी

हसत खेळत आनंददायी अध्ययनासाठी तत्पर असतात. सामुदायिक कवायत, योगासने-प्राणायाम, प्रयोगातून विज्ञान, गोष्टीचा वार, English Learning Activity, गणितातील गमती जमती, मुलाखत व चर्चा, व्याख्यान/मार्गदर्शन, स्थानिक क्षेत्रभेट, कला कार्यानुभव प्रात्याक्षिके, विविध कला गुणदर्शन, एक तास वाचनाचा, असे नानाविध शैक्षणिक व पूरक उपक्रम राबविल्याने दप्तराविना शाळा उपक्रमाची सर्व विद्यार्थी आतुरतेने वाट पाहतात आणि आनंद घेतात.

नाविन्यपूर्ण परिपाठ –

नैतिक मूल्यांचे पाठ देणारा दैनिक परिपाठ तर जवळपास सर्वच शाळांमध्ये अनिवार्य आहेच. त्यातही आपले वेगळेपण सिद्ध करण्यासाठी परीपाठाच्या रचनेत काही बदल केले ते असे; संगीतमय सादरीकरण, मुले मुली सर्वाना समान संधी, दिवसांचा क्रम ठरवून मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषेत सादरीकरण, तारखेचा पाढा, विद्यार्थी वाढदिवस, इंग्रजी संवाद, मा,विभागीय आयुक्त साहेबांच्या आदेशानुसार परमवीर चक्र विजेते, ऑलिम्पिक पदक विजेते, शास्त्रज्ञ यांच्या जयंती/वाढदिवस साजरे करणे, बातम्या दिनविशेष मार्गदर्शन, अशी विविधता ठेवल्याने विद्यार्थ्यांना माहितीबरोबरच नैतिक मुल्यांची जपणूक होण्यास मदत होत आहे.

वाचनालय –


'वाचाल तर वाचाल' या उक्तीचा अर्थ साध्य करण्यासाठी शालेय वाचनालय प्रभावीपणे कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार आवश्यक पुस्तकांची संख्या सध्या मर्यादित असली तरी ' हे हि नसे थोडके' म्हणून विद्यार्थ्यांना मधल्या सुट्टीत , ऑफ तास असताना, एक तास वाचनाचा इत्यादी संधीनुसार तसेच घरी वाचनासाठी पुस्तके नियमित उपलब्ध करून दिली जातात. त्यांना अवांतर वाचनाची गोडी लागण्यासाठी स्मरण स्पर्धा, वाचनावर आधारित वस्तुनिष्ठ/ लिखित प्रश्नमंजुषा, वाचनाचे नाट्यीकरण/सादरीकरण, असे उपक्रम राबविले जात आहेत.

शैक्षणिक सहल –

अभ्यासक्रमातील घटकांचे मूर्त स्वरूप जवळून पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना स्थानिक क्षेत्रभेट अंतर्गत वनविभागाची नर्सरी दाखवण्यात आली. तसेच परिसरात नव्यानेच सुरु झालेला गूळउद्योग म्हणजेच गुऱ्हाळ प्रत्यक्ष दाखवून दिले. त्याचबरोबर ऐतिहासिक बाबी पाहण्यासाठी जानेवारी 2023 मध्ये एस टी महामंडळाच्या बसने हिंगोली ते औरंगाबाद – घृष्णेश्वर मंदिर, वेरूळ लेणी, देवगिरी किल्ला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, बीबी का मकबरा, सिद्धार्थ उद्यान व प्राणिसंग्रहालय, विमानतळ अशी प्रेक्षणीय स्थळे नियोजनबद्धरीत्या दाखवण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी या सहलीचा मनमुराद आनंद घेतला. शिक्षकांतर्फे विद्यार्थ्यांना औरंगाबाद शहरातील एका प्रसिद्ध हॉटेलमध्ये स्वादिष्ट असे जेवण दिले गेले त्याचा आनंद तर अविस्मरणीय व तितकाच अवर्णनीय होता .

फलनिष्पत्ती - शाळेचे दैदिप्यमान यश -

SQDP मध्ये समाविष्ठ वरील उपक्रम सोबतच शाळेत वर्षभरात इतरही अनेक उपक्रम घेण्यात आले. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्ताने तहसील औंढा येथील समूह नृत्य स्पर्धेत शाळेच्या संघाने तालुकास्तरीय पारितोषिक पटकावले. सामान्य ज्ञान प्रश्न मंजुषा स्पर्धेत दोन विद्यार्थ्यांनी तालुक्यातून अनुक्रमे तिसरा व पाचवा क्रमांक मिळवला. तसेच ओलीम्पियाड



स्पर्धेत शाळेतील 30 पैकी 17 विद्यार्थींनी उत्कृष्ट श्रेणी मानांकन मिळविले. जिल्हा स्तर विज्ञान प्रदर्शनात शाळेचा संघ विशेष मानांकन म्हणून गौरविण्यात आला.

ASTRONOMY CLUB –

अंतर्गत स्पेस & टेक्नोलॉजी या पायलट प्रोजेक्ट साठी शाळेची निवड झाली. त्यातील सर्व उपक्रम, मिटिंग, विडियो, प्रात्याक्षिके आणि सादरीकरण प्रभावीपणे राबविल्याने विद्यार्थ्यांना अवकाश संशोधन बाबतीत बरीचशी माहिती मिळाली. व त्यांच्यामध्ये या विषयाबद्दल अधिक आकर्षण आणि औत्सुक्य निर्माण झाले. याचा परिपाक म्हणजे मा. विभागीय आयुक्त यांच्या श्रीहरीकोटा सहलीसाठी स्पर्धा परीक्षेत शाळा, केंद्रस्तर पार करून तालुकास्तर पर्यंत पाच विद्यार्थ्यांनी मजल मारली होती. तसेच 14 जुलै 23 चे चांद्रयान 3 च्या लोंन्चिंग श्रीहरीकोटा येथून थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी शाळेतील विज्ञान प्रेमी शिक्षक श्री एस पी शिंदे यांची निवड झाली.

समारोप -

आदर्श शाळा म्हणून सर्वच बाबतीत होत असलेले धोरणात्मक बद्दल आणि सोयीसुविधा यामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी पोषक वातावरण तयार होत असून त्याचे दीर्घकालीन परिणाम नक्कीच अपेक्षित यशप्राप्ती गाठणारा अशा नानाविध उपक्रमांनी सदर शैक्षणिक वर्ष आनंददायी वातावरणात पार पडले. या सर्व उपक्रमांना शाळेतील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ, केंद्रप्रमुख आणि सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा, DIET टीम हिंगोली यांचे वेळोवेळी मदत सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

व्हिडीओ लिंक -

https://drive.google.com/file/d/1-CoN5WvQqVcPhllqtYBDKAeubAo3sSBh/view?usp=drivesdk

फोटो लिंक -

https://drive.google.com/file/d/10PU3w_USQAgzizGLfs39ttgrOA7Kf_k/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/10BI7nfDHXWyI5DiyghcGOqWKuk8-KSiL/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/10BI7nfDHXWyI5DiyghcGOqWKuk8-KSiL/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/10I-Fjk7cnX8_fQnnEOSWwhEzSpy7ivoa/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/10JGacisY3YZfhxgwWKBZ99L-J-P1CTz9/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1-oIv2FOacVI0g65bKGBIPmWAir2WcSPL/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1-NV8ZDP0A_SPABxR6PjFIcvZkvbl6Hi1/view?usp=drivesdk

स्थानिक गरजेनुसार उपक्रमातून विद्यार्थी उपस्थिती व विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद उर्दु शाळा, कुऱ्हा (पानाचे), ता.भुसावळ, जि.जळगांव

मुख्याध्यापकाचे नाव - रुबिना परवीन खालीद खान

प्रास्ताविक -

जळगाव जिल्हयात भुसावळ तालुक्यात पासुन 10 कि.मी. वर असलेले गाव कुऱ्हा पानाचे मात्र गुणवत्ता पुर्ण शिक्षणासाठी अव्वल असल्याने या गावातील जिल्हा परिषद उर्दु शाळा कुऱ्हा शाळेत आजुबाजुच्या 2 ते 3 गावातील विद्यार्थी या शाळेत शिकत आहे. इंग्रजी माध्यमातुन शिकत असलेले विद्यार्थी दरवर्षी या जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेशित होत आहेत. सन 2018 मध्ये शाळेचा पट 08 होता, आता शाळेचा पट 40 असून 6 विद्यार्थी बाहेरगावातून येथे येणे-जाणे करुन शिक्षण घेत आहे.

सन 2023-24 मध्ये जळगांव जिल्हयाचे जिल्हाधिकारी श्री. आयुष प्रसाद यांचे उपक्रम 10 दिवस गणितासाठी या उपक्रमाअंतर्गत शाळेला डायट चे श्री. अनिल झोपे सर (प्राचार्य) श्री. साळुंखे सर (अधिव्याख्याता) श्री. जगन्नाथ दरंदले सर (अधिव्याख्याता) यांनी भेट देऊन गुणवत्ता तपासणी करुन शिक्षक व विदयार्थी यांना मार्गदर्शन व प्रेरणा दिली. तसेच भुसावळ तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. वायकोळे साहेब विस्तार अधिकारी बी.डी.धांडे साहेब, के. प्र. अशीक सर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत असल्याने शाळा दिवसे दिवस यशाच्या शिखराकडे वाटचाल करीत आहे.

पटनोंदणी व नियमीत उपस्थिती -

शाळेत 2018 मध्ये शाळेची पट फक्त 08 होता तसेच शाळेचे वर्ग 1 ते 4 होते. जेव्हा विद्यार्थी शोधण्यासाठी शिक्षक गावात गेले तेव्हा पालकांनी सांगितले कि शाळेची गुणवत्ता चांगली नाही. मुलांना किमान लेखन वाचन येत नाही आणि 5 वी पासुन मुलांना भुसावळ येथे जावे लागणार आहे. तसेच तुम्ही स्वत: तुमच्या मुलांना खाजगी व इंग्रजी शाळेत शिकवतात आणि आमच्या गरीबाच्या मुलांना उर्दु शाळेत टाकायला सांगता, हे चुकीचे आहे. या चर्चेनंतर शाळेच्या सिद्दीका रुबिना मॅडम यांनी यांचे दोनही मुलांची नावे स्वत:च्या शाळेत टाकली व पालकांना आश्वासन दिले की जर तीन महिन्यात मुलांच्या प्रगतीमध्ये बदल झाला नाही तर मुलांचे स्वखर्चाने खाजगी शाळेत प्रवेश करुन देण्यात येतील, त्यानंतर शाळेचे वर्ग 1 ते 4 पासुन 1 ते 7 झाले आहेत आज रोजी शाळेची पट 35 आहे व शाळेत दररोज 100% विद्यार्थी उपस्थित राहतात. तसेच कुऱ्हा गाव येथुन 7 कि.मी. वर चोरवह गाव आहे तिथे उर्दु शाळा नसल्याने तेथील 4 विद्यार्थ्यांना शिक्षक स्वत: आणतात आणि सोडतात या सर्व बांबीमुळे शाळेची पटसंख्या वाढली आहे.

https://drive.google.com/file/d/1pSEi8SMDQgjdD7GBC0F8tKfa6-L8Usx6/view?uspdrivesdk

भुसावळ येथुन 10 कि.मी. वर जि.प.उर्दु शाळा कुऱ्हा आहे. सुरुवातीस शाळेची स्थिती खुप वाईट होती. खालील प्रमाणे फोटो

https://drive.google.com/file/d/1q-OhQOM4JUF5SsbM1EwZjTCdGkNSlb5q/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1qSMCfkv3USZvwPFCLgCjYSkBecNPtH65/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1q_v6yGDLt5bujUa_IUmNNQ4FePVhQLGH/view?usp=drivesdk

आत सध्या शाळेची स्थिती खालील प्रमाणे आहे.

https://drive.google.com/file/d/1r-FD3bN_hVVf6XKol_RROM0lwlX2Wqli/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1r62QhT_rDFquBqtM9TWJHdLcAPp_8OJD/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1r84OfuRvjp3MCcW35qyYwcZT9YC45ALq/view?usp=drivesdk

आता शाळेत दोन खोल्या असुन खोल्यांना रंगरंगोटी केली आहे. शाळेत स्वतंत्र किचन शेड आहे. विकलांग मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह असून इतर मुलां मुलींसाठी स्वतंत्र शौचालय आहे. शौचालयात 24 तास पाणी सुविधा आहे. पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे. शालेय परिसर स्वच्छ व सुंदर आहे. परिसरातील भिंतीवर अभ्यासपुरक चित्रे काढलेली आहेत. शाळेत विविध प्रकारचे वृक्ष लावलेले आहे. तसेच आवारात परसबाग पण आहे त्यात विविध प्रकारची भाजी जसे भेंडी, कांदे, वांगे, कोथिंबीर, मेथी अशा भाज्या लावलेल्या आहेत. शाळेत संगणक, प्रोजेक्टर अद्ययावत असून त्याचा वापर नियमीत केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ दिसत आहे. वर्गाची सजावट केली असून भिंती बोलक्या आहेत. प्रत्येक वर्गात भाषा, गणित व इंग्रजी साहित्याचा वापर केला जातो. विषय निहाय भरपूर शैक्षणिक साहित्य तयार केले असुन त्याचा वापर अध्यापनात केला जातो.

इंग्रजी विषयाबाबत नाविन्यपूर्ण उपक्रम

(चला कर्सिव लिपी शिकुया)

शाळेत जेव्हा दुपारी जेवणाची सुट्टी होते तेव्हा मुले जेवण केल्यानंतर खेळतात परंतु शाळेत एक अशी मुलगी होती की ती Cursive लिपी शिकली मोठी आणि लहान लिपी शिकुन लिहायला सुरुवात केली. ती कर्सिव उत्तम प्रकारे लिहायला लागली नंतर तिने जेवणाच्या सुट्टी मध्ये जेवण झाल्यानंतर जेव्हा मुले खेळत होती तेव्हा त्यांचा गृप बनवुन Cursive लिपी शिकवायला सुरुवात केली.

https://drive.google.com/file/d/1u-JmC1yiH4DLmA8VlHXWrHx-JatL7BBP/view?usp=drivesdk

याचा इतका चांगला परिणाम काही महिन्यात दिसून आला की मुले चांगल्या प्रमाणे Cursive लिपी लिहीत आहे व त्यांचे अक्षर खुप चांगले झाले.

https://drive.google.com/file/d/1u2uQ4G4K2yGJEl4s_mf7agZCxj5kDpqw/view?usp=drivesdk

आज शाळेचे सर्व विद्यार्थी Cursive लिपी खुप चांगल्या पध्दतीने लिहीत आहे गावातील लोकांनी सुध्दा याची दखल घेतली व सदर उपक्रमाचे खुप कौतूक केले.

https://drive.google.com/file/d/1uG1-h3BS1hRC-_hZOGOc8cjSYhH1_Z8d/view?usp=drivesdk

दररोज शाळेत जेवण झाल्यानंतर मुले रांगेत बसतात व सदर विद्यार्थीनी त्यांना Cursive लिपी शिकवते व त्यावर त्यांना गृहकार्य पण दिले जाते, सद्यस्थितीत हा उपक्रम शाळेत सुरु आहे व त्याचा लाभ विद्यार्थी घेत आहे.

स्थानिक / भौगोलिक व सामाजिक परिस्थितीनूसार घेतलेले विशिष्ट उपक्रम

1) कोरोना काळात शिक्षण आपल्यादारी हा उपक्रम राबविण्यात आला, वर्गातील शिक्षकांनी ग्रुप तयार केले 5 गृप पैकी 1 गृपला दररोज प्रत्येकी 15 मिनीट शैक्षणिक अभ्यास व मार्गदर्शन केले.

https://drive.google.com/file/d/1b20Cpd0XLrZt-cftcqvVCdVu-FuS7dK0/view?usp=drivesdk

सदर उपक्रमाचे गावकरी यांनी खुप कौतुक केले.

जिल्ह्यामध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकात या उपक्रमास प्रसिद्धी देण्यात आली.

https://drive.google.com/file/d/1LNVcj3owXpbTO4z31Q1WcMSmbbakynd_/view?usp=drivesdk

सदर उपक्रमाचे जिल्हाधिकारी व मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी पण कौतुक केले.

https://drive.google.com/file/d/1u99LPSRn3d35fH27Tu4BBSAUUry7Cqj5/view?usp=drivesdk

2) बाल आनंद मेळावा

https://drive.google.com/file/d/1uJFCkQGp-qX-0gNwhaMIQH-Orr8F_-V5/view?usp=drivesdk

3) 100% उपस्थिती टिकविली जाते.

4) निवडणुकीद्वारे शालेय मंत्रीमंडळ निर्मिती

5) अंगणवाडी पहिली प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना मार्चपासून जिल्हा परिषद शाळा येथे तात्पुरता प्रवेश देऊन सराव घेतला जातो 5) सहल निसर्ग सहल / क्षेत्र भेट

https://drive.google.com/file/d/1up4LBfJnCutGuUJFk996-MvutBPiG_ZT/view?usp=drivesdk

6) शालेय क्रिडा स्पर्धा

7) विविध स्पर्धां आयोजन (चित्रकला, वक्तृत्व)

https://drive.google.com/file/d/1svGpIao7CVSTZkucdBYbVKKm1nNU7LvZ/view?usp=drivesdk

8) गट पध्दतीचा जास्त वापर केला जातो.

9) विद्यार्थी व शिक्षकांचे वाढदिवस साजरे करणे

10) तंबाखु मुक्त शाळा

https://drive.google.com/file/d/1utaidqOegsIza88GvbsE0ZHb4IFwKFL9/view?usp=drivesdk

11) आदर्श परिपाठ

12) सांस्कृतिक कार्यक्रम

https://drive.google.com/file/d/1uvQQesfAiGNeFw6kNRcJIyJKscz2nj3A/view?usp=drivesdk

शालेय व्यवस्थापन समितीचा विद्यार्थी विकासात सहभाग -

गावाने शाळेत व शाळेने गावात प्रवेश केल्याशिवाय शिक्षणाची गंगा यशस्वी होणार नाही हा विनोबा भावे यांचा विचार आहे. याप्रमाणे शाळा व्यवस्थापन कुऱ्हा व पालक हे नेहमी शाळा विद्यार्थी व शिक्षकांना मदतीसाठी तत्पर असतात त्यांच्या मदतीने शाळेत परसबाग, संगणक कक्ष, डिजीटल शाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, इमारतीचे सुशोभिकरण झाले आहे. यासारख्या अनेक कार्यात गावकरी व शाळा व्यवस्थापन समिती नेहमी एक पाऊल पुढे असते. शाळा, विद्यार्थी व शिक्षणासाठी कधी श्रमदान तर कधी आर्थिक मदतीचा सहभाग नोंदवतात तसेच शाळेची विद्यार्थी विकासासाठी प्रत्येक महिन्यात पालक सभा, माता पालक व शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेतली जाते.

https://drive.google.com/file/d/1ufbO7hZVN7dzptB9XkFnExPCi0xte4RW/view?usp=drivesdk

पायाभूत साक्षरता आणि **अंक गणि**तिय **क्षमता** -

विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता प्राप्त व्हावी यासाठी साहित्य वापर केला जातो तसेच विविध प्रकारच्या गणितीय क्रिया तसेच गणित पेटी चा वापर करुन गणित विषय हा खुप सोपा करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच शाळेत गणित संबोध स्पष्टतेसाठी वेगवेगळी मॉडेल बनवून ऍक्टीव्हिटी द्वारे गणित विषय मुलांना शिकवला जात आहे.

https://drive.google.com/file/d/1x5AD_ddPyVFFYWkrXXPyCvSYnUI51B0m/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1wcfku75KzSarIbAK1bjwttve7tt1wzlf/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1xYND4-D3stY6obIZJQ4HSy_K8lK1itCT/view?usp=drivesdk

मध्यान्ह भोजन योजनेचा सकारात्मक परिणाम -

शाळेत खुप गरीब व मजुर पालकांची मुले शिकतात. मुलांना दररोज मेनु प्रमाणे आहार दिला जातो. तसेच आठवड्यातून एक वेळा त्यांना पुरक आहार पण दिला जातो त्यामुळे मुलांची उपस्थिती टिकून रहाते.

तसेच शाळेत परसबाग लावलेली आहे. परसबागेत भेंडी, वांगे, मेथीची भाजी, भोपळा, कांदे व इतर भाजी लावलेली आहे. त्यांचा वापर आहारमध्ये केला जातो. शाळेत आहार शिजवण्यासाठी एक वेगळे किचन शेड उपलब्ध आहे.

https://drive.google.com/file/d/1xaQhLobfsF3KAs3i3ExMd-gWVZr0NMxq/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1xdI8gPke3di_4C1YuDm3w7cqg2J4qNFl/view?usp=drivesdk

B –PLUS एक अभिनव उपक्रम

शाळेचे नाव – जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, उपखेड, ता.चाळीसगाव, जि.जळगाव.

E-mail ID– zpupschoolupkhed@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – श्रीमती सुरेखा विठ्ठल पाटील



प्रास्ताविक -

आमचे उपखेड गाव हे जिल्हा मुख्यालयापासून चाळीसगाव तालुक्यात स्थित असून जिल्ह्यापासूनचे अंतर १४० किलोमीटर आहे.वर्तमान परीस्थितीत आज आमची शाळा जळगाव जिल्ह्यातील नामांकित शाळांपैकी एक असा नावलौकिक प्राप्त झालेली शाळा आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत सर्वप्रथम राबविण्यात आलेल्या B – PLUS या उपक्रमात प्रथम क्रमांक मिळविला आहे.आमच्या शाळेत ३० पेक्षा अधिक गावातील नागरीकांनी,पदाधिकाऱ्यानी शिक्षकांनी भेट देवून शाळेच्या भौतिक व गुणवत्तेच्या बाबतीत कौतुक केलेले आहे.



B – PLUS ही संकल्पना केवळ भौतिक सुविधा इतकीच मर्यादित न ठेवता या संकल्पनेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.विद्यार्थी शालेय आवारात जिथे जाईल तिथे तो काहीतरी शिकेलच असा परिसर बनविलेला आहे.

B – PLUS या उपक्रमाचा अर्थ पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेला आहे.

B – Building as Learning Aid (शाळा एक शैक्षणिक साधन)

P – Personality Development (व्यक्तिमत्व विकास)

L – Learning Skill (अध्ययन क्षमतांचा विकास)

U – Understanding with Basics (मुलभूत संकल्पनांची समज)

S – Sport (आंतरराष्ट्रीय खेळ)

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणारा B – PLUS हेच आमच्या शाळेचे सामर्थ्य व शक्तीस्थान आहे.

उपलब्ध भौतिक सुविधा –

आमच्या जि.प.उच्च प्राथमिक शाळा उपखेड शाळेत मुख्याध्यापक कार्यालयासह पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध आहेत तसेच मुलामुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, Ramp, वाल कंपाऊंड, परसबाग, फुलांचे व औषधी वनस्पतींचे गार्डन, डॉ.अब्दुल कलाम टिंकरिंग lab, सुसज्ज प्रयोगशाळा, संगणक, Tab, प्रोजेक्टर, Interactive Panel, Sound System, Rain Water Harvesting, Solar Panel, खेळाचे मैदान व साहित्य,शालेय ग्रंथालय तसेच स्पर्धा परीक्षा स्वतंत्र ग्रंथालय इत्यादी भौतिक सुविधा उपलब्ध आहेत.

उपक्रमांची गरज –

जि.प.उच्च प्राथमिक शाळा उपखेड येथे हजर झाल्यानंतर प्रथमतः गावातील लोकांची उदासीनता दिसून आली.गावातील शाळेचा विकास व्हावा किंवा आपल्या गावातील विद्यार्थी पुढे जावेत हा दृष्टीकोनच गावकऱ्यामध्ये दिसत नव्हता.या परिस्थिती मागील कारणांचा विचार करता असे लक्षात आले की,बऱ्याच पालकांची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जातात. त्यामुळे ज्या शाळेत आपली मुलेच शिकत नाही त्या शाळेकडे लक्ष का द्यावे ही मानसिकता गावकऱ्यांची झालेली होती.


तसेच पटसंख्या व उपस्थिती यातदेखील खूप मोठी तफावत दिसून आली.या परीस्थितीत बदल व्हावा, गावातील विद्यार्थ्यांना आपल्याच शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी सदर उपक्रम हाती घेण्यात आला.

आव्हाने व समस्या –

B – PLUS या उपक्रमाबाबत पूर्णतः अनभिज्ञ असतांना या उपक्रमाची सुरूवात कशी व कोठून करावी,सदर उपक्रमासाठी निधी कोठून उपलब्ध करावा हा यक्ष प्रश्न समोर होता.तसेच गावातील लोकांच्या मानसिकतेत कसा बदल करावा, त्यांना मातृभाषेचे महत्व कसे पटवून द्यावे हे देखील मोठे आव्हान होते.उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी गटशिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी, सरपंच, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष व नागरीक यांच्याशी आव्हाने व समस्या याबाबत चर्चा करून निराकरण करण्यात आले व B – PLUS चा प्रत्यक्ष कार्यारंभ झाला.

नियोजन –

१) सर्वात प्रथम गटविकास अधिकारी श्री.नंदकुमार वाळेकर,गटशिक्षणाधिकारी श्री.विलास भोई यांच्या मार्गदर्शनातून व गावातील सरपंच श्री.महेश मगर यांच्या सहकार्यातून लातूर जिल्ह्यातील BaLA उपक्रम राबविलेल्या शाळा उदगीर,शिरूर अनंतपाळ येथे भेटी देवून सर्व बाबी जाणून घेतल्या.



२) B – PLUS उपक्रम आपल्या शाळेत कसा राबविता येईल याबाबत चर्चा करण्यात आली.चर्चेत लोकसहभाग व अधिकाऱ्यांच्या भेटीबाबत नियोजन करण्यात आले.

३) ग्रामस्थांना या उपक्रमाचे महत्व रात्रीच्या वेळी सांस्कृतिक कार्यक्रमातून प्रेरणासभेचे नियोजन करून पटवून देण्यात आले. प्रेरणासभेतून गावकऱ्यामध्ये शाळाविकासाची प्रेरणा मिळाली व गावातील प्रत्येकाने आपापल्या यथाशक्तीने शक्य ती मदत करण्याचा प्रयत्न केला.

४) निधी उपलब्ध करण्यासाठी गावातील माजी विद्यार्थ्यांना WhatsApp,Facebook या माध्यमातून आवाहन करण्यात आले व मोठी मदत मिळाली.तसेच विविध स्रोत त्यात १४ वा वित्त आयोग व ग्रामनिधी,CSR वस्तूरूपाने मदत, आमदारनिधी, लोकसहभाग इत्यादीतून मदत मिळाली.

५) B – PLUS अंतर्गत येणाऱ्या ४३ मुद्यांचे नियोजन शालेय पातळीवर लोकसहभागातून प्राप्त झालेल्या निधीतून करण्यात आले. BaLA उपक्रमातील सर्व बाबींची पूर्तता करण्यात आली व विद्यार्थ्यांना कृतियुक्त अध्ययन अनुभव देण्यात आले. शाळेतील संपूर्ण परिसर आनंददायी व अध्ययन पूरक करण्यात आला.

कृती कार्यक्रम (प्रत्यक्ष कृती) –

१) लोकसहभागाची खरी सुरुवात शाळेतील शिक्षक श्री.जाधव सर यांनी वडिलांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने शाळेला एक Android TV देवून केली.त्याच प्रेरणेतून लोकसहभागाला खरी गती मिळाली.तसेच Charity begins at home या उक्तीनुसार श्री.जाधव सरांनी स्वतःच्या मुलाला ह्याच शाळेत इयत्ता पहिलीला प्रवेश घेऊन मातृभाषेतून मिळणाऱ्या शिक्षणाचे महत्व समजावून सांगितले व दरवर्षी शाळेला देणगी म्हणून दहा हजार रुपये देण्याचे ठरविले.

२) BALA उपक्रमाची सुरुवात प्रथमतः माननीय गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या उपस्थितीत प्रेरणा सभा घेण्यात आली.प्रेरणा सभेच्या उद्बोधनातून अवघ्या दोन तासात एक लाख बेचाळीस हजाराचा निधी लोकसहभागातून जमा झाला.तसेच शिक्षक व अधिकारी यांनी प्रत्येकी पाच हजार रुपये दिले.

३) विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे झोपडीत राहणाऱ्या स्त्रीने स्वतःहून दिलेला निधी,छोटेखानी लग्नसमारंभ आटपून उर्वरित पैशातून शाळेस दिलेला कलर प्रिंटर,आजीच्या निधनानंतर अंगावरील सोने व त्यातून मिळालेला पैसा शाळेला देणे.यातून गावातील दातृत्व दिसून आले व मदतीचा मोठा ओघ सुरु झाला.

४) शाळेला ७ Android TV गावातील दानशूर व्यक्तींकडून देण्यात आले.

५) ICICI फाउंडेशन यांनी CSR फंडातून Rain water Harvesting,व Solar Panel बसवून कायम स्वरूपी विजेची व्यवस्था करण्यात आली. तसेच उत्तम दर्जाची झाडे त्यांनी या माध्यमातून दिली.

६) जैन इरिगेशन मार्फत तुषार व ठिबक सिंचन मोफत मिळाले.त्यातून परसबाग व फुलबाग फुलली.परसबागेतील सेंद्रिय भाजीपाला विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारातून देण्यात येतो.

७) व्यक्तिमत्व विकास शिबिरे व उपक्रम,विविध खेळाची मैदाने,वेगवेगळे भौमितिक आकाराचे ओटे व त्यावरील लिखाण,भित्तीचित्रे यातून विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतांचा विकास होऊन मुलभूत संकल्पना समजावून सांगण्यास प्रत्येकक्षणी मदत होत आहे.

शालेय नेतृत्वाची भूमिका -

शालेय नेतृत्व करीत असतांना शाळेतील व गावातील वातावरण नेहमीच प्रेरणादायी कसे राहील यासाठी प्रयत्न करण्यात आला.'नेतृत्व दमदार असल्यास कामगिरी खुमासदार होते' या उक्तीप्रमाणे शाळेबद्दल सकारात्मक दृष्टीकोन व बदलाची आवड ठेऊन विद्यार्थी विकासाचा ध्यास घेवून शालेय नेतृत्व प्रभावी व विकासात्मक करण्याचा प्रयत्न केला.

माननीय मुख्यकार्यकारी अधिकारी, मा. शिक्षणाधिकारी, मा.गटविकासाधिकारी, मा.गटशिक्षणाधिकारी, मा.केंद्रप्रमुख, पदाधिकारी, ग्रामसेवक, सरपंच, ग्रामस्थव माझे सर्व शिक्षक यांनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी साथ दिली.मी श्रीमती सुरेखा पाटील मुख्याध्यापिका या नात्याने गावातील प्रत्येकास शिक्षणाचे व शालेय बदलाचे महत्व पटवून दिले.या परिवर्तनामुळे आज B – PLUS च्या माध्यमातून शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याची उत्तम प्रकारे सर्वांगीण जडणघडण होत आहे.

प्रभावशाली व्यक्तिमत्वाचा परिवर्तनाशी असलेला संबंध -

आमच्या शाळेत राबविलेल्या या उपक्रमाची संकल्पनाच मुळात मुख्यकार्यकारी अधिकारी श्री.पंकज आशिया साहेबांची आहे.तसेच या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्यक्ष भेटीद्वारे मा.गटविकास अधिकारी श्री.नंदकुमार वाळेकर साहेब,मा.गटशिक्षणाधिकारी श्री.विलास भोई साहेब यांनी वेळोवेळी अनमोल असे मार्गदर्शन केले.तसेच तालुक्याचे आमदार,ICICI फाउंडेशन, जैन इरिगेशन यांनी आर्थिक व वस्तुस्वरुपात दिलेले योगदान महत्वपूर्ण ठरते.सर्वात महत्वाचे म्हणजे सरपंच श्री.महेश मगर यांनी लोकसहभागासाठी केलेले महत्वपूर्ण प्रयत्न व या प्रयत्नाला सकारात्मक प्रतिसाद देणारे गावातील व बाहेरील शिक्षणप्रेमी ग्रामस्थ,शिक्षकवृंद यांचा या परिवर्तनासाठी महत्वाचा वाटा आहे.





शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रम -

उपक्रमाची गरज व वैशिष्ट्ये सुरुवातीलाच स्पष्ट केल्याने अंतिम ध्येयापर्यंत पोहचणे शक्य झाले.हा उपक्रम हाती घेतल्यानंतर शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम

१) Super 30
२) भिऊ नकोस शाळा तुझ्या पाठीशी आहे.
३) आरोग्यमं धनसंपदा
४) मी वाचणारच

तसेच दहा दिवस गणितासाठी,प्रकटवाचन,Jolly Phonics अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी गुणवत्ता वाढली, आत्मविश्वास निर्माण झाला.शिष्यवृत्ती परीक्षेतील यश,NSSE,MTS परीक्षेतील यश,राज्यस्तरीय गीतगायन स्पर्धेतील यश, शाळेला मिळालेला जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार यामुळे पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला.



फलनिष्पत्ती / उपक्रमामुळे झालेले सकारात्मक बदल -

१) शालेय वातावरण आनंददायी व कृतियुक्त अध्ययनास वाव देणारे तयारझाले.

२) इ.६ वी व ७ वी तील पटसंख्या ६ वरून ९१ पर्यंत पोहचली.

३) इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आमच्या शाळेत प्रवेश घेतला.

४) शाळेची पटसंख्या व उपस्थितीत आमुलाग्र बदल झाला.

५) ५ सप्टेंबर २०२२ रोजी शाळेला जि.प.जळगाव मार्फत आदर्श शाळा पुरस्कार मिळाला.

६) शिक्षण उपसंचालक मा.श्री.बी.बी.चव्हाण यांनी शाळेला भेट देवून उपक्रमाचे कौतुक केले.


दिनमणी मराठी चाळीसगाव 21-10-2023

अनोखा उपक्रम • शिक्षणासोबत शेतीविषयक पूरक ज्ञान; कमी जागेत कल्पकतेतून साकारला प्रकल्प

उपखेड जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांनी फुलवली परसबाग; विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीच्या ज्ञानासह मिळणार पौष्टिक आहार

दिनमणी मराठी चाळीसगाव 18-02-2023

उपसंचालक चव्हाणांकडून उपक्रमांचा आढावा

दिनमणी मराठी चाळीसगाव 26-12-2022

चाळीसगाव तालुक्यातील ३३ शाळांमध्ये पेटणार बी.प्लस मॉडेल प्रयोगाची ऊर्जादायी वात


लोकमत

२५६६ उपखेडची लोकसंख्या | ५०० घरे | ३८१ पटसंख्या

उपखेड शाळेच्या बोलक्या भिंतींआड रमणार सरस्वतीची लेकरं!

जिजाबराव वाघ
लोकमत न्यूज नेटवर्क

चाळीसगाव : शेजारपाजारून येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिलीच्या वर्गासाठी सेमी इंग्रजीचा अभ्यासक्रमही सुरू करण्यात येत आहे. नऊ शिक्षक कार्यरत आहेत. शाळेच्या सर्व भिंती, वर्गखोल्या बोलक्या करण्यात आल्या आहेत.

.परसबाग, भारताचा नकाशा, ओपनजिम, अंबिली पिरिएड, सूर्यमाला, नकाशा, क्रीडांगण, अध्ययन निष्पत्तीनुसार रंगकाम, मुलांना आकर्षित करतील अशी बोलकी चित्रे रेखाटली आहेत.ऑलिम्पिकमध्ये खेळल्या जाणाऱ्या पाच खेळांसाठी क्रीडांगणही साकारले जात आहे.

शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांसह गावकऱ्यांचीही मोठी साथ मिळत आहे. त्यातूनच पटसंख्याही वाढत आहे.
- मंगेश संभाजी मगर, सरपंच, उपखेड, ता. चाळीसगाव.

शिक्षण क्षेत्रात कमालीचे नैराश्य आले असताना गटविकास अधिकारी नंदकुमार वाळेकर यांनी बी - प्लस मॉडेल प्रयोगाची ऊर्जादायी वात पेटवली आहे. प्र. गटशिक्षणाधिकारी विलास भोई यांच्यासह शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व ग्रामस्थांनीही एकजुटीचा सेतू बांधत शाळांचा कायापालट करण्याचा संकल्प सोडला आहे. तालुक्यात जि. प.च्या ९८१ शाळा आहेत, टप्प्याटप्प्याने सर्व शाळांना स्मार्ट रूप देण्यात येणार आहे.

उपखेडकरांचे दातृत्व
• ८ दिवसात अधिकारी नंदकुमार वाळेकर प्रेरणा मगेर बी - प्लस प्रयोगाची मांडणी करताना उपखेडच्या ग्रामस्थांना लोकसहभागाचे आवाहन केले.
• ग्रामस्थांनी सव्वापाच लाखांच्या लक्षणीय ओंजळ पुढे केली. तालुक्यात हा प्रयोग शाळरूपयात आला आहे.

नमुना नंबर १ ची अनोखी प्रणाली –

शाळेची स्थापना (१८/१०/१९११) झाल्यापासून १ ते १३ रजिस्टर आज शाळेत आहेत त्यामध्ये जुने रजिस्टर जीर्ण झाली आहेत.त्यामुळे एखादा दाखला शोधून काढणे हे खूपच वेळखाऊ काम होते.यामुळे वेळ,होणारा मानसिक त्रास व शाळेचा आत्मा अद्ययावत राहवा यासाठी शाळेतील शिक्षक श्री.उमाकांत पाटील व सहकारी वृंद यांनी १ ते १३ रजिस्टर Lamination करणे व मुले-मुली वेगवेगळे करून अल्फाबेटीकल लावून त्यांचे नाव अनुक्रमाने बुक नंबर,रजिस्टर नंबर व पेज नंबर लिहून ठेवलेले आहे.त्यामुळे एका मिनिटात आलेल्या व्यक्तीचे नाव सापडते व १० मिनिटाच्या आत दाखला मिळतो. त्यामुळे नोंदी शोधण्यासाठी लागणारा वेळ वाचून तो वेळ विद्यार्थ्यांसाठी देता येतो.

समारोप -

आज आमची शाळा रोल मॉडेल डिजिटल, B – PLUS शाळा आहे.मुलांच्या कल्पनांना वाव देण्यासाठी तंत्रज्ञानातील व कृतियुक्त विविध उपक्रम मुख्याध्यापक व सर्व शिक्षक राबवून सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न करीत आहेत. शा.व्य.समिती अध्यक्ष व सदस्य,सरपंच व सदस्य यांचे शाळा विकासासाठी मोलाचे सहकार्य मिळत आहे.विविध उपक्रमांमुळे मुलांची आकलन क्षमता वाढून शाळेचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास मदत होत आहे.

आमच्या शाळेतील उपक्रमांच्या लिंक -

शाळापूर्व तयारी -

https://youtu.be/8F_0lxJGAns?si=RY9BrRWGmEHUQj9s

आजी आजोबा दिवस –

https://youtu.be/btMnWHCZPvw?si=uZ0cNWPh0Qm-SAa2

शिक्षण परिषद -

https://drive.google.com/file/d/1eC26qZu3GB05WFOpnbFv_MhNvaDlORCe/view?usp=drivesdk

शालेय परसबाग –

https://youtu.be/gHBNPfBPcX0?si=8P3qXv0wF79Rv5ul

मुलींचे पालकास पत्र उपक्रम –

https://youtu.be/9q98H2B468g?si=ryM7gn3LyfyxKsvo

B – PLUS रंगकाम –

https://drive.google.com/file/d/1LruyB7v61nnqKEC4cNib4ezaxm-wDlUq/view?usp=drivesdk

हर घर तिरंगा उपक्रम –

https://youtu.be/Q9XYXIAAatA?si=BoyMNLIKsd1gzFI9

शालेय दीपोत्सव –

https://youtu.be/FcJN9M_m7yU?si=K1QYTiLKYd8KEaZ_

शाळा परिसर व शाळेतील विविध उपक्रम -

https://youtu.be/fKHuz_u17sA?si=pwG4ygpn_WtQNy4b

स्वच्छ व सुंदर शाळा

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लालवाडी तांडा, केंद्र-पारनेर, ता.अंबड, जि.जालना

Email ID - hmzppslalwaditand@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री. सचिन रामदास खिल्लारे

प्रास्ताविक –

शाळा म्हणजे ज्ञानमंदिर, मग शाळा मंदिराइतकीच पवित्र, सुंदर आणि देखणी देखील असायला हवी. विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त वेळ शाळेत व्यतित होत असतो. म्हणून शाळा 'स्वच्छ व सुंदर शाळा' असायला हवी. म्हणून आम्ही शाळा सर्वांगसुंदर बनविण्याचा ध्यास घेतला. शाळा म्हणजे प्रसन्नतेचा मळा बनवायचा या उद्देशाने मी मुख्याध्यापक श्री. सचिन रामदास खिल्लारे व माझ्या सहकारी श्रीमती नरखेड मॅडम आणि शा. व्य. समिती व सर्व गावकरी पछाडलो गेलो. एक अशी शाळा तयार करायची कि जेथे 'गुणवत्तापूर्ण शिक्षण' तर मिळेलच पण विद्यार्थ्यांना शाळा म्हणजे आपलं सुंदर घर वाटावे अशी शाळा तयार करायच्या कामाला सुरुवात झाली. अनंत अडचणी सोडवत, निधी गोळा करत आणि रात्रीचा दिवस करत आम्ही सर्वांनी मिळून 'जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लालवाडी तांडा, केंद्र - पारनेर, तालुका- अंबड, जिल्हा. जालना ही आमची शाळा स्वच्छ व सुंदर शाळा बनवली आहे. गुणवत्तापूर्ण 'स्वच्छ व सुंदर शाळेच्या' जोरावर आमची शाळा जालना जिल्हयात प्रथम क्रमांकाने I.S.O. मानांकन प्राप्त करणारी शाळा म्हणून नावारूपास येत आहे.



मुख्याध्यापक / शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी किंवा मुख्याध्यापक / शिक्षक यांनी विषयासंदर्भात अधिक प्रभावी केलेले काम -







जि. प. प्रा. शा. लालवाडी तांडा म्हणजे एकदम तांड्यांच्या मधोमध रस्त्याच्या दोन्ही बाजुला असणाऱ्या दोन वर्ग खोल्या आणि शेजाऱ्यांनी शाळेच्या प्रांगणात बांधलेली जनावरे. पावसाळ्यात गळणाऱ्या जीर्ण झालेल्या वर्गखोल्या अशी एकूण परिस्थिती अतिशय छोटे प्रांगण, ना कंपाउंड, ना आडोसा असा आवार, तालुका फक्त 2-3 कि.मी अंतरावर असल्याने अंबडला इंग्रजी शाळांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी दाखल. अशी एकूण सारी परिस्थिती विद्यार्थ्यांची उपस्थिती अत्यल्प, स्थलांतरीत होणारी बालके जास्त, पालकांची शाळेबद्दल व शिक्षणाबददल अनास्था यामुळे गुणवत्तेबाबत अडचणी . मिटर होते पण बंद, म्हणजे मिटर असून लाईट नाही. पाण्याची व्यवस्था नाही, शौचालय असे की जिथे पाय ठेवणे मुश्कील म्हणजे साऱ्या अडचणीच अडचणी

पण या साऱ्या अडचणी असतांनाही यातून मार्ग काढायचा आणि सर्वांगसुंदर, देखणी 'स्वच्छ व सुंदर' शाळा उभी करायची यासाठी आम्ही सुरुवात केली.

मुख्याध्यापक / शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी –





बंद होण्याच्या मार्गावर असलेली ही शाळा फुलविण्यासाठी नियोजनबध्द काम करणे अत्यंत आवश्यक होते. यासाठी पुढील प्रमाणे मार्गक्रमण करण्यात आले. 1) 100% उपस्थिती 2) गुणवत्तापूर्ण शिक्षण 3) पालक दृष्टीकोनात सकारात्मक बदल 4) खेळ, गाणी, गोष्टी 5) सांस्कृतिक कार्यक्रम 6) शैक्षणिक सहल 7) स्पर्धा परिक्षेची तयारी 8) स्वच्छ सुंदर गणवेश 9) शिक्षक-पालक व माता-पालक सभा 10) हस्ताक्षर सुधार प्रकल्प 11) इंग्रजी वाचन व संभाषण प्रकल्प 12) समाजमंदिराचे वर्गखोलीत रूपांतरण 13) 4 गुंठे जागा शाळेसाठी घेतली 14) वृक्षारोपण 15) K.R.R Foundation च्या माध्यमातून 10 लाख रुपयांचा निधी घेतला 16) वर्गखोली, ऑफिस व स्वच्छतागृहाचे बांधकाम 17) तारकंपाउंड 18) पाढयांचे झाड उपक्रम 19) I.S.O शाळा इत्यादी.

अशा प्रकारे एक एक अडचणी सोडवत आणि मार्ग काढत आम्ही एक I.S.O मानांकन प्राप्त 'स्वच्छ व सुंदर' शाळा निर्माण केली







लालवाडी तांडा शाळेचा अखेर कायापालट

आयएसओ मानांकन मिळवणारी जिल्ह्यातील ठरली पहिली शाळा

सकाळ

सकाळ वृत्तसेवा

जालना,ता.७ : सरकारी शाळा दत्तक देण्याची योजना शासनाकडून आखण्यात आली असून या निर्णयावर चांगले की वाईट अशा दोन्ही बाजूने मत-मतांतरे प्रदर्शित होत असतानाच लालवाडी तांडा (ता .अंबड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला दत्तक न घेता येथील रूपम स्टील परिवाराने किशोर अग्रवाल यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ मदतीचा हात देत शाळेचा कायापालट केला आहे. त्यामुळे आयएसओ ९००१-२०१५ हे गुणवत्ता आणि भौतिक सुविधेसाठी मानांकन शाळेस जाहीर झाले असून आयएसओ. दर्जा प्राप्त करणारी ही जिल्ह्यातील पहिली शाळा ठरली आहे.

रूपम स्टीलचे संचालक सत्यनारायण अग्रवाल व सुनील अग्रवाल यांच्या हस्ते मंगळवारी (ता.सात) शाळेच्या खोल्यांचा लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी आयएसओचे अंकेक्षक अनिल येवले यांच्या हस्ते प्रमाणपत्र व मानांकन देऊन शाळेला गौरविण्यात आले. यावेळी रूपम स्टीलचे संचालक गोवर्धन अग्रवाल, संजय अग्रवाल, राजेश अग्रवाल, राहुल अग्रवाल, उद्योजक अरुण अग्रवाल, डॉ.राजेश सेठीया, संजय दाड, अर्जुन गेही, राजेश सोनी, डॉ.संजय जेथलिया, माजी सभापती बप्पासाहेब गोल्डे, रवींद्र अग्रवाल, नरेंद्र अग्रवाल, प्रदीप मुथा, बबलू सारस्वत, राजेंद्र जेथलिया, रमेश सेठी, गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण, प्रवीण कळम पाटील, केंद्रप्रमुख उद्धव बाजड, श्रीराम जाधव, सरपंच डॉ. रमेश चव्हाण, मुख्याध्यापक सचिन खिल्लारे, रत्नमाला नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

रूपम ग्रुपच्या व्यवस्थापकांनी सुरूवातीला एक वर्ग खोली, त्यानंतर मुख्याध्यापक कार्यालय, मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालय असे करत संपूर्ण शाळेचे बांधकाम पूर्ण करून दिले.



जालना : शाळा खोल्यांच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी उपस्थित सत्यनारायण अग्रवाल, सुनील अग्रवाल आदी.

स्मृती जपण्याचा प्रयत्न

स्व.किशोर अग्रवाल यांनी कुटुंब आणि उद्योगाला दाखवलेली दिशा, त्यांचे संस्कार, प्रेरणा या जतन करण्याचा अग्रवाल परिवाराकडून प्रयत्न सुरू आहे.

त्याचाच एक भाग म्हणून शाळेच्या माध्यमातून किशोर अग्रवाल यांच्या स्मृती सदैव कायम राहतील अशा भावना रूपम स्टीलच्या संचालकांनी या प्रसंगी व्यक्त केल्या.

लोकमत — शाळा परिसरात निसर्गरम्य वातावरण : लोकसहभागातून समाजमंदिर बनले ज्ञानमंदिर — लोकमत

विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेचे रंग भरणारी लालवाडी तांड्यावरील शाळा !

विजय मुंडे

लोकमत न्यूज नेटवर्क

जालना : शिक्षकांच्या प्रयत्नांना लोकसहभागाची साथ मिळाली तर शाळेचे नंदनवन होते, याची प्रचिती लालवाडी तांडा (ता. अंबड) जिल्हा परिषद शाळेकडे पाहिल्यानंतर येते. विशेषत: शाळेची इमारत मोडकळीस आल्याने समाजमंदिरात भरणारी शाळा ज्ञानमंदिर झाली आहे. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून मुलांमध्ये गुणवत्तेचे रंग भरणारी फुलांची शाळा म्हणूनही शाळेला ओळखले जाऊ लागले आहे.

लालवाडी तांडा येथे जिल्हा परिषदेची पहिली ते चौथीपर्यंतची शाळा आहे. २८ पटसंख्या असलेल्या या शाळेत दोन शिक्षकांची पदे मंजूर आहेत. असे असले तरी गत दीड वर्षापासून सचिन खिल्लारे हे एकच



शिक्षक मुलांना ज्ञानदान करण्यासह प्रशासकीय कामकाजाची जबाबदारीही पार पाडत आहेत. शाळेची जुनी इमारत मोडकळीस आल्याने ग्रामस्थांनी समाजमंदिरात शाळा भरविण्याचा निर्णय घेतला. समाजमंदिरातील शिक्षण घेणाऱ्या मुलांना लोकसहभागातून विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याशिवाय संत सेवालाल फुलांच्या उद्यानाच्या माध्यमातून शाळेचा परिसर निसर्गरम्य करण्यात आला आहे.





लालवाडी तांडा शाळेत राबविले जाणारे उपक्रम, दुसऱ्या छायाचित्रात पाड्यांचे झाड उपक्रमात सहभागी विद्यार्थी.

शाळेसाठी ८ गुंठे जमीन दान

जिल्हा परिषद शाळेची इमारत उभी राहावी यासाठी ८ गुंठे जमीन दान देण्यात आली आहे. यासाठी पंडित राठोड, मदन राठोड, संतोष राठोड, एकनाथ चव्हाण, सरपंच डॉ. चव्हाण, उपसरपंच अंकुश राठोड, श्रीराम जाधव, आदींचे सहकार्य शाळेला मिळाले. माजी जिल्हा परिषदेचे सदस्य बप्पासाहेब गोल्डे यांचेही शाळेला सहकार्य मिळाल्याचे सांगण्यात आले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि पालक, ग्रामस्थांच्या सहकार्यातून शाळेचा कायापालट झाला आहे. विद्यार्थ्यांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच गुणवत्तेत वाढ व्हावी, यासाठी उपक्रम राबविले जात आहेत. पालकांच्या वेळोवेळी बैठका घेऊन त्यांचे प्रश्न जाणून घेत गुणवत्तेबाबतही चर्चा केली जाते.

- **सचिन खिल्लारे**, मुख्याध्यापक, लालवाडी तांड

शालेय उपक्रमांना प्रतिसाद

- सुंदर हस्ताक्षर, व्हाईट बोर्ड वापर, इंग्रजी वाचन, इंग्रजी शब्दांची बँक, पाड्यांचे झाड, सांस्कृतिक कार्यक्रम, बालमित्र वाचनालय या उपक्रमांना शाळेतील मुलांचा प्रतिसाद मिळत आहे.
- चौथीपर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांना शंभरपर्यंत पाढे पाठ असून, इंग्रजी शब्दांचा साठाही वाढला असल्याचे सांगितले जाते. शिवाय इतर शालेय उपक्रमही मुलांसाठी राबविले जातात.

मुख्याध्यापक व शिक्षक यांना प्रभावी कामासाठी केलेल्या अंमलबजावणीनंतर फलनिष्पत्ती / यशोगाथा-

IAS, IPS, शास्त्रज्ञ व वैज्ञानिक जर आपल्या शाळेतून घडवायचा असेल तर त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रफुल्लीत करणारी आणि ज्ञानार्जनासाठी प्रोत्साहन देणारी अशी 'स्वच्छ व सुंदर' शाळा आपली असली पाहिजे. म्हणुन अनेक अडचणींना मागे सोडत आणि त्यावर विजय मिळवत आमची शाळा ही जालना जिल्हयातील पहिली I.S.O. मानांकन प्राप्त शाळा झाली आहे. आमच्या शाळेमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक सर्व सुख- सोयी उपलब्ध झाल्या आहेत.

समारोप –

प्रशासनाची साथ, गावक-यांची सोबत आणि आम्हा शिक्षकांचे प्रामाणिक प्रयत्न यामुळे आमची शाळा आता खऱ्या अर्थात 'स्वच्छ व सुंदर' शाळा झाली आहे. विद्यार्थी आता शाळेत आनंदाने येतात, रमतात आणि ज्ञानार्जन करतात. आमची शाळा हा आमचा अभिमान आहे.

स्पर्धा परीक्षा, क्रीडा विभाग आणि सांस्कृतिक विभाग अंतर्गत शाळेची यशोगाथा

शाळेचे नाव – श्री बाहुबली विद्यापीठाचे, जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर व आक्काताई नरसाप्पा नांद्रेकर ज्यू. कॉलेज, जयसिंगपूर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

मुख्याध्यापकाचे नाव – श्री दीपक बाळासो वाडकर.

प्रास्ताविक -


सहस्त्राधिक वर्षापासून अनेक मान्यवरांची तपोभूमी श्री.क्षेत्र बाहुबली हे पावन तीर्थक्षेत्र दक्षिण भारतातील सुसंपन्न कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले या तालुक्याच्या ठिकाणा पासून सातकिलोमीटर अंतरावर नक्षत्राप्रमाणे शोभाय मान आहे. परमपूज्य गुरुदेव समं तभद्रजी महाराज यांनी शील, ज्ञान, प्रेम, सेवा आणि व्यवस्था या गुरुकुल पंचसूत्रीचा अविष्कार करून लौकिक शिक्षण व सोबत नैतिक शिक्षणाचा पाया घातला. सह जीवन स्वावलंबन स्वयंपुर्ण शिक्षणा करीता जागो जागी गुरुकुल युक्त शिक्षण प्रणालीस प्राधान्य दिले. या अतिशय क्षेत्रावरील बाहुबली गुरुकुल मध्ये नैतिक व धार्मिक शिक्षणासोबत अनुभव संपन्न लौकिक शिक्षण दिले जाते. याच बाहुबली विद्यापीठाची शाखा जयसिंगपूर येथे कार्यरत आहे.या शाळेने अतिशय नियोजनपूर्वक आणि काळाची गरज ओळखून नवनवे प्रयोग करीत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. शिक्षण आणि जीवन यांचं अतिशय जवळचं नातं आहे. जीवनातून शिक्षण घडत असतं आणि शिक्षणाद्वारे जीवनाला आकार येत असतो. पारंपरिक शिक्षण पद्धतीद्वारे मूल्यांचा ही धडा मिळाला तरते उपयुक्त असते.

'फळाफुलांचा मळा पाहिजे
आनंदाचा सोहळा पाहिजे
गावात एक वेळ देऊळ
नसले तरी चालेल
पण एक आदर्श शाळा पाहिजे.'

शाळा म्हणजे बालकांच्या सर्वागीण विकासाचे ठिकाण असते, शाळेच्या वर्गात देशाचे भविष्य घडते.हाच वारसा घेऊन जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर आणि आक्काताई नरसाप्पा नांद्रेकर ज्यू कॉलेज मधील सर्वानीच संकल्प केला आणि स्पर्धा परीक्षा आणि क्रीडा क्षेत्रात उत्तुंग झेप घ्यायची.त्या दृष्टीने संस्थेचे पदाधिकारी स्थानिक पदाधिकारी आणि मुख्याध्यापक श्री दीपक वाडकर यांनी प्रयत्नपुर्वक नियोजन करून या विभागाकडे अधिक लक्ष दिले.स्पर्धा परीक्षा ,क्रीडा स्पर्धा आणि त्यातील हमखास उत्तुंग यश असे समीकरण तयार झाले. शाळेच्या सर्वांगीण विकासात या विभागाची फलश्रुती हातभार लावत आहे यात शंका नाही. स्पर्धा परीक्षा आणि क्रीडा विभागात शाळेचा नवा अध्याय सुरु झाला. यासाठी सर्व शिक्षक आणि विद्यार्थी यांचे विशेष परिश्रम उपयुक्त ठरले. सदरचे ध्येय समोर ठेवले असता कांही समस्या समोर होत्या

समस्या -

1) स्पर्धा परीक्षा सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात होती.
2) बरेच विद्यार्थी परगावातून येणारे आहेत त्यांच्या प्रवासाची अडचण होती.
3) केवळ शालेय वेळातच अध्यापन करून यश मिळविणे शक्य नव्हते, त्यासाठी शाळेव्यतिरिक्त तासाचे नियोजन करणे आवश्यक होते आणि शिक्षकांची मानसिकता तयार करणे गरजेची वाटत होती.



4) स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी शालेय अन्य विषयात वेळ द्यावा लागत होता, त्यामुळे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास आणि शालेय अभ्यास यात मुलांची धावपळ होत होती.

5) क्रीडा विभागात विशेष कामगिरी करण्यासाठी विशेष प्रशिक्षक नियुक्त करणे ही समस्या होती

6) क्रीडा स्पर्धा साठी आवश्यक साहित्य खरेदी करण्याची गरज होती

7) संगीत विभागात स्वतंत्र शिक्षकाची उपलब्धतता आवश्यक होती

8) जादा वेळ देण्यासाठी मुलींच्या पालकांचे प्रबोधन करणे आवश्यक होते.

समस्या वरील उपाययोजना -

स्पर्धा परीक्षा सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात होती,कोणालाही वंचित ठेवणे योग्य होणार नाही याची जाणीव ठेवून सहभागी सर्व मुलांचा एक स्वतंत्र वर्ग करण्याचा निर्णय घेतला.

परगावातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची बैठक घेतली, त्यांना जादा वेळ आणि मुलांची गैरसोय होणार नाही यासाठी आपल्या स्तरावरून स्वतंत्र गाडीची व्यवस्था करावी किंवा स्वतः वेळेत पाल्यांना सोडावे असे सांगितले. पालकांनी चांगला प्रतिसाद देत स्वत किंवा अन्य वाहनांची व्यवस्था केली.

शिक्षकांना शाळेची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे तसेच शाळे व्यतिरिक्त जादा वेळ देण्याची गरज समजावून सांगितली.रविवारी सुट्टी न देता सकाळी तास ठेवण्याची चर्चा केली.मुलांच्या गुणवत्ता सिद्ध होण्यासाठी सर्वानीच सकारात्मक प्रतिसाद दिला. नियोजनाप्रमाणे कोणतीही जबाबदारी घेण्यास शिक्षक तयार झाले.


स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी केवळ स्पर्धा परीक्षाच्या विषयाला अधिक न्याय देणे आवश्यक होते. शालेय समिती आणि शिक्षक बैठकीमध्ये ठराव केला की अन्य विषयाच्या गृहपाठ वर्गपाठ प्रयोग आणि स्वाध्याय लेखनातून सवलत देण्यात यावी.त्याची अमलबजावणी करण्यात आली.

क्रीडा विभागात विशेष कामगिरी केलेले प्रशिक्षक नियुक्त करण्यात आले.क्रीडा अध्यापकांनी स्वत: विशेष प्रयत्न केले. शाळेच्या वेळे व्यतिरिक्त सराव घेताना हे तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित राहत होते त्यामुळे खेळाची अचूकता साध्य होण्यास मदत झाली.

क्रीडा स्पर्धा साठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली. तीन लाखापेक्षा अधिक रक्कम यासाठी खर्च करण्यात आली.आवश्यक साहित्य उपलब्ध झाल्याने खेळाडूंना कोणतीही उणीव जाणवली नाही. त्याचप्रमाणे संगीत विभागासाठी 1 लाखापेक्षा अधिक रक्कम खर्च करून साहित्य खरेदी केले.

संगीत विभागात स्वतंत्र शिक्षकाची उपलब्धतता आवश्यक होती,त्यासाठी संगीत विशारद असणारे तज्ज्ञ मार्गदर्शक उपलब्ध करून दिले.

जादा वेळ देण्यासाठी मुलींच्या पालकांचे प्रबोधन करणे आवश्यक होते,त्यासाठी वैयक्तिक पालकांची बैठक घेऊन स्वतः सहकार्य करावे असे सांगितले. सायंकाळी वेळ झाला तरी पालक सहकार्य करत होते.



सहशालेय उपक्रम -

केवळ पुस्तकी ज्ञान देणे म्हणजे शिक्षण होत नाही तर महात्मा गांधीजींच्या विचारा प्रमाणे बालकांच्या शरीरमन आणि व आत्मा यांचा सर्वांगीण विकास घडविणारे शिक्षण होय हा सर्वांगीण विकास केवळ पाठ्यपुस्तकातून साध्य होणार नाही तर त्यासाठी सह शालेय उपक्रमाची आवश्यकता आहे. बालक केंद्रित शिक्षण व्यवस्थेत अशा सह शालेय उपक्रमांचे महत्व निश्चितच महत्त्वाचे ठरते. आमच्या शाळेत या सर्व गोष्टींचा विचार करून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अनेक प्रकारचे सह शालेय उपक्रम आयोजित केले जातात. त्यापैकी स्पर्धा परीक्षा विभाग, क्रीडा विभाग आणि संगीत विभाग यासाठी विशेष लक्ष देऊन शिक्षण क्षेत्रात स्वतः ची एक स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात यशस्वी झालो आहोत याचा अभिमान वाटतो.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

https://www.youtube.com/watch?v=5BSnlqIfM1A

स्पर्धा परीक्षांचे महत्त्व खूप मोठे आहे. इंजिनीअरिंग, वैद्यकीय, आयआयटी, मॅनेजमेंट क्षेत्रातील पदवीसाठी प्रवेश मिळविण्यासाठी स्पर्धा परीक्षा द्याव्याच लागतात. रेल्वे, बँक, विमाकंपन्या, प्रॉव्हिडंटफंड, केंद्र व राज्य सरकारातील नोकरी, महानगरपालिकेची नोकरी, काही खासगी कंपन्यांतील नोकरी या सर्व नोकऱ्यांसाठी परीक्षा घेतल्या जातात आणि आतातर अगदी चतुर्थश्रेणीतील पदासाठी ही स्पर्धा परीक्षा घेतली जाते. त्यामुळेच स्पर्धा परीक्षांचे आज फार महत्त्व वाढले आहे आणि त्यामुळेच स्पर्धा परीक्षेचे तंत्र जे प्राप्त करतील अशा विद्यार्थ्यांना आपले करीअर उत्कृष्ट करून जीवन मान उंचावता येते. त्यामुळेच शालेय जीवनापासूनच तयारी व्हावी याउद्देशाने आमच्या शाळेत इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती, इयत्ता आठवी शिष्यवृत्ती, एनएमएमएस तसेच राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षायांचे विशेष मार्गदर्शन वर्ग चालविले जातात. याबाबत विद्यार्थी पालक यांच्यामध्ये जागृती केली जाते. शालेय वयातच या स्पर्धेचे महत्व लक्षात आणून दिल्याने मुलांच्यात सकारात्मक बदल होतो अभ्यासाबाबतीत विशेष.लक्ष दिले जाते.

स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी बुध्दिमत्ता, प्रामाणिकपणा, चातुर्य, संप्रेषण कला, सामाजिक व राजकीय प्रश्नाची जाण, जागतिक घडामोडींचे अद्ययावत ज्ञान, शिस्त, वक्तशीरपणा, न्यायबुद्धी, नेतृत्व गुण, वक्तृत्व, सहानुभूतीशीलता, कणखरपणा, भावनाशीलता, निर्णयशक्ती,इ गुण आवश्यक असतात.हे सर्व यशस्वी करण्यासाठी शिक्षक हि तितकेच अभ्यासू आवश्यक असतात. त्याद्दष्टीने शाळेतील स्पर्धा परीक्षा विभागाची जबाबदारी घेणारे शिक्षक तेवढेच प्रामाणिक आणि उत्साहित असावे लागतात तसे सहकार्य शाळेतील शिक्षक मनापासून काम करत राहिले आणि मुलांच्या गुणवत्तेसाठी प्रयत्न करत राहिले हाच मोठा वाटा आहे.स्पर्धा परीक्षेत यश संपादन करायचे असेल तर वेळ परिश्रम आणि आत्मविश्वास असावा लागतो.शाळेतील स्पर्धा परीक्षा विभागाची टीम या तिन्ही गोष्टीत कधीही तडजोड करीत नाहीत. शाळेची स्पर्धा परीक्षेतील ओळख निर्माण होण्यासाठी विशेष कष्ट घेत राहतात. शाळेतील प्रशासकीय नियोजन आणि त्याची अमलबजावणी यासाठी अखेरपर्यंत झटत असतात.

शाळेच्या स्पर्धा परीक्षेत नवा अध्याय यशाचा मार्ग :

अभ्यासाचे योग्य नियोजन -

परिपूर्ण वार्षिक नियोजन करून त्याप्रमाणे कार्यवाही केले जाते.आपल्याला एखाद्या गोष्टीत यश पाहिजे असेल तर आपण त्याचे योग्य नियोजन करणे अनिवार्य आहे. अभ्यासाचे सुद्धा तसेच आहे. जास्त गुण मिळवायचे असतील तर अभ्यासक्रमातील सोपा भाग आपण पहिले संपवायला हवा आणि नंतर कठीण भागाकडे वळायला हवे. कोणत्या विषयाच्या

कोणत्या पाठाला आपण किती वेळ दिला पाहिजे ज्याने करून कमी वेळेत आपला जास्त अभ्यास होणार हे आपण निर्धारित केले पाहिजे. सुट्टीत जादा तासाचे नियोजन करण्यात येते अभ्यासक्रमाप्रमाणे घटक नियोजन करून वेळेत पूर्ण करणे याकडे विशेष लक्ष दिले जाते. वाचन आणि वाचलेल्याचे चिंतन करणे त्यातून मनन करणे या अभ्यासाच्या महत्त्वाच्या अंगांकडे सर्व शिक्षक लक्ष देतात. नियोजनबद्ध आणि समजेल अशा पद्धतीने अभ्यासपूर्ण "अभ्यासक्रम" पूर्तता, दर्जेदार पुस्तके मार्गदर्शिका यांचा वापर, जास्तीत जास्त सराव पेपर्स, वैयक्तिक मार्गदर्शन आणि अन्य कामातून सवलत पंचसूत्री वापरून कामकाज केले.

वेळेचे व्यवस्थापन -

एका विद्यार्थ्यासाठी वेळ ही सर्वात मूल्यवान वस्तू आहे. अभ्यासात जर यश पाहिजे असेल तर आपण वेळेचे व्यवस्थापन केले पाहिजे. आपण कधी अभ्यास करतो किती वेळ अभ्यास करतो त्याचा सरावाला किती वेळ देतो हे फार महत्वाचे असते. दिवसभर अशी कोणती कामे आहेत की ती आपल्याला टाळता येतील म्हणजे आपण तो वेळ अभ्यासाला देऊ शकतो याचा सुद्धा आपण आढावा घेतला पाहिजे. वेळेचे व्यवस्थापन करण्यासाठी आपण अभ्यासाचे वेळापत्रक बनवले पाहिजे आणि त्याचे कठोर पालन केले पाहिजे.

अभ्यासासाठी संसाधने -


अभ्यास करण्यासाठी जी संसाधने वापरली, त्यामध्ये पुस्तक, नोटस, इंटरनेट वरचे व्हीडीओ हे उच्च आणि विश्वासार्ह श्रेणीचे वापरले गेले. जी संसाधने उपलब्ध आहेत त्यातील चांगली आणि अचूक वापरण्याचा प्रयत्न केला. पालकांना तेच व्हिडीओ पुस्तके वापरण्यासाठी सांगितले. अभ्यासाची संसाधने निवडताना शिक्षकांचे सहकार्य घ्यावे असे पालकांना बैठकीत सांगितले. वैयक्तिक स्तरावर केलेला अभ्यास चांगला ठरतो ही बाब मुलांच्या अंगी बिंबवली जाते.

TV, मोबाईल किंवा अन्य मनोरंजन साधनापासून मुक्ती -

मुलांना टीव्हीचे वेड आहे तसेच आता मोबाईलबाबत आहे. मोबाईलमधल्या इंटरनेटचा वापर फक्त अभ्यासासाठीच करणे आवश्यक आहे. सोशल नेटवर्किंग साइटचा किवा अँप वापर करूच नये.याकडे पालकांनी लक्ष द्यावे अशी सूचना देण्यात येते आणि त्याची अंमलबजावणी करवून घेतली जाते. " परीक्षा तुमच्यासाठी आहे.तुम्ही परीक्षेसाठी नाही!" हा सकारात्मक विचार घेऊन मुलांना मनोरंजनाच्या साधनापासून लांब ठेवले जाते.

जो अभ्यास करणार तो चांगला अभ्यास करा -

दिवसाचे २४ तास कोणी अभ्यास करू शकत नाही. दिवसाचे किती तास अभ्यास करतो त्यापेक्षा किती चांगला अभ्यास करतो ते महत्वाचे आहे. अभ्यास करताना आपले मन अभ्यासात रमले पाहिजे यासाठी विशेष लक्ष दिले जाते. एकाच दिवशी जास्त अभ्यास न करता रोज थोडा थोडा आणि नियमित अभ्यास करा तरच तुम्हाला यश मिळेल हे मुलांना वेळोवेळी सांगितले जाते.अभ्यासाचे नियोजन करून दिले जाते.अभ्यासात शंका राहणार नाहीत याची पुरेपूर काळजी घेतली जाते.



आपल्या आरोग्यकडे लक्ष द्या -

आपल्या जीवनात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपले आरोग्य. आरोग्य हे फक्त शारीरिक नाही तर मानसिक पण असते. यश हवे असेल तर निरोगी शरीरात निरोगी मन असणे हे फार आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला नियमित योगा, व्यायाम, ध्यान केले पाहिजे. शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी आपण पोषक आहार घेतले पाहिजे.यासाठी क्रीडा विभागाची मदत घेतली जाते.अभ्यासाचा कंटाळा येऊ नये यसाठी बदल म्हणून मनोरंजन खेळ घेतले जातात.या सर्व बाबीमुळे मुले सकारात्मक बनली आणि यशाचा आलेख वाढत गेला.

स्पर्धा अभ्यास व्यतिरिक्त अन्य विषयातून सवलत -

स्पर्धा परीक्षेत यश मिळवायचे असेल तर जास्तीत जास्त त्याच विषयाला न्याय मिळावा यासाठी ठराव करून अन्य विषयाच्या लेखन गृहपाठ स्वाध्याय कामातून पूर्ण सवलत दिली जाते.त्यामुळे स्पर्धा परीक्षा विषयाला न्याय देता येईल आणि आत्माविश्वास वाढेल म्हणून हि विशेष सवलत दिली जाते.

सराव प्रश्नपत्रिका आणि स्वतःचे मूल्यमापन -


आजकाल बाजारात बरेच प्रश्नसंच मिळतात. एकदा तुमचा अभ्यास चांगला झाला की जास्तीत जास्त प्रश्नसंच सोडवा. त्याने तुमचा आत्मविश्वास ही वाढेल आणि तुम्हाला परीक्षेची ओळख ही होणार प्रश्नसंच सोडवून तुम्हाला प्रत्यक्ष परीक्षेत वेळेचे नियोजन कसे करावे हे पण कळेल तसेच सराव परीक्षेत जास्त गुण मिळाले तर तुमचा परीक्षेला सामोरे जाण्याचा आत्मविश्वास सुद्धा वाढेल.

स्पर्धा परीक्षा -

दरवर्षी लाखो मुले स्पर्धापरीक्षेची तयारी करतात यामध्ये लाखातून काही शंभर लोक शासकीय सेवेसाठी निवडले जातात त्यामुळे स्पर्धा परीक्षेत स्पर्धा पुष्कळ आहे म्हणून या परीक्षेत यश संपादन करायचं असेल तर अधिक वेळ दिला पाहिजे सर्व विषयाला न्याय दिला पाहिजे म्हणून या स्पर्धा परीक्षांचे स्वतंत्र वर्ग जून मध्येच तयार केले जातात.वर्षाच्या सुरुवाती पासूनच या मुलांची मानसिकता अभ्यासाला पूरक बनविली जाते.

शिक्षक पालक विद्यार्थी संवाद -

ज्या पण स्पर्धा परीक्षेची आपण तयारी करत आहोत. त्या परीक्षेचे स्वरूप नीट समजून घ्या. परीक्षेत कशा प्रकारचे प्रश्न येतात, त्यांना किती गुण असतात, परीक्षेत कोणत्या विषयाला किती मार्क असतात,चुकीच्या उत्तर साठी किती गुण वजा होतात. ही सर्व माहिती तुमच्या कडे असली पाहिजे. आणि त्याप्रमाणे तुम्ही अभ्यासाचे नियोजन केले पाहिजे. पालक विद्यार्थी शिक्षक याची भेट घडवून आणणे स्पर्धा परीक्षांमध्ये आवश्यक असलेली चिकाटी आणि एकाग्रता यासाठी सातत्याने चर्चा करून मुलांचे पूर्ण लक्ष अभ्यासाकडे ठेवले जाते.



क्रीडा विभागाची यशस्विता

https://www.youtube.com/watch?v=BF2QAhNVZ0c

प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी स्पर्धेचे अनन्यसाधारण महत्व आहे. जीवनाच्या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी सुद्धा क्रीडा स्पर्धेचे मोठे योगदान आहे. खेळामध्ये यशस्वी होण्यासाठी खेळाडूंनी जमेच्या बाजू आणि उणिवा यांचा अभ्यास केला पाहिजे. म्हणून वर्षाच्या सुरुवातीला तसेच मागील वर्षामध्ये केलेल्या निरीक्षणातून मुलाची निवड केली जाते.

स्वतंत्र भौतिक व मूलभूत सुविधा -

शाळेमध्ये ज्या सोयी सुविधा असतात त्याला शाळेचे आरोग्य म्हटले जाते शाळेच्या आरोग्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर होत असतो. शाळेला आपण समाजाची छोटी प्रतिकृती समजत असतो. या प्रतिकृतीमध्ये शालेय परिसर, शालेय इमारत, वर्गखोल्या, खेळाचे मैदान व आवश्यक साहित्य उपलब्धता, विद्यार्थी सोयीसुविधा यांचा समावेश होतो. भौतिक सोयीसुविधा जितक्या उच्च आणि चांगले असतील तेवढा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागत असतो. यासाठी आमच्या शाळेत या विद्यार्थ्यांच्या साठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रशस्त क्रीडांगण, स्वतंत्र जिमखाना आणि खेळाचे साहित्य उपलब्ध केले आहे.

खेळ प्रकार निवड -

तालुका जिल्हा स्तर यामध्ये असणार्या खेळ प्रकारची संधी याचा विचार करून तयारी सुरु केली जाते.विद्यार्थ्यांचा वयोगट आणि वजन गट याचा अभ्यास केला जातो. जयसिंगपूर हि शुटींग बॉल ची पंढरी समजली जाते त्यामुळे या खेळ प्रकारासाठी विशेष रुची दाखवली जाते. व्हॉलिबॉल, थ्रो बॉल आणि वैयक्तिक स्तरावर वेटलिफ्टिंगची निवड केली. याचबरोबर विद्यार्थ्यांची वैयक्तिक आवड आणि कौशल्य पाहून ज्या त्या स्पर्धेत उतरण्याचा निर्णय घेतला जातो.

उन्हाळी शिबीर आयोजन -


उन्हाळी सुट्टीमध्येच मुलांना योग्य दिशा मिळावी आणि त्यांच्या तील शारीरिक कौशल्याचा विकास व्हावा.खेळाचे तंत्रशुध्द प्रशिक्षण मिळावे या हेतूने हे शिबीर घेतले जाते.

नियमित सराव -

शाळेच्या नियमित शारीरिक शिक्षणाच्या तासा व्यतिरिक्त जादा वेळ देश सराव जातो. सायंकाळी 4.10 ते 6.00 वाजेपर्यंत कसून सराव घेतला जातो.वैयक्तिक शिक्षक मार्गदर्शन करण्यासाठी उपलब्ध असतात.खेळासाठी विशेष प्रशिक्षक नेमले जातात त्यामुळे योग्य प्रकारे खेळ खेळले जातात.

पालक चर्चा -

शाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी आहेत त्यामुळे सहभाग मोठा असतो.अशावेळी पालकांशी चर्चा करून विद्यार्थ्य साठी कोणता खेळ उचित आहे याचा निर्णय घेतला जातो.पालकांनी अधिक वेळ द्यावा यासाठी प्रयत्न केले जातात.आवश्यक आहार उत्तम आरोग्य राहील यासाठी काळजी घेण्यास सांगितले जाते.



या सर्व प्रयत्नातून शाळेच्या विद्यार्थ्यांनी तालुका ते राष्ट्रीय पातळीपर्यंत झेप घेतली आहे. खेलो इंडिया यामध्ये शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले हा क्षण अपूर्व असा आहे.शाळेच्या क्रीडा धोरणामुळे या क्षेत्रात चमकदार कामगिरी करण्यात येत आहे.शाळेने मागणी केलेले सर्व आवश्यक साहित्य वेळेत उपलब्ध करून दिले याचा फार मोठा फायदा झाला आहे. शाळेने सकारात्मक प्रतिसाद दिल्याने क्रीडा अध्यापक मनपासून कार्यरत राहिले.सातत्याने संपर्क ठेवून चर्चा करत पाठबळ देण्याचे काम केले.

सांस्कृतिक विभाग -निर्मितीचा सोहळा

https://www.youtube.com/watch?v=5BSnlqIfM1A

विद्यार्थी जीवनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे अनन्यसाधारण महत्व आहे. विद्यार्थ्यांचे कलागुण जोपासण्याचे व वाढवण्याचे काम हे सांस्कृतिक कार्यक्रमातून केले जाते. अशा कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कलेचा वारसा जपून स्वतःचे कौशल्य विकसीत करावे. नृत्य नाट्य संगीत हा मनुष्याच्या जीवनाचा अनन्यसाधारण भाग आहे. मानवाच्या जीवनातून कला जर दूर केली तर ते निरस होऊन जाईल. जीवनात रोजच्या धकाधकीतून बाहेर पडायचे असेल तर या अभिजात कलाच मनुष्याला तारक ठरतात. या कलेची योग्य जाण आपण विद्यार्थ्यांच्यात लहानपणातच निर्माण केली पाहिजे.चांगलं बघणं, चांगलं वागणं, चांगलं लिहिणं, आणि मग चांगलं व्यक्त करणं आपण मुलांच्यात रुजवलं पाहिजे या भावनेने सांस्कृतिक विभागाअंतर्गत संगीत विभाग आणि कला विभाग याद्वारे मुलांच्या सुप्त गुणांचा विकास करण्याचा संकल्प केला.

सध्याच्या युगात करिअर करण्याच्या सर्वाधिक संधी कला क्षेत्रात उपलब्ध आहेत. कला क्षेत्राचा अर्थ चित्रकारिता, लेखन, अभिनय या पुरता मर्यादित नाही. तर गायन, नृत्य, संगीत आणि हस्तकला अशा अनेक क्षेत्रात कलाकारांना चांगल्या संधी उपलब्ध आहेत. या गोष्टीचा विचार करून शाळेत संगीत विभाग सुरु करण्यात आला आहे. जादा तासाचे नियोजन करून कलेची आवड असणार्या मुलांना संधी देऊन कलेचे धडे दिले जातात. यासाठी संगीत विशारद पदवी असणारे मार्गदर्शक उपलब्ध करून दिले आहेत. दररोज सायंकाळी तबला हार्मोनियम यासह अन्य वादन आणि गायन क्लासेस आयोजित केले जातात. त्याचा उत्तम प्रतिसाद म्हणजे शाळेत अतिशय चांगल्या पद्धतीचे शालेय वाद्यपथक तयार करण्यात आले आहे.शाळेच्या महत्वाच्या कार्यक्रमात विशेष गणवेशात वाद्यपथक पाहुण्यांचे स्वागत करते त्यावेळी तयार होणारे वातावरण आल्हाददायक बनते. जयसिंगपूर नगरीत या वाद्यपथकाने नावलौकिक मिळविला आहे.शाळेत संगीतमय परिपाठ व प्रार्थना घेऊन शाळेची सुरुवात होते. त्याचबरोबर स्वरसंध्या हा कार्यक्रम आयोजित केला जातो. यामध्ये शाळेचे विद्यार्थी स्वतः आपली कला सादर करतात. पालकांचा अतिशय चांगला प्रतिसाद या कार्यक्रमास लाभतो. कला संगीत बरोबर हस्तकला कौशल्याचा विकास करण्याचा प्रयत्न सातत्याने असतो. दिवाळी पूर्वी विद्यार्थ्यांसाठी आकाशकंदिल निर्मिती कार्यशाळा घेतली जाते. विद्यार्थी अत्यंत उत्साहात या कार्यशाळेत सहभागी होतात.

आम्ही यासाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित केली -

१) विद्यार्थ्यांच्यातील कलेचा शोध घेणे.

२) आवडत्या कलेचा परिपोष होईल त्या कलाप्रकारात मुलांचा सहभाग घेणे.

३) योग्य ते बदल मार्गदर्शन व योग्य उपचारातून घडवून आणणे.

४) मुलांमधील कलेचा अविष्कार करण्यास मदत करणे.

मग वरील उद्दिष्टानुरूप कार्यवाही सुरु केली. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला आणि शाळेच्या एकूणच लौकिकात भर पडला. स्वरसंध्या व वंदेमातरम् या विशेष कार्यक्रमाचे सर्वांना नेहमी भुरळ घातली आहे प्रथम संगीत विभागाचे शिक्षक संगीताची जाण असणारया विद्यार्थिनींची निवड केलीजाते.मग त्यांच्यावर संगीताचे संस्कार केले जातात. त्यांच्याकडून ओंकार साधना इ. करवून घेतली जाते.या मुंला - मुली मधून वैयक्तिक गाणी म्हणू शकणा-या मुलांना समूहात साथ देणे गाणी म्हणणे या साठीच्या विद्यार्थ्यांची निवड केली जाते. मग गाण्यांचे वाटप केले जाते. प्रत्येक गाणे त्या विद्यार्थिनीला खूप वेळा ऐकायला लावले जाते. त्याचा सराव घरी करण्यास सांगून पालकांचा सहभाग घेतला जातो आणि या कार्यक्रमाचे सादरीकरण केले जाते.

स्पर्धा परीक्षा क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक विभाग यातील विशेष आणि नियोजनपूर्वक केलेल्या प्रयत्नाचे फलित म्हणजे आज आमच्या संकुलातील विद्यार्थी संख्या वाढतच आहे. प्रवेश नाकारावा लागतो. लौकिक नैतिक आणि मूल्यवर्धित शिक्षण देण्यासाठी सदैव सर्व स्टाफ प्रयत्न करतो. कोल्हापूर जिल्ह्यात शाळेचा दैदीप्यमान आलेख चढतच आहे. शासकीय अधिकारी यांनी वेळोवेळी शाळेच्या उपक्रम आणि यशाचे कौतुक केलेले आहे.

बाहुबली विद्यापीठ विश्वस्त समितीचे अध्यक्ष श्री.अरविंदजी दोशी, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष श्री.प्रकाश अण्णा आवाडे दादा, ब्रह्मचर्याश्रमाचे अध्यक्ष श्री.सनतकुमारजी आरवाडे, महामंत्री श्री.दादासाहेब पाटील, कोषाध्यक्ष श्री.बाबासाहेब पाटील संचालक श्रीगोमटेश बेडगे यांच्या सह सर्व पदाधिकारी यांचे अनमोल मार्गदर्शन शाळा विकासात लाभले तर शालेय समिती चेअरमन श्री महावीर पाटील, ज्यु कॉलेज चेअरमन श्री.राजेंद्र नांद्रेकर, श्री.धनपाल देमापुरे, डॉ.बी.ए.शिखरे यांच्या प्रेरणेतून ही संकल्पना पूर्ण झाली आहे. या सर्वच यशासाठी मा.मुख्याध्यापक श्री दीपक वाडकर यांच्या नियोजनानुसार विद्यार्थी यश मिळवीत आहेत.

लोकसहभाग व आनंददायी शिक्षणातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव - विद्या मंदिर बशाचामोळा, ता. भुदरगड जि. कोल्हापूर

मुख्याध्यापकाचे नाव - श्री. सचिन कुंडलिक देसाई



प्रास्ताविक –

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड सारख्या दुर्गम तालुक्यातील विद्यामंदिर बशाचामोळा ही शाळा म्हणजे प्रत्येक जिल्हा परिषद शाळेला एक प्रेरणादायी उदाहरण आहे. जवळपास १४ वर्ष शालेय इमारत वापरात नसलेली अतिशय दुरावस्थेत असलेली ही शाळा मागील केवळ चार वर्षात राज्यातील एक रोल मॉडेल स्कूल बनली आहे. कोरोना काळात देखील वीस लाखाहून अधिक लोकसहभाग मिळवून या शाळेचा कायापालट साध्य झाला . या शाळेची प्रेरणागाथा पाहून राज्यातील अनेक शिक्षक आणि अधिकारी वर्ग यांनी देखील या शाळेला मदत कार्य करून एक नवा इतिहास घडवला आहे. या शाळेने केवळ भौतिक सुविधाअंतर्गत प्रगती केली नाही तर मागील चार वर्षात सर्व प्रकारच्या शासकीय शैक्षणिक स्पर्धामध्ये अव्वल स्थान पटकावले आहे. वीस पेक्षाही कमी पटसंख्या असणाऱ्या शाळेत आज जवळपास **32** मुले शिक्षण घेत आहेत. स्वच्छ विद्यालय पुरस्कार, परसबाग निर्मिती, नवोपक्रम स्पर्धा, प्रज्ञाशोध परीक्षा यासारख्या सर्व क्षेत्रांमध्ये शाळा सातत्याने उन्नत दिसत आहे. या शाळेचे नेतृत्व करणारे प्रभारी मुख्याध्यापक श्री सचिन देसाई यांना यावर्षी महाराष्ट्र शासनाने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श पुरस्कार देऊन देखील गौरवले आहे. राज्यातील द्विशिक्षकी शाळेचे एक रोल मॉडेल स्कूल म्हणून आज राज्यातील अनेक समित्या तसेच शिक्षक व पालक या शाळेत भेट देतात. या शाळेतील सर्वात दिशादर्शक बाब म्हणजे या शाळेत लोकसहभागातून केलेल्या विद्यार्थी विकास पूरक सुविधा आणि शाळेत राबवलेले नाविन्यपूर्ण उपक्रम. या शाळेत राबवलेल्या नवोपक्रमास मागील तीन वर्ष राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. स्वच्छ विद्यालय पुरस्कार सहित परसबाग निर्मिती स्पर्धेतही विशेष यश संपादित केले आहे. या शाळेत राबवलेले उपक्रम राज्यातील हजारो शाळेत राबवले गेले आहेत. नक्कीच सर्व शासकीय शाळांसाठी प्रेरणादायी असणाऱ्या या शाळेची यशोगाथा सगळ्यांसाठी एक आदर्श उदाहरण आहे.

शिक्षक / मुख्याध्यापक यांना आलेल्या अडचणी –

१) सदर द्विशिक्षकी शाळा प्रचंड पर्जन्यवृष्टी असणाऱ्या भागात असल्याने गळती कारणाने शाळा इमारत १४ वर्षे वापरात नव्हती. मुलांना शाळेत बसण्यासाठी देखील पुरेशी व्यवस्था नव्हती. महत्वाच्या भौतिक सुविधांचा अभाव होता.

२) मुलांची पटसंख्या २० पेक्षाही कमी होती त्यामुळे शैक्षणिक उपक्रम यशस्वीपणे राबवता येत नव्हते.

३) लोकांचा शाळेसाठी सहयोग व सहभाग अल्प प्रमाणात होता.

शिक्षक / मुख्याध्यापक यांनी अडचणीवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजना -

१) पालक व ग्रामस्थ यांच्यात शैक्षणिक जागृती करून लोकसहभागातून शाळेचा प्रचंड कायापालट केला. १०० दिवस शाळेसाठी या चळवळीतून क्रांतिकारक बदल घडला. शाळेसाठी आवश्यक भौतिक सुविधांची पूर्ती करण्यात आली.

२) गावातील सेवाभावी संस्था, महिला बचत गट यांच्या माध्यमातूनही विविध शैक्षणिक उपक्रम राबवून शैक्षणिक गुणवत्ता वाढवली.

३) १००% मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुख्याध्यापक यांनी विविध नवोपक्रम राबवले त्यामुळे शाळेची गुणवत्ता व पटसंख्या देखील वाढली.

लोकसहभागातून विद्यार्थी विकास -

जून 2020 **ला असणारी शाळेची विदारक स्थिती (बहिरंग)**



जून 20**22 ला शाळेची बनलेली आदर्श स्थिती (बहिरंग)**



जून 2020 ला असणारी शाळेची विदारक स्थिती (अंतरंग)



जून 2022 ला शाळेची झालेली आदर्श स्थिती (अंतरंग)



१०० दिवस शाळेसाठी या चळवळीतून क्रांतिकारक बदल. ग्रामस्थांनी केले शाळेसाठी १०० हून अधिक दिवस मोफत श्रमदान..



शाळेचे माजी विद्यार्थी मा.डॉ. बी. डी पाटील यांच्या दातृत्वातून ग्रामीण भागातील एका जिल्हा परिषद शाळेत उभारला. ICT CENTER प्रकल्प



लोकसहभागातून विद्यार्थी विकासास उपयुक्त सुविधा





DIGITAL CLASSROOM, रंगमंच, पेयजल, स्टडी टेबल







१००% स्टडी टेबल सुविधा असणारी जिल्ह्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा

आनंददायी शिक्षणासाठी नवोपक्रम -

शाळेतील नवोपक्रमांना शासनाचे राज्यस्तरीय पुरस्कार







शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

आयोजित

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२१-२२

प्रमाणपत्र

श्री. सचिन कुंडलिक देसाई, उपशिक्षक, विद्या मंदिर बशाचामोळा, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर यांनी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२१-२२ साठी सादर केलेल्या 'पक्का पाया पहिलीचा ...जाणीव पहिला आकार देताना' या नवोपक्रमास 'प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक गट' या गटातून तृतीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल त्यांना हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

हार्दिक अभिनंदन!

डॉ. अमोल डोंबाळे, वरिष्ठ अधिव्याख्याता, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

श्री. विकास गरड, उपसंचालक (समन्वय), राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

एस. डी. सिंह (भा.प्र.से.), संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.





शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

आयोजित

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२२-२३

प्रमाणपत्र

श्री. सचिन कुंडलिक देसाई, उपशिक्षक, विद्या मंदिर बशाचामोळा, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर यांनी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२२-२३ साठी सादर केलेल्या 'दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल ....देऊ अधिकार प्रत्येक कळीस फुलण्याचा व खुलण्याचा' या नवोपक्रमास 'प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक' या गटातून द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल त्यांना हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

हार्दिक अभिनंदन!

डॉ. दत्तात्रय धिटे, विभाग प्रमुख (संशोधन), राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक (भाषा व समन्वय), राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

श्री. रमाकांत काठमोरे, सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

श्री. कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.), संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

नवोपक्रमातील आदर्श शैक्षणिक उपक्रम.....

१. शब्द बाग (विकास क्षेत्र : भाषा समृद्धी)

मुलांच्या शब्दसंपत्तीमध्ये वाढ व्हावी. वाचन क्षमतेत वाढ व्हावी यासाठी हा प्रकल्प सुरु करण्यात आला. रोपवाटिकामधील सुकलेल्या झाडांचा कल्पकतेने व मुलांच्या सहभागातून असा प्रयोग करण्यात आला. ज्ञानाची रोपटी बनवून शाळेत अशी अनोखी व सुंदर अशी शब्दांची बाग तयार करण्यात आली. अध्ययन निष्पती- ज्ञानाच्या रोपटे बनवून त्यावरील शब्दांचे योग्य प्रकारे वाचन करणे

व्हिडिओ लिंक - https://www.youtube.com/watch?v=XK61ULMYEFw



२. गमतीने शिकू वार आणि महिने (विकास क्षेत्र : गणित-कालमापन)

वार व महिने या महत्वपूर्ण घटकांची रंजक पद्धतीने ओळख व सराव घेण्यासाठी नाविन्यपूर्ण खेळ घेण्यात आलेत. यामध्ये सर्व मुलांनी आवडीने भाग घेऊन सहजपणे मराठीव इंग्रजीमधील वार व महिने यांची माहिती ज्ञात केली.

अध्ययन निष्पती- मराठी व इंग्रजीतील वार, महिने यांची माहिती जाणून अचूक क्रमवार नावे सांगणे.

व्हिडिओ लिंक : **https://www.youtube.com/watch?v=GlDD79bX_bg**



3. टच टू ग्लोबल वर्ल्ड (विकास क्षेत्र : तंत्रज्ञान व सामान्यज्ञान)


या प्रकल्पाअंतर्गत मुलांना अध्ययनास उपयुक्त ठरतील अशा वेबसाईट लिंक चे **QR** कोड स्टीकर बनवून ते प्रत्येक मुलांच्या बेंचवर चिकटवण्यात आले. त्यामुळे टॅबलेट मधून स्कॅन करताच अगदी सहजपणे उपयुक्त शैक्षणिक स्थळांना मुलांनाही सहजपणे भेट देता येऊ लागले. यामुळे या लहान मुलांनाही **PSCHOOL** वरील ऑनलाईन एक्टीव्हीटी सोडवणे, गुगल ट्रान्सलेटर द्वारे अर्थ शोधणे, ऑनलाईन स्टोरी ऐकणे, पाठ्यक्रमावरील ई कंटेंट पाहणे, गुगल वर विशिष्ट गोष्टीबद्दल माहिती शोधणे या गोष्टी मुले आवडीने करू लागली.

अपेक्षित वर्तन बदल- QR कोड स्कॅन करुन ऑनलाईन स्थळांना भेटी देऊन सहजपणे आवश्यक माहिती शोधता येणे.

व्हिडिओ लिंक - https://www.youtube.com/watch?v=MWlXH298L9A



एक विशेष प्रेरणादायी व आनंददायी उपक्रम



'शिक्का शाब्बासकीचा' – मुलांना प्रबलन देण्यासाठी स्टार व प्रेरणामय शब्दांचे असे शिक्के बनविण्यात आले.

४. 'आम्ही छोटे वार्ताहर व संपादक' (विकास क्षेत्र : भाषा व सामान्यज्ञान)

या कार्यक्रमांतर्गत परिसरात घडणाऱ्या विविध घटनांच्या नोंदी घेण्याची जबाबदारी मुलांना देण्यात आली. ह्या मुलांनी संकलित केलेल्या बातम्याचे एक साप्ताहिक प्रकाशित करण्याची पद्धत सुरु करण्यात आली. यासाठी आवश्यक घटना बाबत फोटो मुलांना पुरवण्यात आले. शाळेत व्हर्चुअल न्यूजरूम प्रोग्राम सुरु करण्यात आला. शाळेतील भागातील विविध घडामोडींचे संकलन करून सोप्या छोट्या बातम्या तयार करण्याची जबाबदारी मुलांना देण्यात आली. यासाठी वृतपत्रे व साप्ताहिक नमुने दाखवण्यात आले. या शिवाय दैनिक घडामोडींचे मुलांच्या कडून वाचन करून घेऊन ते व्हिडिओ रेकॉर्डिंगद्वारा प्रसारित करण्यात आले.

अध्ययन निष्पती- आपल्या आसपास घडणाऱ्या व ऐकलेल्या, पाहिलेल्या गोष्टींचा (उदा.कथा, कविता, पोस्टर्स, जाहिरात) संबंध जोडून त्याबाबत गप्पा गोष्टी करतात.

साध्य उद्दिष्ट - विद्यार्थ्यांच्यामध्ये 'स्व' ची जाणीव निर्माण करुन आत्मविश्वास वाढवणे.

https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzqes9xFrt95c9WpnYedJHU





नवोपक्रमातून महाराष्ट्रातील पहिली शालेय वृत्त निवेदन संस्था झाली साकार

Support Video Link –
https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzqes9xFrt95c9WpnYedJHU







६ मॅजिक कार्डचा वापर

साधने : कार्डशीट पेपर, कात्री


शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे -

१) कागदाचे छोटे छोटे तुकडे करणे.
२) तुकड्यावर मराठी,- इंग्रजी अक्षरे किंवा अंक लिहणे.
३) जे अक्षर कार्डवर लिहिले आहे त्यापासून बनणाऱ्या शब्दांची यादी करणे.
४) ते अक्षर वगळून शिक्षकांनी राहिलेला अक्षर समूह फलकावर लिहिणे.
५) मुले प्रत्येक अक्षर समूहाला कार्ड जोडून अर्थपूर्ण शब्द बनवतात.
६) तयार केलेल्या शब्दांची यादी केली जाते.
७) याच प्रकारे अंक कार्डे बनवून तयार होणाऱ्या नवीन संख्येचे वाचन करून घेतले जाते.

कृतीतून होणारे फायदे -

- साधे शब्द व जोडशब्द या सर्वांचा सहजपणे सराव घेता येतो.
- मुलांचा वाचन लेखन सराव होतो.
- मुलांच्या शब्दसंपत्तीमध्ये वाढ होते.
- निरीक्षण क्षमता वाढते.
- संख्याज्ञान दृढ होते.
- आनंदी वातावरणात कृती खेळातून मुले शिकतात.
- लागणारा कालावधी : १ तास

ड्राईव्ह लिंक - https://drive.google.com/drive/folders/1p4f-WM9LocGDPB056gcEDRe0_XZTdIR5



७. EVM **पद्धतीने निवडणूक घेऊन करून वर्गमंत्रीमंडळ स्थापना**

साधने - **Tab, VOTING MACHINE APP,** तक्ते, शाई, सूचनापट्ट्या, कोरे कागद

शिक्षक - विद्यार्थी कृती /टप्पे -

१) शिक्षक शालेय मंत्रिमंडळ निवडणूक कार्यक्रम जाहीर करतात.
२) इच्छुक मुलांचे अर्ज स्वीकारले जातात.

३) निवडणूक प्रसिद्धीपत्रक जाहीर करून सूचना दिल्या जातात.
४) मुलांना ॲप द्वारे मतदान कसे करावे याचे प्रशिक्षण दिले जाते.
५) मुले **TAB** वर **EVM** पद्धतीने मतदान करतात.
६) शिक्षकांच्याकडून निकाल घोषित केला जातो.
७) निवडून आलेल्या मुलाचा शाळेत सत्कार केला जातो.

कृतीतून होणारे फायदे -

- मुलांना **EVM** द्वारे कसे मतदान केले जाते ह्याचे प्रात्यक्षिक ज्ञान व अनुभव मिळतो.
- लोकशाहीचे स्वरूप लहान वयात समजते.
- तंत्रज्ञानाची आवड निर्माण होते.
- मुलांचा भावनिक विकास होतो.
- मुलांच्यात नेतृत्व गुणांचा विकास होतो.
- लागणारा कालावधी : १ तास
- व्हिडिओ लिंक : **https://www.youtube.com/watch?v=nD1fZjcxl8g**



८. एक दिवस शाळेसाठी (विकास क्षेत्र :जीवन कौशल्य, कला, कार्यानुभव)

नवोपक्रम अंतर्गत निर्धारित केलेल्या फौंडेशनल कोर्स मधील प्रात्यक्षिक कार्य करून घेण्यासाठी तसेच मार्गदर्शन करण्यासाठी स्थानिक कारागीर यांची सहायता घेतली जाते. एक दिवस शाळा भेटीचे निमंत्रण देऊन व्यावसायिक कामांची तथा त्यासाठी लागणाऱ्या साधनांची माहिती प्रत्यक्ष शाळेत मुलांना दिली गेली. सुतारकाम, परीटकाम, पेंटिंग असे कलाकुसरीचे काम कारागीरानी तर शिवणकाम, नक्षीकाम तसेच सोप्या पाककृती माता पालकांनी येऊन शिकवल्या. याशिवाय वैदकीय अधिकारी यांनी देखील प्रथमोपचार व औषधी वनस्पती याबबत मार्गदर्शन केले.

अपेक्षित वर्तन बदल- परिसरात केल्या जाणाऱ्या व्यवसायाबद्दल माहिती सांगता येणे. विशिष्ठ कामासाठी कोणते साहित्य आवश्यक असते याची माहिती असणे.

व्हिडिओ लिंक : **https://www.youtube.com/watch?v=_ttmNhi0zRo**



(शिवणकाम, पाककृती व सुतारकाम या कामाची ओळख करून देताना ग्रामस्थ व कारागीर)

९. बचत गटाच्या योगादानातून न्युट्रीशन गार्डन निर्मिती (विकास क्षेत्र : कार्यानुव, आरोग्य)

गावातील बचत गटाच्या माध्यमातून शाळेच्या आवारात न्युट्रीशन गार्डन निर्मिती करण्यात आली. त्यामुळे मुलांना या कामाची प्रत्यक्ष पाहणी करता आली. शिवाय मुलांना सकस व आरोग्यपूर्ण आहार मिळाला. समाज व शाळा यांच्यातील समन्वय देखील यातून वाढला.

ड्राईव्ह लिंक - https://drive.google.com/drive/folders/1nDcJxBVS_q9-FMfgSusB6KIVLHrNviT8





१०. फॉउंडेशनल कोर्सेस फॉर लिटल मास्टर -

'Robotic Education and Training children in Foundational Courses for Little Masters initiative under Sharad Pawar Fellowship in Education शरद पवार फेलोशिप इन एजुकेशन अंतर्गत फॉउंडेशनल कोर्सेस फॉर लिटल मास्टर उपक्रम मध्ये 'रोबोटीक कार' जोडणीचे प्रशिक्षण मुलांना देताना









उपक्रमाची फलनिष्पत्ती / यशस्विता -

मुलांना शिक्षणात गोडी वाढवण्यासाठी, सर्वांग विकास साध्य करण्यासाठी सर्व गोष्ठी नियोजनपूर्वक करता आल्याने, पालकांची साथ व वरिष्ठांचे मार्गदर्शन प्राप्त झाले या प्रयत्नात शाळा यशस्वी झाली., निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य झाली.

१. वर्गातील १००% विद्यार्थ्यांनी सर्व विषयातील सर्व क्षमता प्राप्त करून प्रगत होण्यासाठी अनुरूप वातावरण निर्मिती करणे. वर्गातील सर्व मुलांनी इ २ री च्या सर्व मुलभूत क्षमता व अध्ययन निष्पती साध्य केली. वाचन, लेखन, भाषण, संभाषण या क्षमतेवरही प्रभुत्व संपादन केले. गणितीय साक्षरता प्राप्त झाली. गणिताच्या गोष्टी व सरप्राईज टेस्ट यामुळे गणिताची चांगली तयारी झाली. इंग्रजी विषयातील भाषिक तयारी, शब्दसंपत्ती व संभाषण कौशल्य वाढवण्यास उपक्रम लाभदायक ठरला . पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यांचा तुलनात्मक अभ्यास करता मुलांच्यात अपेक्षित वर्तन बदल दिसून आला. १००% विद्यार्थी प्रगत करण्यास उपक्रम लाभदायक ठरला.

२. बालकांना नवनिर्मितीचा विचार करण्यास प्रवृत्त करणे.

नाविन्यपूर्ण कृती कार्यक्रमातून व प्रयोगातून मुलांच्यामध्ये नवनिर्मितीची आवड निर्माण झाली. नवीन काम करण्यात मुले उत्साहाने भाग घेऊ लागली. मुलांनी स्वतः शालेय बागेत सुकलेल्या फुलापासून ज्ञानाचे रोपटे बनवून शाळेत सुंदर अशी शब्दबाग खुलवली. घरातील टाकाऊ वस्तूपासून काही वस्तू बनवता येईल का **?** याचाही मुले विचार करून प्रयत्न करू लागली. उदा. घरातील शिल्लक कागदी खोक्यापासून मुलांनी चिमण्यांसाठी घरटी बनवली.

३. मुलांना तंत्रज्ञानाची आवड निर्माण होईल अशी संधी निर्माण करणे.

शैक्षणिक सत्राच्या सुरवातीला शाळेत **ICT CENTER** ची उभारणी करण्यात आली त्यामुळे शाळेत तंत्रज्ञान शिकण्यासाठी अनुकूल वातावरण व सुविधा प्राप्त झाल्या. ॲप चा वापर, स्मार्ट बोर्डचा वापर, **Tab** चा वापर नवीन ज्ञान मिळवण्यासाठी करू लागली. आपल्या कल्पकतेने काही साहित्य बनवून दाखवू लागली. फौंडेशन कोर्समुळे मुलांना कौशल्ययुक्त व तांत्रिक कामासाठी कामासाठी लागणाऱ्या साहित्याची ओळख झाली.

४. परिसराची व मुलभूत व्यावसायिक ज्ञानातून जीवनकौशल्यांची ओळख करून देणे.

मुलांना क्षेत्रभेट, शेतीभेट , कारखाना भेट तसेच बलुतेदार व्यवसाय भेट यातून परिसरातील व्यवसायांची ओळख करून दिली. परिसरातील आवश्यक मुलभूत माहितीचे ज्ञान झाले. पर्यावरण जपणूक करण्याची जागृती करण्यासाठी 'प्लास्टिकमुक्त रविवार' सारखे उपक्रम लाभदायक ठरले. रांगोळी, चित्रकला, नक्षीकाम, परसबाग लागवड या कामांची ओळख झाली. विविध कौशल्याची ओळख व आवड निर्माण झाली. कोणतेही काम करण्यात कंटाळा न करता मुले उत्साहाने भाग घेऊ लागली. घरातील कामातही सहकार्य करू लागली. आपल्या भविष्याबद्दल मुले विचार करू लागली.

५. विद्यार्थ्याच्यामध्ये 'स्व' ची जाणीव निर्माण करुन आत्मविश्वास वाढवणे

उपक्रमाच्या सुरुवातीलाच मुलांच्या आवड निवड लक्षात घेण्यासाठी त्यांना विशिष्ट प्रश्नावली देण्यात आली होती. त्यां आधारावर मुलांना मार्गदर्शन करण्यात आले. 'सुंदर माझे अक्षर हस्ताक्षर' प्रकल्पातील उत्कृष्ट ठरलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिल्ड प्रमाणपत्र देऊन प्रबलन देण्यात आले. मुलांना कृती उपक्रम अगर प्रात्यक्षिक कामाचे अभिनंदन करण्यासाठी विशेष शिक्के बनवण्यात आले, ज्यावर स्टार किंवा अभिनंदन रिमार्क टाकण्यात आला. फौंडेशनल कोर्स पूर्ण केल्यावर मुलांसाठी विशेष सर्टिफिकेट तयार करून वाटप करण्यात आले. या सर्व गोष्टीतून मुलांना उत्कृष्ठ कार्य करण्याची प्रेरणा मिळाली व आत्मविश्वासही वाढला.

६. सुप्त क्षमतांच्या विकासास संधी देऊन सर्वांगीण विकास साधणे.

या उपक्रम अंतर्गत भाषण, गायन, कला, क्रीडा, लेखन, कलाकुसर या सर्व गोष्टींची संधी मिळेल अशा गोष्टींची निश्चिती केली होती. मुलांचा भाषण कौशल्य विकास करण्यासाठी वैशिष्टपूर्ण असे 'बालकांचे वक्तृत्वविश्व' हे **QR** कोड सुविधायुक्त असलेले, राज्यातील पहिलाच प्रयोग ठरलेला अनोखा 'भाषण संग्रह' पुस्तक लिहून प्रकाशित करून त्याच्या १००० प्रतींचे मोफत वाटप केले. मुलांना म्युजिक सिस्टीमवर गायनाची संधी दिली. कार्यानुभव अंतर्गत घेतलेल्या उपक्रमातून हस्तकौशल्याचा विकास झाला.

७. शिकण्यातील आनंद मिळवण्याच्या प्रवृत्तीस चालना देणे.


मुले नेहमी प्रसन्न राहू लागली. मुले एकही दिवस शाळेत गैरहजर राहिली नाहीत. प्रत्येक उपक्रमात मुलांनी आवडीने सहभाग घेतला, याशिवाय त्यांच्या पालकांनी देखील आनंदाने सहभाग घेतला. मुलांना रोज 'माझी आठवण' ही दैनंदिनी लिहिण्यास सांगितली जाते, यामध्ये मुलांनी सकारात्मक नोंदी केल्या असल्याचे निदर्शनात आले.

समारोप -

कोरोना काळात इयत्ता १ ली साठी राबविलेला विशेष उपक्रम 'पक्का पाया पहिलीचा' व सन २०२२/२३ या शैक्षणिक वर्षात 'दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल...' हा इयत्ता २ री हे नवोपक्रम म्हणजे मुलांच्या संपूर्ण पायाभूत व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक प्रयत्नांचा, उपक्रमांचा एक सुंदर मिलाफ होता. निपुण भारत आणि **FLN** यासाठी पूरक असे हे नवोपक्रम ठरले. ग्रामीण भागातील या शाळेत राबवलेले उपक्रम त्याच्या यशस्वीतेमुळे संपूर्ण राज्यभर स्विकारले गेले. यातील अनेक कृती, प्रकल्पांचे राज्यभर अनुकरण करण्यात आले.

या उपक्रमामुळे मुलांमध्ये घडून आलेले सकारात्मक बदल - या नवोपक्रमामुळे सर्व मुले खऱ्या अर्थाने प्रगत बनली, त्यांच्यात झालेले गुणात्मक आणि भावात्मक बदल खालील प्रमाणे....

१) मुलांच्या वाचनात सुधारणा झाली, शिवाय वाचनाची आवड निर्माण झाली.
२) मुलांच्या लेखनात सुधारणा झाली. मुले आपले विचार लेखनातून व्यक्त करू लागली.
३) संगणक, टॅब, **V R BOX, ALEXA DEVICE** आदी. साधने योग्यरित्या हाताळतात.
४) स्वतः विषयी आणि कुटुंबाविषयी आत्मविश्वासाने माहिती सांगतात.
५) मुलांना नवीन काहीतरी शिकण्याबद्दल आवड निर्माण झाली.
६) मुलांच्या सृजनशीलतेचा विकास झाला.
७) हस्तकौशल्याचा विकास झाला.
८) पालक व समाज यांचा शाळेशी समन्वय वाढला.
९) गणित विषयाची आवड निर्माण झाली.
१०) गणितीय ज्ञानाचा व्यावहारिक व उपयोजनात्मक वापर करू लागली.
११) श्रमप्रतिष्ठा निर्माण झाली.
१२) इंग्रजी भाषेबद्दल गोडी निर्माण झाली.
१३) शब्दसंपत्ती वाढली.
१४) श्रवण, भाषण, वाचन व लेखन या सर्व क्षमतांचा विकास झाला.
१५) गणितीय साक्षरता मुलांच्यात निर्माण झाली.
१६) मुलांना तंत्रज्ञानाची गोडी वाढली.
१७) एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती वाढली.
१८) कल्पकता व विचारक्षमता यांना चालना मिळाली.
१९) सर्वधर्म समभाव निर्माण झाला.
२०) १००% विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्यात आले



परिशिष्ट - अ

महत्वपूर्ण लिंक

लोकसहभागातून कोरोनो आपत्ती काळात साधलेला शाळेचा शैक्षणिक विकास

https://drive.google.com/file/d/1E1K_ybISsWPKUy6BAe5MR4B8pLWqrYof/view

'दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल' या उपक्रमा संदर्भातील तपशीलवार माहिती व पुरावे आपणास खालील लिंक यादीद्वारे सहजपणे दृष्टीक्षेपात येईल.

- **नवोपक्रमबाबत संपूर्ण माहिती संदर्भ व्हिडिओ संग्रह :**
  https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnyi_FDrMuhjyGLTulkSphYs
  https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzNRRI9glolHet06XTww1cr
- **हस्ताक्षर सुधार प्रकल्पातील सर्व सुलेखन नमुने व पुरावे संग्रह (गुगल ड्राईव्ह) लिंक :**
  https://drive.google.com/drive/folders/1itFL1ODYb3j0lR_mSceLw7GgbbMN4-mP? Usp =s hare_link
- **मराठी वाचन लेखनासाठी स्वनिर्मित ई- साहित्य (पीडीएफ व फ्लिपबुक आवृत्ती)**
  https://desaisachin.blogspot.com/2020/10/my-digital-book.html
- **आम्ही छोटे संपादक उपक्रम**
  https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzqes9xFrt95c9WpnYedJHU
- **न्युट्रीशन गार्डन**
  https://drive.google.com/drive/folders/1nDcJxBVS_q9-FMfgSusB6KIVLHrNviT8?usp=sharing
- **WORLD OF WORDS' E-CONTENT FOR ENRICH VOCABULARY:**
  https://desaisachin.blogspot.com/2019/07/blog-post.html

अ.क्र.	स्वनिर्मित ई-साहित्य / स्त्रोत	लिंक
१)	नवोपक्रमबाबत संपूर्ण माहिती संदर्भ व्हिडिओ संग्रह	https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzNRRI9glolHet06XTww1cr
२)	संवाद क्र १ | उपक्रमाचा उद्देश व दिशा : संवादक – सचिन देसाई	https://www.youtube.com/watch?v=UOih7u_XHLM
३)	संवाद २ रा | लेखनपूर्व तयारी : कृती, उपक्रम व आनंददायी खेळ | संवादक- सचिन देसाई	https://youtu.be/dsd70I27nYk
४)	संवाद ३ रा | लेखनाची पहिली सुयोग्य पकड व पहिले लेखन संस्कार संवादक- सचिन देसाई	https://youtu.be/loFLJrXcxVc

५)	संवाद ४ था | एक अंकी संख्या व दशक यांचा पहिला संबोध व दृढीकरण | संवादक- सचिन देसाई	https://youtu.be/dOx3Sd29-8A
६)	मराठी वाचन लेखनासाठी स्वनिर्मित ई-साहित्य (पीडीएफ व फ्लिपबुक आवृत्ती)	https://desaisachin.blogspot.com/2020/10/my-digital-book.html
७)	मराठी वाचन लेखनासाठी स्वनिर्मित ई-साहित्य (व्हिडिओ आवृत्ती)	https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onny327VPtalw_A0pQi-UkRBi
८)	**'WORLD OF WORDS' E-CONTENT FOR ENRICH VOCABULARY:**	https://desaisachin.blogspot.com/2019/07/blog-post.html
९)	नवोपक्रमसाठी शै.साहित्य व ई-साहित्य वाटप कार्यक्रम (**pdf)**	https://drive.google.com/file/d/1kfCWZ6qSyGWnpfuTlAtNAGoSzzwKpYJw/view?usp=sharing
१०)	नवोपक्रम यशस्वीतेसाठी पूरक ई-साहित्य म्हणून तयार केल्याल्या **QR** कोडयुक्त डिजीटल बुकचा वापर विद्यार्थ्यांनी स्वघरी कसा केला **?** याचे प्रात्यक्षिक (**video)**	https://youtu.be/3p4UD6mXfsI

नवोपक्रम व शाळाविकास बाबत आलेल्या बातम्या

सकाळ

बशाचामोळाची शाळा 'लै भारी'!

- विद्यार्थ्यांसाठी एकवटलेले...
- शिक्षणाला आकार देणारे गाव

रिपोर्ताज
सदानंद पाटील

'कोरोनामुळं दोन वर्षे शाळाच न्हायं... आता कुठं शाळा सुरू झाली; पण मुलगा शाळेत जायला तयारच होईना... शाळा म्हटलं की आदळआपट करायचा. वर्गातील शिक्षकांवर राग काढायचा. मात्र, सचिन देसाई व दिग्विजय कोटकर सरांनी पोराला शाळेची गोडी लावली. आमी बी आमची मुलं-बाळं शिकत्यात म्हणून शाळेलाही लेकरासारखं समजून काम करू लागलो... या सर्वांमुळं शाळेचा कायापालट झाला. माझं पोरगं आता शाळेत जाण्यासाठी गडबड करतं. शाळेची घंटा साडेदहाला घणघणते. तो मात्र नऊलाच शाळेत पोचायचा...' भुदरगड तालुक्यातील बशाचामोळा येथील स्वाती सुनील पाटील गावच्या शाळेबद्दल सांगत होत्या. आज शाळा, विद्यार्थी आणि पालक यांतील दुरावा वाढत असताना बशाचामोळासारख्या दुर्गम भागातील शाळेसाठी झटत असलेले पालक, शिक्षक पाहिले की, या शाळांना पर्याय नाही, असं म्हटल्यावाचून राहावत नाही... त्याच शाळेची ही सफर...



खासगी शाळेपेक्षाही सुंदर प्रवेशद्वार असलेली बशाचामोळा येथील शाळा.

दोन खोल्यांची शाळा, कमान

विद्री-गारगोटीमार्गे भुदरगड तालुक्यातील थेट बशाचामोळा गावात पोहोचलो.... सभोवती डोंगर, हिरव्यागार निसर्गानं नटलेला परिसर. मुळात 'बशाचामोळा' या नावाचं रहस्य काय, असा प्रश्न पडला होता. याचं उत्तर गावातील ज्येष्ठ नागरिक दत्तात्रय राऊ पाटील यांनी दिलं. गावच्या नावाबाबत सांगताना ते म्हणाले, 'बसवेश्वरांचं युद्ध झालेला हा परिसर. त्यांचं मंदिर शाळेपासून जवळच शेतात. त्यांच्या नावाचा अपभ्रंश झाला. बशाचा मोळा म्हणजे बसवेश्वरांचा मळा म्हणा किंवा जमीन...' अशाच पवित्र परिसरात ही शाळा उभारली आहे.

गावाचा पूल ओलांडून पुढे गेल्यावर जिल्हा परिषदेच्या शाळेची दोनच खोल्यांची इमारत. दोन खोल्यात पहिली ते चौथीचे वर्ग भरतात. शाळेच्या दारात मात्र खासगी शाळेपेक्षाही सुंदर प्रवेशद्वार. गावातीलच एका उत्पन्नदाराने नातेवाईकांच्या स्मरणार्थ बांधून दिलेले. मात्र, या प्रवेशद्वाराच्या उभारणीसाठी खड्डे काढण्यापासून ते शाळेतील इंचनइंच परिसराचा विकास करताना येथील ग्रामस्थांनी, आजी-माजी विद्यार्थ्यांनी, महिलांनी घाम गाळला आहे. सरकारी एक रुपयाही न घेता... शाळा अक्षरशः नटवली आहे... सगळा परिसर नीटनेटका... रंगीबेरंगी. शाळेतील मुलंही तशीच उत्साही, अभ्यासू व खेळकर आहेत. शाळेच्या वर्गात



पोचताच विद्यार्थ्यांकडून स्वागत झाले. शाळा मुलांनी गच्च भरली होती. एका कोपऱ्यात स्मार्ट बोर्ड व त्यावर अक्षर गिरवणारी, दुसरीकडे विविध साहित्यांचा वापर करून अक्षरं तयार करणारी, चित्रं रंगवणारी मुलं पाहून तेथील शिक्षणास पोषक वातावरणाचा अंदाज आला. स्मार्ट बोर्डवर काय शिकता? विचारल्यावर क्षणाचाही विलंब न लावता मुलांनी पटापट अक्षर गिरवण्यापासून ते तारांगणापर्यंतची सर्व माहिती दिली. वाडी, वस्तीवरील ग्लोबल शाळेची ही झलक. शाळेच्या भिंतींची आकर्षक रंगरंगोटीही शिक्षण



आणि संस्काराचा भाग कशी बनते, हे प्रत्यक्षात पाहायला मिळाले...

शिक्षण संस्कृती रुजत आहे

या दोन खोल्यांच्या शाळेत शिक्षणासाठी आवश्यक सगळं हजर आहे. स्मार्ट बोर्ड, म्युझिक सिस्टिम, कपाट, गोष्टींची पुस्तकं, विविध चित्रफिती, संगणक, खेळाचे सर्व साहित्य, मुलांसाठी स्टडी टेबल, गणवेश, कृतीयुक्त अध्ययनास आवश्यक सामग्री अशा विविध वस्तूंची रेलचेल...आणि या प्रत्येक वस्तूंचा रोजच्या रोज होणारा वापर... यातच शाळेच्या यशाचं रहस्य लपले आहे. या सर्व साधनांचा सुयोग्य वापर शिकवणारे देसाई व काटकर सरांचे योगदानही तेवढेच मोलाचे. रजा, सुटीचा विचार न करता ही शिक्षक मंडळी अखंड ज्ञानदानाचे काम करत आहेत. त्यामुळेच येथे शिक्षण संस्कृती रुजत आहे...

लोकसहभागातून रुपडे पलटले...

'आमच्या कनवटीला पैसा न्हाई. काम कितीबी सांगा करतो. आमचीच पोरं शाळेत शिकून सवरून मोठी हुगार. मग शाळेसाठी रावलो तर बिघडलं कुठं! सरांनी हाक दिल्यावर शाळेच्या स्वच्छतेत आमी सहभागी झालो,' गावातील आजी नानूबाई झाटे सांगत होत्या. 'गावाच्या मध्यभागी दगडी शाळा होती. ती केवळ एक खोलीची. पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वीची असेल. ती मोडकळीला आल्याने गावाबाहेरच्या शाळेत वर्ग भरवणे गरजेचे होते. त्याही इमारतीला गळती असल्याने अडचण होती. गावातील माजी विद्यार्थी, तरुण मंडळे, गावकऱ्यांनी स्वच्छतेसाठी आवाहन केले. पाहता-पाहता शाळेचा कायापालट झाला. कोरोना काळात गावकऱ्यांनी जुन्या शाळेकडील किचन गावाबाहेरील शाळेच्या इमारतीकडे हलवले. जवानाने ध्वजस्तंभ बांधून दिला. कोणी शाळेची कमान उभारली, तर कोणी पाणपोईसाठी मदतीचा हात दिला. विद्यार्थ्यांसाठी स्टडी बोर्ड मिळाले. स्वच्छतागृह सुसज्ज... शाळेचा नवा लूक पंचक्रोशीत चर्चेचा झाला,' असे सरपंच निशा संतोष संकपाळ यांनी सांगितले.

पक्का पाया पहिलीचा...

ही शाळा प्रसिद्धीच्या झोतात येण्याचे कारण म्हणजे पहिलीच्या वर्गासाठी शिकवला जाणारा 'पक्का पाया पहिलीचा' हा उपक्रम. त्यामध्ये विद्यार्थ्यांची आवडनिवड लक्षात घेऊन त्यांची मानसिक जडणघडण करण्यात येते. उपक्रमास यंदा शासकीय नवोपक्रम स्पर्धेत राज्यात तृतीय क्रमांक मिळाला. कोरोना काळातही मुलांना शिक्षणाची आवड निर्माण करण्यास, शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासह पायाभूत भाषिक क्षमता व अंकगणितीय साक्षरता निर्माण करण्यास हा उपक्रम उपयुक्त ठरला. उपक्रमासाठी अनेक शैक्षणिक सहित्याची निर्मिती श्री. देसाई यांनी केली आहे.

पटसंख्या २२ वरून ३२

गावातील मुले इंग्रजी शाळेत शिकत होती. शाळेच्या लौकिकाने त्यांनी विद्यामंदिरात प्रवेश घेतला आहे. पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांसाठी ही शाळा पसंतीची ठरत आहे. गावातील काही लोकं उद्योग, व्यवसायासाठी बाहेरगावी आहेत. आयुषचे पालक इचलकरंजी, सुकन्या व शिवन्या यांचे पालक गोकुळ शिरगाव येथे कामाला आहेत. मात्र, मुलं आपल्या आजी, आजोबांकडे राहून गावातील शाळेत शिकत आहेत. या मुलांना शहरातील शाळेत जाणे सहज शक्य आहे. किंबहुना तसा प्रयत्नही झाला. मात्र, गावातील शाळाच लै भारी असल्याने ही मुलं पुन्हा जिल्हा परिषद शाळेत दाखल झाली आहेत.

शाळा म्हणजे ज्ञानमंदिर

लोकसहभागातून शाळमागे आणखी एक खोली आकार घेत आहे. तेथे सांस्कृतिक कला गुण सादर करण्यासाठी स्टेज आहे. श्रमदानातून ते साकारले आहे. शाळा म्हणजे पाल्याला घडविणारे ज्ञानमंदिर हीच गावकऱ्यांची भावना आहे. स्पर्धेच्या युगात इंग्रजी शाळांकडे कल वाढला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धेत टिकला पाहिजे, ही गावकऱ्यांची भावना आहे. शासन शाळेसाठी निधी देईल, क्रीडा साहित्य देईल, या भरवशावर ते बसलेले नाहीत. कोल्हापूर शहरात मुलांसाठी मैदाने नाहीत, अशी ओरड सातत्याने होते. जी मैदाने आहेत, ती सुस्थितीत नाहीत, ही त्याची दुसरी बाजू. मग बशाचामोळा सारख्या गावातील नागरिक श्रमदान करून कायापालट करत असतील तर इतरांना अडचण काय, असा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही....बशाचामोळा शाळेची छबी आणि तेथील सकारात्मक विचारांची शिदोरी घेऊन परतीचा प्रवासाला लागलो...काहीतरी नवं सोबतीला घेऊन...

जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की, मौजे कुर्डू, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील गट नं. ८१६ क्षेत्र हे.०.२० आर यामी चतुःसिमा पूर्वेस- महादेव केशव कांबळे यांची मिळकत, पश्चिमेस- शंढवीकडे जाणारा रस्ता, उत्तरेस- पिराजी दो पाटील, नागरगा दो पाटील, दक्षिणेस– गट नं. ८१७ व ही मिळकत आमचे अशिल दत्तात्रय पांडूरंग कांबळे यांचे मालकीची असून वर नमूद मिळकत रेव्हेन्यू रेकॉर्डवर नावे असलेचा गैरफायदा घेऊन कही व्यक्ती हे तबदील करणेचे प्रयत्नात असलेचे आमचे अशिलांना खात्रीलायक समजून आले असून तमाम लोकांना या नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की वर नमूद मिळकतीसंदर्भाने आमचे अशिलांचे व्यतिरिक्त अन्य कोणाशीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार, करार करू नये अगर तसा व्यवहार केलेस आमचे अशिलांचे हक्कावर बंधनकारक असणार नाही म्हणून दिली जाहिर ज्ञापरा नोटीस कोल्हापूर दि. १८/०३/२०२२
उपरोक्त अशिलांतर्फे वकील
सही/-
अॅड. आर. एन. ठाकूर (MAH/7070/2021)

Kolhapur, Main
19/03/2022 Page No. 7

जिल्ह्यात प्रथम : शाळेची राज्य फेरीसाठी निवड

परसबाग निर्मिती स्पर्धेत बशाचामोळा शाळा झळकली

शिवाजी सावंत
लोकमत न्यूज नेटवर्क

गारगोटी : पंतप्रधान पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शाळेतील मुलांनी जीवनसत्त्वयुक्त आहाराचे सेवन करावे, या हेतूने शालेय परिसरात परसबाग निर्मिती स्पर्धा आयोजित केल्या होत्या. याचा जिल्हास्तरीय निकाल जाहीर झाला असून, या स्पर्धेत भुदरगड तालुक्यातील बशाचामोळा प्राथमिक शाळेने प्रथम क्रमांक पटकविला. शाळेची राज्य फेरीसाठी निवड झाली.

डोंगराळ भागातील या शाळेत तीस विद्यार्थी असतानाही उपक्रमशील शिक्षक सचिन देसाई व दिग्विजय कोटकर यांनी ही किमया घडवून आणली. प्रकल्प उभारणीसाठी शाळा व्यवस्थापन समिती, बचत गट व माता-पालक संघाने मोलाचे योगदान दिले.

मुलांना परसबागेचे महत्त्व कळावे, योग्य देखभाल व्हावी, यासाठी बाल हरित क्रांती सेनेची स्थापना केली आहे. शिक्षक, बालक, समाज व स्वयंपाकी नानूबाई झाटे यांच्या अथक प्रयत्नातून हा प्रकल्प यशस्वी ठरला आहे. तालुका कृषी अधिकारी एस. एस. भोकरे यांचेही मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजयसिंह चव्हाण, शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर, आशा उबाळे, गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, विस्ताराधिकारी प्रबोध कांबळे, केंद्रप्रमुख संजय कुकडे, आबासाहेब पसारे यांनी अभिनंदन केले. पांडुरंग पाटील या शेतकऱ्याने या उपक्रमासाठी शाळेसमोरील स्वतःची जमीन भाजीपाला लागवडीसाठी वापरण्यास दिली आहे.



बाशाचामोळा शाळेच्या परिसराती फुलविलेली ही परसबाग.

शालेय जीवनात विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व समजावे, शाळेच्या आवारात सकस आणि पौष्टिक अन्न प्रत्यक्ष कृतीतून उपलब्ध करावे, अशा उदात्त हेतूने शासनाने सुरु केलेल्या परसबाग उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळाली आहे
- सचिन देसाई, मुख्याध्यापक

छोट्याशा गावात राहणारी चिमुकली मुले शिक्षकांनी सांगितल्यावर पहाडही पार करु शकतात. हे या शाळेतील विद्यार्थ्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून राज्याच्या स्पर्धेत समाविष्ट होताना तेथूनदेखील प्रथम क्रमांक मिळवितील, असा माझा दृढ विश्वास आहे.
- निशा संकपाळ, सरपंच

दुर्गमभागातील बशाचामोळा शाळा बनली स्मार्ट

गारगोटी /महानकार्य वृत्तसेवा

सध्याचे युग खुप ग्लोबल आणि स्मार्ट बनत चालले आहे. शाळा व शिक्षण देखील स्मार्ट बनत चालले आहे. आज अनेक शाळांत डिजीटल स्मार्ट बोर्ड बसवले जात आहेत. पण यासाठी जवळपास एक लाख रुपयांचे इलेक्ट्रॉनिक मटेरियल आवश्यक असल्याने केवळ उच्च भू वस्तीतील मोठ्या खाजगी शाळेत अशा सुविधा पहावयास मिळतात. भुदरगड सारख्या दुर्गम तालुक्यात अद्याप कोणत्याही जिल्हा परिषद शाळेत अशी सुविधा उपलब्ध नाही. पण पाटगांव खोऱ्यातील 'बशाचामोळा' या ४ थी पर्यत असणाऱ्या छोट्याश्या शाळेत ही स्मार्ट बोर्ड सुविधा एका समाजसेवी संस्थेच्या योगदानातून प्राप्त झाली. लोकसहभागाचे अनोखे उदाहरण सर्व राज्यासमोर ठेवणाऱ्या या शाळेसाठी ही सुंदर व संस्मरणीय अशी भेट 'रश्मीज् स्माइल ट्रस्ट, मुंबई' तर्फे प्रदान करण्यात आली. गेली कित्येक वर्षे अविरतपणे कार्य करणारी ही देशातील नामांकित समाजसेवी संस्था नुकतीच आंतरराष्ट्रीय पुरस्कारानेही सन्मानित झाली आहे. या संस्थेने महागडचा स्मार्ट बोर्ड सोबत संगणक, प्रोजेक्टर, स्पीकर, प्रिंटर, सर्व मुलांच्यासाठी नवीन दप्तरे, पुस्तके व इतर उपयुक्त साहित्य असे एकूण सव्वा लाख किमतीचे साहित्य शाळेच्या मुलांना भेट दिले. यातून तालुक्यातील पहिली स्मार्ट स्कुल होण्याचा बहुमान या जिल्हा परिषद शाळेस प्राप्त झाला आहे. लॉकडाऊन काळात या शाळेने केलेल्या कौतुकास्पद विकास कार्याचा आदर्श राज्यभरातील शिक्षक



सचिन देसाई यांच्या नवोपक्रमास सर फाउंडेशन राष्ट्रीय पुरस्कार

प्रतिनिधी
पाटगाव

महाराष्ट्र सर फाउंडेशन आयोजित राष्ट्रीय नवोपक्रम स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा सोलापूर येथील सिंहगड इस्टिट्यूड येथे झाला. कोल्हापूर जिल्ह्यातील विद्या मंदिर बशाचा मोळा (ता. भुदरगड) शाळेचे उपक्रमशील शिक्षक सचिन देसाई यांना उपक्रमशील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. डॉ. दीपक माळी, पद्मश्री गिरीश प्रभुणे, डॉ. अरविंद नातू, प्रदीप मोरे, डॉ. ह. ना. जगताप, भाऊसाहेब चास्कर, डॉ. सुहासिनी शहा, दत्तात्रय वारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर फाउंडेशनचे राज्यसमन्वयक सिद्धाराम मशाळे, बाळासाहेब वाघ, राजकिरण चव्हाण व देशभरातील नवोपक्रम शिक्षक उपस्थित होते.

सचिन देसाई यांचा राष्ट्रीयस्तरावरील नवोपक्रम देसाई यांनी 'पक्का पाया पहिलीचा... जाणीव पहिला आकार देताना' हा नवोपक्रम सादर केला होता. सदर उपक्रमास गत वर्षी शासन पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे. कोरोना काळात इयत्ता १ ली वर्गतयारीसाठी राबविलेला उपयुक्त नवोपक्रम दिशादर्शक आहे.

देसाई यांच्या या नवोपक्रमा सोबतच इतर ४ शैक्षणिक नवोपक्रमांना राज्यस्तरीय शासन पुरस्कार यापूर्वी मिळाले आहेत. विविध शैक्षणिक प्रयोग व उपक्रमामुळे भुदरगड तालुक्यातील दुर्गम भागातील 'बशाचामोळा' ही शाळा राज्यासाठी आदर्श ठरत आहे. या शाळेला शिक्षक, शाळा समिती, अधिकारी तसेच शिक्षणतज्ज्ञ यांनी शाळेस भेटी दिल्या आहेत. या उपक्रमाचा राष्ट्रीय पातळीवर गौरव झाल्याने सर्वत्र अभिनंदन होत आहे.

सकाळ

शासकीय नवोपक्रम स्पर्धेत देसाई प्रथम



सचिन देसाई

कडगाव : भुदरगड तालुक्यातील बशाचामोळा विद्यामंदिरचे उपक्रमशील शिक्षक सचिन देसाई यांनी शासकीय नवोपक्रम स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला. प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक गटातून त्यांच्या उपक्रमाची राज्यस्तरावर निवड झाली. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या शैक्षणिक नवोपक्रम स्पर्धेसाठी 'पक्का पाया पहिलीचा ...जाणीव पहिला आकार देताना !' हा उपक्रम सादर केला. कोरोना काळात पहिलीसारख्या महत्त्वपूर्ण व पायाभूत वर्गातील विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देता यावे,यासाठी उपक्रमाची नियोजनपूर्वक व यशस्वीपणे अंमलबजावणी केली. शिक्षणाधिकारी आशा उबाळे, प्राचार्य आय. सी. शेख, रमेश कोरे, गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, विस्तार अधिकारी प्रबोध कांबळे, केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे यांचे सहकार्य लाभले.

Kolhapur Kolhapur-Today

सकाळ



पुणे : येथे पारितोषिक स्वीकारताना सचिन देसाई व अन्य मान्यवर.

नवोपक्रम स्पर्धेत देसाई राज्यात द्वितीय

कडगाव, ता. २६ : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यातर्फे घेतलेल्या नवोपक्रम स्पर्धेत विद्यामंदिर बशाचामोळा येथील शिक्षक सचिन कुंडलिक देसाई यांना द्वितीय क्रमांक मिळाला. विद्या परिषद, पुणे येथे समारंभ झाला. या वेळी संचालक कौस्तुभ दिवेगावकर, सहसंचालक रमाकांत काठमोरे, उपसंचालक डॉ. कमलादेवी आवटे, संशोधन विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय चिटे, समन्वयक अमोल शिनगारे उपस्थित होते.

सचिन देसाई यांनी नवोपक्रम स्पर्धेत राज्यस्तरावर सलग दुसऱ्या वर्षी यश मिळवले. इयत्ता दुसरी वर्गासाठी 'दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल..देऊ अधिकार प्रत्येक कळीस खुलण्याचा व फुलण्याचा' हा नवोपक्रम सादर केला. या उपक्रमांतर्गत पाठ्यक्रम व पाठ्यक्रमेत्तर आधारित १७ आनंददायी कृतींचा समावेश आहे. शिक्षक दिग्विजय कोटकर व शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य लाभले. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजयसिंह चव्हाण, शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर, आशा उबाळे, प्राचार्य आय. सी. शेख, नवोपक्रम विभागप्रमुख सरिता मोरे, गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, विस्ताराधिकारी प्रबोध कांबळे, केंद्रप्रमुख संजय कुकडे, आबासाहेब पसारे यांचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Kagal-Today
27/02/2023 Page No: 4



पुणे : येथे सचिन देसाई यांना फिरती शाळा नवोपक्रमासाठी सन्मानित करताना एम. डी. सिंह व उपसंचालक विकास गरड.

शासकीय नवोपक्रम स्पर्धेत सचिन देसाई यांचा राज्यात तृतीय क्रमांक

पाटगांव : पुणे येथील राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून यावर्षी आयोजित नवोपक्रम स्पर्धेचा अंतिम निकाल व पारितोषिक वितरण सोहळा नुकताच पुणे येथील महात्मा फुले सभागृह, एस. सी.इ.आर.टी.एम. येथे झाला. यामध्ये शिक्षक व मुख्याध्यापक गटामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील बशाचा मोळा येथील उपक्रमशील शिक्षक सचिन देसाई यांचा राज्यात तृतीय क्रमांक घोषित केला. पुरस्काराचे शील्ड व मानपत्र राज्याचे शिक्षण संचालक एम. डी. सिंह व उपसंचालक विकास गरड यांचे हस्ते त्यांना प्रदान करण्यात आले. सचिन देसाई यांनी शाळेतील पहिलीच्या मुलांच्या विशेष वर्गतयारीसाठी पक्का पाया पहिलीचा .....जाणीव पहिला आकार देताना !" हा उपक्रम राबवला. कोरोना काळातही नवीन आनंददायी शिक्षण पद्धतीची व्याख्या देणारा हा उपक्रम राज्यातील हजारो शाळासाठीही दिशादर्शक ठरला आहे. यातील उपयुक्तता व यशस्विता पाहून राज्यातील इतर शाळांतही याची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. पारितोषिक वितरण प्रसंगी सचिन देसाई यांनी मनोगत व्यक्त केले. सचिन देसाई हे राज्यस्तरीय तंत्रस्नेही शिक्षक म्हणून परिचित आहेत. त्यांची बशाचा मोळा शाळा एक आदर्श डिजिशिक्षकी शाळा रोल मॉडेल मानली जात आहे. या नवोपक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, शिक्षणाधिकारी आशा उबाळे, डायट प्राचार्य आय. सी. शेख, नवोपक्रम विभाग प्रमुख रमेश कोरे, विस्तार अधिकारी प्रबोध कांबळे, केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे, दिग्विजय कोटकर यांचे सचिन देसाई यांनी आभार मानले.

बशाचामोळा शाळा बनली स्मार्ट स्कूल

तालुक्यातील स्मार्टबोर्डयुक्त पहिलीच जिल्हा परिषदेची शाळा

कडगाव, ता. १८ : बशाचामोळा (ता. भुदरगड) येथील प्राथमिक शाळास्मार्ट स्कूल बनली आहे. मुंबई येथील रश्मीज् स्माइल ट्रस्टने शाळेस स्मार्ट बोर्ड (टचस्क्रीन बोर्ड), प्रोजेक्टर, संगणक संच व इतर उपयुक्त शैक्षणिक साहित्य दिले. स्मार्टबोर्ड सुविधा असणारी तालुक्यातील पहिलीच जिल्हा परिषदेची शाळा आहे.



बशाचामोळा : शाळेस भेटवस्तू देताना रश्मीज् स्माइल ट्रस्टचे सदस्य.

सध्या शाळा व शिक्षण स्मार्ट होत आहे. अनेक शाळांत डिजिटल स्मार्ट बोर्ड बसवले आहेत; पण याकरिता मोठ्या आर्थिक साहाय्याची आवश्यकता असते. भुदरगड तालुक्यात अद्याप कोणत्याही जिल्हा परिषद शाळेत अशी सुविधा नाही; परंतु बशाचामोळा येथे पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग आहेत. या शाळेत ही स्मार्ट बोर्ड सुविधा प्राप्त झाली. रश्मीज् स्माइल ट्रस्टतर्फेशाळेसाठी व मुलांसाठी नवीन दप्तरे, पुस्तके व इतर उपयुक्त साहित्य असे एक लाख वीस हजार किमतीचे साहित्य भेट दिले.

मुख्याध्यापक सचिन देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संभाजी पाटील, डॉ. भावना कुचेरिया, डॉ. सुहास कुचेरिया, भावना शहा, धरमशी पटेल, हिना पटेल, दीपा ठक्कर यांचे सहकार्य लाभले.

सरपंच निशा संकपाळ, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष विश्वनाथ पाटील, एकनाथ पाटील, आनंदा ढोकरे, संतोष पाटील, मारुती पोवार, पांडुरंग पाटील, व्ही. एम. पाटील, अक्षय पाटील आदी उपस्थित होते. दिग्विजय कोटकर यांनी आभार मानले.

दोन लाखांहून अधिक मदत

मुख्याध्यापक सचिन देसाई हे राज्यस्तरीय तंत्रस्नेही शिक्षक म्हणून परिचित आहेत. त्यांनी लॉकडाउन काळात केलेल्या कौतुकास्पद कार्याचा आदर्श राज्यभरातील शिक्षक घेत आहेत. देशभरातून अनेक शिक्षकांनी या शाळेस स्वेच्छेने दोन लाखांहून अधिक मदत पाठवली आहे.

रयतेचा कैवारी
डिजिटल शैक्षणिक दैनिक

रयतेचा कैवारी



संपादक - शाहू संभाजी भारती (डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' - वर्ष तिसरे - अंक २५८) सोमवार दि.२५/०७/२०२२ पान ०३

बशाचामोळा शाळेस जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार

कोल्हापूर दि.२४ (रयतेचा कैवारी प्रतिनिधी) भारत सरकारच्या स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय अभियान अंतर्गत या वर्षी घेण्यात आलेल्या स्वच्छ विद्यालय पुरस्कार स्पर्धेमधील कोल्हापूर मधील जिल्हास्तरावर सुयश प्राप्त केलेल्या शाळांचा गौरव सोहळा नुकताच शाहू स्मारक, कोल्हापूर याठिकाणी पार पडला. जिल्हा परिषदेचे सीईओ संजयसिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात पुरस्कार प्राप्त व फाइव्ह स्टार असणाऱ्या ८९ शाळांना सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. या वेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी आशा उबाळे, डायट प्राचार्य आय सी शेख आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बशाचामोळा शाळेस सदर पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.



असा पुरस्कार मिळवणारी फाइव्ह स्टार सह ही तालुक्यातील एकमेव शाळा ठरली आहे. लोकसहभागातून सर्व आवश्यक भौतिक आणि मूलभूत सुविधा पूर्ण करत या ग्रामीण भागातील शाळेने अल्पकाळात विकासाचे एक प्रेरणादायी उदाहरण राज्यसमोर सातत्याने सर्वासमोर ठेवले आहे.

सदर यशामुळे एकप्रकारे शाळेच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिमिरातूनी तेजाकडे जाणाऱ्या या प्रवासात या यशाने जणू वाटचाल आणखी प्रकाशमय झाल्याचे चित्र एकप्रकारे निर्माण झाले. सदर पुरस्कार स्विकारण्यासाठी शाळेचे शिक्षक सचिन देसाई, दिग्विजय कोटकर तसेच शाळा व्यवस्थापन समिती प्रतिनिधी विश्वनाथ पाटील, संतोष पाटील व शिवाजी संकपाळ हजर होते. या यशासाठी गटशिक्षणाधिकारी दीपक भेंगाणे तथा प्रबोध कांबळे व आबासाहेब पसारे यांचे मार्गदर्शन मिळाले. शाळेचा कायपालट करण्यास सहकार्य करणाऱ्या सर्व शक्तींचे शाळेकडून यनिमित्ताने आभार व्यक्त करण्यात आले. ग्रामीण भागातील या शाळेच्या या नेत्रदीपक कामगिरी बद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

@ संपादक - शाहू संभाजी भारती (डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' - वर्ष तिसरे - अंक १२५) सोमवार दि.०७/०२/२०२२ पान ०७



आनंददायी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी 'बशाचामोळा' शाळेचा 'स्टडी टेबल' चा नाविन्यपूर्ण उपक्रम

भुदरगड / कोल्हापूर : दि.०६ (रयतेचा कैवारी प्रतिनिधी मारुती वरपे) लोकसहभागातून वैशिष्टपूर्ण व उपयुक्त 'स्टडी टेबल' ची १००% विद्यार्थ्यांना सुविधा देणारी भुदरगड तालुक्यातील बशाचामोळा ही अशी पहिलीच शाळा मा.अशोक गोविंद भुतल (बशाचामोळा,ता.भुदरगड) यांचेकडून पिताश्री कै. गोविंद भुतल यांचे स्मरणार्थ २० स्टडी टेबल व मा.डॉ. प्रकाश दत्तू पाटील (शेळप ता.आजरा) यांचेकडून मातोश्री कै यशोदा द. पाटील यांचे स्मरणार्थ १० स्टडी टेबल असे एकूण ३० स्टडीटेबल शाळेस भेट स्वरुपात देण्यात आले आहेत. शिक्षण विभाग,पं.स.भुदरगडच्या 'माझा वर्ग माझी ओळख' या गुणवत्तापुरक उपक्रमातील सर्वोत्कृष्ट उदाहरण वा फलित समजल्या जाणाऱ्या 'बशाचामोळा' शाळा विकास पर्वात समाविष्ट होतोय. हा नवीन अभ्यासपुरक अभिनव उपक्रम. राज्यस्तरासाठी निवड झालेल्या 'पक्का पाया पहिलीचा..' या नवोपक्रमासाठी लाभदायक ठरणारी एक आदर्शवत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

क्लासरुम झाली आणखी आयडियल, जेव्हा भेट मिळाले स्टडी टेबल !

ते आले... त्यांनी पाहिले आणि त्यांनी दिले !असाच काहीसा अनुभव या प्रसंगातून आला.अगदी काही दिवसापूर्वीच घडलेला हा किस्सा... मा.अशोक गोविंद भुतल हे मुळचे बशाचामोळा या गावातीलच.. याच शाळेत शिकलेले पण सध्या नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने मुंबई येथे स्थायिक असणारे एक प्रतिष्ठित नागरिक. मुंबई सारख्या गजबलेल्या शहरात स्वतःचे प्रचंड नेटवर्क निर्माण केलेले तरीही जमिनीवर पाय असणारे व्यक्तित्व. कामाच्या व्यापातून फारतर वर्षातून..दोनवर्षातून एखादी गावाकडे फेरी. मागील महिन्यात ते दोन वर्षांनी गावी आले होते. गावात फेरफेटका मारताना आपल्या मातृशाळेचा झालेला जीर्णोद्धार पाहून त्यांना मनोमन समाधान वाटले. शाळेत कार्यरत असणारे शिक्षक श्री. सचिन देसाई व श्री.दिग्विजय कोटकर यांना देखील शाळेच्या प्रगती बद्दल धन्यवाद देऊन मुलांच्या शिक्षणासाठी काही आवश्यक असल्यास त्यासाठी सहकार्य करण्याचे मान्य केले. यावेळी त्यांना हे आधुनिक पद्धतीचे स्टडी टेबल आवश्यक असल्याचे सूचित केले आणि तात्काळ त्यांनी त्याची पूर्तता केली. या त्याच्या लोकसहभागात त्यांचे जवळचे मित्र व सामाजिक कार्यकर्ते मा.डॉ. प्रकाश पाटील यांनीही आपल्या आई यशोदा हिच्या स्मरणार्थ आणखी १० स्टडी टेबल दिले. दि. २६ जानेवारी २०२२ रोजी प्रजासत्ताक दिनी या शैक्षणिक सुविधेचे उद्घाटन करण्यात आले.



मा. अशोक गोविंद भुतल यांचेकडून वडिलांच्या स्मरणार्थ शाळेस स्टडी टेबल भेट !

या स्टडी टेबल ची विशेष उपयुक्तता.

वाचन लेखन यासाठी चांगला आधार मिळतो.वरील बाजू ग्रीनबोर्ड सुविधायुक्त असल्यामुळे त्यावर लिहता येते वही व कागद याची एकप्रकारे बचत होते. मुलांना योग्य आसन स्थितीत बसण्याचीही सवय लागते.सराव चाचणी व परीक्षा प्रसंगी पॅड म्हणूनही सुलभतेने वापर करता येतो.कला, मराठी व गणित या विषयासाठी अतिशय उपयुक्त साधन. डेस्क वरील सपोर्ट ग्रीन बोर्ड प्लेट ची उंची हवी तशी अड़जस्ट करता येते. हा स्टडी टेबल फोल्ड करुन ठेवता येतो त्यामुळे वर्गखोलीत जागेचा अडसर होत नाही. लहान वयोगट साठी हवी तशी वर्गरचना करता येते.

लोकसहभागाचे अनोखे प्रेरणादायी उदाहरण राज्यसमोर ठेवणाऱ्या बशाचामोळा शाळेने तिमिराकडून तेजाकडे शैक्षणिक प्रवास करताना गुणवत्तापूरक सुविधा निर्मितीचे आणखी एक आदर्श सर्वासमोर ठेवला आहे. नक्कीच असा उपक्रम इतर शाळांना अनुकरणीय आहे. भारतीय बैठक मध्ये असे घेतलेले शिक्षण मुलांच्यासाठी नक्कीच रंजक ठरेल यात शंका नाही.

बशाचा मोळा शाळेस सॅनिटायजर स्प्रे मशीन भेट


वार्ताहर

पाटगाव

भुदरगडच्या नुतन सभापती आक्काताई प्रविण नलवडे यांनी आपल्या स्वनिधीचा वापर करून शाळेतील मुलांच्या सुरक्षिततेसाठी वेगळा आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी डिजीटल सॅनिटायजर स्प्रे मशीन विद्या मंदिर बशाचामोळा यांच्यासह तालुक्यातील ४० शाळांना आपल्या निधीतून पुरवली आहे.

अतिशय उत्कृष्ट दर्जाच्या सुविधा यामध्ये उपलब्ध आहेत. मशीनजवळ केवळ हात धरताच ऑटोमेटिक हात सॅनिटायजरने क्लिन होतात. शिवाय शरीराचे तापमानही सहज समजते. चार्जिंग बॅटरीची अंतर्गत सोय असलेने ४८ तास याचा बॅकअप राहतो. शिवाय याचा हैण्डवाश मशीन म्हणूनही वापर करता येतो. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असे साधन आहे.

शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला सभापती



पाटगाव : विद्या मंदिर बशाचा मोळायेथे सॅनिटायझर स्प्रे मशीन देताना सभापती सौ. आक्काताई नलवडे व इतर.

नलवडे यांनी विद्या मंदिर बशाचामोळा या लोकसहभागातून उत्कृष्ट कार्य केलेल्या शाळेस प्रत्यक्ष भेट देऊन सदर साहित्य प्रदान केले. या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांच्याकडून आक्काताई नलवडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नलवडे यांनी शाळेचे काम कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

स्वागत व प्रास्ताविक शाळेचे मुख्याद्यापक सचिन देसाई यांनी केले. या कार्यक्रमास प्रविण नलवडे, सरपंच निशा संकपाळ, शिवाजी संकपाळ, आनंदा ढोकरे, विश्वनाथ पाटील, संतोष पाटील, पांडुरंग पाटील, संतोष संकपाळ, अनिल अमृते यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. आभार दिग्विजय कोटकर यांनी मानले.

सकाळ

बशाचामोळा शाळेत डिजिटल वर्गाचे उद्‌घाटन

कडगाव, ता. १७ : भुदरगड तालुक्यातील बशाचामोळा प्राथमिक शाळेतील विध्यार्थ्यांकरिता ६५ हजार किमतीचे शैक्षणिक टॅब माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांनी दिले. बशाचामोळा येथे डॉ. बी. डी. पाटील यांनी वडिलांच्या स्मरणार्थ ४ लाख रुपये खर्चून बांधलेल्या डिजिटल इमारतीच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, बिपीन ग्रुपचे अध्यक्ष बी. डी. पाटील, डॉ. अनिता आंबोकर प्रमुख उपस्थित होते.

शिक्षणाधिकारी आंबोकर म्हणाले, की बशाचामोळा शाळेला देण्याची इच्छा होती. ग्रामीण भागातील शाळेने आनंददायी शिक्षणातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यावर भर दिल्याने आदर्शवत शाळा उदयास आली आहे. गटशिक्षणाधिकारी मेंगाणे म्हणाले, की प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी मदत करणं हे एक दुर्मिळ उदाहरण आहे. ग्रामीण भागातील डिशिक्षकी शाळेचा प्रवास सर्वांना दिशादर्शक आहे. केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे, सरपंच निशा संकपाळ, मुख्याध्यापक संतोष भोसले, प्रकाश पाटील, विश्वनाथ पाटील, पूनम पाटील, संतोष पाटील, एकनाथ पाटील, बी. ए. पाटील. बी. एस. पाटील, नवनीत नाईक, अरविंद पाटील, सुवर्णा भुतल, विनायक चौगले, महादेव देसाई, शशिकांत पाटील, दत्तात्रय रेपे, जयदीप डाकरे आदी उपस्थित होते. तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांनी सुंदर गीतमंच कार्यक्रम सादर केला. मुख्याध्यापक सचिन देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राजू शिंदे यांनी सूत्रसंचलन केले. दिग्वीजय कोटकर यांनी आभार मानले.

वडील कै. दत्तात्रय आबा पाटील यांना प्राथमिक शिक्षणाबद्दल खूप प्रेम होते. माझे प्राथमिक शिक्षण याच गावात झाले. गावातील शाळेसाठी काहीतरी करण्याची इच्छा होती. शाळेची गरज ओळखून आय.सी.टी. केंद्र उभारल्याचे बिपीन ग्रुपचे अध्यक्ष डॉ. पाटील यांनी सांगितले.



बशाचामोळा : येथील शाळेत डिजिटल वर्गाच्या उद्‌घाटनप्रसंगी शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर डॉ. बी. डी. पाटील व अन्य मान्यवर

Kolhapur, Kagal-Today
18/05/2022 Page No. 4



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार स्वीकारताना अध्यापक सचिन देसाई व इतर मान्यवर.

सचिन देसाई यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार

पाटगाव : महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागातर्फे दिला जाणारा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार जिल्ह्यातून प्राथमिक शिक्षक गटातून विद्या मंदिर बशाचामोळा (ता भुदरगड) शाळेचे उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षक सचिन देसाई यांची निवड झाली आहे. सदर बक्षीस वितरण सोहळा मुंबई येथे पार पडला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिक्षक दिना दिवशी देण्यात आलेल्या पुरस्कार प्राप्त शिक्षकांना एक लाख दहा हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. कोल्हापूर जिल्ह्यातून प्राथमिक शिक्षक गटातून निवड झालेले सचिन देसाई हे सध्या भुदरगड तालुक्यातील बशाचामोळा येथे कार्यरत आहेत. त्यांनी सुरुवातीच्या काळात सातारा जिल्हा परिषदेत व मागील पाच वर्षात कोल्हापूर जिल्हा परिषदेत अशी जवळपास १७ वर्षे सेवा केली आहे. त्यांच्या नवोपक्रमास एक राष्ट्रीयस्तर तर चार वेळा राज्यस्तरीय पारितोषिकही मिळाले आहे. स्वच्छ विद्यालय पुरस्कार, परसबाग निर्मिती स्पर्धा, प्रज्ञाशोध परीक्षा आदी शासकीय सर्व स्पर्धांमध्ये शाळा केवळ जिल्ह्यात नव्हे तर राज्यातही अग्रेसर राहिली आहे. त्यांच्या या यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर, मीना शेंडकर गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, विस्तार अधिकारी प्रबोध कांबळे, उत्तम पाटील, केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे व संजय कुकडे शाळेचे शाळा समिती चे अध्यक्ष दत्तात्रय संकपाळ, उपाध्यक्ष पांडुरंग पाटील व शिक्षक दिग्वीजय कोटकर व ग्रामस्थानी अभिनंदन केले आहे.



विद्या मंदिर बशाचामोळा शाळेत डिजिटल वर्गाच्या उद्‌घाटन प्रसंगी एकनाथ अंबोकर सोबत डॉ. बी. डी. पाटील व इतर मान्यवर

'बशाचा मोळा' जि. प. शाळा नावारूपाला आली

- माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर

वार्ताहर
पाटगांव

तालुक्याच्या एका टोकाला असलेली भुदरगड तालुक्यातील बशाचामोळा जि.प. प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवत नावारूपाला आणली असल्याचे मत माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांनी व्यक्त केले

डॉ.बी.डी.पाटील यांनी वडिलांच्या स्मरणार्थ सुमारे ४ लाख रूपये खर्चुन बांधलेल्या डिजिटल इमारतीच्या उद्‌घाटन प्रसंगी माध्यमिक शिक्षणाधिकारी आंबोकर बोलत होते. प्रमुख उपस्थित सौ. अनिता आंबोकर, गटशिक्षणाधिकारी दिपक मेंगाणे बिपिन ग्रुपचे अध्यक्ष बी डी पाटील होते

गटशिक्षणाधिकारी दिपक मेंगाणे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरत शाळा गुणवत्तावाढीत झेप घेण्यासाठी सरसावली शाळेला नवा आयाम देण्याचा ध्यास घेतला आहे. एका ग्रामीण भागातील डिशिक्षकी शाळेचा प्रवास सर्वांना दिशादर्शक असून.डिजिटल, शैक्षणिक साहित्याचा वापर, शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी, वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग राबवत भावी पिढी सक्षम करण्यासाठी शाळेने पुढाकार घेत शाळा नावारूपाला आणली असल्याचे सांगितले

कार्यक्रम प्रसंगी. माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांच्याकडूनही शाळेसाठी ६३ हजार किमतीचे टॅबलेट विद्यार्थ्यांना भेट दिल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समिती मार्फत सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक सचिन देसाई यांनी केले. कार्यक्रमास केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे, सरपंच सौ निशा संकपाळ, विश्वनाथ पाटील,सौ. पुनम पाटील, केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे, संतोष पाटील एकनाथ पाटील, बी.एस. पाटील, नवनीत नाईक, अरविंद पाटील, सुवर्णा भुतल, विनायक चौगले, यांच्यासह तालुक्यातील अनेक शिक्षक, व ग्रामस्थ उपस्थित होते. राजू शिंदे यांनी सूत्रसंचलन केले दिग्वीजय कोटकर यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

पुण्य नगरी

नवोपक्रम स्पर्धेत देसाई प्रथम

पाटगाव : वार्ताहर

विद्यामंदिर बशाचामोळा, ता. भुदरगड या शाळेचे उपक्रमशील शिक्षक सचिन देसाई यांनी या वर्षीच्या शासकीय नवोपक्रम स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्यातून प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक गटात प्रथम क्रमांक पटकावला असून, त्यांची राज्यस्तर फेरीमध्ये निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र शासन पुणे आयोजित राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी त्यांनी 'पक्का पाया पहिलीचा ... जाणीव पहिला आकार देताना!' हा शाळेत घेतलेला उपक्रम सादर केला होता.

कोरोना काळातही इयत्ता पहिलीसारख्या महत्त्वपूर्ण व पायाभूत कक्षेतील विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देता यावे, यासाठी या उपक्रमाची यशस्वीपणे अंमलबजावणी या शैक्षणिक सत्रात केली आहे, असे देसाई यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी त्यांना शिक्षणाधिकारी आशा उबाळे, प्राचार्य आय. सी. शेख, नवोपक्रम विभागप्रमुख रमेश कोरे, गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, विस्तार अधिकारी प्रबोध कांबळे, केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे यांचे मार्गदर्शन व सहकारी दिग्विजय कोटकर यांचे सहकार्य लाभले.

बशाचामोळा वि.मं.चे. शिक्षक सचिन देसाई यांना शरद पवार इन्स्पायर फेलोशिप प्रदान



गारगोटी/महान कार्य वृत्तसेवा :

शिक्षण, साहित्य आणि कृषी क्षेत्रामधील गुणवंतांना भविष्यकाळातील नेतृत्वासाठी प्रेरित करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या नावे 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप' दिली जाते. यामध्ये मूळचे मिणचे खुर्द (ता. भुदरगड) येथील रहिवासी असणारे व सध्या विद्या मंदिर बशाचामोळा (ता. भुदरगड) येथे कार्यरत असणारे उपक्रमशील शिक्षक सचिन कुंडलिक देसाई यांची शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन करिता कोल्हापूर जिल्ह्यातून प्राथमिक विभागातून एकमेव निवड झाल्याने भुदरगड प्राथमिक शिक्षणाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. यानिमित्ताने तालुक्यातील प्राथमिक शिक्षण व शिक्षकांची सर्वांगीण गुणवत्ता अधोरेखित झाली असून जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात भुदरगडचा दबदबा निर्माण झाला आहे. हा फेलोशिप प्रदान सोहळा यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे खासदार शरद पवार, खासदार सुप्रियाताई सुळे, डॉ. सी.डी. मायी, वसंत काळपांडे यांच्यासह प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत नुकताच पार पडला.

सचिन देसाई यांची फेलोशिपसाठी निवड झालेबद्दल शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर, आशा उबाळे, गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, विस्तार अधिकारी प्रबोध कांबळे, केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे, संजय कुकडे यांनी अभिनंदन केले आहे.



रयतेचा कैवारी



संपादक : शाहू संभाजी भारती (दैनिक रयतेचा कैवारी, वर्ष चौथे, अंक ०५१, एकूण अंक १०२६) सोमवार दि.२८/११/२०२२ पान १०

दूसरे पाऊल, आनंदी शिक्षणाची चाहूल !!

- इयत्ता २ री विशेष नवोपक्रम

सर्वांगीण विकास साधणारा नवोपक्रम



इयत्ता १ ली ही कक्षा जर शिक्षणामधील पहिले महत्वपूर्ण पाऊल असेल तर इयत्ता २ री कक्षा देखील नक्कीच दुसरे महत्वपूर्ण असे पाऊल असल्याची जाणीव प्रत्येक शिक्षकाला असायलाच हवी. पहिलीमध्ये दाखल झालेल्या मुलाचा 'शैक्षणिक पाया मजबूत करणे' हे मुख्य उद्दिष्ट राहते आणि तेच मूल दुसरीच्या वर्गात प्रवेश केल्यावर त्याला बोध झालेल्या त्या सर्व क्षमता व कौशल्ये दृढ होणे खूप आवश्यक असते. शिवाय हा अध्ययन प्रवास आनंददायी व शिक्षणाची गोडी वाढणारा असणे खूप आवश्यक आहे. 'शिकणे' हा मुलाचा जितका नैतिक अधिकार आहे तितकेच ते शिक्षण आनंददायी करणे, मुलांना शिकण्यात आवड निर्माण करणे म्हणूनच त्यास अनुकूल वातावरण तयार करणे हे आपले शैक्षणिक कर्तव्य आहे.

या दुसऱ्या महत्वपूर्ण टप्प्यात मुलांच्यात किमान अध्ययन क्षमता प्राप्ती बरोबरच मुलांच्यामध्ये ज्ञान शोधण्याची वृत्ती, आत्मविश्वास, मुल्याशिक्षण यासह जीवनकौशल्याचेही पायाभूत व प्राथमिक ज्ञान यांचे संक्रमण होणे खूप आवश्यक आहे. दुसरीच्या वर्गात आलेले मूल वाचायला शिकलेले असते पण योग्य गतीत व योग्य आरोह-अवरोहसह, आत्मविश्वासपूर्वक वाचता येणे, योग्य गतीत वाचता येणे आता आवश्यक असते.

मूल लिहायला शिकले असते पण हे लेखन सुलेखन असणे, शुद्ध व प्रमाणबद्ध लिहायला शिकणे या टप्प्यात गरजेचे असते. याशिवाय हे मूल बोलायला, विचार व्यक्त करायला शिकले असते पण हे विचार आत्मविश्वासपूर्वक मांडणे, प्रत्येक गोष्टीमागील कारणांचा स्वतःहून शोध घेणे आदी गुणांचा विकास होणे खूप आवश्यक असते. सर्वात महत्वाचे म्हणजे बालकाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण याच काळात होत असल्याने मुलांच्या मनावर चांगल्या विचारांचा प्रभाव टाकणे, मुलांच्यात सुसंस्कार रुजतील असे वातावरण निर्माण करणे आवश्यक ठरते.

एकप्रकारे मुलाच्या शिक्षणप्रवासातील या दुसऱ्या कक्षेत एका आनंदी वातावरणात मुलांचा सर्वांगीण विकास साधण्याचा विशेष प्रयत्न करणे पुढील शैक्षणिक वाटचालीच्या दृष्टीने अत्यावशक ठरते. याच विचारप्रणालीमधून या सर्व गोष्टींची साध्यता सुयोग्य वातावरण करुन देणारा नवोपक्रम म्हणजे 'दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल'.

विद्यार्थी जडणघडणीच्या अर्थात आकार देण्याच्या काळात मुलांच्यात अपेक्षित वर्तनबदल या नवोपक्रमामुळे साध्य करता आला. सर्वात महत्वाचे म्हणजे, हे सर्व मुलांना एका विशिष्ट आनंदी वातावरणात देऊ शकतो, मुले आनंदात सर्व गोष्टी साध्य करू शकतात. शिक्षणातून मिळणारा आनंद हा नवीन शिक्षण घेण्यास रुची वाढवणारा व अध्ययन प्रक्रिया सहज सुलभपणे होण्यास साह्यभूत ठरते, हे मी नवोपक्रमाच्या अनुभवातून साध्य केले आहे. या उपक्रमांतर्गत सुंदर माझे अक्षर, माझी शब्दबाग, गोष्टी गणिताच्या, टच टू ग्लोबल वर्ल्ड, शाळा भरली बाधावार, मॅजिक कार्ड्स, फॉउंडेशनल कोर्सेस, लिटल रिपोर्टर, शिक्का शाब्बासकीचा, प्लास्टिकमुक्त रविवार आदी.

विद्यार्थी उपयुक्त उपक्रम राज्यभरात अनुकरणीय ठरत आहेत. या उपक्रमांतर्गत घेतलेल्या सरप्राइज टेस्टचा लाभही राज्यातील हजारो शाळांनी घेतला आहे.

अशाप्रकारे प्रारंभिक स्तरावर असताना मुलांच्यामध्ये अपेक्षित असणारी शैक्षणिक, बौद्धिक, भावनिक सामिजिक उद्दिष्टे साध्य करण्याचा दृष्टीने योग्य वातावरणात पायाभरणी करण्याचे कार्य या नवोपक्रमामुळे प्रत्येक बालकात साध्य होते. २१ व्या शतकातील आव्हांनाना सामोरे जाणाऱ्या या भावी पिढीला तंत्रज्ञानाची कास धरण्याची व भविष्याचा वेध घेण्याच्या विचारप्रणालीचे एक प्रकारे बीजारोपण घालण्याचे काम या नवोपक्रमातून साध्य होऊ शकले. सर्वांच्यासाठी दिशादर्शक आणि अनुकरणीय असा हा नवोपक्रम बालकाचा सर्वांगीण विकास साधताना त्याला परिसराची जाणीव, मुलभूत जीवनकौशल्याची ओळख व मनावर सुसंकार बिंबवण्याचे कार्य या नवोपक्रमामधून सहजपणे साध्य झाले. पालक व समाज यांच्या सहकार्यातून यशस्वी ठरत असलेला नवोपक्रम म्हणजे एकप्रकारे शिक्षणरुपी बागेतील त्या सर्व कळ्यांना फुलण्यास व खुलण्यास आल्हाददायक वातावरण निर्माण करुन देणारा आहे.

श्री. सचिन देसाई
वि.मं.बशाचामोळा
(राज्यस्तरीय नवोपक्रम पुरस्कारप्राप्त शिक्षक)

वाचन ते परीक्षण

शाळेचे नाव – जिल्हा परिषद प्रशाला, भादा ता.औसा जि.लातूर

मुख्याध्यापकाचे नाव – श्री. अनंतवार रमेश

सहशिक्षक - श्रीमती खडके अनिता मारोती


प्रास्ताविक -

माध्यमिक शिक्षण घेत असतानाचा वयोगट म्हणजे वादळी अशांततेचा काळ होय. सरती बाल्यावस्था आणि उभरती किशोरावस्था अशा संक्रमणाच्या या काळात शरीरात, मनात असंख्य बदल होत असतात. 'स्व'ची जाणिव सुरु होते. स्वतःची मते तयार होवू लागलेली असतात. इथेच चांगले विचार पेरणे गरजेचे असते. कारण माहितीच्या विस्फोटाचे आजचे युग मुलांना ज्ञान घरबसल्या देते. परिसरातून, समाजातून, वेगवेगळ्या मिडीयाकडूनमूल शिकते. त्याचे निरीक्षण जितके जास्त, अनुभव जितके समृद्ध तितका त्याचा सर्वांगीण विकास अधिक होतो.

आयुष्यातला अविस्मरणीय व आनंददायी कालखंड म्हणजे माध्यमिक शिक्षण घेतानाचा काळ, कारण मुलाचे स्वच्छंदी जगणे इथेच सुरु होते. जडणघडणीची भावी आयुष्याच्या पायाभरणीची इथेच पेरणी होते आणि इथेच त्यांना अभंगातून तुकोबा शिकवतात तर, ओव्यामधून ज्ञानोबा माऊली ! एवढेच नव्हे तर, स्वातंत्र्य यज्ञात आहुती देणारे वीर राष्ट्रप्रेमाच्या ज्वाला इथेच पेरल्या जातात. अन् विज्ञाननिष्ठ मनावर कलाम महासत्तेचे स्वप्न कोरतात. मैत्री साकारायला लागते ती इथेच संवेदना जाग्या होतात त्याही इथेच. सगळ्याच नीती मूल्यांचे बीजारोपण होते आणि ध्येय अंकुरायला लागते.

याच वयात मुलांमधील अफाट उर्जा चांगल्या कामी वापरली तर, ठीक नाही तर स्फोट हा अटळच असतो ! कारण फिल्मी दुनियेची आसक्ती, मिडीयाचा वाढता प्रभाव, निखळ मैत्रीचे वेड, व्यसनाधिनता, प्रसार माध्यमांची भूरळ, विरुद्धलिंगी आकर्षण, शरीर व मनात होणारे बदल, काहीतरी करून दाखविण्याची जिगीषा आणि स्वतःचे खरे म्हणण्याची प्रकृती. तोल ढासाळण्यालाही कारणीभूत ठरू शकते.म्हणूनचमी तो" वाचन ते समीक्षण" हा उपक्रम हाती घेवून सावरण्याचा प्रयत्न केला आहे.

मुलांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी, वाचनाची लागावी, अवांतर वाचनाने मुलांचे भवितव्य सुधारावे व त्याचा रिकामा वेळ सत्कारणी लागावा. समाजात भक्कमपणे जगण्यासाठी उभे रहाता यावे. आज जे - जे काही विद्यार्थ्यांकडून वाचले जाते त्यात ते केवळ पाठ्यपुस्तकातील धडे वाचतात. शिक्षक हा अभ्यासक्रमामध्ये व विद्यार्थी हा परीक्षेमध्ये गुंग असतो पण परीक्षेच्या बाहेर जावून जेव्हा तो वाचतो तेव्हाच त्याचा उपयोजित लेखनाचा प्रश्न आपोआप सुटतो. जेवण जसे चौरस असावे तसे वाचन देखील चौफेर असावे. मुलांना शालेय जीवनातच वाचनाची गोडी कशी निर्माण करता येईल याचे मार्ग दाखविले पाहीजेत. कारण वाचाल तर वाचाल, ग्रंथ हेच गुरु, पुस्तक मस्तक घडवतात. अखंडीत वाचीत जावे. अशी अनेक वाक्य आपल्या कानावर येतात पण कोण लक्षात घेतो ? मोबाईल इंटरनेटच्या जगात वाचनाकडे दुर्लक्ष झाले का? नसेल तर, वाचनाचा खजिना आजच्या विद्यार्थींना




कसा उपलब्ध करून देता येईल त्यासाठी मी सुरुवातीला वर्गापुरता हा उपक्रम राबवला आहे. याच उपक्रमाला शाळेने संपूर्ण वर्गासाठी राबवला. तो डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम वाचन समृद्धी उपक्रम गेल्या दोन वर्षापासून राबविण्यात येत आहे.

अभ्यासाचे प्रमुख साधन म्हणजे वाचन होय.वाचन हा ज्ञानप्राप्तीचा सहज सोपान आहे. थोरपुरुषांची विद्वानांची चरित्रे, आत्मचरित्रे याचे वाचन केल्याने व्यक्तीचे व्यक्तीमत्व खुलते वाचनाने अभ्यासास गती प्राप्त होते वक्तृत्वकलाही विकसीत होते. म्हणूनच अवांतरवाचनाची सवय लहान वयातच लागली पाहीजेत. कारण वाचनाने संपूर्ण जगाची माहिती प्राप्त होते. संघर्ष करण्यासाठी सक्षम बनविते, अंधश्रद्धेपासून सावध करते, वाचनाने वैयक्तीक जीवनही समृद्ध होते. म्हणूनच लहान वयातच मुलांचे पुस्तकांशी नाते घट्ट व्हावे म्हणून एक अभिनव उपक्रम मी माझ्या प्रथमतः वर्गापुरता राबवला. तो सर्वाना इतका आवडला की, आता तो सर्व शाळेने राबविला आहे. कारण वाचनानेच माणूस मोठा होतो समृद्ध व विचारशील बनतो. एक साहित्यीक नवीन वाचक वर्ग तयार होतो. तर हा संस्कार मुलांवरती रुजवला तो असा. 10.00 वाजता भरणारी शाळा 9.00 वाजता भरू लागली शाळेच्या वेळेव्यतिरीक्त वेळ देवून अवांतर ग्रंथालय विद्यार्थाच्या दारी असेच जणू म्हणावे लागेल. हजारो पुस्तके वाचनाची, हाताळण्याची, कुतूहल जागे होवून झपाटल्या गत हातात पडलेले पुस्तक वाचलेच पाहीजे ही जिज्ञासा पेरणारा हा उपक्रम ठरल्यानेच विद्यार्थ्यांमध्ये साहित्यांची आवड निर्माण झाली. मुले ही काहीतरी वाचून लिहिण्याच्या प्रयत्न करू लागली.


शेकडो कवी कथाकार साहित्यीक जन्माला आले.


टाईम टेबल -



वाचनाची गोडी लागावी, पुस्तकाशी नाते जडावे म्हणूनच एका ध्येयाने प्रेरीत होऊन हा उपक्रम राबवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात," वाचन हा माझा श्वास आहे". तसेच माझ्या शाळेचा"वाचन ते समीक्षण" हा उपक्रम आत्मा आहे. कारण वाचन म्हणजेच अनेक कौशल्याचा मेळ असतो ती एक कला आहे. असे इमर्सन म्हणतात आणि फ्रान्सीस बेकन हे असे म्हणतात"reading makes a man perfect" आणि आम्ही म्हणतो वाचनानेच बुद्धीची भूक भागविली जाते.





कालावधी -

मार्च ते जानेवारी - कार्यवाहीचे टप्पे -

1) मार्च - एप्रिल - ग्रंथालय पुस्तक निवडणे
2) एप्रिल - मे - ग्रंथालय टाईम टेबल
3) मे - जून -मुलांना पुस्तकाचे वितरण व घरी वाचण्यासाठी देणे
4) जुलै - ऑगष्ट - ज्यादा तासिकेचे नियोजन
5) ऑगष्ट -सप्टेंबर - वाचन ते समीक्षणे लिहीणे
6) सप्टेंबर -ऑक्टोबर – समीक्षणे लेखन - कथा कविता
7) ऑक्टोंबर -नोहेंबर - निबंध, वक्तृत्व, अभिनय, स्पर्धेत सहभाग
8) डिसेंबर-जानेवारी – हस्तलिखिते, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग
9) जानेवारी फेब्रुवारी – सहशालेय उपक्रम तसेच शालेय गुणवत्ता वाढविणे



पुण्य नगरी

भादा शाळेतील वादविवाद स्पर्धेत विद्यार्थ्यांचा शाब्दिक प्रहार

भादा : पैसा श्रेष्ठ की विद्या श्रेष्ठ या विषयावर भादा जिल्हा परिषद शाळेत झालेल्या वादविवाद स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अनेक उदाहरणांचा दाखला देत सामाजिक व्यवस्थेवर शाब्दिक प्रहार केला. या आधुनिक युगात पैशाला इतके महत्त्व प्राप्त झाले आहे की पैशाशिवाय माणूस नाही, माणुसकी सुध्या नाही आणि त्यामुळे माणसांत माणूस नाही अशी वस्तुस्थिती झाली आहे ही खंत विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली.

आम्ही वक्ते आणि आम्हीच श्रोते या उपक्रमांतर्गत आयोजित वादविवाद स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यावेळी ज्ञान श्रेष्ठ की धन श्रेष्ठ या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा झाली. यात पायल पठाण, श्रेया कांबळे आणि आरती विभूते यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. या विषयावर आपल्या वक्तृत्वाची गुंफन करताना विद्यार्थ्यांनी ... अर्थातच पैसा कसा श्रेष्ठ यावर विविध उदाहरणे देऊन आपले मत मांडले.

पैसे से बडी कोई चीज नहीं होती.. इसे तोड़ो मरोडो, गंदा करो या मैला करो फिर भी जिंदा है क्योंकि भाई यह पैसा है.. इस दुनिया में जैसे धरती, आग, हवा, पाणी और आकाश है वैसे ही पैसा एक तत्व बन गया है और जो पंचभुतो से भी बडा बन गया है क्योंकि.. भाई यह पैसा है असा शब्दात त्यांनी पैशाचे श्रेष्ठत्व सिद्ध केले. या विषयावर उदाहरण म्हणून त्यांनी अकबर आणि बिरबल यांचे उदाहरण दिले.

परीक्षक म्हणून रमेश अनंतवार यांनी काम पाहिले तर याचे आयोजन शिक्षिका अनिता खडके यांनी केले होते.

Latur Edition
Jan 16, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com



पुण्य नगरी

शालेय विद्यार्थ्यांची ग्रंथालयाला भेट

भादा : औसा तालुक्यातील भादा गावच्या के. प्रभाकर महाराज वाचनालयाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य ग्रंथसंपदा उपलब्ध करण्यात आली असून या अनुषंगाने शनिवारी ग्रंथालयात भेट देण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी करून प्रत्येक विद्यार्थी सभासद या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

मुख्याध्यापक मोहन माकणे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता नववीच्या विद्यार्थीनींनी ग्रंथालयाला भेट दिली आणि ग्रंथालयाची निरहित असलेल्या प्रश्नांची उत्तरे जाणून घेऊन त्याचा उपस्थितीत सभासद नोंदणी करण्याचा शुभारंभ केला. भादा येथे जिल्हा परिषदेच्या वेगवेगळ्या माध्यमिक व एक प्राथमिक अशा तीन शाळा कार्यरत असून या सर्व विद्यार्थ्यांचा या वाचनालयातील ग्रंथसंपदेचा फायदा व्हावा यासाठी शाळेतील प्रत्येक विद्यार्थी सभासद ही संकल्पना सुरू करण्यात आली शिक्षिका अनिता खडके यांच्या माध्यमातून शाळेतील उपक्रमाचे कौतुक होत आहे.

दरम्यान या ग्रंथालयात शैक्षणिक, कला, कथा, कादंबऱ्या व भरगच्च बालसाहित्य उपलब्ध असून हे सर्व साहित्य विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य खुले करण्याचा नी उपक्रम वाचनालयाच्या वतीने राबविण्यात आला तो स्तुत्यच असल्याची प्रतिक्रिया उपसरपंच बालाजी शिरे, शिक्षणप्रेमी नागरिक राम पाटील, दिपक मानधने, इस्माईल मुलाणी, प्रशांत पाटील, नियाज खोजे इत्यादींनी दिली.

Latur Edition
Dec 25, 2022 Page No. 10
Powered by : eReleGo.com



भादा प्रशालेत कृतीद्वारे वाचन, लेखनाचा उपक्रम वर्ग १ ते ४ व वर्ग ५, ८, १० वीचे जादा क्लास

औसा/बालाघाट नेटवर्क : कोरोनामुळे सुमारे दीड महिने शाळा बंद होती पण शिक्षण चालू होते. कोरोना नियमाचे पालन करून कोविड कॅप्टन, गृहभेटी, फोन संपर्क, ऑनलाईन अध्यापन व अभ्यास, ऑनलाईन पालक मेळावा इत्यादी माध्यमातून शाळा स्तरावर विद्यार्थ्यांसाठी शिक्षण चालू होते.

या सर्व माध्यमातून शिक्षण दिले गेले असले तरी भादा प्रशालेचे मुख्याध्यापक श्रीमंत अनंतवार यांचे समाधान न मानता कोरोना कालावधीत विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी इयत्ता पहिली ते चौथी चे वर्ग शाळेच्या वेळे व्यतिरिक्त दुपारी २ ते ३ या वेळेत कोरोना नियमाचे पालन करून या दोन्ही प्रशालेत वाचन लेखनाचा उपक्रम शिक्षकांच्या सहकार्याने दिनांक २७ - १२ - २०२१ पासून हा उपक्रम राबवित आहेत. दुसरीच्या शिक्षिका श्रीमती बालगीरे यांनी कृतीद्वारे वाचन, लेखनाचा उपक्रम घेत विद्यार्थ्यांमध्ये उत्साह झालेले आहेत.

तसेच वर्ग पाचवी नवोदय व शिष्यवृत्ती, वर्ग आठवी शिष्यवृत्ती, वर्ग दहावी जादा क्लास घेऊन कोरोना कालावधीत विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्व शिक्षक प्रयत्न करीत आहेत.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अर्जुन लटूरे, उपाध्यक्ष सतीश कात्रे व सर्व सदस्य तसेच पालकांमधून शाळेतील उपक्रमाचे कौतुक होत आहे.

तज्ञांशी व सहकाऱ्यांशी चर्चा -

या उपक्रमाचे स्वरूप व व्याप्तीच्या संदर्भात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लातूर डायटच्या प्राचार्या डॉ भागिरथी गिरी मैडम, वरीष्ठ अधिव्याख्याता डॉ जगन्नाथ कापसे सर, डॉ गोरे सर, व माझे सर्व सहकारी यांच्याशी चर्चा करण्यात आली. कारण"वाचन ते समीक्षण" हा उपक्रम कोरोना नंतरच्या काळात मुलामध्ये वाचनाची गोडी लागावी त्यांचा सृजनात्मक विकास व्हावा मुले वाचनाने सहशालेय उपक्रमात प्रत्यक्ष सहभागी व्हावेत व वाचनानेच विद्यार्थाचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने तसेच वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब असून यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलविण्यात वाचनाचा महत्वाचा वाटा असतो.यामुळे वाचनाचा छंद जोपासून जीवन समृद्ध करायला हवे. त्याचप्रमाणे जगण्याच्या परिपूर्णतेसाठी वाचन हे आवश्यक आहे म्हणून वरील तज्ञांचे मार्गदर्शन घडवून आणले.



आवश्यक साधनांचा वापर -

वाचनाची गोडी विद्यार्थ्यांना तेव्हाच लागेल जेव्हा विद्यार्थासमोर वेगवेगळी संधी उपलब्ध असेल

1) दररोज 10.00वाजता भरणारी शाळा 9.00 वाजता भरू लागली.

2) ज्यादा तासिकेचे नियोजन केले. दररोज एक गाडी एक तास लवकर येवू लागली.

3) पुस्तकवीर नेमून वर्गाप्रमाणे विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुस्तक पिशवी तयार केली.

4) वर्गशिक्षक हा त्याच्या वर्गाचा मार्गदर्शक म्हणून त्यांच्या वर्गाच्या पुस्तक देवघेव रजिस्टर वर सह्या घेतल्या.

5) दररोज 9.00 आलेल्या गाडीतील शिक्षक हे दहावीला शिकविणारे दहावीचा ज्यादा तास घेऊ लागले. काहीजण नवोदय व स्कॉलरशीप शिकवू लागले व बाकीचे मुलांना मैदानावरती बसवून त्या -त्या वर्गाच्या वाचन वीराकडून वाचन पिशवी आणून वाचन करत.

6) दर पंधरा दिवसांनी पुस्तक वाचन करून संपवणे आहे हा नियम करून घेतला.

7) मुले वाचलेल्या पुस्तकाचे समीक्षण करू लागले.

8) वाचनाने मुलांच्या सर्जनाशिलतेचा विकास झाल्यानेच स्वलिखीत कथा व कवितेची निर्मिती करू लागले.

9) अनेक स्पर्धेत जसे की, निबंध स्पर्धेत राज्यात मुले प्रथम आली.

10) मुलांच्या अनेक सुप्त कलांचा विकासही झाला. जसे की, वक्तृत्व, भाषण, कथालेखन, चित्रलेखन, शब्दकोडे तयार करणे, ग्रीटींग तयार करणे, मुलाखती, जाहीराती, शुभेच्छा कार्ड, अशा वेगवेगळ्या उपक्रमाची संधी परिसंवाद, अभिनय, अशा वेगवेगळ्या उपक्रमात मुले अव्वल ठरली.

11) गुणवतेत विकास झाला. शाळेचा 100% निकाल लागला.

पूर्व स्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी –

कुमार वयीन अवस्थेत मुलांच्या कार्यशक्तीला योग्य वळण देण्याच्या व सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने खरे तर हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. नको त्या वयात हातात मोबाइल दिल्याने मुले वाचनापेक्षाइतर गोष्टीतच रमल्याने वाचनापासून मुले कुठे तरी कोसोदूर जात असल्याचे लक्षात आले आता मुलांना मित्र म्हणून पुस्तकाऐवजी मित्रजिवाभावाचा सखा म्हणजे मोबाईल झाल्यानेच हा उपक्रम हाती घेतला कारण,.....

1) मुलांना खेळ एखादी कला जोपासण्या ऐवजी मोबाइलचाच छंद लागला.


2) वर्गात स्थिर रहावून लक्षदेवून ऐकणे व अभ्यास करण्यास टाळाटाळ करू लागले आणि याच गोष्टी मुलांना मोठं बनविण्यासाठी महत्वाच्या असतात. ग्रामीण भागातील शाळा शिकण्यासाठीचे स्रोतही कमी असतात त्यामुळे रिकामा वेळ, फुरसतीचा वेळ त्यावेळेत जर मुलांना वेड हे वाचनाचे लागले पाहीजे म्हणून शाळेच्या वेळे व्यतिरिक्त ज्यादा तासिका घेवून 6000 ग्रंथाचे ग्रंथालय मुलांसाठी खुले करण्यात आले. वाचनाची गोडी लागावी, ज्ञानात भर पडावी, वक्तृत्व सुधारावे त्यामुळे लेखन कला सृजनशक्तीचा विकास व्हावा, जगण्याची दिशा मिळावी, अतिशय संवेदनशीलतेने मुलांनी स्वतः चा आणि गावाचा विकास करावा या हेतूने हा उपक्रम हाती घेतला आणि मुले अनेक क्षेत्रात चमकू लागले एव्हाना दहावीचा 100% लागला.

उपक्रमोत्तर स्थिती -

यंत्रयुगात माणूस वाचन संस्कृती विसरत चालल्याची खंत व्यक्त केली जाते. ही वाचन संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी बालवयातच वाचनाचे संस्कार मुलांवरती पक्के होणे गरजेचे वाटले. वाचन माणसाला ज्ञानी विचारी व साक्षेपी बनवते. याच उद्देशाने जि प प्रशाला,भादा व कन्या प्रशाला, भादा, ता.औसा, जि.लातूर या प्रशालेत "वाचन ते समीक्षण" हा नवोपक्रम राबवला. जगातील बदलाचे परिवर्तनाचे माध्यम ओळखूनच समाजातील तळागाळातील मुलापर्यत शाळेतील ग्रंथालयातील पुस्तके पोहोचली पाहीजेत. मुलांनी पुस्तके वाचली पाहीजेत म्हणून जवळपास 6000 पुस्तकाचे वाचनालय मुलांसाठी खुले करण्यात आले. मला असे वाटते की, सहा हजार पुस्तकाचे ग्रंथालय कित्येक वर्ष धूळ खात पडले होते. कपाटात पुस्तकांना चाई लागण्या पेक्षा पुस्तके मुलांच्या हाती देवून फाटू देत पण मुलांनी पुस्तके हाताळली पाहीजेत वाचली पाहीजेत. कारण मुलांनी पुस्तके वाचली पाहीजेत. मुलानी पुस्तके हाताळली पाहीजेत. कारण वाचनानेच माणूस जगात सर्वश्रेष्ठ होतो. डॉ ए पी जे अब्दुल कलामांचाच जन्म वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा का? दररोज वाचन का नको ? शरीराची भूक अन्नाने भागविली जाते.पण बुद्धीची भूक ही वाचनाने शमवावी लागते. वाचनानेच माणूस जगात सर्वश्रेष्ठ होतो डॉ ए पी जे अब्दुल कलामांचा जन्मदिन हा वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो? मग एकच दिवस वाचन दिन का? दररोज मुलांनी वाचले पाहीजे. त्यांची अतिरीक्त उर्जा जर वाचन वखेळ यामध्ये गेली तर योग्य त्या वयात योग्य मूल्यसंस्कार मुलांवर झाले अन विद्यार्थ्याचे जीवन दिशादर्शक झाले व ज्ञानप्राप्ती बरोबर मनोरंजनही झाले. अन बघता बघता मुलांनी शेकडो पुस्तकाचे वाचन केले. कथा, कविता लेखनाबरोबर मुले परीक्षणही लिहू लागले.

गरज व महत्व -

विद्यार्थी हा ज्ञानाचा रचियता आहे असे म्हटले जाते. ज्ञानाच्या निर्मितीसाठी त्याला अनुभव मिळणे गरजेचे आहे. त्याचे स्त्रोत विविध मार्गी असतात त्यातील एक आणि महत्वाचा म्हणजे" वाचन"होय. वाचनाने मनुष्याच्या अनुभवामध्ये वाढ होते. माहितीच्यापसाऱ्यातून त्याला निवडक अनुभव येतात याच अनुभवाच्या मदतीने त्याच्या ज्ञानरचनेच्या प्रक्रियेत भर पडते. हाच दूरगामी हेतू आहे.




संस्कृती, इतिहास, शोध, विचार यांचा मौलिक हेवा पुस्तकाच्या रुपाने पूर्वजाकडून आपल्याला मिळालेला आहे. याची ओळख व्हावी आणि पुढील जीवनाच्या वाटचालीसाठी त्याचा वापर व्हावा ही गरज ओळखून पूर्ण होवू शकते." दिसामाजी काही तरी वाचीत जावे". या उक्तीप्रमाणे वाचन ही गरज होवून बसली आहे. स्पर्धेच्या जगात टिकून रहाण्यासाठी आणि माहितीच्या साहाय्याने अद्यवयातता रहाण्यासाठी वाचनाने व्यक्तीत स्वतंत्र व सुसंगत विचार करण्याची क्षमता वाढते. वाचनाने व्यक्तीच्या जीवनात उद्भवणाऱ्या विविध संकटावर समर्थपणे मात करण्याची क्षमता वाढते. वाचनामुळे व्यक्तीचा माहिती व ज्ञानाचा संग्रह वाढतो. विविधज्ञानशाखातील अद्ययावत ज्ञान नवनवीन कल्पना, तत्वे, सिद्धांत याची माहिती होते. वाचनातून व्यक्तीला विविध प्रश्नांसंबंधी स्वतःची मते बनविता येतात. मानवी जीवनाकडे व्यापक दृष्टीने व रसिकतेने पहाता येते वाचनामुळे व्यक्तीची भाषा समृद्ध होते. शैलीदार अभिव्यक्ती सामर्थ्य वाढते. मैत्री करू पुस्तकाची सोपी करू वाट जीवनाची"या मार्गावर मार्गक्रमण केल्यास विद्यार्थी यशाचे शिखर नक्कीच गाठतात.

अस म्हणतात की, आयुष्यात दोनच गोष्टी आपल्याला शहाणपण देतात.' एक अनुभव, दुसरे पुस्तक या दोन्हीमुळे विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध करते. असंख्य अनुभवाचा खजिना असलेले पुस्तक आपल्या आयुष्यात प्रवेश करते तेव्हा आपल्याला अनेक अर्थाने समृद्ध करते.

कार्यवाही –

शाळेतील वाचनालय विभाग माझ्याकडे जेव्हा दिला तेव्हा मुख्याध्यापक साहेबांना मोठी आश्वासकता होती. कारण शाळेतीलसांस्कृतिक विभागही माझ्याकडेच असल्याने शाळेत होणारे नवनवीन दिनविशेष उपक्रम कार्यक्रम यासाठी ग्रंथालयातील पुस्तकांचा वापर करण्यासाठी तो विभाग माझ्याकडे दिला गेला. कारण हजारो पुस्तकाचे ग्रंथालय धूळखात बसण्यापेक्षा ग्रंथालयातील पुस्तके मुलांच्या हाती देवून ते मुलांनी वाचले पाहीजेत. प्रथमतःहा विभाग माझ्याकडे दिल्यास मलाही असे वाटले की मुलांना जर पुस्तके दिली तर फाटली जातील गहाळ होतील पण मुख्याध्यापक साहेबांना मोठा विश्वास दिला की मॅडम पुस्तके जेवढी वापरात येवून फाटली जातील तेवढे आपण खारीस्त करू पण ही मुलांनी पुस्तकेवाचली पाहिजेत. एखाद्या विद्यार्थ्याच्या हाती चांगल पुस्तक पडले अन त्याचे जीवन घडले तर त्याचे भविष्य बदलून जाईल. कारण वाचनात खूप मोठी जादू आहे ताकद आहे. या अंतरीक तळमळीतूनच हा उपक्रम आकारास आला. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकर, शाहू, फुले, डॉ. ए पी जे अब्दुल कलाम हे घडले.' मलाही याच वाचनाने समृद्ध केले. जर वाचनालय आपण मुलांसाठी खुले केले तर, वाचनालयातील पुस्तकाचे चित्र व शिर्षक पाहून मुलांचे कुतूहल जागे झाले व आपण हे पुस्तक वाचून काढू अशी जिद्द निर्माण झाली आणि हा उपक्रम फुलू लागला.

"वाचन ते परीक्षण" या शीर्षकाखाली माझा उपक्रम सुरु झाला आणि बघता -बघता वर्गासाठी सुरु झालेल्या उपक्रमाचा शाळेनेही स्विकारला.





1) यामध्ये मी प्रथमत: सर्वच विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होतील यासाठी प्रयत्न केले.

2) वयोगटानुसार पुस्तकांची विभागणी केली.

3) आवडीनुसार पुस्तकांची विभागणी केली.

4) मुलांची पुस्तक वाचण्याची बैठक व्यवस्था निश्चीत केली.

हा उपक्रम कसा राबविला जातो?

1) अवांतर वाचनाच्या तासिकेचे नियोजन –

10.00 वाजता भरणारी शाळा 9.00 वाजता भरू लागली. शिक्षित मोठा शिक्षक स्टाफ, सुसज्ज ग्रंथालय, मोठे मैदान, याचा वापर चांगल्या पद्धतीन कसा करता येईल तर एक दिवस शाळेसाठी वाचनासाठी मुलांसाठी म्हणून संपूर्ण स्टाफचे विभाजन झाले प्रत्येक वर्गाची एक गाडी ठरल्याप्रमाण 9.00 शाळेत येवू लागली यामध्ये दहावीला शिकविणारे शिक्षक दहावीचा ज्यादा तास घेवू लागले. 5 वी व 8 वी नवोदय व स्कॉलरशीप चा तास घेवू लागले. व बाकीचे सर्वचजण मुलांना मैदानात बसवून पुस्तक वीरांकडून पुस्तकाचे वाटप करून. वर्गनिहाय मुलांना बसवून पुस्तकाचे वाचन करू लागले.

वेळापत्रकानुसार दररोज 9.00 वाजता शाळा सुरु झाल्यावर अवांतर पुस्तक वाचन हा उपक्रम आकारास येवू लागला.

ग्रंथालयमित्र -

1) पहीली - साक्षी गुणवंत माळी

2) दुसरी - पवन योगेश लटूरे

3) तिसरी - दिक्षा सुखदेव जाधव

4)चौथी - सार्थक काशिनाथ घोडके

5) पाचवी – कृष्णा योगिराज बनसोडे

6) सहावी - यशश्री धनंजय पाटील

7) सातवी – राजकन्या राम पाटील

8) आठवी - कात्रे ऋतुजा पिराजी

9) नववी – बनसोडे दिव्या जयराम

ग्रंथालय प्रमुखांच्या मदतीने ग्रंथालय पिशव्यातील पुस्तकाचे दररोज मुलींना वाटप होवू लागले व दर पंधरा दिवसानंतर पुस्तकाची वर्गातच अदलाबदल होत असे म्हणजे ग्रंथालय प्रमुख व वर्गशिक्षकाने वर्षातून फक्त एकदाच पुस्तकाचे वाटपं केल्यानंतर आपोआप पुस्तकाची देवाणघेवाण होवू लागली.

2) वाचन ते परीक्षणापर्यत मुले पोहचली -

१) https://www.youtube.com/watch?v=5BJuE_PxHZM

२) https://youtu.be/kklQlQJe-CA?feature=shared

३) https://youtu.be/4eAPjSTw7p8?feature=shared.

४) https://youtu.be/kklQlQJe-CA?feature=shared.

५) https://www.youtube.com/watch?v=02rMCcR8HeE

मुलांच्या हातात एकदा का पुस्तक पडले की, ते संपल्याशिवाय मुले थांबत नव्हती. मुले पुस्तक वाचन व वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षण लिहू लागले. शाळेने एक छापील फॉरमॅट दिल्याने व परीपाठा अंतर्गत विचारणा होवू लागल्याने मुले वाचलेल्या पुस्तकातील आवडलेला भाग लेखक या पुस्तकातील महत्वाचा संदेश ही वाचनाची सर्वोत्कृष्ट पायरी म्हणजे परीक्षणे मुले लिहू लागली म्हणजे मोठमोठ्या लेखकाला जे जमणार नाही ते भाद्याची मुले सहज करू लागली.

3) मुले स्वलिखीत कथा कवितेची निर्मिती करतात म्हणजे मुले सृजनशील बनली –

मुले वाचत असताना पुस्तकात आवडलेला भाग गोष्टी कोटेशन, महान व्यक्तीच्या तोंडची वाक्य, वचने ,कविता लिहून ठेवत त्यामुळे मुलांकडे भरपूर साठा झाल्याने मुलांनाही कविता कथा कशी तयार करावी याचे प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने मुलांच्या सर्जनशीलतेचा विकास आपोआप झाल्याने मुले कवी बनले लेखक बनले.


https://youtu.be/w7WdgCteSPY?feature=shared.

https://youtu.be/ReErj88jWQQ?feature=shared.

https://youtu.be/ixRE95LI56A?feature=shared.

स्वलिखीत कविता वाचन -

https://youtu.be/SzqAX8s1qdw?feature=shared.




https://youtu.be/l2iNG_DLxf0?feature=shared.

https://youtube.com/shorts/2eMUja8_k9g?feature=shared.


https://youtube.com/shorts/cdNH_OtRKVQ?feature=shared.

मुलांच्या मनाला भावलेले खटकलेले अनुभव प्रसंग मुले कवितेतून, कथेतून व्यक्त होवू लागले. मुलांनाही मोठ्यांच्या समोर काही गोष्टी बोलून दाखवता येत नाहीत हे अव्यक्त अनुभव साहित्याच्या रुपाने आकार घेवू लागले. त्यामुळे योग्य त्या वयात अव्यक्त भावना प्रकट करण्यासाठी कविता जवळ झाल्याने मुले सृजनशील बनली .

आतापर्यत माझ्या मुलांची 30 ते 32 हस्तलिखिते प्रेरणा नावाने प्रकाशीत झाले ज्यात शेकडो कथा कविता आहेत.









4) शाळेला व्हर्च्युअल क्लासची देणगी मिळाली –

बीडीओ म्हेत्रे साहेबांचा शाळाभेट दौरा अंतर्गत सरांनी शाळेला जेव्हा भेट दिली अन अचंबीत झाले. वाचन ते परीक्षण उपक्रम समजून घेतला व माझ्या वर्गातील कु दिपाली मगर हिचे जेव्हा परीक्षण वाचले तेव्हा त्यांनी एवढे विद्यार्थ्यांच्या हिताचे जर उपक्रम शाळा राबवत असेल तर आपणही शाळेसाठी काहीतरी करू म्हणून व्हर्च्युअल रूमची संकल्पना शाळेत राबवली अन आजमितीला 80 विद्यार्थी इतर देशांशी संवाद साधतात मार्गदशन मिळते.

5) निबंध स्पर्धेत राज्यात प्रथम –

भारत सरकारच्या इनकमटॅक्स डिपार्टमेटकडून घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतही कुं अंजुश्री धनंजय घोडके या विद्यार्थिनीने" भारतीय अर्थव्यवस्था आव्हाने आणि भविष्यातील मार्गक्रमण" या विषयावरती निबंध लिहीला अन तो निबंध राज्यातून प्रथम आला. याच्यामागचे श्रेय हे अवांतर पुस्तक वाचन व वाचन करत असताना टिपणे, बोधवाक्य, सुविचार, उदाहरणे, दाखले व संदर्भ ,मते वाचन व लिहून ठेवल्यान त्याचा निबंध लेखनात योग्य त्या ठिकाणी वापर केल्याने निबंध वाचनीय व महत्वपूर्ण विषयाला स्पर्श केल्यानेच निबंधाला राज्यातून प्रथम क्रमांक मिळाला आहे






निबंध स्पर्धेत भादा कन्या शाळेची


अंजुश्री घोडके राज्यातून पहिली

भादा : आयकर विभागाकडून घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत औसा तालुक्यातील भादा गावच्या कन्या माध्यमिक शाळेतील कु. अंजुश्री धनंजय घोडके या विद्यार्थ्यीनीने राज्यातून पहिला क्रमांक पटकावला. याबद्दल प्रजासत्ताकदिनी पुण्यातील एका कार्यक्रमात तिला सन्मानित करण्यात येत आहे.

विषयाशी निगडीत म्हणी आणि वाक्प्रचार आणि उत्कृष्ट भाषशैली उपयोगात आणून तिने लिहिलेल्या या निबंधाला राज्यातून पहिला क्रमांक मिळाला आहे. याच विद्यार्थ्यीनीने यापूर्वी डॉ. तेगबहादुर सिंग यांच्या जयंतीनिमित्त व प्लॅस्टिक मुक्त अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेत देखील आपली गुणवत्ता सिध्द

6) स्वलिखीत कथा कविता लेखनात राज्यस्तरावर संधी –





वाचन ते परीक्षण या उपक्रमाचा फायदा मुलांच्या सृजनशीलतेचा विकास होण्यात झाला. मुलांच्या अवती भोवतीचे जग व वास्तव अनुभव हे मुलांच्या लेखनकला विकसनात महत्वाचे ठरले. शाळेतही अनेक कवी साहित्यिक असल्याने अधून - मधून त्यांच्याही कविता ऐकायला मिळतात. मुलांच्या अनेक काव्य, कथा निर्मितीला 95 अखील भारतीय साहित्य संमेलनात उदगीर येथे प्रत्यक्ष कथा वाचण्याची संधी जवळपास 31 विद्यार्थ्यांचा वेगवेगळ्या कलाप्रकारात सहभाग मिळाल्याने शाळेच्या यशात

मानाचे तुरे ठरले. एवढेच नव्हे तर, आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था भारत यांच्या वतीने घेण्यात आलेल्या साहित्य निर्मितीत 22 विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत केले. म्हणजेच सहनशीलतेचा विकास होवून मनोरंजनही झाले नवनवीन आव्हानांकडे डोळस दृष्टीने पाहण्याची संधी मिळाली.



लोकसंख्या शिक्षण विभाग, विद्या प्राधिकरण, पुणे यांच्या मार्फत कुमारवयीन मुलांच्या अनेक आव्हानांना वाचा फोडावी म्हणून पर्यावरण, व्यसनमुक्ती, तंत्रज्ञानाचा योग्य वापर, सोशल मिडीयाचा परिणाम याविषयाच्या अनुषंगाने मुलांचे स्वलिखीत नाटके राज्यस्तरावर पोहचली. हे यश शाळेत वाचन उपक्रम राबविल्यानेच मिळू शकले. कारण वाचन करताना महत्वाचे मुद्दे संदर्भ वाचनीय परिच्छेद मुलांच्या वाचनातून माहिती प्राप्त करून देतात . अनेकदा शाळेतही अनेक विषय देवून मुलांना अभिनय, संवादनिर्मितीसाठी संधी उपलब्ध करून दिली जाते. स्वतः मी या विषयावर स्वलिखीत नाटकाचे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यामुळे मुलांना आपसुकच प्रेरणा मिळाली.



मुले पुस्तक वाचून त्यावर दर पंधरा दिवसांनी परीक्षणे लिहीतात. मग मुलांना वाचन प्रेरणा मिळावी व मुलांचे वाचन वाढावे म्हणून शाळेतून वर्ग निहाय गट तयार केले.

1) 3 ते 4 - पु ल देशपांडे गट

2) 5 ते 8 - वि. स खांडेकर गट

3) 9 ते 10 - ना सि फडके गट

असे गट करण्यात आले व वर्गातील सवोत्कृष्ट वाचन, परीक्षण लिहीलेले वाचन प्रमुखाकडे दिले जाते व त्यातून तीनही गटातील परीक्षणे तपासली जातात व गटातून एकाला सर्वोत्कृष्ट परीक्षणाचे पारितोषिक योग्य त्या कार्यक्रमात दिले जाते. त्यामुळे प्रथमतः आपणही पुस्तक वाचले पाहीजे ही धारणा विद्यार्थ्यांची पक्की होते व परीक्षणे लिहीण्याकडे, वाचनाकडे मुले आकर्षिले जातात म्हणजेच मुलांचे वाचन दर्जेदार होते आणि नवीन दर्जेदार वाचक वर्गाची उपलब्धी होते.

8) आगळ्या - वेगळ्या उपक्रमाचा आठवा तास -

दररोजचा आठवातास म्हणजे कंटाळवाणा, पळून जाण्याचा असतो.पण आम्ही या तासात दरदिवशी आगळेवेगळे उपक्रम राबविल्याने एकतर मुलांचे मधल्या सुट्टीत पळून जाणे कमी होवून मुले ग्रंथालयातील नव - नवीन पुस्तक घेवून वाचण्याकडे कल वाढला. त्यातील उपक्रम.....

अ) चला घेवूया मुलाखत - सोमवार


या दिवशी परीसरातील कर्तबगार व्यक्तीच्या मुलाखती घेवून त्या व्यक्तीचे जीवन वाचण्याचा वस्तूपाठ घालून दिला. यामध्ये शेतकरी, स्पर्धा परीक्षेत पास झालेले माजी विद्यार्थी इ.चा समावेश असल्याने प्रश्नावली काढून त्यांना प्रश्न विचारून त्यांचे जीवनातील बारकावे समजून घेण्याची व प्रश्ननिर्मितीची संधी या उपक्रमाने विकसीत झाली. एवढेच नव्हे तर, व्यक्ती वाचण्याची व अनुभवाची खूप मोठी शिदोरी मुलांची शिक्षण प्रक्रिया सुलभ होण्याची व नविनतेचा शोध घेवून आत्मविश्वास पेरण्याची संधी मिळाली.

ब) चिट्ठी खोला झटपट बोला - मंगळवार

दर मंगळवारी आठव्या तासिकेत संपूर्ण मुले मैदानावरती घेवून त्यांना , काही विषयाच्या चिठ्ठ्या केल्या जातात व अचानकपणे कुणालाही बोलायला लावले जाते. शिक्षण, पर्यावरण, तंत्रज्ञान, शेती, देशप्रेम, रस्त्यांचे नियम, व्यसनाधिनता, साक्षरता अशा विषयाच्या चिठ्ठ्या तयार करून एक चिट्ठी दिली जाते व बोलण्याची संधी दिली जाते. त्यामुळे मुलांचे धाडस व ऐनवेळीही बोलण्याचे कौशल्य विकसीत होते.

क) चला बनुया साहित्यीक - बुधवार

या उपक्रमाच्या अनुषंगाने आठवडाभरात स्वलिखीत कथा कविता तयार करायची वती दर बुधवारी शेवटच्या तासात वाचायची, यातही वर्गनिहाय अनुक्रमाने संधी दिली जाते त्यामुळे शेकडो कवी साहित्यिकांची उपलब्धी झाली.



ख) प्रश्न तुमचे उत्तर आमचे - गुरुवार

आठव्या तासिकेत गुरुवारी मुलांना मैदानात गट निहाय बसवून अनेक विज्ञान सामाजिक शास्त्र गणितासारख्या विषयावर एका गटाने प्रश्न विचारायचे व दुसऱ्या गटाने उत्तर द्यायचे हा उपक्रम सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न असल्याने प्रश्न लक्ष देवून ऐकणे व उत्तर लिहून ठेवणे ही क्रिया केली जाते. त्यामुळे मुलांची स्पर्धा परीक्षेची नवोदय, स्कॉलरशीपच्या घटकांची तयारी झाली.


भादा प्रशालेत ऑनलाईन माता–पालक मेळावा
व प्रेरणा हस्तलिखित प्रकाशन


मुलांच्या विकासासाठी
योगासने, ग्रंथवाचन


भादा प्रशालेत ऑनलाईन माता–पालक मेळावा
व प्रेरणा हस्तलिखित प्रकाशन



ग) चावडी वाचन - शुक्रवार

खर तर हा उपक्रम खूपच छान आहे यामधे संपूर्ण विद्यार्थ्यांना एकत्र करून अगोदरच शिक्षकाकडून वाचण्यात मागे असणाऱ्या मुलांची यादी घेतली जाते व बरोबर अशा विद्यार्थ्यांना समोर बोलावून वाचायला लावले जाते. आपणास वाचण्यात अडथळे येत आहेत सर्वासमोर आपण वाचून दाखवायलाच पाहीजे म्हणून त्यांना वाचन सुधारण्याची संधीही दिली जाते.आपापल्या वर्गातील वाचनमित्र जोडून दिले जातात. त्यामुळे मुले वाचनाकडे वळतात अशा मुलांसाठी मोठ्या आकारातील शब्दांची पुस्तके दिली जातात त्यामुळे मुलांचे वाचन सुधारून मुले अवांतर वाचनाकडे वळतात.

घ) दप्तराविना शाळा - शनिवार

या दिवशी मुलांच्या दप्तराला सुट्टी असली तरी अनेक उपक्रमांमध्ये संपूर्ण दिवस जातो. सकाळी शाळा भरताच योगासने होतात. त्यानंतर ध्यानधारणा करून त्यानंतर आठवडाभर शिकवलेल्या अभ्यासक्रमावर आधारीत १० गुणांची तीन विषयाची परीक्षा घेतली जाते त्यामुळे मुलांना आठवडा भर शिकवलेल्या घटकावर उजळणी सुद्धा होते. म्हणजे नुसते उपक्रम न घेता त्यांना अभ्यासातही जखडून न ठेवल्यामुले मुलांचे पुस्तक हेच खरे मित्र झाले आहेत.

च) व्हर्च्युअल सहल ते अवकाश दर्शन -

नाविन्यपूर्णतेचा परिपाठ देत असताना मुलांना अनेक देशांशी व्हर्च्युअल सहलीचाही प्रत्यक्ष अनुभव दिल्याने मुलांच्या जिज्ञासु वृत्तीला आव्हान दिल्याने अनेक भौगोलिक संकल्पनाही दृढ झाल्या आहेत एवढेच नव्हे तर सूर्यग्रहण हे मुलांना शाळेतील दुर्बिणीच्या साहाय्याने अवकाश दर्शन घडवल्याने मुले भौगोलिक संकल्पना जाणून घेण्यासाठी उत्सुक झाले.

छ) वाचन संस्कृती विकसनाला वाचन कट्टयाची साथ -

प्रसंगी अखंडीत वाचीत जावे म्हणून दुपारच्या मध्यंतर व लघुमध्यंतर या वेळेत तिनही भाषेतील वृत्तपत्र सांस्कृतिकच्या कट्ट्यावर ठेवून मुले मध्यंतर होताच वृत्तपत्र वाचण्यासाठी धावत जातात. त्यामुळे मुलांना जगात होत असलेल्या बदलाची माहिती मिळते. जग जवळ आले आणि खेळ ,साहित्य, शोध अशा वाचनीय बातम्या वाचून आपणही यातून काहीतरी शिकावे हा संस्कार त्यांच्यावर आपोआप रूजवला जातो.

ज) दहीहंडी ऐवजी शब्दहंडी वाचन उपक्रम-

कृष्णाजन्माच्या दिवशी आम्ही असे सांगतो की, लहान मुलामुलींनी राधाकृष्ण बनायचे आणि ठरल्याप्रमाणे खूप छान राधाकृष्ण तयार होवून येतात. मग आम्ही शब्द अक्षर वाक्याच्या पट्टया तयार करूनमडक्यातटाकतो. मडक्याला सजवले जाते. व हंडी न फोडता त्यातून एक चिठ्ठी काढायला सांगतो. त्यातून शब्द वाचणे, अक्षर, वाक्य वाचणे वाक्यावरून गोष्ट तयार करायला लावणे असे उपक्रम घेतल्याने मुलांना आनंद तर होतोच त्याच बरोबर वाचलेल्या पुस्तकातील संदर्भाचे उपयोजन करण्याला संधी मिळते, मनोरंजनातून ज्ञान प्राप्तीला प्रेरणा मिळते.

झ) आनंदाचा तास - (ड्राप एव्हरीथिंग ॲन्ड रीड) -DEAR


विद्यार्थी आणि शिक्षकाचे वेळापत्रक बाजूला ठेवून उत्सव सण निमित्ताने सर्व विद्यार्थी एकत्र करून शाळा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास मुलांसाठीकथेची गोष्टीची पुस्तके वाचण्यासाठी दिली जातात. त्यानंतर वाचलेल्या कथेचा सारांश सांगणे. त्या पात्राच्या अनुषंगाने संवाद निर्मिती करून अभिनय करणे. कविता करायला सांगणे शब्दाचा डोंगर, शब्दझुंबर, शुभेच्छांचे संदेश, कोडे बनविणे असे अतिशय सृजनशील उपक्रम राबविल्याने वाचनाकडून पुन्हा परीक्षणाकडेल मुलांना घेवून जाण्याची प्रेरणा मिळते मुलांना आनंद ही मिळतो.

ट) वाचनास पूरक इतर उपक्रम -

1) शब्द डोंगर बनवणे

2) शब्दावरून गोष्ट तयार करणे

3) शब्दांचे झुंबर बनवणे



4) सण उसवानिमित्त शुभेच्छा संदेशाची निर्मिती

5) संवादातून अभिनय निर्मिती

6) शब्दसाखळी बनवणे

ठ) Read लातूर ते गावच्या ग्रंथालयालाही मुले जोडली -

मा.लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख व दिपशिखा ताई देशमुख यांच्या संकल्पनेतील रीड लातूर ह्या उपक्रमाचे केंद्रच माझी शाळा असून मराठी वाचनाबरोबर ग्रामीण भागातील मुलांना इंग्रजी वाचनाकडे घेवून जाणारा अतिशय नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे मुलांचे इंग्रजीच वाचनही सुधारले एवढेच नव्हे तर, गावातील प्रभाकर महाराज वाचनालयाचे प्रमुख किशोरजोशी सरांनीही मुलांसाठी गावचे वाचनालयही खुले करून मुले त्यांच्या नावावर पुस्तकाची देवाण घेवाण करून हवं ते पुस्तक उपलब्ध करून भादा गावात वाचन चळवळच तयार झाली आहे.हेच या उपक्रमाचे यश आहे.

https://youtu.be/9GsyJ2JMNn0?feature=shared

https://youtu.be/fefVcEb7Q38?feature=shared.

https://youtu.be/yyTurPfle2I?feature=shared.

https://youtu.be/_aesD2kR8Es?feature=shared.


9) मुलांची गुणवत्ता वाढली –


वाचन उपक्रमामुळे सहशालेय उपक्रमाचा अभ्यासावरही चांगला परिणाम झाल्याने जिल्ह्यात निकालाचा दबदबा कायम राखणारी जिल्हा परिषदेची शाळा ही नावाजलेली आहे. दहावीचा निकाल 100% असून गुणाक्रमाने स्पधेत टिकणारी शाळा म्हणून नावारूपाला आलेली आहे. नवोदय स्कॉलरशीप चा निकालही अतिशय सुंदर असून एकूणच गुणवत्तेत वाढ झाली असेच म्हणावे लागेल

10) यशस्वीता / उपक्रमोतर स्थिती -

1) मुलांना अवांतर वाचनाची आवड निर्माण झाली.
2) विद्यार्थी स्वतः कथा कविता तयार करू लागले. मुले साहित्यीक बनले
3) वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षणही मुले लिहू लागले.
4) निबंध, वक्तृत्व अभिनयाच्या स्पर्धेत जिल्हा विभागराज्य ते राष्ट्रीय स्तरांवर पोहोचले
5) मुलांचा अनेक उपक्रमात सहभाग वाढल्याने गावातील प्रभाकर महाराज वाचनालय विनामूल्य खुले करण्यात आले.
6) मुले व्हर्च्युअल क्लासच्या अंतर्गत इतर देशांशी जोडले गेले.
7) वाचन उपक्रमामुळेच लेखनकलेचा विकास झाला.
8) मुलांना वाचण्याचे महत्व पटल्यानेच मुले अनेक स्पर्धेत उतरले
9) मुलांना वाचनाची संधी मिळाल्यानेच लोकसहभागातून गावचे ग्रंथालय शाळेला जोडले.
10) वाचन उपक्रमामुळे मुलांच्या वयोगटानुसार मराठीच्या वेगवेगळ्या साहित्य प्रकाराची ओळख झाल्याने मराठी भाषेचा एक नविन वाचकवर्ग तयार झाला.
11) कथा, कविता, कादंबरी वाचनाने रसग्रहण दृष्टीचा विकास झाला.
12) मुलांमध्ये आपोआपच नैतिक मूल्यांची रुजवणूक होण्यास मदत झाली.







11) **समारोप -**

खरे पहाता उपक्रमशिलता हा शिक्षकाचा आवश्यक गुण आहे. पारंपारिक शिक्षणाचा कित्ता गिरवत पुढे न नेता. आजच्या काळातील विद्यार्थ्यांच्या समोर असलेल्या अडचणीवर विजय मिळविण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला स्पर्श करून विद्यार्थ्यांना वर्गाच्या बाहेरचीही ओळख या उपक्रमामुळे निर्माण झाली आहे. जेव्हा हा उपक्रम हाती घेतला तेव्हापासून शाळेचे वातावरण बदलले व प्रत्यक्ष उपक्रमात मुले सहभागी असल्याने त्याचे खूप चांगले परिणाम दिसून आले. त्यामुळेच माझी शाळा ही राज्याच्या आदर्श शाळेत गणली गेलेली एक उत्कृष्ट शाळा म्हणून नावारूपाला आली. आज माझ्याशाळेने एक पाऊल पुढे जावून हा नवोपक्रम राबवला ज्याला लातूर जिल्हा परिषदेचे अभिनंदनाचे पत्रही शाळेला मिळाले. उपक्रमशील, साहित्य रत्न, स्काऊट गाईडच्या सर्वसाधारण विजेतेपदही शाळेने पटकावले. अटलबिहारी इंटरनॅशनल स्कूल म्हणूनही शाळेने दर्जा मिळवला, त्यातूनच वाचन उपक्रम साध्य झाला.

गोडी शिक्षणाची

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हाकेतांडा, केंद्र. रेणापूर, ता. रेणापूर, जि.लातूर

मुख्याध्यापकाचे नाव - श्री गणेश सावळकर

सहशिक्षक - शेख जाकीर शाकीर अहमद


प्रास्ताविक -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हाकेतांडा, ता.रेणापूर जि.लातूर या शाळेत माझी या वर्षी सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षा मध्ये बदली झाली. नवीन शाळा नवीन विद्यार्थी सर्व काही नवीन होते. सदरील शाळेत जून महिन्यात येथील विद्यार्थी, पालक, शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेवून विद्यार्थी विकासास पोषक उपक्रम राबवण्याचे निश्चित केले. काय करावे आणि कसे करावे या विचारात असताना मा.मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनानुसार एक उपक्रम राबवण्याचे ठरले ज्यात शा. व्य. समिती ने महत्वाची भूमिका राबवली. मग काय करायचं ते निश्चित करून प्रवास सुरु झाला.

उपक्रम निवडण्याचे कारण व उपयुक्तता -


शिक्षक म्हणून काम करताना विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, भावनिक, शारीरिक विकासाची माहिती आपणास असणे अत्यंत आवशक आहे. त्याच बरोबर विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणाची पुरेपूर माहिती वर्गशिक्षकास असणे गरजेचे आहे. ज्या शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या अंगातील सुप्त गुणांना ओळखले, तो शिक्षक शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यात सफल झाला असे म्हणणे वावगे ठरणार नाही. मुळात माझी शाळा ही हाके लमान तांडा या गाव वस्तीत असल्याने सर्व पालक ऊसतोड कामगार आहेत. शिक्षणाबाबत प्रचंड उदासीनता दिसून येते. तसेच विद्यार्थ्यांना संवाद साधण्यासाठी भाषेचीही अडचण फार जाणवते. म्हणून मी स्वतः व माझे सहकारी मुख्याध्यापक श्री सावळकर सर यांनी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक पातळीचा विचार करून स्तर निश्चित करण्यासाठी मराठी, इंग्रजी, गणित विषयाच्या संपादणूकीबाबत प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आवश्यक त्या नोंदी घेण्याचे ठरवले. त्याकरिता मी रेणापुर केंद्राचे केंद्रप्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक श्री विनायक ढेले साहेब व शाळेचे मुख्याध्यापक गणेश सावळकर सर यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी दोन्ही साहेबांनी सदर उपक्रमाला **'गोडी शिक्षणाची'** हे नाव देण्याचे सुचवले. व या उपक्रमा संदर्भात माननीय विस्ताराधिकारी श्री.शारवाले साहेब व पं. स.निलंगा गटशिक्षणाधिकारी श्री पंचगले साहेब यांची परवानगी घेऊन उपक्रम राबवण्याची अधिकृत पणे परवानगी दिली.

या उपक्रमात प्रत्येक विद्यार्थ्यांला विषय निहाय सराव पुस्तिका त्यांच्या बौद्धिक पातळीनुसार बनवल्या आहेत . ज्यात मराठीत विषयात वाचता येणे, परिच्छेद वरून प्रश्न उत्तरे सोडवणे, जोडशब्द वाचणे, गणितीय प्रक्रिया जसे बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, घड्याळावरील विविध उदाहरणे, अपूर्णांक, नोटा- नाणी अशा प्रकारच्या अनेक घटकावर आधारित घटक निहाय 500 ते 700 उदाहरणे सरावासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांला तसेच इंग्रजी विषयामध्ये दैनंदिन वापरातील 1000 शब्द व एक हजार वाक्य विद्यार्थ्यांना देणे आवश्यक वाटले. त्यामुळे विद्यार्थ्यांची आकलनक्षमता वाढण्यास निश्चित मदत होईल. इयत्ता 1 ली ते 4 थी च्या विद्यार्थ्यांना वाचता, लिहता येणे, गणितीय प्रक्रिया करता येणे फार आवश्यक आहे. म्हणून हा उपक्रम राबवण्याचे ठरवले.



उपक्रमाचे वेगळेपण -

'गोडी शिक्षणाची' या उपक्रमात प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या बौद्धिक पातळीनुसार त्याला जमेल अशी सराव पुस्तिका विषयनिहाय, घटक निहाय बनवण्यात आली आहे .मुखपृष्ठावर विद्यार्थ्यांचे नाव व त्यांचा फोटो लावण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला स्व ची जाणीव होऊन तो उत्साहाने सराव करेल. त्याच बरोबर आकलन वाढविण्यासाठी 'TOYBANK' अंतर्गत येणाऱ्या साहित्याचा मोठ्या प्रमाणात वापर करण्याचे ठरले. या उपक्रमात स्व अभिव्यक्ती सादरीकरणाला महत्त्व देण्यात आले





मुखपृष्ठ **शेवटचे पृष्ठ**



उपक्रमाची गरज -

1) सदरील उपक्रम हा इयत्ता पहिली ते चौथी वर्गासाठी राबविण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांच्या पायाभूतक्रियेतील गुणवत्तेत वाढ होईल .
2) विद्यार्थ्यांना भाषा गणित विषयाची आवड निर्माण होईल.
3) विद्यार्थ्यांच्या बौद्धिक तसेच व्यावहारिक ज्ञान वाढवण्यास मदत करता येईल.
4) परिसरात घडणाऱ्या घटना प्रसंग देवाण-घेवाण इत्यादी बाबत विद्यार्थ्याला स्वतःचे मत तयार करता येण्यासाठी मदत होईल.
5) भाषेच्या निरीक्षणातून भाषेची समज, आवड करण्यास मदत होईल.

6) स्वतःच्या मताप्रमाणे एखाद्या बाबीवर घटनेवर आपले मत प्रकट करणे विद्यार्थाला सोपे होईल, उदाहरणार्थ कथा, कविता, प्रवासवर्णन, इत्यादी.

7) मराठी व इंग्रजी भाषा वाचन लेखन कौशल्यात नैपुण्यता प्राप्त करणे.

8) खेळातून शिक्षण देणे

9) उपस्थिती टिकवणे व शाळेविषयी आपुलकी निर्माण करणे

10) दैनंदिन गणितीय क्रियेतून व्यावहारिक समज वाढवता येईल.









कार्यवाही करताना आलेल्या अडचणी :-

१.भौगोलिक परिस्थिती.

२. अपुऱ्या सोयी.

३. रात्री लाईट नसणे.

४. सर्व विद्यार्थी हे लमाण संवर्गातील असल्याने भाषेची अडचण.

५.पालकांची शिक्षणाविषयी उदासीनता,

६.गरिबी, आर्थिक परिस्थिती

७. विद्यार्थी अनुपस्थिती.

अशा अनेक अडचणी येऊ लागल्या.

उपक्रमाचे नियोजन –

उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण -

'गोडी शिक्षणाची' हा उपक्रम राबवण्यापूर्वी आम्ही वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नोंदी घेतल्या. त्यात असेच जाणवले की; करोना काळामुळे विद्यार्थ्यांना गणिती प्रक्रिया करण्यात अडचणी येत आहेत. मराठी लेखन, वाचन प्रक्रियेत अडचणी येत आहेत. आमची शाळा लमान तांडा वस्तीत असल्याने इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांना मराठीत बोललेले समजत नाही. मराठी बोलता येत नाही हे आम्हाला समजले. शाळा ही मुख्य गावापासून लांब शेतमाळावर असल्याने विद्यार्थ्यांचा इतर लोकांशी संपर्क तसा नव्हताच . त्याना भाषिक व व्यवहारिक ज्ञानात मर्यादा असल्याचे जाणवले. भाषिक, गणितीय ज्ञानाबरोबर सामाजिक विकास करणे हे गरजेचे आहे . असे वेळो वेळी नोदविलेल्या नोंदी वरून स्पष्ट झाले. विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वासाची कमतरता होती नवीन आलेले पाहुणे, शाळेत आलेल्या व्यक्तीशी संवाद साधताना विद्यार्थ्याच्या मनात भीती जाणवली.



संबंधित व्यक्तींशी, तज्ञाशी चर्चा-

सदरील उपक्रम राबवण्यासाठी व शैक्षणिक प्रगतीसाठी अग्रक्रमाने कोणतेही काम करण्यासाठी सदैव तत्पर असलेले रेणापुर केंद्राचे केंद्रप्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक श्री विनायक ढेले सर व जि.प. प्रा. शाळा हाके तांडाचे मुख्याध्यापक श्री गणेश सावळकर यांच्याशी चर्चा केली. सदरील उपक्रम यशस्वी कसा करता येईल यासाठी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. त्याचबरोबर रेणापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री शारवाले साहेब व रेणापूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री पंचगले साहेब यांनाही या उपक्रमाबाबत त्यांनी माहिती दिली. त्यांनी आम्हाला वेळो वेळी योग्य त्या सूचना दिल्या.



आवश्यक साधनांचा विचार –

शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत उपक्रम राबविण्यात येण्याची सुचवले गेले. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना सरावासाठी मराठी विषयाचे वाचन, लेखन करण्यासाठी गणित विषयाची सराव उदाहरणे, इंग्रजी वाचन, लेखन करण्यासाठी आवश्यक ते पीडीएफ बनवणे किंवा इतर शिक्षकांनी बनवलेले पीडीएफ शोधून संग्रहित करण्याचे ठरले. TOYBANK तर्फे देण्यात आलेले साहित्य, गणित, मराठी, इंग्रजी पेटीचा वापर तसेच आवश्यकता असलेली पुस्तके, झेरॉक्स पेपर रीम, प्रिंटर शाई खरेदी करण्याचा ठराव पारित करण्यात आला.









या उपक्रमात प्रत्येक विद्यार्थ्यास एक फोल्डर फाईल मध्ये मराठी इंग्रजी गणित सराव पुस्तिका देण्यात आली. दररोज किमान दीड तास या सराव पुस्तिका सोडून घेण्यात आल्या. प्रत्येक विषयास दररोज अर्धा तास वर्गात सराव पुस्तिका सोडवणे अनिवार्य असल्याची सूचना देण्यात आली. तसेच इंग्रजी, मराठी, गणित पेटी चा नियमित वापर, आठवड्यातून २-३ दिवस TOYBANK साहित्याचा वापर करणे नंतर समांतर पाठाचे पाठ्यपुस्तकातील घटक शिकवण्यास सुरुवात केली.









उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण –

सदरील उपक्रम राबवला असता विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा आत्मविश्वास दिसून आला. कोणताही विद्यार्थी न घाबरता वाचन, लेखन, गणिती प्रक्रिया करत असल्याचे निदर्शनास आले.

विद्यार्थ्यांची चिकित्सकवृत्ती, सृजनशीलता वाढली आहे. इयत्ता पहिली व दुसरीचे विद्यार्थी एकमेकांशी मराठीत चर्चा करत असताना आढळले. त्या विद्यार्थ्यांना मराठीत बोललेले समजत आहे. संवेदनशीलता वाढीस लागली आहे. या उपक्रमा दरम्यान विविध अधिकारी व विषय साधन व्यक्तीनी भेट दिली व विद्यार्थ्यांचे निरीक्षण केले या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक, भावनिक, मानसिक, सामाजिक विकास साधला गेला आहे. सोबत वाचन व गणितीय क्षमतांमध्ये वाढ झाली.



मा. तहसीलदार साहेब आणि नायबतहसीलदार साहेब ता. रेणापूर



मा. विषय तज्ञ पं.स रेणापूर ता. रेणापूर

कार्यवाहीची टप्पे –

हा उपक्रम चार महिन्यासाठी राबविण्यात आला होता जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात राबवण्यात आला होता. यात दररोज दीडतास सरावपुस्तिका सोडवण्यात येते. तसेच दररोज अर्धा तास खेळातून शिक्षण ही संकल्पना राबवली. विविध साहित्यांचा वापर करण्यात आला.

उपक्रमासाठी इतरांची मदत –

या उपक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती, सदस्य, पालक, शिक्षण प्रेमी, नागरीक व आमचे सहकारी शिक्षक यांनी आर्थिक, सामाजिक, भावनिक मदत केली. आपला पाल्य, विद्यार्थी वाचत आहे, बोलत आहे, गणिती प्रक्रिया करत आहेत हे पाहून कौतुक वाटू लागले. विद्यार्थ्यांना त्यांचा आनंद होऊ लागला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात एक नवीन प्रेरणा निर्माण झाली. सर्व विद्यार्थी मनापासून अभ्यास करतात त्यातून एक प्रकारची आम्हाला फार मोठी प्रेरणा मिळाली.



उपक्रमाचे फोटो -













उपक्रमाची कार्यवाही –

जुलै महिन्यातील गुरुवार दिनांक ०७-०७-२०२३ रोजी शाळा व्यवस्थापन समितीची बैठक घेण्यात आली. यात माझी शाळा माझा स्तर हा उपक्रम राबविण्याचा ठराव घेण्यात आला. मी आणि माझे सहकारी उपक्रम राबविण्याबाबत 17- 7- 2023 पासून नोंदी घेण्यास सुरुवात केली होती. कोणत्या विद्यार्थ्याला कोणत्या घटकाचा अधिकचा सराव घ्यावा त्याची सविस्तर नोंद घेऊन तो विद्यार्थी कोणत्या स्तरावर आहे हे ऑगस्ट महिन्यात निश्चित केले. त्याप्रमाणे साहित्याची पीडीएफ फाईलची, पुस्तके, युट्युब व्हिडिओ, विविध शैक्षणिक गेम, TOYBANK साहित्य यांचा सग्रह जमा केला. विद्यार्थ्यांच्या स्तरानुसार आवश्यक ती पीडीएफ एकत्रित करून भाषा, गणित सराव पुस्तिका बनवल्या. त्याचबरोबर भाषा,गणित पेटीचा वापर पण सुरू केला. TOYBANK खेळ याप्रमाणे दररोज प्रत्येक विषयनिहाय अर्धा तास सराव करून घेतला. असे दररोज दीड तास सराव पुस्तिका सोडवणे अनिवार्य असल्याची सूचना विद्यार्थ्यांना देण्यात आली. दर शुक्रवार व शनिवार लॅपटॉप किंवा मोबाईल वरून YouTube वरील मराठी भाषा संभाषण इंग्रजी संभाषण गोष्टी कथा इतर सामाजिक व्हिडिओ दाखवण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सामाजिक, भावनिक विकास होण्यास व आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.वेळोवेळी विविध चाचणी परीक्षा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना या उपक्रमामुळे वाचन, लेखन. गणितीय प्रक्रिया करणे यात गोडी निर्माण झाली. आणि आमच्या उपक्रमाच्या नावाचे सार्थक झाले 'गोडी शिक्षणाची'.

पूर्वस्थिती निरीक्षण व नोंदी –

विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता काही विद्यार्थ्यांना उभाराहून मराठी पुस्तक वाचण्यास सांगितले असता असे निदर्शनास आले की, काही विद्यार्थी वाचनात कमकुवत आहेत. त्याच बरोबर गणिती प्रक्रिया, इंग्रजी वाचन, लेखन मध्ये काही विद्यार्थी कमकुवत असल्याचे जाणवले. त्यांचा स्तर जाणून घेतल्या नंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या स्तरापेक्षा कमी स्तराची कृती करण्यास सांगितले गेले त्यामुळे मुले बोलकी करण्यात यश आले.





कार्यवाही दरम्यानचे निरीक्षण –

अतिशय उत्साहाने विद्यार्थी या उपक्रमामध्ये सहभागी होऊ लागले. तसेच शाळेत गेले असता विद्यार्थी न चुकता वेळेवर आपापली फोल्डर फाईल घेऊन सराव पुस्तिका सोडवत असे. सर्व विद्यार्थी घरी गेल्यानंतर वाचनाचा सराव करत होते. गणितीय प्रक्रिया करतानाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. काही विद्यार्थी इतकी बोलकी झाली होती की स्वतःच्या आई-वडील आजोबा शिक्षक यांच्या विषयी बोलू पाहत होती. शेतातील कामे, कोरोना काळातील परिस्थिती बाबत तुटक्या-फुटक्या भाषेत बोलू लागली. घरी अभ्यास करतेवेळी ची फोटोWHATS APP GROUP वर टाकू लागले.



उपक्रम यशस्वीता फलनिष्पत्ती -

बालकांचा आत्मविश्वास वृद्धीगत झाला. शालेय कार्यक्रमात भाषणे व आपले मत थोडक्यात मांडू लागले. वाचन लेखन गणिती प्रक्रिया सहज करता येऊ लागली. परिसरात घडणारे प्रसंग घटना इत्यादी बाबत स्वतःचे मत निर्भीडपणे मांडू लागले. शालेय परिपाठ किंवा इतर दिनविशेष कार्यक्रम उत्कृष्ट सहभाग घेऊ लागले. आपल्या वर्ग मित्राचा वाढदिवस 'श्रीमंताचा केक' स्वतः केक बनवून साजरा करू लागले.

एकंदरीत या उपक्रमांमधून बालकांचा सर्वांगीण विकास होऊन त्यांची व्यक्तिमत्व विकास होण्यास छान मदत झाली. पालक ही आपले मुले वाचत लिहीत मुले व्यक्त होताना पाहून समाधान व्यक्त करू लागले. शाळेत काहीतरी नवीन घडत आहे, आमची मुले सर्वांसमोर अगदी धीटपणे भाषण करत आहेत. सर्वांसमोर जाऊन न घाबरता बोलत आहेत. याचा आनंद पालकाच्या चेहऱ्यावर दिसू लागला. पालक शिक्षण प्रेमी नागरिक आनंदित होऊन विद्यार्थ्यांचे कौतुक करू लागले आहेत.

सद्यस्थितीमध्ये शाळेतील एकूण विद्यार्थ्यांच्या 95 टक्के विद्यार्थी वर्गनिहाय त्यांना आवश्यक असलेल्या उच्चतम पातळी गाठली आहे. त्या संदर्भात माहे ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात स्तर निश्चिती करून झालेल्या बदलाची नोंद घेण्यात आली आहे. माननीय केंद्रप्रमुख यांना सदर नोंदीचे पत्रक देण्यात आले आहे.







समारोप –

विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागली, ते आत्मविश्वासाने बोलू लागले. विद्यार्थी स्वतःचे मत निर्भीटपणे मांडू लागले. तांड्यात, घरात, शाळेत त्यांचे कौतुक होऊ लागले. साहजिकच त्यांना गुणवत्ता वाढीस उपयोग होऊ लागला आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी आवश्यक ती कौशल्य विकसित होऊ लागले आहेत. पालक समाधानी आहेत, आपली मुले चंचल, बोलकी होत असल्याचे पाहून समाधान व्यक्त करत आहेत. एकंदरीत हा उपक्रम विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, वाचन कौशल्य, गणितीय प्रक्रियेत किमान क्षमता वाढवण्यात उपयुक्त ठरला.

उपक्रमाअंतर्गत सादरीकरण व्हिडीओ YouTube link:-

माता पालक मिटिंग –

https://www.youtube.com/shorts/Opo9eViVy78

सराव-

https://youtube.com/shorts/qqlgOGkSM3o?si=OjyMc3g0XNWGrUAG
https://youtu.be/HQ3Nx9TIRNQ?si=3fIS5z6yzs7gSlaY

उपक्रम क्राफ्ट सराव-

https://youtu.be/1Y8HiXnQu-0?si=QsbS8XhWZtWKxNMD

शालेय कार्यक्रम-

https://youtube.com/shorts/-TfqydVAsnU?si=IfV8URwi4nUorr1i
https://youtube.com/shorts/w-6E4pT4fpk?si=VIYDmg6uPjemaF3b

उपक्रम तपासणी-

https://youtube.com/shorts/zZDtyF5WmR4?si=3xgcrzgbM3_RWSCs

उपक्रम अंतर्गत खेळ:-

https://youtube.com/shorts/su4P-n2-NnE?si=wJ4XkuAdTEKD8xIH
https://youtube.com/shorts/uvoqRmZkBXc?si=lfulr4bfr7gi6JR5

माझी शाळा, सुंदर शाळा

शाळेचे नाव – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खुर्सापार, केंद्र.नांदागोमुख, ता.सावनेर, जि.नागपूर.

Email Id - zppskhursapar1@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – श्री प्रदिप रामनाथ पडवाल







प्रास्ताविक -

जिल्हा परिषद नागपूर मधील पंचायत समिती सावनेर या पंचायत समिती मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खुर्सापार, ही शाळा नागपूर जिल्ह्याच्या सीमेवर आहे. पंचायत समिती पासून लांब असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाबाबत आनंददायी शिक्षण मिळावं यासाठी एक वेगळा उपक्रम घेण्याचं ठरवलं.

शाळेच्या भौतिक गोष्टी जर पाहिल्या तर बऱ्यापैकी कमी होत्या. त्यानंतर मी विचार केला की याच्यामध्ये काहीतरी बदल व्हायला हवा. तर तो बदल घडवण्यासाठी मी खूप प्रयत्न केले. त्यानंतर माझे प्रयत्न बघून ग्रामपंचायत तसेच पालकांनी सुद्धा त्यामध्ये हातभार लावला. त्यामुळे विद्यार्थी विकास आणि शाळा विकास करण्यामध्ये मला सोयीस्कर गेले.

शैक्षणिक वातावरणाची सुद्धा कमतरता या परिसरामध्ये वाटत होती. ती कमतरता भरून काढण्यासाठी हे सर्व करणे खूप गरजेचे होते. हे केल्यानंतरच शाळेमध्ये बदल होईल अशी मला आशा होती. जर आपण काही करायचे ठरवले तर आपण ते केल्याशिवाय थांबत नाही हे खरे आहे आणि मी तसेच करण्याचे ठरवले आणि त्यानुसार जसं जसे मी काम करत गेलो तसतसे समस्या सुटत गेल्या.

शाळेत राबवले जाणारे उपक्रम-

स्वच्छ शाळा , सुंदर शाळा

सुंदर परिसर, सुंदर शाळा

आदर्श परिपाठ

दिनांकानुसार पाढा

रोजचे स्पेलिंग

सामान्यज्ञानावर आधारित रोज एक प्रश्न

कथेचे सादरीकरण

चित्रकला स्पर्धा

रांगोळी स्पर्धा


क्रीडा स्पर्धा

सांस्कृतिक स्पर्धा

महिला मेळावा

हळदी कुंकू स्वतंत्र कार्यक्रम

बाल आनंद मेळावा, खाद्य पदार्थांचे गाळे



वृक्षारोपण/वृक्षसंवर्धन

हातधुवा मोहीम

सर्व शासकीय योजना राबवणे

वर्षासहल

क्षेत्रभेटी

वर्गसजावट

स्वच्छता अभियान

लेक वाचवा, लेक शिकवा

माझी समृद्ध शाळा

स्नेह संमेलन

आरोग्य तपासणी

झाडे लावा, झाडे जगवा

माझी शाळा, सुंदर शाळा

सुंदर माझे अक्षर


बालसभा

१००% पटनोंदणी, १००% उपस्थिती

शालेय मंत्रिमंडळ निवडणुकीसाठी EVM चा वापर - आमच्या जि.प.शाळेत शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच शालेय मंत्रिमंडळ निवडणूक voting machine, TAB चा वापर करून करण्यात आली.नागपूर जिल्ह्यात प्रथमच आमच्या जिल्हा परिषद शाळेत EVM च्या पद्धतीनेच निवडणूक घेण्यात आली .सदर उपक्रमाची प्रसार माध्यमानीही दखल घेतली.

पालक व शिक्षक WhatsApp group – विद्यार्थ्यांची प्रगती,विद्यार्थ्यांचा घरचा अभ्यास, विद्यार्थ्यांच्या गैरहजेरी बाबत सदर ग्रुपवर मार्गदर्शन केले जाते.तसेच शाळेतील उपक्रम पालकांपर्यंत वेळोवेळी पोहचवले जातात.

असे विविधरंगी उपक्रम या शाळेत राबवण्याबरोबरच शाळेतील पालकांचा विश्वास संपादन करण्यात शाळेचे मुख्याध्यापक श्री.प्रदिप पडवाल सर व सहशिक्षक श्री.शरद काकडे सर यांनी यश मिळवले आहे. त्याचबरोबर नांदागोमुख केंद्राचे उत्साही, हसतमूख केंद्रप्रमूख आदरणीय श्री.राजेंद्र भलवतकर साहेब यांचे वेळोवेळी अनमोल मार्गदर्शन व सहकार्य नेहमीच असते. या मूळेच शाळेत विद्यार्थी उपस्थिती शंभर टक्के असते. या शाळेतील मुले बहूतांशी गरीब घरातील आहेत. मात्र गुणवत्तेच्या बाबतीत ही सरस आहेत .आज इंग्रजी



शाळाचे वाढते प्रस्थ लक्षात घेता आजही ही शाळा भक्कम पाय रोवून उभी आहे व या शाळेची गुणवत्तेकडे यशस्वी वाटचाल सुरु आहे. अशा या निसर्गरम्य शाळेस नक्कीच भेट द्यायलाच हवी.

मुख्याध्यापक/शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी किंवा मुख्याध्यापक/शिक्षक यांनी विषय संदर्भात अधिक प्रभावी केलेले काम -

आनंददायी शिक्षण निर्माण करण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे भौतिक सुविधा चांगल्या असणे, परिसर स्वच्छ सुंदर असणे. शाळेची रंगरंगोटी. स्वच्छतागृह. कोणाकडून तरी काम करून घेणे यापेक्षा आपण स्वतः ते काम का नाही करावे. ही युक्ती वापरत आम्ही दोन्ही शिक्षकांनी जाणवत असलेल्या समस्येवर काम करण्याचे ठरवले. रंगरंगोटी करत असताना आम्ही ब्रश हातामध्ये घेतला, झाडू हातामध्ये घेतला आणि परिसराची स्वच्छता करण्यास सुरुवात केली.


या अडचणींवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक शिक्षकांनी केलेल्या उपाययोजना किंवा मुख्याध्यापक, शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी -

आर्थिक बाब पूर्ण करणे हे आमच्यासमोर मोठे आव्हान होते. मात्र आम्ही स्वतः खिशातून पैसा खर्च करून सुरुवात केली. त्यामुळे सर्व ग्रामस्थ व ग्रामपंचायत यांना आमचं काम बघून प्रेरणा मिळाली की, आपण सुद्धा यांना मदत करावी आणि तिथून मग आम्हाला मदत मिळण्यास सुरुवात झाली.

शाळा मध्यप्रदेश बॉर्डरवर असल्यामुळे शाळेच्या बाजूलाच प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोठे चेक पोस्ट आहे. त्याच चेक पोस्टवर जाऊन मदतीचे आवाहन केले आणि तेथील साहेबांनी शाळेला मदत केली. तब्बल 65 हजार रुपयाची मदत आम्हाला त्या चेकपोस्ट च्या माध्यमातून मिळाली.

शाळेमध्ये समाजसुधारकांचे फोटो उपलब्ध करून घेण्यासाठी गावातील लोकांना आवाहन केले आणि गावातील बऱ्याच लोकांनी कोणी एक फोटो, कोणी दोन फोटो अशा पद्धतीने शाळेमध्ये समाज सुधारकांचे फोटो भेट म्हणून दिले.

त्यानंतर भिंती आम्हाला रंगवायच्या होत्या. मात्र आर्थिक बाब कमी असल्यामुळे त्याच्यावर एक वेगळा उपाय म्हणून आम्ही शैक्षणिक बॅनर शाळेमध्ये लावण्याचे ठरवले आणि शैक्षणिक बॅनर साठी सुद्धा असंच आव्हान आम्ही लोकांना केलं तर लोकांनी सुद्धा तसंच एक बॅनर, कोणी दोन बॅनर अशा पद्धतीने शैक्षणिक उठाव वाढला आणि तो बदल घडत गेला.



मुख्याध्यापक/शिक्षक यांनी निवडलेल्या विषयासंदर्भातील अडचणी दूर केल्यानंतर किंवा मुख्याध्यापक/ शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेल्या अंमलबजावणीनंतर दृश्य परिणाम/फलनिष्पत्ती/यशोगाथा -

आर्थिक अडचण दूर झाल्यामुळे आमचा मार्ग मोकळा झाला आणि त्यानंतर आम्ही परिवर्तन करण्यास सुरुवात केली. शाळा परिसर स्वच्छ आणि सुंदर बनवलं. शाळा परिसर स्वच्छ आणि सुंदर झाल्यामुळे परिसरातील लोक शाळेमध्ये भेट द्यायला लागले.

एकदा मध्यप्रदेश मधील अंजनगाव मधील ग्रामस्थ शाळेत येऊन, "आमच्या मुलांना आपल्या शाळेत प्रवेश घेतला तर चालेल का ?" अशी विचारणा करायला लागले.

जिल्हा शिक्षण सभापती माननीय श्री कुसुंबे साहेब यांनी रविवारी सुट्टीच्या दिवशी शाळेला अचानक भेट दिली.आम्ही दोन्ही शिक्षक शाळेतच काम करत असल्याने साहेबांना विशेष वाटले. तसेच त्यांनी शाळेचे बदललेले स्वरूप पाहून भरभरून कौतुक केले. पंचायत समिती सावनेर मधील उपसभापती माननीय श्री.राहुलजी तिवारी साहेब यांनी सुद्धा शाळेला भेट दिली. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी माननीय श्री.हिरूडकर सर व आमचे गटशिक्षणाधिकारी माननीय श्री सावरकर सर यांनी सुद्धा शाळेला भेट दिली.

शैक्षणिक वातावरण सुधारले. विद्यार्थी आनंददायी शिक्षण घ्यायला लागले. यापूर्वीची शाळा आणि आत्ताची शाळा यामध्ये त्यांना भरपूर फरक जाणवायला लागला. त्यासंबंधी एक व्हिडिओ आहे तो व्हिडिओ बघावा.

https://www.youtube.com/watch?v=C-luUDTyySw

समारोप -

शाळेच्या आजतागायतच्या बदलामध्ये हा बदल खूप मोठा आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे आले. विद्यार्थी जेंव्हा अश्या बदलाबद्दल बोलतात याचा अर्थ नक्कीच शाळेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे.

हे सर्व करत असताना तालुक्याचे माननीय गटशिक्षणाधिकारी श्री कश्यप सावरकर सर, नांदागोमुख केंद्राचे केंद्रप्रमुख माननीय श्री भलवतकर सर, बी आर सी मधील धोटे सर व सर्व अधिकारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

सर्व फोटो व video साठी गुगल ड्राईव्ह लिंक -

https://drive.google.com/drive/folders/1QeyWnjtAbeB-ez4n1MFSkuspmFjRTn9S

हसत खेळत शिकवूया, शाळेत विद्यार्थी टिकवूया

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डौर,मु. डौर पो. आरळी, ता. बिलोली, जि. नांदेड


मुख्याध्यापकाचे नाव – श्री माधव शिंदे

सहशिक्षक – सौ.शिवकन्या मधुकरराव पटवे

गरज व महत्व -

जिल्हा परिषद शाळांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त असते. बरेच ठिकाणी त्यांना घरी कोणतेही शैक्षणिक वातावरण नसते. अंगणवाडीतही विद्यार्थी फारसे शिकत नाहीत. 6 वर्षाचे झाले की शाळेत येतात. 3 ते 6 वर्षापर्यत मनमोकळ दिवसभर खेळायची त्यांना सवय असते. इयत्ता पहिली मधे प्रवेश घेतला की हे विद्यार्थी सुरुवातीला शाळेच्या वातावरणाला घाबरतात शाळा म्हणजे शिस्तिचे, बंधनाचे ठिकाण असा त्यांचा गैरसमज असतो हीच भिती, गैरसमज दूर करुन शाळा म्हणजे हसत खेळत शिकण्याच ठिकाण आहे हे विद्यार्थ्यांना वाटल पाहिजे आणि यासाठी सर्वात मोठी जबाबदारी इयत्ता पहिलीच्या शिक्षकाची असते .माझा हा उपक्रम मी इयत्ता पहिली वर्गासाठी राबवला आहे पहिलीच्या विद्यार्थ्यांना शाळेची,अभ्यासाची मनातून गोडी लागावी यासाठी मी पहिलावर्ग घेतला तेंव्हाच मनात ठरवलं की मुलांना प्रेमानी हसत खेळत शिकवायच, शाळा त्यांना हवीहवीशी वाटली पाहिजे. रडत येणारे विद्यार्थी हसत उडया मारत शाळेत आले पाहिजेत. हसत खेळत आपण अभ्यास कधी केला हे त्यांना कळायलाही नको एवढे छान उपक्रम आपण राबवायचे जेणेकरून विद्यार्थी शिकले ही पाहिजे व शाळेत टिकलेही पाहिजे.

माझी शाळा जि. प. प्रा. शाळा डौर,डौर हे गाव डोंगराच्या कुशीत वसलेल आहे येथे 97% मुस्लिम अल्पसंख्यांक समाज आहे अतिशय गरीब रोजंदारी करून पोट भरणारी ही वस्ती यांचा बाहेरच्या जगाशी काही संबंध नाही. आपल गाव हेच त्यांच विश्व 97 % मुस्लिम समाज असल्याने त्यांची भाषा हिंदी त्यांना मराठी अजिबात समजत नाही. तरीही गावात मराठी माध्यमाची सरकारी जि प शाळा त्यामुळे भाषेचा खूप मोठा प्रश्न इथे आहे अशा परिस्थितीत मुल जेंव्हा इयत्ता पहिलीत शाळेत येतात तेंव्हा शाळेची खूप मोठी जबाबदारी असते की घरातील वातावरण व शाळेतील वातावरणात त्या मुलांना समजून घेऊन व त्यांच्या परिस्थिती नुसार त्यांना अध्यापन केले तरच हे विद्यार्थी शाळेत शिकतात व टिकतात. इयत्ता पहिल्या वर्गासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. पहिलीत आल्यानंतर विद्यार्थी सुरुवातीला घाबरतात व त्यामुळे सुरुवातीचे एक दोन महिने त्यांचे नुकसान होते आपण जर हसत खेळत वातावरण ठेवले तर हे विद्यार्थी सुरुवातीपासूनच शाळेमध्ये खूप छान रमतात व नकळत त्यांचा अभ्यासक्रमही पूर्ण होतो शाळा म्हणजे बंधन नसून घराप्रमाणेच इथेही कोणताही त्रास नाही तर आनंद आहे अशी त्यांची धारणा होते व हळूहळू हे विद्यार्थी अभ्यास करू लागतात व अभ्यासाची गोडी त्यांना लागते याकरिताच हा उपक्रम शाळेत राबविण्यात आला.



उद्दिष्टे -

1) इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची शाळेविषयीची भीती दूर करणे

2) हसत खेळत शिक्षण देणे

3) विद्यार्थ्यांचे संबोध कृतीयुक्त अध्यापनातून पक्के करणे

4) स्व-अनुभवातुन शिकण्याची संधी उपलब्ध करुण देणे

नियोजन -

हा उपक्रम इयत्ता 1 लीच्या 24 विद्यार्थ्यांवर राबवला.यासाठी विविध अध्यापन पद्धतींचा अभ्यास केला व हसत खेळत शिक्षण या अंतर्गत इयत्ता पहिलीसाठी नवीन अध्यापन पद्धतीचा वापर केला.

1 कृतीयुक्त अध्ययन अध्यापन

2 ज्ञान रचनावाद


3 कलेतून शिक्षण

4 माता पालकांच्या मदतीतून शिक्षण

5 तंत्रज्ञानाचा वापर करून दिले जाणारे शिक्षण

6 वेगवेगळ्या खेळाच्या माध्यमातून दिले जाणारे शिक्षण

वरील पद्धतींचा वापर योग्य रित्या करण्यासाठी वेगवेगळ्या कृती तयार करण्यात आल्या. त्याप्रमाणे अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, अध्ययन निष्पत्ती यांची पूर्तता करत असतांना हसत खेळत अगदी सोप्या पद्धतीने कृती करून विद्यार्थ्यांना अध्यापन केले. यासाठी शाळेतील शिक्षक, मोठ्या वर्गातील विद्यार्थी, पालक यांची खूप मदत झाली कोणतीही गोष्ट आपण जेव्हा नियोजन करून करतो तेव्हा अडचणी आपल्याला आधीच कळतात त्यामुळे त्या अडचणींवर मात करण्यासाठी लागणारी मदत याचे नियोजन आपण करतो त्याप्रमाणे नियोजन करून लागणारे साहित्य तयार केले जेणेकरून तो संबोध विद्यार्थ्यांना सहज समजावा व दीर्घकाळ स्मरणात राहावा. शासनाने ठरवून दिलेला अभ्यासक्रम तसेच विद्याप्रवेश उपक्रम व पाठ्यक्रम या सर्वांची सांगड घालून नियोजन तयार करण्यात आले. विद्यार्थी अगदी सहज हसत खेळत शिकतील याकडे विशेष लक्ष दिले. नियोजन करत असताना आठवड्याचे नियोजन करून प्रत्येक आठवड्यात विद्यार्थ्यांसाठी कोणत्या कृती घ्यायच्या त्यासाठी शैक्षणिक साहित्य तयार करायचे त्यानुसार कार्यवाही चे नियोजन करण्यात आले.



कार्यवाही -

सदर उपक्रमाची सुरुवात एक जुलै 2022 पासून केली सर्वात प्रथम सर्व विद्यार्थ्यांची एकमेकांना ओळख व्हावी यासाठी अगदी पहिला उपक्रम स्वपरिचय हा घेतला.

1) **स्व- परीचय -**

यात प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या नावाच्या चिठ्ठ्या करून त्या प्रत्येकाच्या खिशाला लावल्या व गोल बसून गप्पा मारत एकमेकांचा परिचय करून घेतला त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने उठून स्वतःचे नाव पूर्ण वाक्यामध्ये सर्वांना सांगायचे याप्रमाणे आमच्या या उपक्रमाची सुरुवात झाली यातून विद्यार्थ्यांना मोकळ बोलता याव, धीटपणे सर्वांपुढे बोलता याव हा उद्देश्य होता आणि त्या दिवशीच विश्वास वाटला की हा उपक्रम अगदी यशस्वीपणे राबवला जाऊ शकतो . विद्यार्थी आणि आनंदाने हसत खेळत शिकू लागले आणि शाळेमध्ये दिवसभर आनंदाने थांबू लागले.

2) **कृतीयुक्त गाणी** –

लहान मुलांना गाणी, बडबड गीते, नृत्य, करायला खुप मनातून आवडते. वर्गात 98%विद्यार्थी मुस्लिम असल्याने त्यांना मराठी भाषा बिलकुल समजत नाही. कृती व वाक्याचा संबध जोडून त्यांना मराठी भाषा समजेल, त्यांना मराठी भाषा आवडेल या हेतूने हा उपक्रम दररोज़ घ्यायचा अस ठरवलं आणि दररोज एक नवीन गीत कृतीसह मुलांकडून सादर करून घेतले. यासाठी लहान मुलांना आवडणारी वेगवेगळी कृती, गीते शोधली त्यावर विचार केला व कृतीसह ती मुलांकडून करून घेतली यातून मुलांना मराठी भाषेविषयी आस्था निर्माण झाली व त्यांना मराठीची वाक्य कृतीमुळे कळू लागली. याचा फायदा भाषा अभ्यासासाठी झाला मराठी भाषा म्हणजे खूप काहीतरी वेगळी भाषा आहे असा समज विद्यार्थ्यांचा आहे कारण त्यांना मराठी भाषा गावामध्ये ऐकायलाही मिळत नाही. सर्व लोक हिंदीतून संवाद साधत असल्यामुळे त्यांना मराठी भाषा खूप अवघड वाटते .त्यामुळे अशा गीतांच्या माध्यमातून आपण विद्यार्थ्यांना मराठी भाषा खूप सोपी आहे व ती तुम्हाला समजू शकते असा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करता आला .यासाठी खालील मराठी गीतांचा उपयोग करून घेतला.

असावा सुंदर चॉकलेटचा बंगला


एवढी मोठी आजी

गंपूने केले साबणाचे फुगे

घड्याळात वाजला एक

आत्याची आली मला तार आत्या मला फोन करणार

दिल मला कोकणात माझं माहेर पुण्यात



खबडक खबडक घोडोबा

दहा बाई चिमण्या

झुक झुक झुक झुक आगीनगाडी

रेल्वे बैठे तो पंजाबी

आई मला पावसात जाऊ दे

चवदार चवळी


एक लाकूडतोड्या

गाडी आली चला पळा रे

अशाप्रकारे बालगीते दररोज एक याप्रमाणे वर्गात कृतियुक्त सादर करून घेतली जातात. त्यामुळे विद्यार्थी खूप आनंदी दिसून आली आणि शाळेत दररोज उपस्थित राहू लागली. आपण आज काहीतरी नवीन करणार आहोत नाचायला, गायला मिळते या उद्देशाने विद्यार्थी शाळेत रमू लागली.

3) **खेळातून शिक्षण -**

इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासापेक्षा खेळ जास्त आवडतो आणि याच गोष्टीचा आपण वापर करून घेतला तर विद्यार्थी खेळत खेळत शिकू शकतात यासाठी नियोजनाची आणि पूर्वतयारीची अत्यंत गरज असते सर्वप्रथम शिक्षकांनी त्या वर्गातील विद्यार्थ्यांची मानसिकता ओळखून त्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाला मिळते जुळते खेळ आधी शोधून काढले पाहिजेत आणि त्यानंतर त्या अभ्यासाची सांगड या खेळामध्ये आपण जर घातली तर विद्यार्थी अतिशय आनंदाने तो खेळ खेळतात आणि त्यांना जाणीवही होत नाही की आपण अभ्यास करत आहोत. खेळातून आपोआपच त्यांच्या ज्ञानाचे दृढीकरण होते ते मनातून खेळत असल्यामुळे त्यांचे संबोध पक्के होतात. विद्यार्थी नकळत अभ्यासाकडे वळले जातात आणि शिक्षकांचा ताणही कमी होतो यासाठी खेळातून शिक्षण ही संकल्पना खूप आवडते यासाठी अनेक खेळांचे आयोजन केले जाते. याचे उदाहरण घ्यायचं झालं तर क्रीडांगणावर जमिनीवरती ऑइल पेंट च्या साह्याने गोल आखलेले आहेत त्यामध्ये आपण शिकवलेली अक्षरे लिहायची उदाहरणार्थ प म य स र न स ह ल मध्ये सहा अक्षरे लिहायची व विद्यार्थ्याला समोर उभे करायचे आपण अक्षर सांगायची आणि विद्यार्थी त्या अक्षरावरती उडी मारतील आपण सांगितलेल्या अक्षरावरती जर त्यांनी उडी नाही मारली तर तो आऊट याप्रमाणे आपण जर हा खेळ घेतला तर विद्यार्थी अक्षरे, मुळाक्षरे खूप चांगल्या प्रकारे लक्षात ठेवतात व आपण जिंकले पाहिजे यासाठी त्या अक्षरावर ती बरोबर ते उडी मारून ती अक्षरे कायमस्वरूपी लक्षात ठेवतात. ती अक्षरे अभ्यास म्हणून मुले लक्षात ठेवत नाहीत , तर एक चित्र एक आकृती म्हणून ते लक्षात ठेवतात आणि याचाच फायदा पुढे आपल्याला अक्षर शिकवताना, शब्द शिकवताना नक्कीच होतो याच प्रमाणे आपण अंकांचाही खेळ घेऊ शकतो. समजा आपण 11 ते 20 अंक विद्यार्थ्यांना शिकवले तर याचप्रमाणे सहा , सात गोल बनवायचे आणि त्यामध्ये 11 ते 20 मधल्या सहा, सात संख्या घ्यायच्या आणि त्यानंतर त्या विद्यार्थ्यांना आपण कोणतीही एक संख्या सांगायची आणि त्यांना



त्यामध्ये उडी मारायला सांगायची, जर विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या अंकावरती बरोबर उडी मारली तर तो विद्यार्थी जिंकेल आणि सांगितलेल्या अंक वरती बरोबर उडी नाही मारली तर तो विद्यार्थी बाद ठरेल याप्रमाणे आपण हा खेळ घेऊ शकतो आणि विद्यार्थी अतिशय आनंदाने हा खेळ खेळतात याचा खूप छान अनुभव आलेला आहे. यामुळे संख्याज्ञान, अक्षर ज्ञान विद्यार्थ्यांची एबीसीडी त्याचप्रमाणे एबीसीडी चाही हा खेळ आपण घेऊ शकतो. सहा सात गोल मारून त्यामध्ये येते झेड पर्यंतची सहा-सात अक्षरे त्यामध्ये आपण लिहायची आणि सांगितलेल्या अल्फाबेट्स वरती विद्यार्थ्याला उडी मारायला सांगायची आणि हा खेळ घ्यायचा याप्रमाणे आपण जर घेतला तर विद्यार्थ्यांचे अंक अक्षर आणि इंग्रजीतले अल्फाबेट्स हे पक्के होतात आणि याचा फायदा नक्कीच होतो. हा खेळ इयत्ता पहिलीसाठी अतिशय उत्तम वाटला आणि याचा परिणाम चांगला मिळाला. दोन विद्यार्थी स्वतःहून मध्यंतरात किंवा जेव्हा त्यांना क्रीडांगणावरती पाठवतो तेव्हा ते आपले आपले खेळायला लागतात आणि हे पाहून खरोखरच आपल्याला अतिशय आनंद होतो .आपण विद्यार्थ्यांकडून अंकवाचन , पाढे , संगीतमय पाढे घेतो तर टाळ्यांच्या तालावरती जसं आपण गरबा दांडिया खेळतो तसं गरबा किंवा दांडियाच्या तालावरती आपण अशा प्रकारचे अंक किंवा पाढे घेऊन अतिशय तालासुरामध्ये पाढे विद्यार्थी पाठ करतात दांडियाचा देखील आनंद घेतात याचाच फायदा अभ्यासामध्ये होतो.





https://www.youtube.com/watch?v=pXN_euS-Kq0

https://youtu.be/2--8jTQJOAM

https://youtu.be/slbeT_Ux3d4

4) कलेच्या माध्यमातून शिक्षण

जर पाठ्यक्रमातील कुठलाही विषय घेतला तर त्याचा संबंध हा कुठे ना कुठे कलेशी नक्कीच येत असतो. कलेची जोड जर अध्ययन अध्यापनात असेल तर विद्यार्थी नक्कीच त्या विषयांमध्ये रमतात याचा अनुभव सांगायचा झाला तर विद्यार्थ्यांना आपण जेव्हा कुठलही पाठ्यपुस्तक नवीन जेव्हा देतो तेव्हा सर्वात आधी विद्यार्थी काय पाहत असतील तर त्यातली चित्र विद्यार्थी आधी पाहतात कारण ते विद्यार्थ्यांना खूप आवडतात. चित्र असलेली पुस्तके त्यांना खूप हवीहवीशी वाटतात आणि ती पुस्तके त्यांच्या आवडीची असतात. त्यामुळे आपण जर कलेचा वापर या शिक्षणामध्ये केला तर नक्कीच खूप फायदा होईल आणि याचाच फायदा घ्यायला हवा यासाठी इयत्ता पहिलीच्या वर्गामध्ये जास्तीत जास्त चित्रकला कार्यानुभव असा विषय असेल तर या कलेच्या माध्यमातून अभ्यास कसा घेता येईल याकडे लक्ष दिले जाते. लहान मुलांना सर्वात आधी जर त्यांचं लेखन सुधरायचं असेल तर त्यांना अगोदर त्यांची बोटांची जी पकड असते, पेन वरती पेन्सिल वरती ती चांगली होणं खूप महत्त्वाचे असते आणि त्यासाठी सर्वात उत्तम उपाय म्हणजे विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त चित्र रंगवायला देणं. चित्र रंगवायला देण्याची सवय जर विद्यार्थ्यांना लावली तर नक्कीच विद्यार्थ्यांचे अक्षर खूप छान होते आणि जे काही पहिलीचे विद्यार्थी असतील ते लिहिताना नेहमी जाणवतं की विद्यार्थ्यांना हातात पेन धरल्यानंतर हाथ थरथर कापतो किंवा त्यांना ते वळणदार अक्षर काढता येत नाही. गोल असेल किंवा जे काही अवघड अक्षर असतील तेव्हा विद्यार्थ्यांना खूप अडचणी येतात, त्यासाठी जास्तीत जास्त

विद्यार्थ्यांकडून चित्र रंगवून घेतली जातात त्यामुळे विद्यार्थ्यांना तर चित्र काढण्याची एवढी सवय लागली की कुठेही चित्र जर दिसले पुस्तकांमध्ये की ते आधी रंगवून टाकतात. त्यांचं कुठलंही पुस्तक पहा त्या पुस्तकांमध्ये तुम्हाला एकही चित्र दिसणार नाही की जिथे त्यांनी रंग भरलेले नाही , याचाच फायदा आपण आपल्या अभ्यासासाठी करून घेतला तर नक्कीच कलेच्या माध्यमातून आपण आपल्या विद्यार्थ्यांना चांगल्या विषयाकडे वळवू शकतो. यामध्ये विद्यार्थ्यांचे ठसे काम जेव्हा घेतलं तेव्हा खरोखरच विद्यार्थ्यांना आनंद झाला आणि ठ्श्यामधून मग वेगवेगळ्या प्रकारच्या आकार शिकवले .विद्यार्थ्यांना स्वतःच्या अंगठ्याचे ठसे लावायला सांगितले असे वेगवेगळ्या प्रकारच्या कलाकृती त्यातून घेतल्या आणि विद्यार्थी हे जेव्हा आई-वडिलांना आणून दाखवतात तेव्हा त्यांना त्यांचे खूप कौतुक वाटतं . वेगवेगळ्या प्रकारच्या अशा उपक्रमांचा समावेश अध्ययन अध्यापनामध्ये नेहमीच केला जातो यामध्ये चिंचुके, सीताफळाच्या बिया किंवा झाडाच्या शेंगांमध्ये ज्या काही बिया निघतात त्या बिया विद्यार्थी एकत्र करतात आणि त्यापासून वेगवेगळे अंक, अक्षर लिहिणं त्यापासून घर बनवणे, झाड बनवणे, वेगवेगळ्या प्रकारचे आकार बनवणे, चौकोन, त्रिकोण अशा प्रकारचे आकार देखील विद्यार्थी बनवतात आणि अशा छोट्या छोट्या कृती असतात परंतु त्यातून कृती केल्यामुळे त्या गोष्टी त्यांच्या जास्त लक्षात राहतात.



https://youtu.be/oZC84i8UxRg

5) एक तास TV चा -

एक तास टीव्हीचा या उपक्रमांतर्गत इयत्ता पहिलीचे विद्यार्थी वर्गामध्ये बसून कंटाळतात तेव्हा त्यांना दर 15 ते 20 मिनिटानंतर वेगळी ऍक्टिव्हिटी घेणे अपेक्षित असते. अशावेळी एक शिक्षक म्हणून आपल्याला अशा ऍक्टिव्हिटी चे खूप नियोजन करावे लागते आणि दर 15 ते 20 मिनिटानंतर कृती बदलावी लागते तरच विद्यार्थी वर्गामध्ये रमतात व शिकतात या उपक्रमांतर्गत दुपारच्या वेळेमध्ये विद्यार्थ्यांना कंटाळा आलेला असतो,त्यामुळे त्यांच्या आवडीचं काहीतरी घ्यावं आणि त्यातून त्यांचे शिक्षणही व्हावं या उद्देशाने दुपारी तीन ते चार हा वेळ ई लर्निंग साठी असून यामध्ये विद्यार्थ्यांना अँड्रॉइड टीव्ही वरती वेगवेगळ्या व्हिडिओच्या माध्यमातून गाणी, गोष्टी, नृत्य, चित्रकला, गणितीय संबोध, भाषा विषयातील व्हिडिओ, कविता, प्रार्थना खेळ गमतीजमती त्यासारखे वेगवेगळे व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवले जातात आणि विद्यार्थी ते आनंदाने पाहतात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या घरी टीव्ही नसल्याकारणांनी त्यांना टीव्ही पाहायला खूप आवडते व ते मन लावून पाहतात मनोरंजनाबरोबरच त्यांना यातून भरपूर शिक्षण मिळते व दृकश्राव्य साधन असल्याकारणाने ते दीर्घकाळ स्मरणात राहते. आज ऐकलेली गोष्ट, गाणी विद्यार्थी दिवसभर गुणगुणतात त्यामुळे त्याचे दृढीकरण होते आणि याचा आपल्याला अध्ययन अध्यापन प्रक्रियेसाठी खूप चांगल्या प्रकारे होतो , विद्यार्थीही यामध्ये खूप रमतात दीक्षा वरील अनेक कार्यक्रम , डिजिटल साक्षर, फन विथ मॅथ यासारख्या शैक्षणिक एप वरील व्हिडिओ टीव्हीवर दाखवले जातात यातून विद्यार्थ्यांचा पाठ्यक्रम अतिशय चांगल्या प्रकारे पूर्ण होतो व विद्यार्थ्यांचे संबोध स्पष्ट होतात.



6) ताई बनल्या बाई -

शाळेतील मोठ्या वर्गातील विद्यार्थीनींची आम्ही खुप मदतघेतो,अगदी मधल्या सुट्टीत ,शाळा सुटल्या नंतर आपल्या जवळपासच्या मुलांना त्या अभ्यासाला घेऊन बसतात. वर्गाचे गट करुन त्यांना अश्या ताई गटाला दिल्या आहेत त्या त्यांना अभ्यासात मदत करतात.



6) शिक्षणात माता पालकांचा हसत खेळत सहभाग -

इयत्ता पहिलीच्या वर्गात विद्यार्थी जेव्हा येतो तेव्हा तो त्याच्या घरातील वातावरणातून आईपासून पहिल्यांदाच तो शाळेत दूर राहत असतो. त्यामुळे त्याला जर इयत्ता पहिलीच्या वर्गामध्ये छान रमवायचे असेल अभ्यासामध्ये त्याचे मन रमेल या दृष्टीने आपण त्याच्या मानसशास्त्राचाही तितकाच विचार करायला हवा असे वाटते त्यामुळे आपण जर इयत्ता पहिलीच्या वर्गातील मुलांच्या शिक्षणामध्ये त्यांच्या आईचा सहभाग जर घेतला तर विद्यार्थ्यांना घर आणि शाळा हे वेगळे आहेत असं वाटणारच नाही आणि घरातील जसा मोकळ्या वातावरणात विद्यार्थी वाढतात त्याप्रमाणे शाळेतील बाई देखील आपल्या आईप्रमाणेच आहेत आणि आई देखील शाळेतल्या शिक्षिकेप्रमाणेच आहे असे त्यांना वाटू लागते आणि ते शाळेमध्ये छान रमतात आणि ते पुढे शाळेमध्ये चांगल्या प्रकारे अभ्यास करून ते शाळेत टिकतात त्यामुळे वर्गातील विद्यार्थ्यांच्या आईशी आम्ही नेहमी भेटतो आणि त्यांना घरी राहून आपल्या विद्यार्थ्यांचा अभ्यास छोट्या छोट्या कृतींमधून कसा घ्यायचा हे समजून सांगतो . आई कितीही अडाणी असेल तरीही छोट्या छोट्या कृतींमधून ती त्यांना मोजणी, आकार बेरीज, वजाबाकी वेगवेगळ्या गोष्टी गाणी चित्रात रंग भरणे यासारख्या गोष्टी मी सहज करू शकते आणि यासाठीच आपल्याला आईला प्रोत्साहन द्यायचे आहे आणि तिला आपल्या पाल्याच्या शिक्षणामध्ये सहभागी करून घ्यायचे आहे, याच उद्देशाने आम्ही त्यांना वेळोवेळी भेटतो त्यांच्याशी संपर्कात राहतो त्यांना शाळेमध्ये दर आठवड्याला बोलवतो आणि अशा वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करून त्या शिक्षणामध्ये कशा सहभागी होतील आपल्या विद्यार्थ्यांचा अभ्यास कशा घेतील, विद्यार्थ्यांना शाळेमध्ये झालेल्या गोष्टींची बोलकं कसं करतील याकडे विशेष लक्ष देतो आणि त्याप्रमाणे अनेक आई पालक सहकार्य करतात आणि सांगितल्याप्रमाणे घरी कृती करून घेतात चर्चा करतात आणि घरी मुले कशी वागतात कशी बोलतात यावर त्या

भेटायला आल्यानंतर अगदी मनमोकळेपणाने सांगतात. याचा फायदा असा होतो की विद्यार्थी घरात कसे वागतात आणि शाळेत कसे वागतात याविषयी फरक ही कळतो

7) कृतीयुक्त अध्ययन अध्यापन

वर्गामध्ये अध्यापन करत असताना आणखी एक पद्धती म्हणजे कृतीतून शिक्षण . कारण असा ठाम विश्वास आहे की आपण लहान वर्गाला जे काही कृतीतून घेतो ते दीर्घकाळ त्यांच्या स्मरणामध्ये राहते आणि त्यांना ती गोष्ट शिकण्यास खूप आनंद वाटतो आणि सहज शिक्षण होते विद्यार्थ्यांवर कुठलाही दबाव न देता सहज झालेले शिक्षण नैसर्गिक शिक्षण त्यांना चिरकाल स्मरणात राहते .म्हणून आपण जेव्हा एखादी गोष्ट विद्यार्थ्यांना शिकवत असतो तर त्यावर आधारित एखादे कृती विद्यार्थ्यांकडून करून घेता येईल का , जेणेकरून ती कृतीतून ते विद्यार्थी शिकतील आणि ती गोष्ट त्यांना दीर्घकाळ स्मरणात देखील राहील आणि त्यांचा संबोध हा पक्का होईल यासाठी प्रयत्न असतो . लहान वर्गामध्ये अशा अनेक कृती आपल्याला घेता येतात, जवळपास प्रत्येक घटक शिकवत असताना असा प्रयत्न असतो की विद्यार्थ्यांना त्या घटकावर आधारित कृतीची संधी दिली जाते.

उदा : गणितामध्ये बेरीज शिकवतो तर बेरीज ही पारंपारिक पद्धतीने न शिकवता, बोर्ड वरती न शिकवता विद्यार्थ्यांना जमिनीवरती गोल बसवले जाते आणि मध्यभागी फळा ठेवून त्याच्यावरती वेगवेगळ्या वस्तू त्यांना मोजायला लावले जाते आणि बेरीज म्हणजे काय त्यांना समजून सांगीतले जाते आणि कृतीतून त्यांना सहज समजते. त्यानंतर बेरजेवर आधारित मैदानावर नेऊन विद्यार्थ्यांकडून खेळाच्या माध्यमातून बेरीज देखील मुले शिकली आहेत .

https://youtu.be/fH-XQZO6olg


https://youtu.be/VkiSIIJS1Is


https://youtube.com/shorts/dOou7sk1xOo

https://youtu.be/0fseYjAZDWA

8) शाळेचा अंतर्बाह्य परिसर बोलका करणे :

सदर उपक्रमांतर्गत शाळेत विद्यार्थी टिकून राहावे शाळेत विद्यार्थ्यांचे मन रमावे यासाठी आम्ही शाळेचा अंतर्बाह्य परिसर अतिशय बोलका असा रंगरंगोटीच्या साह्याने केला आहे.. त्यात आम्ही पूर्वीच्या ज्या भिंती होत्या त्यावर भाषा गणिताच्या दृष्टीने मुलभूत भागाचे रंगकाम करून बोलक्या भिंती केल्या आहेत जेणेकरून विद्यार्थ्यांना शाळेत रममाण होता येईल आणि त्या भिंतीकडे बघून विद्यार्थी काहीतरी शिकतील .











वरील सर्व उपक्रमांमुळे इयत्ता पहिल्या वर्गातील विद्यार्थी हे आज अगदी आनंदाने शाळेत येतात व प्रत्येक विद्यार्थी कृतीमध्ये स्वतःहून सहभागी होतो

या उपक्रमामुळे उपस्थिती चांगली असते व विद्यार्थ्यांना शाळेची भीती अजिबात वाटत नाही, दिवसभर शाळेमध्ये आनंदाने रमतात. प्रत्येक कृती ते आवडीतून करतात त्यांना शिकवलेल्या गोष्टी कृतीमुळे नीट लक्षात राहतात

समारोप -

वरील सर्व उपक्रम विशेषतः इयत्ता पहिली वर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबवला असला तरीही हा उपक्रम सर्वच वर्गाच्या विद्यार्थ्यांना उपयोगी आहे. सर्व शिक्षकांनी जर आपल्या अध्यापनात कृतीचा समावेश केला तर नक्कीच विद्यार्थी हसत खेळत अध्ययन करतील.

अध्ययन-अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर (ई-लर्निंग)

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावळी, ता.बिलोली, जि.नांदेड

मुख्याध्यापकाचे नाव - श्री कोलोड यादव विठोबा

सहशिक्षक - शितल दिनकर भालेकर

प्रास्ताविक -


आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक जास्तीत जास्त कामगार वर्गातील आहेत. त्यांच्या आर्थिक अडचणीमुळे अनेक कुटुंबे कामासाठी स्थलांतरित झालेली असतात. सातव्या वर्गातील विद्यार्थी त्यांच्या आई वडिलांना सोडून आजी आजोबाकडे राहतात. मागील काही वर्षात शाळेची पटसंख्या पाहता कमी झालेली दिसून आली. यावर उपाययोजना करणे फार महत्वाचे वाटले. विशेषतः उच्च प्राथमिक वर्गासाठी अध्यापन आनंददायी बनवून विद्यार्थी शाळेत दाखल करणे व तो टिकवणे अत्यंत आवश्यक होते. विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाची गोडी वाढवण्यासाठी शाळेची गुणवत्ता सुधारण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे योग्य वाटले. आजच्या युगात चिमुकली मुले ही तांत्रिक गोष्टीमुळे किती आकर्षिली जातात हे आपण अनुभवत आहोत. म्हणून शाळेत अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करून शाळेची पटसंख्या वाढवून उपस्थिती टिकवणे सोबतच गुणवत्ता वाढ करण्याचे ठरवले. त्यासाठी अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रारंभ केला.

समस्या व आव्हाने -

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुले, कामगारांची मुले, ग्रामीण भागातील मुले, शिक्षणाची नितांत आवश्यकता असणारी मुले शाळेत टिकावी आणि शिकावी यासाठी अध्ययन अध्यापनात रस निर्माण करणे गरजेचे होते. तसेच एखादा घटक विद्यार्थ्यांना समजून सांगण्यासाठी अडचणी येत होत्या. वर्गाबाहेरील आशय अध्ययन अनुभव देण्यासाठी अडचण येत होती. तसेच ऐतिहासिक स्थळे पाहणे, कवितांच्या चाली, घटकावर आधारित जास्तीचा सराव करणे. ही आव्हाने पेलण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे होते. तसेच महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषदेमार्फत राबवत असलेले विविध उपक्रम राबवण्यासाठी शाळेतील उपलब्ध विविध तंत्रज्ञानाची साधने उपयोगी पडली.

नियोजन व अंमलबजावणी -


शाळेमध्ये अध्ययन अध्यापनासाठी माझ्याकडे इयत्ता सातवीचा वर्ग आहे. वर्गखोली भौतिक सुविधेने व तंत्रज्ञानाच्या विविध साधनांनी अगदी सुसज्ज आहे. याच संधीचे सोने करण्याचे ठरवले.



यामध्ये एक इंटरॅक्टिव्ह बोर्ड, दोन संगणक संच, एक प्रोजेक्टर इत्यादी साहित्य उपलब्ध आहेत. या डिजिटल इंटरॅक्टिव्ह बोर्ड चा वापर दैनंदिन अध्यापनात खूप चांगल्या पद्धतीने होत आहे.

V school app -

व्ही स्कूल या ॲपची विशेष बाब अशी की व्ही स्कुल लर्निंग ॲप चा मोठ्या पडद्यावर वापर करणारा हा माझा सातवा वर्ग. व्ही स्कूल ॲप अत्यंत उपयोगी तसेच अध्यापनाचे प्रभावी माध्यम आहे. यामध्ये विषयनिहाय, घटक निहाय, पाठाचे प्रकट वाचन, आशय विश्लेषण, चित्र ध्वनिफिती व कविता गायन यासाठीचा समृद्ध माहितीचा स्त्रोत आहे. यात दिलेल्या ऑनलाईन टेस्टमुळे विद्यार्थी स्वतःचे मूल्यमापन स्वतः करतात. विज्ञान विषयातील प्रयोग, इतिहास - भूगोल विषयातील उपक्रम विद्यार्थी स्वतः संकेतस्थळावर शोधून पाहत आहेत.



गोष्टीचा शनिवार -

गोष्टीचा शनिवार या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करत असताना विद्यार्थी स्वतः ऑनलाईन गोष्टी वाचत आहेत. जिल्हा स्तरावरून दर शनिवारी गोष्टीच्या पुस्तकांची इयत्ता निहाय लिंक येत असते. ती लिंक विद्यार्थी स्वतः इंटरॅक्टिव्ह बोर्डवर ओपन करून गोष्ट वाचत आहेत. यामध्ये त्यांना नाविन्य वाटत आहे. यामुळे गोष्टी चांगल्या पद्धतीने विद्यार्थी शिकत असून लक्षात ठेवत आहे.

रस्ते की पाठशाला -

जिल्हाधिकारी कार्यालय व प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ते की पाठशाला हा अभिनव उपक्रम नांदेड जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. या उपक्रमाची अंमलबजावणी व्ही स्कूल अँप वर उपलब्ध करून दिलेली आहे. रस्ते की पाठशाला हा उपक्रम माझ्या वर्गात यशस्वीपणे राबवला जात असून रस्ता अपघातासारखे दुर्घटना टाळण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासूनच एक सुजाण नागरिक होण्यासाठीची मूल्ये रुजवण्यासाठी मा जिल्हाधिकारी साहेबांनी सदरील अभ्यासक्रम चार आठवड्यात पूर्ण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. यासाठी आठवड्याला दोन तासिकांचे नियोजन केले आहे. यानुसार अभ्यासक्रम पूर्णत्वाकडे नेत आहोत. रस्ते

की पाठशाला हा विद्यार्थ्यांसोबतच एक जागरूक नागरिक म्हणून सर्वांसाठी अभ्यासक्रम महत्त्वाचा आहे. त्यामुळे माझ्या वर्गातील 20 विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे.







शाळेतील विद्यार्थी वाहतुकीचे नियम पाळण्याचे महत्व आपल्या नातेवाईकांना सांगत आहेत. त्यामुळे घरातील व्यक्ती वाहतुकीचे नियम पळताना दिसत आहेत.

डिजिटल शिक्षणाचा शुक्रवार -

या उपक्रमांतर्गत तालुकास्तरावरुन इयत्ता निहाय, विषयनिहाय घटक दिले जातात. त्यानुसार या घटकाचे अध्यापन डिजिटल साधनाचा वापर करून केले जाते. तसेच लॅपटॉप, संगणक, इंटरॅक्शन बोर्ड इत्यादींपैकी एका साधनाचा वापर करून अध्यापन केले जाते.विद्यार्थी डिजिटल शुक्रवारची आतुरतेने वाट पाहत असतात. विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानामुळे अध्ययनाची रुची वाढली आहे. लसावी-मसावी या घटकाचे अध्यापन करतेवेळी एक युक्ती सुचली ती अशी की, जो विद्यार्थी वेगाने गणित सोडवेल त्याला डिजिटल बोर्ड वरती मसावी-लसावी चे उदाहरणे सोडवण्याची संधी मिळेल. यात प्रणव सोनकांबळे हा विद्यार्थी जिंकला. त्याने घटकावरील संपूर्ण स्वाध्याय डिजिटल साधनाच्या मदतीने सोडवला.





याव्यतिरिक्त विविध बोधकथा, मार्गदर्शनपर व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी या डिजिटल साधनांचा वापर करता येतो. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल जिल्हा परिषद नांदेड यांची मराठीतील पहिली मुलाखत विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. मुलाखत पाहून प्रत्यक्ष मॅडमला

भेटल्यासारखे वाटले असे मुले म्हणाली. "यशाचे सूत्र" या मुलाखतीतून मुख्य कार्यकारी अधिकारी या विद्यार्थी व शिक्षकांना भेटल्या.



मुख्य कार्यकारी अधिकारी मा. मीनल करनवाल यांची मुलाखत

फलनिष्पत्ती –

विद्यार्थ्यांमध्ये पाठ्यपुस्तकातील विविध विषयातील घटक आभासी स्वरूपात दाखवून त्यातील आशय समृद्ध करून घटकांचे दृढीकरण होत आहे. चार भिंतीच्या आत बसून चार भिंतीबाहेरील विश्व दाखवणे यातून शक्य झाले. विद्यार्थ्यांची अध्ययनातील रुची वाढवून शाळेत टिकवणे हा उद्देश सफल होत आहे. वर्गामध्ये आवश्यक भौतिक सुविधा व अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध करून दिल्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला आहे. तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थी स्वतः करत असल्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास वाढीस लागला आहे. तंत्रज्ञानाच्या सुविधांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शाश्वत शैक्षणिक विकास होण्यास मदत झाली आहे. विविध शैक्षणिक उपक्रम शाळा स्तरावर राबवण्यासाठी तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त उपयोग झाला आहे.

समारोप -

तंत्रज्ञानाच्या वैविध्यपूर्ण साधनांच्या वापरातून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण होण्यास मदत झाले. त्यामुळे विद्यार्थी शाळेत न चुकता येऊ लागले परिणामी सातव्या वर्गाची उपस्थिती वाढली. इंटरऍक्टिव्ह बोर्डाच्या वापरामुळे विद्यार्थी स्वतः स्वाध्याय सोडवून स्वयंअध्ययन करू लागले. एखादा घटक समजला नसेल तर संदर्भ साहित्य म्हणून गुगल चा वापर करू लागले. यामध्ये phet.colorado.com या संकेतस्थळा वर simulations पाहू लागले. विकिपीडियावर संबंधित

माहिती शोधून अध्ययन करू लागले. V-school अँपवर व्हिडिओ, ऑडिओ व स्वाध्याय सहजपणे उपलब्ध झाले. रस्ते की पाठशाळा या मुख्यकार्यकारी अधिकारी मॅडमच्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना रस्त्यावरील नियमांची माहिती झाली. यामुळे भविष्यात अपघाताचे प्रमाण नक्कीच कमी होणार आहे. अश्याप्रकारे वर्गातील डिजिटल साधनांचा वापर करून अध्ययन अध्यापन सहज आणि सोपे करून गुणवत्तापूर्ण अध्ययन अनुभव देण्याचा प्रयत्न चालू आहे.

व्हिडीओ लिंक -

https://drive.google.com/file/d/1hmLjvlQTrtx2KuXVy3YM-kBs3I1EEPI6/view

https://drive.google.com/file/d/1hlmET83BptF1LoNd_FQMzk78aSouKap5/view

दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रात यश

शाळेचे नाव - आंतरराष्ट्रीय निवासी शाळा, तोरणमाळ, ता.धडगाव, जि.नंदुरबार.

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.सुधीर विजयराव पाटील


सहशिक्षकाचे नाव - श्री. रवींद्र रामदास शिंदे

आम्ही संधी दिली.....त्यांनी सोने केले.....

सातपुड्याच्या कडेकपारीत असंख्य वाड्यावस्त्यांवर राहणारी माणसे ही दिसायला तुमच्या आमच्या सारखीच; परंतु दुर्गम भाग असल्याने सुविधांच्या अभावाने देश महासत्ता होण्याच्या मार्गावर भरधाव वेगाने जात असताना इथली माणसे या विकासाच्या मुख्य प्रवाहातून तशी दूरच फेकल्या गेल्याचे म्हणावे लागेल.माणसांचा सर्वांगीण विकास करावयाचा असल्यास त्यास शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे. शासनाने या विखुरलेल्या घरांच्या पाड्या-पाड्यातील मुलांसाठी शाळा देखील सुरू केल्या, परंतु पराकोटीचा दुर्गम भाग दळणवळणाची कुठलीही व्यवस्था नसल्याने प्रशासनाची व शिक्षकांची अतिउच्च मानसिकता असताना देखील मुलापर्यंत पोहोचून शिक्षण देणे, त्यांना चांगल्या शाळा बांधून देणे हे जमत नव्हते. पर्यायाने सिलिकॉन व्हॅलीत दबदबा असलेल्या याच देशातील लोकांचे भाऊबंद अगदी प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहत होते. मुलांचे शिक्षण थांबले होते पण काळ थांबला नव्हता म्हणून शाळाबाह्य असणाऱ्या मुलांची संख्या वाढत होती.... वाढत होती....

चाकोरीत चालणाऱ्या प्रशासनात मा. श्री नंदकुमार साहेब नावाचा चाकोरीबाहेरचा विचार करणाऱ्या अवलिया, संवेदनशील माणसाच्या मनाच्या घालमेलीतून आणि अंत्योदयाच्या उन्नतीच्या पोट तिडकीतून संकल्पना बाहेर आली. या तोरणमाळ परिसरातील सर्व वाड्या वस्त्यांवर जाऊन शाळाबाह्य मुलांचा प्रत्यक्ष आकडा घेण्यात आला. चक्रावून सोडणारे आकडे आजवरच्या शिक्षणासाठी केलेला प्रयत्न फुकट गेल्याचे स्पष्टपणे दर्शवत होते. कारणे बरीच होती . पण कारणांच्या मिमांसेत न पडता साहेबांनी समुहशाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला.आजवर कधीही कुठेही न केलेला प्रयोग होता तो. काळाच्या गर्भात काय दडलय हे मात्र यथावकाश दिसणार होतं.


सन 2016-17यावर्षी प्रायोगिक तत्त्वावर चोरणापाडा, पाटीलपाडा झापी,भाबरी या तीन पाड्यांची मिळून 107 मुलांची एक शाळा नंदुरबार येथे सुरू करण्यात आली. शाळेचे दार आणि मास्तराची तोंड न बघितलेली पण वय वाढलेली शाळाबाह्य मुले येथे दाखल केली. जंगलातला मोकाट वारा,ऊन, पाऊस झेलणारी ही मुले चार भिंतीत शिक्षणासाठी निवासी ठेवण्यात आली. बाहेरचे जग माहीती नाही, मोठे गाव, पक्क्या इमारती, वेगवान वाहने या कृत्रिम वातावरणात मुले कोंडून ठेवलेल्या जंगली प्राण्यासारखी भासत होती. त्यांचं मन लागत नव्हतं. आम्हा शिक्षकांना त्यांना तिथे टिकवून ठेवणे हेच मोठे आव्हान होते; जबाबदारी होती. मला स्वतःला क्रीडा विषयात आवड होती याचाच आधार घेत या मुलांना मनसोक्त खेळण्याबागडण्यासाठी पटांगणात आणले . मोकळे मैदान त्यांच्यासाठी पर्वणीच होती. जंगलात राहणाऱ्या या मुलांच्या अंगात ससे,हरीण, चितळ यांची चपळता आणि घारीची नजर, मोराचा डौल त्यांच्या नसानसातून वाहत होता. गरज होती ती त्यांना नेमकेपणा देण्याची. झाले, मी माझ्यातला प्राथमिक शिक्षकाचा क्रीडा शिक्षक म्हणून बदल केला. वर्षभर दररोज सकाळी संध्याकाळी खो-खो कबड्डी यासारखे सांघिक खेळ; गोळा फेक, थाळीफेक, भालाफेक यासारखे वैयक्तिक खेळाचे सुनियोजित प्रशिक्षण सुरू केले. इकडे नवनवीन शाळा समूहशाळेला मिळत होत्या. आता या चपळ आणि चलाख माकडांची संख्या 377 झाली.



सन 2016/17 व 17/18 या दोन वर्षात क्रीडा विषयाचे कौशल्य विकासाचे कार्य घडत असताना खेळाडूंचे खेळ निपुणतेकडे वळत होते.शिक्षण विभागातील राज्य, विभाग व जिल्हा स्तरावरील मान्यवरांचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळत होते. त्याचबरोबर माझे सहकारी शिक्षक हे ऑडिओ व्हिडिओ,समाजमाध्यमे याद्वारे मुलांच्या खेळातले तंत्र विकसित करत होते. त्याचाच परिपाक म्हणून 2018-19 या वर्षातील क्रीडा स्पर्धांसाठी सुमारे 50 मुलांचा समूह 100 मीटर, 200 मीटर धावणे; तीन किलोमीटर,पाच किलोमीटर चालणे;गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक या क्रीडा प्रकारात नाशिक विभागीय पातळी ही रानात राहणाऱ्या मुलांनी गाठली.चमचम चकाकणारी बक्षिसे मिळवली. एखाद्या जगजेत्याप्रमाणे मेडल आपल्या छातीवर मिरवली. आजवरच्या आयुष्याच्या उच्च शिखरावर ही रानपाखरे विसावली. आणि माझ्यासह आम्हा शिक्षकांची छाती अभिमानाने भरून आली. आम्ही मेहनत घेत होतो, प्रशासन सहकार्य करत होते त्याचाच परिपाक म्हणून तीन किलोमीटर चालणे या क्रीडा प्रकारात कुमारी सोकी सिताराम पावरा ही विद्यार्थिनी राज्यस्तरावर चमकली. आई,वडील,गाव पाड्याला दुरावलेली ही मुले दररोज आनंद उत्सव साजरा करण्याबरोबर जीव तोडून मेहनत घेत होती. दरवर्षी जिल्हा, विभाग व राज्य गाजवत असताना सन 2022-23 या वर्षी तर गुवाहाटी आसाम येथे संपन्न झालेल्या देश पातळीवरील 200 मीटर धावणे या स्पर्धेत आमची विद्यार्थिनी गीता गुला वळवी ही 29 राज्यातून सहभागी झालेल्या स्पर्धकात पाचवी आली.लहानपणापासून खेळांचे प्रशिक्षण घेणारी मुले आणि जन्मभर परिस्थितीशी झुंजणारे मुले या दोन समाजातील ही स्पर्धा माझ्या तोरणमाळ परिसरातील परिस्थितीशी झुंजणाऱ्या लेकरांनी केव्हाच जिंकली होती.

चालू शैक्षणिक वर्षात 23-24 मध्ये ही आंतरराष्ट्रीय शाळेचा दबदबा दिसतोय. या वर्षात 100 मीटर धावणे , हर्डल्स,4*400 रिले ,1500 मीटर हातोडा फेक ,थाळी फेक ,बांबू उडी अश्या विविध मैदानी क्रीडा स्पर्धेत एकूण 17 विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरावरून विभाग स्तरावर निवड झाली.माजी विद्यार्थी जयसिंग भायला पावरा याने विभाग स्तरावर भाला फेक या खेळ प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून त्याची राज्यस्तरावर चंद्रपूर येथे होणाऱ्या स्पर्धेत निवड झाली.

हा क्रीडायज्ञ तोरणमाळ स्थित भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी या निवासी शाळेत आजही सुरूच आहे.अनमोल असे सहकार्य मिळत आहे ज्यांच्याकडून ते माझे मित्र श्री सुरेश फापला पावरा या प्रत्येक समाजाच्या मुलांसाठी झटणाऱ्या अवलिया शिक्षकाचे; त्यांच्याविषयी स्वतंत्र लिहिणे योग्य राहील.1800 मुलांच्या शाळेत दिलेल्या संधीचे सोने करणारे असंख्य नरवीर तयार होत आहेत आम्ही या बदलाचे साक्षीदार आहोत याचाच मला अभिमान आहे.



माझा विद्यार्थी पिंट्या झाला राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू.....



पिंट्या दित्या वसावे इयत्ता 1 ली पाटीलपाडा (गोरंबा) शाळेत मी दाखल केलेला विद्यार्थी भाग्य असे की इयत्ता 8 वी मध्ये ही तो आंतरराष्ट्रीय शाळेत दाखल झाल्या मुळे मला पिंट्या सोबत 3 वर्ष काम करता आले.आज पिंट्या महाराष्ट्रातील कुठल्याही मारेथोन स्पर्धेत भाग घेऊन विजय मिळत आहे.१५ KM धावणे या स्पर्धेत भाग घेऊन राज्य पातळीवरून देश पातळी खेळण्या साठी पिंट्या आज सज्य आहे.आज पिंट्या 400 मीटर आंतरराचे 45 राउंड मारत न थकता मारताना मी पहिले,येणाऱ्या काळात भारताकडून घेण्यात येणाऱ्या खेलो इंडिया साठी पिंट्या तयारी करत आहे. निश्चित त्याच्यात

जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धा 2023-24

आंतरराष्ट्रीय शाळेतील गुरुवर्य समवेत मिनेश.....



मिनेश केवाज्या नाईक

इयत्ता 8 वी 80 मीटर हर्डल्स जिल्ह्यात प्रथम

नासिक विभागासाठी निवड .....

हतरी जोरश्या नाईक इयत्ता 8 वी 80 मीटर हर्डल्स जिल्ह्यात प्रथम

नासिक विभागासाठी निवड .....

*तसेच हतरी चा 400 मीटर धावणे शर्यतीत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे ,या शर्यतीत ही विभागासाठी निवड झालेली आहे. हतरीचे आंतरराष्ट्रीय शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन

UNDER-17 मुले /मुली सांघिक व वैयक्तिक स्पर्धेत आंतरराष्ट्रीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना घवघवीत यश.....

1) हिरेश पावरा इयत्ता 10 वी -1500 मीटर धावणे.जिल्ह्यात दुसरा क्र. नासिक विभाग साठी निवड .

2) हिरेश पावरा बांबू उडीत जिल्ह्यात प्रथम .

3) बकशा पावरा बांबू उडीत जिल्ह्यात दुसरा.

रिले-4*400=हिरेश पावरा ,निलेश पावरा,बियालाल पावरा ,मिनिश पावरा ,डीगाराम पावरा ...जिल्ह्यात प्रथम नासिक विभाग साठी निवड ..

4) हर्डल्स 400 मीटर- मिनिश पावरा इयत्ता 9 वी जिल्ह्यात प्रथम.नासिक विभाग साठी निवड ..

5) हातोडा फेक –बबली मौरे जिल्ह्यात प्रथम, मुंद्रा वळवी जिल्ह्यात दुसरी

6) बांबू उडी मुली –मंजीला पावरा जिल्ह्यात प्रथम, आशा पावरा जिल्ह्यात दुसरी

7) रिले-4*400 मुली-रत्ना वळवी ,मुंद्रा वळवी ,राजबाई पावरा,ललिता पावरा, रायका पावरा ..

रिले टीम जिल्ह्यात प्रथम ..नासिक विभाग साठी निवड.

8) हर्डल्स 400 मीटर मुली-रत्ना वळवी जिल्ह्यात प्रथम .....

जिल्हा परिषद नंदुरबार अध्यक्षा मा.सुप्रियाताई गावित विजयी खेळाडू मुलींचे पुष्पगुच्छ देऊन





अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय निवासी शाळा तोरणमाळ येथील विद्यार्थी ची मैदानी स्पर्धेत विभागीय स्तरावर निवड झाल्याने जि.प.नंदुरबार शिक्षण विभागाकडून अभिनंदन करताना मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पवार साहेब, उप मुख्य कार्यकारी अधिकारी धस साहेब,उप शिक्षण अधिकारी वंदना वळवी मॅडम,पठाण साहेब, समन्वयक महेंद्र अहिरे,मुख्याध्यापक विजय रत्नपारखे सर,शिक्षक वृंद.....



Cross country (2023/24)-under 14 3 km धावणे या स्पर्धेत निलेश पावरा प्रथम तर हिरेश पावरा द्वितीय दोन्ही विद्यार्थिची राज्यावर निवड मार्गदर्शक-रविंद्र शिंदे



विभागीय क्रीडा स्पर्धेत -भाला फेक under 16 विभागात प्रथम राज्यस्तरासाठी निवड 2023/24 जयसिंग भायला पावरा under 16 खेळप्रकार भाला फेक या स्पर्धेत याने 43 मीटर भाला फेकत याने विभागात प्रथम क्रमांक मिळवला त्याची राज्यस्तरासाठी निवड झालेली आहे.



पिंट्या वसावे marathon पिंपळनेर 10 km धावणे प्रथम








स्यत स्वराज्य प्रतिष्ठाण,साक्री
छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त
साक्री मॅरेथॉन 2024
स्पर्धा दि.१९ फेब्रुवारी २०२४ रोजी
6 कि.मी
स्व. दादाजी वामन अक
यांच्या स्मरणार्थ,
डॉ. घनःश्याम दादाजी अकलाडे
प्रथम बक्षिस- रू.5100/-
द्वितीय बक्षिस- रू.3100/
तृतीय बक्षिस- रू.1100/-





क्रीडा क्षेत्रातील यशाबद्दल विद्यार्थ्यांचा सन्मान

“स्वच्छ सुंदर व वैविध्यतेने नटलेली शाळा”

शाळेचे नाव- जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, लोहतवाडी पं.स. नेर, जि.प. यवतमाळ

Email ID - zpschoollohatwadiyahoo.com
मुख्याध्यापकाचे नाव - श्री संतोष उत्तमराव बदुकले



प्रास्ताविक -

"इंद्रधनुचे रंग बहरले"
निसर्ग अवघा सजला
सुंदर शाळा सुंदर परिसर
झेप उंच नभीला.....

जि. प. प्राथमीक शाळा लोहतवाडी,प.स.नेर,जि. प. यवतमाळ ही आमची स्वच्छ व सुंदर शाळा मोझर व रत्नापूर यांच्यामध्ये वसलेले लोहतवाडी हे छोटेसे गाव,लोकसंख्या अगदीच 500 एवढी,या छोट्याशा गावातील लोक शिक्षणाच्या बाबतीत बरीच जागरूक आहेत.शाळेमध्ये 2018 मध्ये मी रुजू झालो तेव्हा शाळेमध्ये विद्यार्थी संख्या 27होती.शाळा छान टुमदार विद्यार्थी सुद्धा बरेच चुणचुनीत मात्र शाळेमध्ये भौतिक सुविधा पुरेशा प्रमाणात नव्हत्या.

शाळेची इमारत फार बोलकी नव्हती बदलत्या प्रवाहानुसार तंत्रज्ञान -साहित्य नव्हते....मग मनाने पक्का निर्धार केला,पालकांशी संवाद साधायचा....!

व्यवस्थापन समिती ,पालक सभा याद्वारे बराच समाज सहभाग मिळविला.आपली शाळा सुंदरच आहे परंतु तिला आणखी नवीन रूप आपल्याला द्यायचे आहे,भौतिक सुविधा व तंत्रज्ञान यांचा समन्वय

साधून शाळा आणखीन सुंदर करूया...ठरले!मग सर्वांचे सहकार्य व शाळेच्या माध्यमातून आम्ही निर्माण केली स्वच्छ सुंदर लोहतवाडी शाळा...

शाळेतील भौतिक साधनांची कमतरता भरून काढली यात किचन दुरुस्ती हँडवॉश स्टेशन, पिण्याची पाणी, सर्वत्र नळ फिटिंग,प्रोजेक्टर अशी सुविधा निर्माण केल्या. शाळेची भिंत एवढेच काय झाडाची खोडे सुद्धा झाली बोलकी.

शाळेचे हे बदलते रूप पाहताना मनाला खूप आनंद होत होता.यात आदरणीय मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकृष्ण जी पांचाळ साहेबांचा 'झेप' उपक्रम सुद्धा मदतगार झाला आणि आमची शाळा BaLA उपक्रमात सुद्धा सहभागी झाली.





कार्य करताना आलेल्या अडचणी-

एकदा मनाशी खुणगाठ पक्की झाली की, उत्साह आणखीनच वाढतो पण कोणतेही कार्य हाती घेतल्यावर अडचणी नाही आल्या तर ते कार्य सफल कसे होणार? आणि त्यावर मात करून मिळालेल्या यशाचा आनंदही काही निराळाच .....

असेच सभा घेताना काही पालक थोडे नकारात्मक वृत्तीचे होते,त्यांची मानसिकता बदलविण्यासाठी मला सतत त्यांच्याशी संवाद साधावा लागला.शाळेत करावयाची सुधारणा आपल्याच मुलांच्या गुणात्मक विकासासाठी आवश्यक आहे हे त्यांना अनेक उदाहरणांमधून पटवून द्यावे लागले.

शाळा रंग-रंगोटी करताना सुद्धा रचनात्मक व कार्यात्मक अडचणी येत होत्या.त्याकरिता आमचे प्रेरणास्त्रोत गटशिक्षणाधिकारी आदरणीय मंगेशजी देशपांडे साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन सुद्धा लाभले. वेळ ,पैसा, व कल्पनाशक्ती यांचा समन्वय साधून सर्व काही सुंदरच करण्याचा ध्यास मनाने घेतला होता.मग या मार्गामध्ये आलेल्या अशा असंख्य छोट्या अडचणींना पार करता आले.





सकारात्मक ऊर्जेद्वारे मोठ्या स्वरूपात कार्य करताना आर्थिक अडचण सुद्धा समोर होतीच,लोकसहभाग व 'ई' वर्ग यांच्या समन्वयातून ते सुद्धा साकारता आले. सुरुवातीला मी एकटाच शाळेत होतो, वर्ग अध्यापन मु. अ. प्रभार व शाळा विकास यांचा समन्वय साधताना तारेवरची कसरत करावी लागली काही महिन्यांतर श्री लोहकरे सर शाळेत रुजू झाले मग दोघे मिळून कार्य करताना आणखीनच ऊर्जा निर्माण झाली.

अंमलबजावणी -

"आव्हाने असो कितीही
सामर्थ्य आमच्या मनात आहे
साधावयाचा केवळ
बालकांचा विकास आहे"

अशा ध्येयाने कार्य सुरू केले.....

ग्रामीण भागामध्ये साहित्याची ने- आण करणे ही कठीण जाते परंतु त्यासाठी वेळ व पैसा खर्ची घालावा लागला, रंगरंगोटी करताना इतर चांगल्या शाळांची भेट घेणे, नवीन कल्पनांची देवाण-घेवाण चर्चा या सर्वांचा सकल विचार केला.जुन्या वृक्षाला नवीन पालवी फुटताना पाहून मन प्रसन्न होते त्याप्रमाणे जुन्या इमारतीचे नवीन रूप पाहताना मन आनंदित होत होते.

वर्ग अध्यापन, मुख्याध्यापक कार्य, सभा व भौतिक सुविधा निर्मिती यांचा सुंदर समन्वय साधला नियोजन पूर्वक पूर्ण कार्य पार पाडले.किचनचे तर रूपच पालटून टाकले. जमिनीवर कार्पेट, धान्य साठवण्याच्या कोठी, इतर साहित्यासाठी स्टील डबे, भाजीपाला साठवण्यासाठी भांडी घरच्या प्रमाणे किचन ठेवण्यास व स्वच्छता ठेवण्यास सूचित करण्यात आले.मुलांना आहार देताना पालेभाज्यांचा उपयोग करता यावा याकरिता परसबाग तयार करण्यात आली.

स्वयंपाकगृह



सांस्कृतिक मंच -

सांस्कृतिक मंच तर अगदीच सौंदर्यपूर्ण नटला.शालेय परिसरातील झाडांची खोडे सुद्धा शैक्षणिक साहित्य बनले.ज्ञानरचनावादानुसार फरशी, भिंती रंगवण्यात आल्या,विद्यार्थी शाळेत कुठेही असो शाळेचा कोपरा न कोपरा जणू शैक्षणिक साहित्य बनवण्यात आला.

स्वतः शैक्षणिक साहित्य बनविण्यात आले. या सोप्या व हाताळण्यास सहज स्वरूपातील साहित्याने विद्यार्थ्याच्या मनालाही भुरळ घातली. शाळेला प्राप्त भाषा, गणित, इंग्रजी पेटी मधील साहित्य विद्यार्थ्यांना सहज हाताळता यावी याकरिता लोखंडी डब्याला रंग देऊन व त्या साहित्याची विषयानुरूप विभागणी करून साहित्याची जुळवणी केली, अतिशय सुंदर रचना करून वर्गामध्ये विषय कोपरे तयार करण्यात आले.

रेन वॉटर हार्वेस्टिंग, हॅन्ड वॉश स्टेशन, वॉशरूम व टॉयलेट येथे नळयोजना करून विद्यार्थ्यांसाठी सुविधा निर्माण केली. Smart TV व Projector द्वारे विद्यार्थ्यांना दीक्षा ॲपचा वापर करून अभ्यासक्रमाची माहिती देणे सुरू केले. तसेच विद्यार्थी स्वतः त्यांचा वापर करतात. हँडमेड शैक्षणिक साहित्यामध्ये कोरे नकाशे तयार करण्यात आले.यामुळे नकाशामध्ये तालुके, जिल्हे, राज्य यांची योग्य त्या ठिकाणी जोडणी करणे ते शिकले. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त वाचनाची सवय लागावी म्हणून एक तास वाचनाचा हा उपक्रम घेण्यात येतो तसेच बाल वाचनालय तयार करण्यात आले. दर शनिवारी विद्यार्थी वाचन कट्टा हा उपक्रम सुरू करण्यात आला.

ग्रामीण भाग असल्याकारणाने विद्यार्थ्यांना वेळोवेळी शालोपयोगी साहित्य उपलब्ध होऊ शकत नाही ही अडचण लक्षात घेता त्याकरता शाळेतच ग्राहक भांडारची स्थापना केली त्यामुळे शाळेतच उपलब्ध

असणारे साहित्य विद्यार्थी वापरू लागले. त्या कारणांनी विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारज्ञान अंगीकृत झाले, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत बाबीअंतर्गत सुविधा करण्यात आल्या. शाळेच्या प्रांगणामध्ये Paver block सुद्धा बसवण्यात आले. कुंडीमध्ये फुल झाडांची लागवड करण्यात आली. संपूर्ण परिसर हिरवागार सौंदर्यपूर्ण व प्रत्येक कोपरा हा अध्ययन घटक बनविण्यात आला.





फलनिष्पत्ती -

'शक्य आणि अशक्य'
यांच्यातील अंतर आपल्या दृढनिश्चयावर अवलंबून असते.

असे म्हणतात,

"काहीतरी उत्तुंग करण्याची जिद्द बाळगावी, विचारावर विश्वास ठेवावा आणि आपल्या कर्तुत्वाने ते साध्य करावे" अशाप्रकारे जिद्द होती शाळेचा विकास करण्याची आणि विश्वास होता स्वतःवर मी हे करेलच!


म्हणूनच सर्वांच्या सहकार्याने व अथक प्रयत्नाने हे साध्य करण्यास वेळ लागला नाही.केवळ चार ते पाच महिन्यांमध्ये शाळेचे संपूर्ण स्वरूप पालटून गेले.जुनी कात टाकून नवीन चमकदार रुपडे ल्यालेली माझी स्वच्छ सुंदर लोहतवाडी शाळा आणखीनच खुलून दिसायला लागली. भौतिक सुविधे बरोबरच अनेक शैक्षणिक उपलब्धता करून दिल्याने संख्यात्मक व गुणात्मक विकासाचा समन्वय आम्हाला साधता आला.

नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग अध्ययन- अध्यापन क्रियेमध्ये करताना विद्यार्थी व शिक्षकांना काळाच्या प्रवाहात पोहता आले, बदलत्या शिक्षण पद्धतीनुसार शाळा निकषानुसार बदलविण्यास यशस्विता लाभली.

विद्यार्थी शाळेत कुठेही वावरताना त्यांना कोणतीही बाब ही अध्ययन प्रतिकृतीच वाटावी अशी शाळा तयार करण्यास आम्ही यशस्वी ठरलो.स्वच्छ सुंदर आहारासोबतच शैक्षणिक साहित्याची उपलब्धता विद्यार्थी स्वतः साहित्य हाताळतात कृती करतात यातून विद्यार्थी आणखी सक्रिय बनले.अवघी 27 पटसंख्या असलेली माझी शाळा आज 43 पटसंख्येवर येऊन पोहोचली, हा या सर्व मेहनतीचा परिणाम होता.पालकांनाही आनंद झाला आमची छोटीशी पण टुमदार शाळा आणखीनच बहारदार दिसायला लागली. आमची मुले सुद्धा तयार होत आहेत याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

'Building As a Learning Aid' हे ध्येय साध्य करता आले. 'झेप ' या उपक्रमामध्ये सहभागी होऊन तालुक्यातून तसेच जिल्ह्यातूनही आमच्या शाळेची निवड करण्यात आली या उपक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री सुनील भाऊ सत्रे यांचे सहकार्य शाळेला खूप प्रमाणात लाभले ही माझ्यासाठी, शाळा व्यवस्थापन समिती साठी व गावासाठी अभिमानाची बाब आहे कारण यामुळे आमची लहानशी शाळा इतर शाळेसाठी आदर्श ठरत आहे.

छोट्या बालकांसाठी तयार केलेली वैविध्यपूर्णता व त्यातून निर्माण झालेली बालकांची सक्रियता ही आमच्या प्रयत्नाची खरी फलनिष्पत्ती आहे.





समारोप-

'बालकांचा सर्वांगीण विकास साध्य करणे' हे आपले कर्तव्य आहे व हे कर्तव्य साकारताना सर्वांच्या प्रेरणेने व सहकार्याने स्वच्छ सुंदर लोहतवाडी शाळेचे स्वप्न साकारले गेले.

यात आमचे गटशिक्षणाधिकारी साहेब, केंद्रप्रमुख साहेब,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सरपंच, शिक्षक, अंगणवाडी ताई ,समस्त गावकरी व आमचे छोटे विद्यार्थी या सर्वांचे सहकार्य व आपलेपण या सर्वांचे हे फलित आहे.

DR.A. P. J Abdul Kalam ....

“MAN NEEDS HIS DIFFICULTIES BECAUSE THEY ARE NECESSARY TO ENJOY SUCCESS”.

YOUTUBE LINK -

https://youtu.be/bGBkrycEe_w?si=adkVExAO2ZsLPAkk

https://youtu.be/DITDr3FoRvI?si=_Pi_E_396tM_5o4g

Building as Learning Aid (BaLA)

शाळेचे नाव – जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, भाटंबागांव, केंद्र.काटखेडा, पं.स.पुसद, जि.यवतमाळ.

Email ID - zpschoolbhatambagaon@gmail.com

मुख्याध्यापक नाव – श्री महेश मोतीलाल चव्हाण

पूर्वीची शाळा



आज रोजी



प्रस्तावना -

शिक्षण सहाय्य म्हणून बिल्डिंग : Ba LA

[Building as Learning Aid]

शालेय इमारतींच्या पायाभूत सुविधांमध्ये हस्तक्षेप करून शिक्षणातील गुणात्मक सुधारणा करण्याच्या दिशेने एक अभिनव संकल्पना आहे. शाळेच्या इमारती मुलांसाठी असतात. आम्ही आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भाटंबा गावामध्ये, विद्यार्थ्यांना शिकण्याच्या प्रक्रियेत मदत करण्यासाठी इमारत शिकण्यास अनुकूल बनवण्याचा आमच्या पातळीवर प्रयत्न केला. आम्ही शाळेच्या पायाभूत सुविधा मुलांना केंद्रीभूत आणि मुलांसाठी अनुकूल बनवण्याचा प्रयत्न केला आहे जेणेकरून त्यांना क्रियाकलाप-आधारित शिक्षणात मदत होईल.

आव्हाने व समस्या -

1] निरस व उदासीन शालेय इमारत

2] पारंपारिक वर्गखोली रंगरंगोटी

3] लोकसहभागासाठी पालकांची उदासीनता

4] उपलब्ध साधनांची उपलब्धता व पर्याप्तता

5] शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर

6] बहुवर्ग अध्यापनासाठी उपयुक्त शालेय इमारतीचा वापर

7] शाळा गावालगत असल्याने शालेय इमारतीची देखभाल

8] 2 शिक्षक व 100 च्या वर पटसंख्या

समस्या सोडवण्यासाठी शिक्षकांनी केलेली कामे -

1] पालक सभा घेऊन शालेय इमारत व वर्गखोल्या रंगरंगोटी करण्याचा संकल्पना सांगितली

2] पालक भेट घेऊन विद्यार्थी विकासात शालेय इमारत व वर्गखोली किती महत्वाची भूमिका बजावते हे पटवून दिले.

3] मुख्याध्यापक व शिक्षक यांनी सर्वांत आधी लोकसहभाग दिला

4] शिक्षकांनी विविध शैक्षणिक साहित्याची निर्मिती केली

5] वर्गखोली रंगरंगोटी अध्ययन निष्पत्ती नुसार करण्याचा प्रयत्न

6] शालेय व्यवस्थापन समितीला सदर उपक्रमाचे महत्व पटवून देण्याचे कार्य



7] शालेय इमारत बोलकी व आनंददायी ,अभ्यासपूरक मांडणी व देखभाल

शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेऊन समितीला विद्यार्थी विकासात शालेय इमारत व वर्गखोल्या किती महत्वाच्या हे महत्व पटवून दिले. समितीची लेखी परवानगी घेऊन BALA [Building as Learning Aid] उपक्रमासाठी कार्यवाही व नियोजन केले.

नियोजन आणि अंमलबजावणी -

शाळेतील पायाभूत सुविधा हे अध्ययन – अध्यापन प्रक्रियेसाठी एक साधन असू शकते. मुलांना सर्जनशीलतेने सामील करून घेण्यासाठी आमच्या शाळेच्या इमारतीच्या घटकांमध्ये नाविन्यपूर्ण बदल केले. वर्गखोल्या, कॉरिडॉर आणि शाळेचे अंगण यांसारख्या आतील आणि बाहेरील मोकळ्या जागेत विविध प्रकारची शिकण्याची परिस्थिती निर्माण केली.

आमच्याकडे विद्यार्थ्यांसाठी 3 वर्गखोल्या डिजिटल आहेत . त्यापैकी 2 वर्गखोल्यात 2 प्रोजेक्टर लावले 1 ग्रामपंचायात व 1 एका नामांकित सेवाभावी ट्रस्टने दिला, तिस-या वर्गखोलीत संगणक व टीव्ही द्वारे वर्गखोली डिजिटल केली आहे. भिंती पारंपारिक पद्धतीने न रंगवता अभ्यासपूरक व सर्जनशीलतेला चालना देणा-या चित्राद्वारे भिंती रंगवल्या आहे.



शाळेच्या भिंतीवर व बाहेरील परिसरात वेगवेगळी शैक्षणिक रंगरंगोटी केली असल्यामुळे भिंतीवरील चित्र लहान मुलांकरिता जणू काही शिक्षक बनले आहे.



लहान मुले, मुली आपल्या आई-वडिलांना या शाळेत शिकायचं आहे असा आग्रह धरताना दिसत असून भिंतीवर असलेले चित्रे भारतीय संविधान, भारतीय नकाशा, पृथ्वी, स्वच्छतेचे संदेश ,यामध्ये जेवण्यापूर्वी व खेळून आल्यावर हात धुणे, अन्न झाकून सुरक्षित ठेवणे, नेहमी नखे कापणे, पिण्याचे पाणी उंचावर ठेवणे, लहान लहान मुलांचे चित्र, वेगवेगळ्या म्हणी, व राष्ट्रीय प्रतीके, भारतीय तिरंगा, राष्ट्रीय फूल कमळ, राष्ट्रीय फळ आंबा, राष्ट्रीय प्राणी वाघ हे चित्र व चित्र दारे ए, बी, सी, डी, म्हणी, थोर महापुरुषांचे चित्रे, काढले असून त्याबद्दल माहिती भिंतीवर असल्यामुळे लहान मुले या शाळेमध्ये शिक्षण घेण्यास इच्छुक असून त्यांची शाळेबद्दलची आपुलकी वाढली आहे त्यामुळे या भिंती लहान मुलांसाठी जणूकाही बोलक्या झाल्या आहे...



BaLA [Building as Learning Aid] या उपकमामुळे - शाळेचे संपूर्ण स्वरूप बदलले आहे. शाळेच्या आकर्षक रंगरंगोटी मुळे मुलांना शाळेविषयी आवड निर्माण झाली आहे. चटई क्षेत्रावरील आरेखनामुळे विद्यार्थी गणितीय क्रिया साहित्याद्वारे करतात. त्यामुळे गणित विषयाची गोडी विद्यार्थ्यांत तयार झाली.



मुख्याध्यापक व सहाय्यक शिक्षक यांनी शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामपंचायत सदस्य या सर्वांना सहभागी करून लोकसहभागातून या उपक्रमाची वाटचाल सुरू केली. खरोखरच शिक्षण ही एक काळाची गरज आहे. या धकाधकीच्या व स्पर्धेच्या युगात बलदंड पायावर उभे राहायचे असेल तर उत्तम दर्जेदार आणि गुणवत्ता पूर्ण शिक्षण बालपणापासून मिळणे अत्यंत आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन आमच्या शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक परिणामकारक अध्यापन करून विद्यार्थ्यांच्या उपजत ज्ञानाला विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाची धार लावून गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याचे काम बाला BaLA [Building as Learning Aid] या उपक्रमांतर्गत करत आहे.

कोरा नकाशा वाचन -

या अभिनव रंगरंगोटी द्वारे भिंतीवर आपला तालुका ,जिल्हा,राज्य,देश ,जग नकाशे कोणतेही नावे न लिहिता विद्यार्थ्यांना कोरा नकाशा वाचन सराव देण्यात येत आहे.

https://drive.google.com/file/d/1YU8cWtWnDE2q2Cy_XXQoaGQ43YrrBt1p/view?usp=sharing

https://drive.google.com/file/d/1X15Bqn6UHkA_BWvvoneuVtknbGhxDKtm/view?usp=sharing

निसर्ग वाचनालय -



MY BIRTHDAY POINT



परस बाग



बोलका व्हरांडा



फलनिष्पत्ती -

"BaLA [Building as Learning Aid] " हा उपक्रम आमच्या शाळेत अतिशय प्रभावीपणे राबविल्यामुळे आज रोजी 42 कुटुंबाच्या भाटंबा गावच्या शाळेत 107 पटसंख्या आहे जवळपासच्या 4 गावचे विद्यार्थी शाळेत दाखल आहे. तसेच अभिमानाने सांगावेसे वाटते कि शैक्षणिक सत्र 2022-23 मध्ये यवतमाळ जिल्हा परिषद यांनी बाला व झेप उपक्रमाची बोलकी शाळा स्पर्धा घेण्यात आली होती त्या स्पर्धेत आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटंबा गांव ला पुसद तालुक्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.

1) BALA (building as Learning Aid) शालेय इमारत शिकण्याचे साधन

2) ABL (Activity Based Learning) कृतीयुक्त अध्यापन.

3) FLN (Foundational Literacy & Numeracy) मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान

4) शिक्षक teacher

5) विद्यार्थी student

6) शालेय परिसर

वरील अशा अनेक निकषानुसार शाळेचे बाह्य व अंतर्गत मुल्यमापन केले.

"BaLA [Building as Learning Aid] " हा उपक्रम शाळेच्या चार भिंतीच्या आत नसून खुल्या वातावरणात संपूर्णपणे समाजासमोर राबवल्यामुळे पालक त्यांच्या पाल्याची प्रगती स्वतःच्या डोळ्यांनी बघत आहेत ,विद्यार्थी सुद्धा स्वतःला समाजापुढे सिद्ध करत आहे व त्यांच्या डोळ्यात आपल्याला वाचता ,लिहिता येतय याच जे आत्मिक चमक दिसतेय त्यामुळे माझ्यासारख्या शिक्षकाला निश्चितच आपल्या कामाची पावती मिळाली हेच या उपक्रमाचे सर्वात मोठे यश आहे.

माणसाचे जीवन हे आशा आकांक्षांवर अवलंबून आहे जीवनात आशा असणे खूप महत्वाचे आहे. कधीही हार न मानता समोर चालत राहणे म्हणजेच आयुष्य होय. ज्याला संधी मिळते तो नशीबवान,जो संधी निर्माण करतो तो बुद्धिवान आणि जो संधीचे सोने करतो तो विजेता.

शेवटी एकच सांगावेसे वाटते

"मज आवडते ही मनापासुनी शाळा लाविते लळा ही जसा माउली बाळा" |

|BaLA [Building as Learning Aid] तपासणी पथक यवतमाळ



"BaLA [Building as Learning Aid] VIDEO पाहण्यासाठी खालील लिंक क्लिक करा

https://drive.google.com/file/d/16__Bl3F4LrlnRJqiK-wwNiStO0639F11/view

उपक्रमांच्या दिनचर्येतून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुकळी, केंद्र.कोठा, ता.कळंब, जि.यवतमाळ

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.अमोल सुभाषराव पालेकर

सहशिक्षक – श्री.संदीप मधुकरराव कोल्हे





प्रास्ताविक -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुकळी, वर्धा व यवतमाळ जिल्ह्याच्या वर्धा नदीच्या टोकावर असलेले कळंब तालुक्यातील छोटसं गाव, गावात 1 ते 5 वी पर्यंत वर्ग गावात 10 घरे तर 500 च्या आसपास लोकसंख्या सन 2018 च्या मे महिन्यात मुख्याध्यापक अमोल पालेकर व सहायक शिक्षक संदीप कोल्हे यांची नियुक्ती झाली. सगळीकडे अस्ताव्यस्त, दोनच खोल्या, शाळेल्या डेस्क बेंच सर्व शिक्षा अभियातून मिळालेले पण ते व्हरांड्यात अडगळीत पडून ऊन, वारा, पाऊस झेलत होते.

शाळेत पाण्याची व्यवस्था नाही., शाळेबाहेरील हॅन्ड पम्पवरून पाणी आणावे लागे.शाळेचा पट २३ चा. पालकांनी आपल्या मुलांना कळंबला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल केले होते. सुरुवातीला शाळेत गेलो तर कोणीही वाली नसलेली शाळा असे तिचे स्वरुप होते.

जून महिन्यात शाळा सुरु झाल्यावर सर्वात प्रथम संवाद पालक सभा घेवून पालकांशी साधावा या हेतूने मुख्याध्यापक यांनी सभा बोलावली. परंतु तत्कालीन अध्यक्ष म्हणाले कोणीही सभेला येणार नाही. कारण शाळा व्यवस्थापन समितीच्या सभेला तर कोणी येत नाही सगळे आपापल्या कामात असतात. शाळा सुरु झाल्यावर वर्ग १ ते ५च्या मुलांची त्यांना प्राप्त असलेली क्षमता चाचणी घेतली.त्यात मुलांची प्रगती कमकुवत दिसली. शाळेत मुलांचे उपस्थित राहण्याचे प्रमाण कमी तसेच शाळेत कोणताही उपक्रम राबविला गेला नसल्यामुळे मुलांनाही शाळेत उत्साह नव्हता . वर्ग एक ते पाचला दोनच शिक्षक असल्याने मुलांचा पायाभूत साक्षरता व संख्या प्राप्तीसाठी केवळ वर्गातील चार भिंतीत आंतरक्रिया होऊन चालणार नव्हते. मुलांची उपस्थिती वाढण्यासाठी, त्यांना शाळेच्या अंगणात आनंद वाटण्यासाठी तसेच मुलांचे आनंददायी रचनात्मक शिक्षण होण्यासाठी सहशालेय नाविन्यपूर्ण

उपक्रमाची गरज वाटत होती.या सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व शिक्षक यांना एकसंघ बांधल्या जाऊन विद्यार्थी गुणवत्ता विकासात हातभार लागणार होता.

आलेल्या अडचणी –

शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नावीन्यपूर्ण तसेच योग्य उपक्रमांची गरज म्हणून जाणून या उपक्रमातून गुणवत्ता विकासाची ध्येये आम्ही लक्षात घेतले होते. त्यासाठी सर्वप्रथम अडचण म्हणजे पालक सभेसाठी 100% पालकांची उपस्थिती नसणे. परंतु पालक तर सर्व कामांमध्ये व्यस्त असायचे. शाळेबद्दल त्यांना फारच कमी आपुलकी होती. यासाठी सुरुवातीचे तीन ते चार महिने विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता, संख्याज्ञान,यावर आम्ही विशेष लक्ष दिले. विविध शैक्षणिक साहित्यातून अध्ययन प्रक्रिया रंजक व गुणवत्तापूर्ण करण्याचे प्रयत्न सुरु झाले.

मुलांची होत असलेली प्रगती बघून निश्चितच पालकांचा शाळेप्रती भूमिका बदलायला सुरुवात झाली.पालक सभेत पालकांची उपस्थिती न राहिल्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांची कामाची वेळ दुपारी एक ते तीन दरम्यान ते घरी असायचे. सकाळी सात ते बारा पर्यंत ते शेतात जायचे. त्यानंतर ते पुन्हा



तीन वाजता कामावर जायचे हे आम्ही हेरले व त्यांना वेळेनुसार पालकसभा घेण्यास सुरुवात केली या सर्वप्रथम पालक सभेत 'माझ्या मुलाची प्रगती सर्वांसमोर'या सहशालेय उपक्रमापासून सुरुवात करण्याचा मानस व्यक्त केला. मुख्याध्यापकांनी शाळेतील वीज दुरुस्ती, पिण्याचे पाणी समस्या, अस्ताव्यस्त व नादुरुस्त वर्गखोली, शौचालय त्या अनेक समस्या त्यांच्यासमोर मांडल्या. प्रत्येक पालक सभेत या समस्येवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी समितीने पुढाकार घेण्याचे निश्चित करण्यात आले. शाळेत होणाऱ्या सहशालेय उपक्रमांचा विद्यार्थ्यासमवेत पालकांनी सहभाग घ्यावा यासाठी जबाबदारी निश्चित करण्यात आली. माता पालक यांच्या मुलांच्या अध्ययनात त्यांचा सक्रिय सहभाग लाभावा यासाठी पालकांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. परंतु सुरुवातीला अल्प प्रतिसाद लाभला. काही पालक अबोलतर काही निष्क्रिय होते, परंतु हळूहळू आपल्या मुलांच्या गुणवत्ता विकासासाठी पालकांना कार्यशाळेचे महत्त्व कळल्यावर त्यांच्या उत्स्फूर्त सहभागास सुरुवात झाली. सहशालेय उपक्रमातून गुणवत्ता विकास या संकल्पनेवर कार्यकर्त्यांना केवळ विद्यार्थी हा केंद्रबिंदू ठेवून पालकांच्या सहकार्याने व सहभागाने विकासाचे लक्ष आम्ही ठेवले होते.

प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी –

आमच्यासमोर सर्वप्रथम समस्या होती ती विद्यार्थ्यांची नियमित व शाळेत वेळेवर उपस्थित राहणे. यासाठी 'आगगाडीत बसूया- शाळेला जाऊया' या उपक्रमाची सुरुवात केली.या उपक्रमात परिपाठामध्ये मुलांची उपस्थिती गणना केल्यानंतर जे विद्यार्थी अनुपस्थित असायचे त्यांची कारणे जाणून घेणे व त्यांना शाळेत येण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी मुलांनी एका रांगेत गाडी बनवून इंजिन तयार करत, ती आगगाडी मुलांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांना अनुपस्थितीचे कारण विचारत व विनाकारण मुलगा घरी असेल तर त्याच पालकांनी मुलाची शाळेची तयारी करून त्या आगगाडीत बसून दिले जाई आणि इतर मुले मग त्या मुलाना शाळेत आणत.



जर तो मुलगा आजारी असेल तर त्यास गेटवेल सून म्हणून बिस्किट देऊन त्याचा निरोप घेत.अशा प्रकारे गैरहजेरी कमी करून उपस्थिती वाढविण्याचा प्रयत्न झाला. 'माझ्या मुलाची प्रगती सर्वांसमोर' उपक्रमांतर्गत प्रत्येक पालक सभेत मुलांच्या प्रगतीचे व त्यांनी प्राप्त केलेल्या क्षमतेचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी करतात, या उपक्रमाचे आयोजन केल्याने मुलांचे आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण तसेच पालकांनी दिलेली शाबासकी यातून मुलांना शिकण्याचे बळ मिळण्यास सुरुवात झाली.



शाळेत अनेक पुस्तके व बाल साहित्य अस्ताव्यस्त पडलेले होते. मुलांसोबत पालकांनाही वाचण्याची गोडी लागावी, वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी, त्यांना प्रकट वाचनातून समजपुर्वक वाचनाकडे नेता यावे. यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हसत खेळत बाल वाचनालयाची सुरुवात करण्यात आली. बालवाचनालयाचे संचालक मंडळ विद्यार्थ्यांनी स्थापन करून ग्रंथपाल, उपग्रंथपाल यांची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. पुस्तकांची यादी आवक जावक नोंदवही त्यांनी उपयोगात आणण्यास सुरुवात केली.उन्हाळ्यात मुलांसमवेत पालकांनी वाचनाचा छंद जडावा यासाठी फिरते मुक्त वाचनालयाची सुरुवात करण्यात आली. सायकलला पुस्तकांचा बॉक्स ठेवून ग्रंथपालाकडे

वितरण व संकलन ही जबाबदारी सोपविण्यात आली. सोबतच मुलांना विविध साहित्य प्रकारांची ओळख व्हावी. त्यांनी स्वतः काही रचना करावी कवी, लेखकांची ओळख व्हावी. त्यांना मुलाखत कळावी, संवाद कळावा याकरिता मराठी राजभाषा दिनी शाळा स्तरीय बाल साहित्य संमेलन आयोजित करण्याच्या पायंडा घातला गेला.

मुलांना, कथा, कविता, विनोद, जाहिराती, बातमी, कोडी, चित्रे यातून अभिव्यक्त होता यावे यासाठी विद्यार्थी स्वलिखित ज्ञानरंजन मासिकाचे संपादन करण्यास सुरुवात केली. या ज्ञानरंजन मासिकाचे संपादन विद्यार्थीच करतात आणि नेतृत्व गुण सामूहिक जबाबदारी समजावी हे गुण नकळत त्या मुलांमध्ये उमलत गेले. त्यातून विद्यार्थी कथा, कविता, चित्र, कोडी, संवाद यातून अभिव्यक्त होऊ लागली, तसेच त्यांनी लिहिण्यास सुरुवात केली. शाळेच्या विविध कार्यक्रमात जसे 1 मे महाराष्ट्र दिन, 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिन, 2 ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती, 14 ऑक्टोबर बालक दिन इ. या विशेष दिवशी प्रकाशन करून सुरुवात झाली.

विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील घटक शिकत असताना आज विद्यार्थ्यांनी जे काही अध्ययन अनुभव घेतले, त्याचा वापर दैनंदिन व्यवहारात व्हावा तसेच प्राप्त केलेल्या क्षमतांची वारंवार उजळणी व्हावी या संकल्पनेतून परिपाठावेळी 'तारीख एक गणित अनेक' उपक्रमास सुरुवात करण्यात आली. यात विद्यार्थी तारखेनुसार पाढा, दिनविशेष, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्गमूळ, शेकडेवारी, घनफळ, कालमापन, आकृतीबंध, मापन, परिसर अभ्यास याबाबत दैनंदिन अनुभवांची सांगड घालतात. उदाहरणार्थ तीन तारीख घेतल्यास वर्ग पहिलीची मुले दोन अधिक एक तीन, माझ्याकडे तीन लाडू आहेत आईने मला आणखी एकही दिला नाही तर माझ्याकडे तीनच राहिले असे सांगतात .वर्ग दुसरीची मुले तीन ऋतू असतात.तीन, सहा, नऊ, बारा आकृतीबंध सांगतात, त्यापेक्षा वरच्या वर्गातील मुले तीन चा वर्ग, वर्गमूळ, घनमूळ, तीन किलोमीटर म्हणजे 3000 मीटर, तीन रुपये म्हणजे 300 पैसे तीन रस्ते एकत्र येतात म्हणजे तिठा, तीन ही संख्या विषम आहे, रोमन मध्ये तीन कसे लिहितात इत्यादी भन्नाट कल्पना व व्यवहाराची सांगड घालणारी उदाहरणे विद्यार्थ्यांनी सांगण्यास सुरुवात केली. मुलांनी दररोज शिकलेल्या बाबी उजळणी व प्राप्त अध्ययन निष्पत्तीचे साधर्म्य साधून विविध गोष्टी सांगण्यास सुरुवात केली यात सर्व शिक्षक उत्तम सुलभन करतात .





परिपाठाच्या वेळी मुलांना- गोष्ट आनंदाची, गोडी विरामचिन्हाची उपक्रम अंतर्गत छोट्या छोट्या गोष्टींच्या पुस्तकांचे सहभागी वाचन घेण्यास सुरुवात केली ज्यामुळे अगदी वर्ग पहिलीच्या मुलालाही चित्र वाचन, चित्र वर्णन करता येऊन चित्राचे वाचन करत गोष्टीत पुढे काय याचा अंदाज घेता येऊ लागला. शिक्षकांच्या मदतीने मुख्यपृष्ठ, मलपृष्ठ, प्रकाशक, शब्द जुळणी, मूल्य, चित्र रेखाटन, त्यातील विराम चिन्हे, आदर्श प्रकट वाचन, नवीन गोष्ट तयार करणे या सर्जनशील बाबी यातून साध्य करण्यास सुरुवात करण्यात आली.

बदलत्या अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये पालकांना ज्ञानरचनावादी अध्ययन प्रक्रिया कळावी यासाठी पालकांची कार्यशाळा घेण्यात आली ज्यात साहित्यातून गणिती क्रियाबाबत मार्गदर्शन या प्रात्यक्षिक कार्यातून शिक्षकांनी सादरीकरण केले. मध्यान्ह भोजनासोबतच मुलांच्या परिसर अभ्यासाशी निगडित प्रत्यक्ष अनुभव देण्यात परसबागेची महत्त्वाची भूमिका आहे. म्हणूनच निपुण भारत मध्ये परसबागेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. या परसबागेतून आम्ही रचनात्मक परसबाग उपक्रमास सुरुवात केली. खरे पाहता आम्हाला शाळेचा परिसर कमी आहे परंतु कमी जागेत शैक्षणिक नंदनवन विकसित करण्याच्या भूमिकेतून मुलांना परसबागेचे क्षेत्र वाटून देऊन विविध पालेभाज्या, फळभाज्या घेण्यास सुरुवात केली. परसबागेची मशागत, पेरणी करणे, कोंब येणे, पालवी येणे, रोपटे मोठे होणे, वाढ होणे त्याची फळे तोडणे, त्याचे तराजूंनी मोजमाप करणे असे प्रत्यक्ष अनुभवातून परिसर शिक्षण मुलांना मिळण्यास सुरुवात झाली.

मुलांना आर्थिक साक्षरता यावी, व्यवहार ज्ञान चांगल्या प्रकारे विकसित होऊन बचतीचे महत्त्व मुलांना कळावे. बँकेचे व्यवहार, दुकानाचे व्यवहार यातून त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकता यावे यासाठी विद्यार्थी संचालक मंडळाद्वारे आनंदी मुलांची बचत बँक सुरू करण्यात आली.यामध्ये लेखापाल, रोखपाल, व्यवस्थापक, चौकशी अधिकारी, शिपाई, अध्यक्ष अशा विविध भूमिका विद्यार्थी सांभाळतात.बँकेचे पासबुक, पैसे काढणे, पैसे जमा करणे याबाबत पावत्या मुले स्वतः भरतात.पैशाचा हिशोब ठेवतात. बँकेच्या जमा झालेल्या पैशातूनच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उदा. पेन, पेन्सिल, नोटबुक, इरेझर, शार्पनर इत्यादी ताबडतोब उपलब्ध व्हावेत यासाठी विद्यार्थी संचलित ग्राहक भांडार सुरू करण्यात आले. या ग्राहक भांडारातील वस्तूंची नोंद घेणे, हिशोब ठेवणे, नफा तोटा, शेकडा नफा, शेकडा तोटा बघणे याबाबत मुलांना माहिती होऊ लागली. या उपक्रमातून सुरुवात झाली ठोक किंमत, चिल्लर किंमत, झालेला नफा बँकेत जमा करणे व तो परत सर्व सभासदांना वितरित करणे. म्हणजेच सहकारी क्षेत्रातील समभागाची माहिती मुलांना होत आहे. अशा या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या प्रभावी अमंलबजावणी व भितीमुक्त शाळेतून विद्यार्थी शिकू लागले. विद्यार्थ्यांच्या निरोगी जीवनासाठी व व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी 'दसऱ्याच सोनं व्यसनमुक्तीचं लेणं' या दसऱ्याच्या सणावेळी या उपक्रमाची सुरुवात झाली.यामध्ये विद्यार्थ्यांनी आपट्याच्या पानावर व्यसनमुक्तीचा संदेश असणारे घोषवाक्य लिहून आपापल्या नातेवाईक पाल्यांना व्यसनमुक्ती जीवनाचे अभिवचन,आशीर्वाद मागायचे

असा उद्देश होता. सोबतच नातेवाईकांना व्यसनमुक्तीची पत्र लिहून त्यांना व्यसनाचे दुष्परिणाम समजून सांगणे हा त्यामागे उद्देश ठेवण्यात आला.





सन 2019 - 20 च्या सत्रात मार्च महिन्यात कोरोना संसर्गजन्य आजाराने संपूर्ण जगाला ग्रासून टाकले. अशावेळी शाळेतील किलबिलाट थांबला विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवास थांबेल अशी भीती व्यक्त केली जात होती, परंतु आम्ही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा रथ थांबू न देता नाविन्यपूर्ण सहशालेय शैक्षणिक उपक्रमांमधून गुणवत्तेचा रथ वेगाने पुढे नेण्यासाठी कार्य केले. कोरोना काळात गावात जाणे, प्रत्यक्ष वर्ग घेणे शक्य नव्हते, तेव्हा शिक्षक मित्र, विषय मित्र, पालक, गावकरी, पोलीस पाटील,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांच्या सहकार्याने "ध्वनीक्षेपक बनला अध्ययन दूत " या उपक्रमास सुरुवात केली. यात पोलीस पाटील यांच्या घरी ध्वनीक्षेपक लावून तो आमच्या मोबाईलला घरून जोडला जाईल व मुले कॉन्फरन्स वर जोडलेली असत व पालक ज्यावेळी घरी असत त्यावेळी मुलांची अध्ययन प्रक्रिया दोन्ही ध्वनीक्षेपकावर सुरू असायची. यासाठी गावातील महिला बचत गट यांनी ध्वनीक्षेपकाची व्यवस्था करून दिली. गप्पा, गोष्टी, संवाद, प्रकट वाचन, चर्चा करण्यास सुरुवात त्यामुळे अनेक पालकांनी आपल्या मुलांची प्रगती लक्षात येऊ लागली. शाळा बंद असताना गावात शैक्षणिक वातावरण निर्माण व्हावे यासाठी गावच्या 'बोलक्या भिंती देई शिक्षणास गती'उपक्रम राबविण्यात आला. गावातील भिंतींवर शैक्षणिक क्रियाकलाप दर्शविणारे फ्लेक्स लावण्यात आले. यावर मुलांना काही क्रिया करता येईल यांचे वाचन म्हणून करता येईल यासाठी पालकांनी मनोमन सहकार्य केले.प्रत्येक चौकात गटप्रमुख नेमून क्रिया कलाप यासाठी आवश्यक खडू, डस्टर, स्केचपेन याची व्यवस्था करण्यात आली. मुले तिथे आपली वेगळी क्षमता कौशल्य विकसित करू लागली.

आमच्या शाळेत राबविण्यात येत असलेल्या सहशालेय उपक्रमांची फलनिष्पत्ती मोठ्या प्रमाणात आढळतात.या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी गुणवत्ता विकासात व त्यांच्यामध्ये झालेला बदल पालकाना त्यांच्या समक्ष विद्यार्थ्यांची प्रगती प्रत्येक पालक सभेत दिसू लागल्यामुळे शाळेबद्दल विश्वास पालक, ग्रामस्थ यांना निर्माण झाला आणि त्यामुळेच त्यांनी शाळेला पाण्याची व्यवस्था, थंड पाण्याची व्यवस्था, फिल्टर पाणी सोबतच शाळा रंगरंगोटी आणि वीज बिल याची सुद्धा तरतूद त्यांनी करून दिली आहे.पालकांच्या कार्यशाळा उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील गोंधळ कमी होऊन त्यांच्या गुणवत्ता विकास होऊ लागला. पालक स्वतःही शिक्षक मित्र बनले. आगगाडीत बसू या शाळेला जाऊया उपक्रमातून 100% विद्यार्थी उपस्थित राहू लागले. विद्यार्थी आवडीने शाळेत आल्यानंतर त्या

मुलांच्या भावना, मन समजून घेणे त्या शाळेत आनंदी वातावरण निर्माण होणे आवश्यक असते तरच ते शाळेत शिकू शकते, टिकू शकते, त्याच्या क्षमता विकसित होऊ शकतात. अध्ययन निष्पत्ती साध्य होऊ शकतात हे जाणून 'My Mood Today' उपक्रमाची सांगड घालण्यात आली. मुले शाळेत आल्यावर त्यांचा मूड बघण्यासाठी त्यांनी आनंदी, दुःखी, घाबरलेला किंवा रागावलेला इमोजी घेऊन समोर जायचे. तिथे आरशासमोर उभे राहून स्वतःला न्याहाळायचे. कंगवा, तेल पावडरने स्वतःला व्यवस्थित करायचे, इमोजीवर जो मूड असेल, त्यानुसार त्याचे नाव वर्गात लिहायचे यातून कोणत्या विद्यार्थ्याचा मूड आनंदी होण्यासाठी खेळ गोष्टीतून वातावरण निर्मिती तयार करायची अशी प्रक्रिया केली. शाळास्तरीय बाल साहित्य संमेलन या उपक्रमामुळे भाषेची गोडी व लेखनातून भाषणात अभिव्यक्त होत विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढू लागला. भाषेतील विविध साहित्य प्रकाराची त्यांना ओळख झाली. मी सुद्धा छान लिहू शकतो. ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये दिसू लागली. बाल वाचनालयातील विविध पुस्तकातून वाचलेले माय बुक ऑफ क्रिएटिव्हिटी मध्ये लिहिण्याची आवड मुलांना लागली. फिरते मुक्त वाचनालयातून मोबाईल टीव्हीचा वेळ कमी होऊन गावात वाचन संस्कृती तयार होण्यास हातभार लागला. मुलांना छोट्या छोट्या गोष्टीच्या पुस्तकातून प्रकट वाचन समजपूर्ण वाचनाकडे जाता आले. आनंदी मुलांच्या बचत बँक, विद्यार्थी ग्राहक भांडार या उपक्रमात विद्यार्थी स्वतः संचालक म्हणून व्यवहार सांभाळतात, त्रैमासिक सभा आयोजित करणे, व्यवहाराचा लेखाजोखा सर्वासमक्ष मांडणे यातून त्यांना सहकार्यवृत्ती, एकोपा, आर्थिक तपशील सांभाळण्याचे अनुभव शिक्षण प्राप्त झाले. त्यांनी केलेल्या ग्राहक भांडारातील व्यवहाराचा नफा त्यांना मिळू लागल्याने त्यांच्या बचतीला व्याज मिळू लागले. कॅशबुक, चोपडी, पासबुक हाताळण्याचे ज्ञान त्यांना प्राप्त झाले.

परिपाठातील गोष्ट आनंदाची, गोडी विराम चिन्हाची उपक्रम अंतर्गत मुलांना प्रकट वाचन करता येऊ लागले. गोष्टीत पुढे काय असेल याचा त्यांना अंदाज बांधता येऊ लागला. अबोल मुले चित्र वर्णन यात बोलू लागली. वाचन व लेखन दरम्यान त्यांना विराम चिन्हाचा अर्थ कळू लागला. दसऱ्याच सोनं व्यसनमुक्ती लेणं या उपक्रमामुळे मुलांना पत्र लिहिणे कौशल्य विकसित झाले. तसेच जीवनात व्यसनाचे दुष्परिणाम जाणून यापासून अलिप्त राहून निरोगी जीवन कसे जगावे याचे महत्त्व त्यांना कळले.मुलांचा भावनिक व सामाजिक विकास होण्यास यामुळे मदत झाली.भविष्यात निरोगी पिढी निर्माण व्हावी यासाठी शाळेत शिकलेल्या चांगल्या गोष्टींचे जीवनात अनुसरण करणे म्हणजेच खरे शिक्षण हेही मुलांना व पालकांना पटले.

कोरोना काळात रविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे आजही आमची मुले शंभर टक्के प्रगत आहेत तसेच ध्वनीक्षेपक बनला अध्ययन दूत, गावच्या बोलक्या भिंती, ऑनलाईन वर्ग, चौकातील शाळा, इत्यादी उपक्रमामुळे मुलांची अध्ययनक्रिया सतत चालू आहे ज्यामुळे विद्यार्थ्यांनी एससीईआरटीमार्फत राबविण्यात आलेल्या सर्व उपक्रम व स्पर्धांमध्ये सक्रिय सहभागी होऊन यश संपादन केले. शाळेच्या उपक्रमाची दखल जिल्हा व राज्य पातळीवर घेण्यात आली. अमरावती विभागातर्फे नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी सन्मानपत्र देऊन शाळेचा गौरव करण्यात आला.







मागील एप्रिल महिन्यात राज्याचे शिक्षण आयुक्त माननीय सुरज मांढरे साहेब यांनी प्रत्यक्ष जेव्हा शाळेला भेट दिली तेव्हा विद्यार्थी संचलित आनंदी मुलांची बचत बँक, विद्यार्थी ग्राहक भांडार उपक्रमाचे भरभरून कौतुक केले व शाळेच्या बँकेत संचालक मंडळ यांच्या आग्रहास्तव फिक्स डिपॉझिट खाते त्यांनी उघडले तेव्हा मुलांना अतिव आनंद झाला. त्यांनी नियोजित 30 मिनिटाच्या भेटीव्यतिरिक्त एक तास 45 मिनिटे वेळ देऊन शाळेतील सर्व नाविन्यपूर्ण सहशालेय उपक्रम जाणून घेतले.सहशालेय उपक्रम राबवून विद्यार्थी गुणवत्ता विकास सर्वांसाठी पथदर्शी असल्याचा अभिप्राय त्यांनी नोंदविला.

'तारीख एक गणित अनेक उपक्रम' मुलांच्या सर्जनशीलतेला व नवनिर्मितीला चालना देणारा असल्याचे त्यांनी मत व्यक्त केले. 'आनंदी मुलांची बचत बँक' उपक्रम जिल्ह्यातील अनेक तालुक्यांनी राबवण्यास सुरुवात केली आहे. 'My Mood Today' या उपक्रमाची दखल सिखे या संस्थेने घेऊन त्यांच्या राष्ट्रीय त्रेमासिकमध्ये प्रकाशित केली आहे. शाळेच्या सहशालेय व नाविन्यपूर्ण उपक्रमाची दखल समग्र शिक्षा महाराष्ट्र पोर्टलनेही घेतली आहे.अनेक उपक्रमांचे व्हिडिओ त्यांनी आपल्या पोर्टलवर अपलोड केलेले आहे. एस सी ई आर टी ने शाळेच्या अनेक उपक्रमांची दखल घेतली आहे. अनेक प्रकारचे न्यूज चॅनल, वर्तमानपत्रे यांनीही विविध शैक्षणिक उपक्रमांना प्रसिद्धी दिली आहे. यामुळे निश्चितच शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचा हुरूप वाढण्यास मदत झाली.

शाळेतील नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे शाळेची ख्याती संपूर्ण जिल्ह्यात पसरली असून दर शुक्रवारी विविध तालुक्याचे शिक्षक, पदाधिकारी आमच्या शाळेत भेट देतात.



शाळेतील नावीन्यपूर्ण गोष्टी सहशालेय उपक्रमातून शिकतात. शाळेतील विद्यार्थ्यांची उल्लेखनीय प्रगती बघून विद्यार्थी पटसंख्या 32 पर्यंत नेण्यात यशस्वी झालो. गावातील एकही विद्यार्थी कळंब तालुक्याचे ठिकाणी इंग्रजी शाळेत जात नाही हे उपक्रमाचे सुयश म्हणता येईल.

जि. प. प्राथमीक शाळा सुकळी आज नाविन्यपूर्ण सहशालेय उपक्रमातून उल्लेखनीय गुणवत्ता विकासाकडे वाटचाल करीत असून अनेक विद्यार्थी नवोदय विद्यालय, स्कॉलरशिप, राष्ट्रीय अंकगणित स्पर्धा, ऑल इंडिया सैनिक स्कूल ओलंपियाड फाउंडेशन, आरटीएसई महादीप अशा विविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन करीत आहेत.दैनंदिन अध्ययन अध्यापनास सहशालेय उपक्रमाची जोड असल्यास प्रत्यक्ष अनुभवातील शिक्षण देणे, प्रत्येक विद्यार्थ्याच्या विकासात लक्ष देणे सहज शक्य होते असे वाटते.

खडकाळ माळरानावरील शालेय नंदनवन

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फांगदर, ता. देवळा, जि.नाशिक.

Email ID - zpschoolfanghdar@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री संजय मालोजी गुंजाळ


पाचटाच्या झापात भरणारी वस्तीशाळा,

खडकाळ माळरानावरील शालेय नंदनवन..

जिल्हा परिषदेच्या शाळांबाबत समाजात सातत्याने सकारात्मक चर्चा होण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. गेल्या सात आठ वर्षांत जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कमालीचे बदल झाले.हे बदल अनेकांना अनुकरणीय ठरले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फांगदर ता. देवळा (नाशिक) ही शाळा खडकाळ माळरानावर बहरलेले शालेय नंदनवन ठरत आहे. आदिवासी शेतमजुरांच्या पाल्यांची ही शाळा राज्यभरातील हजारो शिक्षक व पालकांचे आकर्षण व प्रेरक ठरत आहे. 'मुले ही देवाघरची फुले असतात.' विद्येच्या मंदीरात येणारी निष्पाप बालके घडवण्याची खरी कसरत गुरूजनांची असते.मग ती मुले कोणाचीही असोत.दिवसभर शेतकऱ्यांकडे मजूरी करणा-या पालकांच्या लेकरांची ही उपक्रमशील शाळा जिल्ह्यालाच नव्हे तर महाराष्ट्रातील शाळांसाठी 'मॉडेल' ठरली आहे.

समाज सहभागातून कायापालट -

नाविन्यपूर्ण बदलाने समाज आकर्षित होतो, ही स्वाभाविकता आहे. ह्याच जाणिवेतून ही शाळा निरागस बालकांचा आरसा होऊ लागली. मुलांच्या गुणवत्तेतून अडाणी, अशिक्षित पालकांच्या चेह-यावर आनंद पोहोचला. या गुणात्मक बदलातुनच शाळेला मदतीचा ओघ सुरु झाला.ख-या अर्थाने या वस्तीशाळेचे संस्थापक स्वयंसेवक शिक्षक खंडु मोरे व त्यांचे सहकारी संजय गुंजाळ यांनी मुलांसह अवघी शाळाच बहारदार केली. खामखेडा गावाच्या डोंगर पायथ्याशी खडकाळ जागी फांगदर ही टूमदार वस्ती आज राज्याच्या शिक्षण विभागाला पडलेलं शैक्षणिक स्वप्नच असल्याचे येथील शिक्षण प्रेमी म्हणतात.




वस्तीशाळा ते प्रयोगशील शाळा प्रवास.....

नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्याच्या शेवटच्या टोकास गिरणा नदीच्या काठावर कळवण, देवळा व सटाणा तालुक्याच्या हद्दीवर खामखेडा हे गाव. या गावापासुन चार किमी अंतरावर फांगदर ही पंचवीस-तीस आदिवासी शेतमजुरांची वस्ती. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या उदेशाने वस्ती,वाडी,तांड्या पाड्यावर 'धरूया शिक्षणाची कास करुया वस्तीचा विकास' या धोरणा अंतर्गत २ जुलै २००१ रोजी अपुऱ्या भौतिक सुविधांच्या बळावर पाचटाच्या झापात फांगदर वस्तीशाळेची मुहूर्तमेढ रोवली गेली. शालेय प्रवाहातून बाहेर फेकली गेलेली तसेच शिक्षणच सुरु नसलेल्या अवघ्या पंधरा विद्यार्थ्यांवर ही शाळा सुरु झाली.

सह्याद्री पर्वतरांगांच्या पायथ्याशी असलेल्या डोंगराच्या माळरानावर पाचटाची झाप,खाजगी कौलारू घर,कांदाचाळ,पत्र्यांचे शेड यात शाळा भरवत तब्बल सहा सात वर्षं अशाच स्थितीत मुलांनी शिक्षण घेतले. भौतिक सुविधांचा अभाव असलेली ही शाळा २००८ मध्ये जिल्हा परिषदेकडे नियमित झाली.

ह्याच घटनेतून शाळेच्या बदलाची सुरुवात झाली.ही प्रकाशवाट दोन्ही शिक्षकांना प्रेरक ठरली. 'अगर किसी चीज को दिल से चाहो तो पुरी कायनात उसे तुमसे मिलाने मे लग जाती है'. याप्रमाणे दोघा शिक्षकांच्या ह्या निश्चयाला हळू हळू फळ मिळायला सुरुवात झाली.सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळेला टुमदार इमारत मंजूर झाली.जागेचा प्रश्न होताच, उजाड माळरान खुणावू लागले.मोठ्या कष्टाने माळरान सपाट करत टेकडीवर शाळेचे बांधकाम पूर्ण केले.खडकात फुलवलेल्या बागेसारखी उजाड माळरानावरची ही शाळा आज जिल्ह्यातील शैक्षणिक पर्यटनस्थळ ठरत आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली आहे.

दोघां शिक्षकांनी शाळा स्तरावर राबवलेल्या ज्ञानरचनावाद, क्षेत्रभेट उपक्रम, डिजीटल इंटरॲक्टीव क्लासरूम, औषधी बगीचा, सुंदर शैक्षणिक संकुल, विविध शैक्षणिक साहित्यातून अध्यापनाची गोडी, वाढदिवस समारंभ, विविध जयंती उत्सव, सामाजिक संस्था, देणगीदारांच्या योगदानातून प्राप्त केलेल्या भौतिक सुविधामधुन संपन्न विविध शैक्षणिक उपक्रमांतून फांगदर शाळेची जिल्ह्यात 'प्रयोगशील शाळा' म्हणुन वेगळी ओळख निर्माण झाली आहे.



फांगदर ही टुमदार वस्तीशाळा असली तरी खाजगी शाळांच्या स्पर्धेत उत्कृष्ट झाली आहे. शैक्षणिक गुणवत्ता व उत्तम दर्जा खंडु मोरे,संजय गुंजाळ या शिक्षकांच्या योगदानाने मिळाला.नवनवीन उपक्रमांच्या जोरावर राज्यातील कानाकोपऱ्यात फांगदर शाळा चर्चेत आहे.महाराष्ट्रातील पहिली वस्तीशाळा आयएसओ मानांकन मिळविण्याचा मान या शाळेला मिळाला आहे.या विकासात खामखेडा ग्रामस्थ, विविध सामाजिक संस्था,समाजातील दानशुरांच्या सहाय्याने व पालकांच्या अथक परिश्रमातून राज्यातील प्राथमिक शाळांना नवी उर्जा ठरेल असे कामकाज या आदिवासी वस्तीवरील शाळेने उभे केले आहे.

तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन प्रगत शाळा म्हणुन लौकिक मिळवला आहे.गुणवत्ता विकासात मागील पाच वर्षापासून सतत अ श्रेणीत स्थान पटकावले आहे.'Creativity is intelligence having fun' ह्या आईनस्टाइनच्या उक्तीप्रमाणे फांगदर शाळेने सर्जनशीलतेला आनंदाची जोड देत नवनवीन प्रयोग शाळेत राबवले.

सतत उपक्रमशीलता –

सतत राबविल्या जाणाऱ्या वैविध्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांमुळे जिल्ह्यातील 'उपक्रमशील शाळा' असा नावलौकिक या शाळेने मिळवला.पाच वर्षांपूर्वी गुणवत्ता विकासात शाळा 'ड' श्रेणीत होती.परंतु अवघ्या दोन वर्षांत शिक्षकांच्या अथक प्रयत्नास लोकसहभागाचा जोड यामुळे फांगदर शाळेने अंतर्बाह्य़ बदल घडवून आणत तीन वर्षापुर्वी 'आयएसओ' मानांकनास गवसणी घातली.द्विशिक्षकी असलेल्या फांगदर शाळेच्या खंडू मोरे व आनंदा पवार या दुकलीने अपार मेहनतीने गुणवत्तेसह नावारुपास शाळा आणली. सध्या संजय गुंजाळ याचं पाठबळ लाभत आहे.

लोकसहभागातून शाळेचा विकास -

या प्रगतीत लोकसहभाग महत्त्वपूर्ण ठरला.शेतमजुर आदिवासी बांधवांचे पाल्य असल्याने लोकसहभाग तरी कसा शक्य ? त्यामुळे पदरमोड करून शिक्षकांनी शाळेची गुणवत्ता सुधारली.गुणवत्तेच्या नावाने मजूरांच्या शेतकरी मालकांना साकडं घातलं.समाजातील दानशूर घटक हेरले.समाजाला शाळेत आणले.विविध उपक्रम समाज माध्यमातुन समाजापुढे येऊ लागले.



'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे लोकसहभाग सुरू झाला. आज फांगदर शाळेकडे पंधरा लाखाहून अधिक लोकसहभाग जमा करत शाळा विकासातील निधीचा अडसर दूर केला.कोणत्याही शासकीय मदतीविना शाळेने 'ई लर्निग'च्या माध्यमातून एका वर्गाची अध्ययन-अध्यापनाची सोय केली.दहा संगणक,प्रोजेक्टर, साउंड सिस्टीम, इंटर ॲक्टीव स्मार्ट बोर्ड,एम्प्लीफायर, चोवीस तास विजेसाठी सोलर सिस्टीम, इंटर ॲक्टीव स्मार्ट पॅनल यांसह आदर्शवत ई-लर्निंग सुविधा एका आदिवासी वस्तीवर सुरु केली आहे.

शेतमजुरांची मुले अतिशय सराईतपणे संगणक हाताळत अध्यापनात प्रभावीपणे वापर करतात. विश्वास नांगरे पाटील यांच्या 'मन मै है विश्वास' चे मूर्त रूप फांगदरला साकारले गेले. "शाळेला गावाचा आधार असावा व गावाला शाळेचा अभिमान वाटावा." या उक्ती प्रमाणे गावालाच नव्हे तर जिल्ह्याला शाळेचा अभिमान आहे.

फांगदरच्या चिमुकल्यांसाठी परदेशातुन मदत –

प्रतिकुल परिस्थितीत असलेल्या शाळेची उपक्रमशीलता व गुणवत्ता समाजमाध्यमातुन लोकांपर्यंत पोहोचली. छोट्याशा जिल्हा परिषदेच्या शाळेबद्दल समाजाला आकर्षण वाढले. शाळा भेटीस लोक येऊ लागले. शाळेच्या गरजांची जाणीव झाली. कळवण येथील रमेश शिरसाठ यांनी इंटर ॲक्टीव स्मार्ट बोर्ड, सुनिल पाटील, नानाजी मोरे, सी.आर.पाटील यांनी संगणक, अंगोला देशातील स्थायिक दिपक भामरे यांनी दोन संगणक आदींसह खामखेडा ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन शाळेला संगणक मिळाले आहेत.या संगणकावर आदिवासी विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे गिरवतात. दुसऱ्या टप्प्यात अलका सुर्यवंशी पुणे,विलास सुर्यवंशी मुंगसे, देवळा डॉक्टर असोसिएशन, स्वप्निल ॲग्रो वडाळा या दात्यांच्या माध्यमातुन शाळेच्या इतर गरजा पुर्ण झाल्या.

शारिरीक विकासाचे सामर्थ्य असलेले क्रीडांगण लोकसहभागातूनच जेसीबीच्या सहाय्याने तयार झाले आहे. उमाजी देवरे, संजय बच्छाव, प्रभाकर शेवाळे य शेतकऱ्यांनी स्वखर्चातून चारशे फुटावरून शाळेसाठी पाइपलाईन खोदाई, पन्नास हजाराहून अधिक भरीव मदतीचे योगदान दोहा, कतार या देशातून रविंद्र आहेर, अंगोला देशातील दीपक भामरे यांच्या मदतीतुन ८०० फुटावरून तीन इंची पाईप लाईन


संजय बच्छाव या शेतकऱ्याच्या स्वत:च्या विहिरीवरून जोडणी करून दिली आहे त्यामुळे पाण्याचा आजीवन प्रश्न शाळेचा मार्गी लागला.शालेय आवारात कमान तयार करून दिली. भगिरथाने गंगा आणावी असेच कार्य या मान्यवरांनी केले.

बदलांच्या दिशेने रंगरंगोटी, औषधी बगीचा, सुंदर शैक्षणिक संकुल, साहित्य निर्मिती, पाण्याची व्यवस्था, हातपंप, शालेय आवारात पाच लक्ष रूपयांचे पेवर ब्लॉक, नाशिक येथील विविध उद्योगात कार्यरत असलेल्या युवकांनी दीड लक्ष रुपयांची सोलर सिस्टीम बसवून दिली. वाचन विकासात समृद्ध होण्यासाठी हजाराहुन अधिक ग्रंथसंपदा असलेले वाचनालय सुरु आहे. तसेच पुणे येथील स्वप्निल पवार यांच्या माध्यमातून अमेरिका येथील बुकवाला संस्थेच्या माध्यमातून शाळेला १०० पुस्तकांचा संच मिळाला. सोनाली दळवी यांच्या माध्यमातून पुणे येथून एक हजार गोष्टींची पुस्तके मिळाली. बालकांमधील गुणात्मक बदल व शैक्षणिक गुणवत्ता, उपक्रमशीलतेच्या जोरावर पंधरा लाखांपेक्षा अधिक लोकसहभागातून हे नंदनवन फुलल्याचे शिक्षक आनंदाने सांगतात.

नॅचरल व कॉर्पोरेट लुकची स्कुल –

जिल्हा परिषदेच्या परंपरागत वातावरणास फाटा देत कॉर्पोरेट लुक दिला. 'हसऱ्या फुलांची बाग जणू, हिरवळ चौफेर सुगंधी, ही तशीच शाळा, मुले इथ स्वच्छंदी 'कवी केशवकुमारांच्या स्वप्नातील शाळा फांगदर मध्ये अनुभवायला मिळते. भरगच्च वृक्षसंपदेने नटलेलं मनोहारी रूप येणाऱ्या- जाणा-यांना भुरळ घालते. टेकडीच्या माथ्यावर टुमदार तालुक्यातील सर्वात स्वच्छ व सुंदर शाळा म्हणून फांगदर शाळेकडे पाहिले जाते.जिथे एकेकाळी पिण्यास पाणी दुरापास्त असतांना शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळा हिरवीगार नटवली आहे.

शिक्षकांनी शालेय आवारात तीनशेपेक्षा अधिक झाडे लावली आहेत.बेचाळीस औषधी वनस्पतींचा बगीचा फुलवला आहे. हिरडा, बेहडा, जायफळ, कोरपड, आनंद, जायफळ, आवळा, तुळस, रिठा, निंब, वड, अश्वगंधा या वनौषधी असलेली जिल्ह्यातील एकमेव स्कुल आहे.प्रत्येक वृक्षास स्वत:च्या नावाच्या पाट्या आहेत. यातुन विद्यार्थ्यांना वृक्षांची ओळख होते. कार्यालय सुसज्ज करत शहरीकरणाचा कॉर्पोरेट लुक देत कार्पेट, प्रत्येक वर्ग खिडक्यांना पडदे, विद्यार्थी-शिक्षकांना ओळखपत्र, नेमप्लेट असं वेगळेपण



शाळा जपते. शालेय आवारात विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने पक्ष्यांची तहान भागविण्यासाठी झाडांवर बाटल्यांच्या साहाय्याने सुविधा केली आहे.त्यामुळे चिमणी, साळुंखी, कावळे यांसह विविध पक्ष्यांचा किलबिलाट शालेय आवारात सतत ऐकू येतो.'चला मुलांनो खेळूया... पक्षी आपण होऊया' असा आनंद बालकांमध्ये नेहमीच असतो.


पहिली डिजिटल ई-लर्निंग स्कुल –

काळानुरूप बदल करून संगणक, इंटरॲक्टिव्ह स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टरवर शाळेत अध्यापन केले जाते. आदिवासी शेतमजुरांची मुले अध्ययन करत असतांना ह्या साधनांचा कुशलतेने वापर करतात. ई-लर्निंग सुविधेने टॅबलेटच्या साहाय्याने वस्तीतील आदिवासी मुले शिक्षण घेतात हे परिसरात गौरवास्पद आहे. तंत्रस्नेही साधनांचा प्रभावी वापर करत शाळेतील चौथीतील मुले पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन स्वतः तयार करतात. पहिली पासुन विद्यार्थी संगणक हाताळत असल्याचे सकारात्मक चित्र आहे. शिक्षकांनी विविध शैक्षणिक व्हीडीओ तयार केले असुन स्वतंत्र ब्लॉग आहे.शैक्षणिक सॉफ्टवेअरच्या माध्यमातुन विद्यार्थी पाठ्यक्रम पुर्ण करतात.या साधनांचा अध्यापनात वापर होत असल्याने विद्यार्थी उपस्थिती व गुणवत्ता वाढ झाली आहे.

क्षेत्रभेटीला महत्त्व –

अध्ययन व अध्यापन प्रक्रिया विविध उपक्रमांच्या माध्यमांद्वारे फांगदर शाळेत रंजक बनविण्यात आली आहे.पारंपरिक 'खडू फळा' या पद्धतीसह क्षेत्रभेट उपक्रमातुन चार भिंतींच्या आड मिळालेले ज्ञान बाहेरील जगाशी जोडणे हा उद्देश ठेवत घोकंपट्टी पद्धतीच्या शिक्षणापासून विद्यार्थ्यांची सुटका करण्यासाठी त्यांना स्वयंअध्ययनास प्रवृत्त केले जाते.

बिनभिंतीच्या शाळेत जीवन जगण्याचे शिक्षण मिळत असल्याने शिक्षक नेहमी मुलांना कधी टेकडीवर, कधी उघडया मैदानावर विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या उद्देशाने नेऊन विद्यार्थी व शिक्षकांमधील अनामिक भीती दूर कशी होईल याबाबत शिक्षक दक्ष असतात.नदी, घाट, लघु उद्योग, बायोगॅस प्रकल्प, आदर्श आधुनिक शेती, प्राथमिक आरोग्य केंद्र, टपाल कार्यालय, बँक, वीटभट्टी, कुक्कुटपालन उद्योग,



साखर कारखाना, पोलीस ठाणे अशा अनेक ठिकाणी शाळेच्या विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना चाकोरी बाहेर पडत अध्यापन करतांना सुलभता व सहजता अनुभवास येत असल्याने सहज शिक्षण यातुन निर्माण होत असते. शिक्षकांच्या धडपडीमुळे व ग्रामस्थांच्या सहकार्यातून शाळेचा इथपर्यंतचा विकास घडून आला आहे.ही शाळा म्हणजे शिक्षण विभागासाठी भूषण असल्याची जिल्हा परिषदेचे शिक्षण व लोकप्रतिनिधींच्या शाळा भेटी दरम्यानच्या प्रतिक्रिया शाळेविषयी सर्व काही सांगून जातात.

दप्तरमुक्त शनिवार –


सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक उपक्रमांबरोबरच कवायत, व्यायाम, योगासने, प्राणायाम, ई-लर्निंग साहित्याचा अधिक वापर, ज्ञानरचनावादी साहित्य ,विविध साहित्य खेळ या बाबी मागे राहतात.परिणामी दर शनिवारी या बाबी प्रभावीपणे राबवले जातात .ह्या दिवशी मुक्त आविष्कारासाठीचे नानाविध उपक्रम शाळा राबवीत असते. मुलांच्या दप्तराला सुट्टी असते. दप्तरमुक्त शनिवार उपक्रम प्रभावीपणे राबवत असल्याने शनिवारची उपस्थिती शंभर टक्के टिकवुन ठेवण्यात यश आले आहे.मुले म्हणतात.... 'छान फुले, छान मुले, सारेच कसे आनंदात डोले.

सोशियल मीडियाचा वापर -

जिल्ह्यातील शाळेचा http://khandumore34dreamsschool.blogspot.in/ ब्लॉग असणारी पहिली शाळा फांगदर आहे. त्याच बरोबर शिक्षकांनी स्वतःचा ब्लॉग तसेच khandumore शैक्षणिक युट्युब channel तयार केले असुन अनेक शैक्षणिक साहित्य ह्या ठिकाणी पहावयास मिळते. शाळेचा नावाचे zpschoolfhangdar या नावाने फेसबुक पेज केले असल्याने शाळेचे विविध शैक्षणिक उपक्रम नेहमी शिक्षक सोशल माध्यमातुन झळकवत असल्याने त्यातून इतरांना प्रेरणा मिळते .

शालेय वस्तु भांडार -

शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची परिस्थिती हलाखीची आहे.त्यामुळे व वस्तीवर शालेय गरजा पूर्ण होतील अशी व्यवस्था नसल्याने शिक्षकांनी शाळेत वस्तु भांडार तयार केले आहे. वस्तु भांडारात विद्यार्थ्यांना



पेन, पेन्सिल, वह्या, रंग, तशेच शालेय शैक्षणिक साहित्य 'ना नफा ना तोटा' या तत्वावर मिळते.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गरजा शाळेतच पूर्ण होतात.याचा हिशोब शाळेतील विद्यार्थी ठेवत असल्याने हे वस्तु भांडार कौतुकाचा विषय ठरले आहे.

शिक्षणाची वारी -

शाळांच्या गुणवत्ता विकास व शालेय व्यवस्थापन समितीच्या सक्षमीकरणासाठी शासनाने 'शिक्षणाची वारी'चे आयोजन केले होते. जळगाव येथे २०१८ मध्ये झालेल्या या वारीत शिक्षण क्षेत्रातील नवनवीन प्रयोग पाहण्याची संधी मिळाली. जिल्हा परिषद फांगदर शाळेचा "लोकसहभागातून शाळा विकास" हा स्टॉल लावण्यात आला होता. ह्या दालनास तीन दिवसात एक लाखाहून अधिक लोकांनी भेट दिली ही बाब ह्या छोट्याश्या शाळेला अभिमानास्पद आहे . वारीच्या माध्यमातून अधिक प्रकर्षाने चर्चेत आलेल्या फांगदरला मघिल पाच वर्षात अनेक शाळांतील असे दहा हजाराहुन अधिक शिक्षक, शिक्षणप्रेमी, अधिकारी, पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती, सदस्य, ग्रामस्थ, विद्यार्थी यांनी भेट दिली. चांदवड देवळा मतदार संघाचे आमदार डॉ. राहुल आहेर यांनी स्वतः भेट देत शाळेचे विविध उपक्रम जाणुन घेतले. या कौतुकास्पद बाबींत विशेषतः जिल्ह्यातील दीडशे शाळांच्या सहलीत तीन हजार शिक्षकांनी आमच्या उपक्रमशीलतेची दखल घेऊन आपापल्या शाळेत बदल केला आहे.इथं आलेल्या प्रत्येकाला म्हणावेसे वाटते....


"वाचू पुस्तके चला गड्यांनो, रंजनासवे ज्ञान नवे नवे.

विमानाची हवाई सफर, शिक्षणमंत्र्यांशीही संवाद:

"मंजिल उन्हीको मिलती है, जिनके सपनो मे जान होती है.

पंखोसे कूछ नही होता, होसलोंसे उडान होती है"

जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना विमान प्रवास करणं तसं अशक्यप्रायच गोष्ट. आमच्या मुलांच्या 'घरी अठरा विश्व दारिद्रय...भाकरीच्या चंद्राची भ्रांत' विमानप्रवास तर दूरच घरातील कुणी साधे विमानही पाहिलेले नाही,काहींचे आई-वडील शेतमजुरीचे काम करून संसाराचा गाडा चालवत तर बाकी शेती




करून उदरनिर्वाह करत.अनेक मुलांनी तर अजूनपर्यंत जिल्ह्याचे ठिकाणही पाहिलेले नाही. अशा परिस्थितीत वस्तीशाळेत शिकणाऱ्या २४ मुलांनी थेट विमानाने नाशिक ते मुंबई असा विमानप्रवास केला. एवढ्यावरच न थांबता शिक्षणमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याशी बातचितही केली. मुंबई दर्शनही केले. विद्यार्थ्यांना थेट विमानातून सफर घडविण्याचे ठाणले. शिक्षक संजय गुंजाळ, खंडू मोरे यांनी याबाबतचा प्रस्ताव पालकांसह शिक्षण समितीसमोर ठेवला.आपली नाही तर निदान मुलांची तरी विमानप्रवासाची हौस फिटेल. पालकांनीही मोठ्या कष्टाने सहा महिने पैशांची जमवाजमव केली. ठरल्याप्रमाणे नियोजन झाले मार्च २०१९ रोजी विद्यार्थ्यांनी नाशिक येथून विमानाने मुंबईकडे झेप घेतली.या मुलांनी मुंबईत राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या सेवा सदन निवास्थानावर त्यांची भेट घेतली.

मंत्री महोदयांनी विद्यार्थ्यांना विमान प्रवासाबद्दल अनुभवी विचारत कुठून विमान प्रवास केला.तुमची शाळा कशी आहे. तुम्हाला तुमच्या शाळेत काय बदल हवा आहे.इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना त्यांची कविता दुसरी आणि तिसरी च्या विद्यार्थ्यांना देखील कविता म्हणायला लावल्या.पहिलीतील विद्यार्थ्यांना त्यांना आवडणाऱ्या गोष्टी जाणून घेतल्या. शाळा व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेचे शिक्षणाच्या वारीची यशोगाथा व छोट्यांच्या मोठ्या गोष्टी हे शिक्षक खंडु मोरे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्याच्या विधान भवनास भेट दिली. विधानभवनाच्या आमदारांचे आसन, विधान भवनातील कामकाजाचे सविस्तर माहिती जाणून घेतली. राज्याच्या मंत्रालयात भेट दिली. गेट ऑफ इंडीया त्याचबरोबर विद्यार्थ्यांना जल वाहतुकीच्या देखील अनुभव यावा यासाठी विद्यार्थ्यांना जहाजावरून देखील शिक्षकांनी सफर भेट घडवून आणली. वस्तीवरच्या या विद्यार्थ्यांना हा नवा अनुभव होता. त्यांना एक नवे जग पहायला मिळाले. या सहलीचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसला.विशेष म्हणजे चोवीस विध्यार्थ्यापैकी नऊ विद्यार्थ्यांचे पालक रोजंदारीने कामाला जाणारे शेतमजुर होते. इतर शेतकऱ्यांची मुले होती.

डिझाईन फॉर चेंज उपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर निवड -

डिझाईन फॉर चेंज या उपक्रमात नुकताच शाळेचा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर निवडला गेला. विद्यार्थ्यांना शाळेत येणाऱ्या अडचणींची सोडवणूक विद्यार्थी स्वतः करतात अशा ह्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारातून वाहून जाणारे पावसाच्या पाण्याची विल्लेवाट योग्यरीत्या लावत हे पाणी बोअरवेल मध्ये



सोडल्याने हा बोअरवेल पुन्हा सुरू केला. या उपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर शंभर शाळांमध्ये फांगदरची निवड झाली.

https://youtu.be/QvgkTrbZhCE?si=X_mxHsoKOPoDdAiC

"शाळेला गावाचा आधार असावा, व गावाला शाळेचा अभिमान वाटावा''

अश्या प्रकारे येथील पालक,ग्रामस्थ ,सामाजिक संस्था ,लोकप्रतिनिधी व मुख्या संजय गुंजाळ व खंडू मोरे या शिक्षकांच्या अथक प्रयत्नातुन एका पाचटाच्या झापात भरणारी शाळा राज्याच्या नकाशावर उपक्रमातून झळकली आहे.समाजाच्या सुंदर समन्वयातून शाळेचा विकास घडला.

'अनंत आमुचि ध्येयासक्ती, अनंत अन आशा किनारा तुला पामराला'

कुसुमाग्रजांच्या कोलंबसचे गर्वगीतातील ह्या ओळींसारखे काम फांगदर शाळेत सातत्याने सुरू आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ नितीन बच्छाव ,गटशिक्षणाधिकारी सतीष बच्छाव,शिक्षण विस्तार अधिकारी किरण विसावे यांच्या सततच्या मार्गदर्शनातुन शाळा शैक्षणिक झेप घेत आहे.

माध्यमांनी घेतलेली शाळेची दखल –

झी २४ तास वाहिनीने सुखवार्ता या सदरातून केलेली यशोगाथा खालील लिंक द्वारे आपण पाहू शकतात.

https://youtu.be/XC1G4pSFlPQ

https://youtu.be/bENCuKYUKd8?si=sZ_Zzcd3Uk5HOj8X


https://youtu.be/ulNemdsqyz0?si=vE6lWmLa1IlMxcLA

https://youtu.be/hAk27lNK_OQ?si=UrHLuDeTDiXn5KG4

https://youtu.be/vFrc-cpKnbM?si=hhP3fVTr8R2YjPYM

https://youtu.be/qzdK6t9hgyQ?si=APhTFN_VEmYmnxsO

https://youtu.be/6QJadPTw_EQ?si=MrEwfY9LkkA5yv63



शाळेच्या बदलाचे फोटो-






























शिक्षणाची वारी
आम्ही शिक्षणाच्या वारीचे वारकरी...








COMPUTER





डिजिटल तंत्रज्ञानाचा अध्ययन अध्यापन प्रक्रियेत प्रभावी वापर

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करंजवण, ता.दिंडोरी, जि.नाशिक

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.प्रकाश वसंतराव गोसावी

Email ID - zpschoolkaranjwan1909@gmail.com

सहशिक्षक - श्री.प्रकाश लोटन चव्हाण

प्रास्ताविक –

एका रिसर्च नुसार वर्गात २०% विद्यार्थी अतिप्रगत असतात,६०% विद्यार्थी त्या वर्गाच्या क्षमतेवर आधारित प्रगत होत असतात मात्र २०% विद्यार्थी त्या-त्या वर्गाच्या क्षमता प्राप्त करण्यात असमर्थ असतात वर्गात तयार झालेली हि २०-६०-२० ची दरी नष्ट करून सर्वाना समान पातळीवर आणण्यासाठी नाविण्यतेचा शोध घेणे गरजेचे असते. नवीन शैक्षणिक धोरण NEP 2020 नुसार २०२६ पर्यंत इयत्ता ३ री पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता व अंकागणितीय क्षमता यात संपन्न करणे हे ध्येय ठेवण्यात आले आहे त्यानुसार आमच्या शाळेत गणित विषयाची विशेष आवड निर्माण करण्यासाठी व भाषा विषयाचे कौशल्य संपादन करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आलेला आहे.

शिक्षकांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी –


- कोरोना नंतर इयता १ लीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्याही पद्धतीची शैक्षणिक पार्श्वभूमी नव्हती व त्याच वर्षी विद्यार्थी क्षमतेपेक्षा अधिकचीअपेक्षा ठेवत एकात्मिक द्विभाषिक पाठ्यपुस्तकाची निर्मिती करण्यात आली होती त्यामुळे इयत्ता पहिलीत मुले आवश्यक त्या प्रमाणात प्रगत होऊ शकले नव्हते.
- इयत्ता दुसरीत आल्यावर विद्यार्थ्यांना १०० पर्यंत ज्ञान होते मात्र अक्षरी लेखन करू शकत नव्हते.तसेच गणिती क्रिया करण्यात ५०% विद्यार्थी मागे असल्याचे दिसून येत होते.
- मराठी विषयाचे शब्द वाचन करत होते मात्र वाक्य वाचन उचित वेगात करू शकत नव्हते.
- इंग्रजी वर्णाक्षरे वाचन होते मात्र शब्द वाचन करण्यात अडचणी दिसून येत होत्या.
- या अडचणी वर मात करण्यासाठी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच विविध उपक्रमांचे नियोजन करून विद्यार्थी प्रगतीकडे वाटचाल करण्यात आली.

अडचणींवर मात करण्यासाठी शिक्षकांनी केलेले प्रयत्न -

प्रत्येक विद्यार्थ्याला त्या त्या विषयांच्या अध्ययन निष्पत्ती वर्ष अखेर गाठता याव्यात यासाठी खालील प्रमाणे नियोजन केले.

अ) गणित विषयात विद्यार्थी स्वयं अध्ययनाने सक्षम करण्यासाठी Math's Project हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला यात

- कोणतेही दोन अंक विद्यार्थ्यांना देणे
- त्यापासून विद्यार्थी स्वत: २ संख्या तयार करतील.
- त्या संख्या अक्षरात लेखन करतील.
- त्यांचे विस्तारित रुपात लेखन करतील



- आधीची व नंतरची संख्या लेखन करतील
- लहान मोठी संख्या ठावून <,> चिन्हाचा वापर करून तुलना करतील.
- आणखी मानाने एक संख्या घेऊन तीन संख्याचा चढता उतरता क्रम लावतील.
- ३ बेरजेची व ३ वजाबाकीचे उदाहरणे तयार करून ते योग्य पद्धतीने सोडवतील.
- ६ गुणाकाराची उदाहरणे मांडणी करून सोडवण्याचा प्रयत्न करतील.

या अंतर्गत विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाची सवय लावण्याची सुरुवात झाली. त्यांना या रचेनेचे Laminated कार्ड तयार करून देण्यात आले. एका फलकावर या उपक्रमाची डिझाईन करून मुलांना गटाने सहाध्यायी शिक्षणाची गोडी लावण्याची सुरुवात झाली. मुले स्वयं अध्ययनाने शिकू लागले. विद्यार्थी हा प्रोजेक्ट सोडवातांनाचा व्हिडिओ पहा.
https://www.youtube.com/watch?v=xh2sWwC8CHQ

आ) मराठी विषयासाठी –


शब्दचक्र, शब्दबाग, चित्रावाकय वाचन, शब्दासाखळी, शब्द डोंगर, अनुभव कथन, शब्दात लपलेले शब्द शोधणे, विषयानुसार माहिती लेखन करणे ही उपक्रमची अध्ययन फलक तयार करून घेण्यात आली. आणि विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनातून शिक्षण देऊन समृद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

इ) डिजिटल शिक्षणातून FLN समृद्धी उपक्रम -

कोरोना काळात विद्यार्थ्यांना मोबाईलची विशेष आवड निर्माण झाली होती. पालक विद्यार्थ्यांविषयी याबाबत नेहमीच तक्रार करतांना दिसायचे. या प्रश्नावर प्रभावी तोडगा काढण्यासाठी मी डिजिटल खेळाची रचना तयार केली यात मराठी, गणित, इंग्रजी या तीनही विषयांचा समावेश करण्यात आला. रोज सकाळी ८ वाजता पालकांच्या मोबाईलवर खेळाची लिंक पाठवून विद्यार्थ्यांना खेळातून शिकण्यासाठीचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमाचे एक Android App तयार करून महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त मा.सुरजजी मांढरे साहेबांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. आमच्या तालुक्यातील प्रत्येक मुख्याध्यापकांना तालुक्याच्या प्रशासकीय ग्रुपवरून लिंक देण्यात येऊ लागली. राज्य भरातील शिक्षकांना App व रोजच्या डिजिटल खेळाची लिंक देण्यात येऊ लागली. माझ्या वर्गा बरोबरच तालुक्यातील जिल्ह्यातील व राज्यातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणातून समृद्ध करण्यात आले.

App लिंक - https://play.google.com/store/apps/details?id=smart.educationfln&pcampaignid=web_share

ब्लॉग लिंक- https://chavanprakash001.blogspot.com/p/fln_11.html




पालकांना शाळेत उपक्रमाविषयी माहिती देतांना






वर्गात सहाध्यायी पद्धतीने TAB वर स्वयं अध्ययन करतांना विद्यार्थी

वर्गात विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन करता यावे यासाठी विविध अध्ययन साहित्याची निर्मिती करण्यात आली, यात PPT, Interactive Game shows तयार करून सर्व वर्गांना पुरवण्यात आले.

Drive link- https://drive.google.com/drive/folders/1o4LMuF83mYY4QIZrHdAvSX7XVMAQ6EgY?usp=sharing

विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनासाठी शेकडो लॅमिनेटेड शिट्स तयार केल्या आहेत विद्यार्थी स्वयं अध्ययनाने व सहाध्यायी पद्धतीने शिक्षण घेतात.


लॅमिनेटेड वाचन कार्ड निर्मिती



Creation Of Lamination Cards for enjoyable self learning





उपक्रम अंमलबजावणी नंतर दिसून येणारे दृश्य परिणाम (फलनिष्पत्ती) -

Math's Project हा अनोखा उपक्रम राबवल्या नंतर वर्गातील सर्व विद्यार्थी २ अंकापासून संख्या तयार करून वाचन व लेखन करू लागले. दिलेल्या अंकावरून विद्यार्थी गणिताच्या क्रिया करण्यास सक्षम झालेले दिसून आले. इयत्ता २ री तूकडी ब वर्गातील एकूण २९ विद्यार्थ्यांपैकी १६ विद्यार्थी यांनी गणित विषयात अध्ययन प्रभुत्व संपादन केल्यानंतर त्यांना ३ अंका पासून तीन संख्या तयार करणे व त्यापासून वर दिलेल्या सर्व गणिती क्रिया करणे तसेच ३ अंकी संख्यांचा गुणाकारच नव्हे तर भागाकार क्रिया सुद्धा करू लागले, २ री चे विद्यार्थी चौथीचे ३ अंकी संख्यांचे गुणाकार व भागाकार करू लागले आहे ही महत्वाची यशस्विता येथे टिपता येईल त्यासाठी ह्या लिंक वरून आपणास व्हिडिओ पाहता येईल.

https://www.youtube.com/watch?v=xh2sWwC8CHQ

मराठी विषयाचे शब्दचक्र या उपक्रमामध्ये विद्यार्थी १ अक्षर दिल्या नंतर त्या अक्षराने सुरु होणारे शब्द व शेवट होणारे शब्द स्वत: लेखन करू लागले. शब्दबाग उपक्रमामध्ये एक शब्द दिल्यावर त्याच्याशी संबधित शब्द लेखन करू लागले. त्या शब्दांचा वापर करून विद्यार्थी वाक्य लेखन करू लागले. चित्र वाक्य वाचन उपक्रम मध्ये पाठ्यपुस्तकातील घटक व भाषा पेटीतील साहित्यांचा वापर करून विद्यार्थी चित्राऐवजी शब्द घेऊन वाक्य वाचन करू लागले. शब्दसाखळी तयार करणे या उपक्रमामध्ये विद्यार्थी एक शब्द दिल्यावर त्यांच्या शेवटच्या अक्षराने सुरु होणारे नवीन शब्द बनवत शब्दांचा पाठलाग करतात. शब्द डोंगर उपक्रमात एक शब्द दिल्यावर त्यापासून एक एक शब्द वाढवत नेत विद्यार्थी किमान ५ ते ६ वाक्ये तयार करतात, अनुभव कथन उपक्रम मध्ये प्रसंगाचे किमान ५ ते ६ वाक्ये सांगण्याचा प्रयत्न करतात, शब्दात लपलेले शब्द शोधणे एका मोठ्या शब्दात लपलेले लहान लहान शब्द तयार करून विद्यार्थी लेखन करतात. याप्रकारे विद्यार्थ्यांमध्ये गेल्या ४,५ महिन्यात बदल घडून येतांना दिसत आहेत.

उपक्रमाचा व्हिडीओ पहा.
https://youtu.be/reKzVTymPns?si=3frldlwtd-VbLjBQ

इंग्रजी विषयात देखील काही विद्यार्थी अक्षरांचा क्रम योग्य प्रकारे लावून अर्थपूर्ण शब्द तयार करणे व वाचन लेखन करणे या कृती सहज करण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी ह्या लिंक वरून आपणास व्हिडिओ पाहता येईल.


https://youtu.be/61J0dfQpnJ8?si=QMAxle3ARuNWVxqB

डिजिटल शिक्षणातून FLN समृद्धी उपक्रमात पुन ३६५ दिवस रोजचा नवीन डिजिटल खेळ हे ध्येय ठेवण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांना रोजचा नवीन गेम मिळू लागल्याने विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साधनाचा योग्य वापर करण्याची वृत्ती निर्माण झाली. मराठी, गणित, इंग्रजी गेम सोडवून मुले what's app द्वारे स्क्रीन शॉट पाठवतात तसेच राज्यभरातील विद्यार्थी पालक देखील मोठ्या प्रमाणात यात सहभागी होऊन what's app द्वारे स्क्रीन शॉट पाठवतात इतर शाळेतील विद्यार्थीही या उपक्रमातून समृद्ध होत आहेत. रोजचे गेम ब्लॉगवर वर अपलोड केले आहेत व एक Android App ही विकसित केले असून तेथूनही अनेक शिक्षक विद्यार्थ्यांना त्या गेमचा लाभ देतात.




डिजिटल शिक्षणातून FLN समृद्धी App & स्वयं अध्ययन इयत्तानिहाय Apps प्ले स्टोअरवर उपलब्ध आहेत.

वर्गात डिजिटल माध्यमातून सुरु असलेले अध्यापन




डिजिटल शिक्षणातून FLN समृद्धी या दैनिक गेम सिरीज ला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद पालकांचे पोस्ट



समारोप -

नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन इयत्तेच्या शेवटी त्या - त्या इयत्तांच्या अध्ययन क्षमता विद्यार्थ्यांनी प्राप्त कराव्यात असे सूचित करण्यात आलेले आहे त्यानुसार आमच्या शाळेत विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहे यात मुख्याध्यापक व सहकारी शिक्षकांचे पालकांचे छान सहकार्य लाभल्याने गणित विषयाबरोबर इतर विषयात मला अपेक्षित यश साध्य करता येत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा अध्ययन अध्यापनात प्रभावी वापर करण्यासाठी विद्यार्थ्यांना विविध ऑनलाईन खेळ, व्हिडिओ, पीपीटी या द्वारे स्वयं अध्ययनाची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या विविध उपक्रमामुळे वर्गातील शैक्षणिक वातावरण आनंददायी व प्रसन्न बनले आहे.



अतिदुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धामडकी, ता. इगतपुरी, जि. नाशिक.

Email ID – zpschooldhamadki@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.प्रमोद पांडुरंग परदेशी


प्रास्ताविक -

बिन रस्त्याचे गाव, कोणत्याही फोनला नेटवर्क नाही. दोन किलोमीटर पायपीट करत वाडीत प्रवेश करावा लागतो. संपूर्ण आदिवासी म. ठाकूर लोकवस्ती, पावसाळी भात शेतीवर कुटुंब जीवन जगत आहे. कुटुंबातील प्रमुख अशिक्षित असल्याने मोलमजुरी करून दिवस कसाबसा पूर्ण करत कुटुंब गाडा चालवत आहेत. अशा परिस्थितीत मुलांचे शिक्षणासाठी गरजा पूर्ण करतांना तारेवरची कसरत कुटुंब प्रमुख करत असतात. वाडीत पायाभूत सुविधा नाहीत.

अतिदुर्गम भागात आधीच शिक्षणापासून फारकत घेणारे विद्यार्थी असतांना त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षकांना प्रचंड मेहनत घ्यावी लागते. इगतपुरी तालुक्यातील आमची अतिदुर्गम धामडकीवाडी त्यापैकीच. भावली खुर्द धरणाच्या बाजूला रस्त्यापासून 2 किमी दूर असलेल्या वाडीत पायपीट करून खाचखळग्यांच्या रस्त्याने जावे लागते. इयत्ता 1 ली ते 4 थी पर्यंत जिल्हा परिषद शाळा असून एकूण 17 विद्यार्थी पटावर आहेत. मुख्याध्यापक म्हणून मी स्वतः प्रमोद परदेशी आणि सहकारी शिक्षक दत्तू निसरड दोघे काम पाहत आहोत.

अडचणी -

आदिवासी अतिदुर्गम भागातील शाळा असल्याने येथील 17 विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी लोकसहभागातुन दानशूर व्यक्तींची मदत घेत अनेक उपक्रम राबविण्याचे नियोजन केले. अशिक्षित पालक कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांची चाललेली धडपड शिवाय मुलं शिकले पाहिजे यासाठी त्यांचे सहकार्य मोलाचे म्हणून अनेक मार्गातून शाळेची वाटचाल सुरु केली. 2018 मध्ये बदली ने शाळेत रुजू झालो शाळेत पायाभूत भौतिक सुविधा पूर्ण मोडकळीस आल्या होत्या. दोन्ही वर्ग खोल्या पावसाळ्यात मुलांना बसण्या योग्य नव्हत्या. किचन शेड, स्वच्छतागृह दोन्ही मोडकळीस आले होते. शिवाय दळणवळण सुविधा नाहीत. पालक मोलमजुरी साठी सकाळी 6 वाजता वाडीतून बाहेर गावी निघून जातात. घरात लहान भावंड सांभाळ साठी शाळेतील मुलांना घरीच ठेवत असत. अशा अनेक अडचणीना सामोरे गेलो. ह्या सर्व समस्या समजून घेऊन आम्ही दोन शिक्षकांनी नियोजन तयार केले. पालकांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण व्हावी व शाळेतील मुलांची उपस्थिती 100 असावी यासाठी प्रयत्न सुरु केले. लोकसहभागातून विद्यार्थी विकास साधण्यासाठी नियोजन तयार केले.



उपाययोजना / अंमलबजावणी -

पालकांच्या व शाळेच्या समस्या ओळखून सर्व प्रथम शाळा व्यवस्थापन समिती, पालक सभा आयोजित केल्या. पालकांमध्ये शिक्षणाविषयी जनजागृती निर्माण केली. शाळेच्या गरजा बाबत PPT च्या माध्यमातून विविध NGO / फाउंडेशन यांच्या कडे सादरीकरण केले.

मी स्वतः 2015 पासून माझ्या बदली आधीच्या शाळेत विविध NGO च्या माध्यमातून तालुक्यातील 21 शाळांच्या शैक्षणिक व भौतिक सुविधा पूर्ण करून काम करत आहे. त्यामुळे माझ्या धामडकीवाडी च्या शाळेबाबत मुंबईस्थित पेहेचान प्रगती फाउंडेशन व अभिनव अजमेरा यांनी शाळेसाठी मदतीचा हात पुढे केला. शाळेच्या गरजांचे प्राधान्यक्रम ठरवून काम सुरु केले. विद्यार्थ्यांना वर्षभर पुरतील अशा शैक्षणिक गरजा त्यात वह्या, पेन-पेन्सिल, दप्तर, सॅन्डल, शूज इत्यादी साहित्य मोफत मिळाले. त्यामुळे पालक खूप समाधानी झाले. शाळेत विद्यार्थी उपस्थिती 100% राहू लागली.

दृष्य परिणाम / फलनिष्पत्ती -

ऍडव्हेंचर एज्युकेशनल टूर मुंबई यांच्या माध्यमातून मुंबई येथील नामांकित इंटरनॅशनल स्कूल दिवाळी सुट्टी 4 दिवस कॅम्प आयोजित करते त्यात सिंगापूर इंटरनॅशनल स्कुल दहिसर, इको मोंडेला स्कूल ऐरोली, सिंघानिया इंटरनॅशनल स्कुल मुंबई, वेबग्योर स्कूल अंधेरी आणि ऐरोली या शाळेतील विद्यार्थी वाडीत शाळेच्या पायाभूत भौतिक सुविधा तसेंच गावातील ग्रामस्थांसाठी जीवनावश्यक गरजापूर्ती करत असतात. त्यामुळे पालकांना शाळा आपलीच आहे हीं भावना निर्माण झाली. मुलांना शाळेत नियमित पाठवू लागले.

पेहेचान प्रगती फाउंडेशन मुंबई यांचे कडून शाळेतील मुलांना मोफत मुंबईदर्शन सहल तसेंच नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अंजेनेरी येथील फ्लॉवर गार्डन येथे मोफत सहल आयोजित करून आमच्या आदिवासी विद्यार्थ्यांनी वाडीपलीकडचे जग अनुभवायला मिळाले. पेहेचान प्रगती फाउंडेशन मुंबई यांचे कडून संपूर्ण वर्षभराचे शैक्षणिक साहित्य मोफत मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढी साठी खूप मदत झाली. इयत्ता सातवीपर्यंत मध्येच शाळा सोडणारे विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी बाहेर गावी जाऊन नियमित शिक्षण घेत आहेत. बालविवाह बंद होऊन पालक मुलींना शिक्षणासाठी बाहेर गावी पाठवत आहेत. लोकसहभागाच्या माध्यमातून आमच्या धामडकीवाडी शाळेतील विद्यार्थी आज गुणवत्ता पूर्ण शिक्षण पूर्ण करत आहेत.

समारोप -

आदिवासी भागातील आणि अतिशय दुर्गम भागातील आमची शाळा विद्यार्थी विकासात महत्वाचे योगदान देऊन विद्यार्थी विकास साधला आहे. आजपर्यंत विविध NGO व फाउंडेशन यांच्या माध्यमातून शाळेसाठी, विद्यार्थ्यासाठी व गावासाठी असे एकूण ७० लाख रुपये वस्तू रूपाने मदत मिळून दिली आहे. त्यात २०१९ मध्ये कोरोना मुळे सर्व जग थांबले त्याच बरोबर शाळाही बंद झाल्या. काळाची पावले ओळखून आम्ही आमच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अभिनव उपक्रम राबवून मुलांचे अखंडित शिक्षण चालू ठेवले. आमच्या टीव्हीवरील धामडकीवाडी शाळा उपक्रम राज्यभर गाजला. याची फलनिष्पत्ती म्हणून आमचा उपक्रम हा अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चंदगीरवाडी केंद्र – खिरविरे सोबतच इगतपुरी तालुक्यातील ३५ गावात

"टिव्हीवरील धामडकीवाडी" शाळा उपक्रम सुरु झाला. आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यासोबत तालुक्यातील इतरही विद्यार्थ्यांच्या विकासात आमच्या शाळेचे योगदान देता आले. राज्य नवोपक्रम स्पर्धेत आमचा "टीव्हीवरील धामडकीवाडी शाळा" जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले व राज्यस्तरावर निवड करण्यात आले. आमच्या उपक्रमाची बातमी विविध न्यूज वाहिनीवर महाराष्ट्रभर प्रसारित झाली आहे. यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नाशिक (डायट) यांचे मार्गदर्शन मिळाले. आमच्या विद्यार्थ्यांसाठी आमची शाळा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थी विकास साधत आहे. तसेच आमच्या तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी निलेश पाटील साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी अशोक मुंढे साहेब, नांदगावसदो केंद्राचे केंद्रप्रमुख राजेश खैरनार सर यांचेही मोलाचे मार्गदर्शन आम्हांला मिळाले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्य यांनी वेळोवेळी मोलाची साथ दिली. विविध NGO व फाउंडेशन यांची अनमोल साथ त्याच मुळे आम्ही आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा विकास करू शकलो.



लोकमत

धामडकी : विद्यार्थ्यांना डिजिटल साधनांच्या तंत्रज्ञानाची ओळख, गावाला पाण्यासाठी टाकी

शिक्षकाची किमया, गावासह शाळेचा कायापालट

भास्कर सोनवणे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

घोटी : इगतपुरी तालुक्यात अनेक अतिदुर्गम आदिवासी गावे आहेत. वर्षानुवर्षं शिक्षणाशी नाळ जुळत नसल्याने सर्व क्षेत्रात मागास राहण्याचे प्रमाण एकीकडे वाढतच आहे. अशा स्थितीत धामडकी या आदिवासी गावाचा दर्जेदार शिक्षणासह कायापालट झाला. विविध कामांद्वारे गावाला झपाट्याने बदलून टाकणारे प्राथमिक शिक्षक प्रमोद परदेशी हे गावासाठी देवदूत ठरले आहेत.

धामडकी जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून काम करताना त्यांनी विविध संस्थांच्या मदतीने तालुक्यातील १२ शाळांना डिजिटल आणि भौतिक सुविधा मिळवून दिल्या. तीन गावांना रोटरी क्लब घोटीच्या साहाय्याने मोफत शौचालये बांधून हगणदारीमुक्त केले. मुंबईच्या पेहेचान प्रगती फाउण्डेशनच्या अध्यक्ष प्रगती अजमेरा, अमेरिकावासी अभिनव अजमेरा हे परदेशी यांच्या समन्वयाने भौतिक व शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी गावाला भरीव मदत करीत आहेत. विद्यार्थ्यांना वर्षभराचे सर्व शैक्षणिक साहित्य, वह्या, पेन, पेन्सिल, दप्तर यांसह शाळेला लागणाऱ्या सर्व सुविधा पुरविण्यात येतात. डिजिटल शाळेसाठी प्रोजेक्टर, कॉम्प्युटर, स्क्रीन देऊन विद्यार्थ्यांना डिजिटल साधनांच्या तंत्रज्ञानाची ओळख करुन दिली. आदिवासी महिला पाण्यासाठी वणवण भटकंती करीत असल्याने शाळेला व गावाला पाण्याचे जलकुंभ बांधले.



धामडकी शाळेत संगणक हाताळताना आदिवासी विद्यार्थिनी.

> शाळेत रुजू झालो तेव्हा गावात चौथीच्या पुढे कोणी शिकलेले दिसले नाही. कोणतीही सुविधा नसलेले माझे विद्यार्थी टॅब आणि कॉम्प्युटरवर शिक्षण घेतात. धामडकी, भगतवाडीचा झालेला कायापालट पाहून जगातील सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याचे समाधान मिळते. आवडत्या धामडकी वाडीसाठी अजून बरेच काही करायचे आहे.
>
> - प्रमोद परदेशी, धामडकी



लो शिक्षक दिन विशेष

ॲडव्हेंचर एज्युकेशनल टूर सोबत असलेल्या संपर्कांमुळे परदेशी मुंबईच्या नामांकित इंटरनॅशनल शाळेतील विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा धामडकी शाळेत घेतला.

Hello Nashik Gramin
Page No. 1 Sep 05, 2019
Powered by: erelego.com


जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धामडकी
ता.इगतपुरी, जि.नाशिक



आपलं महानगर

'टीव्हीवरची शाळा' पाहण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांची पायपीट

इगतपुरी●कोरोना काळात शृंखला तुटलेल्या शिक्षणासाठी राज्यभरात उपयुक्त ठरलेल्या टीव्हीवरच्या शाळेच्या धामडकीवाडी पॅटर्न पाहण्यासाठी इगतपुरीचे गटविकास अधिकारी किरण जाधव यांनी खाचखळगे आणि दगड गोट्यांच्या रस्त्याने एक किलोमीटर पायपीट केली. त्यांच्यासह सहायक गटविकास अधिकारी भरत यंदे यांनी धामडकीवाडी गाठली. बिनरस्त्याच्या अतिदुर्गम धामडकीवाडीसाठी लवकरच भक्कम रस्ता करणार असल्याचा शब्द त्यांनी यावेळी दिला. चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी मोबाईल नेटवर्क नसतांनाही येथील शिक्षक प्रमोद परदेशी यांनी टीव्हीवरच्या शाळेचा धामडकीवाडी पॅटर्न यशस्वी केला. हा पथदर्शी प्रकल्प राज्यभरात अतिदुर्गम भागासाठी बहु उपयोगी असल्याने राज्याच्या शिक्षण विभागाला सविस्तर कळवणार असल्याचेही ते म्हणाले.

कोरोनाच्या उद्रेकामुळे राज्यभर शाळांमधील किलबिलाट थांबलेला आहे. यामुळे अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा विसर पडू लागल्याचा दुष्परिणाम



शिक्षक दत्तू निसरड यांनी टीव्ही संच दिला भेट...

धामडकीवाडीची बिनरस्त्याची ओळख पुसून काढण्यासाठी गटविकास अधिकारी किरण जाधव यांनी तातडीने पाऊल उचलले आहे. त्यानुसार आगामी काही महिन्यात ह्या वाडीला भक्कम रस्ता बनवून पुढील भेट शासकीय मोटारीने करू असा त्यांनी शब्द देऊन कार्यवाही सुरू केली आहे. शिक्षक दत्तू निसरड यांनी शाळेच्या उपक्रमासाठी यावेळी टीव्हीसंच भेट दिला.

जायला लागला. ऑनलाईन शिक्षण द्यायचे तर मोबाईलला नेटवर्क नाही. पेचात सापडलेले इगतपुरी तालुक्यातील धामडकीवाडी शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद परदेशी यांनी टीव्हीवरच्या शाळेचा धामडकीवाडी पॅटर्न सूक्ष्म नियोजनाने यशस्वी केला. राज्याचा शिक्षण विभाग, शिक्षण संचालनालय, शिक्षण तज्ज्ञ, टिलिमिली आदींनी दखल घेऊन टीव्हीवरच्या शाळेची प्रशंसा केली.

याबाबत इगतपुरीचे गटविकास अधिकारी किरण जाधव यांना विशेष उत्सुकता होती. त्यानुसार त्यांनी सहायक गटविकास अधिकारी भरत यंदे, केंद्रप्रमुख श्रीराम आहेर, शिक्षक संघटनेचे नेते निवृत्ती नाठे यांच्यासह धामडकीवाडीला भेट दिली. रस्ता नसलेली इगतपुरी तालुक्यातील धामडकीवाडी येथे जाण्यासाठी अधिकाऱ्यांना खाचखळग्यांचा आणि दगड गोट्यांचा एक किलोमीटर रस्ता तुडवावा लागला.

धामडकीवाडी गावात पोहोचल्यावर चावडीवर लावलेल्या टीव्ही समोर बसून चिमुरडे विद्यार्थी आनंददायी शिक्षणाचे धडे गिरवत असलेला दिसले. घरांमध्येही टीव्हीवर धामडकीवाडी पॅटर्न सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी स्वतः अजमावून पाहिले. विद्यार्थ्यांना अभ्यास क्रमावर आधारित प्रश्न विचारल्यानंतर विद्यार्थ्यांनी उत्तरे दिली. टीव्हीवर प्रसारण होणाऱ्या पंधरवेशी संबंधित माहिती गटविकास अधिकारी किरण जाधव यांनी घेऊन प्राप्तिक्षिक घेतले. टीव्हीवरच्या धामडकीवाडी पॅटर्नबाबत मुख्याध्यापक प्रमोद परदेशी, सहकारी शिक्षक दत्तू निसरड, व्यवस्थापन समिती अध्यक्ष गोकुळ आगीवले, शिक्षणप्रेमी स्वयंसेवक बबन आगीवले, केबल तज्ज्ञ अमजद पटेल यांनी अधिकाऱ्यांना उपक्रमाचे प्रभावी सादरीकरण केले. पेहेचान प्रगती फाउंडेशनच्या प्रगती अजमेरा, अभिनव अजमेरा यांच्या आर्थिक सहाय्याने हा बहुमोल उपक्रम नावलौकिक मिळवत आहे. उपस्थित अधिकाऱ्यांनी उपक्रमाचे विशेष कौतुक करून धामडकीवाडी पॅटर्न राज्यभर विशेष पथदर्शी प्रकल्प म्हणून स्वीकारण्यासाठी राज्याच्या शिक्षण विभागाला विनंती करणार असल्याचे गीरयोद्गार काढले. याप्रसंगी गटविकास अधिकारी किरण जाधव आदींच्या हस्ते गावकऱ्यांना मास्कवाटप करण्यात आले. गावकऱ्यांनी अधिकाऱ्यांचे औक्षण करून आदिवासी पद्धतीने रानफुलांचे गुच्छ देऊन स्वागत केले.

Edition
Sep 10, 2020 Page No.
Powered by : eReleGo.com

आपलं महानगर

३५ गावांतील टीव्हीवरची शाळा प्रकल्पाचे उद्घाटन

अस्वली स्टेशन●पेहेचान प्रगती फाउंडेशन मुंबई व इगतपुरी तालुका शिक्षक संघ यांच्या सहकार्याने तालुक्यात ३५ शाळांमध्ये धामडकी पॅटर्न टीव्हीवरची शाळा ह्या उपक्रमाचे उद्घाटन नुकतेच पेहचान प्रगती फाउंडेशन मुंबईचे अनुज अजमेरा व शिखा अजमेरा यांच्या हस्ते झाले. यावेळी पंचायत समितीचे सदस्य सोमनाथ जोशी, विस्तार अधिकारी एन. डी. मोरे, शाहीर उत्तम गायकर उपस्थित होते.

तालुक्यातील ३५ गावांमध्ये टीव्हीवरची शाळा पॅटर्न राबवण्यात येत आहे व त्याचा लाभ जिल्हा परिषद शाळेचे सर्व विद्यार्थी एकूण ६ हजार ५०० इतके विद्यार्थी लाभ घेणार असून खासगी शाळेचे विद्यार्थीदेखील याचा लाभ घेऊ शकतात. कोरोनामुळे शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांना आपल्या घरातच शिक्षण मिळावे या हेतूने या ३५ गावांची टीव्हीवरील शाळा सुरू करण्याची संकल्पना इगतपुरी तालुका



शिक्षक संघाचे तालुका अध्यक्ष निवृत्ती नाठे, उमेश बैरागी, भिला अहिरे, सागर जलगावकर यांच्या प्रयत्नाने व राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक प्रमोद परदेशी यांच्या व केबल व्यावसायिक अमजद पटेल यांच्या सहकार्याने हा प्रकल्प सुरू झाला आहे. हा प्रकल्प चालविण्याची जबाबदारी प्राथमिक शिक्षक संघाने घेतली आहे असून राजेंद्र मोरकर मुख्याध्यापक जि. प. शाळा माणिकखांब हे याचे नियंत्रक असणार आहेत. पहेचान प्रगती फाउंडेशनच्या प्रगती अजमेरा व अभिनव अजमेरा यांच्या आर्थिक सहाय्याने या प्रकल्पाची सुरुवात केली गेली आहे. शालेय शिक्षणाचा प्रसारण करण्यासाठी मुंढेगाव गोंदे, माणिकखांब, आहुर्ली, वाडीवऱ्हे येथील केबल ऑपरेटर किसन नाठे, गोपाळ नाठे, बन्सी गतीर, अर्जुन धोंगडे, विजय वाजे, उत्तम गायकर, शांताराम चव्हाण यांच्या सहकार्याने प्रसारण केले जात आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व संघटना पदाधिकारी यांनी मेहनत घेतली.

Nashik Edition
Nov 12, 2020 Page No.
Powered by : eReleGo.com

विद्यार्थी विकासासाठी शाळेचे विविध उपक्रम फोटो व लिंक्स :

लोकशाही वाहिनी न्यूज - https://www.youtube.com/watch?v=7UgnpCaeedY
जागर जनस्थान वाहिनी न्यूज - https://youtu.be/CRxbTACzi8s?feature=shared
उपक्रम व्हिडिओ व फोटो - https://bit.ly/46LCWeD

शालेय स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश

शाळेचे नाव – जिल्हा परिषद आदर्श कन्या प्राथमिक शाळा,कसबे तडवळे,ता.जि.धाराशिव.

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.सय्यद रहिमान मगबुल


धाराशिव जिल्ह्यातील कसबे तडवळे शाळेची यशोगाथा आपल्या समोर ठेवतांना विद्यार्थ्यांना मिळालेले यश सहजसोपे नव्हते. आम्ही उद्दिष्ट्ये ठरवून उपक्रमांची आखणी करून नियोजन बद्ध अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला त्यात आम्हाला यश मिळाले. हा प्रवास आपल्या समोर ठेवतांना आनंद होत आहे.

उद्दिष्टे -

1. अप्रगत विद्यार्थी शोधणे.
2. शाळेची उपस्थिती वाढवणे.
3. विद्यार्थी लाभाच्या सर्व योजना राबवणे.
4. शाळेचा सर्वांगीण विकास उपक्रम
5. विद्यार्थी व शाळेची गुणवत्ता वाढीसाठी उपक्रम
6. नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा वापरातून वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे
7. ग्रंथालयाचा वापर करून अवांतर वाचन वाढवणे .
8. लोकसहभागातून शाळेच्या मुलभूत सुविधा मिळवणे
9. राष्ट्रीय सण समारंभात विविध गुणवत्तेच्या स्पर्धा राबवणे
10. शासनाच्या वेळोवेळी निर्णय व नियोजनाची अमलबजावणी करणे
11. नवोदय व शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत भरघोस यश मिळवणे

उपक्रम -

1. लाभाच्या सर्व योजना दक्षतापूर्वक प्रभावी राबवणे.
2. समस्या शोधून पालकांच्या मदतीने सोडवणे.
3. शाळा व परिसर वृक्ष रोपण व संवर्धन करणे.
4. शाळा रंगरंगोटी करणे.
5. माझी शाळा सुंदर शाळा व सुंदर माझे कार्यालय.
6. परिणामकारक अध्ययन अध्यापन व तंत्रज्ञानाचा वापर
7. राष्ट्रीय सण सामारंभ व उत्सव साजरा करणे.
8. विविध खेळ व स्पर्धा नियोजन व आयोजन.
9. नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा चा नियमित वापर करणे.



10. दिक्षा app , V –school ,स्वाध्याय ,अभ्यासमाला , गोष्टीचा शनिवार उपक्रम नियमित वापर
11. SAMSUNG TAB चा वापर
12. SMART T.V.चा वापर
13. E-Learning Classroom चा वापर
14. Intractive Board चा अध्यापनात वापर
15. Zoom,Google meet,Youtube ,मोबाईल च्या सहाय्याने Online Class नियमित घेणे
16. शाळेत येताच परिपाठापूर्वी प्रकट वाचन नियमित घेणे. इयत्ता पहिली ते चौथी वर्गाची पहिली तासिका प्रकट वाचन श्रुतलेखन ,संख्याज्ञान,मुलभूत क्रिया याचा समावेश .
17. 100 % विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक व गणवेश वाटप
18. सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी बचत बँक
19. सुसज्ज प्रयोगशाळा व ग्रंथालय
20. पोषण बाग

नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी -

मी मुख्याध्यापक श्री.रहिमान मगबुल सय्यद, आज मला माझ्या शाळेची मागील दहा वर्षांपासून सुरू असलेली शिक्षकांच्या व पालकांच्या अथक परिश्रमामुळे शाळेच्या गुणवत्तेची यशोगाथा आपल्या समोर मांडण्याची संधी उपलब्ध झाली आहे. यांचा मला मनस्वी आनंद होत आहे. सन 2006 या वर्षापासून शाळेला लाभलेलेले श्री.जगन्नाथ लक्ष्मण धायगुडे व सर्व शिक्षक यांनी शाळेच्या गुणवत्तेसाठी राबवलेले वरीलप्रमाणे यशस्वी उपक्रम हे माझ्या शब्दात येथे मांडताना मला फार मोठा आनंद होत आहे.शाळेच्या गुणवत्तेमुळेच सन 2022.23 पर्यंत या शाळेचे एकूण 131 विदयार्थी जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथे प्रवेशीत आहेत तर पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये 117 विद्यार्थिनी शिष्यवृत्ती धारक झालेले आहेत.

वरील उपक्रमाला अनुसरून नियोजन व उपक्रम -

या शाळेत स्पर्धा परीक्षेचे धडे हे इयत्ता पहिलीच्या वर्गापासूनच गिरवायला पालकांच्या शिक्षकांच्या सहाय्याने सुरुवात होते.

प्रवेशप्रक्रिया व पटनोंदणी -

दरवर्षी उन्हाळी सुट्टी लागण्यापूर्वीच शाळेत शाळाव्यस्थापन समितीच्या व शिक्षकांच्या सहविचार सभेत पुढील नवीन वर्षाचा आराखडा, वर्ग नियोजन, 100 % प्रवेश व पट नोंदणी तयार करून नवीन वर्षाची उत्साहात तयारी केली जाते .यासाठी सर्वेक्षण, गृहभेटी,पालक मेळावे, वंचित घटकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व या बाबी सर्व शिक्षकांच्या मदतीने पूर्ण केली जातात. मार्च व एप्रिलमध्येच इयत्ता पहिली प्रवेश 100 % पुर्ण करून यांचा एप्रिलमध्येच काही दिवस वर्ग भरवला जाउन त्यांना या

शाळेविषयी गोडी/आवड निर्माण केली जाते,त्यामुळे नवीन वर्षात विद्यार्थ्यामध्ये कोणतेही दडपण अथवा शाळेविषयी भीती रहात नाही.

इमारत व वर्ग रचना -

या शाळेला सुसज्ज इमारत जरी नसली तरी आवश्यक वर्गखोल्या उपलब्ध आहेत. गावाच्या पूर्व बाजूस असणा-या स्मशानभूमीला लगतच नव्हे तर स्मशानभूमीत व अस्वच्छ वातावरणात असलेल्या या शाळेच्या इमारतीला आम्ही, प्रशासन, प्राधिकरणाच्या सहकार्याने व लोकसहभाग व लोकवाटा जमा करून आज शाळेला रमणीय व देखणे स्वरूप म्हणजे "सुंदर माझी शाळा" बनवली आहे आणि यामागचे कारण आहे शाळेची गुणवत्तेत होणारी वाढ आज शाळेला जागेअभावी पाच इमारतीत शाळा भरवली जाते.

इमारत वर्ग खोल्या –

14 वर्गखोल्या, 1 मुख्याध्यापक कार्यालय, 1 प्रयोगशाळा, 1 CRC (वर्गखोली साठी), 1 वाचनालय खोली अशा एकूण १८ खोल्या असून त्या सर्व खोल्यांचे बांधकाम परीक्षण करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यातील काही वर्गखोल्या दुरुस्त करूनही गळतात अथवा जीर्ण झाल्या आहेत.


शाळेचा पट - सन 2023.24 मध्ये शाळेचा पट 493 सर्व मुली (कन्या शाळा)

प्रत्येक वर्गाच्या दोन तुकड्या.

शाळेच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न व राबलेले उपक्रम -

1. 100 % प्रवेश व पटनोंदणी
2. शासन निर्णयानुसार प्रवेश ,
3. शक्यतो दोन्ही तुकडीत समान विद्यार्थी संख्या
4. शासनाच्या लाभाच्या सर्व योजनांचा विद्यार्थ्यांना 100 % लाभ
5. जसे 100 % पाठ्यपुस्तक वाटप तेही पहिल्याच दिवशी समस्या आलीच तर बुक बँक चा वापर.
6. 100 % गणवेश वाटप ,
7. शाळास्तर ,वर्गास्तर नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी
8. महिन्यातून एक वेळा पालक मेळावा
9. नियमीत शाळा व्यवस्थापन समिती सभा व नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी
10. अवांतर वाचन : सुसज्ज वाचनालयाचा वर्गनिहाय वापर व पुस्तक/ग्रंथ परिचय व परीक्षण

शाळेच्या वाचनालयात सर्व शिक्षकांनी व पालकांनी आणि मा.विस्तार अधिकारी व मा.केंद्रप्रमुख या सर्वांनी मिळून अंदाजे १लाख रुपयाचे सुंदर वाचनालय निर्माण केले असून त्यात बालवाचनालयासाठी, शिक्षकांसाठी असे एकूण 3300 पुस्तके उपलब्ध आहेत .याचा खूप छान शाळेला



फायदा झाला आहे. वाचनाच्या सवयीमुळे 26 नोव्हेंबर 2022 रोजी संविधान दिनादिवशी संविधानाच्या 30 प्रति विद्यार्थीनिंनी खरेदी करून त्यातील काही कलमे अवगत केली आहेत.

परिणामकारक अध्ययन अध्यापन व तंत्रज्ञानाचा वापर -

जसे - दिक्षा, V-school, स्वाध्याय, अभ्यासमाला, गोष्टीचा शनिवार चा नियमित वापर SAMSUNG TAB चा वापर, SMART T.V.चा वापर E-Learning Classroom चा वापर, Intractive Board चा अध्यापनात वापर, Zoom, Google Meet, Youtube, मोबाईल च्या सहाय्याने Online Class नियमित घेणे.

1. विद्यार्थी शाळेत येताच परिपाठापूर्वी प्रकट वाचन नियमित घेणे .
2. अध्ययनस्तरानुसार गट तयार करुन त्याप्रमाणे पूरक अध्ययन/अध्यापन व उपचार वर्ग
3. इयत्ता पहिली ते चौथी वर्गाची पहिली तासिका मध्ये प्रकट वाचन, श्रुतलेखन, संख्याज्ञान, मुलभूत क्रिया याचा नियमित सराव घेणे.
4. परिपाठात वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट (शिक्षक /पालक /विद्यार्थी)
5. सुसज्ज नाविन्यपूर्ण प्रयोग शाळा व त्याचा वापर
6. विविध राष्ट्रीय सण समारंभ आयोजित करुणे : त्यात वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, स्वयंरचित कविता स्पर्धा, प्रश्नमंजुशा स्पर्धा, भिंतीपत्रके स्पर्धा इत्यादी आयोजित करून बक्षिस वितरीत करणे.
7. लोकसहभागातून वर्ग, शाळा परिसर, कार्यालय व संरक्षक भिंत याची विद्यार्थी उपयोगी व समाजोपयोगी अशी रंगरंगोटो केल्याने शाळा विविध ज्ञानाने रमणीय झाली आहे. या व अशा अनेक उपक्रमामुळे गुणवत्ता वाढीस आधार मिळालेला आहे.

या शाळेचा नवोदय व शिष्यवृत्तीचा तडवळा पटर्न -

सन 2006 पासून शाळा व्यवस्थापन समिति व पालक यांच्या अथक परिश्रमाणे शाळेत असणारा इयत्ता : पांचवी चा वर्ग हा वर्षांचे 365 दिवस एकही सुट्टी न घेता अविरतपणे शाळेच्या वेळाव्यतीरिक्त होत असलेले सकाळी 7.30 ते 9.30 व सायंकाळी 6.00 ते रात्री 8.00 जादा तास व स्पर्धा परीक्षेची तयारी सातत्याने केली जात आहे या गुणवत्तेमुळेच सन 2023 पर्यंत या शाळेचे एकूण 131 विदयार्थी जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथे प्रवेशीत आहेत तर पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये 117 विद्यार्थिनी शिष्यवृत्ती धारक झाल्या आहेत.

या यशामुळे आज या शाळेचा पट हा 490 पेक्षा जास्त झाला.याला गावकरी,पालक,शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षण प्रेमी नागरीक व प्रशिक्षत शिक्षक वृंद व शाळेत असणाऱ्या मुलभूत सुविधा व सर्वतोपरी प्रशासनाचे सहकार्य व मार्गदर्शन या सर्वांचे प्रयत्न उपयोगी ठरले.

मोठ्या उत्साहाने सर्व शिक्षक हे या शाळेची गुणवत्ता व प्रगती साधत असताना वरीलप्रमाणे विविध उपक्रम यशस्वी रीत्या राबवत आहेत यासाठी शिक्षक व पालक यांनी मिळून 2,50,000/-

रु.खर्चातून सुसज्ज असे ग्रंथालय उभारले आहे. शासनाच्या सहकार्याने या शाळेत सुसज्ज अशी नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा उभारण्यात आलेली असून विज्ञान, भूगोल, प.अ.व गणित या सारखे विषय अध्ययन व अध्यापनासाठी अगदी सोपे झालेले आहेत . त्याचा सर्वांना फार मोठा फायदा झालेला आहे. अपूर्व विज्ञान मेळावे, आनंद मेळावे, एस्ट्रोनॉमी क्लब यासारखे उपक्रम यशस्वी होत आहेत.

लाभाच्या योजना, मेनू कार्डाप्रमाणे उत्कृष्ट शालेय पोषण आहार. अध्ययन कोपरे, वर्ग सजावट, जवळपास 10 लाख रु.लोकसहभाग हा वस्तुरूपात स्मार्ट टी.व्ही. Tab, ई-लार्निंग क्लासरूम, शाळेला रंगरंगोटी इ.उपक्रमातून विद्यार्थी उपस्थिती व गुणवत्ता वाढण्यास फार मोठे सहकार्य प्राप्त झालेले आहे.


या शाळेत स्वतंत्र असे सुलभ शौचालय, प्रयोगशाळा, स्पर्धा परीक्षा विभाग, संगीतमय परिपाठ ऐकू आनंदाने लिहू आनंदाने, पुस्तक परीक्षण, माझा परिपाठ माझी स्वच्छता, अनेक वृक्षाचे लागवड व संवर्धन यशवी करण्यासाठी फार मोठे प्रयत्न झाल्याने आज शाळेला सुंदर रुप प्राप्त झालेले आहे.

एकंदरीत माझी शाळा ही एक जिल्ह्यातील एक मॉडेल स्कूल होऊ पहात आहे. यासाठी मा.गटशिक्षण अधिकारी साहेब, तेरणानगर बीट चे मा.विस्ताराधिकारी श्रीम.जोशी के.ए., मा.केंद्रप्रमुख श्री.जाकते कें.ए..यांचे नेहमी फार मोठे सहकार्य व प्रेरणा लाभली जात आहे.

झालेला परिणाम -

वरील उपक्रमामुळे पटसंख्या वाढीला लागली .गुणवत्ता वाढीमध्ये आमूलाग्र बदल झाला प्रगतीच्या वाटेवर जात असून आजही शाळा संपूर्ण जिल्ह्यासाठी स्पर्धा परीक्षेसाठी यशस्वी शाळा म्हणून प्रसिद्ध होत असताना आम्हा सर्वांना फार आनंद होत आहे.

अ.न.	वर्ष	पट	सरासरी उपस्थिती	नवोदय प्रवेश पात्र	शिष्यवृत्ती धारक
01	2017.18	439	98.00	07	08
02	2018.19	436	98.50	05	17
03	2019.20	453	98.00	06	15
04	2020.21	450	98.00 Online	14	23
05	2021.22	452	98.00 Online/offline	05	16
06	2022.23	490	98.50	04	19



शाळेचे फेसबुक पेज





मा.मुख्यकार्यकारी अधिकारी साहेब श्री.रायते साहेब यांची भेट व हितगुज



शाळेची वर्गखोली आकर्षक रंगरंगोटी गुणवत्ता एक्सप्रेस जि.प. कन्या तडवळे





विज्ञान मेळावा



संगणक कक्ष



पालक मेळावा व बक्षीस कार्यक्रम



योगाभ्यास



वंचित घटक शाळांमध्ये प्रवेश गृहभेट





मान्यवरांच्या उपस्थितीत नवागतांचे स्वागत भित्तीपत्रक स्पर्धा





स्काउट आणि गाईड स्थापना

सावित्रीच्या लेकी



सुसज्ज वाचनालय



इ-लर्निंग कक्ष



विविध वेशभूषा



शाळेचे झांज पथक





माझी शाळा माझा प्रवेश



गणवेश वाटप 2022.23



कवायत व योगासने



बालविवाह निर्मुलन समुपदेशन व पालक मेळावा



महान जागतिक शास्त्रज्ञाची माहिती



मा.जिल्हाधिकारी श्री.कौस्तुभ दिवेगावकर साहेबांची शाळेस भेट दि.७ सप्टेंबर २०२२



मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.राहुल गुप्ता साहेबांची शाळेस भेट दि.७ सप्टेंबर २०२२



मा.जिल्हाधिकारी, श्री.कौस्तुभ दिवेगावकर साहेबांची व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.राहुल गुप्ता साहेबांची शाळेच्या सुसज्ज अशा डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम बालवाचनालयास भेट व विद्यार्थिनीशी हितगुज भेट दि.७ सप्टेंबर २०२२.



अभ्यासपूरक उपक्रमांतून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कौडगाव, ता.जि.धाराशिव.

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.राजेश धोंगडे

सहशिक्षक - श्रीम सुमित्रा दगडू आटपळकर

प्रास्ताविक -

संतांची भूमी असलेल्या मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव बार्शी रोडवरील कौडगाव हे एक आदर्श गाव आहे. गावातील बहुतांश लोक शेती करतात. लोकसंख्या 6000 एवढी आहे. धाराशिव लेण्यांच्या पायथ्याशी हातलाईचा सुंदर नयनरम्य हिरवागार देखावा आहे. बालाघाट डोंगराच्या पायथ्याशी वळणावळणाच्या वाटेवरच कोडगाव हे सदन गाव वसले आहे भौतिक सुविधा व परिसर धाराशिव पासून १० किलोमीटर अंतरावर कौडगाव हे गाव आहे. गावात निजामकालीन दगडी जुने बांधकाम असलेली जिल्हा परिषदेची शाळा आहे. शाळेत पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग आहेत. विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय आहे .मुला मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह आहे. बाजूने संरक्षण भिंत आहे. या शाळेत 2018 या वर्षी रुजू झाले तेव्हा शाळेसमोर एकही झाड नव्हते. परंतु आज संपूर्ण शाळेचा परिसर हिरव्या गर्द झाडांनी नटलेला आहे. शाळेची ओळख उपक्रमाच्या माध्यमातून झालेली पाहायला मिळते.

मुख्याध्यापक / शिक्षक सहशालेय उपक्रमासाठी केलेले प्रभावी काम –

प्राथमिक शाळा कौडगाव शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्यासाठी पालकांना विश्वासात घ्यावे लागले सहशालेय उपक्रमातून आम्ही सर्व शिक्षकांनी मिळून 50000 लोक वाटा जमा केला. सह शालेय उपक्रमाच्या माध्यमातून गावातील लोकांनागुणवत्ता वाढण्याचा एक आदर्श घालून दिला. विविध उपक्रमातून विद्यार्थी शाळेकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. शाळेकडे लळा लागत गेला. त्यातूनच शाळेचा विकास व गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न केला.

उपक्रमासाठी आलेल्या अडचणी –

सुरुवातीला शाळेत कार्यक्रम घेण्यासाठी पालक विरोध करत असत .परंतु पालकांनाच सहशालेय उपक्रमाचे महत्त्व कळत गेले .विद्यार्थ्यांना शाळेत आनंद मिळत गेला .माता पालक मेळावे घेतल्याने पालकांना विश्वास वाढत गेला.

उपाययोजना –

शाळेत विविध उपक्रम घेण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती बैठक घेतल्या .लोक वाटा जमा करण्यात आला. मुख्याध्यापक शिक्षक पालक यांच्या माध्यमातून शाळेचा विकास करण्याचा सर्वांनी प्रयत्न केला.



सहशालेय उपक्रम -

१.नवागत स्वागत

२.वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन

३.जागतिक योग दिन

४.कवायत व योगासन

५.सांस्कृतिक कार्यक्रम

६.दप्तर मुक्त शनिवार

७.प्रश्नमंजुषा उपक्रम

८.विशेष व्यक्तींच्या मुलाखती

९.तंबाखूमुक्त अभियान

१०.कब बुलबुल व स्काऊट गाईड शिबिर

११.गावातील व्यावसायिकांना भेट

१३.सामाजिक उपक्रमात सहभाग

१४.ई लर्निंग डिजिटल क्लास उपक्रम

१५.विद्यार्थी शिक्षक वाढदिवस साजरा करणे

१६.मराठी हिंदी इंग्रजी आदर्श परिपाठ घेणे

१७.व्यक्तिमत्व विकास स्पर्धा

१८.शंका पेटी

१९.राष्ट्रीय दिन नेत्यांच्या जयंती पुण्यतिथी साजरी करणे

२०.सांकेतिक कुणाच्या माध्यमातून शब्द ओळखणे

२१.जो दिनांक तो पाढा

२२.गट निहाय लहानांचा अभ्यास मोठ्यांनी घेणे

२३.स्वच्छ सुंदर शाळा उपक्रम

२४.चावडी वाचन


२५.हळदी कुंकू माता पालक मेळावे

२६.आरोग्य तपासणी शिबिर

२७.इंग्रजी स्पेलिंग पाठांतर स्पर्धा

२८.विद्यार्थी मैदानी स्पर्धा

२९.लेझीम झांज पथक सादरीकरण



३०.रांगोळी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा

३१.टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवणे

३२.पर्यावरण पूरक मातीचे गणपती बनवणे

३३.वक्तृत्व निबंध चित्रकला स्पर्धा

३४.माझी समृद्ध शाळा उपक्रम

३५.लेक वाचवा लेक शिकवा

३६.हात धुवा दिन

३७.किशोरी मेळावा

३८.परिपाठात सामान्य ज्ञान पाच प्रश्न

३९.शाळा पूर्वतयारी मेळावा


४०.आनंद मेळावा घेणे

शाळेतील सकारात्मक बदल-

मी सुमित्रा दगडू आटपळकर (प्रा. शि.) या पदावर सन 2018 ला प्राथमिक शाळा कौडगाव या शाळेत रुजू झाले. गावात अशी चर्चा होती की महिला शिक्षिका शाळेत असतील तर गावाला कुलूप लावले जाईल. परंतु आम्ही सहा जणांची एक टीम 2018 साली या शाळेवर नियुक्त झालो आणि गावचा सगळा चेहरा मोहरा बदलून टाकला. प्रथम आमच्या सर्व नवीन टीमने विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त निर्माण केली. आनंददायी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शाळेविषयी आवड निर्माण केली .शाळेसमोर लावलेली झाडे शाळा सुटल्यानंतर काही खोडकर विद्यार्थी काढून टाकत. गावातील युवा मंडळाची बैठक घेऊन त्यांना विश्वासात घेऊन झाडे कशी जगता येतील यासाठी विचार विनिमय केला. इतर नको असलेला खर्च टाळून गावातील शाळेला मंदिर समजून विकास करण्याचे सर्वांनुमते ठरले.युवा मंडळाच्या माध्यमातून मोठे खड्डे खांदून श्री विश्वास नाईकवाडे यांनी झाडे जगण्यासाठी उंच वाढलेले झाडे लावली. पाण्याचे व्यवस्था ठिबक सिंचन च्या माध्यमातून केली .यावरून असे लक्षात आले की गावातीलच लोकांनी झाडे लावल्यामुळे त्यांचे रक्षण त्यांनीच केले .आज शाळेसमोर उंच उंच झाडे हिरवीगार अवस्थेत आहेत.

यापूर्वी शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जात नव्हते .मुलींना भाग घेण्यास पालकांचा नकार असे .आम्ही सर्व शिक्षकांनी गावात असे वातावरण निर्माण केले की आम्ही जे उपक्रम घेऊ त्याला पालकांची परवानगी घेण्याची पण आवश्यकता लागली नाही .एवढी पालकांमध्ये विश्वासार्हता निर्माण केली .आता परिणाम गुणवत्ता वाढीवर झाला. सांस्कृतिक कार्यक्रमातून लोक वाटा जमा झाला .विविध साहित्य शाळेसाठी खरेदी केले.

आज सांगायला इतका आनंद होत आहे की,वडगाव शाळेचा कायापालट करण्यासाठी गावातील पालक शिक्षक तरुण युवा मंडळे या सर्वांनी मिळून शाळा बदलवून टाकली .एटीएस, एमटीएस सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये



पहिली वर्गातील विद्यार्थी राज्यात चमकले .पालकांची अशी धारणा झाली की,तुम्हाला शाळेसाठी काय मदत हवी असेल ती घ्या परंतू तुमच्या बदल्या दुसऱ्या शाळेवर होवू देणार नाही, हिच आमच्या कार्याची खरी पावती आहे.

मला या शाळेवर आल्यावर उपक्रमशील शिक्षीका म्हणून तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. ऑनलाईन व्हिडिओ निर्मिती मध्ये विद्यार्थी उपक्रम सादर केल्यामूळे विनोबा या पुणे येथील संस्थेकडून जिल्हा पुरस्कार मिळाला. हाच बदल मला यशोगाथा लिहिण्यासाठी प्रेरक ठरला. केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे.



दहिहंडी उत्सव



वेशभूषा स्पर्धा

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 5
02 Jan 2023

कौडगाव शाळेचे क्रीडा स्पर्धेत यश



उस्मानाबाद : प्रतिनिधी

तालुक्यातील कौडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या खेळाडूंनी बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेत यश मिळविले.

स्पर्धेत खो-खो १४ वर्षाखालील गटात मुलांचा प्रथम क्रमांक व कब्बड्डीमध्ये मुलींचा प्रथम क्रमांक आला. श्वेता नाईकवाडी हिने उंच उडी, थाळी फेक, गोळाफेक, ४०० मिटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. विविध स्पर्धामध्ये घवघवीत यश मिळाल्यामुळे क्रीडा शिक्षक घोंगडे रविंद्र यांचा व विजेत्या संघाचा ग्रामपंचायत, शालेय समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

मुख्याध्यापक राजेश धोंगडे, सरपंच दयानंद थोरात, शाळा अध्यक्ष प्रदिप थोरात, सदस्य, ग्रामस्थ, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


"तयार रहा"






जि. प. प्रा. शाळा. कोडगाव.

लोकसहभागातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ताडबोरगाव, ता.मानवत, जि.परभणी.

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.अनिल बापूराव सावळे



प्रास्ताविक -

शाळा कशी असावी याची कविकल्पना अनेकांनी रंगवली आहे. शाळा कशी असावी यावर कविता, गाणीही आहेत. त्या कविता एकूणच शाळेतील शिस्त, कंटाळा यापासून सुटका मागतात. निसर्गात जायला मागतात. बंड करून मोकळेपणा मागतात.... कृष्णमूर्ती लहानपणी शाळेत रमणारे नव्हते. त्यांनी शाळेत अनेकदा बोलणे खाल्ले कारण वर्गातल्या त्या कंटाळवाण्या वातावरणात त्यांचे मनच रमत नसायचे. त्यामुळे ते फारसे शिकू शकले नाहीत. त्यातूनच शिक्षण, शाळा हा त्यांच्या चिंतनाचा विषय झाला असावा. त्यांचे ते प्रसिद्ध वाक्य नेहमीच सर्वत्र सांगितले जाते की, ''शाळा आणि तुरुंग या जगातल्या दोनच जागा अशा आहेत की जिथं कुणीचं स्वत:होऊन जात नाही दाखल करावं लागतं '' यातून शाळा त्यांना तुरुंगासारखी वाटली... त्यामुळेच कृष्णजींनी जेव्हा पुढे शिक्षणाची मांडणी केली तेव्हा त्यांनी आदर्श मुक्त मनांची शाळा कशी असेल याची मांडणी केली. शाळेचा पाया भीती, शिस्त नसेल तर शाळा ही प्रेमाच्या पायावर आधारित असेल याचा पुरस्कार केला. आदर्श शाळेचे चित्र मांडताना ते म्हणतात, ''शाळेच्या समर्पित कामावर प्रेम करणारे शिक्षक असतील तर तशाच प्रकारचे इतर सहकारी त्यांना मिळत जातील व जे समर्पित नाहीत ते हळूहळू दूर होतील...शिक्षक मुख्याध्यापकांच्या भीती दडपणाखाली नसतील व मुख्याध्यापकही शाळेतील ज्येष्ठ शिक्षकांच्या दडपणाखाली नसतील. जेव्हा शाळेतील संबंध हे समानतेचे असतील तेव्हाच एक आनंदाचे प्रेमाचे वातावरण असेल....मुख्याध्यापक सर्व जबाबदाऱ्या स्वत:च्याच खांद्यावर घेणार नाही तर याउलट प्रत्येक शिक्षक हा शाळेची जबाबदारी घेणारा असेल... अशी मध्यवर्ती केंद्र नसणारी शाळा चालू शकेल का, असा प्रश्न विचारला जाईल पण जेव्हा सर्वजण प्रज्ञेच्या, सहकार्याच्या आधारे काम करत असतील तेव्हाच हे घडू शकेल...'' कृष्णजींनी अतिशय महत्त्वाच्या मुद्द्यालाच स्पर्श केलाय. ते शाळा म्हणजे शाळेची इमारत, तिथले उपक्रम, अभ्यासक्रम यावर भर देत नाहीत तर तिथे काम करणाऱ्या माणसांवर भर देतात. तिथल्या माणसांच्या संबंधांविषयी

माणसांच्या समजेविषयी बोलतात... हे त्यांचे वेगळेपण आहे. पुन्हा मुख्याध्यापकाला शाळेत स्वामित्वही ते देत नाही तर समज असलेल्या शिक्षकांच्या सामूहिक नेतृत्वाविषयी ते बोलतात.... शिक्षकांच्या वागण्यातूनच शाळेत एक वेगळे वातावरण निर्माण होईल, अशी त्यांची एकूण मांडणी आहे.

शालेय इमारत (भौतिक सुविधा) -

१) शाळेचे स्थान मध्यवर्ती आहे.
२) शाळा सिद्धी व स्वच्छ शाळा प्रकल्पामध्ये उल्लेख केलेल्या सर्व भौतिक सुविधा शाळेत आहेत.
३) भविष्यवेधी दृष्टीकोनातून वाढती पटसंख्या, विद्यार्थ्यांची व शिक्षकांची निवासव्यवस्था, इत्यादी बाबींच्या अनुषंगाने बांधकामासाठी पुरेशा जागेची उपलब्धता आहे.
४) शाळेस संरक्षकभिंत प्रस्तावित आहे.
५) शालेय वातावरण अध्ययनपूरक व पर्यावरणपूरक आहे.
६) शाळेस विद्युतीकरण सुविधा आहे.
७) RTE नियमानुसार पटसंख्येच्या प्रमाणात शिक्षक आहेत..
८) आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून शाळेतील सर्व यंत्रणा अद्ययावत आहे..
९) शालेय इमारत चाईल्ड फ्रेंडली व इको फ्रेंडली आहे.
१०) शाळेत वाय-फाय यंत्रणा वा नेट कनेक्टीव्हीटी आहे.
११) शाळेसाठी पूर्ण क्षमतेचे सोलर युनिट आहे.
१२) शालेय इमारतीत वायुविजन व्यवस्थित आहे.
१३) विद्यार्थ्यांच्या शारीरिक,मानसिक व सर्वांगीण विकासासाठी क्रीडांगण सुविधा आहे.
१४) शाळेत विज्ञान प्रयोगशाळेसोबत अभ्यासक्रमात अंतर्भूत विविध विषयनिहाय प्रयोगशाळा आहे.
१५) विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात प्रथमोपचार पेटी आहे.
१६) रेनवॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था आहे.
१७) विविध कार्यक्रमांच्या आयोजनासाठी पुरेशी ध्वनी, प्रकाश व बैठक व्यवस्था असणारे सुसज्ज सभागृह आहे.
१८) परिसरातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वाहतूक व्यवस्था आहे.
१९) शालेय प्रांगणात अंगणवाडी, बालवाडी (पूर्व प्राथमिक वर्ग) आहे.

शालेय वातावरण -

१) शालेय वातावरण विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्यांचा,२१ व्या शतकातील विविध कौशल्यांचा विकास करण्यास पूरक आहे.
२) अभ्यासक्रमातील अंतर्भूत विविध विषयनिहाय, वर्गनिहाय, वयोगटानुरुप पुरेसे व हाताळण्यास योग्य असे शैक्षणिक साहित्य उपलब्ध आहे.
३) अभ्यासपूरक व अभ्यासेतर कृतिकार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे.
४) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांची अंगभूत व व्यावसायिक क्षमता ओळखून त्या क्षमतेच्या विकासास अनुरुप विविध उपक्रम आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.
५) भविष्यकाळातील व्यावसायिक उच्चतम मागणीचा अंदाज बांधून संबंधित बाबींचे प्राथमिक प्रशिक्षण सुरुवातीपासून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
६) शाळेकडे सुरक्षितता,आरोग्य व स्वच्छतेबाबत नियमावली व यंत्रणा आहे



शैक्षणिक सामाजिक व राष्ट्रीय कार्यातील सहभाग -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ताडबोरगाव येथे स्वच्छ गाव हागणदारी मुक्त गाव या उपक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात आली. सदरील गावाला मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी तसेच मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांनी भेट देऊन उपक्रमाची पाहणी केली.



शैक्षणिक सहल ISRO सहल निवड



श्रीहरीकोटा स्पेस सेंटर सहल भेटी साठी ताडबोरगाव जि. प. शाळेची विद्यार्थीनी कु. ऋतुजा पंडितराव शेळके रवाना

मानवत / प्रतिनिधी.

मानवत तालुक्यातील मौ. ताडबोरगाव जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीनी कु. ऋतुजा पंडितराव शेळके श्री हरी कोटा स्पेस सेंटर भेट सहलीसाठी निवड झाली असून विमान प्रवासाद्वारे 16 मे ते 21 2023 या कालावधीत सहलीसाठी जाणार आहेत. सदरील या कालावधीत श्रीहरीकोटा येथील सॅटलाईट लॉन्चिंग सेंटर ,चेन्नई साईट सिईंग, बंगलोर सिटी साईट सिईंग, रामोजी फिल्म सिटी भेट आदींचे सहलीमध्ये नियोजन आहे. सदरील विद्यार्थीनिच्या यशाबद्दल तिचे ताडबोरगाव ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गजानन जंगले, उपाध्यक्ष श्री. दत्ता आवचार, यांच्या सह सर्व सदस्य व मानवत सावरगाव केंद्राचे केंद्र प्रमुख श्री. शिरीषजी लोहट, गटशिक्षणा धिकारी श्री. डी. आर. रणमाळे, शाळेचे मुख्याध्यापक श्री. अनिल सावळे, श्री. अशोक गोरे, श्री. बलभीम माथेले, श्री. श्रीपाद माटेगावकर, श्री. मोहन देशमुख, श्रीमती नंदा शिंदे, श्रीमती सारिका करंडे, श्रीमती स्वाती कुकडे, श्री. नरेंद्र कांबळे यांच्या सह शाळेतील शिक्षक वृंद यांनी या विद्यार्थी निचे कौतुक करत तीला सहल प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.



मानवत येथे तालूकास्तरीय श्री हरी कोटा हवाई सफर परीक्षा संपन्न

जिल्हास्तरीय परीक्षेसाठी तालुक्यातील दहा विद्यार्थ्यांची निवड

मानवत / प्रतिनिधी.

मानवत येथे तालूकास्तरीय श्रीहरी कोटा हवाई सफर परीक्षेचे आयोजन बे. बे. एच. महाविद्यालयात दिनांक ०३ मार्च दोनी मानवत तहसील पेढारे गटशिक्षणाधिकारी मा. श्री. डि.आर.तारगावे यांच्या मेहनतीमुळे करण्यात आले होते. या येणारे योग्यता आलेल्या मानवत तालुकास्तरीयपरीक्षा तालुक्यातील पहिला मिळणाऱ्यासाठी अधिक पुन्हा लाभ व्हावा यासाठी करण्यात आले. त्यामुळे यासाठी पात्र ठरले ही पूर्वीच जिल्हास्तरीय परीक्षेसाठी झालेली आहेत मात्र कोरोना जिल्हा परिषद सर्वांमधील विद्यार्थी पि. रेणा दादाराव गिते, मानवत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थी कु. इशिका सचिन सपके व कि. मयूर नवनाथ लाटे, द्वितीय क्रमांक

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी कि. पांडुरंग साहादेव पौळे तालुकास्तरावर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी कि. कोहा लक्ष्मण गुंगाणे या विद्यार्थ्यांची परीक्षेत पूर्ण प्रश्न बरोबर सोडवले आहेत. या मुलांचा केंद्रप्रमुख मा. श्री. डि.आर. तारगावे, केंद्रीय मुख्याध्यापक मा. श्री. एस. एम. कदम, श्री. एस. एस. पौळ, श्री. एस. एस. शेळके, मानवत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी कु. ऋतुजा पौळे या विद्यार्थिनीने कु. ऋतुजा पौळे, श्रीमती पवळेकर, श्रीमती. पी. एन. होके, श्रीमती. एस. डी. जाधवगावकर यांनी जवळपास ही परीक्षा यशस्वी करण्यासाठी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे केंद्रप्रमुख मा. श्री. डि.आर. तारगावे, श्री. एस.एस. पौळ, श्री. दिलीप रेंगे, पर शाळेत केंद्रातील श्री. शेळके सर, श्री. जाधवगावकर, श्री. पी.एन. होके, श्रीमती पवळेकर

गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न -

- Spoken English Program प्रभावीपणे राबवला
- सार्वजनिक ठिकाणे, मंदिर येथील speaker चा उपयोग Spoken English साठी केला. Online / Offline च्या माध्यमातून हा उपक्रम प्रभावीपणे राबवला त्याचा परिणाम विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी झाला
- website च्या माध्यमातून विद्यार्थाना अवांतर वाचन करता यावे म्हणून google link उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत विद्यार्थी Digital Sarkar link च्या माध्यमातून शैक्षणिक video पाहतात. द्रकश्राव्य साधनाच्या माध्यमातून विषयाचे दृढीकरण होण्यास मदत होते.
- इंग्रजी शाळेची मूलं जि.प.शाळेत गावातून बाहेरगावी इंग्रजी शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या फार होती मात्र मागच्या वर्षी 15 मूले इंग्रजी शाळेतून आपल्या शाळेत प्रवेशीत झाली. यावर्षी ती संख्या We Learn English या दैनंदिन कार्यक्रमाच्या प्रभावी अमलबजावणीने नक्की वाढणार आहे .

- सहकारी शिक्षक यांचा समन्वय व सहभाग शाळेत शिक्षकांची 10 पदे आहेत सर्व पदे भरलेली असून शिक्षक कार्यरत आहेत. माहेवार बैठका होवून सर्वासोबत वार्षिक मासीक घटक अध्ययन निष्पतीवर आधारित नियोजन केले जाते त्यावर अमलबजावणी होते. प्रत्येकजण परस्परांना सहकार्य करतो लोकसहभाग गाव देत आहे तर आर्थिक स्वरूपात एक लाख रूपये मी व माझ्या शिक्षक सहकार्यानी जागा खरेदीसाठी स्वेच्छेने दिले. विद्यार्थ्यांशी आपुलकीने वागून पालकांच्या भूमीकेत आम्ही सर्वच असल्याने विद्यार्थी व पालक खूप आनंदी आहेत.

- मुलींच्या शिक्षणाबाबत ग्रामीण भागात अनास्था असते पण शाळेने महिला पालक मेळावे घेवून मुलीनी शिक्षण घ्यावं उच्चशिक्षीत व्हावं यासाठी जनजागृती केली. आमच्या शालेय व्यवस्थापन समितीने अध्यक्षपद सर्वानुमते महिलेकडे दिले. गावच्या सरपंच ही महिला आहेत. या वर्षी गुणवंत मूलीच्या हस्ते 26जानेवारी रोजी समितीने ठराव घेवून सर्वानुमते पारीत करून दिपाली बोडखे च्या हस्ते ध्वजारोहण केले.जागतिक महिला दिनी मुख्याध्यापक व शिक्षक एक दिवसांसाठी म्हणून संधी देत मुलींचा सन्मान केला. प्रचार प्रसार माध्यमांनी याची दखल घेत या कार्याचे सर्वत्र कौतूक झाले.

एक उपक्रम ABACUS -


ABACUS चा वापर गणितात करून जलद गतीने गणीत सोडवणे यात अबॅकसला मराठीत "सरकणाऱ्या मण्यांच्या दांड्या असलेली आणि मोजण्यासाठी किंवा आकडेमोडीसाठी वापरण्यात येणारी चौकट" असे म्हणतात. पूर्वीच्या काळात आकडेमोड करण्यासाठी आज सारखे इलेक्ट्रिक कैलकुलेटर नव्हते. त्या काळात आकडेमोड करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जात होता. अबॅकस हे तंत्र अनेक आशियाई देशांमध्ये व्यापक स्वरुपात वापरण्यात येते. याद्वारे बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार यासारख्या गणिती क्रिया विद्यार्थ्यांना सहज करता येतात. ५ ते १५ वयोगटातील मुलांसाठी हे तंत्र अतिशय उपयुक्त आहे. या तंत्राचा फायदा गणिती बौध्दीक क्षमता वाढवण्याकरता होतो.

अबॅकसचे फायदे -

- विद्यार्थी अंकगणितात हुशार होतात.
- एकाग्रता आणि स्मृति चा विकास होतो.
- आत्मविश्वास वाढतो.
- काल्पनिक आणि व्हिज्युअलायझेशन शक्तीचा विकास होतो.



- तर्क शक्ती आणि विश्लेषण शक्तीचा पण विकास होतो.
- कॅल्क्युलेटर, कॉपी किंवा पेनशिवाय गणिताचे प्रश्न सोडवू शकतात.
- जी भीती तुम्हाला गणिताचा अभ्यास करण्यापासून रोखत होती ती कायमची नाहीशी होते. यासोबतच गणितात रस वाढतो.
- लक्ष केंद्रित करण्याची आणि ऐकण्याची क्षमता वाढली.
- स्मरणशक्ती आणि मानसिक क्रियाकलाप सुधारले आहेत.
- हे नंतरच्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी देखील खूप उपयुक्त आहे.
- शिक्षकांच्या सहकार्याने शाळेत हा उपक्रम राबवला गेला.



Digital गुणपत्रक -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताडबोरगाव या शाळेत विद्यार्थ्यांना Digital गुणपत्रक दिले जातात तसेच शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानतर प्राथमिक शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र दिले जाते. विद्यार्थ्याला पोर्टल वर आपले जनरल register number टाकल्यानंतर त्यांच्या मोबाईलवर हे गुणपत्रक व प्रमाणपत्र डाऊनलोड करता येते. विशेष म्हणजे 1 ते 8 वर्गातील कोणत्याही इयत्तेचे गुणपत्रक download करता येते. यासाठी शाळेत येण्याची गरज नाही



जिल्ह्यातील उत्कृष्ठ स्काउट गाईड पथक



वाचन चळवळ –

अक्षर आनंद पुस्तक वाचन स्पर्धेमुळे मुले गोष्टीची, महापुरुषांची चरित्रे, वैज्ञानिक अशी माहिती असणारी भरपूर पुस्तके वाचन करत आहेत. फक्त वाचतच नाहीत तर ते समजपूर्वक वाचन करून त्याच्या नोंदी घेत आहेत. मागील वर्षी 350 पुस्तके वाचणारी मुलगी परभणी जिल्ह्यात प्रथम होती. वाढदिवस वाचन, वाचनासाठी निमित्त शोधू या, वाचन संस्कार केंद्र या उपक्रमांमुळे वाचनाचा संस्कार मुलावर घडत आहे. समाजातील अनेक संस्था ह्या अक्षर आनंद वाचन चळवळीमुळे वाचनावर कार्य करण्यास तयार होत आहेत. त्या अंतर्गत विद्यार्थिनीने सर्वांसमोर वाचन

चळवळीत सक्रीय शिक्षकांची मुलाखत घेतली मुलाखतकार : विद्यार्थिनी कल्याणी गुंगाने, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताडबोरगाव मार्गदर्शन : नरेंद्र कांबळे विशेष सहकार्य : मुख्याध्यापक अनिल सावळे, बलभीम माथेले, श्रीपाद माटेगावकर. ज्यात : आपल्याला आर्थिक मदतीची गरज आहे का? व ती मिळाली तर आपण काय बदल घडवून आणाला.? अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र वाचनाची चळवळ राबविण्यासाठी कमीत कमी मनुष्यबळ, आर्थिक बळ, वेळ लागेल असे नियोजन करते. वेळेचा काटकसरीने उपयोग करते .तरीही चळवळ म्हटली की पैसा लागतोच. मिळालेल्या पैशातून वाचणाऱ्या मुलांच्या कौतुकासाठी निधी खर्च केला जाईल. तसेच ज्या शाळांना, बालवाचकांना पुस्तकांची गरज आहे त्यांना पुस्तकं घेण्यासाठी निधीचा उपयोग केला जाईल. बालकांनी लेखन केलेले साहित्य प्रकाशित करण्यासाठी निधीचा उपयोग होईल. वाचणाऱ्यांना ग्लॅमर प्राप्त व्हावं यासाठी याचा उपयोग केला जाईल. प्रश्न : अक्षर आनंद वाचन चळवळीची पुढील दिशा काय असेल?वाचन घराघरात, कुटुंबा कुटुंबात गेले पाहिजे. वाचनाचे सामाजिकीकरण झाले पाहिजे. यासाठी समाज सहभागाने विविध कृती कार्यक्रम राबविणे. लोकांना युवकांना आपल्या एखाद्या समस्येबाबत मत, विचार, भावना व्यक्त करता आल्या पाहिजेत. अक्षर आनंद वाचन चळवळीची पुढील दिशा अशी असेल. कल्याणी आपली चळवळ समाज विचाराने समृद्ध करणारी आहे,अशा पद्धतीने विद्यार्थी घडणीच्या प्रक्रियेत शाळा योगदान देत आहे.



समारोप -

एकूणच या चार वर्षात झालेले जे बदल आहेत त्या बदलांच्या प्रक्रियेत ज्यांचं मार्गदर्शन लाभले ते मानवत पं स चे गटशिक्षणाधिकारी मा.डी आर. रणमाळे साहेब केंद्रप्रमुख मा. शिरीष लोहट सर यांचे खूप खूप धन्यवाद ज्यांच्या सोबतीने चार वर्षाचा प्रगतीचा चढता आलेख मांडता आला. तसेच सर्व सहकारी शिक्षक बंधू भगिनी ज्यांच्या सहकार्याने ताडबोरगावतला प्रत्येक नागरीक प्रत्येक गावकरी युवक महिला पालक शाळेला जोडल्या गेला व एका शाळेला अधिक सक्षम करता आले आणि गावचे सरपंच उपसरपंच ग्रा. पं सदस्य शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्य यांचीही मोलाची साथ मिळाली, यातून विद्यार्थ्यांना अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न निश्चितच केला जाईल.

लोकसहभाग व स्पर्धा परीक्षेतून गुणवत्ता विकास

शाळेचे नाव- जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा, गुंजेगाव, ता.गंगाखेड जि.परभणी

मुख्याध्यापकाचे नाव - श्री ढेले व्यंकट शिवलिंग





लोकसहभागातून शाळेचे बदलते रूप

प्रास्ताविक –

बालघाट डोंगररांगेत वसलेले गुंजेगाव हे परभणी जिल्ह्यातील गंगाखेड या तालुक्याच्या ठिकाणापासून 20 किमी अंतरावर वसलेले आहे. गावची लोकसंख्या जेमतेम 2300 असून सर्वच जातीधर्माचे लोक गुण्या-गोविंदाने व प्रेमाने एकत्र नांदतात. फारशी शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या या गावच्या जिल्हा परिषद शाळेची स्थापना दि. 09/07/1958 रोजी झाली.

पार्श्वभूमी –

वर्ष २००५ / २००६ मध्ये शाळेची बांधकाम स्थिती चांगली होती .पूर्वी शाळा गावाच्या मध्यवस्तीत तुटपुंज्या जागेत असल्यामुळे अध्यापनाचे कार्य व्यवस्थित करता येत नव्हते. मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग मेहनती लाभल्यामुळे भौतिक व शैक्षणिक स्थिती सुधारण्यास वाव होता.

नियोजन व कार्यवाही -

लोकसहभागातून सर्वप्रथम गावापासून 500 मी. अंतरावर मुख्य रस्त्यालगत गावकऱ्यांनी 20 गुंठे जमीन शाळेच्या इमारतीसाठी खरेदी करुन दिली. त्याच जागेवर जिल्हा परिषद परभणी कडून प्राप्त निधीतून आठ वर्गखोल्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले या वर्गखोल्यांमधून पहीली ते आठवीपर्यंतच्या वर्गाचे अध्यापन कार्य सुरु झाले.

लोकसहभागाचा चढता आलेख –

शाळेस फक्त जमीन खरेदीपुरता लोकसहभाग न राहता हा मदतीचा ओघ आजतागायत सुरूच आहे. वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये सर्व गावक-यांच्या मदतीने ०३ लाख रुपये निधी उभा राहीला. त्यातून शालेय रंगरंगोटी दोन वर्गखोल्यांसाठी ई-लर्निंग सिस्टीम संगणकासह प्रोजेक्टर इत्यादी साहित्य खरेदी करण्यात आले. विदयार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्या-साठी रिलायंस शेतकरी समिती गुंजेगाव यांच्या पुढाकारातून 50000 रुपयांचा निधी देण्यात आला. त्यातून पाण्याची टाकी बांधण्यात आली.कष्टकरी व शेतकरी वर्गातून शाळेत येणारे विद्यार्थी असल्याने विदयार्थ्यांना मदत म्हणून मुलुंड (मुंबई) येथील श्री अश्विन भाई करनिया यांनी त्यांच्या वाढदिवसा- निमित्य सर्व विद्यार्थ्यांना मोफत स्कूलबॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. 14 व्या वित्त आयोगातून ग्रामपंचायत कडून पाच संगणक संच, कायम पाणीपुरवठा रहावा यासाठी बोअरवेल, मुला-मुलींसाठी दोन स्वतंत्र स्वच्छतागृह, परिपाठ व मध्यान्ह भोजनाच्या वेळी उन्हांपासून विदयार्थ्यांचे संरक्षण व्हावे म्हणून 45X85 फूट आकाराच्या ग्रीनशेडची उभारणी करण्यात आली. असाच ओघ पुढे वाढत जाऊन लोकसहभागातून 80000 रुपये खर्चून शालेय रंगरंगोटी,दैनंदिन कामकाज उपयोगी दोन लॅपटोप,मित्र प्रेम बचत गटामार्फत 12 खुर्च्या व वर्ग,परिसर स्वच्छतेसाठी 10 कचरा कुंड्या पुरविण्यात आल्या.


15 व्या वित्त आयोगातून ताशी 500ली. क्षमतेचे वॉटर फिल्टर (RO) ०३ लक्ष पंचेविस हजार रुपये किमतीचे शाळेस देण्यात आले. दरवर्षी व वेळोवेळी मिळणा-या लोकसहभागातून 2019 मध्ये पन्नास हजार रुपये किचनशेड उभारणी- साठी खर्च करण्यात आले. 2023-24 या वर्षी शालेय रंगरंगोटी व इतर भौतीक सुविधांसाठी 75000/- रुपयांचा लोकसहभाग निधी जमा करण्यात आला.

लोकसहभागातून फक्त आर्थिक व भौतिक विकासच साधलेला नसून शालेय आवारात 200 पेक्षा जास्त वृक्ष घनवन पद्धतीने जोपसना करण्यात आले आहेत. वृक्षांच्या उत्तम संगोपनातून आज शालेय परिसर हिरव्यागार वनराईने नटलेला आहे. स्पर्धा परिक्षेतून विद्यार्थी गुणवत्ता विकास साधताना लोकसहभाग सुद्धा महत्त्वाचा ठरला आहे. कोविड काळात विद्यार्थी अभ्यासगट निर्मितीपासून ते आज स्पर्धापरिक्षा उदा. NMMS, -MTS, शिष्यवृत्ती, नवोदय यासाठीही पालकांचे सहकार्य लाभत आहे. दिवाळी व उन्हाळी सुट्टी कालावधीत सुद्धा पालक मोठ्या उत्साहाने सहकार्य करतात.

या सर्व गोष्टींची फलश्रुती म्हणून मागील काही शैक्षणिक वर्षापासून वेगवेगळ्या स्पर्धापरिक्षेत शाळेचे विद्यार्थी उल्लेखनीय कार्य करीत आहेत.

स्पर्धा परीक्षेची तयारी व यश –

जि. प. प्रा. शा. गुंजेगाव येथे. इयत्ता पहिलीपासून स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतली जाते त्यासाठी मुलांना MTS, स्कॉलरशिप,नवोदय,NMMS इत्यादी: परीक्षेला मुलांना बसवले जाते सन 2023-24 मध्ये 83 विद्यार्थी हे MTS परीक्षेसाठी 43 विद्यार्थी scholarship परीक्षेसाठी 24 विद्यार्थी NMMS व 16 विद्यार्थी नवोदय परीक्षेला बसवण्यात आले आहेत.



सन 2022-23 मध्ये NMMS परीक्षेत 14 पैकी 14 मुले पात्र व 03 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. व स्कॉलरशिप परीक्षेत 07 विद्यार्थी पात्र 02 विद्यार्थी धारक झाले आहेत तसेच नवोदय परीक्षेतदेखील आमचा विद्यार्थी प्रवेशपात्र झाला आहे.

NMMS परीक्षेतील पात्र व धारक स्कॉलरशिप परीक्षेतील धारक (2022-23) -




श्रीहरीकोटा विमान सहल घडविणारी शाळा –

मा.आयुक्त केंद्रेकर साहेब यांच्या कल्पनेतून व पारदर्शक स्पर्धा परिक्षा घेऊन उपग्रह प्रक्षेपणाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी श्रीहरीकोटा, थुम्बा, तिरुअनंतपुरम् येथे जाण्यासाठी तालूक्यातून निवडण्यात आलेल्या तीन विदयार्थ्यांपैकी दोन विद्यार्थी गुंजेगाव जि.प.प्रा. शाळा या शाळेचे निवडले गेले.तालुकास्तरीय सारथी निबंध स्पर्धेमध्ये सन २०२१ -२२ व २०२२ -२३ मध्ये प्रथम, द्वितीय,तृतीय क्रमांक शाळेने पटकाविला ही शाळेसाठी अभिमानाची बाब ठरली.



वाढती पटसंख्या –

सन	पट
2023	283
2022	278
2021	276
2020	267
2019	243
2018	241

आमचे उपक्रम -

परीपाठातील विपश्यना उपक्रम



दिवाळी सुट्टीतील सराव परीक्षा



गुंजेगाव शाळेची भूषणे/पुरस्कार –

याप्रकारच्या वाढत्या शालेय गुणवत्तेमुळे 2019 साली रिलायंस फाउंडेशन तर्फे तालुका उत्कृष्ट शाळा म्हणून शाळेस सन्मानित करण्यात आले. वरिष्ठ कार्यालयाने शालेय गुणवत्तेची दखल घेत 2021 साली जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार देऊन गौरवित केले तसेच शासनाकडून नाविन्यपूर्ण डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम विज्ञान प्रयोगशाळा, अकरा संगणक संचासह लॅब व प्रोजेक्टर, LCDTV शाळेला प्राप्त झाले आहेत.

या पुढेही या शाळेची प्रगतीची वाटचाल निरंतर गावकरी,शिक्षणप्रेमी नागरिक,शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या सहकार्याने सुरु राहील.

youtube link - https://youtu.be/auWkIs4fVwY?si=jgEqrDI1jw2bIKET

https://youtu.be/xnZdU5TxLg8?si=Uwo9XW_0Jjjm8rnL

गावाला शाळेचा अभिमान आणि शाळेला गावाचा आधार

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, काटेवाडी,केंद्र. काटेवाडी,ता.बारामती, जि.पुणे


मुख्याध्यापकाचे नाव – सौ.राणी आण्णा ढमे.

सहशिक्षक - श्री.संतोष महादेव सातपुते

लोकसहभागाची गरज व महत्त्व-

शिक्षण व्यवस्थेमध्ये शाळा आणि समाज हे दोन अविभाज्य आणि महत्त्वपूर्ण घटक आहेत समाजासाठी शाळा व शाळेसाठी समाज हे ब्रीदवाक्य घेऊन जर काम केले तर लोकसहभागातून आदर्श शाळा निर्माण करण्यास मदत होते. व्यक्तिमत्व विकास व त्यातून समाज विकास हे शाळेचे प्राथमिक ध्येय आहे आणि समाजाने शाळेसाठी सहकार्य केले तरच शाळेचा विकास साधणे सोपे जाते त्यासाठी शाळेच्या कार्यामध्ये लोकांचा व समाजाचा सहभाग घेणे अगत्याचे ठरते. केंद्र सरकारच्या शिक्षण हक्क अधिनियम आरटीई 2009 नुसार शालेय कार्यामध्ये समाजाचा, लोकांचा सहभाग घेणे आवश्यक असल्याने लोकसहभागाला एक अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाने दि.16 मे 1996 व दि.24 ऑगस्ट 2010 रोजी पारित केलेल्या परिपत्रकानुसार शिक्षक पालक सभेचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. 17 जून 2010 च्या महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या परिपत्रकांमुळे शिक्षणाची उद्दिष्टे पूर्ततेसाठी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करत असताना सामाजिक न्याय, लोकशाही, मानवी मूल्य प्रस्थापित करण्यासाठी शिक्षण क्षेत्रामध्ये लोकसहभागाचे महत्त्व खूप अनन्यसाधारण आहे असे नमूद करण्यात आलेले आहे त्यामुळे शाळेच्या विकासासाठी लोकसहभाग हा खूप महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

शाळेमध्ये लोकसहभाग वाढवावा हे ध्येय समोर ठेवून स्थानिक पातळीवर शाळा व्यवस्थापन समितीची रचना सर्व शासकीय ख व खाजगी शिक्षण संस्थांना आज बंधनकारक असल्यामुळे शासनाने यासंदर्भात निर्गमित केलेल्या सर्व परिपत्रकांचा आधार घेऊन स्थानिक पातळीवर शिक्षक पालक संघ, माता पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती या सर्वांच्या माध्यमातून लोकसहभाग निर्माण करून शाळा आणि विद्यार्थ्यांचा विकास करणे आज काळाची गरज निर्माण झालेली आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये लोकसहभागाचे महत्त्व जाणून शासनाने विद्यार्थ्यांचा विकास व शिक्षण संकल्पना साकारण्यासाठी अध्ययन-अध्यापन कार्यामध्ये समाज पालक आणि लोकसहभाग यांचे महत्त्व वेळोवेळी वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून वेगवेगळ्या परिपत्रकाच्या माध्यमातून दाखवून दिलेले असल्यामुळे आज लोकसहभागातून शाळेचा विकास करण्यासाठी मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक यांनी लोकसहभागाचे महत्त्व जाणून घेणे गरजेचे आहे तरच शाळेचा विकास करणे आजच्या नवीन युगात शक्य होणार आहे.



गावाला शाळेचा अभिमान आणि शाळेला गावाचा आधार या ब्रीदवाक्य प्रमाणे शालेय प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या विकासासाठी लोकसहभाग आणि स्थानिक पातळीवर अधिकारी पदाधिकारी यांच्या मदतीने खांद्याला खांदा लावून काम केले तर लोकसहभागातून विद्यार्थ्यांचा विकास करणे शक्य होणार आहे यामध्ये आर्थिक बाबी सहशालेय उपक्रम शैक्षणिक बाबी या अनेक मुद्द्यांवर लोकसहभागातून शालेय विकास विद्यार्थ्यांचा विकास करणे सोपे होणार असून यातून आपणास लोकसहभागाचे महत्त्व आणि गरज स्पष्टपणे दिसून येते.

लोकसहभागाची उद्दिष्टे -

१. लोकसहभागातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे.

२. लोकसहभागातून शाळेचा आणि समाजाचा संबंध जोपासणे आणि वाढविणे.

३. लोकसहभागातून शालेय समस्या सोडविणे.

४. लोकसहभागातून शालेय कामकाजावर सनियंत्रण प्राप्त करणे.

५. लोकसहभागातून शाळेत आर्थिक मदत आणि नवीन स्त्रोत निर्माण करणे.

६.लोकसहभागातून समाजातील तज्ञ प्रतिभावान व्यक्तींच्या ज्ञानाचा विद्यार्थी विकासासाठी उपयोग करून घेणे.

७.लोकसहभागातून विद्यार्थी गळती आणि स्थगिती यावर शंभर टक्के उपाययोजना करणे.

८.लोकसहभागातून शालेय परिसरातील वातावरण सुरक्षित आनंददायी आणि आकर्षक करणे आकर्षक करणे.


९.लोकसहभागातून शालेय सामग्रीचे संवर्धन करणे आणि जतन करणे.

१०.लोकसहभागातून समाज आणि शाळा यांच्यामध्ये परस्पर सहकार्याची मैत्रीची भावना निर्माण करणे.

११.विद्यार्थी गळतीचे प्रमाण कमी करून गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे.

१२. लोक सहभागातून विद्यार्थ्यांच्या मध्ये जीवनमूल्ये गाभाभूत घटक यांचे महत्त्व निर्माण करणे.

१३.विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी लोकसहभागातून सहकार्य घेऊन विविध उपक्रमांची अंमलबजावणी करणे.



लोकसहभागाची व्याप्ती -

लोकसहभागातून विद्यार्थी विकास साधत असताना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी, तालुका.बारामती, जिल्हा.पुणे या शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या 198 विद्यार्थ्यांना याचा लाभ झालेला आहे.

लोकसहभाग घेण्यापूर्वीच्या काळामध्ये विद्यार्थ्यांना विविध भौतिक सुविधा उपलब्ध होऊ न शकल्यामुळे काही क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांचा विकास होण्यास कमी वाव मिळत होता त्याचा परिणाम शाळेच्या भौतिक सुविधा आणि गुणवत्तेवर देखील होत होता.

लोकसहभागाचे नियोजन

संबंधित व्यक्तींशी, तज्ञांशी चर्चा –

बारामती टेक्स्टाईल पार्कचे अध्यक्षा सौ सुनेत्राताई वहिनीसाहेब पवार यांच्या मार्गदर्शना खाली गावातील सर्व पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सर्व सदस्य या सर्वांशी चर्चा करून लोकसहभाग बाबतचे नियोजन आणि कार्यवाही करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

आवश्यक साधनांचा विचार -

लोकसहभागासाठी सर्व आवश्यक साधनांचा साधनांचा विचार विनिमय करून जास्तीत जास्त लोक सहभाग कसा मिळेल याबाबतीत नियोजन करण्यात आले.

लोकसहभागासाठी केलेल्या कृतींचा क्रम –

a) लोकसहभागासाठी शाळा व्यवस्थापन समिती सभा घेण्यात आली.

b) माता पालक गटाची सभा घेण्यात आली.


c) लोकसहभागाचे महत्व पटवून देण्यासाठी शिक्षक पालक गटाची सभा घेण्यात आली.

d) शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आणि सदस्यांना परिसरातील आदर्श शाळेची भेट घडवून

देण्यात आली.

e) शिक्षण क्षेत्रातील तज्ञ मंडळी समाजसेवक परिसरातील तज्ञ व्यक्ती यांचे मार्गदर्शन शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि पालकांना करून देण्यात आले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, काटेवाडी, तालुका.बारामती जिल्हा.पुणे या ठिकाणी लोकसहभागातून विद्यार्थी विकास करत असताना आज शाळेची विद्यार्थ्यांची गुणवत्ता चांगली सुधारली आहे. शाळेने लोकसहभागातून



प्राप्त केलेल्या विविध गोष्टींमुळे सांस्कृतिक, क्रीडा पातळीवर तालुका जिल्हास्तरावर यश प्राप्त केलेले आहे. लोकसहभागातून प्राप्त डिजिटल साधनांच्या माध्यमातून आज शाळेतील विद्यार्थी तंत्रज्ञानाच्या मदतीने चांगली गुणवत्ता प्राप्त करत आहेत.

लोकसहभागाची कार्यपद्धती -

शैक्षणिक कार्यातील लोकसहभाग –


विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काठेवाडी तालुका बारामती जिल्हा पुणे या ठिकाणी स्थानिक पातळीवरील सर्व तज्ञ व्यक्ती शिक्षण क्षेत्राची आवड असणाऱ्या व्यक्ती माता पालक शिक्षक पालक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य या सर्वांच्या सहकार्यातून लोक सहभाग घेऊन शैक्षणिक कार्यामध्ये विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले त्यामुळे विद्यार्थ्यांचा विकास होण्यात मदत झाली.

अ. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन - विद्यार्थ्यांचा सर्वांगीण गुणवत्ता विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांना परिसरातील तज्ञ शिक्षण प्रेमींच्या मदतीने विद्यार्थ्यांना शालेय पातळीवर मार्गदर्शनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली.

आ. शालेय विद्यार्थ्यांचे समुपदेशन - शाळेमधील सर्व विद्यार्थ्यांना ताण त्या नावाचे व्यवस्थापन सहकारवृत्ती, नीतीमूल्य गाभाभूत घटक या सर्व गोष्टींची माहिती वेगवेगळ्या व्याख्यानातून करून देण्यात आली यासाठी तज्ञ व्यक्तींचे समुपदेशन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले त्यामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होण्यास उपयोग झाला.

इ. तज्ञ व्यक्तींचे अनुभव कथन - विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये काय व्हावेसे वाटते या संदर्भात परिसरातील संबंधित क्षेत्रामध्ये यश प्राप्त केलेल्या तज्ञ व्यक्तींचे अनुभव कथन ऐकण्याची सुवर्णसंधी विद्यार्थ्यांना वेळोवेळी शाळेमध्ये विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये परिसरातील तज्ञ डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक, खेळाडू, सामाजिक क्षेत्रात काम करणारे समाजसेवक, आरोग्य सेविका अंगणवाडी सेविका. महसूल कर्मचारी, राजकीय व्यक्ती या सर्वांचे अनुभव कथन वेळोवेळी विद्यार्थ्यांना शाळेमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याचा फायदा असा झाला की विद्यार्थ्यांना समाजामध्ये काम करत असणाऱ्या वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ञ मंडळींचे अनुभव ऐकून त्यांच्या विषयी आदर निर्माण होण्यास मदत झाली.

ई. आजी आजोबा दिवस - शाळेतील सर्व विद्यार्थ्यांमध्ये आपल्या घरातील आजी आजोबांविषयी आदर निर्माण व्हावा आणि त्यांच्या विषयी कृतज्ञतेची भावना निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी या ठिकाणी आजी आजोबा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी आजी-आजोबांसाठी वेगवेगळे खेळ आणि गोष्टी घेण्यात आल्या, आजी-आजोबा आणि त्यांचे नातवंड यांच्यामध्ये



एक प्रकारचा सलोखा आणि आदराची भावना निर्माण होण्यास मदत झाली आणि याच माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये बालसंस्कार रुजविण्यासाठी एक सुवर्णसंधी शाळेमध्ये उपलब्ध करून देण्यात आली.


सहशालेय उपक्रमातील लोकसहभाग –

गावाला शाळेचा अभिमान आणि शाळेला गावाचा आधार या ब्रीदवाक्याप्रमाणे सहशालेय उपक्रमामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी या ठिकाणी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.धनाजी काळे आणि शाळा व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्य यांचा लोकसहभाग हा खूप महत्त्वपूर्ण ठरला आहे . जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी या ठिकाणी शाळा व्यवस्थापन समितीतील अध्यक्ष व सर्व सदस्यांनी लोकसहभाग मिळवून देण्यासाठी गाव , तालुका पातळीवर खूप मोठ्या प्रमाणात प्रयत्न केल्यामुळे आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी एक आदर्श शाळा म्हणून संपूर्ण जिल्ह्यामध्ये नावलौकिकास आलेली आहे. याचे सर्व श्रेय लोकसहभाग प्राप्त करून देणाऱ्या पालक वर्गाला आणि ग्रामस्थांना जाते.

अ. वार्षिक स्नेहसंमेलन - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी या ठिकाणी लोकसहभागातून दरवर्षी वार्षिक स्नेहसंमेलन हे खूप मोठ्या प्रमाणात आयोजित केले जाते. याप्रसंगी शालेय आवारामध्ये उत्तम दर्जाचा स्टेज, लाईट, डेकोरेशन, बैठक व्यवस्था, साऊंड सिस्टिम या सर्व गोष्टींची पूर्तता लोकसहभाग आणि शाळा व्यवस्थापन अध्यक्ष आणि सर्व सदस्य यांच्या सहकार्यातून केली जाते, याप्रसंगी प्राप्त आर्थिक आणि भौतिक मदत ही शाळेच्या विकासासाठी वापरली जाते. शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन लोकांच्या सहकार्यातून राबविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि व्यक्तिमत्व विकासाला वाव मिळतो.

आ. स्वच्छता हीच सेवा – निर्मल ग्राम काटेवाडी स्वच्छ सुंदर काठेवाडी हे ब्रीदवाक्य सार्थ ठरवत दरवर्षी 2 ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती या दिवशी संपूर्ण गावामध्ये आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी परिसरामध्ये सर्व ग्रामस्थांच्या मदतीने लोकसहभागातून स्वच्छता दिनाचे महत्व ओळखून संपूर्ण शालेय परिसर आणि गावातील परिसर सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन स्वच्छ करतात आणि सन 2023 - 24 ला स्वच्छता हीच सेवा हे ब्रीदवाक्य समोर ठेवून सर्वांनी स्वच्छता करून स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली आहे.

इ. वृक्षारोपण पर्यावरण पूरक कार्यक्रम - देशातील पहिले इको व्हिलेज म्हणून निर्मल ग्राम पर्यावरण ग्राम काटेवाडी गावाची संपूर्ण देशभरात ओळख निर्माण झालेली. याच्या प्रणेत्या सौ .सुनेत्राताई वहिनीसाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गावामध्ये आणि शालेय परिसरामध्ये दरवर्षी वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि उत्स्फूर्त पद्धतीने साजरा केला जातो. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी यावर्षी शाळेतील विद्यार्थिनींनी शालेय परिसरातील वृक्षांना राखी बांधून पर्यावरण पूरक रक्षाबंधन सण साजरा केला.




ई. विद्यार्थी आरोग्य शिबिर - आरोग्याचे महत्त्व ओळखून विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहिले तरच विद्यार्थी चांगला अभ्यास करतील या उद्देशाने शालेय परिसरामध्ये दरवर्षी विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी केली जाते . याप्रसंगी परिसरातील तज्ञ डॉक्टर मंडळी यांचे सहकार्य घेऊन लोकसहभागातून विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपक्रम मार्गदर्शन आणि व्याख्यानांच्या आयोजन केले जाते याप्रसंगी शिक्षक पालक माता पालक यांचाही सहभाग घेतला जातो.

उ. माता पालक महिला मेळावा - घरातील आई ही विद्यार्थ्यांचा अभ्यास घेत असल्यामुळे आणि विद्यार्थ्यांच्या विकासाच्या छोट्या छोट्या गोष्टींवर जास्त लक्ष असल्यामुळे माता पालकांचे उद्बोधन होणे ही काळाची गरज आहे आणि हीच गरज ओळखून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काठेवाडी या ठिकाणी विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने माता पालक गटाचा मेळावा आयोजित केला जातो. याप्रसंगी मातांना मार्गदर्शन करण्यासाठी संबंधित विषयातील तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान आयोजत केले जाते.


आर्थिक लोकसहभाग -

विकास आणि पैसा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यामुळे शाळेमध्ये करावयाचा विकास साधण्यासाठी लोकसहभागातून आर्थिक मदत जमा करणे हे महत्त्वाचे आहे . आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सदस्य आणि सर्व ग्रामस्थांच्या सहकार्यातून वेळोवेळी विविध देणगीदारांनी आर्थिक मदत केल्यामुळे शाळेमध्ये वेगवेगळ्या भौतिक सुविधा , इतर शालेय उपयोगी साहित्य , रंगरंगोटी करण्यासाठी आर्थिक लोकसहभाग महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतो .यासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य आणि सर्व ग्रामस्थांच्या मदतीने शाळेसाठी जास्तीत जास्त आर्थिक लोकसहभाग मिळवण्यासाठी मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकवृंद सदैव प्रयत्नशील असतात, यासाठी पालक वर्गाचा देखील खूप मोठा सहभाग मिळत असतो.

1. डिजिटल प्रोजेक्टर - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी शाळेला सौ सुनेत्रा वहिनीसाहेब पवार यांच्या हस्ते डिजिटल प्रोजेक्टर बारामती येथील जय ट्रॅक्टर चे मालक श्री विद्याधर काटे आणि श्री वैभव काटे यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत हसत खेळत डिजिटल प्रोजेक्टर च्या साह्याने अभ्यासक्रम पाठ्यक्रमातील व्हिडिओ दाखवण्याची सोय शाळेमध्ये झालेली आहे. डिजिटल प्रोजेक्टरची किंमत १ लाख ३९ हजार रुपये आहे . अत्याधुनिक आणि चांगल्या दर्जाचा डिजिटल प्रोजेक्टर शाळेत आर्थिक लोकसहभागातून प्राप्त झाल्यामुळे मुलांची वाटचाल प्रगतीकडे होत आहे.



2. क्रीडा स्पर्धा वाहतुकीची बस व्यवस्था – जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने मागील सलग तीन शैक्षणिक वर्षांमध्ये तालुका पातळीवर इयत्ता पहिली ते चौथी मुलींच्या गटात लेझीम स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून आणि इयत्ता पहिली ते चौथी गटात प्रथम क्रमांक मिळवून सलग तीन वर्ष जिल्हा पातळीवर उत्कृष्ट सादरीकरण केलेले आहे. जिल्हास्तरावर होणाऱ्या स्पर्धा पुणे शहरात होत असल्यामुळे बारामती ते पुणे हे अंतर जास्त असल्याकारणाने काटेवाडी गावचे माजी सरपंच श्री विद्याधर काटे यांनी स्वतःच्या खर्चातून विद्यार्थ्यांना सलग तीन वर्ष पुण्याला स्पर्धेला जाण्यासाठी बसेसची स्वतःच्या खर्चातून सोय उपलब्ध करून दिली.
3. वृक्ष आणि प्लास्टिकच्या कुंड्या - बारामती परिसरातील नामांकित आशीर्वाद मच्छी ढाबा मालक श्री अतुल राऊत यांनी शाळेसाठी स्वखर्चातून वृक्ष आणि प्लास्टिकच्या उत्तम दर्जाच्या कुंड्या उपलब्ध करून दिल्या त्यामुळे शालेय परिसराचे सुशोभीकरण करण्यास सहाय्य झाले आणि विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व समजले.
4. इन्व्हर्टर - लाईट गेल्यानंतरही विद्यार्थ्यांना संगणक कक्षामध्ये संगणकाचे ज्ञान घेण्यासाठी आणि त्यावर अध्ययन करण्यासाठी त्याचबरोबर कार्यालयीन कामकाज कोणत्याही खंडाशिवाय चालू राहण्यासाठी काटेवाडी चे ग्रामस्थ श्री अतुल राऊत यांनी शाळेसाठी दोन इन्व्हर्टर च्या जोड्या स्वखर्चाने उपलब्ध करून दिले आहेत.
5. टीव्ही संच - वर्गामध्ये विद्यार्थ्यांनाही e -कंटेंट पाहून अध्ययन अध्यापन आनंददायी आणि हसत खेळत होण्यासाठी ग्रामस्थ श्री दिलीप गायकवाड यांनी 32 इंची एलइडी टीव्ही शाळेसाठी उपलब्ध करून दिले आहेत.
6. घड्याळ - शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री तानाजी काळे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व वर्गांमध्ये चांगल्या दर्जाची घड्याळे बसवून दिली आहेत.
7. स्वयंसेवक मानधन - शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी गाव पातळीवरील स्वयंसेवक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे त्यांच्या मानधनासाठी ग्रामस्थ श्री अमोल भैया काटे यांनी मानधन दिले आहे.
8. प्लास्टिक खुर्च्या - काटेवाडीतील ग्रामस्थ श्री रामचंद्र ठोंबरे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस 25 प्लास्टिकच्या खुर्च्या देऊन चांगला आर्थिक लोकसहभाग उपलब्ध करून दिला आहे.
9. योगा मॅट - संसार येथील प्रसिद्ध बागायतदार श्री.अनिल निंबाळकर यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना स्वखर्चाने योग करण्यासाठी पन्नास योगा मॅट उपलब्ध करून दिल्या आहेत.
10. पिण्याच्या पाण्यासाठी फिल्टर - इयत्ता पहिली ते चौथीतील सर्व विद्यार्थ्यांना शाळेमध्ये पिण्याची शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे आणि त्यांचे आरोग्य राहून अभ्यास सात विद्यार्थ्यांची चांगली प्रगती व्हावी या उद्देशाने




काटेवाडी गावातील सरपंच श्री चांगले विद्याधर काटे आणि ग्रामपंचायत मधील सर्व सदस्यांनी शाळेसाठी अत्याधुनिक दर्जाचे दोन फिल्टर उपलब्ध करून दिले आहेत.

11. विद्यार्थ्यांसाठी ब्लॅंकेट - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी येथील सर्व विद्यार्थ्यांना काटेवाडी गावातील हनुमान तरुण मंडळ यांनी ब्लॅंकेट उपलब्ध करून दिले आहेत.
12. लेखन साहित्य - जिल्हा परिषद प्राथमिक काटेवाडी या ठिकाणी वेळोवेळी होणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांमधून ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे लेखन साहित्य उपलब्ध करून दिले आहे यामध्ये श्रीधर घुले, राजू भिसे, किरण वायसे, अमर जगताप, मनोज माने या ग्रामस्थांनी आर्थिक लोकसहभाग लेखन साहित्याच्या माध्यमातून शाळेत उपलब्ध करून दिला आहे.
13. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मंडप साउंड सिस्टिम - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी या ठिकाणी दरवर्षी होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमासाठी त्याचबरोबर नवागतांचे स्वागत या सर्व कार्यक्रमासाठी शाळेमध्ये आकर्षक असा मंडप आणि साऊंड सिस्टिम ची सोय श्री जमीर शेख हे ग्रामस्थ स्वतःच्या खर्चातून शाळेत विना मोबदला उपलब्ध करून देतात.
14. साऊंड सिस्टिम - ग्रामपंचायत काटेवाडी चे माजी उपसरपंच श्री.श्रीधर घुले यांनी स्वखर्चातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी साठी उत्कृष्ट दर्जाची साऊंड सिस्टिम उपलब्ध करून दिली आहे त्याचा वापर विद्यार्थी दररोज परिपाठामध्ये आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये करत असतात.

मनुष्यबळ लोकसहभाग –

1. शालेय परिसर स्वच्छता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी चा शालेय परिसर हा अवॉर्ड हवी असल्यामुळे गावातील ग्रामस्थांच्या लोकसहभागातून शाळेची वेळोवेळी स्वच्छता साफसफाई आणि डागडुजी लोकसहभागातूनच होत असते यासाठी पालक वर्ग मोठ्या उत्साहाने सहभाग घेतात . गावातील सौ मनीषा भिसे या शालेय परिसर स्वच्छ करण्यासाठी दररोज श्रमदान करतात.
2. क्रीडा मैदान निर्मिती - शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री धनाजी काळे आणि शाळा व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्य यांच्या आर्थिक लोकसहभागातून आणि पुढाकारातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडीचे क्रीडा मैदान स्वच्छता आणि लाल माती टाकून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे त्यामुळे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन शालेय क्रीडांगणामध्ये आज होत आहे आणि विद्यार्थी क्रीडा स्पर्धामध्ये तालुकास्तरावर जिल्हास्तरावर शाळेचे नाव मोठे करत आहेत.
3. ठिबक सिंचन सुविधा - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडीतील सर्व वृक्षांना ठिबक सिंचनाद्वारे पाणी उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत त्यामुळे झाडांची वाढ चांगली होत आहे, यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन ठिबक सिंचन श्रमदानातून शाळेमध्ये बसवून दिलेले आहे .




उपक्रमात आलेल्या अडचणी व त्यावर केलेल्या उपाययोजना –

1. आर्थिक लोकसभा घेण्यासाठी सुरुवातीच्या काळामध्ये काही ग्रामस्थ सक्रिय सहभाग घेत नव्हते परंतु नंतर वेळोवेळी भेटीगाठी घेऊन यामध्ये वाढ करण्यात आली आणि सर्व ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद दिला.
2. लोकसहभागाचे महत्त्व पटवून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या माता पालक सभेला महिलाच मेळाव्याला सुरुवातीच्या काळात कमी उपस्थिती होत होती परंतु नंतर महिला वर्गांची पालक वर्गांची भेट घेऊन या मेळाव्यास चांगला प्रतिसाद मिळू लागला.
3. संघटक ज्ञानाचे बदलत्या काळातील महत्त्व त्याच बरोबर स्मार्ट टीव्ही प्रोजेक्टर यांचे महत्त्व पालकांना समजावून सांगितल्यामुळे या गोष्टी शाळेत उपलब्ध करून देण्यासाठी नंतरच्या काळात पालकांनी ही रेल्वेने सहभाग घेतला आणि आर्थिक लोकसहभाग शैक्षणिक उठाव करण्यास सहकार्य केले.
4. सुरुवातीच्या काळात पालक वर्गाचे लोकसहभागामध्ये सक्रियता जाणवत नव्हती परंतु नंतर शिक्षण क्षेत्रातील तज्ञ मंडळींचे मार्गदर्शन मिळाले, शिक्षक पालक गटातील सदस्य माता पालक गटातील सदस्यांनी सर्व पालकांना याचे महत्त्व समजल्यामुळे नंतरच्या काळात सर्व पालकांनी लोकसहभागात सहभाग घेतला.

लोकसहभागाची यशस्विता / निष्कर्ष -

सामाजिक सहकार्य शिवाय शाळेचा विकास साध्य करता येत नाही या उक्तीप्रमाणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी सर्व ग्रामस्थांच्या लोकसहभागातून शाळेचा विकास साधता आला आहे यामध्ये शैक्षणिक लोकसहभाग, आर्थिक लोकसहभाग, मनुष्यबळ लोकसहभाग अशा विविध स्तरावर ग्रामस्थांनी शाळा व्यवस्थापन समितीतील अध्यक्षांनी सदस्यांनी त्याचबरोबर प्रत्येक पालकांनी उत्स्फूर्त पद्धतीने लोकसभा घेऊन स्वखर्चातून शाळेत अनेक प्रकारच्या सोयी उपलब्ध करून दिल्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी येथील सर्व विद्यार्थी सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकासात अग्रेसर ठरले आहेत .विविध स्पर्धा परीक्षांमध्ये शाळेचे विद्यार्थी आज नावलौकिक प्राप्त करत आहेत त्याचबरोबर जिल्हा पातळीवर होणाऱ्या यशवंतराव चव्हाण कलाक्रीडा महोत्सवामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडीने बारामती तालुक्याची प्रतिनिधित्व करत असताना सलग तीन वर्ष उत्तम सादरीकरण केलेले आहे. लोकसहभागातून प्राप्त झालेल्या विविध भौतिक सुविधा, डिजिटल सुविधा यामुळे परिसरातील इंग्रजी माध्यमातील अनेक विद्यार्थ्यांचा कल आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडीकडे वाढताना दिसून येत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता लोकसहभागामुळे वाढीस लागलेली आहे.



समारोप -

गावाला शाळेचा अभिमान आणि शाळेला गावाचा आधार या उक्तीप्रमाणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी लोकसहभागातून आज यशाची शिखरे गाठत आहे या सर्व विकासामध्ये विद्यार्थी विकास हा केंद्रस्थानी राहिलेला आहे आणि या सर्व वाटचालींमध्ये गावातील ग्रामस्थ, शाळेतील पालक, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद या सर्वांचे योगदान महत्वाचे आहे.

लोकसहभागातून विद्यार्थी विकास क्षणचित्रे -





प्रभात गोकुळ (बापू) टांकसाळे

काटेवाडीत शिक्षकांचे वाजतगाजत स्वागत

काटेवाडी, दि. ७ (वार्ताहर)- काटेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांना शाळेच्या गेटपासून वाजत गाजत आणून ग्रामस्थांनी अनोख्या पद्धतीने शिक्षक दिन साजरा केला.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनंजय काळे यांनी शालेय परिसराचे सुशोभीकरण केले होते. सर्व शिक्षकांचे पुष्पवर्षाव करून शालेय आवारात ढोल ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. प्रत्येक शिक्षकांना पेटा बांधता होता. शाल, श्रीफळ, पांडुरंगाची व गणपतीची मूर्ती भेट देऊन गौरविण्यात आले. यावेळी बारामती तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी संपत गावडे , विस्तार अधिकारी नवनाथ कुचेकर, केंद्रप्रमुख बाळकृष्ण खरात, विद्याधर काटे, उपसरपंच श्रीधर घुले, पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य पांडुरंग कचरे, तंटामुक्तीचे अध्यक्ष के. टी. जाधव, राजेंद्र पवार, संभाजी ब्रिगेडचे कोपाध्यक्ष अमोल काटे, शीतल काटे, समीर मुलानी, रामभाऊ ठोंबरे, दूध संघाचे संचालक संजय शेळके, अजित काटे, अँड. राजेंद्र मासाळ, सागर भिसे, धनंजय भिसे, पोलीस पाटील सचिन मोरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनंजय काळे, उपाध्यक्ष पूनम सोनवणे, गौरी जगताप, शरद देवकाते, सचिन यादव, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांनी केले.

मुख्याध्यापिका राणी ढमे, अशिक्षिका नर्मदा शिंदे, गीतांजली देवकर, जयश्री चांगण, संतोष सातपुते, सोनाली तांदळे, बापू तांदळे, लीना दळवी, वनिता जाधव, माजी शिक्षक वनिता सोडमिसे, धनपाल माने, प्रीतम सातपुते यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आशासेविका संध्या काळे, सारिका खोमणे, सुषमा लोंढे यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन दीपक वाकळे यांनी केले. धनंजय काळे यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापिका राणी ढमे यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

काटेवाडीत रंगला शिक्षकांचा गुणगौरव सोहळा

काटेवाडी : बारामती तालुक्याच्या काटेवाडीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी ढोल- ताशांच्या गजरात फेटे बांधून मराठमोळ्या पद्धतीने शिक्षकांचे स्वागत केले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन म्हणून 'शिक्षक दिन' साजरा केला जातो. त्या अनुषंगाने शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनंजय काळे यांनी या अनोख्या स्वागत सोहळ्याचे आयोजन केले आहे.

गटशिक्षणधिकारी संपत गावडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून, कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने अध्यक्ष धनंजय काळे, उपाध्यक्षा पूनम सोनवणे, गौरी जगताप, शरद देवकाते, सचिन यादव, आदींनी मुख्याध्यापिका राणी ढमे, नर्मदा शिंदे, गीतांजली देवकर, जयश्री चांगण, संतोष सातपुते, सोनाली तांदळे, बापू तांदळे, लीना दळवी, वनिता जाधव, माजी शिक्षक वनिता सोडमिसे, धनपाल माने, प्रीतम सातपुते, अण्णा ढमे आदी शिक्षकांना गौरविण्यात आले.

या वेळी गटशिक्षणाधिकारी संपत गावडे, विस्तार अधिकारी नवनाथ कुचेकर, केंद्रप्रमुख बाळकृष्ण खरात, विद्याधर काटे, श्रीधर घुले, पांडुरंग कचरे, संजय शेळके, के. टी. जाधव, अमोल काटे, रामभाऊ ठोंबरे, अमोल काटे, शीतल काटे, धीरज घुले, समीर मुलानी, नितीन भिसे, अजित काटे, सचिन मोरे, विशाल सुतार, दिलीप गरदडे, सागर भिसे, संदीप दळवी आदी उपस्थित होते.

Smart Pune Edition

सिध्देश्वर प्रसन्न

सर्वसामान्य जनता व वाचकांचे व्यासपीठ

E-mail: nirabaramativarta@gmail.com

साप्ताहिक

निरा-बारामती वार्ता

स्थापना २००३

संपादक : राजेश वाघ

Whats app no. 8888850132

www.nirabaramativarta.page

कार्यकारी संपादक : अमर वाघ

महाराष्ट्र शासन अधिस्वीकृतीधारक पत्रकार

RNI NO- MAHMAR/ 2004/17466 Decl. No. SDM/BARAMATI/SR/4/2013 ⊕ Post. Li. No. PML/14/2021-23

वर्ष २० वे | अंक २० वा | शनिवार दि. १७ जून २०२३ | मो.८८८८८५०१३२/९०४९२२९४४८ | पाने-४

दिल्ली, मुंबई, नागपूर

ढोल ताशांच्या गजरात काटेवाडी शाळेत नवागतांचे स्वागत



बारामती - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी येथे १५ जून २०२३ रोजी इयत्ता पहिली दाखल होणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात गुलाब पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते स्वागत आणि प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. त्यांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन फुगे देऊन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमासाठी माजी विरोधी पक्षनेते श्री अजित दादा पवार साहेब यांचे स्वीय सहाय्यक श्री सुनील कुमार मुसळे साहेब, काटेवाडी गावचे माजी सरपंच श्री विद्याधर काटे, उपसरपंच श्रीधर घुले, काटेवाडी ग्राम चे तंटामुक्तीचे अध्यक्ष श्री के टी जाधव सोसायटीचे माजी चेअरमन श्री अनिल काटे पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य श्री पांडुरंग कचरे , राजेंद्र पवार धीरज घुले विशाल सुतार समीर मुलांनी दिलीप काटे गजानन हगवणे अनिल भाऊ काटे संजय शेळके ग्रामसेवक श्री भोईटे, तांबोळी, मारुती मासाळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री धनंजय काळे ,सर्व सदस्य मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, पालक वर्ग उपस्थित होते

दैनिक

राष्ट्र सह्याद्री

राष्ट्र सह्याद्री 22 Apr 2023 - 22 Apr 2023 - Page 6

डॉ. आंबेडकर जयंती निमित्तलेझीम पथकाचे आयोजन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बारामती : परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त सणसर तालुका इंदापूर या ठिकाणी लेझीम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या ठिकाणी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी मुलींच्या लेझीम पथकाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याबद्दल सणसर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीच्या वतीने शाळेला रोख चार हजार रुपये बक्षीस देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनंजय काळे आणि मुख्याध्यापक ढमे यांनी लेझीम पथकाचे कौतुक केले. मार्गदर्शक शिक्षक सातपुते आणि सोडमिसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पालक राजू मोहिते, दीपक कवाळे उपस्थित होते.

तालुका प्रतिनिधी : सुरज देवकाते

पुढारी

संक्षिप्त



काटेवाडी लेझीम पथकासमवेत मान्यवर.

लेझीम स्पर्धेत काटेवाडीचा संघ प्रथम

जळोची : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त सणसर (ता. इंदापूर) येथे आयोजित लेझीम स्पर्धेत काटेवाडी (ता. बारामती) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक मिळविला. या लेझीम पथकाला सणसर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीच्या वतीने रोख चार हजार रुपये बक्षीस देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनंजय काळे आणि मुख्याध्यापक ढमे यांनी लेझीम पथकाचे कौतुक केले. मार्गदर्शक शिक्षक सातपुते व सोडमिसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी पालक राजू मोहिते आणि दीपक कवाळे उपस्थित होते.

काटेवाडीच्या प्राथमिक शाळेत शाळापुर्व मेळावा संपन्न



बारामती:- एन्व्हॉयमेंटल फोरम ऑफ इंडिया बारामतीच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली काटेवाडी येथील जि.प.च्या प्राथमिक शाळेत शाळापूर्व मेळावा आयोजित करण्यात आला.

कोरोनामुळे गेले दोन वर्षे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व बौद्धिकनुकसान झाले आहे; ते भरुन निघावे तसेच विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी आणि विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरुन काढण्यासाठी शाळेत शाळा पूर्व मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मेळाव्याचे अगोदर सर्वप्रथम गावातून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले.

लेझीमच्या गजरात नवागत मुलांमुलींचे व माता पालकांचे स्वागत करण्यात आले.नवागत मुलांचा शारिरीक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक आणि भावनात्मक विकास, भाषाविकास गायन पूर्वतयारी व समुपदेशन इत्यादी बाबींची तयारणी करण्यासाठी शाळेत सात टेबल लावले होते.

येथे शैक्षणिक साहित्याचा वापर करुन प्रत्येक विद्यार्थ्यांचे विकास पत्र तयार केले.स्मार्ट माता तयार करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असून त्या अंतर्गत माता, पालकांनी आपल्या मुलांचा रोजच घरी अभ्यास करुन घ्यावा हा आहे.

या कार्यक्रमासाठी उपसरपंच श्रीधर घुले, बारामतीचे तालुका गटशिक्षणाधिकारी संपत गावडे, डाएटच्या अधिव्याख्याता श्रीमती बच्छाव, काटेवाडी बीटचे विस्ताराधिकारी नवनाथ कुचेकर, केंद्रप्रमुख विश्वास वागडे इत्यादींनी उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण आदर्श शाळा तयार करण्याचे ठरविले.

या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सर्वश्री धनंजय काळे, उपाध्यक्ष पुनम सोनवणे, तंटामुक्त समितीचे मा.अध्यक्ष राजेंद्र पवार, मिलिंद काटे,पोलीस पाटील सचिन मोरे, रश्मिगणी कुंभार,सचिन यादव, अजय भिसे, प्रकाश ठेंगले, दत्तात्रेय चांदणे, ग्राम विकास अधिकारी बाळासाहेब भोईटे माता पालक सदस्य व गावकरी उपस्थित होते तसेच काटेवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका राणी ढमे उपशिक्षिका वनिता सोठमिसे, नर्मदा शिंदे, गीतांजली देवकर, जयश्री चांगण, संतोष सातपुते, सोनाली तांदळे, बापू तांदळे, लीना दळवी तसेच अंगणवाडी ताई लैलाबी शेख, अलका खुटाळे बेबी शेख,मुन्नाबी शेख, छाया अडसूळ तसेच पूर्व पहिलीच्या वर्गाच्या शिक्षिका दिपाली काळे यांनी सहकार्य केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक लीना दळवी यांनी केले व संतोष सातपुते सरांनी आभार मानले.

लोकमत

काटेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत रंगला स्वागत सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

काटेवाडी : काटेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून वाद्यांच्या गजरात 'चला जाऊया, शाळा शिकूया' असा संदेश देण्यात आला. उन्हाळी सुटीच्या प्रदीर्घ कालावधीनंतर चिमुकल्यांच्या किलबिलाटाने शाळेचे आवार गजबजले. शाळेत पहिले पाऊल ठेवलेल्या चिमुकल्यांना शाळेची गोडी निर्माण व्हावी, यासाठी खाऊ देत मुलांचा शाळेचा पहिला दिवस अविस्मरणीय करण्यात आला.

शालेय शिक्षिकांनी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण केले. यावेळी राजेंद्र पवार, अनिल काटे, दूध संघाचे संचालक संजय शेळके, सोसायटीचे अध्यक्ष मारुती मासाळ, रणजित गायकवाड, दिलीप काटे, के. टी. जाधव, जितेंद्र काटे, धीरज घुले, प्रकाश ठेंगले, प्रमोद काटे, सागर भिसे, ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब भोईटे उपस्थित होते. मासाळवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत माजी उपसरपंच समीर मुलाणी यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक इमाम मुलाणी, मीराताई ढोले यांनी पाठ्यपुस्तकांचे वाटप केले. ढेकळवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजित घुले, नानासाहेब घुले, सोमेश्वर सूर्यवंशी, सोनाली खराडे, अनिता गरदडे, स्नेहल हगवणे, जगन्नाथ ठोंबरे यांच्या हस्ते पाठ्यपुस्तकाचे वाटप केले. मुख्याध्यापक अजित गावडे व सुखदेव वाघमोडे यांनी स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांना मिष्टान्नाचे जेवण देण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाचा संदेश देण्यात आला.



काटेवाडी येथे जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांचे ग्रामस्थांनी गुलाब पुष्प देवून स्वागत केले.

शाळेच्या आवारात काढलेल्या रांगोळ्या, तोरण, फुलांनी सजविलेले वर्ग आणि संगीताच्या सुरावटीने मुलांचे स्वागत करण्यात आले. शाळेत पहिले पाऊल ठेवणाचा मुलांच्या पावलांचे ठसे कागदावर उमटवून शालेय जीवनातील त्यांचे पहिले पाऊल जपण्यात आले. नवागतांचा हा स्वागत सोहळा काटेवाडी त रंगला होता. संरपच विद्याधर काटे, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य पांडुरंग कचरे, उपसरंपच श्रीधर घुले यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत पाठ्यपुस्तकांचे वाटप मुख्याध्यापक राणीताई ढमे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धंनजय काळे, उपाध्यक्ष पूनम गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

Hello Pune Gramin
Page No. 6 Jun 16, 2023
Powered by: erelego.com



काटेवाडी शाळेला डिजीटल प्रोजेक्टर

काटेवाडी : काटेवाडी (ता. बारामती) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी डिजिटल प्रोजेक्ट देण्यात आला. या वेळी बारामती टॅक्सटाईल पार्कच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार उपस्थित होत्या.

त्या काटेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी जय ट्रॅक्टरच्या वतीने वैभव काटे, संरपच विद्याधर काटे यांच्या पुढाकाराने डिजिटल प्रोजेक्ट वाटप हा उपक्रम राबविणयात आला. त्यावेळी पवार बोलत होत्या. कंपनीच्या वतीने विविध विविकासकामांसाठी सेस फंड वापरला जातो. त्या साठी जय ट्रॅक्टरचे मालक वैभव काटे यांच्या पुढाकाराने १ लाख ३९ चाळीस रुपयांचा डिजिटल प्रोजेक्ट शाळेसाठी देण्यात आला. मुख्याध्यापक राणी ढमे व सहशिक्षक धनपाल माने यांनी स्वागत केले.

या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य वनिता सोडमिसे, नर्मदा शिंदे, गितांजली देवकर, जयश्री चांगण, संतोष सातपुते, सोनाली तांदळे, बापू तांदळे, प्रितम सातपुते, लिना लोखंडे आदी शिक्षक उपस्थित होते.

काटेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी डिजिटल प्रोजेक्ट वाटप सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

लोकमत

काटेवाडीच्या जिल्हा परिषद शाळेत पुस्तकाची दहीहंडी

लोकमत न्यूज नेटवर्क

काटेवाडी : येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पुस्तकाची दहीहंडी फोडण्यात आली. गोपाळकालाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत अनोखा उपक्रम राबविण्यात आला.

शाळेच्या मैदानात विद्यार्थी कलागुणांना वाव देण्यासाठी गोपालकाला व दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, विद्यार्थी व विद्यार्थिनींची गोपाळाची वेशभूषा आकर्षण ठरली. यावेळी चौथीच्या विद्यार्थ्यांनी तीन थर लावत पुस्तकांची दहीहंडी फोडली. कार्यक्रम यशस्वितेसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनंजय काळे, मुख्याध्यापिका राणीताई ढमे, उपशिक्षिका नर्मदा शिंदे, गीतांजली देवकर, जयश्री चांगण, सोनाली तांदळे, वनिता जाधव, लीना दळवी, संतोष सातपुते, बापू तांदळे आदींनी प्रयत्न केले.

यावेळी परिसरातील बालगोपाळांनी सहभागी होत डीजेच्या तालावर थिरकण्याचा आनंद घेतला.

Hello Pune Gramin
Page No. 5 Sep 10, 2023
Powered by: erelego.com


ता.बारामती, जि.पुणे.


MH.42
AR.0142
Latitude : 18.12502773°
Longitude : 74.65975018°
Altitude : 471.94263 meters
Date : 09/16/2021 10:35 AM
Note : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी श्रमदान दिन


मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब
विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा
यांच्या
वाढदिवसानिमित्त
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी येथे
विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण व इतर सर्व विद्यार्थ्यांना
शैक्षणिक साहित्य वाटप
शुभहस्ते
मा.सौ. सुनेत्रावहिनी पवार
अध्यक्षा – बारामती हायटेक टेक्स्टाईल पार्क
वार-शनिवार दि.२३/०७/२०२२ रोजी सकाळी ९:३० वा.
स्थळ-जिल्हा परिषद शाळा काटेवाडी
सौजन्य : राष्ट्रवादी करिअर अॅकॅडमी माजी विद्यार्थी
आयोजक : समीर मुलाणी(मा. उपसरपंच, ग्रा.प.सदस्य काटेवाडी)


MH.42
T.1645




2021.03.25 09:37




New Holland
3630




श्रीमती. गंगुबाई कृष्णाजी काटे (देशमुख)
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी
ता.बारामती, जि.पुणे.
स्वातंत्र्यदिन

लेझीम स्पर्धा जिल्हा परिषद पुणे सादरीकरण जिल्हा स्तर



लोकनृत्य स्पर्धा जिल्हा परिषद पुणे सादरीकरण जिल्हा स्तर




मातीची गणेश मूर्ती निर्मिती
आजी आजोबा दिवस


DEPARTMENT OF DRINKING WATER AND SANITATION
MINISTRY OF JALSHAKTI
GOVERNMENT OF INDIA
ग्रामपंचायत काटेवाडी, पंचायत समिती बारामती, जिल्हा परिषद पुणे
स्वच्छ भारत मिशन (ग्रा)
एक कदम स्वच्छता की ओर
स्वच्छता ही सेवा
रविवार दि. १ ऑक्टोबर
राष्ट्रीय
महास्वच्छता
महाअभियान
१ ऑक्टोबर
स्वच्छतेसाठी श्रमदान
१ तास
! स्वच्छतेतून समृध्दीकडे !
।। स्वच्छेने एकत्र येऊया, गाव स्वच्छता करुया ।।


जि प शाळा काटेवाडी मुली विजेता लेझीम संघ


जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी
ता.बारामती, जि.पुणे.



सन २०१३ : जिल्हा परिषद अध्यक्ष चषक
शाळा काटेवाडी तालुका बारामती सक्रिय सहभाग








श्रीमती. गंगुबाई कृष्णाजी काटे (देशमुख)
ता.बारामती, जि.पुणे.


ता.बारामती, जि.पुणे.

आदर्श शाळा भेटी





युट्युब व्हिडिओ link- https://youtu.be/McpWV3QpYW4?si=4r6A1aWZX9W6iyrp

https://youtu.be/jrZf1vdNYy0?si=LPz1DXKXqFE8L0bS

आनंददायी शिक्षण – Building as Learning Aid (BaLA)

शाळेचे नाव - रायगड जिल्हा परिषद शाळा हेदवली, केंद्र.कडाव, ता.कर्जत, जि.रायगड.

Email ID – rzpschoolhedwali03@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.किसन दरवडा

सहशिक्षक - श्री.बाळाराम गायकर

प्रास्ताविक –

रायगड जिल्ह्यामधील कर्जत तालुक्यात हेदवली हे गाव आहे. कर्जतपासून अंतर साधारण २० किलोमीटर. मुख्य रस्त्यापासून दूर असलेल्या या गावात शाळेसाठी खूप साऱ्या समस्या होत्या. अपुरी शालेय इमारत, विद्युतीकरणाचा अभाव, पिण्याच्या पाण्याची असुविधा, शौचालयाची दुरवस्था, जागेअभावी शैक्षणिक वातावरणाचा अभाव इत्यादी.

अशा एक न अनेक समस्यांनी ग्रासलेल्या हेदवली शाळेत मुख्याध्यापक श्री.किसन दरवडा सर आणि उपशिक्षक श्री.बाळाराम गायकर सर यांनी अतिशय कल्पकतेने कायापालट घडवून आणला. आज शाळा सर्व सोयीसुविधांनी सुसज्ज आहे. शाळेमध्ये अत्यंत प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण तयार झाले आहे. शिक्षकांच्या दीर्घ काळाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना उत्तम यश आले आहे.

संपूर्ण शालेय इमारत इतकेच नव्हे तर शाळेचे मैदान, परिसर सगळीकडेच विपुल प्रमाणात शैक्षणिक साहित्यांची आकर्षक मांडणी केलेली आहे. स्वच्छ व सुंदर शाळा घडवत असताना टाकाऊ वस्तूंचा अत्यंत कल्पक वापर केलेला आहे. विद्यार्थी फक्त पुस्तकी ज्ञान न घेता आनंददायी शिक्षणात अभिप्रेत असणारे नवनिर्मितीचे प्रात्यक्षिक करत आहेत.


अडचणी –

हेदवली शाळेची स्थापना दिनांक १ एप्रिल १९५३ ची आहे. शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत होती. पुढील शिक्षणासाठी मुलांना गावापासून 2 किलोमीटर दूर असणाऱ्या मांडवणे गावी जावे लागत असे. बाहेरगावी जाण्याची गैरसोय होत असल्याने बऱ्याच मुलांचे शिक्षण अर्धवट राहत असे, विशेषतः मुलींमध्ये गळतीचे प्रमाण अधिक होते.

जुन्या शालेय इमारतीत एकाच वर्गखोली असल्यामुळे विद्यार्थ्यांची खूप गैरसोय होत होती.दोन इयत्तांना मंदिरात बसावे लागत होते. अपुऱ्या भौतिक सुविधांमुळे विद्यार्थी उपस्थिती १००% राहत नव्हती. आनंददायी शैक्षणिक वातावरणाचा अभाव होता. पालक, शाळा व्यवस्थापन समिती यांचे कृतीशील सहकार्य लाभत नव्हते.

उपाययोजना –

1. प्रथमतः शाळेमध्ये इयत्ता पाचवी, सहावी व सातवी हे उच्च प्राथमिक वर्ग सुरु करण्यात आले. यामुळे पटसंख्येत्त लक्षणीय वाढ झाली. दोन वर्षांच्या पाठपुराव्यानंतर ३ वर्गखोल्यांची शालेय इमारत मंजूर झाली.
2. सदर इमारत बांधकामासाठी गावात कोठेही जागा उपलब्ध होत नव्हती, तेव्हा शिक्षकांनी ग्रामस्थांशी वारंवार चर्चा करून गावाबाहेर भवानी देवी मंदिराजवळील जागा बांधकामासाठी



उपलब्ध करून घेतली. ही जागा खडकाळ व उताराची आहे. परंतु ही जागा अतिशय कल्पकतेने वापरून परिसर सुंदर करून घेतला आहे.

3. तीन वर्गखोल्यांची सपाट सिमेंटची इमारत बांधून झाली. यानंतर एक मोठी समस्या निर्माण झाली. कोकणात होणाऱ्या जोरदार पावसामुळे पाणीगळती सुरु झाली. वर्गात बसणे अशक्य होऊ लागले.
4. याच दरम्यान सर्व शिक्षकांनी मिळून शालेय इमारतीत व परिसरात शैक्षणिक साहित्य तयार करून लावण्याची योजना आखली. साधारणपणे आपण पुठ्ठा, कार्डपेपर, थर्माकोल असे साहित्य वापरून शैक्षणिक साहित्य बनवतो, परंतु ईथे मात्र शिक्षकांनी पत्रा, लोखंडी पाईप, प्लंबिंग पाईप, प्लायवूड अशा अत्यंत टिकाऊ व मजबूत साहित्यापासून शैक्षणिक साधने बनवली. याकरीता बरीचशी हत्यारे जमा केली, खरेदी केली, जुने साहित्य जमा केले.
5. शाळांमधून शैक्षणिक साधने कपाटात ठेवलेली असतात त्यामुळे साहजिकच त्यांची उपयोगिता मर्यादित असते इथे मात्र तयार केलेली शैक्षणिक साहित्ये जमिनीत लाकडी खांब किंवा लोखंडी पाईप लावून त्यावर बसवली. हे शैक्षणिक साहित्य मुलांसाठी कायमस्वरूपी उपलब्ध असते. मुले हवे तेव्हा यांचा वापर करू शकतात. प्रत्येक शैक्षणिक साहित्यामध्ये कृतिशीलता आहे. चक्र फिरवणे, ठोकळे सरकवणे, वस्तू मोजून योग्य ठिकाणी ठेवणे अशा विविध क्रिया करत ही शैक्षणिक साधने मुले वापरतात. मुलांना खेळत खेळत शिकण्याची मजा या साधनांमधून मिळते.
6. यानंतर शालेय आनंददायी शैक्षणिक वातावरण निर्मितीवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला.
7. जास्तीत जास्त शैक्षणिक साधनाची निर्मिती, टाकाऊ वस्तूंचा प्रभावी वापर यातून शालेय परिसर आनंददायी शिक्षणास पूरक बनला.
8. मुलांना गटात शिकण्याची सवय शैक्षणिक साधनांतून लागली आहे. मोठी मुले लहान मुलांचा या साधनांच्या माध्यमातून सराव घेतात. यातून विद्यार्थ्यांचे संवादकौशल्य विकसित होण्यास मदत होते.
9. शैक्षणिक साहित्याच्या या लक्षवेधी रचनापद्धतीमुळे विविध मान्यवर संस्था व शिक्षणप्रेमी शाळेला भेटी देवू लागले. यातूनच शबरी सेवा समिती , कशेळे, तालुका कर्जत ह्या संस्थेने शाळेला सहकार्य केले. Slab गळतीच्या समस्येवर उपयायोजना करण्याचे ठरले. शालेय इमारतीवर अर्ध्या भितींचे बांधकाम करून पत्रा शेड करून hall बांधण्याचे ठरले.यातून पाणीगळतीची समस्या थांबणार होती शिवाय शाळेसाठी hall उपलब्ध होणार होता. शबरी सेवा समिती संस्थेने पत्रा शेड बांधून देण्याचे मंजूर केले परंतु भिंतीचे बांधकाम मात्र शाळेने करावे अशी योजना मांडली. सर्व शिक्षकांनी या योजनेला सकारात्मक प्रतिसाद दिला. गावामध्ये फिरून सर्व ग्रामस्थांना श्रमदानाचे आवाहन करण्यात आले. शिक्षकांनी स्वतः गावकरी यांच्या सहकार्याने आर्थिक भार उचलत बांधकाम साहित्य जमा केले. सर्वांनी खूप मेहनत घेवून शेडसाठी आवश्यक असलेली भिंत बांधून घेतली. त्यानंतर शेडचे काम पूर्ण होऊन शाळेसाठी मुख्य इमारतीच्या वर सुसज्ज असे मोठे दालन / hall तयार झाले .




हजार शतक दशक एकक
×9000
× 900
× 90
× 9
स्थानिक किंमत
संख्या लिहा.




R.Z.P. SCHOOL- HEDWALI, KARJAT- RAIGAD.
SHARE & CARE (माणुसकीची भिंत)
• आपल्याकडील जास्तीच्या किंवा अनावश्यक शालेय वस्तू येथे ठेवाव्यात.
• गरजूंनी त्या गरजेनुसार घेवून जबाबदारीने वापराव्यात.


RAIGAD ZILLHA PARISHAD SCHOOL
•HEDWALI•
स्कूल
चले
हम




हेदवली
22-08-17 16:01


प्रज्ञा-
सुमित-




रायगड जिल्हा परिषद शाळा
हेदवली
तालुका कर्जत
2017-10-12 17:37


WHERE WHAT ?
OFFICE
CLASS ROOM-I
CLASS ROOM-II
CLASS ROOM-III
CLASS ROOM-IV
BOYS TOILET
GIRLS TOILET
KITCHEN
DRINKING WATER


विज्ञान विभाग
SCIENCE ZONE
INDIA
ISRO
INDIA


स्वच्छ शाळा, स्वच्छ भारत
जगन्नाथ
माझा खाऊ मला द्या!
माझा खाऊ मला द्या!


शतक
दशक
एकक
संख्यावाचन
कोटी
दशलक्ष
लक्ष
दशहजार
हजार
शतक
दशक
एकक
लक्ष
हजार
अंकाची स्थानिक किंमत
संख्येचे वाचन व अक्षरी लेखन


संख्यातुला
NUMBER BALANCE








संख्यातुला
NUMBER




शब्द बनवा



फलनिष्पत्ती –

शाळेने विज्ञान प्रदर्शन, स्वच्छता अभियान, परसबाग निर्मिती, शालेय पोषण आहार स्वच्छता गट स्थापना अशा विविध उपक्रमात उत्तम कामगिरी केली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा, सातत्य, उपक्रमशीलता, स्वच्छता इत्यादी अनेक बाबतीत लक्षणीय प्रगती दिसून आली.

स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून शाळेत भौतिक सुविधा सुसज्ज झाल्या आहेत याचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना होत आहे.

समारोप –

शैक्षणिक साहित्य निर्मितीच्या माध्यमातून सुंदर शालेय वातावरण निर्मिती करून आनंददायी शिक्षणास उत्तम गती मिळाली . साहित्यानिर्मितीतही नवनवीन प्रयोग होणे आवश्यक होते ,. नाविन्यपूर्ण साहित्यानिर्मितीमुळे मुलांना अध्ययनात रुची वाटू लागली . मुलांची विविध कौशल्ये विकसित झाली . साहित्यानिर्मितीमध्ये मुलांचा सहभाग घेतल्याने मुलांना नवनिर्मितीचा आनंद मिळाला . नाविन्यपूर्ण उपक्रमांना सामाजिक सहकार्यही उत्तम मिळाले त्यातून शालेय भौतिक विकासास हातभार लागला .

शाळेतील परसबाग घरोघरी

शाळेचे नाव – रायगड जिल्हा परिषद शाळा, गोळेगणी, ता.पोलादपूर, जि रायगड

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.सचिन परशुराम दरेकर

जाणवलेली समस्या –


बदलीने शाळेत हजर झाल्यानंतर 'गुणवत्ता हीच मालमत्ता' या विचाराने शाळेत 'विद्यार्थी गुणवत्ता' हेच अंतिम ध्येय ठेऊन कामास प्रारंभ केला. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत विद्यार्थाला परिपूर्ण उपयोजित ज्ञान मिळावे या हेतूने शाळेतील सर्व शिक्षकांजवळ चर्चा करून शाळेत अभ्यासपूरक व सहशालेय उपक्रमांची अंमलबजावणी करण्याचे नियोजन केले. भाकरी तयार करणे, दिनांकाचे पाढे, चित्ररूपाने पुस्तक तयार करणे, शैक्षणिक शेकोटी, पक्षांच्या पंखांची ओळख, गुणवत्तेची गुढी, शालेय मंत्रिमंडळ, हसत खेळत धूळपाटी , पाककला, शिक्षणाची वारी, उपस्थिती झेंडे, शालेय सुशोभिकरण, रोपवाटिका, दिवाळी भेटकार्ड, तूर लागवड, रानभाज्या प्रदर्शन, परिसर भेट, Useful Common English word इ. उपक्रम शैक्षणिक वर्षात घेतले.

शाळेची भौगोलिक स्थिती, भौतिक सुविधा, आर्थिक नियोजन यावर शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ व पालक दानशूर व्यक्तिमत्व यांच्याजवळ विचार विनिमय करून उपक्रमांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या सर्व समस्यांचे निराकरण केले.

शाळेभोवतालेचा परिसर बराच मोठा असल्याने व शाळेचे गाव शहरापासून खूप दूर असल्याने शालेय पोषण आहारात प्राप्त धान्य व्यतिरिक्त इतर पालेभाजी, फळभाज्यांचा अत्यल्प वापर होत असे त्यामुळे शाळेशेजारी मोकळ्या जागेत परसबाग करण्याचे ठरवले.

समस्या -

१. शहर दूर असल्याने भाज्यांची आवश्यकता.
२. स्वकष्टाची व मेहनतीची कमतरता
३. सहशालेय उपक्रमात पालकांचा कमी सहभाग
४. परसबागे विषयी नकारात्मक मानसिकता
५. पर्यावरणाचे निरीक्षणाचा आभाव



उद्देश -

१. परिसराशी मैत्री करणे
२. ज्ञान शाळेबाहेरील जगाशी / व्यवहाराशी जोडणे
३. स्वनिर्मितीचा आनंद व स्वकष्टाची जाणीव देणे
४. सहशालेय उपक्रमात पालक व समाजाचा सहभाग वाढवणे
५. परसबागेतील विविध भाज्यांचा शालेय पोषण आहारात नियमित वापर करणे.

उपक्रमाची व्याप्ती / स्तर –

शाळेत शिक्षकांना जसे आपल्या अध्यापन तंत्राची स्वातंत्र्य आहे, तसे विद्यार्थानाही आपल्या कल्पकतेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य आहे.म्हणून विद्यार्थांच्या या कल्पकतेला धरून विविध सहशालेय उपक्रम शाळेत राबविले जातात.त्यासाठीची पूर्व तयारी कार्यवाही नियोजन व यशस्वीता याचा विचार करून उपक्रमची अंमलबजावणी केली. स्वनिर्मिती, वेगळेपण व स्वयं अध्ययन यामुळे विद्यार्थी शाळेत रममाण झाले. लोकसहभागामुळे शालेय आंतरक्रिया चांगली झाली.


सदर उपक्रम शाळास्तरावर घेण्यात आला. शाळेची सेंद्रीय परसबाग तयार झाल्यावर प्रत्येक मुलाच्या घराशेजारी परसबागा तयार करून स्पर्धा घेतली.

उपक्रमाचा तपशील -

विद्यार्थ्यांना बालवयातच पर्यावरणाची,परिसराची आवड निर्माण व्हावी. कष्टाच्या कामांची जाणीव व्हावी या हेतूने विविध भाज्यांची, रोपांची लागवड केल्यानंतर प्रत्येक कामाचे निरीक्षण व चर्चा केली. सेंद्रिय खते ,कीटकनाशके निर्मिती करण्यासाठी आजू बाजूच्या विविध वनस्पती (कडूनिंब,पपई, नेंगड, तुळस, लसून इ.) व परिसरातील शेणखत, गोमुत्र, ताक, गांडूळमाती, जाड मीठ, हळद, इत्यादीचा वापर करून सेंद्रिय कीटकनाशक शाळेत तयार केले. ज्याचा वापर परसबागेसाठी केला.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्या भूमिका समजावून दिल्या.

कार्यवाही -

- संपूर्ण उपक्रमाचे नियोजन केले.
- वाफे तयारी केले.
- पक्के कुंपण तयार केले.



- बी चे रोपण, शेणखताचा वापर, सेंद्रिय कीटकनाशक फवारणी केली.
- ठिबक सिंचन पद्धतीने पाणी पुरवठा केला.
- तालुका कृषी अधिकारी व कृषी क्षेतातील तज्ञाचे मार्गदर्शन घेतले.
- भेंडी, वांगी, दुधीभोपळा, पडवळ, मिरची, टमाटर , मुळा, चवळी, कोथिंबीर यांचा आहारात नियमित वापर.
- पालकांच्या सहभागाने घरोघरी परसबाग उपक्रम स्पर्धेचे आयोजन
- पालक सभा घेऊन उपक्रमची माहिती, कामाचे स्वरूप व प्रत्येकाची भूमिका समजावून दिली.
- प्रत्येक टप्प्याचे निरीक्षण व चर्चा.
- परिसरातील प्रत्येक विद्यार्थांनी उपलब्ध जागेत परसबाग तयार केली.
- स्पर्धेतील उत्कृष्ट ३ परसबागेला आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मान केला.

समस्या / अडचणी -

१. मुलांना स्वकष्टाची सवय नव्हती
२. शेतीकामाबाबत उदासीनता
३. परसबागेचे संरक्षण करणे
४. पाणी समस्या
५. कीटकांचा प्रादुर्भाव

सर्व समस्यावर सकारात्मक दृष्टीकोनातून मुलांना प्रोत्साहन देऊन क्रियाशील ठेवले. प्रत्येक्ष कृतीतून, अनुभवातून केलेल्या कामात मुलांना अधिक आनंद मिळतो हे लक्षात आले.

फलनिष्पती -

१.परिसराविषयी आवड व मैत्री निर्माण झाली.

२.निरीक्षण शक्ती, सहकार्य, चिकाटी या गुणांची वाढ झाली.

३.आपणही काहीतरी वेगळे करू शकतो ही जाणीव वाढून विद्यार्थांमध्ये आत्मविश्वास वाढला.

४.शा.पो.आहारात परसबागेतील भाज्यांचा वापर होत असल्याने स्वनिर्मितीचा एक वेगळा आनंद मिळाला.

५.पालकांच्या व मोठ्या माणसांचे कष्टाचे मोल लक्षात आले

६.घरोघरी परसबागा तयार झाल्या व समाजाचा शाळेविषयीचा दृष्टीकोन अजून सकारात्मक झाला.



झालेला खर्च -

कुंपण : रु.५००.००

बी : १०००.००

बक्षिसे : ५००.००

एकूण खर्च :२०००.००

उपक्रमाचे फोटो -





सकाळ



पोलादपूर : गोळेगणी शाळेत परसबागेची पाहणी करताना अधिकारी.

पोलादपुरात गोळेगणी शाळेत परसबाग स्पर्धा

पोलादपूर (बातमीदार) : पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी शाळेत तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या पुढाकाराने घरोघरी परसबाग स्पर्धा घेण्यात आली. या वेळी परसबागेचे महत्त्व, सेंद्रिय शेती, सेंद्रिय खते, गोमूत्र, ताक यापासून मिळणाऱ्या फायद्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्यांनी घराशेजारी छोटी परसबाग, वाफे, कुंपण, खते कशी तयार करावी, यांची माहिती देऊन घरोघरी परसबाग स्पर्धा राबविण्याचा संकल्प केला. त्यातून उत्कृष्ट परसबागेला बक्षिसे देण्यात येतील, अशी माहिती या वेळी देण्यात आली. कमी जागेत सांडपाणी, शेणखत, सेंद्रिय फवारणी यांचा कसा उपयोग करावा, यांची माहिती दिली. या वेळी गावातील प्रभाकर पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे, कृषी सहायक मनोज जाधव आदी उपस्थित होते.

Mumbai, Raigad-Today
05/12/2019 Page No. 6



गोळेगणी शाळेतील परसबाग स्पर्धेचे कौतुक

पोलादपूर : पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी शाळेत मंगळवारी तालुका कृषी अधिकारी धुमाळ यांनी घरोघरी परसबाग स्पर्धेबाबत शाळेच्या परसबागेला व बागकाम सुशोभीकरणाला भेट देऊन मार्गदर्शन केले व शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. शाळेतील मुलांना मार्गदर्शन करताना तालुका कृषी अधिकारी यांनी परसबागेचे महत्त्व, सेंद्रिय शेती, सेंद्रिय खते, गोमूत्र, ताक यापासून मिळणाऱ्या फायद्यांचे महत्त्व समजावून सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या घराशेजारी छोटी परसबाग, वाफे, कुंपण, खते कशी तयार करावी यांची माहिती देऊन घरोघरी परसबाग स्पर्धा राबविण्याचा संकल्प सोडला व त्यातून उत्कृष्ट परसबागेला बक्षीस देण्यात येतील अशी माहिती दिली.



धुमाळ यांनी दिली भेट

कमी जागेत सांडपाणी, शेणखत, सेंद्रिय फवारणी यांचा कसा उपयोग करावा याची माहिती दिली. प्रत्येक विद्यार्थ्यांनी परसबाग स्पर्धेत सहभागी होतील. गोळेगणी शाळेतील गांडूळ खत निर्मिती, ऑक्सिजन पार्क, ठिबक सिंचन पद्धतीची पाहणी करून कौतुक केले. याप्रसंगी गावातील प्रभाकर पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे, कृषी सहायक मनोज जाधव आदी उपस्थित होते.



राष्ट्रीय कर्तव्य म्हणून स्वच्छता अभियानामध्ये पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत फ्रीडम ग्रुपचे प्रमुख श्री रोहन शिंदे यांनी प्रतिनिधिशी बोलताना व्यक्त केले आहे.

विद्यार्थ्यांकडून फळभाज्यांची लागवड

पोलादपूर : पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी शाळेत विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सहकार्याने परसबाग तयार करून विविध भाज्यांचा उपयोग शालेय पोषण आहारात करून स्वनिर्मितीचा, स्वकष्टातून मिळालेल्या यशाबद्दल विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान मिळाले आहे. जुलै महिन्यात नियोजन करून उपक्रम राबविण्याचे ठरवून जमिन तयार करणे, विविध वाफे तयार करणे, रोपांची लागवड करणे, कुंपण बांधले, देखभाल करणे आदी कामे विद्यार्थ्यांना सोबत घेऊन, वेगवेगळे शेतीपूरक कामांची माहिती देत, रोपं, त्यांची मूळं, फुले यांचे मार्गदर्शन देत, कोणतेही औषध फवारणी न करता सेंद्रिय खताचा वापर करून आज (वेळ पावसाचे प्रमाण खूप जास्त असतानाही) तीन महिन्याने भेंडी, शिराळे, वांगी, काकडी, मिरची, भोपळा, पडवळ, चवळी आदी भाज्यांचा प्रत्यक्ष पोषण आहारात उपयोग होत आहेत. शाळेचे शिक्षक विलेश गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली शंकर बलीकोंडवार, विलास उतेकर, सचिन देरेकर यांनी विद्यार्थ्यांना सहशालेय उपक्रमातून स्वकष्टाने, मेहनतीने साकारलेल्या परसबागेतील ही यश मुलांना खूप सुखावून जाते.

कातली बंगला येथे गांधी, शास्त्री जयंती

पोलादपूर














सेंद्रिय वर्मी वॉश तयार करणे
सेंद्रिय वर्मी वॉश





खेळाल तर शिकाल

क्षेत्र – भाषा /इंग्रजी /गणित /विज्ञान / सामाजिक शास्त्र या विषयांबाबत नाविन्यपूर्ण उपक्रम

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा, शीर नंबर ३, ता.गुहागर, जि.रत्नागिरी

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.नंदकुमार जानू पवार

प्रास्ताविक -

२०२० हे वर्ष जगभरात कोरोनाचा हाहाकार माजवणारे ठरले. या महामारीने कोणत्या क्षेत्रावर परिणाम झाला नाही असे नाही पण सर्वात जास्त परिणाम शिक्षण क्षेत्रावर झाला.विद्यार्थ्यांची शाळेत बसण्याची, अभ्यास करण्याची मानसिकता कमीच होती.शाळा सुरु झाल्या तेव्हा मागील इयत्तेची जवळ जवळ पाटी कोरीच होती. आधीच्या इयत्तेचा अभ्यासक्रम व यावर्षीचा त्या इयत्तेचा अभ्यासक्रम यांची एकमेकांशी सांगड घालताना तारेवरची कसरत करावी लागत होती.पालकांचा विद्यार्थ्यांशी नगण्यच संवाद होता.त्यात ग्रामीण भागातील शाळा असल्यामुळे विद्यार्थी बुजरे होते.खूप लाजरे होते. अबोल होते.ती अबोल कळी कशी उमलावी हा विचार स्वस्थ बसू देत नव्हता.ही दरी भरून काढण्यासाठी विद्यार्थ्यांना काहीतरी नाविन्यपूर्ण पद्धतीने, खेळाच्या माध्यमातून शिकवलेल्या घटकाचा अधिक उत्तम प्रकारे सराव करून घेण्याच्या उद्देशाने "**खेळाल तर शिकाल** "हा उपक्रम घेण्यात आला.

शाळा सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांची शाळेत बसण्याची, अभ्यास करण्याची मानसिकता अजिबात नसल्यामुळे आधीच्या इयत्तेच्या अभ्यासक्रमाची यावर्षीच्या अभ्यासक्रमाशी सांगड घालताना आमची दमछाक होत होती. विद्यार्थ्यांचाही तेवढा सकारात्मक प्रतिसाद नव्हता. मागील इयत्तेच्या क्षमता घेत यावर्षीच्या क्षमता रुजवताना विद्यार्थ्यांकडून अभ्यास करवून घेणे, त्यांना आनंदी ठेवणे व शिकवलेल्या भागाचे दृढीकरण करणे ही तारेवरची कसरत चालू होती. विद्यार्थी अभ्यासाकडे दुर्लक्ष करत होते. शिकवलेल्या भागाचा सराव कमी पडत असल्यामुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास त्यांनी गमावला होता. या सर्वांमुळे शिक्षक, पालक, शाळा, प्रशासन सर्वच जण चिंतेत होते.


विद्यार्थी जितके कृतीशील असतील तितका त्यांचा सर्वांगीण विकास अधिक झपाट्याने होणार हे नक्कीच ! विद्यार्थ्यांनी शिकवलेल्या भागाची उजळणी हसत खेळत, खेळाच्या माध्यमातून केल्यास अभ्यास

करणे कंटाळवाणे व निरस वाटणार नाही. त्यासाठी अतिशय सोप्या पद्धतीने तेथील स्थानिक परिस्थितीचा विचार करून सहज उपलब्ध साहित्याचा वापर विद्यार्थ्यांसाठी आनंददायी शिक्षणाची दारे उघडी करण्यासाठी रचनात्मक दृष्टीकोन निर्माण करून खेळाच्या माध्यमातून दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रियेला एक वेगळा आयाम देणे, स्वयं अध्ययनाची आवड निर्माण करणे, अध्ययन अध्यापनाचे नाविन्यपूर्ण पद्धतीने दृढीकरण करणे तसेच आत्मविश्वास व स्पर्धापरीक्षांच्या अभ्यासाची तयारी करून घेणारा ठरावा या उद्देशाने "**खेळाल तर शिकाल**" हा उपक्रम उपयुक्त व गरजेचा वाटला.

शाळेतील जुन्या अभ्यासक्रमाच्या स्वाध्यायकार्डांच्या कोऱ्या भागांच्या माध्यमातून मनोरंजक पद्धतीने खेळांची निर्मिती केली. हे खेळ कधीही व स्वयंअध्ययन पद्धतीने अध्ययन करण्यास उपयुक्त ठरू लागले. शिकवलेल्या ज्ञानाचे दृढीकरण तसेच स्वयं अध्ययनासाठी "**चला करूया भटकंती रत्नागिरी जिल्ह्याची**", "**खुल जा सिम सिम**", "**चला हवा येऊ द्या**", "**आता बोला ना !**", "**रॅपिड राउंड**", **"कुलूप माझे चावी तुमची**" इत्यादी उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. या उपक्रमासाठी इयत्ता ३ री व ४ थी चे विद्यार्थी घेण्यात आले. **"चला करूया भटकंती रत्नागिरी जिल्ह्याची**" हा खेळ Jigsaw Puzzle वर आधारित आहे. अगदी सहजपणे सर्व विद्यार्थ्यांना योग्य ठिकाणी तालुके लावता आल्यामुळे सर्वांनाच खूप आनंद झाला. सीमा, नद्या, अरबी समुद्र, सह्याद्री पर्वत, घाट, किल्ले, खाड्या इत्यादींची नावे योग्य ठिकाणी लावता आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. स्वतःच जमिनीवर नकाशा तयार केल्यामुळे रत्नागिरी जिल्ह्याची माहिती विद्यार्थ्यांनी खूप छान प्रकारे सांगितली. "**चला करूया भटकंती रत्नागिरी जिल्ह्याची**" या खेळामुळे प्रत्येक तालुक्याचे "Cut-Outs" योग्य ठिकाणी लावणे तसेच नद्या, खाड्या, गरम पाण्याचे झरे, किल्ले, सीमा योग्य ठिकाणी लावणे व संपूर्ण जिल्ह्याची भटकंती करून आणणे या कृती विद्यार्थी पुस्तकाचा आधार न घेता करू लागले.

"**खुल जा सिम सिम** " हा खेळ इंग्रजीचे Reading Skill वाढविण्यासाठी उपयुक्त ठरला. वाचनाच्या प्रवाहात जे मागे आहेत त्यांना मुख्य प्रवाहात आणून त्यांच्यातील चुकांचा शोध घेऊन इतरांची मदत घेत हसत खेळत वाचन घेण्यासाठी हा खेळ उपयुक्त आहे. एखाद्या जादुगाराप्रमाणे डोळे मिटून " **खुल जा सिम सिम** " म्हणत आलेले पान वाचणे ही विद्यार्थ्यांना गम्मतच वाटली.

विविध जयंत्या, पुण्यतिथ्यांच्या निमित्ताने करत असलेल्या भाषणातून विद्यार्थी अभिव्यक्त होण्यासाठी कमी पडत असल्याचे जाणवले. विद्यार्थ्यांचा लाजरेपणा, अबोलपणा घालवून त्यांना निर्भीडपणे अभिव्यक्त होण्यासाठी **"चला हवा येऊ द्या"** या खेळाची निर्मिती झाली. मराठी, गणित, परिसर अभ्यास, इंग्रजी इत्यादी




सर्वच विषयांसाठी " **चला हवा येऊ द्या** " हा खेळ उपयुक्त आहे. वर्तुळ व त्याचे भाग, सयाजीराव गायकवाड, माझा तिरंगा माझा अभिमान, द्रौपदी मुर्मू, My Self, Commitment, हृदय, फुफुस इत्यादी ४० पेक्षा जास्त विषय चिठ्यांमध्ये असूनही मी ही बोलू शकतो / शकते हा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला.त्यानंतर याच खेळात आलेल्या चिठ्ठीवर नुसते न बोलता त्या विषयावर लेखन करायचे ही अट घातली. त्यामुळे लेखनाचा सराव झाला. विद्यार्थी माहिती उताऱ्यात विभागून, विरामचिन्हांचा वापर करून लेखन करू लागले. नुसतेच बोलू शकतो असे नाही तर आपणही खूप छान लेखनही करू शकतो याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर होता. विशेष म्हणजे Eyes Work, Hands Work, Commitment, Emotions, Myself, Body Parts and its work इत्यादी २० ते २२ विषयांवर देखील English Writing विद्यार्थी अचूक करू लागले.

"आता बोला ना " हा खेळ English Riddles वर आधारित आहे. Pohe Recipe, Biscuit Factory ची कार्डे क्रमवार लावून ती Recipe सांगणे तसेच Guessing Game ची कार्डे वाचून कोडी सोडविण्यासाठी आधी कोण उत्तर शोधतो याची स्पर्धाच विद्यार्थ्यांमध्ये सुरु झाली. प्रत्येक ओळीचा अर्थ समजून घेऊन कोडी सोडवायला मुले शिकली. सर्वच विद्यार्थी इंग्रजी कोडी वाचून त्यांची उत्तरे शोधण्यात खूपच तरबेज झाली.

"**रॅपिड राउंड** " हा खेळ परीसर अभ्यासाचा पाया पक्का होण्यासाठी उपयुक्त ठरला . या खेळात जवळ जवळ २०० प्रश्नांची जंत्री आहे. "कौन बनेगा करोडपती" म्हणत विद्यार्थी या खेळात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

"कुलूप माझे चावी तुमची" हा खेळ मराठी, इंग्रजी, परीसर अभ्यास चा पाया मजबूत होण्यासाठी, शिकविलेल्या भागाचे दृढीकरण करण्यासाठी उपयुक्त ठरला. यासाठी प्रत्येक विषयाची पत्त्यांची गुहा तयार केली आहे या गुहांमध्ये प्रत्येक घटकांवर छोटे छोटे प्रश्न तयार केले आहेत. "या कुलुपाची चावी मला माहित आहे" असे म्हणत विद्यार्थी या खेळाची मजा लुटतात.


उपक्रमपूर्व विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चिती करण्यात आली होती.पूर्व व पश्चात अध्ययन स्तर निश्चितीमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत कमालीची वाढ झाल्याचे दिसून आले.शाळा सुरु झाली त्यावेळी विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण झाल्यामुळे आत्मविश्वास गमावला होता. उपक्रम पश्चात सर्व विद्यार्थी उत्साही




वाटले. मुख्य म्हणजे अभिव्यक्तीत व शिकवलेल्या ज्ञानाचे दृढीकरण होण्यास वाढ झाली त्यामुळे ताण कमी होऊन १००% समाधान मिळाले.


अभिव्यक्तीसाठी तसेच आत्मविश्वास वाढीसाठी व शिकवलेल्या भागाचे दृढीकरण करण्यासाठी हे सर्व उपक्रम विशेष उपयुक्त ठरले. याचे फलित म्हणजे त्यांच्यातील न्यूनगंड जाऊन आत्मविश्वास निर्माण झाला. शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थी शिकवलेल्या ज्ञानाचे दृढीकरण करू लागले. मराठी,इंग्रजी, परिसर अभ्यास भाग १ व २ या विषयातील प्रत्येक घटकाचे विविध खेळांच्या माध्यमातून हसत - खेळत, कोणतेही दडपण न घेता दृढीकरण होऊ लागले.सन२०२३ मध्ये घेण्यात आलेल्या "आमचा रत्नागिरीचा भास्कराचार्य "व "रत्नागिरी टॅलेंट सर्च (RTS) परीक्षा "या जिल्हास्तरीय स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांनी केंद्रस्तर,बीटस्तर व तालुक्यात विशेष प्राविण्य संपादन केले. **प्रत्येक घटकाचे खेळ, कृती व नाविन्यपूर्ण उपक्रमातून दृढीकरण झाल्यास यातून मिळणारे ज्ञान हे चिरंतन राहते**, या तत्वावर हा नाविन्यपूर्ण उपक्रम आधारित आहे. तसेच या नाविन्यपूर्ण उपक्रमात **कृतीला व स्वयंअध्ययनाला** भरपूर वाव आहे. **अभिव्यक्तीसाठी, विविध स्पर्धापरीक्षा तयारीसाठी**, **वाचन – लेखन व गुणवत्ता वाढीसाठी** हा नाविन्यपूर्ण उपक्रम नक्कीच अतिशय उपयुक्त असल्याची खात्री झाली.

"खेळाल तर शिकाल" या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे **शिक्षक – विद्यार्थी आंतरक्रिया** सहज पणे घडून येऊ लागली. **शिक्षकांच्या शिवाय देखील विद्यार्थी शिकवलेल्या किंवा मिळवलेल्या ज्ञानाचे दृढीकरण** खेळातून सहज करू लागली. विद्यार्थ्यांचे **अभिव्यक्ती कौशल्य, English Reading कौशल्य विकासासाठी पूरक उपक्रमांचे आयोजन** करण्यास आम्ही यशस्वी झालो. **विद्यार्थ्यांची मानसिकता, शैक्षणिक प्रगती, ज्ञानरचनावादी वातावरण समृद्ध** करण्यात "**खेळाल तर शिकाल**" या उपक्रमाचा हातभार लागला याचा मनस्वी खूपच आनंद आहे.



चला करूया भटकंती आता बोला ना कुलूप माझे चावी तुमची स्पर्धा परीक्षेतील यश लिहिते व्हा रत्नागिरी जिल्ह्याची यशोगाथा

YouTube Links -

https://drive.google.com/file/d/13J6Q2RdCFptnjX-J8A8CRMeNB2UZ0_ct/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1x11i0fvHbxyWxG0CY1JRPQaSBtA1jp_W/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1uk2B7j1azHKOKnrDXpC9uObcwihsdHno/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1y4_nPHI3xEiT3MUdGsPRjqoAPsxHwWDr/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1x-85pItYV2WWgikSnByL3fnw1OeA-_-j/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1ytNdDehyaiB80_WevcAucZ7IaJN70LGM/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1xBT5jK7852AK2uPT1IOLQwxvJqAuR2we/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1SYR5vNCxuod1IUH0W1QtkEDPoBmTcWrJ/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1eyRjlxxp541qj3mb-p-caANFMH-M4fdz/view?usp=drive_link

लोकसहभाग आणि विविध उपक्रमातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सागवे कात्रादेवी, ता.राजापूर, जि.रत्नागिरी.


Email ID – katradevis73@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.लक्ष्मण सहदेव घाडीगांवकर


प्रास्ताविक –

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सागवे कात्रादेवी ही एक ग्रामिण भागातील इयत्ता 1 ली ते 4 थी पर्यंतची शाळा आहे. शाळेची इमारत आणि जागा मालकी ग्रामस्थ मालकीची आहे. त्यामुळे शाळेसाठी शासकीय निधी खर्च करता येत नव्हता. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळावे, विद्यार्थ्यांचे शिकणे अधिक सुखकर आणि आनंददायी पध्दतीने झाले पाहिजे. शिक्षणाची सुरुवात प्रेरणादायी वातावरणात झाली पाहिजे यासाठी शाळेचा सर्वांगीण विकास करणे गरजेचे आहे. या विचाराने प्रेरित होऊन लोकसहभागातून शाळा विकास या अभियानाची सुरुवात करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना मोफत दप्तर, वह्या, छत्री, रुमाल पेन अशा प्रकारच्या शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करून पालकांमध्ये शाळेविषयी ओढ निर्माण केली.

वर्ग खोल्यांना प्लास्टर नाही, खिडक्या तुटलेल्या, वर्ग खोल्यांमधील कोबा तुटलेला त्याला खड्डे पडलेले, गळकी इमारत, शाळेला संरक्षण भिंत नाही. पालकांचे शाळेकडील दुर्लक्ष, निष्क्रिय झालेली शाळा व्यवस्थापन समिती, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा ऱ्हास अशा प्रकारची दयनीय परिस्थिती होती. 16 जून 2019 च्या सभेत लोकसहभागातून शाळेचा विकास करायचा असा निर्धार केला. पालक, ग्रामस्थ शाळा व्यवस्थापन समिती यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळा सुधार समितीची स्थापना करण्यात आली. या समितीचे बँकेत स्वतंत्र खाते उघडण्यात आले. याच खात्यावरून पुढील सर्व आर्थिक व्यवहार करण्यात आला. लोकसहभागातून एकूण 15 लाख 17 हजार एवढा निधी जमा करण्यात आला. या निधीतून बालस्नेही सर्व सोयीसुविधांनी परिपूर्ण अशी देखणी शालेय इमारत तयार झाली . विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञान शिक्षण,खेळ यासाठी आवश्यक साहित्य खरेदी करून विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा शाळेकडे ओढा वाढला. शाळेचे अंतरंग आणि बाह्यंग उजळून निघाले. आज शाळेत पाऊल ठेवल्यावर मनाला प्रसन्नता लाभते. विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांमध्ये प्रविष्ट करून ते गुणवत्ता धारक बनले. शाळेचा गुणात्मक दर्जा उंचावला. यामुळे इंग्रजी माध्यमाची सुमारे 20 मुले शाळेत दाखल झाली आणि शाळेचा पट उंचावत गेला. मागील चार वर्षात 37 एवढ्या पटसंख्येवरून 2023-24 मध्ये 56 पटसंख्या अशी सुधारणा होत गेली. हा संपूर्ण प्रेरणादायी शैक्षणिक प्रवास नक्कीच इतरांसाठी प्रेरणादायी आहे.







या कार्यात आलेल्या अडचणी -

मागील चार वर्षापूर्वी शाळेत उपशिक्षक म्हणून बदली झाल्यावर श्री.लक्ष्मण सहदेव घाडीगांवकर यांना मुख्याध्यापक म्हणून अतिरिक्त कार्यभार सांभाळावा लागला. त्यावेळी विद्यार्थी प्रगती आणि शाळेमधील पालक आणि ग्रामस्थांचा सहभाग हे फार मोठे आव्हान होते. शाळेची अवस्था फारशी चांगली नव्हती. विद्यार्थी आणि पालकांना शाळेत यावेसे वाटेल असे वातावरण आवश्यक होते. शालेय व्यवस्थापन पूर्णपणे ढासळले होते. यातून मार्ग काढताना खालीलप्रमाणे अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

- ❖ शालेय वातावरण सकारात्मक होणे आवश्यक होते.
- ❖ ग्रामस्थ आणि पालकांचे शाळेकडे पूर्णपणे लक्ष असणे आवश्यक होते.
- ❖ विद्यार्थ्यांना भाषा आणि गणित यामधील मूलभूत अध्ययन निष्पत्ती अवगत होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे होते.
- ❖ विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे आणि पालकांचे पाल्याच्या प्रगतीकडे लक्ष देण्यासाठी विदयार्थी गैरहजेरी ही फार मोठी समस्या होती.
- ❖ शाळेत पायाभूत सोयी सुविधा निर्माण कराव्यात यासाठी आर्थिक पाठबळ उपलब्ध होत नव्हते. शाळेसाठी देणगी रूपात मदत जमा करणे हे एक फार मोठे आव्हान होते.
- ❖ शाळा व्यवस्थापन समिती गठित केलेली होती परंतु सभांना सदस्य उपस्थिती नगण्य होती.
- ❖ ग्रामिण भागातील शाळा असल्याने शाळा बाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त होते.
- ❖ विद्यार्थी आणि पालक यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून शिक्षण ही लोकचळवळ होण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे गरजेचे होते.

अडचणींवर मात करण्यासाठी केलेले प्रभावी काम -

ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी विद्यार्थ्यांना शाळेत यावेसे वाटेल, शाळेत आल्यावर तो तल्लीन होऊन आनंददायी पध्दतीने अध्ययन करेल असे शैक्षणिक वातावरण शाळेत निर्माण करण्यासाठी खालील पध्दतीने प्रभावी उपायांची अंमलबजावणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांमधील पायाभूत कौशल्य विकास -

बहुसंख्य विद्यार्थ्यांना मराठी वाचन, संभाषण, लेखन आणि गणित विषयात संख्याज्ञान, व संख्यांवरील क्रिया या मधील अपेक्षित अध्ययन निष्पत्ती अवगत नव्हत्या. यासाठी सुरुवातीच्या काळात शाळेत शालेय वेळेपूर्वी एक तास उपचारात्मक अध्यापन यासाठी देण्यात आला. भाषा आणि गणित


विषयाची प्रत्येक विद्यार्थ्याची अध्ययन स्तर निश्चिती केली. त्यानुसार कृती आराखडे तयार केले. त्यानुसार तीन महीने अंमलबजावणी केली. दररोज विद्यार्थ्यांना रंजक,आणि आनंद दायी स्वाध्याय द्यायला सुरुवात केली.विदयार्थी घरी जाऊन स्वतः अभ्यासाला बसू लागले.याचा सकारात्मक परिणाम विद्यार्थी प्रगतीवर दिसू लागला. शाळेत काहीतरी नवीन घडते आहे. याची जाणीव पालकांना व्हायला सुरुवात झाली.

लोकसहभागातून शैक्षणिक साहित्याचे वाटप -

1. पालकांना शाळेपर्यंत आणणे हे फार मोठे काम होते. त्यासाठी एक नावीन्यपूर्ण उपक्रम शाळेमध्ये सुरू केला. समाजातील काही दानशूर व्यक्तींची भेटीगाठी घेऊन त्यांच्याकडून देणगी रूपात शैक्षणिक साहित्य उपलब्ध केले. शाळेमध्ये मोठा कार्यक्रम आयोजित करून मान्यवर प्रतिष्ठित व्यक्ति यांना निमंत्रित केले. पालकांच्या उपस्थितीत शैक्षणिक तसेच शालेय उपयोगी साहित्य विद्यार्थ्यांना वाटप केले. यामध्ये प्रामुख्याने श्री प्रमोद विनायक बने राहणार रत्नागिरी यांचे नांव प्राधान्याने घ्यावे लागेल यांच्या माध्यमातून शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीलाच अर्धा डझन वह्या, छत्री, पेन, रुमाल, दप्तर आदि सर्व साहित्य प्रति विद्यार्थी वाटप केले. सदर कार्यक्रमाला बहुसंख्य पालक तसेच मान्यवर आणि देणगीदार उपस्थित होते. मुख्याध्यापकांनी उपस्थित सर्वांसमोर आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थी आणि शाळा विकासाचे ध्येय प्रभावीपणे मांडले.
2. श्री.प्रमोद बने यांच्यामार्फत दिवाळी सणानिमित्त प्रत्येकाच्या घरात आनंददायी दिवाळी साजरी व्हावी या उद्देशाने अंगणवाडी ते 4 थी मधील प्रत्येक विद्यार्थ्याला 1 किलो मैदा,1 किलो गूळ, 1 किलो रवा, 1 लीटर तेल याप्रमाणे फराळासाठी लागणारे साहित्य शाळेमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात पालक वर्ग उपस्थित होते. अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रत्येक वेळी विद्यार्थी प्रगती आणि शाळेचा सर्वांगीण विकास यावर चर्चा घडवून आणण्यात आली.

3. विद्यार्थ्यांचे वाढदिवस अनोख्या पध्दतीने साजरे करण्यात आले. जे पालक सधन आहेत त्यांच्या गाठी - भेटी घेऊन आपण जर वाढदिवसाची पार्टी न देता त्या खर्चातून शाळेच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असे शैक्षणिक साहित्याचे वाटप केले तर ते अधिक स्मरणात राहील. हा विचार त्यांना पटवून दिला. याचा खूपच चांगला परिणाम दिसून आला. असंख्य पालकांनी आपल्या पाल्यांचे वाढदिवस या पध्दतीने साजरे केले.

अशा प्रकारच्या उपक्रमांचा खूप चांगला परिणाम पालक आणि ग्रामस्थ यांना शाळेविषयी आवड आणि गोडी वाढविण्यासाठी झाला.






अधिक माहितीसाठी येथे क्लिक करा




अधिक माहितीसाठी क्लिक करा




❖ शाळेसाठी एक दिवस उपक्रम

1. गावातील प्रत्येकाने एक दिवस शाळेच्या कार्यात हातभार लावावा आणि ग्रामस्थ, पालक यांच्या मनात शाळेविषयी आपुलकी वाढावी यासाठी या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. याची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात आली.



- सुरुवातीला ग्रामस्थ सहविचार सभेत गावातील कुशल कारागीर यांची माहिती गोळा केली.
- शाळेच्या गरजा निश्चित केल्या. त्याप्रमाणे कोणाची मदत घेता येईल हे ठरवून शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून संबंधितांना भेटी दिल्या. त्यांच्या वेळेनुसार योग्य कामासाठी त्यांची मोफत मदत घेण्यात आली. यामध्ये प्लास्टर करणारे कारागीर यांच्याकडून भिंतींना प्लास्टर , लादी बसविण्याचे कसब असणाऱ्या कारागिरांकडून संपूर्ण शाळेत लादी बसवून घेतली.





- गायन, वादन, विविध कलाकौशल्य असणाऱ्या व्यक्तींना प्रत्यक्ष शाळेत बोलावून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची संधी उपलब्ध करून दिली.
- या उपक्रमा अंतर्गत प्रत्येक मोठ्या सुट्टी नंतर शाळा सुरू होण्यापूर्वी शालेय परिसर स्वच्छता, शाळेच्या परिसरातील बागकाम, बांधकामे यासारखी विविध कामे श्रमदानाच्या माध्यमातून पूर्ण केली.
- शिक्षक गैरहजेरी मध्ये पालकांना विद्यार्थ्यांसमोर अध्यापनाची संधी उपलब्ध करून दिली.



दर शनिवारी शाळा सकाळ सत्रात भरते. मुले शाळेत उशिरा यायची. काही मुले शाळेत येण्यास टाळाटाळ करायची. विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे ओझे कमी करून त्यांना शाळेत येण्यासाठी आनंद वाटला पाहिजे असे काही तरी करावे. यावर विचार मंथन सुरू असताना मजेचा शनिवार हा उपक्रम दर शनिवारी राबवायचा असे ठरविण्यात आले. त्यानुसार दर शनिवारी कोणते उपक्रम घ्यायचे याचे नियोजन करून शाळेत मजेचा शनिवार हा नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला. यासाठी लोकसहभाग घेऊन हा उपक्रम समाजाभिमुख केला.

कार्यपध्दती –

- शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक-पालक संघ, शाळा सुधार समिती या आदि समित्यांच्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सभेत या नावीन्यपूर्ण उपक्रमाची माहिती देवून दर शनिवारी घेण्यात येणाऱ्या अध्यापन नियोजनाची माहिती दिली.
- गावातील स्थानिक कलाकाराला शाळेत बोलावून त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली.
- कला – कार्यानुभव, कौशल्य शा. शि. अंतर्गत विविध उपक्रमांची योग्य पध्दतीने मांडणी करून दर शनिवारी नियोजनानुसार कार्यवाही केली.
- गप्पा, गाणी, गोष्टी, चित्रकला, नृत्य, नाट्य आदि उपक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून त्यांच्या सुप्त गुणांना चालना दिली.



❖ विद्यार्थी कट्टा एक अनोखा उपक्रम


ग्रामस्थ श्री.नंदूकाका कुळकर्णी यांच्या संकल्पनेतून आणि प्रेरणेतून विद्यार्थी कट्टा हा उपक्रम शाळेत 26 जानेवारी 2023 रोजी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सुरू करण्यात आला.


नवोपक्रमाची उद्दिष्टे -

- विद्यार्थी दशेपासूनच विद्यार्थ्यांना स्वयंलेखनाची सवय लावणे.
- मुद्देसूद लेखनाची सवय लावण्यासाठी ठोस उपाययोजना करणे.
- विद्यार्थी शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी वाचनाची सवय लावणे.
- आपले मत व्यक्त करण्याचे धाडस मुलांमध्ये निर्माण करणे.
- शुद्ध आणि वळणदार लेखन करण्यासाठी आवश्यक उपाय योजना आखणे .
- रोजनिशी लेखनाची सवय लावणे.
- लेखन कौशल्य सुधारण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणे.

कार्यपध्दती -

- विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य सुधारण्यासाठी चित्रवर्णन , माहिती सांगा, तर काय होईल ते सांगा, गप्पा गोष्टी या सारख्या भाषण संभाषण कौशल्य सुधारणाऱ्या उपक्रमांची आखणी केली.
- वाचनाची पुस्तके सहज उपलब्ध करून दिली. वर्गातच त्यांची सुयोग्य पध्दतीने मांडणी केली.
- सुरुवातील चित्र – गोष्टी, मोठ्या फॉन्ट मधील पुस्तके, रंगीत चित्रे असलेली पुस्तके अशी पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून दिली.
- दुपारच्या सुट्टीत, शाळेत लवकर आल्यावर, रिकाम्या वेळी पुस्तके वाचन करण्याची सवय लावली.
- जास्तीत जास्त पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्याला महिन्याच्या शेवटी गौरविण्यात आले. त्यामुळे पुस्तके वाचनाची सवय लागली.
- दर शनिवारी विद्यार्थ्यांसाठी अचानक लेखनासाठी विषय देवून स्वयंलेखन करून घेतले.
- उत्कृष्ट लेखन नमुने विद्यार्थी कट्टा बोर्डवर लावले, hats app ग्रुपच्या माध्यमातून लेखनाला प्रसिध्दी दिली.
- उत्कृष्ट लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.







शाळा सुधार समितीची स्थापना -

शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा स्तरावर सतत कार्यरत असणारी शाळा सुधार समितीची स्थापना करावी. या समितीच्या नावे बँकेत खाते उघडून शाळा सुधार उपक्रमांतर्गत जमा होणारा सर्व निधी जमा करून तो नियोजनबद्ध पध्दतीने सर्वांच्या सहमतीने योग्य त्या बाबींवर खर्च करावा असे एका सभेमध्ये ठरविण्यात आले. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात आली. विविध नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून होणारी विद्यार्थी प्रगती समाजासमोर येत होती. विद्यार्थी अधिक बोलके आणि उत्साही झाल्याचे दिसून येत होते. श्री प्रमोद विनायक बने यांनी 430000/- एवढा निधी खात्यावर जमा करून लोकसहभागाचा एक वेगळा आदर्श समाजासमोर घालून दिला. हळूहळू शाळेच्या सर्वांगीण विकासात अनेक दानशूर व्यक्तींनी मदत करायला सुरुवात केली. सन 2023 मध्ये शाळेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून जानेवारी आणि फेब्रुवारी या दोन महिन्यात 650000/- एवढा निधी रोख स्वरूपात जमा झाला. काहींनी वस्तुरूपात शाळेला मदत केली . यात शालेय रंगमंच अंदाजे खर्च 100000/- शालेय प्रवेशद्वार अंदाजे खर्च 200000/- चप्पल स्टँड अंदाजे खर्च 10000/- याचा समावेश आहे.

दृश्य परिणाम-

- शाळा सुधार समितीने एकूण ११४९२४७/- एवढ्या रोख निधीतून नवीन वर्गखोली बांधकाम, शालेय भिंतींना बालस्नेही रंगरंगोटी, स्वच्छतागृह आणि किचनशेड यात पाणी व्यवस्था आणि सुशोभीकरण, अद्ययावत हात धुण्याची सोय वर्गखोल्यांना प्लास्टर आणि लादी बसविणे, प्रवेशद्वार आकर्षक रंगसजावट इत्यादि कामे करून घेण्यात आली.
- शाळेची स्वत:ची 350000/- रुपयाची संचित ठेव आहे. ज्याच्या व्याजातून विद्यार्थी बक्षीस योजना आणि गरीब विद्यार्थी फंड यासाठी निधी उपलब्ध केला जातो.
- https://www.youtube.com/watch?v=fBW4FS82ik0 अधिक माहितीसाठी या लिंकचा वापर करा.

पटसंख्येचा वाढता आलेख -

वरील सर्व पातळीवरील सुधारणांचा खूप चांगला परिणाम विद्यार्थी पटसंख्येवर झाला. मागील दोन वर्षात खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून एकूण 20 विद्यार्थ्यांनी या जि. प. मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतला. विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये चमकू लागले. **पुराव्यासाठी येथे क्लिक करा** आणि पटसंख्येने भरारी घेतली.

- विविध शाळाबाह्य परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.
- शाळेत प्रसन्न आणि आनंदी वातावरण निर्माण झाले आहे.
- आज विद्यार्थी शाळेत रमतात.
- दररोज सकाळी मुले न चुकता शालेय वेळेपूर्वीच हजर असतात.
- लोकसहभागातून विविध सहशालेय उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला आहे.
- विद्यार्थी कट्टा या उपक्रमामुळे विद्यार्थी स्वत: अभिव्यक्त व्हायला लागले, विद्यार्थी मुद्देसूद लेखन करत आहेत.
- लोकसहभागाच्या माध्यमातून अनेक क्षेत्रभेटी घेण्यात आल्या त्यामुळे सर्जनशीलतेला चालना मिळाली आहे.
- लोकसहभागातून स्नेहभोजन यामुळे पोषण आहार योजनेला पुष्टी मिळाली आहे.

समारोप –

अशा प्रकारे मुख्याध्यापक आणि सर्व सहकारी शिक्षक यांनी आपले उत्तम व्यवस्थापन कौशल्य, उत्कृष्ठ समाज संपर्क आणि नेतृत्त्व याच्या जोरावर शिक्षण ही एक लोकचळवळ निर्माण करून समाजाचा शिक्षण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला. आदर्शवत शैक्षणिक उठाव करून शाळा सर्वांगसुंदर बनविली. विद्यार्थी आणि पालकांना शाळेत यायला आनंद वाटेल आणि ग्रामस्थांना अभिमान वाटेल अशी शाळा आणि शालेय वातावरण निर्माण केले आहे. या सर्वांचा एकत्रित परिणाम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास तसेच गुणवत्तेवर झाला आहे. आज शाळेच्या शेजारील गावातील अनेक मुले या शाळेत दाखल होत आहेत. या सर्वाचा परिपाक म्हणून सन 2023 मध्ये या शाळेच्या मुख्याध्यापकाचा कार्यभार सांभाळणारे श्री.लक्ष्मण सहदेव घाडीगांवकर यांना महाराष्ट्र शासनाचा क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सन 2022-23 ने गौरविण्यात आले. आहे.

☞ येथे क्लिक करा





“ आनंददायी शिक्षण ”

शाळेचे नाव – जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, पांढरेवाडी, ता.जत, जि.सांगली

Email ID - zppspandharewadi123@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री. रमेश शिवाजी पाटील

सहशिक्षक - श्री.नारायण नानाराव शिंदे


प्रास्ताविक –

शाळेचे ब्रीद :- एकच ध्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

निसर्गाच्या वनराईत नटलेली शाळा - जि.प.उच्च प्राथमिक मराठी शाळा पांढरेवाडी ता. जत जि. सांगली 'फळाफुलांचा मळा पाहिजे, आनंदाचा सोहळा पाहिजे, गावात एक वेळ देऊळ, नसले तरी चालेल,पण एक आदर्श शाळा पाहिजे.' अशाच एका आनंददायी शाळेची यशोगाथा तुमच्यापुढे सादर करत आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आनंददायी शिक्षणाची गरज आहे.

मूलभूत गरजांपैकी शिक्षण एक मूलभूत गरज आहे. २१ व्या शतकात तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. शैक्षणिक सत्राची सुरुवातच आनंददायी शिक्षणानी करायचे ठरवले. मुले शाळेत १०० % आली पाहिजेत, शाळेत टिकली पाहिजे आणि ते शिकली पाहिजेत. ही गोष्ट मनाला स्वस्थ बसू देत नव्हती. आनंददायी शिक्षण सुरू करण्याचे आव्हान होते. यासाठी काय करावे ? कोणाची मदत घ्यावी ? असे अनेक प्रश्न मनात येत होते. अनेक प्रश्नांचा गुंता होता. या प्रतिकूल परिस्थितीत उत्तर शोधण्यासाठी मनात भावनांचा कल्लोळ दाटला होता. यामधूनच आमच्यातील शक्तिस्थाने शोधणे सुरू झाले.

जि.प.उच्च प्राथमिक मराठी शाळा पांढरेवाडी ता.जत. जि. सांगली येथील शिक्षकवृंद व पालकांशी संवाद साधला. संभाषणाच्या द्वारे पालकांच्या मनातील शिक्षणविषयक तळमळ जाणवत होती. दुर्गम भागात असल्यामुळे आपली मुलं या शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर जाऊ नये ही भीती त्यांच्या मनात सलत होती. या सर्व गोष्टींचा सारासार विचार करून मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समिती, माता पालक गट, शिक्षक पालक गट तसेच पालकांना विश्वासात घेऊन, आनंददायी शिक्षण सुरू करायचे ठरविले. व आमचे मार्गक्रमण सुरू झाले.



उद्दिष्टे:-

१) १००% मुलांपर्यंत आनंददायी शिक्षण पोहचवणे व त्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवणे.

२) पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्या माध्यमातून शिक्षणाची गती वाढवणे.

३) विविध शैक्षणिक साधने, खेळ व आनंददायी शिक्षण चर्चेच्या माध्यमातून विद्यार्थांना सक्षम करणे.

४) आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सक्षम करून स्वयंअध्ययनाची सवय लावणे.


५) विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून देणे.

अशी उद्दिष्टे ठरवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.

अंमलबजावणी –

एखादी व्यक्ती समाजातील इतर घटकांशी आंतरक्रिया किती यशस्वीरीत्या साधू शकते हे ओळखून प्रथम मी ठरवले माझ्याकडे नियोजन व पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. यासाठी शिक्षकवृंद, शालेय व्य. समिती, माता पालक गट, शिक्षक पालक गट तसेच पालकांना विश्वासात घेऊन, आनंददायी शिक्षण सुरू करायचे ठरविले व नियोजन केले. माझे सर्व सहकारी शिक्षक श्री.साहेब बोईनवाड, श्री.विलास चौधरी, श्री.नारायण शिंदे, श्रीम. बबिता बिरादार, श्रीम.अनुराधा गोदाजी व पालकांसोबत चर्चेनंतर उपक्रमाची सुरुवात केल्या नंतर विद्यार्थी प्रतिसाद हा खुपच सकारात्मक जाणवला. विद्यार्थ्यांच्या कृतीयुक्त सहभागामुळे विद्यार्थी सक्रियपणे आनंददायी शिक्षणचा आनंद घेवु लागले. शैक्षणिक साहित्याचा वापर, विविध खेळ, संवाद, अभिनय, गायन, विविध कलांचे सादरीकरण इत्यादी.. यामुळे विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण अनुभवता आले. सर्व कृतीतून विद्यार्थी बोलते झाले. लहान लहान संभाषण, त्यातील संवाद यामुळे विद्यार्थी वाक्य सुस्पष्ट, योग्य उच्चारासह बोलु लागले. घरातील व्यक्ती सोबत संवाद साधु लागले. सरावाने त्यात सहजता येत गेली. विद्यार्थ्यांना आत्मविश्वास आला. विद्यार्थ्यांचा शब्द संग्रह वाढला. भाषेची समज वाढली, वाक्याचा अर्थबोध विद्यार्थ्यांना होवु लागला. मुलांना ज्या ठिकाणी अडचणी येत होत्या अशा वेळेस त्यांचा पुन्हा पुन्हा सराव घेवुन, प्रत्येक विद्यार्थी हा उपक्रमात सहभागी कसे होतील यासाठी आम्ही सगळे सतत प्रयत्न करत होतो.

"ही आवडते मज मनापासुन शाळा लाविते लळा जसा माऊली बाळा" या उक्तीप्रमाणे लोकसहभाग, अनुदान व शिक्षक सहभागातुन शाळेच्या भिंतीची आकर्षक व दर्जेदार रंगरंगोटी करण्यात आली. विद्यार्थ्यांचे भावविश्व या भिंतीवर रेखाटले गेले. जिवंत व बोलके वातावरण शाळेमध्ये निर्माण झाले व विद्यार्थी म्हणू लागले



सर.. ह्या भिंती आमच्याशी बोलत आहेत. खरंच अगदी स्वप्नाहुन ही सुंदर शाळा सजली. विद्यार्थी शाळेत रममाण झाले.


वाढदिवस विद्यार्थांच्या आयुष्यातील सर्वात महत्वाचा दिवस. म्हणून शाळेने विद्यार्थांचा वाढदिवस आई-वडील व कुटुंबासह शाळेत केक,फुगे लाऊन साजरा करण्याचा उपक्रम सुरु केला. सदरील उपक्रमात ज्या विद्यार्थाचा वाढदिवस असेल त्या विद्यार्थांच्या पालकांनी पुस्तक, वस्तू स्वरुपात एखादी वस्तू, भौतीक सुविधात मदत म्हणून शाळेला दिल्या व शाळेप्रती सामाजिक बांधिलकी जपली. या उपक्रमामुळे शाळेला पालक व गावकऱ्याकडून खूप मदत झाली.

स्पर्धेच्या युगात विद्यार्थी शिकला व टिकला पाहिजे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे या उद्देशाने शाळेने कौन बनेगा ब्रीलीयंट या उपक्रमाद्वारे शाळेतील गुणवान व बुद्धिमान विद्यार्थी निवडले. त्यांना या उपक्रमाद्वारे एक व्यासपीठ मिळवून दिले. मुलांना स्पर्धा व जिंकणे या गोष्टीचा परिचय शालेय जीवनात करून दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थी साहजिकच हुशार बनण्यासाठी अधिक परिश्रम घेऊ लागले व गुणवान विद्यार्थी तयार झाले. मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी असे आनंददायी उपक्रम उपयुक्त ठरले.

मुलांपर्यंत आनंददायी शिक्षण पोहोचले, पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्या माध्यमातून शिक्षणाची गती वाढली. विविध शैक्षणिक साधने, खेळ व आनंददायी शिक्षण चर्चेच्या माध्यमातून विद्यार्थां सक्षम होऊ लागले. मुलांना स्वयंअध्ययनाची सवय लागली. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाले.

फलनिष्पती –

आनंददायी शिक्षणात मुलांची आवड व क्षमतानूसार काही शैक्षणिक खेळांच्या मदतीने मुले सहज सुलभ अभ्यास करू लागली. सोबतीला काही स्वनिर्मित शैक्षणिक साहित्याचे झेरॉक्स, फ्लॅश कार्ड, इयत्तावार अभ्यासाच्या झेरॉक्स, तसेच स्वनिर्मित व्हिडीओ यांच्या माध्यमातून अभ्यास पूर्ण करण्यास मदत झाली. तसेच सोबतीला शासनाचा टिलिमिली कार्यक्रम, गोष्टींचा शनिवार, किशोर मासिक पत्रक, दिक्षा ॲपचा वापर अशा अनेक साहित्यांची सोबत मिळाली. उद्भवलेल्या कठीण परिस्थितीत सहज सुलभ आनंददायी शिक्षण पद्धतीने मुलांचा जास्तीत जास्त सहभाग वाढला. त्यांच्या विचारांना व अभिव्यक्तिस चालना मिळाली. चित्रकला, कला, कार्यानुभव,शारीरिक शिक्षण इत्यादी विषयात मुले आनंदाने सहभागी होऊन विविध स्पर्धांमध्ये मुले यश संपादन करून व इतरांना प्रेरीत करू लागले.



समारोप -

आनंददायी शिक्षण या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे शिक्षण घेता आले. आनंददायी शिक्षण अभ्यासाविषयी आवडनिर्माण झाली. त्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकून ठेवता आले. शिक्षणातील उत्साह टिकून ठेवण्यात यश आले. वेळोवेळी विद्यार्थ्यांना बक्षीसरुपी थापही दिली. त्यामुळे आनंददायी शिक्षणाचे ध्येय साध्य होत आहे. आज हे सर्व बघून खूपच आनंद होत आहे. ठरवलेले ध्येय साध्य झाले. पालक, विद्यार्थी, शिक्षक यांच्यात सुसंवाद व सुसूत्रता असेल तर प्रत्येक अडचणींवर आपण मात करू शकतो.

आनंददायी शिक्षणामुळे 'मुले शिकली आणि शाळा हसली'. शाळेच्या या सर्व अविस्मरणीय प्रवासामध्ये श्री.मोहन गायकवाड साहेब प्रा.शिक्षणाधिकारी सांगली, डॉ. रमेश होसकोटी साहेब जि.शि.व.प्र. संस्था सांगली, श्री.अनसर शेख साहेब, गटशिक्षणाधिकारी, प.स.जत, श्री.गवारी साहेब, शिक्षण वि.अ, श्री.मुल्ला साहेब, विषय तज्ञ, श्री.मनोज खोकले साहेब तसेच शाळेतील शिक्षक वृंद, शालेय व्यवस्थापन समिती व पालक यांचे उत्तम सहकार्य व मार्गदर्शन मिळाले.

संदर्भ साहित्य : फोटो व व्हिडिओ -

















Video link - https://youtu.be/huYfgivSH9I?si=xX4abRQylesjE84A

https://youtu.be/meZ1UhVnIf4?si=ZQ9ZKNqN7htEdzMO

https://youtu.be/zcCNtOB87S0?si=cPXHfzScbx9DYYJ4

क्रीडा क्षेत्रातील यश

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिंचणी,पोस्ट मोरावळे,ता.जि.सातारा.

Email ID- chinchanischool@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - कमल कुमार गायकवाड

प्रास्ताविक-

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचणी या शाळेच्या यशोगाथेमध्ये गावाचा महत्वाचा वाटा आहे लोकसहभागातून शालेय भौतिक सुविधा 15व्या वित्त आयोगातून शालेय सुविधा यांची पूर्तता केली आहे. इमारतीच्या पाच खोल्या आहेत, प्रशस्त व्हरांडा, परसबाग यामध्ये औषधी वनस्पती भाजीपाला फळांची झाडे यांचा समावेश आहे. ग्रामपंचायतने दोन स्मार्ट टीव्ही मुलांना ई लर्निंग साठी उपलब्ध करून दिलेले आहेत विद्यार्थी विकास हाच आमचा ध्यास यासाठी सर्वतोपरी सतत प्रयत्न करत असतो.

पूर्वीच्या अडचणी-


क्रीडा स्पर्धेमध्ये मुलांनी सहभागी व्हायचे असते याबाबत पालकांमध्ये जागृती नव्हती. एखाद्या स्पर्धेमध्ये सहभागी केले तरी त्या स्पर्धेबाबत जास्त माहिती नव्हती. मुलांना कोणता आहार द्यावा याबाबतच्या जागृती नव्हती शाळेत पण मुलांचा सराव कमी पडत होता.

उपाययोजना-

पालक सभा घेऊन पालकांना क्रीडा क्षेत्रामध्ये यशस्वी खेळाडूंच्या बरोबर कॉन्फरन्स कॉलवर बोलण्याची संधी उपलब्ध करून दिली . युट्युब वरचे व्हिडिओ दाखविले, दिवसभरात आहार काय घ्यावा याविषयी मार्गदर्शन केले. वेळ लावून पळण्याचा सराव घेतला .शाळेत सकाळी व संध्याकाळी दोन वेळा सराव घेतला. पालकांनी स्वतः पाल्याला सोबत घेऊन पळण्याचा सराव घेतला .

फलनिष्पत्ती-


सन 2023-2024 या शैक्षणिक वर्षात कै. यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा स्पर्धाअंतर्गत वैयक्तिक क्रीडा प्रकार धावणे यामध्ये बीट स्तरावर , प्रेम विजय पवार इयत्ता चौथी 600 मीटर धावणे, या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. ज्योती लक्ष्मण साबळे इयत्ता पाचवी 400 मीटर धावणे, प्रथम



क्रमांक मिळविला तालुका स्तर दोनशे मीटर धावणे, ज्योती लक्ष्मण साबळे इयत्ता पाचवी प्रथम क्रमांक मिळविला अशा प्रकारे क्रीडा स्पर्धांमध्ये मुलांना यश प्राप्त झाले.

मुलांना व्यायामाची सवय लागली, योग्य आहार घेण्याची माहिती झाली . सातत्याने कोणतीही गोष्ट सहज प्राप्त होते हे समजले. मुलांमध्ये स्पर्धाबाबत गोडी वाढली ,त्यातून ते अधिक सराव करू लागले.





स्व. यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा स्पर्धा सन २०२३-२४

कण्हेर बीट

प्रमाणपत्र

कुमार/कुमारी/ प्रेम विजय पवार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा

चिंचणी यानें / हीने स्व. यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा स्पर्धा बीट स्तर स्पर्धेतील लहान / मोठ्या गटात

६०० मी. धावणे क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

दिनांक :- १०/१०/२०२३

सौ. जयश्री शिंगाडे
शिक्षण विस्तार अधिकारी, कण्हेर बीट

सातारा जिल्हा परिषद, सातारा

स्व. यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा स्पर्धा सन २०२३-२४

कण्हेर बीट

प्रमाणपत्र


कुमार/कुमारी/ ज्योती लक्ष्मण साबळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा

चिंचणी यानें / हीने स्व. यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा स्पर्धा बीट स्तर स्पर्धेतील लहान / मोठ्या गटात

१०० मी. धावणे क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

दिनांक :- १०/१०/२०२३

सौ. जयश्री शिंगाडे
शिक्षण विस्तार अधिकारी, कण्हेर बीट



सातारा जिल्हा परिषद, सातारा

पंचायत समिती, शिक्षण विभाग, सातारा

स्व. यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा स्पर्धा सन २०२३-२४

प्रमाणपत्र

कुमार/कुमारी ज्योती लक्ष्मण साबळे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा

चिंचणी यानें / हीने स्व. यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा स्पर्धेतील लहान / मोठ्या गटात २०० मीटर धावणे

क्रीडा प्रकारात प्रथम / द्वितीय / तृतीय क्रमांक मिळविल्याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

स्थळ : जि.प. शाळा, कोडोली, सातारा. । दिनांक :- २६ व २७ ऑक्टोबर २०२३

रविंद्र खंदारे
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती,सातारा

सतीश बुद्धे
गट विकास अधिकारी (वर्ग १)
पंचायत समिती, सातारा

सामाजिक भावनात्मक शिक्षणासाठीचे प्रयत्न - आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन कार्यक्रम

पूर्वीच्या अडचणी -


आत्ताचे असाक्षर स्त्री व पुरुष जेव्हा लहान होते त्यावेळी एकत्रित कुटुंब पद्धती होती. कितीतरी मुलींना लहान भावंडे सांभाळण्यासाठी घरीच ठेवले जायचे कधी शाळेत जाता आले नाही, कितीतरी मुलांना वडील वारल्यामुळे खूप लवकर कुटुंब सांभाळण्याची जबाबदारी आली त्यामुळे शाळेत जाऊन शिकता आले नाही. अशी शिक्षण घेण्याची अपुरी इच्छा असलेल्या पालकांनी आपल्या मुलांना शिक्षण देऊन शिक्षण घेण्याची इच्छा पूर्ण केली.

उपाययोजना -

सन 2023 24 या शैक्षणिक वर्षात शासनाने एक सप्टेंबर 2023 रोजी गावातील साक्षर लोकांची यादी निश्चित करण्याच्या सूचनेप्रमाणे यादी तयार करण्यात आली. 8 सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून सर्व असाक्षरांना एकत्र आणून सरपंच यांच्या समवेत आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे उद्घाटन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचणी या ज्ञान मंदिरात झाले. त्याची काही क्षणी चित्रे काढण्यात आली त्या फोटोची महाराष्ट्र शासनाने दखल घेतली. शासन आदेशाप्रमाणे स्वयंसेवक नेमले. आता शिक्षण घेणे का गरजेचे आहे याविषयी माहिती दिली. दैनंदिन व्यवहारात असाक्षरतेमुळे फसवणूक होते आपण असाक्षर असल्यामुळे या गोष्टीला बळी पडतो याची माहिती दिली. तुमच्याकडे वेळ आहे तो सत्कारणी लावण्यासाठी लोकांना प्रवृत्त केले. विविध आनंदाची खेळ, गाणी घेण्यात आली, त्यांची शिकण्याची सुरुवात आनंददायी पद्धतीने केली.

फलनिष्पत्ती -


आठ सप्टेंबर 2023 रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाच्या निमित्ताने असाक्षर लोकांना एकत्र आणून नवसाक्षर कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. लोकांच्या याद्या निश्चित केल्या ज्या गोष्टीत आनंद वाटेल ती गाणी गोष्टी उखाणे खेळ घेऊन कार्यक्रमाची सुरुवात आनंददायी पद्धतीने केली .



वृद्धापकाळात शिक्षणाची अतृप्त राहिलेली इच्छा हातात पाठीवर खडू घेतल्यानंतर पूर्ण झाल्याचे समाधान स्मित हास्य त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते. गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, गावातील तरुण मंडळ, महिला मंडळ यांनी हे काम करण्याचे तयारी दाखवली उद्घाटनाच्या छायाचित्राचे कौतुक महाराष्ट्र शासनाने केले. सकाळ, ऐक्य, दैनिक पुढारी, लोकमत, प्रभात कृती संगम, मुक्तागिरी, आंतरराष्ट्रीय वर्तमानपत्र, टाइम्स ऑफ इंडिया यांनी दखल घेतली यामुळे सर्व गाव या कार्यक्रमात जोमाने उतरले विविध वर्तमानपत्राच्या फोटोचा मोठा फलक करून हौसाबाई मस्कर यांचा फोटो गावाच्या कमानी शेजारी लावण्यात आला.

समारोप -

शासनाने कार्यक्रमाची रुपरेषा परिपत्रकातून निश्चित करून दिल्यानंतर शाळेतील शिक्षक, सरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ,उपाध्यक्ष यांचे सहकार्य व स्वयंसेवकांच्या मदतीने आजी-आजोबांच्या नातवांच्या सहकार्यातून हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याचे नियोजन करण्यात आले. 8 सप्टेंबर 2023 च्या छायाचित्राचे महाराष्ट्र शासनाने केलेले कौतुक विविध वर्तमानपत्रांनी घेतलेले नोंद यातून लोकांची जबाबदारी वाढली त्यातून अधिक जाणीव जागृती झाली व हा कार्यक्रम यशस्वीरिता पार पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले. सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन देण्यात आले लोकांना शिक्षणाची गोडी लागली व शिक्षणाचे महत्त्व सुद्धा समजले.



प्रेरणादायी छायाचित्रात चिंचणीच्या आजी

नव भारत साक्षरता कार्यक्रम : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून दखल; प्रशंसा

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : जागतिक साक्षरता दिनी पहिल्यांदाच शाळेत जाऊन अक्षरे गिरवणाऱ्या ७६ वर्षीय बबई रामचंद्र म्हसकर या अशिक्षित महिलेच्या छायाचित्राची केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दखल घेतली आहे. केंद्रीय शिक्षण सचिव संजय कुमार अवर्णनीय व प्रेरणादायी अशा शब्दात प्रशंसा केली आहे, तर मंत्रालयाने त्यांचा फोटो 'अद्वितीय आनंद का अनुभव!' असे शीर्षक देऊन तपशीलासह ट्विट केला आहे.

देशभरात मागील वर्षापासून नव भारत साक्षरता अभियान 'सर्वांसाठी शिक्षण ' या नावाने सुरू झाले आहे. महाराष्ट्रात त्याची सुरुवात ८ सप्टेंबर रोजी जागतिक साक्षरता दिनी करण्यात आली. पंधरा वर्षे व त्याहून अधिक वयाच्या निरक्षरांच्या साक्षरतेसाठी सन २०२७ पर्यंत कालबद्ध कार्यक्रम केंद्र शासनाने राज्यांच्या मदतीने राबवणे सुरू केले आहे.


राज्यातील उपक्रमाच्या प्रारंभाची छायाचित्रे व तपशील योजना संचालनालयाने केंद्र शासनास सादर केली होती. सातारा येथील सामाजिक कार्यकर्ते या महिलेचे साक्षरता वर्गातील पहिल्या दिवसाचे छायाचित्र योजना उपसंचालक राजेश क्षीरसागर यांना पाठवले. त्यांनी ते केंद्रीय मंत्रालयाला पाठवले होते. सातारा जिल्ह्यातील ७६ वर्षीय बबई रामचंद्र म्हसकर या साक्षरता वर्गात सहभागी होऊन त्यांनी पहिल्या दिवशी काही अक्षरे व अंक गिरवले. आपणास लिहिता आल्याचा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद अवर्णनीय असाच होता.

येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत अभियानाच्या पहिल्या दिवशीच नव भारत साक्षरता अभियानात सहभागी झाल्या.त्यांना असाक्षरतेतून साक्षरतेचे धडे देण्यासाठी जिल्हा प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका कमल गायकवाड, शिक्षक माधवी ढवळे, स्वाती लकडे यासह विद्यार्थी वर्ग व स्वयंसेवक सहकार्य करीत आहेत.

सामाजिक कार्यकर्ते मोहन जगताप यांनी त्यांची भावमुद्रा कॅमेऱ्यात टिपली आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे अवरसचिव प्रदीप हेडाऊ यांनीही या प्रेरणादायी प्रसंगाची व छायाचित्राची प्रशंसा केली आहे.

राज्यात १ कोटी ६३ लाख निरक्षर

केंद्र शासनाने शाळा हे एकक ठरवून स्वयंसेवकांच्या मदतीने प्रौढ निरीक्षणांना साक्षर करण्यासाठी नवभारत साक्षरता कार्यक्रम सुरु केला आहे. महाराष्ट्रात सन २०११ च्या जनगणनेनुसार १ कोटी ६३ लाख निरक्षर आहेत. चालू वर्षी राज्याला मागील वर्षीच्या उद्दिष्टासह बारा लाख चाळीस हजार निरक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट मिळाले आहे. याच्या सविस्तर सूचना योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिल्या आहेत. त्यानुसार राज्यभर गावोगावी साक्षरतेचे वर्ग कमी-अधिक संख्येने सुरु झाले आहेत.



गरिबीमुळे शिक्षणापासून वंचित!

बबई म्हस्कर यांचा जन्म १९४५ ला झाला. दारिद्र्यामुळे शिक्षण घेता आले नाही. सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील चिंचणी (महाराष्ट्र राज्य) हे ८०० लोकसंख्या असलेले कन्हेर धरणामुळे विस्थापित झालेले गाव आहे. या पुनर्वसित गावात घरोघरी प्रत्येक जण शासकीय सेवेत उच्चपदांवर शिपाई ते तहसीलदार असे लोक दिसून येतात. गावचे शैक्षणिक, सहकार व क्रीडा,आर्थिक व राजकीय क्षेत्रात योगदान मोठे आहे. तरुणांच्या मोठेपणाने भारावून गेलेल्या बबई आज्जी या वयात आजही शिक्षण घेण्यास आतुर आहेत.


जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिंचणी
ता.जि.सातारा
देशभरात नवभारत साक्षरता अभियान सर्वांसाठी शिक्षण अभियानातील चित्रकार मोहन जगताप यांनी टिपलेल्या
चिंचणी येथील बबई रामचंद्र म्हसकर यांच्या छायाचित्राची महाराष्ट्र शासन व भारत सरकारच्या केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून दखल.
विविध वृत्तपत्रांनी वृत्ताची दखल घेतली.
State's lessons place slate, chalk in elders' hands for first time
TIMES Special
सातारच्या प्रेरणादायी छायाचित्राची केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून दखल
चिंचणीच्या आजीबाई होताहेत साक्षर
७६ वर्षीय बबई म्हसकर यांचं होतंय कौतुक; केंद्र, राज्यानेही घेतली दखल
* श्री वरदायिनीमाता तरुण मंडळ, चिंचणी * ग्रामस्थ व ग्रामपंचायत, चिंचणी, * शाळा व्यवस्थापन समिती, चिंचणी

केळवली शाळेची कलाक्षेत्रातील यशोगाथा

शाळेचे नाव – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केळवली, ता.जि.सातारा.

Email ID – zpschoolkelwali7@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.सुदाम मारुती चव्हाण

सहशिक्षक – श्री.सुरेंद्र सुभाष अवसरे

केळवली गाव जिल्ह्याच्या ठिकाणापासून ३५ किलोमीटर अंतरावर वसलेलं टुमदार गाव, निसर्गाचा भारदस्त वारसा लाभलेलं, निसर्गाच्या कुशीत वसलेलं, एका उंच डोंगरावर स्थानापन्न झालेलं गाव, दुर्गम दुर्लक्षित खेडं. जिथं भौतिक सोयी-सुविधांचा अभाव, रस्त्याची दुरावस्था झालेली पण गावापर्यंत पोहोचलेली सडक. गावात ग्रुप ग्रामपंचायत केळवली-सांडवली. जेमतेम पन्नास एक उंबरा असलेली घरं. गावची लोकसंख्या अडीचशे ते तीनशेच्या घरात आणि याच गावात शासनाच्या मालकीची असणारी एकमेव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केळवलीची इमारत. या इमारतीत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत वर्ग असणारी चार खोल्यांची इमारत. पक्क्या विटांनी बांधून प्लास्टर केलेली सुसज्ज इमारत. याच इमारतीत गावची ग्रामसभा-गावच्या बैठका होत. अलीकडे नुकतीच नवीन सरपंचाच्या अध्यक्षतेखाली नूतन ग्रामपंचायत बांधून पूर्ण झालेली आहे फक्त उद्घाटनाच्या प्रतीक्षेत उभी आहे.

केळवली शाळेचा पट जेमतेम पंधरा ते वीस. शाळेत ३ शिक्षक कार्यरत. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत एक उपशिक्षक व पाचवी ते आठवीसाठी दोन विषय शिक्षक. शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुदाम चव्हाण सर, विषय शिक्षक श्री. सुरेंद्र अवसरे सर, उपशिक्षक श्री. गजानन वाईकर सर. २०१८ च्या बदली प्रक्रियेतून हजर झालेले पण यापूर्वी याच भागात काम केलेले. शाळेची शैक्षणिक प्रगती तशी जेमतेम. हीच शैक्षणिक प्रगती उंचावण्यासाठी शाळा पातळीवर काय प्रयत्न करावे लागतील या विषयावर विचार मंथन. त्यात कोविड काळ. ज्यांन सारं जग स्तब्ध झालेलं, पण शाळा मात्र त्याला अपवाद. काही ठिकाणी ऑनलाईन शिक्षण चालू होतं तर काही ठिकाणी ऑफलाइन शिक्षण. आमची शाळा मात्र ऑफलाइन शिक्षणाने जोडलेली कारण मोबाईल नेटवर्कचा अभाव, अँड्रॉइड मोबाईलची कमतरता इत्यादी येणाऱ्या समस्यावर मात करत एका विस्तीर्ण अशा झाडाखाली सर्व मुलांना जाण्या-येण्यासाठी सोयीची होईल अशी बिन भिंतीची निसर्ग शाळाच जणू. सुरुवातीला मुलांची उपस्थिती जेमतेम कारण कोविडचे भय पालकांच्या मनातून जातच नव्हते. परिस्थितीच तशी होती, त्यामुळे उपस्थितीची जबरदस्ती करू शकत नव्हतो, पण कर्तव्य व आवड म्हणून आम्ही सर्वजण उपस्थित विद्यार्थ्यांची योग्य अंतरावर बसवून कोविड नियमांचे पालन करून शाळा घेत होतो. त्यामुळे मुलांची शाळेविषयी असणारी नाळ जोडून राहिली. शिक्षणात खंड न पडता शिक्षण प्रवाहात मुले राहिली. मुलांना शासनाच्या स्वाध्यायपुस्तिका व खाजगी प्रकाशनाकडून घेतलेल्या स्वाध्यायपुस्तिका देण्यात आल्या. जेणेकरून विद्यार्थी स्वयंअध्ययन करून त्या सोडवतील असा आमचा प्रयत्न होता. उपस्थित विद्यार्थी घरी स्वाध्याय पुस्तिका सोडविताना पाहून जे विद्यार्थी शाळेत येत नव्हते ते विद्यार्थी सुद्धा उपस्थिती दाखवू लागले. पालकांची संमती मिळाली आणि



काही महिने आमचा असा दिनक्रम सुरू झाला. काही दिवस आम्ही गृह भेटीसाठी ठेवले. गृहभेटीत स्वाध्यायपुस्तिका तपासून चुकादुरुस्ती करणे असा आमचा नित्यक्रम असे. त्यात आम्ही खंड पडू दिला नाही.

सर्व काही आनंदाने स्वयंप्रेरणेने किंबहुना कर्तव्य म्हणून करत होतो. पण एक दिवस या आनंदावर विरजण पडावं तस झालं. गावात कोरोनाची लागण झालेली दोन-चार माणसं सापडली अन् आमची शाळा आम्हाला नाईलाजास्तव बंद करावी लागली. म्हणतात ना नकटीच्या लग्नात हजार विघ्न तसा प्रकार झाला, पण गृहभेटी मात्र आम्ही चालू ठेवल्या, पण विद्यार्थी म्हणावं तसा अभ्यास करत नव्हते. शिक्षणात खंड पडण्याची भीती वाटू लागली. शिक्षणप्रवाहापासून मुले दूर राहण्याची भीती वाटू लागली, आणि घडलेही तसेच मुलं रानोमाळ भटकू लागली. गावाकडच्या खेळात रस घेऊ लागली. घरी आई-वडिलांना कामात मदत करू लागली. प्रसंगी शेतीचीही कामे करू लागली. पालकांनाही बरे वाटू लागले. त्यांना कामात मदत होऊ लागली. तसे पालक अशिक्षित त्यांना शिक्षणाचे महत्त्व काय कळणार ?

भयावह वाटणारा कोरोनाचा काळ ज्या वेगाने तो पसरला त्या वेगाने मात्र ओसरला नाही. हळूहळू कोरोनाची लागण झालेले रुग्ण आणि बरे होणारे रुग्ण या तफावत पडू लागली. हळूहळू कोरोना रुग्णांची संख्या कमी होऊ लागली. कोरोनाची लाट ओसरली आणि भारत कोरोना मुक्त झाला. पुन्हा नव्याने उभा राहिला. संपूर्ण भारतात दैनंदिन व्यवहार सुरू झाले. कार्यालयीन नियमाच्या अटींच पालन करून उघडली गेली. तशी शाळा ही नियमाच्या अटींच पालन करून सुरू झाली.. पुन्हा नव्याने शाळा मुलांच्या सहभागाने गजबजल्या. शाळांतील किलबिलाट वाजू लागला. आणि खऱ्या अर्थाने पुन्हा शिक्षण प्रक्रियेला सुरुवात झाली. हळूहळू मुलांची उपस्थिती वाढू लागली, पण मुलं मात्र शैक्षणिक प्रगती पासून खूप दूर गेलेली दिसली. काहीशी लाजरी- बुजरी तर कधी आक्रमक, हिंसक वाटू लागली. आत्मविश्वासाचा अभाव, एकाग्रता कमी, चंचल व विचलित मन इत्यादी गोष्टी दिसून आल्या. मग यावर आम्हा सर्व शिक्षकांचे चर्चासत्र घडू लागली. विचार मंथन होऊ लागले. यातच श्री. गजानन वाईकर गुरुजी उत्तम वादक व गायक. या कलेचा काही उपयोग करून घेता येईल का? यावर विचार केला. मुले निसर्गाच्या वातावरणात राहतात. या गोड वातावरणातील मुलांचा आवाजही गोड नक्कीच असणार यात शंकाच नव्हती. मग सुरू झाले आमचे कलेचे प्रयोग. सर्वप्रथम शालेय परिपाठ संगीतासह सुरू झाला. शालेय प्रार्थना, राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत, समूहगीत, भजन या गोष्टींनी श्रीगणेशा केला. आणि ते मुलांनाही आवडू लागले. तसतसे काही नवीन उपक्रम समाविष्ट केले. उदाहरणार्थ प्रश्न माझा उत्तर तुमचे, व्याकरणाचा भाग, रोज नवे पाच इंग्रजी शब्द जे मुलांना माहीत नाहीत असे शब्द असे विविध शैक्षणिक उपक्रम नित्यनेमाने शाळेत राबवू लागलो. वाचनाची गोडी वाढावी म्हणून दररोज एक बोधकथा प्रकटीकरण वयोगटांनुसार होऊ लागले. मुलांची समजपूर्वक वाचनाची आवड निर्माण झाली. पाठांतर वाढले. गायन कलेचा पाठांतर वाढीसाठी उपयोग झाला. सभाधीटपणा, नेतृत्व गुण, आत्मविश्वास वाढीस लागला.

शाळेतील बहुतांशी मुले वादक बनली. वादक बनणे म्हणावे तसे सोपे नाही, त्यासाठी आवड व नियमित सरावाची अत्यंत आवश्यकता असावी लागते. तो सराव नित्यनेमाने श्री. गजानन वाईकर सर व आम्ही सर्वजण घेत होतो. कोणतीही कला आत्मसात करण्यासाठी प्रचंड साधना करावी लागते. तेव्हा ती आत्मसात होते. असे ते नियमितपणे मुलांच्या मनावर बिंबवत असत. मुलेही त्यांना साथ देऊ लागली. प्रचंड सराव करू लागली. आवड तर होतीच सवडीने कलेची साधना घेऊ लागली आणि त्याचे फळ म्हणून आज बरीचशी मुले उत्तम हार्मोनियम वाजवतात. हाच हार्मोनियम मिळवण्यासाठी सर्वप्रथम गावात

प्रयत्न केले. गावचा प्रतिसाद म्हणावा तसा न मिळाल्यामुळे आमचे इतर प्रयत्न सुरू झाले. आमच्या प्रयत्नांना शेवटी यश आले. एक दिवस अचानक माझ्या चुलत भावाचा फोन आला. "अरे! तुझ्या शाळेला माझे मित्र मदत करू इच्छितात." तू त्यांच्याशी बोल एवढं बोलणं झालं. आणि मी ठरवलं आपण हार्मोनियम व तबला घ्यायचा. त्यांच्याशी बोलणं झालं. त्यांचे बजेट पाहून मी हार्मोनियमसाठी आग्रही राहिलो. माझी शाळेप्रती व विद्यार्थ्याप्रती तळमळ पाहून त्यांनी होकार दिला. उन्हाळ्याच्या सुट्टीत देण्याचे नियोजन झाले. आणि खरोखरच उन्हाळी सुट्टीतील एके दिवशी सर्व शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हार्मोनियम भेटवस्तू स्वरूपात देण्याचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात मुलांनी गीत गायनाचा कार्यक्रम केला. या गायन कलेच्या प्रभावाने सर्व उपस्थित मित्र मंत्रमुग्ध झाले व आपण एक योग्य भेट दिल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसून आले. खरंतर ही मुलं शिक्षण प्रक्रियेत असताना एका बॅचची नंतर विविध पदावर कोणी नोकरी करणारी, कोणी इंजिनियर, कोणी व्यवसायिक, कोणी शासकीय नोकर पण त्यांच्यातल्याच एकाचे निधन झाल्याने त्याच्या स्मृतीपित्तर्थ दरवर्षी ते गरजू शाळेस भेटवस्तू स्वरूपात देतात पण अट एकच असते ती शाळा दुर्गम भागातील असावी. सामाजिक जाणिवेतून काम करणारी माणसं खरोखरच या जगात आहेत याचा प्रत्यय याप्रसंगी आला. शाळा विकासात या गीत गायनाचा काय उपयोग करून घेता येईल का? याबाबत आम्हा सर्व शिक्षकांच्यात चर्चा झाली. चर्चेअंती असे ठरले की तालुकास्तरावरील व जिल्हास्तरावरील स्पर्धेत आपण भाग घ्यायचा व आपल्या मुलांची ही उपजत कला सर्वांसमोर खुली करायची आणि तशी संधीही लवकरच मिळाली.

सन २०१९-२० यावर्षीच्या स्वर्गीय यशवंतराव चव्हाण विद्यार्थी व्यक्तिमत्व स्पर्धेत तालुकास्तरावर सहभाग घेऊन तिसरा क्रमांक पटकावला व पुढे जिल्हास्तरावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडवे तालुका सातारा यासोबत केळवली शाळेच्या विद्यार्थ्यांनी संयुक्तपणे भाग घेऊन प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळविले. पहिल्यांदाच तालुका व जिल्हास्तरावर मिळालेल्या यशाने आम्ही सर्वजण भारावून गेलो त्यानंतर सन २०२०-२१ चा कोरोनाचा काळ वगळता आम्ही दरवर्षी स्पर्धेत भाग घेऊन यश संपादन करू लागलो. त्यानंतर सन २०२१-२२ भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक व पुढे जिल्हास्तरावर झालेल्या कार्यक्रमात उत्कृष्ट गीताचे सादरीकरण करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या संदर्भातील बातम्या स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिद्धही झाल्या व आमच्या शाळेचे नाव यानिमित्ताने जिल्ह्याच्या नकाशावर झळकू लागले. याचाच आधार म्हणून की काय आम्हास महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे कन्या शाळा सातारा यांच्याकडून कन्या शाळा सातारा शाखेचे शताब्दी वर्ष आणि स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव यानिमित्त आयोजित आंतरशालेय देशभक्तीपर समूह गान स्पर्धेत भाग घेण्याचे निमंत्रण पत्र प्राप्त झाले व लगेच त्या संदर्भाने तयारी सुरू ठेवली. मुले आता गीत गायनात अधिकाधिक रस घेऊ लागली. मनापासून सर्वजण काम करू लागलो. निमंत्रण स्वीकारले होते. स्पर्धेच्या दिवशी आम्ही सर्व शिक्षक व विद्यार्थी कार्यक्रम स्थळी हजर झालो. यावेळी ऑनलाइन व ऑफलाइन दोन्ही प्रकारे देशभक्तीपर गीतांचे समूहगान घेण्यात आले. जवळजवळ २५ ते ३० शाळांनी सहभाग नोंदवला होता. पुन्हा एकदा उत्कृष्ट गीतांचे सादरीकरण करून द्वितीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले. स्पर्धेतील यशाची बातमी गावातील मुंबई मंडळापर्यंत पोचली. गावातील व मुंबईकडील लोकांना कौतुक वाटू लागले, म्हणून असाच एक गीत गायनाचा कार्यक्रम गाव स्तरावर घेण्याचे नियोजन गावकरी व आम्ही सर्वजण मिळून करण्यात आले. गणेश उत्सव हा कोकणवासी यांचा आवडता उत्सव. या उत्सवानिमित्त सर्व मुंबईकर गावी असतात. तेव्हा कार्यक्रम

घेण्याचे ठरले. नियोजनानुसार कार्यक्रमही झाला. गावातील लोकांनी आर्थिक स्वरूपात शाळेस मदत केली व मुलांचे कौतुकही केले. यापुढे ज्या ज्या वेळेस शाळेत सहकार्याची गरज लागेल तेव्हा आम्ही सर्वजण पुढे असू, असे आश्वासन देण्यात आले. गाव स्तरावर पुन्हा एकदा संधी मिळाली. गावच्या देव भंडाऱ्याच्या कार्यक्रमावेळी मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे दोन ते अडीच तासाचे सादरीकरण करण्यात आले. यात बालनाट्य, विनोदी नाटके, एकांकिका, गीत गायन आदींचा समावेश होता. या ठिकाणीही कौतुक झाले. आम्हा शिक्षकांचा सत्कार करण्यात आला व आर्थिक स्वरूपात भरघोस अशी शाळेला मदत झाली.

सन २०२२-२३ मध्ये झालेल्या स्वर्गीय यशवंतराव चव्हाण विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास स्पर्धेमध्ये गीत मंच या प्रकारामध्ये तालुकास्तरावर भाग घेऊन लहान गट प्रथम क्रमांक व मोठा गट प्रथम क्रमांक पटकावून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. पुन्हा एकदा जिल्हास्तरावर गीत मंच स्पर्धेत दोन्ही गटात गीतांचे उत्तम सादरीकरण केले. लहान गट प्रकारात गीतगायनात द्वितीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले. गीतमंच आणि केळवली हे समीकरणच बनून गेले. त्या संदर्भाने वेळोवेळी स्थानिक वृत्तपत्राने बातम्यांच्या स्वरूपात आमची दखल घेतली. जिल्हा पातळीवर केळवली शाळेने नाव कमावले. याचा सार्थ अभिमान आम्हा सर्व शिक्षक, विद्यार्थी व गावकरी यांना नक्कीच आहे. सन २०१९-२० ते सन २०२२-२३ पर्यंत आमच्या यशाची कायम चढती कमान राहिली आहे. बालआनंद मेळाव्यातही सहभागी होऊन प्रत्येक वेळी यश संपादन केले आहे. तालुक्याच्या विज्ञान प्रदर्शनात कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी ईशस्तवन व स्वागत गीत गायनाचे सादरीकरण करण्याची संधी मा. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सातारा यांचे मार्फत मिळाले. स्थानिक वृत्तपत्रातून शाळेच्या कलेविषयाच्या बातम्या प्रसिद्ध होऊ लागल्याने काही कलाप्रेमी व त्यांचे ग्रुप शाळेस भेटी देऊ लागले. असाच एक ग्रुप सप्तसूर म्युझिकल ग्रुप, सातारा यांनी शाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांशी हितगुज केले. मुलांच्या गायन कलेची प्रशंसा केली व विद्यार्थ्यांना लेखन साहित्य भेटवस्तू स्वरूपात दिले. तसेच खाऊचे वाटपही केले त्याचबरोबर समर्थ सद्गुरु भजनी मंडळ सातारा यांनीही भेट देऊन भजन गायनासंदर्भात मुलांना प्रोत्साहित केले व मुलांकडून भजन गाऊन घेतले. विद्यार्थ्यांचे भजन ऐकून ते सर्वजण चकित झाले. विशेष कौतुकही केले. एक दिवस अचानक प्रांतअधिकारी साहेबांनी अचानक शाळेत भेट दिली. आपत्ती व अतिवृष्टीच्या कामकाजातून वेळ काढून ते शालेय विद्यार्थ्यांच्यात रमले. त्यांच्याशी मनमोकळेपणाने गप्पा मारल्या. मुलांचा गाण्याचा सूर पाहून ते भारावले व एवढ्या डोंगर माथ्यावर किती छान मुले गातात, अशी शाबासकीही दिली. तसेच आजपर्यंत मा.गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती सातारा, भाग शिक्षण विस्तारी बीट – परळी, केंद्रप्रमुख केंद्र-पाटेघर इत्यादी सर्व अधिकारी वर्गांनी भेट देऊन मुलांचे यथायोग्य कौतुक केले.

सन २०२३-२४ मध्ये पुन्हा एकदा पंचायत समिती शिक्षण विभाग सातारा यांचे कडून सातारा आकाशवाणीवर एक तासाचा कार्यक्रम करण्याचे आमंत्रण मिळाले. यात गीत गायनाबरोबरच बालनाट्य, एकांकिका, विनोदी चुटकुले यांचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली. तयारीसाठी दहा दिवस होते. या संदर्भाने आम्ही सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही खूप कष्ट घेतले. शाळा पातळीवर खूप सरावही झाला. मेहनतीचे फळही मिळाले. अत्यंत सुंदर पद्धतीने सादरीकरण करून लोकांची वाहवा मिळवली. महत्त्वाचे म्हणजे सातारा आकाशवाणीवर हा कार्यक्रम करण्याचे भाग्य मिळाले,संधीचे सोने झाले. सर्व ठिकाणाहून कौतुकाचा वर्षावाही झाला. तश्या बातम्याही प्रसिद्ध झाल्या. एक नवा रोमांचकारी अनुभव अनुभवयास मिळाला. विद्यार्थी ही स्मार्ट बनू लागले. प्रत्येक अनुभवातून शिकू लागले. अनुभवांची

शिदोरी साठवू लागले. धाडस व आत्मविश्वास दुणावला. स्वतःचे सामर्थ्य ओळखू लागले. स्वतःवरचा विश्वास वाढला. चालण्या-बोलण्यात, वावरण्यात, विचारात, कृतीत चांगला फरक जाणवू लागला. गीतगायनस्पर्धेबरोबर निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, क्रीडा स्पर्धा यातही उत्तुंग असे यश मिळवले आहे. निबंध स्पर्धेत सन २०२३-२४ विषय राजश्री शाहू महाराजांची एक आठवण यात लहान गटात नववा क्रमांक मिळवला. क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन तालुकास्तरावर मोठ्या गटात गोळाफेकीत प्रथम क्रमांक व जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच क्रीडा स्पर्धेत थाळीफेकीत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक व जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक संपादन केला. यावर्षीच्या २०२३-२४ च्या क्रीडा स्पर्धेत तालुका स्तरावर पाच विद्यार्थ्यांची निवड ही झाली. यात मोठा गट १०० मीटर धावणे मुले व १०० मीटर धावणे मुली तसेच बुद्धिबळ या प्रकारात मोठ्या गटात दोन विद्यार्थ्यांची निवड झाली. लांब उडी प्रकारात एका विद्यार्थ्याची निवड झाली. विविध स्पर्धेत भाग घेऊन शाळेच्या यशाची चढती कमान कायम ठेवण्याचा आम्हा सर्व शिक्षक व विद्यार्थी यांचा प्रयत्न असतो. तसे पहिले तर शाळा दुर्गम भागात, जाण्या येण्याच्या अडचणी, फार अंतर पण प्रत्येक स्पर्धेत भाग घेऊन मिळालेल्या संधीचे सोने करण्याचा आमचा नेहमी प्रयत्न असतो. पालकांचीही सहकार्याची भूमिका असते. त्यांच्याशिवाय व मुलांच्या मेहनतीशिवाय हे करणे अशक्य आहे. त्यांची साथ सोबत असणे अत्यंत आवश्यक असते. त्याचबरोबर शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुदाम चव्हाण सर, विषय शिक्षक श्री. सुरेंद्र अवसरे सर व कलाशिक्षक श्री. गजानन वाईकर सर या सर्वांच्या प्रयत्नातून शाळेस एक नवा आकार. नवी प्रसिद्धीही मिळवून देण्याचा प्रयत्न नक्कीच झाला आहे. सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद द्यावेसे वाटतात. अशा प्रकारे केळवली शाळेची कलाक्षेत्रातील यशाची यशोगाथा व याबरोबरच विद्यार्थी विकासामध्ये झालेला अतुलनीय बदल शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न या यशोगाथा अहवालाच्या निमित्ताने केलेला आहे.

फोटो लिंक -

https://drive.google.com/drive/folders/10IEWv5mPNee7o81CwNtME2kMUM5Av0f?usp=sharing

व्हिडिओ लिंक –

https://youtu.be/caCk_yLSfYI?si=kWtmxKXYjkqyoDV1
https://youtu.be/00KWymWR7Wk?si=5Fw7XBep5nMcnUoE
https://youtu.be/8nPB1KcDgzk?si=r-SdjBTI8nEsRuEk
https://youtu.be/PgbjobTdX6s?si=h9G1WJGfJoucaMkh
https://youtu.be/B-ixLlLzoSg?si=ins26q6h-7t80cjF
https://youtu.be/Ci3Q8kTobEA?si=BHE2bir4mQhMNAYQ

अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुशी, केंद्र. किडगाव, बिट-लिंब, ता.जि.सातारा

मुख्याध्यापकाचे नाव - सौ संगिता हणमंत इंगवले

सहशिक्षक - श्री.वैभव शंकर रणदिवे

प्रास्ताविक -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुशी, ता.जि.सातारा या आमच्या शाळेमध्ये अध्ययन अध्यापनातील तंत्रज्ञानांतर्गत टी.व्ही (LED) या साधनाच्या वापरामुळे विविध विषयार्गत झालेला विद्यार्थ्यामधील बदल अनुभवास मिळाला. त्या अनुषंगाने यशोगाथा लेखन करण्याची संधी प्राप्त झाली त्याही पेक्षा अध्ययन अध्यापनात प्रत्यक्ष येणारा अनुभवातील आनंद खुप मिळाला.

अडचणी -

सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षात शालेय इमारत धोकादायक अवस्थेत असल्याने सदर शाळा इमारत निर्लेखित करून नव्याने शाळा बांधकाम मंजुर झाले. सर्व प्रथम एक वर्गखोली बांधकाम पूर्ण झाले होते. शाळा बांधकाम पूर्ण होईपर्यंत ग्रामपंचायत सभागृह व ग्रामस्थांच्या मालकीच्या खोल्यांचा शाळाकरीता वापर करण्यात येत होता. सन २०१८ मध्ये शाळेत १) श्री.जुनघरे व २) श्री रणदिवे या दोन शिक्षकांची बदलीने नियुक्ति झाली होती. सर्व वर्गाना शिक्षक मिळाले होते परंतु वर्गखोल्यांची अडचण होती. घरातील लहान-लहान खोलीतुन वर्गाध्यापन करताना बऱ्याच गोष्टीचा सामना करावा लागत असे. लाईट, बैठक व्यवस्था, परिसरातील वातावरण या सर्वामुळे विद्यार्थ्याना अध्ययन पुरक निर्मिती करता येत नव्हती.

त्यातच भर की काय? म्हणुन गावात कोणतेही मोबाईल नेटवर्क काम करीत नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोबाईलच्या साहाय्याने एखादी घटना, प्रसंग दाखविणे शक्य होत नव्हते. शाळेतील सर्व शैक्षणिक साहित्य एका खोलित होते ते दर वेळी वापरणे शक्य नव्हते अशात केवळ शाब्दीक माहिती देवून विद्यार्थ्याना त्या घटकाची संकल्पना समजावून सांगीतली जात होती. पाठ्यक्रमातील पुस्तकातील घटकांची तयारी करताना इतर माध्यमे व साधने यांची सतत कमतरता जाणवत होती. सन २०१९-२० मध्ये शाळेच्या इतर तीन खोल्या बांधून पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्याना किमान उत्तम प्रकारची वर्गखोली स्वतंत्ररित्या वर्गनिहाय उपलब्ध झाली. विद्यार्थ्यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. नवीन खोली, रंग- रंगोटी यामुळे बन्यापैकी चैतन्य निर्माण झाले होते.

अशातच मार्च २०२० पासून जगात एक अशांतता पसरली होती कोविड-१९ या विषाणूजन्य आजाराने कोरोना करीता संपूर्ण भारतात लॉकडाऊन करण्यात आले होते परंतू त्यात एक विशेष बाब म्हणजे कोरोना आज़ार येण्याच्या

अगोदर दोन ते तीन महिने मोबाईल टॉवर कुशी गावात कार्यान्वीत करण्यात आला होता 'जीओ' कंपनीचा मोबाईल टॉवर सुरु झाला होता. परंतु लाकडाऊनच्या भीतीमुळे सर्व काही थांबले होते.

अशा प्रकार अध्ययन -अध्यापनाचे काम अचानक थांबेल हे कोणीही व कधीही स्वप्नात पहिले नव्हेत मात्र ते प्रत्यक्षात घडले होते.

या अडचणींवर मात करणे ही काळाजी गरज होती.





पूर्वीच्या वर्ग खोलीत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात कमतरता होती

(जुनी इमारत)

कार्यवाही-अंमलबजावणी-उपाययोजना -

विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापनात नाविन्य निर्माण करण्याच्या हेतुने तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी सर्वप्रथम शिक्षकांनी स्वतःचे मोबाईल सीम कार्ड जी ओ कंपनी मध्ये रूपांतरीत (port) केले. त्यानंतर मोबाईलमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे शैक्षणिक अँप घेतले. दीक्षा अॅप, रीड टू मी, स्वाध्याय अँप असे अँप डाऊनलोड करून घेतले. लॉकडाऊनच्या काळात ऑनलाईन शिक्षण सुरु झाले. झुमच्या साहाय्याने विद्यार्थ्यांशी विविध विषयांवर शिक्षण चालू झाले विदयार्थ्यांना या नवीन शैक्षणिक ऑनलाइन प्रक्रियेचा अनुभव घ्यायला मिळत होता. हळू हळू विद्यार्थ्यांना मिटींग चालू असताना व्हीडीओ ऑडिओ म्युट करणे, हँण्ड रेज करून प्रश्न विचारणे या गोष्टी समजत होत्या. विद्यार्थी प्रतिसाद देत होते. हळू हळू कोरोना प्रभाव कमी होऊ लागला. लॉकडाऊन कमी झाले. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने शाळा पूर्ववत नियमावलीत सुरु झाल्या विद्यार्थी सुरक्षा हे महत्वाचे सूत्र आखून त्यानुसार अध्यापन करण्याचे आदेश मिळाले.

सर्वप्रथम मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सर्व सदस्य यांनी ग्रामपंचायतीने १४ व्या वित्त आयोगातून शाळेकरीता विविध फर्निचर व इतर साहित्याची मागणी केली .सरपंच, ग्रामसेवक सर्व सदस्य यांचे निर्णयातून

शाळेस विविध प्रकारचे फर्निचर व महत्वाचे म्हणजे ई-लर्निंग करिता टी.व्ही.(Smart) 2 सेट दिले त्यामध्ये विविध इयत्तांचे अभ्यासक्रमाचे सॉफ्टवेअर अपलोड केले आहे.

दिक्षा अँप मध्ये सर्व इयत्तांच्या पाठ्यक्रमानुसार पाठ्यघटक आहेत त्या नुसार अध्यापन करणे सहज शक्य होते. सर्व प्रथम ऑनलाइन शिक्षण चालू असताना विद्यार्थ्यांना झुम मीटिंगची वेळ व लिंक दररोज व्हॉट्सॲप वर प्रत्येक शिक्षक ग्रुप वर पाठवत व आपापले नियोजित अध्यापन करत परंतु ब-यापैकी वेळेचे बंधन असल्यामुळे विद्यार्थी-शिक्षक आंतरक्रिया जास्त प्रमाणात होण्यावर निर्बंध यायचे मात्र प्रत्यक्ष अध्यापन करत असताना विद्यार्थ्यांना आंतरक्रियेत भाग घेताना खुप रस असायचा.


शालेय स्तरावर विविध महापुरुषांची जयंती पुण्यतिथी साजरी केली जाते. त्यावेळी त्या महापुरुषांचा जीवन परिचय विद्यार्थ्यांना टीव्ही मधील मीराकास्ट ॲप्लिकेशन ऑन करून मोबाईल कनेक्ट करून दिला जायचा. टीव्ही व मोबाईल यांचे कनेक्शन सुरु झाले की हवे त्या महापुरुषांची जीवनयात्रा दाखवणे शक्य होते. पुर्वी विद्यार्थी बालसभेच्या माध्यमातून महापुरुषांविषयी अगदी थोडक्यात माहिती कथन करायचे परंतु त्यांना या तंत्रज्ञानामुळे पूर्ण माहिती देणे शक्य होते.

विज्ञान विषयांतर्गत सजीवसृष्टी, सजीवांचे अनुकूलन, प्रकाशसंश्लेषण, वनस्पतींचे अवयव, आपली अस्थिसंस्था, आपत्ती व्यवस्थापन या सह इतर विविध घटकांची माहिती अभ्यासताना टी.व्ही या तंत्रज्ञानाची खुप मदत होते. हवे त्या ठिकाणी व्हिडिओ पॉज करून शंकांचे निरसन करता येते. विविध प्रश्नांची निर्मिती करता येते. चौकस प्रश्न विचारण्याची वृत्ती जागृत होते.

भूगोल विषयांतर्गत आपल्याला न उलगडलेल्या आकाशगंगेतील आपली सूर्यमाला, सूर्य, ग्रह, उपग्रह यांचे परिवलन व परिभ्रमण या तंत्रज्ञानाच्या आधारे अनुभवता आले. सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, समुद्र भरती ओहोटी, जलविद्युत ऊर्जा, पवनऊर्जा निर्मितीचे व्हिडिओ अभ्यासता येतात.


इतिहास विषयांतर्गत विविध ऐतिहासिक स्थळांची भौगोलिक तसेच ऐतिहासिक माहिती छ. शिवरायांच्या आयुष्यातील प्रतापगडावरील पराक्रम, लाल महालातील हल्ला, पन्हाळावरून सुटका, आग्रा येथून सुटका असे विविध संस्मरणीय, प्रेरणादायक प्रसंग या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपणाला विद्यार्थ्यांना अनुभुती देता येते.

आनंददायी शिक्षणातील विविध उपक्रम बोधकथा, गोष्ट, मनोरंजक गाणी यांचे सादरीकरण या तंत्रज्ञानाच्या मदतीने अतिशय सुकर होऊन गेले आहे.




आम्ही सावित्रीच्या लेकी- बालिकादिन
ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले
जयंती


कुयत्ला- हवी
आम्ही सावित्रीच्या लेकी- बालिकादिन
ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले
जयंती













प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करताना

शिक्षक व विद्यार्थी

फलनिष्पती -

अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानातील टी.व्ही या माध्यमाचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांची विचार करण्याची मर्यादा वाढली. आपले विचार न भिता व्यक्त करू लागले. एखाद्या घटकाचे आकलन होत नसेल तर स्वतः टिव्हीवर शिक्षकांचा मोबाइल कनेक्ट करून अनेकदा ते अभ्यासू लागले. रिकाम्या वेळेचा योग्य वापर करू लागले. विविध विषयांवर भाषणे अभिनय, लेखन करण्याची सवय जडली. विविध महापुरुषांच्या जीवन चरित्रांची माहिती घेऊन अनुकरण करण्याचा प्रयत्न करू लागले. शाळेतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी या तंत्रज्ञानाचा यशोचित वापर करू लागले तसेच स्वतःच्या ज्ञात असलेल्या कल्पनांची सत्यता पडताळू लागले.

एकंदरीत शाळेचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने अध्ययन - अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर सुरु आहे.

समारोप -

जि.प.प्रा.शाळा कुशी या आमच्या शाळेत सन २०२१ - २०२२ पासून सद्यस्थितीत अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा (T.V./ मोबाईल) चा प्रभावी वापर करण्यात शाळेतील सर्व विद्यार्थी सहभाग घेत असुन त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवता वाढीसाठी खुपच फायदा होत आहे.

"इंग्रजी पेटी अन् डिजिटल साधनांची युती, निघून गेली इंग्रजीची भीती''

शाळेचे नाव – जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, विजयदुर्ग नं.1 ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

Email ID – zppsvijaydurg@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री. शितल शामराव देवरकर

प्रास्ताविक –

इंग्रजी भाषा ही जगातील लोकप्रिय भाषा आहे. इंग्रजी ही जागतिक व्यापार, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या क्षेत्रांमध्ये प्रमूख भाषा आहे. आपल्या भारतातसुद्धा इंग्रजी भाषेचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे इंग्रजी भाषा शिकणे खूप आवश्यक बनले आहे.


आज शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना पहिलीपासून इंग्रजीचे अध्यापन केले जाते. पाठ्यपुस्तकांमध्ये जो इंग्रजीचा अभ्यासक्रम दिलेला असतो तो सर्व मुलांना शिकवला जातो. त्यातून सर्व मुलांना इंग्रजीची ओळख होते. परंतु इंग्रजी ही परकीय भाषा असल्यामुळे आणि आपल्या मातृभाषेपेक्षा वेगळी असल्यामुळे मुलांमध्ये इंग्रजी विषयाची भीती निर्माण होते. आणि त्यामुळे त्यांचे अध्ययन म्हणावे तितके सुलभ होत नाही. त्यामुळे मुलांच्या मनातून इंग्रजीची भीती दूर करणे खूप गरजेचे आहे. त्यामुळे फक्त पुस्तकातील अध्यापनावर विसंबून न राहता इंग्रजी विषयक नवनवीन विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून इंग्रजी भाषा मुलांना सोपी कशी वाटेल, त्यांचे अध्ययन सुलभ कसे होईल या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. आणि म्हणूनच आम्ही आमच्या शाळेमध्ये इंग्रजी भाषा विषयक विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे ठरविले. यामध्ये इंग्रजी स्पेलिंग पाठांतर, इंग्रजी वर्ग, इंग्रजी पेटीचा परिणामकारक वापर, डिजिटल साधनांच्या माध्यमातून इंग्रजीचा सराव, इंग्रजीचे मनोरंजक खेळ यासारख्या उपक्रमांची अंमलबजावणी आम्ही आमच्या शाळेमध्ये केली. या सर्व उपक्रमांना मुलांचा अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला आणि मुलांमध्ये सकारात्मक बदल घडून आल्याचे दिसून आले. या उपक्रमांमुळे मुलांच्या इंग्रजी शब्द संग्रहात वाढ झाली. तसेच मुलांचे इंग्रजी वाचन ही सुधारले.

आलेल्या अडचणी –

आमच्या शाळेमध्ये इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत वर्ग असून शाळेचा पट 56 आहे. शाळा सुरू झाल्यानंतर इंग्रजी विषयाची उजळणी घेतली असता अनेक विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची तयारी खूपच कमी असल्याचे आढळून आले. अनेक मुलांना साध्या सोप्या इंग्रजी शब्दांच्या स्पेलिंग सांगता येत नव्हत्या. मोजकीच मुले अडखळत - अडखळत इंग्रजी वाचन करत होती. एकंदरीत इंग्रजी विषयी मुलांच्या मनामध्ये भीती असल्याचे जाणवले.

केलेल्या उपाययोजना -

या अडचणींवर मात करण्यासाठी आम्ही विचार विनिमय करून इंग्रजी विषयक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे ठरवले. त्यानुसार आम्ही खालील उपक्रम राबवून त्याची योग्यरीत्या अंमलबजावणी केली.



1) इंग्रजी स्पेलिंग पाठांतर -

या उपक्रमांतर्गत मुलांना दररोज दोन स्पेलिंग पाठ करण्यासाठी दिले गेले आणि परिपाठामध्ये प्रत्येक मुलाकडून दिलेल्या शब्दाची स्पेलिंग विचारून योग्य स्पेलिंग सांगण्याची कृती करण्यात आली . दररोज अचूक स्पेलिंग पाठ करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना शाबासकी दिली जाते . यामुळे हळूहळू सर्व विद्यार्थी स्पेलिंग पाठांतर करू लागले.

2) इंग्रजी वर्ग –

शाळेमध्ये लोकसहभागातून एका वर्गखोलीला इंग्रजी वर्गाचे रूप देण्यात आले आहे. यामध्ये संपूर्ण खोलीच्या भिंतीवर इंग्रजी शब्द आणि इंग्रजी विषयक चित्रे तसेच लीप फॉर वर्ड या पुस्तकातील तक्त्यांचे रेखाटन करण्यात आले आहे. दुपारच्या सुट्टीत मुलांना त्या वर्गात बसून इंग्रजीचा सराव घेतला जातो.



3) इंग्रजी पेटीचा योग्य वापर –

शासनाच्या माध्यमातून शाळेला इंग्रजी पेटी मिळालेली आहे. या पेटीमध्ये इंग्रजी विषयाचे विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे. हे सर्व साहित्य वेळोवेळी मुलांना दिले जाते. त्या साहित्याचा वापर कसा केला जातो त्याचे मार्गदर्शन मुलांना केले जाते. मुलेही रिकाम्या वेळी, सुट्टीच्या वेळी ते साहित्य घेऊन त्याचा सराव करू लागली. त्यामुळे इंग्रजी विषयाचा चांगला सराव झाला.



4) डिजिटल साधनांचा वापर –

शाळेमध्ये लोकसभागातून संगणक, प्रोजेक्टर, टॅब अशी विविध डिजिटल साधने उपलब्ध करून घेतली आहेत. त्यांचाही इंग्रजीच्या सरावासाठी वापर केला. प्रोजेक्टरवर इंग्रजी विषयक विविध व्हिडिओ, पीडीएफ मुलांना दाखवून त्यांचा सराव करून घेतला गेला. तसेच read to me या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून चौथीच्या मुलांना इंग्रजीचे अध्यापन केले गेले. त्याचबरोबर शाळेमध्ये एकूण नऊ टॅब्स उपलब्ध आहेत. त्यामध्ये इंग्रजी विषयक विविध प्रकारचे ॲप्स इन्स्टॉल केले आहेत. त्यांच्या साहाय्याने मुलांच्या इंग्रजी विषयामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले गेले. तसेच शाळेचे शिक्षक श्री.शितल देवरकर यांनी इंग्रजी शब्द, त्यांचा उच्चार आणि अर्थ यावर आधारीत व्हिडिओ, Kahoot games बनवले. त्यांचाही मुलांना चांगला उपयोग होत आहे.





5) इंग्रजीचे मनोरंजक खेळ –

इंग्रजी विषयाची भीती दूर करण्यासाठी इंग्रजीचे विविध मनोरंजक खेळ घेण्यात आले. इंग्रजीच्या मनोरंजक खेळांमुळे मुलांची इंग्रजीची भीती दूर होण्यास मदत झाली. याशिवाय इंग्रजीचा चांगला सरावही झाला.

या नावीन्यपूर्ण उपक्रमांबरोबरच स्पेलिंग पाठांतरच्या स्पर्धा घेणे, इंग्रजी वाचनाच्या स्पर्धा घेणे तसेच इंग्रजीच्या विविध ऍक्टिव्हिटीज सोडवून घेणे या माध्यमातूनही इंग्रजी भाषेचा सराव देण्यात आला.

फलनिष्पत्ती –

इंग्रजी विषयासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविल्यामुळे मुलांमध्ये खालील सकारात्मक बदल दिसून आले.

1) विद्यार्थ्यांची इंग्रजीची भीती कमी होण्यास मदत झाली.
2) विद्यार्थ्यांचे इंग्रजी शब्द संग्रहात वाढ झाली.
3) विद्यार्थ्यांच्या इंग्रजी वाचनात सुधारणा झाल्याचे दिसून आले.
4) विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषय शिकण्याची गोडी निर्माण झाली.
5) इंग्रजी पेटीतील साहित्य डिजिटल साधनांच्या वापरामुळे शिक्षकांचे इंग्रजी अध्यापन परिणामकारक होण्यास मदत झाली.
6) एकंदरीत इंग्रजी विषयाचे अध्ययन - अध्यापन आनंददायी आणि परिणामकारक होऊ लागले.

समारोप –

अशाप्रकारे इंग्रजी भाषा विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणीमुळे आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासामध्ये खूपच सकारात्मक बदल झाला आहे. त्यांची इंग्रजी शिकण्याची आणि शिक्षकांची इंग्रजी शिकवण्याची प्रक्रिया खूपच सुलभ आणि परिणामकारक होण्यास मदत झाली आहे. आमचे हे इंग्रजी विषयाचे नाविन्यपूर्ण उपक्रम इंग्रजी भाषा शिकण्यासाठी प्रभावी असल्याचे दिसत आहेत.

शाळेची क्रीडा क्षेत्रातील यशोगाथा

शाळेचे नाव - बी.एफ.दमाणी प्रशाला,194/1, बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर.

Email ID - bfdamaniprashalasolapur@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - सौ.रेखा नरेंद्र पेंबर्ती



प्रास्ताविक –

खेलों से चरित्र का निर्माण होता है और चारित्रवान खिलाडियों से राष्ट्र का निर्माण होता है । खेळाच्या माध्यमातून शरीर, मन व बुध्दीच्या विकासाबरोबरच राष्ट्रनिर्मितीचेही कार्य घडते. खेळामुळे मन आनंदी होते. आनंदी व तणावरहीत मुले अधिक कार्यक्षम असतात. त्यासाठीच विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबध्द असणारी राज्यातील अग्रमानांकित अनुदानित शाळा म्हणजे 'बी. एफ.दमाणी प्रशाला'. शाळेने नेहमीच विदयार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचे कार्य केले आहे. याचीच फलनिष्पती म्हणजे प्रशालेतील विदयार्थी विविध स्पर्धा परीक्षांबरोबरच खेळाचेही मैदान गाजवत आहेत.

आलेल्या अडचणी –

दमाणी विदयामंदिराच्या शैक्षणिक संकुलात प्राथमिक व माध्यमिक आणि इंग्रजी माध्यमाचे प्राथमिक व माध्यमिक अशा 4 विभागांचा समावेश होतो. चारही विभागातील विदयार्थ्यांची पटसंख्या पाहता खेळाचे मैदान अपुरे पडते. त्यासाठी अपु-या मैदानाची समस्या लक्षात घेता 'तलवारबाजी (फेन्सिंग)' या Indoor खेळाची संस्थेने निवड केली.

अंमलबजावणी -

शाळेत येणा-या सर्व अडचणींवर नियोजनपूर्वक मात करून त्यांची ठोस अंमलबजावणी केली. उपलब्ध जागा आणि वेळ यांची सांगड घालत तलवारबाजीचे तंत्रशुध्द प्रशिक्षण देण्याचे संस्थेने नियोजन केले. नियोजनाप्रमाणे दि.21 जून 2016 पासून या खेळाच्या प्रशिक्षणास सुरूवात झाली. तलवारबाजी खेळाचे शाळेतील विदयार्थ्यांना तंत्रशुध्द प्रशिक्षण मिळावे यासाठी NIA चे क्रीडा प्रशिक्षक श्री.पवन भोसले सरांची शाळेने निवड केली.

तलवारबाजी खेळातील खेळाडूंना जास्तीत जास्त सराव करता यावा, पण त्याचवेळी त्यांचे शैक्षणिक नुकसानही होणार नाही याकडे शाळेने लक्ष वेधले. या खेळातील खेळाडूंसाठी शालेय वेळापत्रकाव्यतिरिक्त दोन स्वतंत्र वेळा ठरविण्यात आल्या. पहाटे 5 ते सकाळी 8 आणि शाळा सुटल्यानंतर सायं 5 ते 6.30 वाजेपर्यंत तलवारबाजी खेळाडू सराव करीत असतात. शिवाय प्रत्येक रविवारी व सुटटीच्या दिवशीही तलवारबाजीचे प्रशिक्षण वर्ग सुरू असतात.

शाळेने तलवारबाजी खेळाडूंसाठी दि.21 ऑगस्ट 2018 रोजी जागतिक दर्जाचे **'ॲपरेटस'** यंत्राची खरेदी केली. हे यंत्र खरेदी करणारी राज्यातील एकमेव अनुदानित शाळा म्हणजे 'बी.एफ. दमाणी प्रशाला'. संस्थेने तलवारबाजी खेळाडूंसाठी अत्याधुनिक साहित्यांचीही खरेदी केलेली आहे.





तलवारबाजी खेळासाठी दमाणी प्रशालेत इलेक्ट्रॉनिक मशीनची सुविधा

✓ सोलापूर/प्रतिनिधी

ऑलिम्पिक स्पर्धेत समाविष्ट असलेल्या तलवारबाजी स्पर्धेच्या खेळाडूला अचूक गुणदान करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मशिनचा वापर केला जातो. त्यासाठी दमाणी प्रशालेने गरज ओळखून विद्यार्थ्यांसाठी मशिन उपलब्ध करून दिली आहे.

मशिन उपलब्ध करून देणारी बी.एफ दमाणी प्रशाला जिल्ह्यातील एकमेव आहे. पवन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशालेतील राष्ट्रीय खेळाडूंनी तलवारबाजी खेळाचे प्रात्यक्षिक केले. यावेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रकाश काटुळे व तलवारबाजी खेळाडू श्वेतांबरी मालप यांनी मार्गदर्शन केले. यावेळी तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष दीपक शिंदे, प्रशालेच्या मुख्याध्यापिका जोत्स्ना मळेकर, पर्यवेक्षिका रेखा पंचवटी उपस्थित होते.

1) साहित्य खरेदी -

वर्ष	ब्लेड			सॉर्ड			मास्क			जॅकेट			चेस्ट गार्ड	अपर लोअर	ग्लोज	बॉडी वायर	कीग बॅग	क्रॅक	ऐशीन कीट
	फॉ	से	ई	फॉ	से	ई	फॉ	से	ई	फॉ	से	ई							
2016-17	-	-	-	3	3	3	-	-	-	2	2	-	-	6	16	8	-		-
2017-18	2	2	2	4	4	4	4	4	4	2	2	-	4	6	16	8	2	-	-
2018-19	6	6	6	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	3	-	-	-
2019-20	5	5	5	5	6	5	2	2	2	4	4	-	-	9	14	15	-	5	1
2022-23	4	4	4	4	4	4	4	4	4	2	2	-	-	-	18	18	-	-	-
2023-24	5	5	5	2	2	2	-	-	-	-	-	-	-	-	-	6	-	-	-

फॉ - Foil, से-Sabre, ई – Epee (Three types of events in Fencing)

क्रीडापटूंसाठी प्रेरणादायी व्याख्याने / मार्गदर्शन –

प्रशालेतील खेळाडूंसाठी खालील व्याख्यात्यांचे प्रबोधनपर प्रेरणादायी व्याख्याने, चर्चासत्रे व मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले.

डॉ.सोनाली घोंगडे (सुप्रसिध्द आहारतज्ञ) –

खेळाडूंसाठी शारीरिक व मानसिक स्वास्थ महत्त्वाचे आहे. शारीरिक तंदुरूस्तीसाठी खेळाडूंना कसरत करावी लागते. त्याचबरोबर त्यांच्या संतुलित आहाराकडे लक्ष देणे गरजेचे होते. त्यासाठी शाळेने सोलापुरातील सुप्रसिध्द आहारतज्ञ डॉ.सोनाली घोंगडे यांचे खेळाडूंकरिता व्याख्यानाचे आयोजन केले. त्यांनी खेळाडूंसाठी संतुलित आहाराचा तक्ता (नियोजन) तयार करून दिला व तक्त्याप्रमाणे विदयार्थ्यांना आहार घेण्यासाठी पालकांचे प्रबोधन करण्यात आले.





मा.श्री. प्रकाश काटुळे - राज्य तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष व शिवछत्रपती,पुरस्कार विजेते

मा.श्री. सुदेश मालप - सोलापूर हॅन्डबॉल संघटनेचे सचिव व अजिंक्यतारा स्पोर्टस,क्लबचे सर्वेसर्वा

मा.सौ.श्वेतांबरी मालप होमकर - राष्ट्रीय तलवारबाजी खेळाडू व सोलापूर विदयापीठातील पहिली तलवारबाजीपटू

मा.श्री. केशवराज भडंगे - प्रशालेचा माजी विदयार्थी व राष्ट्रीय थ्रोबॉल खेळाडू

यशोगाथा / फलनिष्पत्ती –

तलवारबाजी खेळात येणा-या सर्व अडचणी व समस्यांवर मात करून शाळेतील तलवारबाजी खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारून शाळेच्या नावलौकिकात वाढ केली.

शालेय स्पर्धांतील कामगिरी -

वर्ष	विविध स्तरांवरील कामगिरी				एकूण
	राष्ट्रीय	राज्य	विभाग	जिल्हा	
2016-17	-	4	11	11	26
2017-18	-	4	14	14	32
2018-19	5	21	24	24	69
2022-23	3	21	37	37	98





असोसिएशन स्पर्धामधील कामगिरी

वर्ष	विविध स्तरांवरील कामगिरी				एकूण
	आंतरराष्ट्रीय	राष्ट्रीय	राज्य	जिल्हा	
2016-17	-	-	45	45	90
2017-18	-	4	70	70	144
2018-19	-	7	97	97	201
2019-20	2	19	104	104	229
2022-23	1	20	119	119	259

वरील माहितीवरून हे लक्ष्यात येते की विविध स्तरावरील सहभागी आणि प्राविण्य प्राप्त विदयार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे.

विशेष उल्लेखनीय –

- विविध राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत प्रशालेतील खेळाडूंनी एकूण 8 सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.
- क्रीडा दिनानिमित्त सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत प्रशालेतील 28 तलवारबाजीपटूंचा सन्मान करण्यात आला.
- संस्थेस क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी "सुशिल क्रीडा पुरस्काराने" सन्मानित करण्यात आले.

1. थायलंड बँकाँक येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी प्रशालेतील तलवारबाजीपटू चि.सोहम ऋषिकेश साठे व चि. बसवराज श्रीशैल अंबारे या दोघांची निवड झाली.





2. **अथर्व राजेंद्र खोत (इ.10वी)**
    - दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय तलवारबाजी निवड चाचणी स्पर्धेसाठी पात्र
    - Asian Championship मध्ये 6 वा क्रमांक
    - World Championship मध्ये 8 वा क्रमांक
    - Junior International Championship मध्ये 19 वा क्रमांक
3. **समृध्दी गणेश घाळे (इ.10 वी) (2023-24)**
    - छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या महाराष्ट्र शासन आयोजित ' मिनी ऑलिंपिक' स्पर्धेत तलवारबाजी खेळात रौप्यपदक प्राप्त.
4. प्रशालेतील राष्ट्रीय तलवारबाजीपटू चि.अमेय रविकांत विधाते व कु. श्रावणी विजयकुमार शिरवाळ यांना 10वी बोर्ड परीक्षेत सवलतीचे क्रीडा गुण (ग्रेस मार्कस) प्राप्त झाल्यामुळे एकूण गुणानुसार दोघांनी सोलापूर जिल्हयात प्रथम येण्याच्या बहुमान मिळविला.
5. इ.10वी बोर्ड परीक्षेत क्रीडा गुणांच्या सवलतीचा फायदा ब-याच विदयार्थ्यांना झाला. यामुळे अभ्यासाबरोबरच खेळांचे मैदान गाजविणा-या विदयार्थ्यांच्या एकूण गुणांत वाढ झाली. शाळेतील 90% पेक्षा अधिक गुण मिळविणा-या विदयार्थी खेळाडूंची संख्या सर्वाधिक आहे.



6. श्री. पवन भोसले - (उत्कृष्ट तलवारबाजी प्रशिक्षक)
    - NIA चे प्रशिक्षक
    - गुजरात येथे होणा-या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी कोच (प्रशिक्षक) म्हणून निवड
    - 2018 - क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबददल राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार प्राप्त

समारोप -

तलवारबाजी खेळात आलेल्या असंख्य अडचणीवर मात करून, उणीवांना बाजूला सारून प्रशालेतील तलवारबाजी खेळाडूंनी क्रीडाक्षेत्रात गगनभरारी घेतलेली आहे. जागतिक कीर्तीचे प्रतिभावान खेळाडू घडविण्यासाठी संस्था, शाळा व शिक्षक सर्वोतोपरी मेहनत घेत आहेत. अभ्यास व शालेय तासिका सांभाळत विदयार्थी खेळाडू आपापल्या खेळाकडे तितकेच लक्ष देत आहेत. 'हाती घ्याल ते तडीस न्या' या उक्तीप्रमाणे खेळाडूंसाठी निर्धारित केलेल्या उदिदष्टापर्यंत पोहोचण्याचा शाळा कसोशीने प्रयत्न करत आहे. देशासाठी अनेक दर्जेदार खेळाडू घडविण्याचा शाळेचा मानस आहे.

Google Drive Link -

https://drive.google.com/drive/folders/1RJgHuhw9_QrhJbVutEwQeFh_XjSGBO8G?usp=drive_link

अप्रगत विद्यार्थी विहीन गुणवत्तापूर्ण प्रगत शाळा स्पर्धा व क्रीडा क्षेत्रातील यश

शाळेचे नाव – जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, पुलई, पंचायत समिती, वर्धा, जि. वर्धा

Email ID – zpupsxhollpulai@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – सौ. प्रतिभा दिनकर गोमासे

रायगड किल्याची प्रतिकृती



21 जून आंतरराष्ट्रीय योगादिवस साजरा करतांना पुलई शाळेचे विद्यार्थी व शिक्षक



यशोगाथा क्षेत्र / विषय :



अप्रगत विद्यार्थी विहीन, गुणवत्ता पूर्ण प्रगत शाळा स्पर्धा व क्रीडा क्षेत्रातील यश.


प्रास्ताविक –

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. शासन, शिक्षण विभाग, शाळा, विविध संस्था यांचे मार्फत गुणवत्ता सुधारण्याकरिता विविध योजना, उपक्रम, प्रकल्प, विविध स्पर्धा खेळ इत्यादी माध्यमातून शाळांचा विकास केला जातो. पर्यायाने विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता साधण्याच्या सातत्याने प्रयत्न केला जातो. यात शाळा स्तरावर योग्य कार्यवाही करुन शिक्षक, मुख्याध्यापक विद्यार्थी यांचा प्रत्यक्ष सहभाग महत्वाचा आहे.

सन 2020-21 व 2021-22 या वर्षात कोरोना काळात शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता (शैक्षणिक) काही प्रमाणात कमी झाली. वर्ग 1 ते 3 ऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत येण्यास मनाई होती. परंतू शासन व जिल्हा परिषद यांचे मार्फत Online क्लासेस व Online वर्ग उपक्रम या माध्यमातून गुणवत्ता टिकवून ठेवण्याचे कार्य शिक्षकामार्फत मोठ्या प्रमाणात करण्यात आले.

कोरोना काळानंतर मागील वर्षी आक्टोंबर 2021-22 मध्ये शाळा सुरु झाल्यावर विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत येवू लागले. गुणवत्तेच्या दृष्टीने सोपे अल्पकालीन उपक्रम राबवित असतांना जिल्हा परिषद, वर्धा व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचे मार्फत जिल्हा परिषद च्या उच्च प्राथमिक शाळा करिता 100% गुणवत्ता व 100% भौतिक सुविधा हे उद्दिष्टे ठेवून अप्रगत विद्यार्थी विहीन प्रगत शाळा स्पर्धा व क्रीडा क्षेत्रातील यश स्पर्धा आयोजित केली. सदर स्पर्धेत 5 क्षेत्र व निकषांवर 200 गुणांचे स्वयं मूल्यमापन करुन गुणांकन करुन जिल्हास्तरीय पथक मार्फत कर मूल्यमापन करण्याबाबत आदेशित करण्यात आले व बक्षिस रुपाने तालुका स्तरावर प्रथम येणाऱ्या शाळेस 3 लाख दुसरा क्रमांक 2 लाख व तिसरा क्रमांक 1 लाख रुपये बक्षिस स्वरुपात देण्याचे ठरविण्यात आले. तसेच जिल्हास्तरावर 8 लाखाचे बक्षिस घेणे हेही ठरविण्यात आले.त्यानुसार आमच्या शाळेने स्वयं मूल्यांकन करुन सदर स्पर्धेत भाग घेतला त्यानुसार आम्ही 188 गुण घेवून पहिल्या पाच शाळाना पंचायत समितीत येवून पंचायत समितीत पहिला व जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळविला.

सदर उपक्रमात भाग घेतल्यामुळे शाळेच्या गुणवत्तेत वाढ होवून शाळेच्या भौतिक सुविधा व शैक्षणिक साधनांची पूर्तता करण्यास मदत झाली. गावात ही शाळेविषयी लोकांची भावना वाढली. आपली शाळा खूप चांगली झाली. शाळेविषयी विद्यार्थ्यांविषयी व शिक्षकाविषयी आपुलकीची भावना निर्माण झाली. आपल्याच गावात मुलांना 8 वी पर्यंत शिकवायचे. कुठे ही जायचे नाही. आपल्या मुलांची खरी प्रगती ही आपल्या गावातल्या शाळेतच होईल असे प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पालकांना जाणवू लागले.





अप्रगत विद्यार्थीविहीन गुणवत्तापूर्ण प्रगत शाळा स्पर्धा याविषयी नियोजन सभा.

1. मुख्याध्यापक / शिक्षक यांना विषया संदर्भात आलेल्या अडचणी किंवा त्यांनी केलेले अधिक प्रभावी काम

अप्रगत विद्यार्थीविहीन गुणवत्ता पूर्ण प्रगत शाळा ही जिल्ह्यातील सर्व शाळांकरिता गुणवत्तेची नवसंजीवनी ठरली. शाळा सुरु होवून जेमतेम दोन महिने झाले असेल तर कोरोना सुरु झाला. त्यामुळे विद्यार्थी शाळेपासून प्रत्यक्षरीत्या दूर झाले. शाळा सुरु होताच काही प्रमाणात विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड कमी झाली. कोरोना मुळे विद्यार्थी खेळ खेळत नव्हते, खेळण्याची सवय मोडली. परंतू आम्ही विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचविण्यासाठी व स्थिर राखण्याचे काम केले. यात शासनाने सुरु केलेले उपक्रम जसे की अभ्यास माला, सेतू अभ्यासक्रम, साप्ताहीक स्वाध्याय शिकू आनंदे, आकाशवाणी कार्यक्रम नाविण्यपूर्ण उपक्रम. रायगड किल्ल्याची प्रतिकृती इत्यादी उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करुन विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवले. तसेच प्रत्यक्ष गृहभेटी व प्रत्यक्ष मार्गदर्शक Online जादा वर्ग याचा वापर मोठ्या प्रमाणात केला. पाठावरील स्वाध्याय, उपक्रम कृती व तंत्राचा वापर करुन प्रत्येक विद्यार्थी कृतिशिल राहील याकडे लक्ष देण्यात आले.

शाळेतील सर्व वर्गातील सर्वच विद्यार्थ्यांची स्तर निश्चिती करुन कोणता विद्यार्थी कोणत्या स्तरावर आहेत याबाबत माहिती संकलित करुन विद्यार्थी ज्या स्तरावर आहे त्यानुसार मार्गदर्शन केले व प्रत्येक विद्यार्थी प्रगत कसा होईल. याबाबत कृती आराखडे तयार करुन त्यानुसार विद्यार्थी डोळ्यांसमोर ठेवून अध्यापन करण्यात आले.

सदर स्पर्धेतील निकषानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली. 1.भौतिक सुविधा, 2. इमारत व वर्ग खोल्या 3. शाळा मैदान व क्रीडा 4.ग्रंथालय व वाचनालय 5.प्रयोग शाळा, संगणक, स्वच्छ भारत योजना शिक्षकाचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास व शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया शिक्षक सक्षमीकरण, वर्ग व्यवस्थापन व शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया

प्रशासकीय बाबी इत्यादी सर्वच बाबतीत नियोजनपूर्वक कार्य करुन या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

स्पर्धेची तयारी करतांना भौतिक सुविधा या आधीच पूर्ण होत्या. परंतू काही सुविधा सहभाग नोंदविल्यावर केल्या. उदा.सोलर पॅन, इलेक्ट्रीक सुविधा, शाळेसाठी स्वतंत्र मीटरसह विद्युत जोडणी सर्व खोल्यांमध्ये विद्युतीकरण (वायरफिटींग) सर्व खोल्यामध्ये विद्युत दिवे व पंख्यांची सुविधा इनव्हर्टर सुविधेसह अखंड विद्युत पुरवठा सौर उर्जा पॅनलचा वापर करुन विद्युत सुविधा पूर्ण केल्या. बाला पेंटीग, नाटयीकरण, नकाशा वाचन, ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोलीची उपलब्धता, अन्य सहशालेय उपक्रम लोकसहभाग, वृक्षरोपण व वृक्षसंवर्धन,100 झाडे परिसरात लावली. शासकीय एलिमेंटरी इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत सहभाग, नवोदय, शिष्यवृत्ती इ. 5 वी व 8 वी तसेच शासन स्तरावर इयता 8 वी च्या विद्यार्थ्यांना NMMS परीक्षेत सहभाग 2018-19 या वर्षी 1) कार्तीक शेळके, 2) खुशी कोहळे, 3) अश्विनी कंगाले 4) पल्लवी राऊत हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले. त्याचप्रमाणे गावात राम हाडके योगाचे धडे देतो. आमच्या शाळेतील काही विद्यार्थी योगा स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर पोहचले. शैक्षणिक साहित्य विज्ञान प्रयोगशाळा मांडणी इत्यादी बाबतीत सर्व शिक्षकांनी खूप मेहनत घेतली. प्रामुख्याने आमच्या शाळेतील विषय शिक्षक श्री नरेश ढोके सर, श्री प्रफुल इंगोले सर, श्री रोशन कोहळे सर व श्री मडावी सर यांनी मोलाचे सहकार्य केले.

2. या अडचणीवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक / शिक्षक यांनी केलेल्या उपाय योजना किंवा मुख्याध्यापक/ शिक्षक यांनी केलेली अंमलबजावणी :

अप्रगत विद्यार्थी विहीन, गुणवत्ता पूर्ण प्रगत शाळा या उपक्रमांबाबत प्रथम डिसेबर महिन्यात, मुख्याध्यापक व 50% शिक्षकाचे प्रशिक्षण झाले. या प्रशिक्षणात 5 क्षेत्र होते. त्या प्रत्येक क्षेत्रात काही निकष दिले होते. प्रत्येक निकषाला 1 गुण असे 5 क्षेत्रातील निकषावर एकुण 200 गुण होते. प्रत्येक निकषाची नोंद आपल्या शाळेत असेल तर 1 गुण घेता येईल. तसेच 1) भौतिक सुविधा 2) शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास व शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया 3) प्रशासकीय बाबी- शाळेने ठेवावयाचे महत्वाचे अभिलेखे तथा Online नोंदी 4) अन्य सहशालेय व पूरक उपक्रम 5) शैक्षणिक गुणवत्ता विकास विद्यार्थ्यांची प्रगती तथा शैक्षणिक संपादणूक या पाच क्षेत्राशी संबंधी असणारे निकष लक्षात घेतले असता बऱ्याच गोष्टी शाळेत होत्या परंतू काही निकष पूर्ण करणे आवश्यक होते ते पूर्ण करण्याकरीता मुख्याध्यापक सौ.प्रतिभा गोमासे यांनी शाळेतील सर्व शिक्षकांची सभा घेवून त्यांना विचारले की, या उपक्रमात सहभाग घ्यायचा की नाही. तेव्हा सर्वांचे मत घेतले असता प्रयत्न करायला काही हरकत नाही. सर्वांनी होकार दर्शविला. लगेच दुसऱ्या दिवशीपासून सर्व शिक्षक, मुख्याध्यापक कामाला लागले. ज्या ज्या गोष्टी नाही त्या गोष्टी लेखी स्वरुपात नोंद घेवून त्या कशा पूर्ण करता येईल. याबाबत नियोजन केले. मुख्याध्यापक सौ.प्रतिभा गोमासे यांनी प्रशासकीय बाबी शाळेने ठेवावयाचे अभिलेखे सन 2018-19, 2019-20 सन 2020-21 या तिन्ही वर्षातील अभिलेखे पूर्ण केले तसेच शैक्षणिक गुणवत्ता विकास विद्यार्थ्यांची प्रगती आपआपल्या विषयानुरुप करण्याचे ठरविले.

श्री नरेश ढोके सर यांनी भौतिक सुविधा व शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास ही दोन क्षेत्र घेवून त्यात असणारे निकष पूर्ण केले तसेच श्री इंगोले सर यांनी अन्य सहशालेय व पूरक उपक्रम, रायगड किल्ल्याची प्रतिकृती शैक्षणीक गुणवत्ता विकास विषयांशी संबंधी निकष पूर्ण करण्याचे ठरविले आणि विद्यार्थ्यांची शैक्षणीक प्रगती जास्तीत जास्त कशी वाढेल, कृतीशील उपक्रम, कथाकथन, गप्पागोष्टी, नाटकांचे सादरीकरण इत्यादीबाबतची जबाबदारी श्री कोहळे सर व श्री मडावी सरांवर सोपविली. शाळेचा परिसर तसा नेहमीच सुसज्ज व स्वच्छ राहायचा. शाळेच्या मुख्यद्वारापासून तर मुख्याध्यापकाच्या कार्यालयापर्यंत 6 x15 फुटाच्या


आकर्षक रस्ता बनविला, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना विद्येचे झाडे लावून रस्ता आकर्षक व सुशोभित बनविला, बाला पेन्टीगचे 51 आकर्षक तक्ते/ चार्ट बनविले ते विद्यार्थ्यांच्या गुणवतेच्या दृष्टने शालेय परसबाग – वांगी, टमाटर, पालक, मेथी, मिरची, पपई, सांभार इत्यादीनी भरगच्च होती. तसेच फुलबाग- मोगरा, वेगवेगळ्या रंगाची बंडीग गुलाबाची फुले कार्यालयात येणाऱ्या-जाणाऱ्याची मने मोहीत करणारी होती. शाळेतील शिक्षक श्री प्रफुल इंगोले सर यांच्या मार्गदर्शनातून छत्रपती शिवाजीमहाराजकालीन किल्ले रायगड प्रतिकृती विद्यार्थ्यांनी बनविली व त्या किल्ल्याला मा.शिक्षणाधिकारी सोनवणे साहेब, मा.तायडे साहेब, कुमरे साहेब यांनी मा. डायट वर्धाचे वरिष्ठ अधिव्याख्याता मा.रत्नमाला खडके मॅडम व प्राचार्य मा. मंगेश घोगरे साहेब यांनी शाळेला भेट देवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी नाटकाचे सादरीकरण केले तेही अगदी नाविण्यपूर्ण याबाबतीत सुध्दा मान्यवरांनी फुल देवुन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. असे अनेक उपक्रम राबविण्यात आले ज्यात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रांगोळी स्पर्धा, गणितीय दिवस, राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्य प्रश्नमंजुषा, बाल आनंद मेळावा, वृक्षारोपण, शाळेबाहेरची शाळा या मा. विभागीय आयुक्त कार्यालय गुणवत्ता विकास उपक्रमात शाळेतील दोन विद्यार्थीनीचा सहभाग, राष्ट्रीय स्तरापर्यंत खो-खो च्या टीम , राष्ट्रीय स्तरावर योगा स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळविणारा वर्ग 8 मधील सुजल विनायक कोहळे, कला व संगीत यामध्ये शाळेतील इयत्ता 2 री चा विद्यार्थी कार्तिक किसनाजी बावणे तबला वादक अप्रतिम वादय सराव इत्यादी महत्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी शाळेच्या संरक्षक भिंतीवर वारली चित्रकला पेटींग काढून विविध प्रसंग रेखाटले त्यात वारली पेटींग क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला अनुसरुन असल्यामुळे विशेष आकर्षण ठरले. वर्धा आकाशवाणी केंद्राला इ. 1 ते 4 विद्यार्थ्यांचे बडबड गीते, संवादाचे सादरीकरण करुन दाखविले.

सदर कार्य करतांना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री किसनाजी बावणे व सर्व सदस्यगण यांनी वेळोवेळी मोलाचे सहकार्य केले व समाज सहभाग गोळा करण्याकरिता विशिष्ट वेळ देवून आर्थिक मदतीकरिता स्वत: आणि इतरांकडून फुल नाही फुलाची पाकळी मिळवून देण्याकरिता खूप मोठे योगदान दिले. या आर्थिक मदतीमुळे शाळेची रंगरंगोटी, वॉल पेटिंग, सोलर पॅनल, रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था पूर्ण झाली.

3. मुख्याध्यापक शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेल्या अंमलबजावणी नंतर दृश्य परिणाम.

अप्रगत विद्यार्थी विहीन गुणवत्तापूर्ण प्रगत शाळा या स्पर्धेत भाग घेतल्यापासूनच शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेच्या बाबतीत उत्साह वाढला .सर्व शिक्षकांनी अगदी मनापासून प्रत्येक विद्यार्थी प्रगत कसा होईल यासाठी विशेष उपक्रम खेळ व कृती, प्रकल्प ज्यादा वेळ देवून 100% विद्यार्थ्यांना समजपूर्वक वाचन करता आले आणि गणितीय मूलभूत क्रिया इयत्तेनुसार करता आल्या. तपासणी पथकांनी एक-एक विद्यार्थी घेवून त्यांची भाषेची व गणितीय चार मूलभूत क्रियांची गुणवत्ता कमालीची दिसून आली.

शाळेची विविध साधने व ई लर्निगच्या साहित्याची सुविधा उपलब्ध झाली. शाळेत गुणवत्ता पूर्ण शैक्षणिक वातावरण निर्मिती होवून विद्यार्थ्यांचा, पालकांचा व शिक्षकांचा उत्साह वृध्दिंगत झाला आणि शिक्षणाबद्दल, स्पर्धा परीक्षेबद्दल तसेच खेळाबद्दल आवड निर्माण होवून उपस्थितीचे प्रमाण वाढले. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये जागृकता निर्माण झाली. चढओढ निर्माण झाली. त्यामुळे शिक्षकांमध्ये कार्य करण्याची क्षमता वाढली. शिक्षक सहजतेने कोणतेही कार्य करण्यास तत्पर असतात.



समारोप -

जिल्हा परिषद वर्धा व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या मार्फत स्पर्धा राबविली त्यात भाग घेताना आम्हाला खूप आनंद झाला. शाळेसाठी व विद्यार्थ्यांसाठी काही विशेष कार्य करण्याची संधी या निमित्ताने मिळाली. त्या संधीचे सोने करुन आमच्या जि.प. उच्च प्राथमिक शाळा पुलई या शाळेला तालुक्यात/ पंचायत समिती स्तरावर प्रथम पारितोषिक मिळाले.

आमची शाळा या स्पर्धेत सहभागी झाली. या स्पर्धेमुळे शाळेला खूप फायदा झाला व आज आमची शाळा वर्धा पंचायत समितीत एक आदर्श व नाविण्यपूर्ण उपक्रमशील शाळा म्हणून नावारुपास आली. यांचा आम्हां सर्व शिक्षकांना सार्थ अभिमान व समाधान आहे.


ऋणनिर्देश -

अप्रगत विद्यार्थीविहीन गुणवत्ता पूर्ण प्रगत शाळा स्पर्धा वर्धा जिल्ह्यातील सर्वच शाळेत विद्यार्थ्यांची गुणवत्ता, भौतिक विकास, उपक्रमाची निश्चिती करणे व शालेय कामकाज व अभिलेखे या सह अनेक बाबतीत अतिशय प्रभावी फायदेशीर ठरली. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, मा. मुख्याधिकारी अधिकारी व मा. प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी गुणवत्ता विकासाचा महत्वपूर्ण उपक्रम राबवून आम्हाला ही दिशा दिली. हा उपक्रम संपूर्ण राज्यातील जि. प. च्या शाळेतील गुणवत्ता वाढीस फायदेशीर होईल. त्या निमित्ताने या स्पर्धेत आमच्या शाळेचा प्रथम क्रमांक आल्यामुळे आमची शाळा वरील सर्व मान्यवराचे सदैव ऋण व्यक्त करते.

या स्पर्धेत आमच्या शाळेस वेळोवेळी मार्गदर्शन करणारे मा.तायडे साहेब विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी सुभाष खिराळे साहेब,पंचायत समिती वर्धा, सर्व विस्तार अधिकारी, सर्व विषय तज्ञ, फिरते विषय शिक्षक, मा.केंद्र प्रमुख श्री. रमेश जाधव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

तसेच पुलई गावातील सर्व पदाधिकारी सरपंच मा.अमितभाऊ जगताप, भाजप जिल्हा अध्यक्ष मा. सुनिलभाऊ गफाट व मा.जयश्रीताई सुनिलराव गफाट माजी शिक्षण सभापती तथा जिल्हा परिषद सदस्या वर्धा, मा. किसनाजी बावणे अध्यक्ष, सर्व सदस्यगण शाळा व्यवस्थापन समिती पुलई, सर्व पालक वर्ग, शाळेतील सर्व शिक्षक, शालेय पोषण आहार स्वयंपाकी शुभांगी डांगे व अशोक डांगे, गावातील बचत गट व गावातील माजी विद्यार्थी यांनीही या स्पर्धेत आम्हाला खूप सहकार्य केले. या सर्वांप्रती शाळेतर्फे मी मुख्याध्यापिका प्रतिभा गोमास मनापासून कृतज्ञता व्यक्त करते. धन्यवाद!

क्षणचित्रे - शाळासिध्दी उपक्रमांतर्गत पुलई शाळेचे पाच विदयार्थी व एक शिक्षक या शैक्षणिक अभ्यास दौरा करण्याकरता सहभागी.



दिल्ली दौरा











अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी पालक आणि विद्यार्थी यांना मार्गदर्शन



सन्मा. गावंडे साहेब, गटविकास अधिकारी यांच्याहस्ते गुणगौरव



मा. सोनवणे साहेब शिक्षणाधिकारी (प्राथ.) व डायट वर्धाचे प्रा. मंगेशजी घोगरे साहेब अधिव्याख्याता मा. रत्नमाला खोडके मॅडम, मा. गावंडे मॅडम, गटशिक्षणाधिकारी सुभाष खिराळे साहेब, यांच्या हस्ते गुणगौरव



तालुका स्तरीय प्रथम पारीतोषिक मान्यवराच्या हस्ते स्विकारतांना मुख्याध्यापक व शाळेतील सर्व शिक्षकवृंद, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी



जिल्हा स्तरावर लोकनृत्य सादर करणाऱ्या जि.प. उच्च प्राथमिक शाळा, पुलई येथील विद्यार्थीनी



जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, पुलई येथील विद्यार्थी बोलक्या भिंतीचा वाचनाचा आस्वाद घेतांना..




NMMS परीक्षा 2023 पात्र विद्यार्थ्यांचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री रोहनजी घुगे साहेब यांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन





अप्रगत विद्यार्थीविहीन गुणवत्तापूर्ण शाळा तपासणी पथकासमोर विद्यार्थी गणित सोडवून दाखवितांना.





बजाज सायन्स सेंटर, वर्धा येथे

कार्यशाळेत पुलई शाळेचे विद्यार्थी निवासी कॅम्पमध्ये सहभागी



पुलई शाळेच्या विद्यार्थिनींनी जिंकली विभागीय खो-खो स्पर्धा




वर्धा : जिल्हा परिषदेच्या पुलई उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींच्या खो-खो चमूने विभागीय स्पर्धा जिंकून वर्धा जिल्ह्याचे प्रभुत्व पुन्हा एकदा सिद्ध केले.

क्रीडा व युवक संचालनालय पुणेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धा २०१६-१७ चंद्रपूर येथे पार पडल्या. नागपूर विभागीय या स्पर्धांमध्ये खो-खो स्पर्धा पुलईच्या उच्च प्राथमिक शाळेतील १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने जिंकली. दुसऱ्यांदा ही स्पर्धा या संघाने जिंकली आहे. सदर संघ औरंगाबाद येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये दुसऱ्यांदा नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करेल. या संघाची कर्णधार म्हणून निकिता शेंदरे, पायल सरोदे, समीक्षा शेळके, मयूरी शिंदे, प्रतीक्षा बावणे, वेदांती डांगे, ऋतुजा लोणकर, अबोली नेहारे, साक्षी रामटेके, आश्विनी कंगाले, भूमिका सुखदेवे, आस्था चोराटे यांचा समावेश आहे. विभागीय क्रीडा स्पर्धेत तसेच जिल्हास्तरीय इतर स्पर्धांमध्ये १०० मीटर धावस्पर्धा मयूरी शिंदे, २०० मीटरची स्पर्धा तेजल कोराम यांनी जिंकली. आता त्या भंडारा येथे होणाऱ्या विभागीय धाव स्पर्धेत वर्धा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विभागीय स्पर्धा जिंकणाऱ्या संघास प्रफुल्ल इंगोले मार्गदर्शन करीत आहे.



राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त व गणितीय दिवस या निमित्त रांगोळी स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग .



मा.जिल्हाधिकारी व मा. आयुक्त यांच्या हस्ते धनादेश व सन्मानपत्र देवुन पुलई शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकवृंदास गौरवित केले.



जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा
शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, वर्धा तथा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

अप्रगत विद्यार्थी विहीन गुणवत्तापूर्ण
प्रगत शाळा पारितोषिक योजना
सन २०२१-२२

सन्मानपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

जि.प. उच्च प्राथ. शाळा पुलई तालुका वर्धा या शाळेने सदर उपक्रमांतर्गत

तालुकास्तरीय शाळा मूल्यांकनात प्रथम/द्वितीय/तृतीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल

सदर प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

हार्दिक अभिनंदन!

स्थळ : जि.प. वर्धा
दिनांक : 18.04.2022

श्री. शिवाजी सोनवणे, शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, वर्धा
डॉ. मंगेश घोगरे, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा
डॉ. सचिन ओम्बासे (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा
श्रीमती प्रेरणा देशभ्रतार (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा
मा. श्री. सुनील केदार, पालकमंत्री, जिल्हा वर्धा





पुलई शाळेच्या विद्यार्थ्यांनी भिंतीवर काढलेले वारली चित्र लेखाटन.

यशोगाथा लिंक -

https://drive.google.com/file/d/13TCjY80-qAbgowh7SbvyOdDpYnrsxRfS/view?usp=drivesdk


https://drive.google.com/file/d/131NZqViNM8lVLzcm3nQ3LKgU8Q78TBC2/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/13VinjuAcibwRXzF5LRncextQbbk_KRbr/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/13wdgmY2mZMo78u3-ixFh7srSYzUFYImG/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/147Zb-FElAy8yH8QTHfU1c0Ewdfq6KXOC/view?usp=drivesdk

https://www.youtube.com/watch?v=LUZ-bL1vmP8



बागेतील फुले व गुणवत्तापूर्ण मुले

शाळेचे नाव - जि.प.प्राथमिक शाळा,सुलतानपूर,केन्द्र.आजंती,पो.सावली(वाघ),ता.हिंगणघाट, जि.वर्धा.

मुख्याध्यापकाचे नाव - कु. शुभांगिनी मनोहरराव वासनिक



शाळेचा दर्शनी फ़ोटो

Link of the school video -

https://youtu.be/Ls35TWk58BM

https://youtu.be/J2_FNMdfVzo

मी आणि माझी सहाय्यक शिक्षिका सन 2016 -17 ला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुलतानपूर येथे रुजू झालो. दोघींचाही काम करण्याचा उत्साह व आनंद ओथंबून वाहत होता. परंतु एखाद्या स्वप्नातून जाग यावी व वास्तव डोळ्यासमोर काही औरच यावे असं प्रत्यक्ष तिथे रुजू झाल्याचे चित्र होतं. त्याला कारणही तसंच होतं, पालकांचा जिल्हा परिषदेच्या शाळेकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन, शाळेविषयीची अनास्था, शाळेचे ओसाड अंगण, 1963 बांधकाम असलेली शाळेची जीर्ण झालेली इमारत, फरशांना भेगा गेलेल्या त्या ही अशा की, कुठून कधी आणि कसे साप विंचू बाहेर येतील याचा अजिबात नेम नसलेल्या आणि पावसाळ्यात तर काही विचारायची सोय नाही एखाद्या चाळणीतून पाणी गळावे तसेच शाळेचे छत गळायचे.



शाळेची पूर्वस्थिती

कुठे बसायचे? आणि कसे शिकवायचे? अशा अनेकविध समस्यांचा डोंगर समोर उभा होता ह्या सगळ्यातून मार्ग काढत अध्यापन कार्याकडे वळलो असता, जास्तीत जास्त विद्यार्थी अनुपस्थित असायचे.विद्यार्थ्यांमधे आत्मविश्वासाचा अभाव होता. भाषेच्या संदर्भात फक्त मुळाक्षरांची ओळख होती. गणिताबद्दल तर काही विचारायलाच नको, पायाभूत कल्पनाही स्पष्ट नव्हत्या. त्यामुळे विद्यार्थी गोंधळून जायचे. दोघींचाही आपापल्या वर्गाबाबत चा अनुभव सारखाच होता. आज जिकडे-तिकडे तंत्रज्ञानाचे वारे वाहत होते, परंतु तंत्रज्ञान म्हणजे काय या कल्पनेपासूनही येथील विद्यार्थी व पालक कोसोदूर होते. शाळेची संपूर्ण स्थिती बघता अतिशय नैराश्य आणणारी होती. परंतु दोघींनीही ठरविले की हया अडचणींचा बाऊ न करता त्या अडचणींनाच संधी समजून कार्य करायचे.व कंबर कसून नव्या प्रवासाची सुरुवात केली. सुरुवातच होती ती 'गुणवत्तापूर्ण मुले व बागेतील फुले' कारण हे उद्दिष्ट लवकर साध्य होणारे नसून त्याचे परिणाम दीर्घ काळाने दिसणारे होते. विद्यार्थ्यांना हिरवळयुक्त फुले असलेला परिसर आवडतो,विद्यार्थी तेथे रमतो त्यामुळे हातात घेतली ती लॉन युक्त व फुलांनी सजलेली छोटीशी बाग निर्माण करण्याचे कार्य. शाळा छोटीशी विद्यार्थीही वयाने छोटेसे. दोघींनीही पुढाकार घेऊन सकाळी नऊ वाजता शाळेत येणे,खड्डे खणणे, नर्सरीतून स्वखर्चातून,मिळेल तेथून फुलझाडे गोळा करणे, परिपाठाच्या आधी त्या रोपांची लागवड करणे, हे नित्याने सुरू केले .हे करत असताना शाळेतील दोन शिक्षिका हे काम करतात म्हणून सुरवातीला लोक मजा घेण्याच्या दृष्टिने आमच्याकडे बघत होते. परंतू कामातील सातत्य बघून गावातील तरुणवर्ग आपोआपच सहकार्याच्या भावनेने मदतीला धावून आला. शाळेतील लहान विद्यार्थीही या कार्यात त्यांच्या क्षमतेनुसार सहभाग घेऊ लागली. त्यांना शाळेबद्दल आपुलकी वाटू लागली. माझा देखील या कार्यात वाटा असावा, ही भावना निर्माण झाली व विद्यार्थी शाळेकडे आकर्षित झाले. बाह्य सजावटीसाठी करत असलेल्या या प्रयत्नांची मदत शाळेच्या आंतरिक बदलासाठी मोलाची ठरली. मॅडम मला विचारतात, माझा कार्यात सहभाग घेतात . माझी आस्थेने चौकशी करतात, ही भावना मुलांना सुखावून गेली. व शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढू लागली. आधीच ठरविलेले उद्दिष्ट होते की, 'बागेतील फुले व गुणवत्तापूर्ण मुले,' या उद्दिष्टपूर्तीसाठी आम्ही कामाला लागलो. ज्ञानरचनावाद या पद्धतीचा अवलंब केला. शैक्षणिक साहित्य निर्मिती केली. प्रत्येक विद्यार्थ्यांचा स्तर ओळखून स्तर निहाय अध्यापन सुरू केले. प्रत्येक विद्यार्थी सहभागी होतील अशा कृतींचे आयोजन करण्यात आले. याचा परिणाम असा दिसू लागला की विद्यार्थी नियमित शाळेत उपस्थित राहू लागले. अनेकाविध कृतीतून शिकण्याचा आनंद घेऊ लागले. आज मॅडम नवीन काय सांगणार याची त्यांची दररोजची उत्सुकता वाढतच होती. त्यांची शिकण्याची समजण्याची गती दिवसेनदिवस वाढतच होती. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत 25 निकष पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र वरील 25 निकषांची परीपूर्तता करणारा पाठ शाळेवर राबवला. मुले 25 निकशात खरी उतरू लागली. 25 निकषांची पूर्तता करणारा पाठ इतरांनाही मार्गदर्शक ठरावा,या हेतूने मे 2017 च्या जीवन शिक्षण मासिक मध्ये 'शिकूया भाषा नव्या पद्धतीने' या शीर्षकाखाली प्रकाशित झाला.

गणिताचे विद्यार्थी बेरीज, वजाबाकी, गुणाकार. भागाकार,स्थानिक किंमत, दर्शनी किंमत, विस्तारित रूप. अब्जावधी संख्यांचे वाचन व लेखन, गणिताचा व्यवहारात उपयोग इतकेच नव्हे तर दोन - अंकी तीन अंकी संख्यांचा पाढा तयार करून एका स्ट्रोकमध्ये आत्मविश्वासपूर्वक गुणाकार, भागाकार क्रिया करू लागले. ज्ञानरचनावादातील विविध पद्धती, जसे गुणाकाराची गणेश पद्धती,साहित्याचा वापर करून

भागाकार म्हणजे समान वाटणी, ही संकल्पना रुजू लागली. आणि नोटांच्या माध्यमातून वजाबाकी क्रिया जलद व अचूक रित्या करू लागले. सुरुवातीला जे गणित गोंधळात टाकणारे होते. तेच गणित करताना आता त्यांना आनंद होत होता. दिवसंदिवस विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची भूक ही अधिकच वाढत होती. आता समोर काय हा प्रश्न त्यांची उत्सुकता वाढतच होता. त्यातूनच स्वयंअध्ययन बोर्डची कल्पना उदयास आली.

शाळेच्या प्रांगणात प्रवेशद्वाराजवळच स्वयंअध्ययन बोर्ड उभारल्या गेले.विद्यार्थी फावल्या वेळात तेथे स्वयं अध्ययन करू लागले. सुट्टीच्या दिवसात ही शाळेच्या आवारात बसून अध्ययन करू लागले. हे सर्व चित्र गावकऱ्यांसाठीही कुतूहलाचे होते. हा उपक्रम गावकऱ्यांचा, पालकांचा दृष्टिकोन बदलण्यासाठी उपयोगी ठरला. हे सर्व करत असताना आमचे कित्येक शनिवार,रविवार सुट्ट्यांचे दिवस शाळेतच गेले. आमच्या उद्दिष्टपूर्तीच्या मार्गात आनंदात या सुट्ट्याही शाळेला दिल्याचा आनंद काही औरच होता. या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रवास विद्यार्थी घरापर्यंत नेत होते. शाळेत काहीतरी सुरू आहे या जाणिवेने पालक शाळेशी सुसंवाद साधू लागले .पालकांचा शाळेविषयी चा दृष्टीकोन बदलू लागला.



आमच्या अध्यापनाला तंत्रज्ञानाची जोड मिळावी असे आम्हाला नेहमीच वाटायचे. त्यासाठी गरज होती ती लोकसहभागाची. पालकांचा बदललेला हा दृष्टिकोण लोकसहभाग मिळविण्यासाठी पोषक ठरला. व बजाज फाउंडेशन चा पहिला एलईडी विथ एअर पीसी शाळेला प्राप्त झाला. विद्यार्थ्यांची अध्ययनाची गती अधिक वाढली. आमची मुलं कम्प्युटरवर शिकतात याचा त्यांच्या पालकांना अतिशय आनंद वाटू लागला.

विद्यार्थ्यांच्या संकल्पना मूर्त रूपात स्पष्ट होऊ लागल्या. अशातच ठरविलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठीच्या दिशेने वाटचाल होत होती. शाळेच्या भौतिक सुविधा बदलविण्याचा दृष्टीने मनात विचारांचे काहूर माजू लागले. कारण करायचं खूप होतं पण गरज होती ती आर्थिक पाठबळाची. दात्यांचा शोध घेत असतानाच टीव्ही टेक्स्टाईल चे प्रबंधक श्री.भूपेन्द्र शहाणे साहेब यांना शाळेला भेट देण्यास आमंत्रित करण्यात आले .व योगही तसाच जुळून आला. वेळेच्या अतिव्यस्ततेमुळे पाच मिनिटांसाठी ते शाळेत आले व विद्यार्थ्यांना प्रश्न विचारता - विचारता त्यांना पाच कधी वाजले हे कळलेच नाही.

विद्यार्थी प्रात्यक्षिक करताना



दुसऱ्या दिवशीच त्यांचा फोन आला. आणि त्यांनी शाळेला एक लक्ष रुपयांचा धनादेश सी एस आर फंड अंतर्गत देत असल्याचे सांगितले. आमच्या आनंदाला पारावार उरला नाही. कारण जे- जे मनात ठरविले होते ते सत्यात उतरण्याची वेळ आली होती. मिळालेल्या सीएसआर फंड मधून सर्वप्रथम शाळेचे अंतर्बाह्य रूप पालटवले.



P. V. Textile, Jam तर्फे एक लक्ष रुपयांचा धनादेश प्राप्त

बोलक्या भिंती, आकर्षक चित्रे, वर्ग सजावट, नकाशे, अध्ययनास पोषक वातावरण निर्मिती, करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा व स्वच्छतेचा विचार करता हॅन्ड वॉशस्टेशन, मुलांसाठी,मुलींसाठी टाईल्ससह, नळाच्या सुविधेसह टॉयलेट्स बांधण्यात आले. विद्यार्थ्यांना बसायला डेक्स बेंच ची सुविधा करून घेतली. लॉन युक्त आकर्षक फुल झाडांसह परिसर तयार करण्यात आला. जिथे विद्यार्थी रमू लागले. शाळेचे अंतर्बाह्य बदललेले रूप व त्याचा सन्मान करण्यासाठी 'सन्मान दातृत्वाचा 'कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास आमदार श्री समीर भाऊ कुणावर यांना आमंत्रित करण्यात आले. जिल्हास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवात आमच्या शाळेतील विद्यार्थिनी गंगुबाईची भूमिका नाट्यछटेतून मांडून जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान पटकावला व बक्षीस समारंभाच्या अनुषंगाने आमची शाळा आमदार साहेबांच्या लक्षात होतीच व इथे आल्यानंतर विद्यार्थ्यांनी ज्ञानरचनावादाने केलेल्या कृतीचे प्रात्यक्षिक पाहून,आमदार साहेबांची इंग्लिश मध्ये अस्खलितपणे घेतलेली मुलाखत पाहुन, आमदार साहेब भारावून गेले व ग्रामीण भागातील विद्यार्थी ही शहरी विद्यार्थ्याचा तुलनेत कुठेही कमी नाही. हे आपल्या भाषणातून मनोगत व्यक्त करून मी,ही शाळा आत्ताच दत्तक घेत आहो असे जाहीर केले. आपल्या आश्वासनाची पूर्तता करत शाळेला 'दोन लक्ष बारा हजार नवशे नव्यान्नव' रुपयाची डिजिटल साधने प्राप्त करुन दिले.



आमदार निधीतून डिजिटल साहित्य प्राप्त

अशाप्रकारे आम्ही प्रगतीचा एक एक टप्पा गाठत गेलो. परंतु अजूनही प्रश्न आवासून उभा होता तो गळक्या छपराचा. गावकऱ्यांच्या सहकार्याने जिल्हा परिषद अध्यक्षांकडे हा प्रश्न मांडला. त्यांनीदेखील शाळेची प्रगती बघता, शाळेला तीन लक्ष छ्यान्नव हजार रुपयाची ची मेजर रिपेरिंग मंजूर केली. आता आमच्या इमारतीच प्रश्न सुटला नव्हता तर टाईल्ससह सुसज्ज अशी इमारत तयार झाली होती.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ पाणी आवश्यक होते. तेव्हा ग्रामपंचायतला अर्ज केला असता 14 व्या वित्त आयोगातून तीस हजार रुपयाचे आरो वॉटर प्लांट शाळेला त्यांनी मिळाला.

शाळा आता गुणवत्तापूर्ण शिक्षणा बरोबरच भौतिक सुविधेने ही परिपूर्ण होत होती. शाळेला हॅट्रिकचान्स मिळाला तो पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या माध्यमातून! सलग तीन वर्ष आमचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरत आहेत. नाट्यक्षेत्रात प्रथम क्रमांक मिळणारी आमची विद्यार्थिनी 'कुमारी सुहानी भगत हिने 'बिन्हाड' ह्या चित्रपटात बालकलाकाराची भूमिका वठवली आहे. प्रवास इथेच न थांबता कॉन्व्हेंटच्या युगात प्रेरणादायी ठरणारी ही शाळा ब्लेजर गणवेश युक्त असावी असणारी या उद्देशाने वणा नागरी सहकारी बँकेचे संचालक श्री. सुधीर बाबु कोठारी यांच्याशी भेट घेऊन त्यांच्या सहकार्याने लोकसहभागातून हिंगणघाट मधील पहिली 'ब्लेझर गणवेश' असलेली शाळा असण्याचा बहुमानही आमच्या

सुलतानपूर च्या शाळेला प्राप्त झाला आहे. अशाप्रकारे शाळेचा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रवास हा अविरतपणे सुरू आहे त्यासाठी शाळा विविध उपक्रम राबवित आहे.


गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राबवलेले विविध उपक्रम -

1. शंभर टक्के उपस्थितीस बक्षीस (मासिक)

जोपर्यंत विद्यार्थी जास्तीत जास्त उपस्थित राहणार नाहीत, तोपर्यंत तो लवकर शिकणार नाही म्हणून विद्यार्थी 100% शाळेत उपस्थित राहणे आवश्यक ठरते. म्हणून महिन्याच्या शेवटी जो विद्यार्थी जास्तीत जास्त उपस्थित राहील त्यास बक्षीस देण्यात येते ह्या महिन्यात जरी मला बक्षीस मिळाले नाही तरी पुढल्या महिन्यात बक्षीस मिळालेच पाहिजे, ही भावना वर्गातील विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होऊन जास्तीत जास्त विद्यार्थी शाळेत उपस्थित राहतात. म्हणून वर्गाची उपस्थिती ही नेहमीच शंभर टक्के असते.

2.शिक्षक व विद्यार्थी यांचे एकरूपतेचे नाते -

माझ्या बाई अगदी माझ्या आईसारखीच आहे. त्या वेगळ्या नाहीत. ही भावना विद्यार्थ्यांच्या भावविश्वाला स्पर्शून जाणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्यांच्याजवळ जाऊन बसणे, त्यांच्या कुटुंबाविषयी प्रश्न विचारणे,त्यांच्या आवडीनिवडी वर चर्चा करणे, त्यांच्यासाठी खाऊ नेणे, त्यांच्यासोबत खेळने... या अगदी छोट्या छोट्या गोष्टी परंतु विद्यार्थ्यांच्या जवळ येणाऱ्या. त्यांना आपल्याकडे ओढणाऱ्या. व शिक्षकांविषयी विद्यार्थ्यांना जी अनामिक भीती असते ती आपल्या या कृतीमुळे निश्चितच कमी होते. अशा प्रकारे विद्यार्थ्यांशी अगदी भरभरून गप्पा मारल्यास ते आपले सुखदुःख, आवडीनिवडी, त्यांचे बालविश्व, निरागस मन, सर्वकाही शिक्षका जवळ उलगडतात. विद्यार्थ्यांना दिलेले महत्त्व त्यामुळे त्यांना 'स्व ' ची जाणीव होत असते.





3. विद्यार्थी अध्ययन जोडी -

फक्त हुशार विद्यार्थ्यांचा विचार न करता, जे विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या मागे पडलेली आहेत, त्यांच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होऊ नये म्हणून त्यांच्यासाठी देखील उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. जसे वर्गातील प्रगत विद्यार्थ्यांची जोडी, मागे पडलेल्या विद्यार्थ्यासोबत लावणे. प्रगत विद्यार्थ्यांकडे त्यांच्या गृहपाठात मदत करण्याची जबाबदारी सोपविणे. शिवाय प्रगत विद्यार्थ्यांच्या तुलनेत सोप्या प्रकारचा गृहपाठ देणे. जेणेकरून 'आय कॅन डू' ही भावना त्याच्या मनात खोलवर रुजली जावी व 'सोप्या कडून कठीणाकडे' या सूत्रांची अंमलबजावणी व्हावी. याप्रमाणे कार्य करून परिपाठाचे वेळी जबाबदारी स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांचे व अप्रगत विद्यार्थ्याने पूर्ण केलेल्या गृहपाठा बद्दल त्याला ही कौतुकाची थाप देणे. याप्रमाणे केलेल्या उपक्रमांमुळे माझ्या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वृद्धिंगत झालेला आहे. शिवाय शाळा ही 100% प्रगत झालेली आहे.



4. संदर्भ साहित्याची उपलब्धता –

जे विद्यार्थी हुशार आहेत त्यांना केवळ पाठ्यपुस्तके पुरेशी नसतात. त्यांची भूक ही मोठी असते. ग्रामीण भागातील विद्यार्थी हा आजही माहिती किंवा ज्ञान मिळविण्याच्या संदर्भात शिक्षका वरच अवलंबून आहे. आजही ग्रामीण भागात वर्तमानपत्रे ही येत नाही. म्हणून त्यांना अधिकचे संदर्भ साहित्य पुरविणे जसे दैनंदिन वर्तमानपत्र, मासिके, तसेच शाळेत उपलब्ध असलेले वाचनालयातील पुस्तके नियमित वाचनास देणे, व त्याचे टिपण काढावयास लावणे, दैनंदिन परिपाठाचे वेळी त्याचे वाचन घेणे, व अभिनंदन करणे.....अशा प्रकारची कृती घेणे यामुळे जे विद्यार्थी मागे होते ते ही प्रवाहात येण्याचा प्रयत्न करू लागले व 'फुलासंगे मातीस वास लागे' या उक्तीप्रमाणे आम्हास परिणाम दिसून आला तो म्हणजे असा की, विद्यार्थ्यांमध्ये चढाओढ, स्पर्धा निर्माण होऊन 100 % विद्यार्थी प्रगत झाले.

5. सत्कृत्य लेखन –

विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रुजवणूक व्हावी, चांगलं वाईट याची जाण निर्माण व्हावी, चांगले कार्य केल्याने होणारा आनंद, मनाला होणारी संवेदना, सौजन्यशीलता, व समाधान याची जाणीव व्हावी, या उद्देशाने 'सत्कृत्य लेखन' हा उपक्रम आम्ही सुरु केला. रोज सकाळपासून सायंकाळ पर्यंत दैनंदिन वेळेत मी काय केले याचे सायंकाळी अवलोकन करणे, मी केलेलं चांगलं काम याचं लेखन करायला लावायच व दुसऱ्या दिवशी त्याच वाचन घ्यायच अस नित्यनियमाने सुरू केल. त्यातून 'चांगलं काम ' याची रोजनिशी

तयार झाली आणि हळू सर्व विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक परिवर्तन होताना दिसून आले. आणि संस्काराची शिदोरी विद्यार्थ्यांच्या गाठीला बांधली जात असल्याचा आनंदही आम्हाला देऊन गेली.



6. माझे अभ्यासाचे वेळापत्रक –

विद्यार्थी शाळेत अध्ययन करतो, परंतु घरचे कार्य याचे नियोजन नसल्यामुळे गृहपाठातील नियमितता यात समन्वय साधला जात नाही, असे लक्षात आले. तेव्हा सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत त्याचे मी काय करतो याचे विद्यार्थ्यांना वेळापत्रक करण्यास सांगितले. त्यात विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा वेळ फार कमी असल्याचे दिसून आले. व त्यात सर्व विषयांचा समावेश होत नाही हेही लक्षात आले. तेव्हा ठरवले की प्रत्येकाचा अभ्यासाचा वेग जरी वेगळा असला तरी त्यांना एक नियोजनबद्ध वेळापत्रक दिल्यास एक दिशा ठरेल तेव्हा ही दिशा 'माझे अभ्यासाचे वेळापत्रक' या उपक्रमाने ठरले आणि 'सकाळी सहा वाजता पासून सायंकाळी दहा वाजेपर्यंत' व 'सायंकाळी सहा वाजता पासून तर दहा वाजेपर्यंत', विषयानुसार वाचन-लेखन, गणन, पाठांतर, खेळ, चित्रकला, स्वाध्याय पुस्तिका सोडविणे, सामान्य ज्ञान.... इत्यादींची वेळेच्या नियोजनात वाटणी करून एक वेळापत्रक तयार केले. त्यात शनिवारच्या सकाळच्या शाळेतील दुपारी बारा वाजता पासून व सुट्टीच्या दिवशी व रविवारच्या काळात कौशल्य प्रधान उपक्रम देऊन वेळापत्रक तयार करण्यात आले व त्याची कार्यवाही अमलात आणली विद्यार्थ्यांचा नियोजन बद्ध व नियमित अभ्यास होऊ लागला. वाचन व लेखन गतीत कमालीची प्रगती दिसून आली. एवढेच नव्हे तर विद्यार्थी स्वतः गृहपाठाची स्वरूप ठरवू लागले. वेळ, सण, सुट्टया व झालेल्या पाठयक्रमावर नियोजन बद्ध स्वाध्याय देऊ लागले. गृहपाठ मी तयार करतो या भावनेने त्यांच्यामध्ये निर्णय क्षमता, आत्मविश्वास, परिपक्वता यात वाढ

झाल्याचा अनुभव आला. आजही विद्यार्थी याच वेळापत्रका ने अध्ययन करतात याचा आनंद वाटतो. व आत्मविश्वासाचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर झळकताना दिसते.

7. कलागुणांना वाव व जोपासना –

सांस्कृतिक विकास हा व्यक्तिमत्व विकासाचा अविभाज्य घटक. म्हणून शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय नियोजनबद्धरीत्या साजरा केला जातो .सन 2016 -17 मध्ये माझ्या विद्यार्थिनीला नाट्यछटेत तयार केलं. तिच्यात मुळातच कलागुण होते. त्याला वाव मिळाला. त्याला स्क्रिप्ट व अभिनयाची जोड देऊन जिल्हा परिषद शाळांच्या तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत तालुकास्तरीय पुरस्कार प्राप्त झाला 'चला प्रगत होऊ या' ही नाट्यछटा अतिशय वेगाने वर्धा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करून गेली यातूनच 2017 -18 मध्ये सुहानी अभिनय व नाट्यछटा क्षेत्रात जिल्ह्यातून प्रथम. 'चला बघूया whatsapp ची दुनिया ' या नाट्यछटेतून नव्या तंत्रज्ञानाशी आपली नाळ कशी जुळली याचे प्रात्यक्षिकच जणू सादर केले व याचेच फलित म्हणून Mगिरीवर मुलाखत व तिच्या या अभिनयामुळे 'बिन्हाड ' या चित्रपटात नायिकेच्या बालपणाची भूमिका अतिशय चांगल्या प्रकारे निभावली. असेच हिरे चमकावे अशीच आमची सदैव अपेक्षा राहील व त्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील राहू.



8. कौशल्याधिष्ठित उपक्रम –

विद्यार्थी हा सर्व गुणसंपन्न असावा, त्याचा शैक्षणिक, भावनिक,मानसिक, शारीरिक विकास व्हावा, हस्त नेत्र समन्वय साधला जावा, व बुद्धीला चालना मिळावी, यासाठी कौशल्याधिष्ठित उपक्रम शाळेत घेतले जातात. त्यात ग्रीटिंग कार्ड, आकाश कंदील तयार करणे, पणती सजावट, रांगोळी सजावट, पुष्पगुच्छ सजावट, राख्या तयार करणे, कागदापासून पाकीट तयार करणे, बागकाम करणे, परसबाग काम करणे, वाफे तयार करणे, वाफेबनवणे, बिया रुजवणे, झाडांना योग्य आकार देणे,शाळा, वर्ग, सजावट व स्वच्छता

करणे,फुलांचे हार तयार करणे, कापसापासून वाती तयार करणे..... इत्यादी उपक्रम शाळेत घेतले जातात. यातून मी करतो. मलाही करता येतं' । can do 'ही भावना वृद्धिंगत होते.

9. वाढदिवस साजरे करणे –

वाढदिवस साजरे करणे हा नाविन्यपूर्ण उपक्रम नाही .परंतु तो साजरा करताना त्याला एक कलाटणी अशी की, माझा वाढदिवस मी किती वर्षाचा, 'मी केलेले सत्कृत्य, मी केलेला संकल्प ' या स्वरुपात विद्यार्थी स्वतः बद्दलची माहिती सांगतात.

सर्व विद्यार्थी जन्मदिवसाच्या शुभेच्छा देतात.



सत्कृत्य याबाबत प्रोत्साहन व कौतुक करतात. भेटवस्तू देतात ते म्हणजे एक रोपटं. अशा प्रकारे वाढदिवस आवडीने साजरा केला जातो. यातून सत्कार्य, स्व ची जाणीव व सुजाण नागरीकतत्त्वाची वाटचाल सुरू करण्यात आली.

10. स्पर्धापरीक्षांची तयारी व यश –

विद्यार्थी हे शिक्षकाचे आराध्यदैवत. त्या देवाला लागणारे सर्व मला करता यावे ही माझी व माझ्या सहाय्यक शिक्षिकेची इच्छा. माझा विद्यार्थी शाळेतच नाही तर इतर विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत टिकावा. म्हणून लक्ष घातले ते शिष्यवृत्ती परीक्षेकडे. शिष्यवृत्ती परीक्षा व नवोदय परीक्षा यात विद्यार्थ्यांना बसवले. त्यांची परीक्षेच्या दृष्टीने तयारी करून घेतली. शॉर्ट ट्रिक्स, सामान्यज्ञान, बुद्धिमत्ता चाचणीतील तर्कवितर्क, यांचा सराव घेण्यात येतो. विविध चाचणी या वेळेत बसवून सोडून घेते, तपासून कुठे कमी पडते याचा शोध घेऊन पुन्हा पुन्हा बारकावे लक्षात घेऊन सराव करण्यात येतो. परीक्षेचा दिवस व निकालाचा दिवस या दोन्ही दिवशी अपेक्षांचं ओझं आणि प्रयत्नांची पराकाष्टा व ध्येयपूर्तीच क्षितीज यांची जुगलबंदी सुरू असते. माझे विद्यार्थी 2016-2017 मध्ये जिल्ह्यातून अनुक्रमे तीन व चार क्रमांकावर झळकले आणि प्रयत्नांना यश मिळतेच मिळते हे पुन्हा दृढ झालं.

तेच पुन्हा 2017 -18 मध्ये माझी विद्यार्थिनी सुहानी भगत हि तालुक्यातून प्रथम तर प्रेम साबळे हा तालुक्यातून चौथ्या क्रमांकावर येऊन यशाची परंपरा कायम राहिली. तसेच 2018 - 19 मध्ये कार्तिक पहुरकर हा तालुक्यातून शिष्यवृत्ती परीक्षेत पाचव्या क्रमांकावर आला आमची शिष्यवृत्ती ची ही परंपरा अशीच कायम टिकावी यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो.

11. ज्ञानरचनावादी पाठाची निर्मिती व अध्यापन –

अध्ययन-अध्यापनची नवी पद्धत 'ज्ञानरचनावाद ' या ज्ञानरचनावादी पद्धतीतून पाठाचे अध्यापन करण्यास सुरुवात केली. त्यात पाठाचे प्रकट वाचन, आरोह-अवरोह,विरामचिन्हे युक्त वाचनाचा सराव,शब्दांचा अर्थ, (समानार्थी व विरुद्धार्थी) शब्दांच्या जाती, शब्दांची माळ, डोंगर,वाक्य निर्मिती,प्रश्न निर्मिती, यमक जोडून कविता निर्मिती, कोणतेही तीन शब्द घेऊन अर्थपूर्ण व बोधपूर्ण गोष्ट तयार करणे, नाट्यीकरण करणे, कृतीयुक्त सादरीकरण करणे, कल्पनाप्रधान प्रश्नांची उत्तरे सोडविणे, पाठाला अनुसरून चित्र रेखाटन करणे, त्याचप्रमाणे कार्यात्मक व्याकरणाचा ही सराव घेऊन पाठ हा चिरकाल विद्यार्थ्यांच्या लक्षात राहून त्याचा सार विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरेल या हेतूने या उपक्रमाचे स्वरूप वाढत जाऊन विद्यार्थी उत्तम कवी होऊ शकतात याची देखील प्रचिती आली व विद्यार्थ्यांना शिकवता शिकवता 'शिकूया भाषा नव्या पद्धतीने' या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत आलेल्या 25 निकषांचा आम्ही तयार केलेला पाठ आजूबाजूच्या तालुक्यातील शिक्षकांना मार्गदर्शक तर ठरलाच. परंतू हा माहे जून 2017 चा 'जीवन शिक्षण' अंका मध्ये छापून आल्यामुळे एकाच पाठा तून एवढे निकष कसे पूर्ण करायचे हा इतर शिक्षकांना पडलेला प्रश्नही सुटला.

12. आकर्षक व मूल्यवर्धक परिपाठ –

शालेय परिपाठ हा तर जणू दिवसभरातील कार्य उत्साहाने पार पडणारा झराच आहे .त्यात सुविचार म्हणजे मनाला स्वच्छ करणारा सकारात्मक भावना जागृत करणारा व विचार करून तसे वागायला लावणारा एक अबोल गुरूच आहे. आणि असे सुविचार दैनिक परिपाठात घेऊन विद्यार्थ्यांना त्याचा अर्थ समजावून सांगण्याचा उपक्रम दररोज घेतल्या जातो. परिपाठात घेण्यात येणाऱ्या प्रार्थनेचे प्रार्थनेतील ओळीचे सुरुवातीला अर्थ समजून सांगणे व त्यानंतर गायन घेणे, यामुळे विद्यार्थ्यांना त्या प्रार्थनेच्या गायना मागे असलेली भावना कळते व विद्यार्थी तल्लीन होऊन प्रार्थनेचे गायन करतात.

13. आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर –

स्पर्धेच्या युगात माझा ग्रामीण विद्यार्थी टिकावा, त्याला तंत्रज्ञानाची, डिजिटल साहित्याची, ओळख व्हावी, साहित्य हाताळता याव व इंटरनेटचा वापर करून त्याच्या ज्ञानाची कक्षा रुंदावत विज्ञान निष्ठ तार्किकनिर्णय क्षमता वृद्धिंगत व्हावी या हेतूने समाज सहभागातून बजाज फाउंडेशन तर्फे एलईडी टीव्ही प्राप्त करून घेतला त्यातून डिजिटल साहित्याची हाताळणी अध्ययनात व अध्यापनात तंत्रज्ञानाचा विषयानुरूप वापर होऊ लागला. विद्यार्थी आनंदाने डिजिटल साहित्याचा आस्वाद घेऊ लागले. सन 2017 - 18 मध्ये 14 व्या वित्त आयोगातून 52 इंच चा स्मार्ट ओनिडा टीव्ही प्रयत्नपूर्वक प्राप्त करून घेतला आणि

विद्यार्थ्यांचा युट्युब आणि आंतरजाल शी संपर्क आला आणि विद्यार्थीच डिजिटल झाले आज माझे हे विद्यार्थी माझी शाळा युट्युब वर झळकत आहे हेच या प्रयत्न मागील यश विद्यार्थी झुम मीटिंग द्वारे दुसऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. नवनवीन गोष्टी शिकतात. गुगल क्लाऊड वरून ताजमहल, यमुना रिव्हर,वाघा बॉर्डर यांची प्रत्यक्ष भेट दिल्याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला आहे. आणि डिजिटल प्रगती हा उपक्रम साध्य झाला. तसेच विद्यार्थी इंटरॲक्टिव बोर्ड हाताळता हाताळता हे छोटे सुलतान कधी तंत्रस्नेही झाले कळलच नाही व यातूनच 'तंत्रस्नेही झाले छोटे सुलतान 'या नवोपक्रमाचा देखील उदय झाला.



14. स्वयंअध्ययन बोर्ड –

शाळा हे ज्ञानाचे मंदिर आहे. शाळेतील विद्यार्थी शालेय परिसरात अध्ययन करतात. त्याचप्रमाणे सुट्टीच्या दिवसात ही विद्यार्थी शाळेच्या भोवतालच्या परिसरात खेळतात. तेव्हा शाळेचा बहिरंग देखील हा अध्ययनाचा एक स्त्रोत असावा या हेतूने इंग्रजी, मराठी, गणित या विषयाच्या अनुषंगाने स्वयंअध्ययन बोर्डचा विचार डोक्यात आला. आणि गणिताचे नंबर चक्र, स्पेलिंग, घड्याळ यातून विविध क्रिया आणि किंमत विस्तारित रूप, सहा अंकी संख्या तयार करणे,अंकात व अक्षरात लिहिणे, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या क्रिया करणे घड्याळांमध्ये To and past असे दोन भाग केले असून वेळेत बदल करून वेळ सांगणे, घड्याळात सांगितलेली वेळ दाखवणे अशाप्रकारे सुट्टीच्या दिवसात रिकाम्या वेळेत विद्यार्थी स्वयंअध्ययन करतात. त्याचप्रमाणे मराठीचे कार्यात्मक व्याकरण, योग्य विरामचिन्ह यांचा सराव, स्वयंअध्ययन बोर्ड वरून करता येतो.

इंग्रजीसाठी prepositions, verbal contradiction, sentence making, questions making बोर्ड वरून विद्यार्थी स्वयंअध्ययन करतात याचा वापर विद्यार्थ्यांच्या निरीक्षण क्षमतेत वाढ होणे, तर्कशक्ती, आत्मविश्वास सर्जनशीलता यात भर पडली व आमचा स्वयंअध्ययन बोर्ड उपक्रम यशस्वी झाला.

15. पालकांचा व्हाट्स अप ग्रुप –

विद्यार्थी शाळेत करत असलेल्या विविध कृतींची माहिती पालकांपर्यंत पोहोचवावी, शाळेतील शिक्षकांचा पालकांशी सुसंवाद घडावा या विचारातून 'शिक्षक-पालक सुसंवाद ' या व्हाट्सअप ग्रुप ची निर्मिती करण्यात आलेली आहे.

16. स्तर निश्चिती करून स्तरनिहाय अध्यापन –

सर्वच विद्यार्थ्यांचा बुध्यांक हा वेगवेगळा असतो. काहींना जास्त माहितीची गरज असते. काही विद्यार्थी दिलेलं कार्य पटकन संपवून दुसऱ्या कार्याची वाट पाहतात. त्यामुळे कोणता विद्यार्थी कोणत्या गटात येतो याची प्रथम निश्चिती करून त्या त्या गटात प्रमाणे त्यांना कार्य देऊन सराव घेतल्या जातो.

17. पालकांचा शैक्षणिक सांस्कृतिक कार्यात सहभाग –

आमच्या शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रम हे केवळ विद्यार्थ्यां पुरतेच मर्यादित नसून या सांस्कृतिक कार्यक्रमात पालकांचाही सहभाग घेतला जातो. त्यामुळे पालकही ही आपली शाळा म्हणून शाळेकडे आत्मीयतेने बघतात व तेवढ्याच आत्मीयतेने सहकार्यही करतात.



18. गावातील विविध क्षेत्रात पारंगत असलेल्या व्यक्तींचे मार्गदर्शन –

गावात अनेक व्यक्ती अशा आहेत की त्या वेगवेगळ्या कलाकुसर मध्ये तज्ञ आहेत.तेव्हा त्यांचेही मार्गदर्शन आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो व जेव्हा वेळ असेल वेळेच्या अनुषंगाने त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन आमच्या विद्यार्थ्यांना मिळत असते. भविष्यातील सेंद्रिय शेतीचे महत्त्व याविषयीं मार्गदर्शन मिळावे म्हणून श्री. रतन बोरकरांच्या सेंद्रिय शेतीला भेट देण्यात आली. त्यांनीदेखील अतिशय उपयुक्त मार्गदर्शन केले.

शेतकरी सत्कार





19. गावकऱ्यांसाठी व विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर



20. कला महोत्सव व साहित्य प्रदर्शन (विद्यार्थी निर्मित)

21. शाळेचे यूट्यूब चैनल

22. लॉन सह छोटी बाग व परसबाग निर्मिती मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग

शाळा ही रुक्ष न राहता हिरवळीने नटलेली असावी,शाळेत रुजू झाल्यावर या हिरवळीची तीव्रतेने जाणीव झाली. आणि मग 'हिरवीगार बाग व उमललेली फुले ' हे उद्दिष्ट समोर ठेवून काळी माती, पाण्याची सोय, वाफे तयार करणे, कुंड्या, रोप, झाड आणि पावसाळा बस दोन महिन्यातच फुलांचा हिरवळीचा घेरा तयार झाला 15 ऑगस्टला फुलांच्या ताटव्यात भारताचा स्वातंत्र्य दिनाचा ध्वज फडकवण्यात आला. मग विद्यार्थ्यांमध्ये फुलांची झाडांची जाणीव निर्माण केली. विद्यार्थी शाळेत प्रति आकर्षित झाले. एक झाड एक विद्यार्थी झाडांची काळजी घेणे,पाणी देणे, कुंडीतील रोपांची काळजी घेणे, तण काढणे... यातच भर पडली सीताफळ, जांभूळ,पेरू,आंबा, पपई, बोर,लिंबू, आवळा इत्यादी फळांच्या झाडाची.... त्यातच परसबागेत पालक,मेथी, सांभार, वांगी, मिरची,टोमॅटो,शेवग्याच्या शेंगा इत्यादी ची भर पडली आणि आपली शाळा म्हणजे फळाफुलांनी बहरलेली बाग आहे. त्यासाठी आपल्या मॅडम झटत आहे हे मुलांना दिसत होते त्यामुळे विद्यार्थीही कंबर कसून कामाला लागले आणि आज प्रत्येक विद्यार्थ्याला शाळा, बाग फुले

यांच्याविषयी आत्मीयता दिसून येते. एक विशेष म्हणजे आमचे विद्यार्थी दूत असून शाळेतील कुठल्या झाडाला, वस्तूला, फुलांना गावकरी इजा पोहोचत नाही.

अशा वृत्तीची जोपासना म्हणजेच आमच्या कार्याची जणू पावतीच !



23. हिंगणघाट तालुक्यातील ब्लेझर गणवेश असलेली पहिली जिल्हा परिषदेची शाळा -

कॉन्व्हेंटच्या गणवेश हा विद्यार्थ्यांना व पालकांना जास्त आकर्षित करतो, जेव्हा विद्यार्थ्यांची गुणवत्ता कॉन्व्हेंट मधील विद्यार्थ्यांप्रमाणेच आहे तेव्हा आपल्याही शाळेतील विद्यार्थ्यांचा गणवेश हा कॉन्व्हेंटच्या गणवेशासारखाच असावा ही कल्पना मनात आली परंतु पालकांना हा गणवेश परवडण्यासारखा नव्हता. म्हणूनच शोध सुरू झाला तो दात्यांचा.



आमच्या शाळेची किर्ती हिंगणघाट पर्यंत पोहचलीच होती. त्यामुळे हिंगणघाट येथील वना नागरिक बँकेचे संचालक माननीय सुधीर बाबू कोठारी यांनी आमच्या शाळेला ब्लेजर गणवेश देण्याचे कबूल केले व दिले सुद्धा व त्यातून हिंगणघाट मधील ब्लेझर असलेली पहिली शाळा म्हणून शाळेचा उदय झाला. गणवेशा मुळेदेखील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर किती प्रभाव पडतो,याचीदेखील प्रचिती आम्हाला या गणवेश बदलामुळे आली आमचे विद्यार्थ्यांमधेअधिक आत्मविश्वास वृद्धिंगत झाला.

24. सामान्य ज्ञानस्पर्धा –


पाठ्यपुस्तका बरोबरच विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान देखील वाढावे म्हणून परिपाठात दररोज दोन सामान्य ज्ञानाचे प्रश्न घेऊन महिन्याच्या अखेरीस एक सामान्यज्ञान चाचणी घेण्यात येते. व अधिक चांगले गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यास बक्षीसही देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चढाओढ निर्माण होऊन अधिक सामान्य ज्ञान मला कुठुन मिळवता येईल यासाठी विद्यार्थी जागृत झालेले आहेत.

25. सर्व विद्यार्थ्यांना लोकसहभागातून समान स्वेटर



या सर्वांचा परिपाक म्हणजे गावातील एकही विद्यार्थी बाहेर कॉन्व्हेंट मधे जात नाही. बाहेर गावातील पालक आपल्या मुलांना नातेवाईकाजवळ शिकण्यास ठेवतात व ती मुलं आमच्या सुलतानपूर शाळेत दर्जेदार शिक्षण घेत आहेत. जिथे मुले शाळेची घंटी कधी वाजेल व घरी जाण्याची सुट्टी कधी होईल याची वाट पाहतात तिथेच या शाळेतील मुलांची पावले सुट्टी झाल्यावरही घराकडे वळत नाही. इयत्ता 1 ते 5 वर्ग असलेली ही शाळा, प्रत्येक वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता नुसार अपेक्षित क्षमता पूर्ण केलेल्या आहेत. इयत्ता पहिलीचे विद्यार्थी ! सत्र संपायच्या आतच 100% विद्यार्थी वाचन, गणन व संख्यावरील क्रिया अचूकपणे करतात. सोबत बालवाचनालयातील पुस्तकांचाही आनंद घेतात. वर्ग दुसरीतील विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर जणू मोतीच ! इयत्ता दुसरीला गणित विषयात अपेक्षित स्तर म्हणजे वजाबाकी स्तर ! पण हे चिमुकले भागाकर ही अचूकपणे सोडवतात .इंग्रजीच्या कविता असो,ड्रामा,संभाषण, इत्यादीमध्ये येथील विद्यार्थी कुठेच कमी पडताना दिसत नाही. एवढेच नाही तर दिलेल्या वाक्यांचे इंग्रजी मधून भाषांतर देखील करतात. आमच्या शाळेत फक्त शैक्षणिक गुणवत्तेवरच भर नाही तर समाजासाठी एक उत्तम माणूस कसा घडेल यासाठी मूल्यवर्धन उपक्रमाची विशेष सांगड घालून माणूस घडवणारी मूल्ये शाळेत रुजवली जात आहे. (मी आणि मूल्यवर्धन) या पुस्तकात शाळेतील देशमुख मॅडम यांचे अनुभवाची निवड करण्यात आली. छोट्याशाच प्रांगणात असलेली पालेभाज्यांची परसबाग मुलांच्या योग्य शारीरिक वाढीसाठी मोलाची भूमिका बजावत आहे. यातच 14 वे वित्त आयोगामार्फत 52 इंचाचा स्मार्ट टीव्ही देखील शाळेला प्राप्त झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कठीण संकल्पना युट्युब, गुगल, क्रोम, विकिपीडिया च्या माध्यमातून स्पष्ट होत आहे. शाळेला प्राप्त झालेल्या डिजिटल साहित्यातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापनात उपयोग व्हावा म्हणून दररोज काही ठराविक वेळ डिजिटल साहित्याच्या साह्याने अध्ययन करण्यासाठी देण्यात येतो व विद्यार्थी आज हे सगळे साहित्य एवढ्या चांगल्या प्रकारे हाताळतात की भविष्यातील टेक्निशियन, इंजिनियर त्यांच्या रूपात दिसायला लागले आहेत. त्याचीच परिणीती म्हणजे आत्तापर्यंत शिक्षकांना तंत्रस्नेही होण्याची चळवळ उभारली गेली, परंतु माझ्या शाळेतील 'तंत्रस्नेही बनले छोटे सुलतान' या नवोपक्रमाचा उदय झाला आहे. गावची लोकसंख्या 350 एवढीच परंतु गुणवत्तापूर्ण शिक्षण या शाळेत मिळते या विश्वासाने नातेवाईकांची मुले सदर शाळेत दाखल करण्यात येत आहे. त्यामुळे शाळेची पटसंख्या चा आलेख दिवसेंदिवस वाढतच आहे. गुणवत्तापूर्ण - गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणतात ते हेच काय?हे मनाला पडलेलं कोडे ईथे आल्यावर सुटल्याशिवाय राहत नाही. इथे अध्ययन-अध्यापनाच्या चाकोरीबद्ध पद्धतीतून बाहेर पडून विद्यार्थ्यांच्या प्रत्येक विचाराला मुक्त होण्याची संधी आहे. अभिव्यक्ती, सृजनशीलता, कल्पनाविश्वाला बहर आहे.

शाळेच्या गुणवत्तापूर्ण वातावरणामुळे बाहेरील जिल्ह्यातील नागपूर,चंद्रपूर यवतमाळ येथील शिक्षक वर्ग त्यांच्या विद्यार्थ्यांसह शाळेला भेटी दिलेल्या आहेत. आजूबाजूच्या तसेच बाहेरच्या साठी ही शाळा प्रेरणादायी ठरत आहे. सदर शाळेची प्रेरणा घेऊन शिक्षक आपल्या क्षेत्रात कार्य करण्यास प्रेरित झालेले आहेत.





यवतमाळ जिल्ह्यातील शिक्षकांची शाळेला भेट



नागपूर येथील शिक्षक व विद्यार्थ्यांची शाळेला भेट



शिक्षणाच्या वारीत शाळेचा सहभाग

लोकमत



प्रयोगशील शाळा

आनंद इंगोले

'गुणवत्तापूर्ण मुले व बागेत फुललेली फुले' या उद्देशाने शुभांगिनी वासनिक व मयुरी देशमुख या दोन्ही शिक्षिका शाळेत रुजू होताच त्यांनी शाळेत विविध उपक्रम हाती घेतल्याने विद्यार्थ्यांची १०० टक्के उपस्थिती राहात आहे.

जिल्हा परिषदेची 'इनोव्हेटिव्ह स्मार्ट कॉन्व्हेंट स्कूल'

सुलतानपूरची शाळा : विद्यार्थ्यांना लावली शिक्षणाची गोडी

लोकमत न्यूज नेटवर्क

वर्धा : जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणताच पालकांचा व समाजाचा त्या शाळांकडे बघण्याचा दृष्टिकोन काही वेगळाच असतो. परंतु, आता त्याला जिल्हा परिषदेच्या काही शाळा अपवाद ठरत आहेत. त्यातीलच एक शाळा म्हणजे हिंगणघाट तालुक्याच्या सुलतानपूर येथील 'इनोव्हेटिव्ह स्मार्ट कॉन्व्हेंट स्कूल' होय.

सुलतानपूरच्या या जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये भौतिक सुविधांची फारशी उपलब्धता नसताना आहे त्याच परिस्थितीमध्ये स्वच्छ व सुंदर परिसर तयार करण्यात आला. त्यामुळे शाळेच्या प्रवेश द्वारापासूनच येथे ज्ञानरचनावादाला सुरुवात होते. विद्यार्थ्यांच्या चिकित्सकवृत्तीला खतपाणी मिळण्याच्या दृष्टीने शाळेच्या प्रवेशद्वाराजवळच विविध विषयांचे शैक्षणिक फलक तयार केले असून ते सर्वांच्या स्वागतासाठी तयार आहे. शाळेच्या मागे असलेल्या छोट्याशा मैदानावर हिरवळ तयार केली असून तेथे रंगीबेरंगी फुलझाडेही लावण्यात आली आहे. गेल्या तीन ते चार वर्षांपासून शिक्षिकांनी शिक्षणाच्या सेवाव्रतात वाहून घेतल्याने शाळेचे रुपडे पालटले आहे. डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या या शाळेमध्ये नवचैतन्य निर्माण केले. पालकांच्या मनामध्ये असलेली अनास्था दूर करून शाळेचे वातावरण आनंदमयी व बालस्नेही करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. परिणामी, या शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थितीही वाढली आहे.

सुलतानपूर पॅटर्न

या शाळेमध्ये कॉन्व्हेंटचे वातावरण तयार केल्याने गावातील एकही मुलगा बाहेरगावी जात नाही. येथे विद्यार्थी अध्ययन जोडी, वाढदिवस साजरे करणे, कौशल्याधिष्ठित उपक्रम, अध्ययनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, स्वयंअध्ययन बोर्ड, पालकांचा व्हॉट्सअॅप ग्रुप,पालकांचा शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग, शाळेचे युट्यूब चॅनेल, सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन आदी उपक्रम राबविण्यासोबतच ब्लेझर गणवेश असलेली ही पहिलीच शाळा आहे.



दृष्टिक्षेपात शाळा

स्थापना	इयत्ता
1963	१ ली ते ५ वी
20	11

- शाळेची वैशिष्ट्ये : हिरवळीचे क्रीडांगण, निसर्गरम्य वातावरण
- शाळेचा सन्मान : तीन वर्षांपासून शिष्यवृत्ती परीक्षेस पात्र ठरत आहे.

चित्रपटात साकारली बालकलाकाराची भूमिका

जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात सुहानी संजय भगत या विद्यार्थिनीने नाट्यछटेत पहिला क्रमांक प्राप्त केला. या अभिनयानंतर तिने मराठी चित्रपट 'बिन्हाड'मध्ये भूमिका साकारली आहे.

गावातील एकही विद्यार्थी कॉन्व्हेंटमध्ये जाऊ नये, याकरिता गावातील शाळेतच विविध उपक्रमांची पायाभरणी केली. याच शाळेला कॉन्व्हेंटचे रुप दिले.

-शुभांगिनी वासनिक, मुख्याध्यापक


शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांना शिस्त लागली. फळ्याऐवजी आता स्मार्ट बोर्डवर शिकविले जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांची उपस्थितीही वाढली आहे.


-अर्चना संजय भगत, पालक


Hello Wardha
Page No. 4 Jan 20, 2020
Powered by: erelego.com


नुकताच covid-19 या आजाराने जगभरात थैमान घातले होते. त्याचा सर्वात जास्त परिणाम शाळांवर झाला. तेव्हा ऑनलाइन तंत्रस्नेही प्रशिक्षणाचा आम्ही लाभ घेतला . 2019-20 मधे राबवलेला तंत्रस्नेही बनले छोटे सुलतान राज्य पुरस्कार प्राप्त कु. शुभांगिनी वासनिक यांचा नवोपक्रम covid-19 च्या काळात अतिशय उपयुक्त ठरला. 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' या अंतर्गत ऑनलाइन एज्युकेशन ला फार महत्त्व आले आणि शाळेच्या विद्यार्थ्यांना डिजीटल साधनांच्या वापरा बाबत माहिती होतीच .परंतु केवळ 40% पालकांकडेच स्मार्टफोन होते. हा प्रश्न आमच्या लक्षात आला. ऑनलाइन शिक्षणा साठी 100% विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात यावे म्हणून 'संकट बनले संधी' हा नवोपक्रम 2020-21 मधे शाळेतील सहाय्यक शिक्षिका कु.मयुरी देशमुख ह्यांच्या कल्पनेतून उदयास आला . यशस्वीता म्हणजे इयत्ता 1 ली ते 5 वी पर्यंतचे सर्व विद्यार्थी गोष्टीचा शनिवार व स्वाध्याय उपक्रम यात 100% सहभाग घेत आहेत . 'गोष्टीचा शनिवार 'उपक्रमा अंतर्गत टिचर ऑफ द वीक मधे सुद्धा शाळेची निवड झालेली आहे. भौतिक सुविधे अंतर्गत 4 वर्षाच्या अथक प्रयत्ना नंतर जि.प. वर्धा यांचे निधीतून सहा लक्ष रुपयांच वॉल कंपाऊंडचे बांधकाम नुकतेच पूर्ण झालेले आहे व बारा लक्ष रुपयांची वर्ग खोली देखील शाळेला मंजूर केलेली आहे. नवीन इमारतीच्या सुशोभनाकरिता, इलेक्ट्रिक फिटिंग करिता, तसेच पाण्याची व्यवस्था करणे करिता पुन्हा खर्चाची बाब उभी झाली. पुन्हा एकदा दात्याच्या शोधात असताना ही अडचण पंचायत समितीचे विषय साधन व्यक्ती श्री.सुकळकर यांच्या सहकार्याने पी.वी. टेक्सटाईल जामचे महाप्रबंध श्री.भूपेंद्रजी शहाणे यांनी CSR अंतर्गत एक लक्ष रुपयांचा धनादेश शाळेला सत्र 2022- 23 मध्ये मिळून दिला. पुन्हा एकदा भौतिक सुविधा सज्ज करण्यास बळ मिळाले.

हे सर्व सुरु असताना गुणवत्तेच्या बाबतीतही अनेक उपक्रम सुरूच होते. त्यात शिष्यवृत्ती परीक्षेत सत्र 2021 _ 22 मध्ये शंभर टक्के विद्यार्थी पात्र झाले. सत्र 2022 - 23 मध्ये 80 टक्के विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले. अशातच वर्धा जिल्ह्याला ब्लेंडेड कोर्स निर्मिती अंतर्गत भाषा हा विषय मिळालेला होता त्यात शाळेच्या मुख्याध्यापिका वासनिक मॅडम व इयत्ता पहिलीतील विद्यार्थी साक्षी व साई यांचा ब्लेंडेड कोर्स व्हिडिओ निर्मितीत सहभाग ही शाळेसाठी अभिमानाचीच गोष्ट आहे. तसेच एन. ई. पी 2020 अंतर्गत येणाऱ्या नवभारत साक्षरता कार्यक्रमात शुभांगीनी वासनिक यांनी राष्ट्रीय स्तरावर ट्रेनिंग घेऊन महाराष्ट्र राज्याचा उजास या अभ्यासक्रमाच्या निर्मितीत सहभाग नोंदवलेला आहे, त्याचप्रमाणे नव्याने सुरू झालेला वर्धा डायट चा हिल टॉप उपक्रम अंतर्गत अध्ययन स्तर निश्चिती नुसार विद्यार्थी तयार करण्याकरिता येणाऱ्या प्रश्नांचा सराव घेण्यात येतो. हिलटॉप साठी मुख्याध्यापिका वासनिक व देशमुख मॅडम यांचाही प्रश्न निर्मिती सहभाग असून हा सराव घेत असताना विद्यार्थिदेखील अध्ययन निष्पत्तीला धरून प्रश्नांची निर्मिती करू लागले .पिसा लेव्हलची विद्यार्थी तयार करण्याचे शिक्षकांचे प्रयत्न अविरत सुरूच आहे.




आठवडा १८
HILLTOP
(Higher Level Learning Outcomes Practice to get an Outstanding Performance)
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा
दिनांक : १/१/२०२४ विषय : गणित (इयत्ता ४ थी व ५ वी))
प्रश्न १) पुढील आकृतीबंध पूर्ण करा.
297, 99, 33, ...
अ) ११
ब) १२
क)१३
ड) १४
Que 1) Complete the following pattern.
297, 99, 33, ...
A) 11
B) 12
C) 13
D) 14
कु. शुभांगिनी मनोहरराव वासनिक
जि.प. प्राथमिक शाळा सुलतानपूर
ता. हिंगणघाट, जि. वर्धा
गुणवत्ता विकास हाच आमचा ध्यास


आठवडा १७
HILLTOP
(Higher Level Learning Outcomes Practice to get an Outstanding Performance)
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा
दिनांक : २६/१२/२०२३ विषय : गणित (इयत्ता २ री व ३ री)
प्रश्न १) ८९७ हे उत्तर येण्यासाठी अचूक संख्यांची जोडी कोणती?
अ) ४३९ व ४७२
ब) ४९० व ४९७
क) ५३८ व ३५९
ड) ४७८ व ४२९
Que 1) Which is the correct pair of numbers to give the answer 897?
A) 435, 472
B) 490 व 497
C) 538 व 359
D) 478 व 429
श्रीमती मयुरी देशमुख
जि.प. प्रा.शाळा सुलतानपूर
ता. हिंगणघाट, जि. वर्धा
गुणवत्ता विकास हाच आमचा ध्यास





आनंददायी शिक्षणासाठी नवोपक्रम

(ज्ञानरंग बालकेंद्र ते विद्यालये संस्कृतम्)

शाळेचे नाव - जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची प्राथमिक शाळा, सारस्वत कॉलनी, नेहरू रोड, डोंबिवली पूर्व, मुंबई.

Email ID - geisprimaryschooldombivali@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - सौ समता जगन्नाथ पावसकर


प्रास्ताविक -

"ज्ञानरंग बालकेंद्र ते विद्यालय संस्कृतम्" खरंतर आपल्या जीवनात मातृभाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामध्ये संस्कृत भाषा ही तर देववाणी मानली जाते अमृताहुन गोड असलेली या भाषेला शालेय शिक्षणात शासन दरबारी अध्ययन भाषा म्हणून स्थान मिळेल या भरवशावर न राहता आलेल्या संधीचे सोने करत शाळेने हे पाऊल उचलले आणि प्राथमिक स्तरावर संस्कृत विषयाचा अंतर्भाव केल्याने आनंदाने पालक शिक्षक व विद्यार्थी हे सर्वच संस्कृत सैनिक म्हणून कार्यरत झाले. अयनम् या पुस्तिकेद्वारे 350 विद्यार्थी शिलेदारांनी या प्रवासाचा एक टप्पा पूर्ण करत चैत्रगौरीच्या साक्षीने त्याचा वार्षिकोत्सव सोहळा, शाळा व संस्कृत भारती कोड.कण प्रांताच्या संयुक्त विद्यमाने अध्ययनामध्ये यशस्वी झाले.

|| विद्याधनम सर्वधनात प्रधानम् ||

ज्ञान ही सर्वात मोठी संपत्ती आहे जिथे मालक आपण स्वतः असतो या संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी उच्चार स्पष्ट होण्यासाठी, वाणीत माधुर्य येण्यासाठी अशा जयतु संस्कृतम विश्वपोषकम् अशी वैश्विक स्तरावर आपली प्रतिमा निर्माण करणारी संस्कृत ही एक सर्वात प्राचीन भाषा असून कवी वाल्मिकी हे संस्कृत भाषेचे आद्यकवी होत संस्कृत भाषेला सर्व भाषांचे जननी म्हटली जाते. संस्कृत भाषेतील शब्द भांडार अतिशय समृद्ध आहे एका शब्दासाठी अनेक पर्यायी शब्द आहेत देवांची अनेक नावे असतात उदाहरणार्थ विष्णुसहस्रनाम, गणेश सहस्रनाम इ.विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढावा तसेच शुद्ध वाणी व्हावी यासाठी प्राथमिक स्तरावर संस्कृत भाषेविषयी आवड निर्माण करण्यासाठी हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. याचे उद्घाटन २ जुलै २०२२ रोजी करण्यात आले.

लिंक - https://www.youtube.com/watch?v=CAW06Psr0G8



सदर विषयांतर्गत अधिक प्रभावी केलेले काम –

एकविसाव्या शतकात संस्कृत भाषेची स्थिती अतिशय दयनीय झाली आहे. लोक संस्कृत भाषा शिकण्याचा फारसा प्रयत्न करत नाही. शाळेत केवळ एक विषय म्हणून इयत्ता आठवी ते दहावीच्या वर्गांना हा विषय असतो संस्कृत भाषा मृतभाषा होणार की काय? हा प्रश्न सतत सतावत होता जेव्हा नित्य व्यवहारात ही भाषा बोलली जाईल संवादात तिचे अस्तित्व राहील तेव्हाच ती मातृभाषा म्हणून गणली जाईल. भाषांच्या मातृस्थानाचे संस्कृत भाषेचे महत्व अबाधित ठेवण्यासाठी प्राथमिक स्तरावर म्हणजे इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना ही भाषा आनंददायी शिक्षणातून देण्याचा हा अनोखा उपक्रम राबवण्याचा प्रामाणिक प्रयत्न…

प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी –

संस्कृत विषय प्राथमिक स्तरावर शिकवण्यासाठी संस्कृत कोड.कण प्रांताचे शिक्षक नेमले गेले. त्यामधील काही शाळेतील शिक्षक सहभागी झाले. माध्यमिकच्या संस्कृत विषयाच्या शिक्षकांची मदत घेतली गेली व वर्षभर दर शनिवारी सकाळ व दुपार अधिवेशन मध्ये एक एक तास सदर विषय शिकवण्यात येऊ लागला .

१) प्रथमतः संस्कृतचे शिष्टाचार म्हणजे सुप्रभातम् , शुभसायम् ,नमस्कारम् इत्यादी शब्दांची ओळख करून दिली.

२) विविध वस्तूंची मराठीतील नावे संस्कृत मध्ये सांगण्यात आले उदाहरणार्थ-गज: -हत्ती, खग:- पक्षी काक:- कावळा इ.

३) खेळा द्वारे संस्कृत विषयाची तयारी करून घेतली गेली

४) संस्कृत मधून पाढे म्हटले जाणे.


५) सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत दिनचर्येचा अभ्यास प्रत्यक्ष विद्यार्थी सहभागातून

६) संस्कृत मधून नाटक ,समूहनृत्य ,समूहगीत, संस्कृत अंताक्षरी अशा विविध उपक्रमांची प्रात्यक्षिके घेतली गेली.

लिंक - https://youtu.be/50DV0yBaAwE?feature=shared

https://youtu.be/0BnDlpcYHic?feature=shared

https://youtube.com/watch?v=-Xhz-nwNIJs&feature=shared



अंमलबजावणी नंतरची फलनिष्पत्ती –

पूर्ण वर्षभर संस्कृतचे अध्ययन झाल्यानंतर 25 मार्च 2023 रोजी चैत्र गौरीची स्थापना करून एक तासाचा संपूर्ण संस्कृत मधून ज्ञानरंग बालकेंद्र ते विद्यालय संस्कृतम् हा कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केला त्यामध्ये संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कुमारी गौरी खरे यांनी केले व दीपप्रज्वलना नंतर .....


संस्कृत गणेशवंदनाम्, संस्कृत दिनाचरणम्, जलकुपी क्रीडा, कथाकथनम्, संस्कृत नाटकम्, वैयक्तिक गीतम्, संस्कृत अंताक्षरी, समूह नृत्य अशा वैविध्यपूर्ण माध्यमातून संस्कारक्षम कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले व सदर कार्यक्रमांद्वारे संस्कृत विषयाचे यश संपादन झाले. विद्यार्थी अतिशय उत्तम रीतीने संस्कृत बोलू शकतात शिवाय इयत्ता पहिली व दुसरीच्या मौखिक परीक्षा व इयत्ता तिसरी व चौथीच्या लेखी परीक्षा घेण्यात आल्या. त्यामुळे संस्कृत विषयाची महती पालकांना कळली आणि पालक प्रतिसाद उत्तम मिळाला.

लिंक - https://youtube.com/watch?v=HPRDA0upFEQ&feature=shared

समारोप -

संस्कृत ही जगातील सर्वात जुनी भाषा आहे. प्रत्येक घरात संस्कृत बोलणे आवश्यक आहे. संस्कृत भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी लहान वयातच नवीन शैक्षणिक धोरणानुसार आपल्या विद्यार्थ्यांना नवनवीन शैक्षणिक दालनामध्ये संचार करण्यास उद्युक्त करणे हे शिक्षकांचे आद्य कर्तव्य आहे आणि त्या सर्व क्षेत्रांमध्ये संस्कृत अनेक विविध पद्धतीने सहाय्यभूतच ठरेल. भगवद्गीता पठण स्पर्धा, रामरक्षा शुद्धलेखन पाठांतर स्पर्धा, संस्कृत वार्तालाप सभा इत्यादी मध्ये विद्यार्थी चमकतील हेच खरे.

॥ शुभम् भवतु ॥



One Page Translation - an innovative activity

School Name - Ajitrao Ghorpade Vidyalaya Kalambi,Tq.Miraj, Dist –Sangli

Headmaster Name - SHRI. PURUSHOTTAM DHONDIRAM GHADAGE


Objectives – initiative

1) To increase the vocabulary of students.
2) To reduce the fear about English language.
3) To enhance the translation skill among students.
4) To help the students to understand the text.
5) To improve the understanding skill of student.
6) To Translate different types of informative texts from English into mother tongue.
7) To make students able to read the text meaningfully.
8) To make students able to read and translate other topics also.
9) To improve reading skill of basic LSRW.
10) Useful for all classes.

Nature of Implementation.

1) First of all, we have selected the lesson from the text. after that we finalized a page for the activity.ie- One page translation.
2) After selection of page we count all the words from the given page and make the list of all words. And we count all the sentences also.
3) We give all the words with Marathi meaning and give time for reading and practice of all words.
4) We arrange a test of all these words for practice and preparation of one page translation activity. Once students able to understand all these given words the next step is-
5) We take one …two.. three … more times ample practice of words through written test. We make the result of this word test too.

   We take the practice of written test till 100% students can understand all the words given pager with meaning.



6) Then teacher explains the meaning of that page to all students with the translation of that words.

7) Core of the Activity.
Eg. -

Tea is a popular drink.

We arrange the one page translation test as per above given example.

We provide only other pronunciation of text and students have to write its spellings as well as word to word translation of all words. Lastly they have to write full meaning of given sentences.

8) In this way students can understand how to read and translate the given page clearly.

Teachers arranged the repetition of tests till students are not able to translate the page clearly. And kept its result for the accuracy of activity.

Duration of initiative

Duration of this initiative is 10 days. It may be flexible as per students.

Day – 1 – To choose the page for comprehension.

Day -2 - To count the sentences and words and giving meaning.

Day – 3 - Practice of words with meaning.

Day – 4 - Practice of words with meaning.

Day – 5- Practice of words with meaning.


Day -6 – To take the words test.

Day -7 – To take repetition of words test if necessary.

Day – 8- Practice of main Test with words meaning as well as sentence meaning.

Day -9 – Arrangement of main test.

Day -10 - Making result of activity.



Outcomes -

A) Individual Level (Students)

1) Students are able to read the given page Fluently.
2) Increase the student's vocabulary.
3) Understands meaning of each word as well as each sentence from given page.
4) Creates the interest about studying English language.
5) Development of translation skill.

B) Institutional Level (School)


1) Useful for all classes.
2) Increase the vocabulary of all category students.
3) Creates the interest about studying in English language.

Success of initiative -

This activity is very useful to all classes from 5th to 10th classes. We conducted this activity in the month of July as well as August 2023 in all class from 5th to 10th class. We found the success rate of the activity is nearly about 80% to 90 % average in semi-English as well as Marathi medium classes. We can conduct this activity to improve English language skills. We can create awareness about English language within students. This activity is very useful to develop the translation skill of English language.

Universalizes the story of success -

We can use this activity in all schools in cluster level. We can use social media like Facebook, YouTube, WhatsApp etc. If we can conduct this activity in every class, it will be helpful to increase students' vocabulary, language skill, translation skill it will be useful to make awareness about English it reduces the fear about the English language.





Link of the activity Video -

https://www.youtube.com/watch?v=F6-FO9ZG3xY


https://www.youtube.com/watch?v=CK2rdKjHsjY

Some photographs of this activity -









"Integrated Learning in the Modern Age - Navigating Competitive Exams, Mental Health, and the Digital Revolution."

Name of the school - D.S. High School, Sion, Mumbai.

Email ID – dshighschoolsion@gmail.com

Name of Principal - Dr. Shubhangi Santosh Gaikwad

"True education is not about mere information but transformation; it's the alchemy that turns the lead of raw potential into the gold of realized Self. In contemporary educational discourses, the phrase "holistic development of a child" has emerged as a central theme. Championed by some of the leading lights of progressive education, it serves as a beacon for parents and educators who prioritize Integrated learning. This concept is not just aesthetically pleasing but profound, encompassing the myriad facets of a child's life. It underscores the importance of nurturing every latent ability within the child, transcending mere academics to integrate physical, ethical, and spiritual dimensions of education—addressing both corporeal and ethereal needs. Life, when broadly viewed, bifurcates into the tangible, the domain of our physical existence, and the intangible, where emotions and thoughts reside.

Theosophical perspectives further refine this view into three distinct realms:


1. **The Physical Sphere**: Pertaining to our bodily existence.
2. **The Ethical Sphere**: Encompassing emotions and intellect—essentially, the life of the spirit.
3. **The Spiritual Sphere**: Attuned to the eternal inner essence, the quintessential thinker within.

Established in 1939, Shiv Shikshan Sanstha's D.S. High School is ISO **21000:2018** certified institution, first Marathi Medium school in Mumbai stands as a beacon of hope in the heart of Asia's largest slum, Sion, Mumbai. This Marathi medium school, located at M.D. Kulkarni Marg, Scheme No. 6, Road No. 24-C, has emerged as a symbol of excellence, defying economic constraints and nurturing young minds for over eight decades.

